PAGES MISSING WITHIN THE BOOK ONLY

DAMAGE BOOK

brown book

UNIVERSAL
LIBRARY

OU_192390

UNIVERSAL
LIBRARY

OUP—552—7-7-66—10,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M915.4 L44B Accession No. M10

Author

Title भारतीय श्रेष्ठत्व

This book should be returned on or before the date last marked below.

भारतीय श्रेष्ठत्व.

लेखक

के० दत्तात्रय गोपाळ लिमये, बी. ए.

(माजी दुय्यम संपादक, केसरी)

व

रा. रा. शंकर रामचंद्र बेडेकर बी. ए.


आवृत्ति दुसरी.

सन १९२५

किंमत १।४.

मुद्रक व प्रकाशक,
रा. रा. शंकर नरहर जोशी, " चित्रशाळा प्रेस "
१०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

प्रकाशकाचे दोन शब्द.




'भारतीय श्रेष्ठत्व' हा ग्रंथ चित्रमयजगतमधून प्रकरणशः प्रसिद्ध झाला होता. तो आतां कित्येक विद्वान लोकांच्या सूचनेवरून पुस्तकरूपाने लोकांपुढे मांडण्यांत आला आहे. याचा पहिला भाग केसरीचे दुय्यम संपादक कै० दत्तात्रय गोपाळ लिमये यांनी लिहिलेला आहे व सर्व ग्रंथ त्यांच्याच हातून पुरा झाला असता तर बरें झालें असतें. परंतु ईश्वरी संकेत निराळा असल्यामुळें लिमये यांच्यावर १९१५ सालीं काळाने झडप घातली. यानंतर या ग्रंथाचीं राहिलेलीं प्रकरणें पुरें करण्याचें काम योग्य गृहस्थ न लाभल्यामुळें चार वर्षे तसेच पडून राहिलें होते. परंतु १९१९ मध्ये रा० शंकर रामचंद्र बडेकर यांनीं परिश्रमपूर्वक उत्तरार्ध लिहून देण्याची जबाबदारी पत्करली व ती योग्य प्रकारें पार पाडली हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो.

हा ग्रंथ कोणत्या धोरणाने व काय आधारावर लिहिण्यांत आला, याचें दिग्दर्शन कै० लिमये यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत उत्तम रीतीने केलेलेच आहे. तेव्हां त्याची पुनरुक्ति येथें करण्याचें कारण नाहीं. तथापि वाचकांना एक सूचना देणें अगत्याचें दिसतें. ती ही कीं, या ग्रंथांत भारतीय वाङ्मय, गणित, ज्योतिष तत्त्वज्ञान, संगीतशास्त्र वगैरे सर्वच विषयाची माहिती दिलेली आहे, ती वाचकाना बहुश्रुतपणा आणण्यास चांगली उपयोगीं पडेल. तथापि सर्वच प्रकरणें प्रत्येक वाचकास एकसारखी मनोरंजक व सुबोध वाटणार नाहींत. याचें कारण, कोणास गणिताची गोडी असते तर कोणास संगीतशास्त्र अवगत असतें; आणि आपल्या आवडीच्या विषयासंबंधीचें विवेचन कोणासहि झालें तरी जसें बारकाईने लक्षांत येतें, तसें इतर विषयासंबंधी म्हणतां येत नाहीं. याकरितां आवडत्या विषयावरील प्रकरणें प्रथम वाचून ग्रंथपद्धति लक्षांत घेतली म्हणजे इतर भाग समजण्यास तादृश अडचण पडणार नाहीं. प्रत्येक भागांतील विवेचन अगदीं स्वतंत्रपणें करण्यात आलें असल्यामुळें मधलाच एखादा भाग वाचण्यास हरकत नाहीं. साराश, आपल्या परिचयाच्या प्रकरणापासून सुरवात करून सर्व ग्रंथाचें लक्षपूर्वक अध्ययन करणाऱ्यास आमच्या संस्कृतीचें यथार्थ स्वरूप लक्षांत येऊन आज पाश्चात्य संस्कृतीपासून आम्हास कोणता भाग उचलावयाचा आहे, याचा निर्णय करण्यास चांगली मदत व्हावी अशी ग्रंथाची मांडणी आहे ती लक्षांत घेऊन वाचक या ग्रंथाचें योग्य चीज करतील अशी आम्हांस आशा आहे.

व्यवस्थापक—चित्रशाळा, पुणें.

प्रस्तावना.



कुस्तीमध्यें एका मल्लानें दुसऱ्या मल्लास चांत केलें, तर याचे अंगीं पहिल्यापेक्षां शरीरसामर्थ्य, चपळपणा किंवा पेचांचें ज्ञान कमी आहे, इतकेंच फार झालें तर जग म्हणतें. याच न्यायानें, रणभूमीचे आखाड्यांत दोन राष्ट्रांचा कुस्ती होऊन तींत एकाचा पराजय झाला, तर त्याजवळ पहिल्याइतकें लष्करी सामर्थ्य, हत्यारांचा सरंजाम, डावपेंचांचें ज्ञान, पैशाचा पुरवठा अगर शौर्य नाहीं, इतकेंच फार झालें तर जग न्यायानें म्हणूं शकेल. पण जग इतकेंच म्हणून रहात नाहीं. तें याच्याही पलीकडे जाऊन जित राष्ट्रास सर्व बाबतींत सर्व बाजूंनी नादान ठरवूं पाहते ! जगाच्या या मनोवृत्तीस जेत्या राष्ट्राकडून स्वाभाविकपणेच उत्तेजन मिळत असतें; किंबहुना जित राष्ट्राचा तेजोभंग करण्याच्या या कार्यांत विजयी राष्ट्रच अहंकाराने प्रेरित होऊन पुढारीपण घेत असतें. जेत्या राष्ट्रानें किंवा जगानें जित राष्ट्रसंबंधाने आपली अशी समजूत करून घ्यावी, हा दुष्टपणा किंवा अधमपणा यापेक्षा अहंकारी मानवी स्वभाव व तज्जन्य गैरसमज यांचाच खेळ आहे, हें सांगावयास नकोच.

हिंदुलोक, हिंदुराष्ट्र व हिंदुस्थान यांचा रणभूमीवर व मुत्सद्दीपणाच्या डावपेंचांत अखेरीस पुरता मोड व पराजय होऊन त्यांस राजकीय पारतंत्र्य आल्यादिवसापासून **हिंदु** चोकांचीही स्थिति बहुतांशीं वरील प्रकारचीच झाली होती. **हिंदूंचा** जातिभेद, **हिंदूंची** मूर्तिपूजा, **हिंदूंचे** तत्त्वज्ञान, **हिंदूंचें** वाङ्मय, **हिंदूंचें** शिल्प, **हिंदूंची** स्त्रियाविषयींची कल्पना, सारांश **हिंदूंचें** जें जें काय असेल तें तें त्याज्य, नादान, टाकाऊ व गचाळच आहे किंवा असलें पाहिजे, असें जगांतील सामान्य लोक गृहीतच धेऊन चालूं लागले ! यांतच युरोपीयन मिशनरी व प्रवासी याच्या पुस्तकांनीं व व्याख्यानांनीं भर घातली. विशेष दुःखाची व शोचनीय गोष्ट ही की, आमच्यांतीलही कांहीं पुढाऱ्यांत हीच कल्पना अतिशय जोरानें रुजून तेही **हिंदुधर्म** व **हिंदुसमाज** यांजवर निष्ठुरपणें प्रहार करीत सुटले ! याचा एकंदरींत **हिंदुसमाजावर** अत्यंत अनिष्ट परिणाम होऊन समाजबंधन शिथिल झालीं, व त्यामुळें त्याचें समष्टिरूपाचें सामर्थ्य ऱ्हास पावूं लागलें, आम्हींच काय ते सर्व जगांत सर्वतोपरि श्रेष्ठ आहों व पुढेंही श्रेष्ठच राहणार, ही कल्पना जितकी अभ्युन्नतीस अपायकारक आहे; तितकीच, आम्ही सर्व प्रकारें

नादानच आहों व नादानच राहणार, ही मनोवृत्तिही उणतीस घातक असते, हें त्या काळीं कोणाचेंही फारसें ध्यानांत आलें नाहीं. 'हिंदूंचें सर्व कांहीं नादान व ठाकाळ आहे; त्याचा त्यांनीं जोंपर्यंत सर्वस्वीं त्याग केला नाहीं, तोंपर्यंत त्यांचा हा ऱ्हास एकसारखा होऊन हिंदुराष्ट्र अखेर नष्ट होणार. त्यास हा मृत्यु टाळावयाचा असेल तर त्यानें आपलें गचाळ हिंदुत्व टाकून पाश्चात्य राष्ट्रांचा कित्ता सर्व बाबतींत गिरविला पाहिजे, तरच त्याची धडगत आहे.' ही कल्पना सिद्धांत म्हणून सर्वत्र बावरू लागली!

पण ही आत्मविश्वासशून्य व म्हणूनच आत्मघातक कल्पना वास्तविक खरी आहे काय? हिंदुराष्ट्र हें जगांतील सर्वांत जुनें व प्राचीन राष्ट्र आहे; व तें अद्यापही आपलें हिंदुत्व राखून जगलें आहे. हिंदुराष्ट्र इतकें नादान व गचाळ असेल तर तें आजपर्यंत जगविण्यांत परमेश्वराचा हेतु तरी काय? बाबिलोनिया, असीरिया, इजिप्त, ग्रीस, रोम, इराण येथील जुनीं राष्ट्रें नामशेष कां झालीं व हिंदुराष्ट्र तेवढेंच कां टिकलें? वरील राष्ट्राचे वंशज आज पृथ्वीवर हयात आहेत, नाहीं असें नाहीं. पण धर्म, भाषा, वाङ्मय, परंपरा, संस्कृति या बाबतींत जुनें असें त्यांच्या राष्ट्रीय जीवनांत फारसें उरलेलें नाहीं. पण हिंदूंचा प्रकार तसा नाहीं. त्यानीं आपली भाषा, समाजरचना, धर्म, तत्त्वज्ञान यांची परंपरा आपल्या राष्ट्रीय संसारात अद्याप कायम राखली आहे. पृथ्वीवरील इतर कोणत्याही राष्ट्रांत दिसून आला नाही इतका चिवटपणा जर हिंदु राष्ट्रांत प्रत्यक्ष दिसून येत आहे, तर हिंदुसमाजाचा पायाच कालासही दाद न देणाऱ्या अशा कांहीं विलक्षण भक्कम व टिकाऊ मालमसाल्याचा बनविला असला पाहिजे, असें मानण्यावांचून गत्यंतरच नाहीं. दुसरें असें कीं, हिंदुराष्ट्रास सर्वस्वीं नादान व गचाळ मानण्याची ही प्रवृत्ति एकोणिसाव्या शतकातलीच आहे. त्यापूर्वी किंवा प्राचीनकाळीं हिंदुस्थानाबद्दल जगाचें असें हलकें मत मुळींच नव्हतें. उलट हिंदुस्थानांत संपत्तीचा धूर निघत असून तेथील सर्व कांही सोनें, हिरे व माणकें यानीं मढविलेलें आहे व तेथें सर्वत्र दिव्य सुगंध भरून राहिलेला आहे, अशा दूरस्थांच्या या देशासंबंधानें कल्पना होत्या! तसेच एकोणिसाव्या शतकाचे अखेरच्या पादापासून हिंदूंच्या प्राचीन विद्या-कलांचा जसजसा जास्त अभ्यास युरोपीयन पंडित करूं लागले तसतसे वरील भ्रमक कल्पनांचें जाळेंही हळूहळू उकून जाऊं लागलें; आणि हिंदु राष्ट्राचे श्रेष्ठ गुण व श्रेष्ठ संस्कृति यांजबद्दल जगांत योग्य आदरबुद्धि उत्पन्न होऊं लागली. अर्थात् हिंदूंवर नादानपणाचा व

गबाळपणाचा शिक्का मारणारें मध्यंतरीचें जगाचें मत केवळ विशिष्ट काळच्या व विशिष्ट स्थळाच्या हिंदु समाजाचें वरवर निरीक्षण करून बनलेलें होतें, असेंच मानलें पाहिजे. हिंदु लोकांची स्वतःबद्दलची पहिली तिरस्कारबुद्धिही हळूहळू नष्ट व्हावयास लागली असून, त्यांच्यांत स्वाभिमान व आत्मविश्वास यांची ज्योत पेटूं लागली आहे. ही ज्योत अद्यापही ज्या अंतःकरणांत पेटली नसेल त्यांत ती उत्पन्न व्हावी व जेथें ती उत्पन्न झाली असेल तेथें ती जास्त प्रज्वलित व सतेज व्हावी या हेतूनें, हिंदु राष्ट्रानें जगाच्या इतिहासांत आजपर्यंत कोणतीं महत्कार्यें केलीं व जगांतील प्रमुख राष्ट्रांत त्यानें कोणतें स्थान संपादलें, यांचें या पुस्तकांत पंडित हरविलास याचा 'मागोवा' घेत विहंगमदृष्टया अवलोकन करण्याचें योजिलें आहे. या अवलोकनास मुख्य आधार सर विल्यम जोन्स, प्रो. विल्सन, कोलब्रुक, मॅक्समूलर कर्नल टॉड, पोकॉक, वगैरे युरोपीयन पंडित व ग्रंथकार याचाच घेतला आहे, हें सांगणे अवश्य आहे. 'युरोपीयनांचा शब्द म्हणजे वेदवाक्य' अशा बुद्धीनें हे आधार घेतलेले नसून, अगदीं तिऱ्हाइत व प्रतिष्ठित साक्षीदाराच्या साक्षीस ज्या दृष्टीनें न्यायकोर्टांत विशेष महत्त्व दिलें जातें, त्या दृष्टीनेच हे आधार घेतले आहेत. वास्तविक युरोपीयन पंडित व ग्रंथकार याचे मनात हिंदुस्थानाविषयीं विशेष आदरबुद्धि नसणें व त्यांनीं त्यास नावें ठेवणें हेंच स्वाभाविक आहे. पण असें असताही जर त्यानीं हिंदुस्थानचा आदर, गौरव व स्तुति केली असेल तर ती पूर्ण विचारांतीं पूर्ण खात्री झाल्यामुळेंच, कदाचित् नाइलाजानें, केली असली पाहिजे, असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. निव्वळ भाटाच्या स्तुतीपेक्षां आरंभीं निंदक असून पुढें गुणग्राहक व नंतर स्तुतिपाठक बनलेल्यांनीं केलेल्या स्तुतींचा योग्यता अर्थातच अधिक आहे; व याच दृष्टीनें युरोपीयन पंडित व ग्रंथकार याचाच आधार या विहंगमावलोकनास घेतला आहे. सदरहू पंडित हरविलास सारदा बी. ए. याच्या 'हिंदु सुपिरिऑरिटी' नामक ग्रंथाचा हें पुस्तक तयार करण्यास फार उपयोग झाला; किंबहुना त्या ग्रंथाचेंच हे पुस्तक मराठी रूपांतर आहे, असेंच म्हणण्यास हरकत नाहीं.

दत्तात्रय गोपाळ लिमये.

अनुक्रमणिका.

भाग १ ला.

विषय.		पृष्ठ.
उपोद्घात	... ...	१
भारतीय सं[illegible]	... .	७
भारतीय संस्कृतीची गर्भावस्था	..	१२
भारतीय राज्यव्यवस्था	. .. . ..	२५
भारतीयांचे शील	.. ..	३७
भारतीयांचा क्षात्रधर्म	.	५१
भारतीयांचा दांपत्यधर्म		५९
भारतीयांच्या उपाधी व परराष्ट्रसंबंध		६३
भारतीयांची भाषा, लिपि व वाङ्मय	...	११९

भाग २ रा.

भारतीयांचे वाङ्मय	... .. . १३०
गद्यात्मक वाङ्मय (कथाकाव्ये)	.. .. १५५
आर्यांचे तत्त्वज्ञान	. . ... १७१
सांख्यदर्शन	.. .. १८२
भारतीय वैद्यशास्त्र	.. .. १९१
गणित	. ... २०२
ज्योतिषशास्त्र	. . .. २११
युद्धकला व युद्धशास्त्र	. .. . २१९
संगीत व इतर शास्त्रे	... ... २२१
भारतीय नाट्यकाव्य व नाटककार	... . . . २३१
व्यापार व्यापारी संघ	... . २५०
[illegible]चे व्यापारी रूप	... . २५८
भारतीय सभा	... . २७२
आर्यांचा धर्म	... ... २७५

भारतीय श्रेष्ठत्व.



उपोद्घात.

हिंदुस्थानदेशाकडे अगदी स्थूल दृष्टीने पाहणारासही,या देशावर सृष्टिदेवतेची पूर्ण कृपा आहे, असें तात्काळ दिसून येते. ' हिंदुस्थान हा सगळ्या पृथ्वीचाच एक लहानसा नमुना आहे. (India is an epitome of the whole world) असें जें एका मार्मिक लेखकानें (Chamber's Eccyclopedia p.337)म्हटलें आहे ते अक्षरशः खरें आहे. जगांतील निरनिराळ्या देशांत सृष्टीचीं जीं भिन्नभिन्न विशिष्ट स्वरूपे दिसून येतात तीं सर्व हिंदुस्थानात एकत्र नांदताना दिसतात. प्रेक्षकाचें मन आपल्या जादूनें भारून टाकणारें सृष्टिसौंदर्य,अत्यंत सुपीक जमीन,अति घनदाट अरण्ये,अत्युच्च पर्वत, प्रचंड नद्या आणि अतिशय कडक थंडी, याचे बरोबरच या देशांत वृक्षशून्य व खडकाळ मैदानें, जलशून्य वालुकामय प्रदेश आणे आनि कडक उष्णता हीही पाहावयास व अनुभवावयास सापडतात ! मॅरेनामक इतिहासकार (हिंदुस्थानचा इतिहास पृ० १) म्हणतो कीं, ' हिंदुस्थानातील सृष्टिशोभेची भव्यता, विशालत्व व विविधता आणि तेथील भूमींत उत्पन्न होणारी अनेक प्रकारची बहुमोल व मुबलक धान्यसंपत्ति या बाबतींत जगांतील कोणताही देश हिंदुस्थानाची बरोबरी करूं शकणार नाहीं. ' (The varied grandeur of its scenery and the rich production of its soils are scarcely equalled in any other country) कौंट जॉर्नस्टजर्ना (Theogony of the Hindus, p. 126.) लिहितोः—" या हिंदुस्थान देशांतील सृष्टिदेवतेनें चित्रविचित्र व अनेक रंगाचे बहुमोल वस्त्रच पांघरले आहेसें वाटतें. या देशात उन्हाळ्यांत एकदम वर येणारी मुबलक वनस्पतिसंपत्ति व पावसाळ्यात होणारीं भयंकर वादळें, त्याच्या हिमाच्छादित हिमालयाची भव्यता व वालुकामैदानाचा रखरखितपणा, उत्तर हिंदुस्थानातील अतिविस्तीर्ण मैदानें व गगन चुंबित पर्वतांवरील सृष्टिशोभा, हीं पाहणाराचें मनावर तेथील सृष्टीची विलक्षणता, भव्यता व चमत्कृति याचा कायमचा परिणाम झाल्यावाचून राहत

नाहीं. " नगाधिराज हिमालयाच्या भव्य शोभेचें तर वर्णन कोणत्या शब्दांनीं करूं असेंच प्रवाशास होऊन जातें ! एल्फिन्स्टन इतिहासकार (हिंदुस्थानचा इतिहास पृ. ८) लिहितो कीं,' प्रवासी कितीही साधाभोळा, गंभीर किंवा काटेतोल लिहिणारा असो, हिमालयाच्या सृष्टिशोभेत इतकें अपूर्व सामर्थ्य भरलेलें आहे कीं, तीं एकदां त्याचे दृष्टीस पडलीं कीं त्याचे मन व त्याची लेखणी उत्साहाने भराऱ्याच माराव्यास लागते; त्या सृष्टिशोभेची स्मृति त्याचे मनांतून आमरणात नष्ट होत नाहीं व तसली शोभा त्यास जगात अन्यत्र पाहावयासही सांपडत नाहीं. ' (The scenery of the Himalayas is a sight which the soberest traveller has never described without kindling into enthusiasm, and which, if once seen, leaves an impression that can never be equalled or effaced.)

हिंदुस्थानावर सृष्टिदेवतेचा जसा कृपाप्रसाद आहे तसा बुद्धिदेवतेचाही त्याजवर अखंड वरदहस्त आहे ! जसें विविध सृष्टिरचनेने तसेच मनुष्यसमाजाने निरीक्षण व अध्ययन करण्यास हिंदुस्थान देश व हिंदुसमाज हा एक सनातन ग्रंथच आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. कौंट जॉर्नस्टजर्ना या ग्रंथकाराने लिहिल्याप्रमाणें, ' नखशिखांत लोखंडी चिलखत घातलेला राजपुतान्यातील अश्वारूढ योद्धा व काशीच्या देवालयांतील ईश्वरधर्मनिष्ठ ब्राम्हण पहा; आपल्या लढाऊ जहाजांतून किंवा चपळ घोड्यावरून त्वरेने हालचाली करणारा कडवा मराठा व हत्तीवर बसून मंदगतीने चालणारा नबाब याजकडे दृष्टि फेका; अगर जंगलात वाघाची शिकार करणारी वीरस्त्री व आपली कामवासना देवासच अर्पण करणारी मुरळी याजकडे नजर फेका; तुम्हांस हिंदुस्थानात विलक्षणता, भव्यपणा व चमत्कार ही आढळल्यावाचून रहाणार नाहींत ' (Theogony of the Hindus, P. 126). कर्नल टॉड राजस्थानचे इतिहासात (पृ० ६०८, ६०९) लिहितोः-" ग्रीक तत्त्वज्ञानाच्या तोडींचीं किंबहुना प्लेटो, थेल्स, पायथागोरस वगैरे तत्त्ववेत्त्यांस गुरुस्थानीं असलेलीं तत्त्वज्ञानदर्शने निर्माण करणारे ऋषि हिंदुस्थानाखेरीज अन्यत्र कोठे सांपडणार ? ज्याचे ज्योतिषज्ञान पाहून साप्रतही युरोपियन पंडितास आश्चर्य वाटतें असें ज्योतिषशास्त्रज्ञ, युरोपियन तज्ज्ञाच्या अद्यापही आदरास पात्र होणारी प्रचंड व सुंदर लेणीं कोरणारे शिल्पशास्त्रज्ञ व मूर्तिकार, आणि राग व स्वर बदलून श्रोत्यांचे

अंतःकरण आनंदांतून दुःखात व दुःखाश्रूंतून हर्षस्मितांत सहज लीलेनें नेणारे गायक हिंदुस्थानाबाचून दुसऱ्या देशात कोठचे सापडणार ?" कलकत्ता रिव्ह्यू-नामक मासिकात (दिसेंबर १८६१) एक लेखक लिहितोः—" हिंदुराष्ट्र साप्रत जरी हीन दीन झालेलें असलें, तरी प्राचीन काळीं ह्या राष्ट्रात श्रेष्ठ कलाकौशल्य व युद्धविद्या, सुखकारक राज्यपद्धति, शहाणपणाचे कायदे व उच्च प्रकारचें ज्ञान ही सर्व नादत होतीं, यांत शंका नाहीं." एडिंबरो रिव्ह्यूमध्येंही (आक्टोबर १८७२) एक लेखक म्हणतोः—" जगाच्या उपलब्ध इतिहासांत जीं प्राचीन राष्ट्रें केवळ नाममात्रेकरून सांप्रत हयात आहेत, त्याच्यामध्ये संस्कृतीचा अरुणोदय होण्यापूर्वीच या प्राचीन हिंदुराष्ट्राचा संस्कृतिसूर्य मध्यान्ही येऊन ठेपला होतो ! ज्याच्या प्राचीन संस्कृतीचे महत्त्वाचे अवशेष साप्रत विद्यमान आहेत अशा जुन्या राष्ट्रात हिंदुराष्ट्र हें सर्वांत जुने आहे. असें असूनहीं सुसंस्कृति व सुधारणा या बाबतींत आजतागायत कोणत्याही राष्ट्राला हिंदुराष्ट्रास मागें टाकता आलेले नाहीं !" 'सगळ्या जगात मनुष्यप्राणी श्रेष्ठ असून मनुष्यातही त्याचें मन अत्यंत श्रेष्ठ होय' असें सर विल्यम हॅमिल्टन-नामक तत्त्वज्ञाचे एक सूत्र आहे. त्या सूत्राचे दृष्टीनें विचार केला तर 'हिंदुराष्ट्राच्या मनाची व बुद्धीची भरारी जितकी उंच व दूर पोंचलेली आहे, तितकी पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही राष्ट्राची पोंचलेली नाहीं' असे जे मिसेस मॅनिंग (Ancient & Mediaeval India vol II, P. 148) या ग्रंथकर्तीनें म्हटलें आहे त्याची सत्यता तेव्हाच पटते. दुसरा एक ग्रंथकार लिहितोः—" काव्य व गायन हीं प्राचीन हिंदुराष्ट्राच्या हाडींमासीं खिळलेलीं असून तें व्यापारधंद्यातही तरबेज होते. शास्त्रशोधात व शास्त्ररचनेतही त्याचा अचाट उद्योग व सूक्ष्म आणि तीव्र दृष्टि पदोपदीं दिसून येते. हिंदुस्थानात कलाकौशल्यानें तर आपली अखेरची सीमाच गांठली आहे कीं काय असा भास होतो. त्याची संस्कृत भाषा ही जगांतील भाषात सर्वोत्कृष्ट व अत्यंत मनोहर आहे. सत्यनिष्ठा, औदार्य व इमान या बाबतींतील हिंदूंच्या राष्ट्रीय शीलाची कोणासही बरोबरी करता येणार नाहीं. त्यांच्याच वसाहतींनीं एका काळीं सर्व जग व्यापलेले होते. त्याच्या राजासच इतर राष्ट्रें अजूनही सागरदेवता म्हणून पूजित आहेत; किंबहुना सुधारलेल्या जगाच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यात व प्रत्येक मनुष्याच्या भोंवतीं चाललेल्या सर्व व्यवहारांत प्राचीन हिंदूंचीच सुधारणा भरून राहिलेली आहे." प्रो. हीरेन (Historical researches, Vol II,

P. 45) म्हणतातः— " केवळ आशिया खंडाचेच नव्हे तर युरोपखंडातील लोकांचेही सर्व ज्ञानाचा व धर्माचा उगम हिंदुस्थानांतच आहे. "

हिंदुस्थान व हिंदुराष्ट्र यांच्या गुणांचा गौरव करतांना मॅक्स मुल्लरसाहेबाच्या वाणीस तर वक्तृत्वाचें अतोनांत भरतेंच आलेले आहे! 'हिंदुस्थान, व तें आम्हास काय शिकवील?' या आपल्या ग्रंथांत (India, what can it teach us P. 15) ते लिहितातः—" सृष्टि देवतेने आपली समृद्धि, सामर्थ्य व सौंदर्य हीं सर्व पूर्णपणें ओतून कोणत्या देशास मृत्युलोकचें नंदनवन बनविलें आहे, हें पहाण्यास मी जर सर्व जग धुंडाळू लागलों तर मला अखेर हिंदुस्थानाकडेच बोट दाखवावें लागेल! मानवी अंतःकरणाच्या व बुद्धीच्या श्रेष्ठ वृत्ति व शक्ति कोणत्या देशान पूर्णावस्थेस पोंचल्या आहेत, ? सृष्टींतील व संसारांतील अत्यंत महत्त्वाच्या गूढ प्रमेयाचा सूक्ष्म व खोल विचार कोठें झाला आहे? व प्लेटो, कँटप्रभृति तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांचे परिशीलन केलेल्या पंडिताच्याही अध्ययनास सर्वस्वीं पात्र होईल असा वरील गूढ प्रमेयाचा उलगडा कोठें झाला आहे? असे प्रश्न मला कोणी विचारले तर मी त्यांस ' हिंदुस्थान-हिंदुस्थान-हिंदुस्थान ' असें एकच उत्तर देईन! ग्रीक, रोमन व यहुदी या तिनच राष्ट्रांचे विचार, वाङ्मय व संस्कृति याजवर युरोपियन राष्ट्रांचें आजपर्यंत पोषण झालेलें असल्यामुळें त्यांचें आध्यात्मिक जीवन अपुरें, आकुंचित व खुरटें झालेले आहे. हें जीवन खरोखर परिपूर्ण, विशाळ, सर्व मनुष्यता आकलन करणारें व विश्वव्यापक करावयाचें असल्यास, किंबहुना त्यांत नवीन व सनातन असें चैतन्य ओतून त्यास अजरामर करावयाचें असल्यास आपण कोणत्या देशाच्या वाङ्मयाकडे धाव घ्यावी, असा मी मनाशीं विचार करूं लागलों तर भाग्यशालीभरतखंडच माझ्या डोळ्यापुढें उभें राहतें' भाषा,धर्म,पुराण-कथा,कायदे, चालीरीती, प्राचीन कला, प्राचीन शास्त्रें वगैरे जे मानवी मनोबुद्धीचे निरानिराळे विकास व विलास आहेत त्यांपैकीं कोणत्याही एकाच्या विशेष अध्ययनास आरंभ केल्यावर,तुम्हास आवडो वा न आवडो तुम्हास हिंदुस्थानाकडेच जाणें भाग पडेल! कारण मानवी इतिहासाच्या सामुग्रीपैकी अत्यंत महत्त्वाच्या व अत्यंत बोधकारक सामुग्रीचे भांडार हिंदुस्थानात-केवळ एकट्या हिंदुस्थानातच-साठविलेले आहे"*

* If I were to look over the whole world to find out the country most richly endowed with all the wealth, power and beauty that nature can bestow-in some parts a very paradise

साराश, राष्ट्रीय प्रपंचाचें कोणतेही अंग घ्या किंवा मानवी मनोबुद्धि विकासाच्या कोणत्याहि शाखेचा विचार करा, त्या प्रत्येकात प्राचीन हिंदुलोक श्रेष्ठ व अग्रगण्य होते, आणि हें वैशिष्ट्य जगातील इतर कोणत्याही राष्ट्राचे ठायीं दिसून येत नाही, असेच प्रत्ययास येईल. आजपर्यंत जगांत एकादे राष्ट्र युद्धविद्येत तर दुसरे व्यापारात श्रेष्ठ झाले असेल; कोणी तत्त्वज्ञानात तर कोणी काव्यात, कोणी शास्त्रात तर कोणी कलाकौशल्यात निष्णात झालें असेल. एखादे राष्ट्र राजकीय दृष्ट्या अति उच्च पदास पोचले असेल, पण तें नैतिक व बौद्धिक दृष्ट्याही तितके उच्च असेलच असे नाही. पण वरील सर्व बाबतीत सारखेच श्रेष्ठ व सारखेच अग्रगण्य असे प्राचीन हिंदुराष्ट्राखेरीज पृथ्वीचे पाठीवर एकही राष्ट्र पूर्वीही नव्हते व साप्रतही नाहीं ' ' प्राचीन हिंदुराष्ट्राचे असें भपकेदार रंगात चित्र रेखाटून त्यांच दोष लपवून ठेवणे व गुण तेवढेच फुगवून वर्णन करणे हे अयोग्य आहे ' असा कोणी टीकाकार यावर आक्षेप घेईल. पण पर्वताची उंची मोजतात तीं

---

on earth, I should point to India. If I were asked under what sky the human mind has most fully developed some of its choicest gifts, has most deeply pondered on the greatest problems of life, and has found solutions of some of them which well deserve the attention even of those who have studied Plato and Kant, I should point to India And if I were to ask myself from what literature we here in Europe—we who have been nurtured almost exclusively on the thoughts of the Greeks and the Romans, and of one Semitic race the Jewish—may draw that corrective which is most wanted in order to make our inner life more perfect, more comprehensive, more universal, in a far more truly human—a life not for this life only, but a transfigured and eternal life, again I should point to India..... Whatever sphere of human mind you may select for your special study, whether it be language, or religion or mythology, or philosophy, whether it be laws or customs, primitive art or primitive science, everywhere you have to go to India, whether you like it or not; because, some of the most valuable and most instructive materials in the history of man are treasured up in India and in India only. "

त्याच्या लहानसहान टेंकड्यांचें किंवा डोंगरांचें माप घेऊन कोणी मोजीत नाहींत; तर त्यांचीं जीं अत्युच्च शिखरें असतात त्यांचे मोजमाप घेऊनच तीं मोजीत असतात, हें या टीकाकारानीं लक्षात ठेवावे. हिमालय पर्वतास 'नगाधिराज' ही जी यथार्थ पदवी मिळाली आहे, ती मसुरी, दार्जिलिंग किंवा सिमला याजजवळच्या उंच डोंगरावरून नव्हे; तर गौरीशंकर धवलगिरि व कांचनगंगा या गगनचुंबित शिखरांवरून मिळालेली आहे. याच न्यायाने हिंदुंची संस्कृति व हिंदुराष्ट्रानें जगाचे इतिहासात केलेलीं महत्कार्यें यांचे मोजमाप करताना त्यांच्या अत्युच्च शिखराचेच मोजमाप घेणे अवश्य आहे.

असीरियन, बाबिलोनियन, इजिप्शियन, फीनिशियन, ग्रीक, इराणी, रोमन वगैरे अनेक प्राचीन राष्ट्रे जगांत उदयास आली व वैभवाचे शिखरास चढलीं; आणि राजकीय कात्या, सामाजिक उत्पात किंवा वर्णविद्वेषाचे भूकंप यांचे तडाक्यात सापडून नामशेषही झालीं. पण असल्या कात्यातून, उत्पातातून व भूकंपातूनही वर वर्णिल्य प्रकारचे भाग्यशाली हिंदुराष्ट्र आपला विशिष्ट हिंदूपणा कायम राखून अद्य जिवंत राहिले आहे, याचे बीज कोणते ? हिंदुधर्माची इमारत सनातन सत्य पायावर उभारली असून तिच्याच आश्रयाने जन्मलेली व वाढलेली जी हिं संस्कृति तींत विलक्षण जिवटपणा व श्रेष्ठता आहे; आणि म्हणूनच त्या धर्मा वाढलेले व संस्कृतीने पोसिलेले हिंदुराष्ट्र अजून जिवंत राहिले आहे, यात संशनाहीं, असीरिया, बाबिलोनिया, इजिप्त, इराण, ग्रीस, रोमन ही राष्ट्रे व त्यांची संस्कृति वैभवशाली होती हे खरें. पण आकाशातील एकादी उल्का पृथ्वीवर व आकाशात क्षणमात्र दैदीप्यमान प्रकाश पाडीत व लोकांचे डोळे दिपवीत तात्काळ नष्ट होते; किंवा एकादा धूमकेतु आपल्या विलक्षण वेगाने व अपूर्व आकृतीने जगास चकित करीत उदय पावून लवकरच अनंत आकाशांत भरारी मारून अदृश्य होतो. तशा स्वरूपाचें वर सांगितलेल्या राष्ट्रांचें वैभव व संस्कृति ही होती. परंतु हिंदुराष्ट्राचें वैभव व हिंदुसंस्कृति याच्या सूर्यास मधूनमधून मेघांना झाकून टाकले किंवा प्रसंगीं त्यास ग्रहण लागले, तरी हा सूर्य सर्व जगाच्या दूरदूरच्या कोनाकोपऱ्यातही आपला प्रकाश, उष्णता व चैतन्य पसरवीत आणि मानवजातीस समाधान व सौख्यलाभ करून देत अद्यापही एकसारखा प्रकाशत आहे !

प्रकरण १ लें.

भारतीय समाजघटना.

जगातील अनेक प्राचीन व वैभवशाली संस्कृति आणि राष्ट्रे नामशेष झालीं असता हिंदुसंस्कृति, हिंदुराष्ट्र व हिंदुधर्म हींच तेवढीं 'सनातन' या विशेषणास कां पात्र झालीं, याचे सामान्य दिग्दर्शन गेल्या उपोद्घातात केले होतें. या प्रकरणात या मुद्द्याचा थोड्या निराळ्या दृष्टीने विचार करावयाचा आहे.

अनेक व्यक्तींच्या समुदायास 'समाज' हे नाव प्राप्त होण्यास त्याचे स्वरूप कसें असावे लागते ? आणि त्या समाजाची अभिवृद्धि व ऱ्हास हीं कोणत्या नियमास अनुसरून होतात ? या प्रश्नासंबंधाने युरोपियन समाजशास्त्र-वेत्त्यामध्यें पुष्कळ भवति न भवति होऊन अखेर असा सिद्धांत सर्वमान्य झालेला आहे कीं, समाज म्हणजे वाळूवंटातील वाळूच्या अनेक कणांप्रमाणे एकमेकापासून अगदीं स्वतंत्र व असंबद्ध अशा अनेक व्यक्तींचा एकत्र राहणारा समूह नसून, समाज ही एक (Organic body) सजीव व सचेतन वस्तु आहे; व तिचा उत्कर्षापकर्ष सृष्टीतील इतर सजीव सचेतन वस्तूंची वाढ व ऱ्हास याविषयाच्या नियमासच अनुसरून होत असतो. अर्थात समाज व राष्ट्र चिरस्थायी होण्यास त्याची घटना सृष्टीच्या नियमानुसार व शास्त्रशुद्ध पायावरच होणे आवश्याचे आहे. हजारो जातीच्या सचेतन वस्तूंच्या उत्क्रांतीचे सूक्ष्म निरीक्षण करून हर्बर्टस्पेन्सर-प्रभृति पाश्चात्य उत्क्रांतिवाद्यांनी असा सिद्धांत स्थापित केला आहे कीं, सजीव व सचेतन वस्तूंचा जसजशी उत्क्रांती होत जाते तसतसे त्यांचे निरनिराळे शारीरिक व्यापार व कार्ये करण्यास निरनिराळे अवयव व इंद्रिये उत्पन्न होत जातात. जीवाच्या उत्क्रांतीतील अगदीं खालच्या पायरीवरचा अतिसूक्ष्म अणुजीव असून त्यास निरनिराळे अवयव किंवा इंद्रिये मुळींच नाहींत; त्याचे सर्व व्यापार त्याचें अणुमात्र वाटोळे शरीरच करीत असते. प्रत्येक व्यापारासाठीं एकेक भिन्न व स्वतंत्र अवयव किंवा इंद्रिय उत्पन्न होणे ही उत्क्रांतीची शेवटची पायरी असून ती मनुष्य प्राण्यात बहुतांशानें सिद्ध झालेली दिसून येते.

सृष्टीतील सजीव व सचेतन वस्तूंच्या उत्क्रांतीचा हाच नियम ज्या समाज-घटनेत बऱ्याच अंशाने पाळलेला आढळून येईल, तो समाज चिरस्थायी किंवहुना सनातन

राहण्यास पात्र झाला, असे मानण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्या उत्क्रांति-तत्त्वाच्या दृष्टीनें विचार केल्यास जगातील सर्व समाजात हिंदुसमाजाचीच घटना वरील सृष्टिनियमांस अनुसरून झालेली आहे, असे कोणासही दिसून येईल. समाजाच्या अस्तित्वास, पोषणास व अभिवृद्धीस जे व्यापार व जी कार्यें आवश्यक आहेत, तीं तीं चोख रीतीनें करण्यास त्या समाजाचे भिन्नभिन्न अवयव व इंद्रियें (अर्थात् वर्ग) उत्पन्न होणें, हीच त्या समाजाच्या अभिवृद्धीची मुख्य खूण होय. पुरुषसूक्तात राष्ट्रपुरुषाच्या चार अवयवांचे स्थानीं चातुर्वर्ण्याची केलेली स्थापना किती मार्मिक आहे हें यावरून लक्षात येतें. सामाजिक व्यापार व कार्यें यांचे हे पूर्ण विभेदीकरणाचे उत्क्रांतितत्त्व हिंदुसमाज-घटनेत वर्णाश्रम-धर्मरूपाने परिणत झालेलें आहे; व म्हणूनच हिंदुसमाज, हिंदुराष्ट्र व हिंदुधर्म अजून जिवंत राहिला आहे युरोपियन समाजात अमक्या व्यक्तीनें किंवा अमुक व्यक्ति-समुदायानें समाजातील अमुकच व्यापार किंवा कार्य केलें पाहिजे, असा तिकडे नियम नाहीं. व्यक्तीनें किंवा व्यक्तिसमुदायाने आपल्या स्वार्थास इष्ट किंवा मनास योग्य वाटेल ते कार्य उचलावें व वाटेल तेव्हा तें बदलावें; ह्या तत्त्वाचा अंमल व्यक्तिस्वातंत्र्य व प्रतिस्पर्धा या तत्त्वांचे नावाखाली तिकडे जारीने चालू आहे. अर्थात् तिकडील समाज अजून वरील अणुजीवांच्या किंवा कोहींमे त्याच्या वरच्या पायरीचे आहेत; व त्यांचे शरीर आता कोठे निरनिराळे अवयव व इंद्रिये फुटण्याच्या तयारीस लागले आहे, असें म्हणणें भाग आहे. तिकडे (ट्रेड गिल्ड) व्यवसाय-संघाच्या रूपानें विभेदीकरणाचे किंवा हिंदूंच्या वर्ण-व्यवस्थेचें तत्त्व हळुहळू दृगोचर होऊं लागलें आहे. म्हणजे युरोपातील आजचे हे व्यवसाय-संघ कांहीं शतकांनी आमचे वर्ण व जाती यांच्याच वळणावर जाणार, किंबहुना तसे ते गेले तरच तिकडील समाजास अभिवृद्धि व चिरस्थायित्व प्राप्त होईल, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

आमच्या प्राचीन समाजप्रवर्तक ऋषींनी सृष्टीचा हा उत्क्रांति-नियम जाणून व त्या नियमास अनुसरून हिंदुसमाजघटना केली आहे. त्यांचे आत्मनिरीक्षण व आत्मज्ञान जसें श्रेष्ठ कोटीतलें होतें, त्याप्रमाणें सृष्टीच्या निरनिराळ्या गूढागूढ व स्थूल-सूक्ष्म व्यापाराचे व कार्याचेंही सूक्ष्म अवलोकन करून त्यावरून समाज-घटनेचे व व्यक्तीच्या सदाचाराचे सनातन सिद्धांत त्यांनीं काढले होते. या सिद्धांताचे पायावर हिंदुसमाज-घटनेची इमारत त्यांनीं उभारल्यामुळेंच कर्तृत्वा-

बरोबर सौख्य, प्रगतीबरोबर स्थैर्य आणि अभिवृद्धीबरोबरच स्वत्व-संरक्षण यांचा या समाजास लाभ झाला, आणि या सृष्टिनियम-स्थापित सिद्धांतास अनुसरल्यामुळेंच हिंदूंचे समाज-नियम व संस्था यास दृढता व स्थैर्य याचे बरोबरच एक प्रकारची उज्ज्वलताही आली. मानवी शरीरात भिन्नभिन्न अवयव व निरनिराळीं इंद्रियें एकाच अंतरात्म्याच्या प्रेरणेप्रमाणे वागून आपापले व्यापार व कार्ये इतराच्या व्यापाराच्या व कार्यांच्या आड न येता, पण एकमेकास पोषकच होतील अशा रीतीने, विनबोभाट करीत असतात, म्हणूनच तो मनुष्यप्राणी जोमदार राहून वाढत जातो. किंवा सूर्यमालेतले निरनिराळे ग्रह, उपग्रह, लघुग्रह मध्यवर्ती सूर्याच्या आकर्षणशक्तीच्या अनुरोधाने आपापल्या विवक्षित कक्षेत विवक्षित गतीने इतराच्या आड न येता फिरत राहतात, म्हणूनच सूर्यमालेचे हे चक्र सुयंत्रित चाललेले आहे. याच न्यायाने हिंदुसमाज जेव्हा आपल्या ऐन वैभवाच्या व सामर्थ्याच्या भरात होता तेव्हा यातील निरनिराळे वर्ण, वर्ग व जाती आपपले नियमित व्यवसाय नियमित रीतीने आणि इतर वर्णांस व सर्व समाजास पोषक होतील अशा प्रकारे करीत असत.

सारांश, हिंदुसमाजाची घटना अशा रीतीने शास्त्रशुद्ध पायावर झालेली असल्यामुळे अर्वाचीन युरोपियन समाज-रचनेतील व संस्कृतीतील दोष, उणीवा व वैगुण्य यात आलेले नाही. हिंदुसमाजात स्पर्धा व कलह यांच्या मादक उत्तेजनाशिवाय शांतपणाने व स्थिरतेने सर्व सामाजिक व्यवहार व सामाजिक प्रगति होत आलेली आहे. युरोपियन समाजाप्रमाणें हिंदुसमाजातील एका वर्गातच संपत्ति बेसुमार साठून इतर वर्गास दैन्य व दारिद्र्य आलेले नाही; आणि श्रीमानास अधिक धनिक व गरीबास अधिक दरिद्री करणारी समाज-बंधने व समाज-नियमही यात नाहीत. वर्णाश्रम-पद्धतीचे मुख्य मर्म व रहस्य हें आहे की, प्रत्येक वर्ण, जाती किंवा वर्ग आणि यातील प्रत्येक व्यक्ति यास ज्याच्या त्याच्या मानसिक व शारीरिक योग्यतेप्रमाणे व सामर्थ्याप्रमाणे कामे करण्याची संधी व साधने तिने आयती दिलेली असून ती कार्ये करीत असता सबंध समाजाचा व राष्ट्राचा व्यवहार, हित व प्रगति होतही सहज साधतात; व ती साधतांना व्यक्तीच्या स्वाभाविक गुणांचा, शक्तीचा व कर्तृत्वाचा मुलभपणे व शांततेने विकास होत जातो. हिंदुसमाजांतील या वर्णाश्रम-विभाग-पद्धतीमुळें संपत्ति एकाच वर्गात साठविली न जातां तिचा सर्व वर्गात योग्य विभागणी होऊन देशांत अठरा विश्वे दारिद्र्य व उपासमार ही फारशी राहिली नाहीत; लोकांची

नैतिक व बौद्धिक प्रगति झाली, राष्ट्रीय व्यवहार चोख व विनबोभाट रीतीने चालला; आणि विशेष हें कीं, शांतता व स्थैर्य कायम राहून राष्ट्राची विशेष प्रगति झाली.

हिंदूंच्या समाजघटनेचा मुख्य विशेष वर्णाश्रम-विभाग हा आहे हे वर सांगितलेंच आहे. ही समाज-घटना होऊं लागली त्या काळीं आरंभी आर्य व अनार्य असे मनुष्यजातीचे दोन ठळक विभाग होते. अर्वाचीन काळीं सुधारलेले (civilized) व रानटी (savage) असे जे दोन विभाग मानले जातात, त्याच प्रकारचा आर्य-अनार्य हा विभाग आहे. आर्यांमध्यें पुढील चार वर्ण होते:-

१ ब्राह्मण—ज्ञान-विज्ञान, विद्या व शास्त्रकला, अध्ययनाध्यापन व यजन-याजन, हीं यांचीं कर्में होतीं.

२ क्षात्रिय—धनुर्विद्येचें शास्त्र व युद्धकला यांचे संपादन आणि राज्यकारभार हीं यांचीं कामें होतीं.

३ वैश्य—शेती, गोरक्षण, व्यापार व इतर कारागिरीचे धंदे हे करीत.

४ शूद्र—मानसिक व बौद्धिक दृष्टीने कमी दर्जाचें असलेले लोक वरील तीन वर्णांची सेवा-नोकरी-करीत.

कोणत्याही सुधारलेल्या समाजात वरील प्रकारचा कर्म-विभाग कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने अस्तित्वात असतोच, पण या बाबतीतील भारतीयांची श्रेष्ठता ही कीं, त्यांनीं ही कर्म-विभाग-पद्धति फार प्राचीन काळीं शास्त्रीय तत्त्वाच्या पायावर उभारून पूर्णावस्थेस नेली. हीं शास्त्रीय तत्त्वें म्हटला म्हणजे आनुवंशत्व (या तत्त्वाचें महत्त्व व व्यापकत्व अद्याप युरोपियन सम[illegible] शास्त्रीय-स्यास पुरते समजलेले नाहीं), श्रमविभाग, समाजाच्या [illegible] काटकसर व संरक्षण, त्याच्या सामर्थ्याची सुलभ वाढ आणि विशिष्ट मनोबुद्धिगुणांचा विशिष्ट प्रकारें होणारा पूर्ण विकास हीं होत. विद्वान लोक, योद्धे, वैद्य,

---

* हिंदूंच्या चतुर्वर्णी समाजाची हीं ' स्वभावज ' कर्में व गुण भगवद्गीतेतील पुढील श्लोकांत स्पष्ट रीतीनें सांगितलेलीं आहेत:—

शमो दमस्तपःशौचं क्षांतिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ।
कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥

कायदेपंडित, धर्माधिकारी, व्यापारी, कामकरी हे वर्ग जसे अर्वाचीन काळी युरोप—अमेरिकेतील सर्व सुधारलेल्या देशांत आहेत. तसे ते भरतखंडातही होते व आहेत. पण त्यात फरक इतकाच आहे की, पाश्चात्य समाजातील ही कर्म-विभागणी शिथिल, अपूर्ण, अस्पष्ट आणि चंचल असून तिचें कार्य अनियमित व यदृच्छेनें होत आहे; पण भारतीय समाजांतील ही विभागणी दृढ, परिपूर्ण, स्पष्ट व स्थिर असून ती एकाद्या यंत्राप्रमाणे आपले कार्य नियमितपणे व बिनचूक करीत असे.

हिंदुसमाज-घटनेस प्रारंभ झाला त्या वेळी व त्यानंतरही बराच काळ वर्ण-व्यवस्थेस हल्लींच्या दृढ जातिव्यवस्थेचे स्वरूप प्राप्त झालेले नव्हतें. चारी वर्णांतील लोक आपापल्या नवोदित गुणकर्माप्रमाणे खालच्या आणि वरच्या वर्णामध्ये प्रविष्ट होत असत; म्हणजे त्या काली व्यक्तींची उत्क्रांति व अपक्रांति, उन्नति आणि अधोगति ही दोनही सारखी समरेषेने समाजात चालू होती. समाज-घटनेच्या प्राथमिक अवस्थेत असे होणे स्वाभाविक किंबहुना इष्टही होते. ब्राह्मण आईबापांचे पोटी जन्मलेला मनुष्य आपल्या गुणकर्माप्रमाणें कधीं क्षत्रिय, कधी वैश्य व कधीं शूद्रही होत असे; उलट शूद्रही ब्राह्मण किंवा क्षत्रिय होत असे. शांकरदिग्विजयकारानें सांगितलेल्या—

जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते ।
वेदपाठी भवेद्विप्रो ब्रह्म जानाति ब्राह्मणः ।

या न्यायाने त्या वेळी सर्व लोक जन्ममयी एका दृष्टीने शूद्र समजून व्यक्तींच्या गुणकर्मप्रवृत्तीप्रमाणे तिला वर्ण-व्यवस्थेतील ते ते स्थान मिळे.
महाभारताच्या वनपर्वातही म्हटले आहे:—

सत्यं ज्ञानं क्षमा शीलमानृशंस्यं तपो घृणा ।
दृश्यंते यत्र नागेश स ब्राह्मण इति स्मृतः ॥

दुसऱ्या दृष्टीने पाहिले तर शांतिपर्वात सांगितल्याप्रमाणे,

न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत् ।
ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मभिर्वर्णतां जगत् ॥

ब्रह्मदेवाने मनुष्यप्राणी निर्माण केले तेव्हा ते सर्व ब्राह्मणच होते; पण ते आपापल्या भिन्न गुणकर्मप्रवृत्तीप्रमाणे भिन्न भिन्न वर्णाचे झाले.

कवष ऐलूष हा दासीपुत्र व शूद्र असूनही त्याची विद्वत्ता पाहून त्यास ऋषींनी आपणात समाविष्ट करून घेतले; किंबहुना तो शूद्र असूनही ऋग्वेदांतील काही

मंत्रांचा तो द्रष्टा ऋषि झाला. (ऐतरेय ब्राह्मण, द्वितीय पंचिका अ० ३-१९ व ऋग्वेद १० वे मंडल, सूक्ते ३०–३४) सत्यकाम जाबाल यास गोत्र नसून त्याच्या मातेचे नाव ' जबाला ' असे होतें; व त्यावरूनच त्याचें ' जाबाल ' हे नाव पडलें. छादोग्य-उपनिषद्, ४।४) असें असूनही हा यजुर्वेदाच्या एका शाखेचा आद्य प्रवर्तक झाला. मनुस्मृति (अध्याय १० श्लोक ६५) सांगते कीं:—

' शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चेति शूद्रताम् ।

पाणिनीने आपल्या अष्टाध्यायीच्या ६ व्या अध्यायात (१–३०) चाकवर्मण-नामक एक प्राचीन वैय्याकरण उल्लेखिलेला असून तो ' वर्मण ' या प्रत्ययावरून क्षत्रिय होता, हें उघड सिद्ध होते. विश्वामित्र जन्माने क्षत्रिय व वाल्मिकी शूद्र होते, हे सुप्रसिद्धच आहे. शिकंदराची हिंदुस्थानावर स्वारी झाली त्या काळी ही स्थिति काहीं अंशीं कायम होतीसें दिसते. ग्रीक ग्रंथकारांनी हिंदूंच्या चारच जातींचा उल्लेख केलेला आहे. कोणत्याही जातीच्या हिंदूस 'सोफिस्ट' (ब्राह्मण) होता येत असे, असे मेगॅस्थनीस म्हणतो. सोफिस्ट, शेतकरी, धनगर, कारागीर, शिपाई, अधिकारी व मंत्री असे हिंदूंचे सात वर्ग एरियन ग्रंथकाराने नमूद केले आहेत. कर्नल टॉड राजस्थानाचे इतिहासात लिहितो की, " सूर्य-चंद्रराजवंशाच्या पहिल्या काही पिढ्यांचे काळी उपाध्यायपण हा एक धंदा होता, त्यास वंशपरंपरेचें स्वरूप प्राप्त झालेले नव्हते. या राजवंशांची वंशावली पाहता असे दिसून येतें कीं, या वंशातील कांहीं शाखांनी मध्यंतरीच क्षात्रय कर्मे सोडून देऊन व नवीन गोत्रास प्रारंभ करून ब्राह्मणकर्मे अंगिकारिली होतीं; व पुढे याच्याच वंशजांनी आपले पहिले क्षात्रकर्म पुनः अंगिकारिले होते. "

वर्णव्यवस्थेचा हा लवचिकपणा पुढे पुढे नष्ट होत जाऊन त्यास साप्रतच्या दृढ व परस्परास अप्रवेश्य अशा जातिभेदाचे स्वरूप प्राप्त झाले. त्या काळी अनुवंश-त्वाचे तत्त्व प्रधान मानून जन्मावरून जाति निश्चित होऊं लागली. पण त्यातही पूर्वीच्या लवचिक वर्ण-व्यवस्थेचे-गुणकर्म-विभागाचे तत्त्व कायमच होते. ब्राह्मण-कुळात जन्मलेल्यास ब्राह्मणत्व मिळे, पण ब्राह्मणाप्रमाणें आचरण करण्याची जबा-बदारीही त्याचे शिरावर येई. ही जबाबदारी न ओळखता जर तो अन्य कर्मे करूं लागला, तर त्या काळचे वर्णाश्रम-पद्धतीचे अभिमानी, असलेले क्षात्रिय राजे त्याच्या कर्मास योग्य अशा जातीत त्यास घालीत, किंवा त्याची निराळीच जात बने. साराश, या काळीं खालच्या जातींतून वरच्या जातींत प्रवेश होणे

बंद होऊन वरच्या जातींतून खालच्या जातींत अधःपात होणें किंवा नवी जात बनणें हीं कार्यें मात्र चालू राहिलीं. पुढे भारतीयांचा परकीय राष्ट्रांशीं व भिन्न संस्कृतींशीं अत्यंत निकट संबंध येऊन त्यांचे राजे हिंदुस्थानावर राज्य करूं लागल्यापासून आमच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील एक अंग अजीबात तुटून जाऊन समाज विकलांग झाला. चारी वर्ण व त्यांत अंतर्भूत झालेल्या जातीं आपआपली नियमित कार्यें करीत आहेत कीं नाहींत हें पाहणें व काहीं तसें करींत नसतील तर त्यांस समाजातील खालच्या जातींतले स्थान घेण्यास भाग पाडणें, हें जें हिंदुसमाजघटनेतील क्षत्रिय राजाचे मुख्य काम ते लुप्त झाल्यामुळें समाज अत्यंत विस्खलित झाला आणि जाति-भेदास सांप्रतचे चमत्कारिक स्वरूप प्राप्त झालें. हल्ली वरिष्ठ जातींतील मनुष्यानें कितीही भ्रष्टाचरण केलें तरी हिंदुधर्मीय राज्यशास्त्र नसल्यामुळें, त्याचें सत्तेनें खालच्या जातींत अधःपतन होत नाहीं ! जातिभेदास हल्लीं जे हीनस्वरूप प्राप्त झालें आहे व ज्यामुळें कनिष्ठ जातींना वरिष्ठ ब्राह्मणादि जातींचा मत्सर वाटावयास लागला आहे, त्याचें मुख्य कारण तरी, जातिभेदाची वरील स्थिति हेच आहे. ही स्थिति उत्पन्न होण्याचीं मुख्य कारणें अशीं झालीं कीं, भारतीय युद्धांतील क्षत्रिय-संहारामुळें, राष्ट्राच्या युद्धसामर्थ्यास कमकुवतपणा आला; यामुळें आर्यावर्ताचें राज्य अन्यधर्मीयांचें हातीं गेलें आणि हिंदुसमाजघटनेतील महत्त्वाचे कार्य करणारा हिंदुधर्मीय राज्यशास्ता न उरल्यामुळें समाज-व्यवस्थेची घडी विघडली !

भारतीययुद्ध संपल्यानंतर लागलीच कलिकालास कशी व का सुरुवात झाली, अर्थात हिंदुसमाजात ऱ्हासाचे बीज कसे पेरले गेले, हे वरील विवेचनावरून वाचकांचे ध्यानात येईल. भारतीय वैभवसूर्य ढगाराचे अंतीं म्हणजे भारतीय युद्धकालीं मध्यान्हीं येऊन तळपत होता तो कलियुगाचे आरंभाबरोबरच अस्ताचलाकडे कलूं लागला; तो, ठाणेश्वराच्या लढाईत शहाबुद्दीन घोरीनें पृथ्वीराजाचा पराभव केला त्या वेळीं, संयोगितेचा अपूर्व अनुराग व पृथ्वीराजाचे अद्वितीय तेज, याचा रक्तवर्ण संधिप्रकाश पाडीत अस्तास गेला; आणि पानपत ऊर्फ कुरुक्षेत्राच्या त्याच अपेशी रणभूमीवर अहमदशाहा दुराणी याच्या सैन्यानें मराठ्यांच्या फौजेचा मोड केला, त्या वेळीं या सूर्यानें अधःपतनाचा परम नीच बिंदु गाठला, असेंही म्हणता येईल !

वर सांगितल्याप्रमाणे हिंदुसमाजाची वर्णाश्रमव्यवस्थेची घडी सांप्रत जरी विघटलेली आहे, तरीही तीं अद्याप हिंदुसमाजाच्या स्वत्वसंरक्षणाचे कार्य बऱ्याच

अंशाने करीत आहे. वर्णाश्रमव्यवस्थेचीं स्वत्वसंरक्षण व प्रगति हें किंवा कार्यें असून, विपरीत परिस्थितीमुळे उत्तरोक्त कार्य शिथिलही झालें आहे, तरीही ती स्वत्वसंरक्षणाचें पूर्वोक्त कार्य अद्यापही करीत आहे. व म्हणूनच हिंदुसमाज गेल्या एक हजार वर्षांतील राजकीय का धार्मिक कलह यातून निभावून जिवंत राहिला आहे. जातिव्यवस्थेची ही युक्तता परकीय एकवर्णी समाजांतील समंजस व निःपक्षपाती निरीक्षक नजरेस आली आहे. सर हेनरी कोटन लिहितातः—(The system caste, far from being the source of all the troubles which be traced in Hindu society, has rendered most important se in the past and still continues to sustain order and solidar " साप्रतच्या हिंदुसमाजात जे दोष, उणीवा, अडचणी किंवा भानगडी येतात त्या सर्वांचा उगम जातिव्यवस्थेपासून झालेला नाही; येवढेच नव्हे या व्यवस्थेने प्राचीन कालीं समाजघटनेचे मोठे कार्य केलेले असून साप्र त्यामुळेच हिंदुसमाजाची सुव्यवस्था व दृढता कायम राहिली आहे. " युरोपी समाजशास्त्राच्या दृष्टीनेही आमच्या जाति-व्यवस्थेत कोणते गुण आहेत, य वर्णन मि. स्मिडन लो यांनी [A Vision of India] नावाच्या आप पुस्तकात पुढीलप्रमाणे केलें आहे:—' जातिव्यवस्थेमुळेच हिंदुसमाजाचा पा खंबीर व मजबूत राहून त्यात समाधान नांदले, आणि या गुणामुळेच राज्यक्रां व पंचमहाभूतांचे उत्पात यांशी अनेक शतकें एकसारखी टक्कर देत राहण्या हिंदुसमाजात सामर्थ्य आले, यात तिळमात्र संदेह नाही. समाजातील प्रत्ये माणसास त्याचे योग्य स्थान, योग्य धंदा, योग्य कर्तव्य व योग्य मित्र दाखवू देण्याचे कार्य हीच जाति-व्यवस्था करते. प्रत्येक व्यक्ति एकटी, स्वतंत्र व असं हाय्य अशी न राहता तिला प्रारंभापासूनच एका वर्गाचा व जातीचा अवयव ही बनवून टाकते; आणि सामाजिक मत्सर व मनोरथ-भंगाची निराशा या दुर्धर रोगाची त्याला आभरणात बाधा देऊं देत नाही. त्याचे स्थैर्यास व धंद्यास योग्य असे समशीलाचे स्नेही-सोबती व बांधव त्यास मिळवून देऊन त्याचे कुलातही त्यांचेविषयी स्नेहाचा व बंधुत्वाची भावना ही दृढ करते. युरोपियन समाजात क्लब, व्यवसाय संघ [ट्रेड युनियन] परस्पर साह्यकारी संस्था [बेनिफिट सोसायटी व धर्मखाते या संस्था जी कार्ये करतात, तीं सर्व एकटी जातिव्यवस्था हिंदु समाजात करिते. हिंदुस्थानात युरोपप्रमाणें अनाथगृहे [वर्क हौसेस्] नाहीत, व

अजून त्याची आवश्यकताही उत्पन्न झालेली नाही. याचे तरी कारण हेच की, आपले आप्तेष्ट, स्नेही व ज्ञातिबांधव यास संकटकाली सर्व प्रकारे सहाय्य करणे हे आपले कर्तव्य आहे, अशी हिंदुसमाजात सार्वत्रिक भावना आहे. आणि कुटुंबाचे सांसारिक पाश तसेच सहवास व समव्यवसाय यांनी उत्पन्न केलेली बंधने जाति-व्यवस्थेने विशेष दृढ केल्यामुळेच वर सांगितलेली सार्वत्रिक कर्तव्यभावना उत्पन्न झाली आहे, यात शंका नाही. साराश, हिंदुस्थान व जातिभेद याचा इतका एकजीव झालेला आहे की, जातिभेदशून्य अशा हिंदुस्थानाची नुसती मनात कल्पना करणेही दुर्घट आहे. ''

There is no doubt that it is the main cause of the fundamental stability and contentment by which Indian society has been bound for centuries against the shocks of politics and the cataclysms of Nature It provides every man with his place, his career, his occupation, his circle of friends It makes him, at the outset, a member of a corporate body. It protects him through life from the canker of social jealousy and unfulfilled aspirations it ensures him companionship and a sense of community with others in like case with himself The caste organization is to the Hindu his club, his trade union his benefit society, his philanthropic society; there are no work-houses in India and none are as yet needed. The obligation to provide for kinsfolk and friends in distress is universally [illegible] nor can it be questioned that this is due to the recognition of the strength of family ties and of the bonds created by associations and common pursuits which is fostered by caste principle An India without caste, as things stand at present, is not quite easy to imagin

प्रकरण २ रें.



भारतीय संस्कृतीची प्राचीनता.

हिंदुसमाजाची उभारणी अविनाशी व सनातन अशा तत्त्वाच्या पायावर सृष्टिनियमानुसार झालेली असल्यामुळे हिंदुसमाज, हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति याच्या मध्ये विलक्षण जिवटपणा कसा आला आहे, याचें दिग्दर्शन मागील प्रकरणात केलें. हिंदुसंस्कृतीचा हा जिवटपणा जसा आश्चर्यकारक आहे तशी तिची प्राचीनताही मन थक्क करून सोडणारी आहे, हें या प्रकरणात दाखविण्याचा विचार आहे.

ग्रीक राष्ट्राच्या प्राचीनतेकडे पहा, इजिप्तमधील जगद्विख्यात मनोरे बांधणाऱ्या सौफी राजघराण्याचे प्राचीन काळाकडे नजर फेका, किंवा अर्वाचीन युरोपियन शास्त्रज्ञांनी मानलेल्या 'शिलायुगा'चा विचार करा; हिंदुसंस्कृतीच्या प्राचीनतेच्या दृष्टीनें हे काळ अगदींच अर्वाचीन भासतील. आपल्या या पृथ्वीचें आयुर्मान इतकें मोठें आहे कीं, तें हजारानीं किंवा लक्षानीं न मोजतां अब्जानींच वास्तविक मोजलें पाहिजे ! आणि अशा या पुराणतम कालापर्यंत पसरलेल्या जगाच्या इतिहासात ज्या ज्या संस्कृतींचा इतिहास साध्यत उपलब्ध आहे, त्या सर्वांत हिंदुसंस्कृति अधिक प्राचीन आहे, ही गोष्ट निःपक्षपाती इतिहास-शोधकांस मान्य झालेली आहे. या जगात आजपर्यंत अनेक राष्ट्रे जन्म पावलीं व नामशेष झालीं; अनेक साम्राज्यें उभारलीं व जमीन-दोस्त झालीं आणि अनेक राष्ट्रे उदयास आलीं व नष्ट झालीं. पण या सर्वांचा जन्म व मृत्यु, स्थापना व नाश, उदय व अस्त हीं दोनही हिंदुराष्ट्रानें पाहिलीं, अर्थात् त्याच्या बारशाचा सोहळा व बाराव्याचा विधि हीं दोनही जिनें पाहिलीं, तीं हिंदुसंस्कृति सर्वांत प्राचीनतम होय हें स्पष्ट आहे.

सर्व जुन्या राष्ट्रांच्या संस्कृतीच्या प्राचीनतेची परीक्षा करून कौंट जार्नस्टजर्ना यानीं असा सिद्धांत नमूद केला आहे कीं,(Theogony of the Hindus पृ० ५०) " हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति याच्या प्राचीनतेची बरोबरी करूं शकेल,

---

: मनुष्य प्रथमतः गारगोट्या वगैरेची हत्यारें करीत असून त्यास पुढें क्रमानें तांबें, ब्राझ, लोखंड वगैरे धातूंचा शोध लागला, असें कांहीं युरोपियन विद्वान् मानतात; त्यास अनुसरून मानवी सुधारणेचीं युगें मानण्याचा तिकडे प्रघात आहे.

असें एकही राष्ट्र या पृथ्वीचे पाठीवर नव्हतें व नाहीं. " अमेरिकेंतील येल कॉलेजचे प्रेसिडेंट डॉ. स्टाइल्स हे संस्कृत वाङ्मयाची प्राचीनता पाहून इतके थक्क झाले होते कीं, ' आडामचीं पुस्तकें ' हिंदुस्थानात सांपडण्याचा संभव आहे, असें वाटून त्याचा शोध करण्याची विनंति त्यानीं सर विल्यम जोन्स यास केली होती ! (Ward ' s Mythology पृष्ठ १४४) हिंदूंची चतुर्युगीची काल-गणना पाहून हालहेडनामक ग्रंथकाराचें मन आश्चर्यानें व पूज्य-बुद्धीनें भरून आलें, आणि ' हिंदूंच्या या कालगणनेची प्राचीनता पाहिली म्हणजे तिच्यापुढें यहुदी धर्मग्रंथात वर्णिलेला सृष्टिरचनेचा काळ हा परवांचा वाटावयास लागतो ' असे उद्गार त्यानें काढले ! कोणतेही राष्ट्र बाल्यावस्थेंतून व तरुणपणातून प्रौढ दशेस येईपर्यंत त्यामध्यें सृष्टिशास्त्र निर्माण होत नाहीत; अशा शास्त्रांमध्येंही आकाशस्थ ग्रहगोलाचे [ज्योतिष] शास्त्र हें तर सर्वांचे मागून उदय पावतें. आणि या शास्त्रात शोध व प्रगति हीही पायरी पायरीनें व हळू हळू होत असतात. या दृष्टीने हिंदूंच्या ज्योतिष शास्त्राची प्राचीनता पाहिली तर तींवरून त्या शास्त्राचा उदय होण्यापूर्वी हिंदुराष्ट्र किती तरी सहस्र वर्षें अस्तित्वांत असलें पाहिजे, याची सहज कल्पना येते. हिंदुज्योतिषाच्या प्राचीनतेच सर्व बाजूंनीं विचार करून अखेर कौंट जार्नस्टजर्ना लिहितात कीं, (Theogony of the Hindus पृ. ३७।३८) " बेलीने केलेल्या गणितावरून असें दिसून येतें कीं, ख्रिस्तापूर्वी ३००० वर्षांचे सुमारास ज्योतिष व भूमिति या शास्त्रात हिंदुराष्ट्राची पुष्कळ प्रगति होऊन चुकली होती; अर्थात् हिंदुराष्ट्राची सामान्य संस्कृति त्या कालाच्या किती तरी सहस्रके आधीं जन्मास आलेली असली पाहिजे, असें मानावयास हरकत नाहीं. दुसरें असें की अजंठा, वेरूळ, घारापुरी वगैरे ठिकाणचीं लेणीं आणि इजिप्तच्या मनोऱ्यांचीही प्रचंडपणात बरोबरी करणारीं पण शिल्पसौंदर्यानें त्याहूनही श्रेष्ठ असलेलीं देवळें पाहिलीं, म्हणजे हिंदुसंस्कृतीची प्राचीनता मनास तेव्हाच पटते. " बेकस्पासून शिकंदरापर्यंतचा काल ६४५१ वर्षांचा असून, त्या अवधींत हिंदुस्थानावर एकंदर १५३ राजांनी राज्य केलें. असें ग्रीक इतिहासकार सांगतो. बकस्च्या पूर्वी इकडे किती राजे झाले असतील, हें मात्र इतिहासास मुळींच माहीत नाही. काश्मीरच्या प्राचीन इतिहासाचें वर्णन करणाऱ्या राजतरंगिणींत ज्या राजाच्या कारकीर्दीचें वर्णन आहे, त्याच्या सर्व कारकीर्दींचा काळ ४१०९ वर्षें, ११ महिने, ९ दिवस इतका होत आहे. ' स्पटेंबसपासून सेंद्रकोटस [चंद्रगुप्त] पर्यंत ६०४२ वर्षें लोटलीं. ' असें मेगॅस्थनीस म्हणतो.

[स्पटेंबसास कित्येक ग्रीक इतिहासकार ' डायोनिसियस ' म्हणत असून हिंदुस्थानातील अतिप्राचीन काळच्या एका राजाच्या नांवाचा हा ग्रीक अपभ्रंश आहे.] प्रो. मॅक्समुंकर History of Antiquity P. 218(74) लिहितातः—"विक्रमशकापूर्वी ३०४४ किंवा ख्रिस्ती शकापूर्वी ३१०० वर्षांचे सुमारास युधिष्ठिर-शक सुरू झाला, आणि त्याचेही पूर्वी म्हणजे ख्रिस्तीशकापूर्वी ६७१७ वर्षांचे सुमारास स्पटेंबस् ऊर्फ डायोनिसियस हा भारतवर्षात राज्य करीत असावा." कौंट जार्नस्टजर्ना हे लिहितातः—(Theogony of the Hindus P. 4) "चंद्रगुप्ताची राजधानी पाटालपुत्र येथे शिकंदराचा वकील मेगॅस्थनीस हा आला असता, त्यास तेथे काही राजवंशावलि पाहावयास मिळाल्या. त्यामध्ये डायोनिसियसपासून चंद्रगुप्तापर्यंत झालेल्या १५३ राजांची नांवे व प्रत्येकाच्या कारकीर्दीची वर्षे, ही नक्की दिलेली आढळली. त्यावरून या १५३ राजांचा एकंदर राज्यकाळ ६४५१ वर्षे झाल्याचे त्यास कळून आले. यावरून हिशेब करता डायोनिसियस राजा ख्रिस्तापूर्वी सुमारें ६००० वर्षांचे सुमारास भरतखंडात राज्य करीत होता, असे सिद्ध होते. इजिप्तमधील सर्वांत जुना गिझे-मनोरा बांधणारा सोफी राजा ख्रिस्तापूर्वी ३८६७ चे सुमारास असून इजिप्तमधील सर्वांत जुन्या राजाचा काल ख्रिस्तापूर्वी ५८६७ हा आहे, पण याच्याही पूर्वी भरतखंडातील डायोनिसियस राजाचा हा काळ येत आहे!" सर विल्यम जोन्स लिहितात.—[त्यांचे ग्रंथ Vol I. P. 304.] "मगधदेशावर राज्य केलेल्या ८१ राजांचा निर्देश पुराणात आहे. त्यांपैकी पहिल्या २० राजांच्या कारकीर्दीचा काल दिलेला नाही. त्यापुढील ६१ राजे हे एकाच राजघराण्यातील नसून ते पांच घराण्यांचे आहेत. यांपैकी पहिल्या राजघराण्यातील प्रदिष्ट राजापासून तो नंदराजापर्यंत एकंदर सोळा राजांनी ख्रि.पू. २१००पासून ख्रि. पू. १५०० पर्यंत राज्य केले. यानंतर दुसऱ्या राजघराण्याच्या १०राजांनी ख्रि.पू.१३६५पर्यंत राज्य केले.शुंग घराण्यातही दहाच राजे असून त्यांची समाप्ति ख्रि.पू. १२५३ चे सुमारांनी झाली; त्यानंतर आलेल्या कांवायन घराण्यांचे फक्त चारच राजे झाले व त्यांनी ख्रि.पू.९०८पर्यंत राज्य केले.पांचवें राजघराणे आंध्राचे असून ख्रि. पू. ४५६ किंवा विक्रमपूर्व ४०० वर्षेपर्यंत त्यांचे राज्य टिकलें."
"प्रद्योत ऊर्फ प्रदिष्ट राजघराणें स्थापन होण्यापूर्वी [ख्रि. पू. २१००] बार्हद्रथ घराणें मगधदेशावर राज्य करीत असून त्यांतील पहिला सोमापी व शेवटचा रिपुंजयनामक राजा झाला; व या घराण्याने १००० वर्षे राज्य केले. आणि या बार्हद्रथ घराण्याचे पूर्वी सहदेव, जरासंध व बृहद्रथ हे राजे झाले होते."

या वरील सर्व माहितीवरून असे दिसून येतें कीं, हिंदुराजांची काल-गणना (अर्थात् करताना पुराणकारास प्रत्येक राजाचा काल घेण्याऐवजीं एकेक राजघराणें घेऊनच त्याची कालगणना केलेली लागली आहे. हिंदुसंस्कृतीची प्राचीनता सिद्ध करण्यास येवढी एकच गोष्ट पुरेशी आहे. प्रो. हीरनच्या मते अयोध्या नगरी ख्रि. पू. १५००–२००० वर्षांचे दरम्यान वसविली असावी. कॅप्टन ट्रॉयर हे याच्याही पलीकडे जाऊन असे म्हणतात कीं, ख्रि. पू. ३००० चे सुमारास सुधारणेंत फार पुढे गेलेलीं अनेक मोठीं राज्यें हिंदुस्थानात होतीं, व या कालाचे पूर्वी बरींच शतकें रामायणाचा नायक राम हा झाला असला पाहिजे. अयोध्या नगरीनें १५०० वर्षे वैभव उपभोगल्यानंतर शुंग घराण्याच्या एका राजाने कनोज शहर वसाविलें, असें पुराणांतरी वर्णन आहे; आणि या कनोज नगराची स्थापना ख्रि. पू. १००० चे सुमारास झाली असावी, असा रेनेलचा तर्क आहे. हस्तिनापुर व इंद्रप्रस्थ यांची स्थापना फारच प्राचीनकाळी झाली असली पाहिजे, हे तर सर्व शोधकास मान्य झालेंच आहे. दाबिस्ताननामक एक बाक्ट्रियन लेख सर विल्यम जोन्स यास काश्मिरात सापडला होता. व तो पुढे त्यानी युरोपात नेला. या लेखात अनेक राजांची मोठी नामावली दिलेली असून तींतील पहिला राजा बाक्ट्रिया देशात शिकंदराचे स्वारीपूर्वी ५६०० वर्षांचे सुमारास राज्य करीत होता, आणि हा राजा हिंदुच होता. यावरून ख्रि. पू. ६००० चे सुमारास, म्हणजे पृथ्वीवर मनुष्यप्राणी निर्माण झाल्याचा जो काळ मध्ययुगीन युरोपियन ग्रंथकारानी दिला होता त्याचे आधीं अनेक शतकें, भरतखंडाची संस्कृति किती श्रेष्ठतेस पोचली होती ते कळून येतें." असें कौंट जार्नस्टजर्ना (Theogony of the Hindus P. 134) लिहितात. तसेंच जगातील प्राचीन देशात जी नाणीं सापडलीं आहेत, त्यात सर्वांत जुनें नाणें हिंदुस्थानातलेच आहे; यावरूनही हिंदुसंस्कृतीच्या प्राचीनतेची कल्पना येईल. इजिप्त, ग्रीस, इराण, चीन, अमेरिका वगैरे देशांत फार प्राचीनकाळी हिंदूंनीच वसाहती केल्या, आणि त्यांचेच वंशज पुढें तेथील नामांकित राष्ट्र बनलीं. तसेंच स्कांडेनेव्हिया, जर्मनी व ब्रिटन येथील लोकाच्याही संस्कृति व धर्म हीं हिंदुस्थानापासूनच त्यास मिळालीं आहेत. साराश, सर्व जगास प्राचीनकालीं विद्या, संस्कृति व धर्म याचा जो लाभ झाला, तो भरतखंडरूपी गुरुपासूनच होय. (ही गोष्ट पुढे एका प्रकरणात विवेचावयाचीच आहे.) यावरूनही हिंदुसंस्कृतीची प्राचीनता कोणासही सहज पटेल.

पाश्चात्य विद्वान् शोधक कालनिर्णयाचे व कालगणनेचे बाबतींत विशेष चिकित्सक व प्रत्यक्ष-प्रमाणवादी असतात; आणि हें एका दृष्टीनें योग्य व इष्टही आहे. पण ही चिकित्सक बुद्धि अतिरिक्त झाली म्हणजे तिला संशयीपणाचे व विश्वास-शून्यतेचेच स्वरूप प्राप्त होतें. प्रो. विल्सन यांना म्हटल्याप्रमाणे, भोळसरपणाचे पाशांत न सांपडण्याचे प्रयत्न करता करतां ते त्याच्या उलट दिशेच्या पक्क्या संशयीपणाच्या भोवऱ्यात सापडतात. या बाबतींत दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे की, सामान्य युरोपियन विद्वानाची ऐतिहासिक दृष्टि फार दूरवर न पोचणारी, संकुचित व कोती असते. पाश्चात्यांची ही ऐतिहासिक नजर ५।६ हजार वर्षापलीकडे फार करून पोंचतच नाही. युरोपखंडातील साप्रतची संस्कृति अगदी अर्वाचीन काळची असल्यामुळे या संस्कृतीपूर्वी युरोपात जगाच्या आरंभापासून रानटीपणा व अज्ञानच होतें, असा त्याचा दृढ समज झालेला आहे. किंबहुना या जगाची व त्यावरील मनुष्यप्राण्याची जी उत्पत्ति झाली, तिच्या कालासंबंधानेही त्याची दृष्टि अशीच कोती व संकुचित होती व आहे. जग उत्पन्न होऊन १०।१२ हजार वर्षे व मनुष्यप्राणी निर्माण होऊन ५।६ हजार वर्षे झालीं, ही समजूत जेथें अनेक शतकें दृढ होऊन गेलेली आहे, तेथील शोधकाचेही मन हिंदुस्थानातील संस्कृतीची अवाढव्य प्राचीनता व त्याच्या कालगणनेची प्रचंडता पाहून गोंधळून व बावरून जावे, यात काहीं नवल नाहीं. ८।१० हजार वर्षांपूर्वी बहुतेक युरोपखंडात रानटी स्थितिच होती, असे त्यास दिसून आल्यामुळे, इतर देशात १०।१५ हजार वर्षांपूर्वीही लोक पुष्कळच सुधारलेले होते, असे त्यास सांगितलें तर त्याचा त्यावर विश्वासच बसत नाहीं. युरोपियन विद्वानाच्या ह्या मनःस्थितीचा परिणाम युरोपियन शोधकाच्याही मनावर त्यास न कळत झाल्यावाचून राहत नाही. हिंदुस्थानातील राजे, कवि किंवा ग्रंथ याचा कालनिर्णय ठरवितांना त्यांस होता होईल तितकें अर्वाचीन कालाकडे खेचण्याचा प्रयत्न युरोपियन शोधकाकडून होतो, त्याचे तरी बीज हेच आहे. कित्येक शोधक आधी मनांत काहीं तरी प्रमेय ठाम करून घेतात. आणि मग ते त्यास अनुकूल असे आधार शोधतात, काहीं आधार ओढाताण करून जुळवतात व जी वचनें त्यांचे प्रमेयास विरुद्ध असतील तीं प्रक्षिप्त ठकलून मोकळे होतात ! पण ही पूर्वग्रह-दूषित मनोवृत्ति खऱ्या शोधकतेस व्यत्यय आणणारी आहे, हे सांगावयास नकोच. आपल्या ह्या पृथ्वीचें आयुष्य हजारानीं किंवा लक्षानींही न मोजता अब्ज वर्षांनीं मोजले पाहिजे; तसेच या पृथ्वीवर मनुष्यप्राणी निर्माण होऊनही लक्षानां मोजता येतील इतकी वर्षे झालेलीं आहेत. या गोष्टी भूस्तर शास्त्रवेत्त्यांचे प्रयत्नाने

आता कांठे युरोपांत थोड्याबहुत मान्य व्हावयास लागल्या आहेत. अर्थात् साप्रतकाळीं ज्या देशात केवळ रानटी लोकांचीच वस्ती आहे, असे देश जगाचे आरंभापासून त्याच स्थितीत आहेत, असे गृहीत धरून राष्ट्राच्या किंवा देशाच्या संस्कृतीची प्राचीनता ठरविण्याचे काहीच कारण नाहीं. एकादा देश अत्यंत सुधारलेला असूनही तेथील संस्कृति प्रचंड भूकंप, ज्वालामुखींचे उद्रेक जलप्रलय किंवा कात्या यांनीं नामशेष होऊन, तेथें पुनः रानटी स्थिति येण्याचाही संभव आहे, हीं गोष्ट विसरतां कामा नये. तसेच जगात अति प्राचीन, काळीं एक देश अगदी रानटी स्थितीत असला, म्हणजे त्या काळीं सबंध पृथ्वीवरील सर्वच देशाची तशीच स्थिति होती, असेही गृहीत धरण्याचे कारण नाहीं. किंबहुना साप्रत काळीं जेथे महासागर किंवा कडक थंडीने गोठलेले समुद्र आहेत, तेथे ते जगाचे आरंभापासूनच आहेत असेही नाहीं. त्या जागी मोठीं खंडें, मोठीं राष्ट्रें व उच्च संस्कृति हीं अतिप्राचीन काळीं होतीं, असे आता दिसून येऊं लागले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता युरोपियन विद्वान् व शोधक यांच्या, जगातील निरनिराळ्या संस्कृतींच्या प्राचीनतेसंबंधाच्या कल्पना संकुचित आणि चुकींच्या कक्षा व कां आहेत हें ध्यानात येईल.

पृथ्वीच्या उत्पत्तीचा किंवा मनुष्यप्राण्याच्या निर्मितीचा काळ भारतीयांनीं अशा संकुचित किंवा कोत्या दृष्टीने मुळींच ठरविलेला नाहीं. त्यांची युगपद्धतीवरी कालगणना अर्वाचीन भूस्तर-शास्त्र-वेत्त्याच्या कालगणनेच्या बरीच जवळ जवळ येते, हें लक्षात ठेवण्यासारखे आहे. भारतीयांनी आपल्या सूक्ष्म बुद्धीनें कालाचे विभाग जसे अतिसूक्ष्म परिमाणापर्यंत पाडले आहेत तशी त्यांनी अनादि अनंत काल मोजण्याची प्रचंड परिमाणेंही आपल्या विशाल बुद्धीने ठरवून ठेवलीं आहेत, हें सहज सिद्ध करून देता येईल.

हिंदूंच्या प्रत्येक लहान-मोठ्या धार्मिक विधींच्या व धर्म-कृत्याच्या आरंभीं जो संकल्प म्हणण्यात येतो, त्यात जगदुत्पत्तीचा काल स्पष्टपणे सांगितलेला आढळून येतो.

'अद्य श्री-ब्रह्मणो द्वितीय-प्रहरार्धे वैवस्वत-मन्वंतरे
अष्टाविंशतितमे कलियुगे कलिप्रथमचरणे दंडकारण्ये देशे' इ०.

अशा प्रकारचा हा संकल्प आहे. या संकल्पाचा अर्थ काय व त्यावरून जगदुत्पत्तीच्या कालाची नक्की गणना कशी होते, ते आता पाहूं.

जगदुत्पत्तीसंबंधाने भारतीयांचा असा सिद्धांत आहे कीं, एकदा जग उत्पन्न झालें म्हणजे त्याचे तें व्यक्त स्वरूप विवक्षित काल टिकतें; व नंतर त्या व्यक्त जगाचा नाश

होऊन ते अव्यक्त स्वरूपांत म्हणजे मूळ परमाणु स्थिति तितकाच काल राहून त्यानंतर जगास पुनः व्यक्त स्वरूप प्राप्त होते. जगास हे व्यक्त स्वरूप जितक्या कालपर्यंत असते, त्या कालास ' ब्रह्मादिन ' म्हणजे सृष्टि-कर्त्याचा दिवस, व अव्यक्त स्वरूप असते त्या कालास ' ब्रह्मरात्रि ' म्हणजे सृष्टि-कर्त्याची रात्र, अशा अन्वर्थक परिभाषिक नावे दिलेला आहेत. याच ब्रह्मादिन-ब्रह्मरात्रीस ' कल्प ' असाही एक दुसरा पर्याय शब्द आहे.

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ।
राज्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥
भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
राज्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥

(भगवद्गीता अ० ८ श्लो० १८।१९.)

सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥

(भ० गी० अ० ९ श्लो० ७)

या श्लोकांत जगदुत्पत्तीचे हेच महाद्गाडगें किंवा चक्र कसे फिरत असते ते सांगितलेले आहे. आता ब्रह्मदेवाचा हा दिवस व ही रात्र यांचे-कल्पांचे-मानवी वर्षांशी प्रमाण काय, ते पाहिले पाहिजे. भारतीयांच्या कालगणनेत सामान्यतः ६ व ६० हीं दोन परिमाणे विशेष महत्त्वाचीं आहेत, हे पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

६० पळे = १ घटका, ६० घटका = १ अहोरात्र.
६० अहोरात्र = १ ऋतु, ६ ऋतु = १ वर्ष.
६० वर्षे = १ संवत्सरचक्र, ६ संवत्सरचक्रे = १ दिव्यवर्ष. (देवांचे एक वर्ष)

हे देवांचे एक वर्ष व ब्रह्मदेवाचीं अहोरात्र यांचे परस्पर-प्रमाण मनुस्मृतींत्या (अ० १, श्लोक ६९-७२ या) चार श्लोकांत सांगितलेले आहे.

चत्वार्याहुः सहस्राणि वर्षाणां तु कृतं युगम् ।
तस्य तावच्छती संध्या संध्यांशश्च तथाविधः ॥
इतरेषु ससंध्येषु ससंध्यांशेषु च त्रिषु ।
एकापायेन वर्तंते सहस्राणि शतानि च ॥
यदेतत्परिसंख्यातमादावेव चतुर्युगम् ।
एतद् द्वादशसाहस्रं देवानां युगमुच्यते ॥
दैविकानां युगानां तु सहस्र-परिसंख्यया ।

ब्रह्मणेकमहर्ज्ञेयं तावती रात्रिरेव च ॥

या श्लोकावरून पुढील हिशेब स्पष्ट दिसून येतोः—

सत्ययुग=४००० दिव्यवर्षे+४०० दिव्यवर्षे संध्या+४०० दिव्यवर्षे संध्यांश=
४८०० दिव्यवर्षे.

त्रेतायुग=३००० दि० व०+३०० दि० व० संध्या+३०० दि० व संध्यांश=
३६०० दि० वर्षे.

द्वापारयुग=२००० दि० व०+२०० दि० व० संध्या+२०० संध्यांश.
२४०० दि० वर्षे.

कलियुग=१००० दि० व०+१०० दि० व० संध्या+१०० संध्यांश=
१२०० दिव्यवर्षे

एकूण=१२००० दिव्यवर्षे.

चार युगे=१२००० दिव्यवर्षे=१ दिव्ययुग.
१००० दिव्ययुगे १ ब्रह्मदिन
,, =१ ब्रह्मरात्रि.
३६० मानवी वर्षे=१ दिव्यवर्ष. म्हणूनः—

सत्ययुग ४८०० दि० व०×३६० १७२८००० मानवी वर्षे
त्रेतायुग ३६०० दि० व०×३६० १२९६००० मा. वर्षे.
द्वापारयुग २४०० दि० व०×३६० ८६४००० मा वर्षे.
कलियुग १२०० दि० व०×३६० ४३२००० मा. वर्षे.
एक चतुर्युगी=१ दिव्ययुग ४३, २०, ००० मा. वर्षे.
अर्थात १ ब्रह्मदिन=४३२०००००० मानवी वर्षे.

इतका काळ जगताचे साप्रतचे व्यक्त स्वरूप कायम राहणार आहे. आता साप्रतचा काळ हा ब्रह्मदिनापैकी कोणता काळ आहे, म्हणजे जगदुत्पत्ति होऊन किती काळ लोटला, हे पहावयाचे आहे.

यत्प्राग् द्वादशसाहस्रमुदितं दैविकं युगम् ।
तदेकं सप्ततिगुणं मन्वंतरमिहोच्यते ॥

या मनुस्मृतीतील श्लोकावरून (अ० १. श्लोक ७९) असे दिसून येते की, वर जे दिव्ययुग किंवा एक चतुर्युगी सांगितली, तशा ७१ चतुर्युगी झाल्या म्हणजे एक मन्वंतर होते; व अशी १४ मन्वंतरे एका ब्रह्मदिनात किंवा कल्पात

असतात. कालगणनेची ही सर्व परिमाणे सूर्य सिद्धांत (अ० १, श्लोक १८, २०) पुढील प्रमाणें दिलीं आहेत:—

युगानां सप्ततिः सैका मन्वंतरमिहोच्यते ।
कृताब्दसंख्या तस्यांते संधिः प्रोक्तो जलप्लवः ॥
ससंधयस्ते मनवः कल्पे ज्ञेयाश्चतुर्दश ।
कृतप्रमाणः कल्पादौ संधि पंचदश स्मृतः ॥
इत्थं युगसहस्रेण भूतसंहारकारकः ।
कल्पो ब्राह्ममहः प्रोक्तं शर्वरी तस्य तावती ॥

अर्थात् ७१ दिव्ययुगे किंवा चतुर्युगी=१ मन्वंतर; आणि संधीसह १४ मन्वंतरें=१ ब्रह्मादिन किंवा कल्प. आणि दोन मन्वंतराचे संधीस जलप्लव किंवा जलप्रलय व्हावयाचा; व १४ मन्वंतरांचे अखेरीस जगाचे व्यक्त स्वरूप नष्ट होऊन तें अव्यक्त—निर्गुण स्थिति—जावयाचे, असें या श्लोकावरून स्पष्ट होते.

आता वर दिलेल्या संकल्पात असे सांगितले आहे कीं, जगदुत्पत्ति होऊन आजपर्यंत (स्वायंभुव, स्वारोचिष, औत्तमि, तामस, रैवत व चाक्षुस हीं) सहा मन्वंतरें होऊन गेलीं असून, सांप्रत सातवें वैवस्वत मन्वंतर चालू आहे.

यापुढें चालू मन्वंतराचीं शेष वर्षे व (सावर्णि, दक्ष-सावर्णि, ब्रह्म-सावर्णि, धर्म-सावर्णि, रुद्र-सावर्णि, रौच्य-सावर्णि किंवा देव-सावर्णि, व भौत्य-सावर्णि किंवा इंद्र-सावर्णि हीं) सात मन्वंतरें जावयाचीं असून त्यांचे अखेरीस कल्पांत होणार आहे. चालू असलेल्या वैवस्वत मन्वंतराच्या ७१ चतुर्युगींपैकीं २८ व्या चतुर्युगींतलें कलियुग सांप्रत चालू आहे. याचा हिशोब प्रत्यक्ष मांडला असता तो असा होईल:—

एक चतुर्युगी=४३,२०,००० मानवी वर्षे.

एक मन्वंतर ७१ चतुर्युगी ४३,२०,०००×७१=३०,६७,२०,००० वर्षे; अर्थात् सहा मन्वंतरें=३०,६७,२०,०००×६=१,८४,०३,२०,००० वर्षे.

सातव्या मन्वंतरापैकीं होऊन गेलेल्या २७ चतुर्युगी=४३,२०,०००×२७= ११,६६,४०,०००. वर्षे.

अठ्ठाविसाव्या चतुर्युगीपैकीं तीन युगें संपून कलियुगाचींही ५०१४ वर्षें होऊन गेलीं; म्हणजे कलियुगाचीं ४२६९८६ वर्षें अद्याप शिल्लक आहेत.

अर्थात् २८ वी चतुर्युगी ... ... =४३,२०,००० वर्षे.
राहिलेली काल-वर्षे ... ... =४,२६,९८६.

बाकी ———————

अठ्ठाविसाव्या चतुर्युगीचा गेलेला वर्षे=३८,९३,०१४.
तेव्हा जगदुत्पत्तीपासून आजपर्यंत एकंदर
सहा मन्वंतरें ... ... =१,८४,०३,२०,००० वर्षे.
सातव्या मन्वंतरातील २७ चतुर्युगी=११,६६,४०,००० ,,
२८ व्या चतुर्युगीची गेलेली वर्षे +३८,९३,०१४ ,,

———————

एकूण १,९६,०८,५३,०१४ वर्षे झाली.

व राहिलेली शेवटची सात मन्वंतरे ३०, ६७, २०, ०००×७=२१४७०४०-
००० वर्षे. सातव्या मन्वंतरापैकी राहिलेल्या ४३ चतुर्युगी
४३२००००×४३ ... .. =१८५,७६०००
चालू २८ व्या चतुर्युगीची शिलकी वर्षे ... ...= ४, २६, ९८६

———————

विद्यमान जगाचा अंत-कल्पान्त-होण्यास एकूण ... ... २,३३,३२,२६,९८६ वर्षे लोटली पाहिजेत असे होतें ! !

ज्याच्या ऐतिहासिक दृष्टीचा किंवा कल्पनेचा मोठा पल्ला म्हटला तरी ६।७ हजार वर्षांचे पलीकडे जाऊं शकत नाही, त्याची बुद्धि भारतीयांची ही विशाल-काल-गणना पाहून गोंधळून जाऊन त्यानीं तोंवर अशक्यतेचा किंवा काल्पनिकतेचा शिक्का मारावा, हे साहजिकच आहे. पण पाश्चात्त्याच्या या कोत्या व आकुंचित दृष्टीचे भ्रमास आमच्यातील विद्वान शोधकानींही भुलून जावे, हे मात्र मोठे आश्चर्य होय. अशा प्रकारचे अलीकडचे ताजे व ठळक उदाहरण म्हटले म्हणजे रा. रा. त्र्यंबक गुरुनाथ काळे याचे आहे. यानी आपल्या 'पुराण-निरीक्षण' ग्रंथात भारतीय युद्धाचा काल ख्रि. पू. १२६३ वें वर्ष, हा ठरविला आहे. या कालनिर्णयास एक मुख्य आधार त्यानीं असा दिला आहे कीं, लोक ज्या कालास कलियुगाचा आरंभ असे समजत आले आहेत, तो खरोखर 'कल्यारंभ' नसून 'कल्पारंभ' आहे: व हा 'य' आणि 'प' अक्षराचा घोटाळा आर्यभट्टादि ज्योतिष्यानीं केला आहे. रा. काळे यानी आपला ही समजूत एकदा ठाम करून घेतल्यामुळे यांचें युग ४ वर्षांचें, एक मन्वंतर २८८ वर्षांचे व

एक कल्प ४०३२ च वर्षांचा बनला आहे ! ! प्रो फर्ग्युसन याचे एक लेखपर्यंत मत ग्राह्य धरल्यामुळेच रा. काळे याचा असा गोंधळ उडाला आहे. ख्रि. पू. ३१०१ हा काळ कलियुगारंभाचा नसून, आर्य लोकांनी सिंधू नदी ओलांडून प्रथमतः सरस्वतीतीरी वसाहत केली त्याचा आहे. असें एक आपले 'निःसंशय पण प्रमाणशून्य' मत प्रो. फर्ग्युसन यांनी दिले आहे. तेच रा. काळे यानी ग्राह्य धरले आहे. येवढेच नव्हे तर या साहेबांचेही पुढे जाऊन या वसाहत कालास त्यानी कल्पारंभ असे नाव देऊन ठेवले आहे ! पण 'कल्प' शब्दाचा असा अर्थ रा. काळे कोणत्या आधारावरून करतात ? वर उल्लेख केलेला सूर्यसिद्धांत एक वेळ बाजूस राहो; पण भगवद्गीता व मनुस्मृति यातील जीं वचने मागे दिली आहेत, त्यात कल्प म्हणजे ब्रह्मादिन, कल्पारंभ म्हणजे जगाची नवीन व्यक्त रचना, आणि कल्पांत म्हणजे नुसता जल-प्रलय नव्हे तर जगाच्या व्यक्त स्वरूपाचा पूर्ण नाश, अशाच अर्थी आहे. अमरकोशांतही कल्प म्हणज ब्रह्मादिन किंवा जगदुत्पत्ति, असे दोनच अर्थ दिलेले आहेत. त्यावरून भारतीय युद्धाचे पूर्वी जगदुत्पत्ति होऊन फक्त १८३९ च वर्षे झाली होती, असा रा. काळे याच्या या उपपत्तीचा हास्यास्पद अर्थ होत आहे. तसेच दोन मन्वंतराचे दरम्यान होणारा जलप्रलय, रा. काळे याच्या उपपत्तिप्रमाणे प्रत्येक २८८ वर्षानी झाला पाहिजे असे होते ! मनुस्मृति ही युगाची वर्षे दिव्यवर्षानी सांगत आहे, मानवी वर्षांनी नव्हे, हीही गोष्ट आर्यभट्टास दोष देणारे रा. काळे याचे लक्षात आलेली दिसत नाही. 'कल्प' शब्दास आपल्या मनाचाच काही तरी अर्थ चिकटवावयाचा, कल्पारंभ तोच खगोलवर कल्पारंभ असे आधारशिवाय विधान करावयाचे, आणि आर्यभट्ट त्यास कल्पारंभ न म्हणता कल्पारंभ म्हणतो म्हणून, आपल्या डोक्यातल्या घोटाळ्याचे खापर त्याजवर फोडून मोकळे व्हावयाचे, हा मोळेपणा चिकित्सक शोधकास मुळीच शोभण्यासारखा नाही, असे म्हणणे भाग आहे.

प्रकरण ३ रें.

भारतीय राज्यव्यवस्था.

मागील प्रकरणात भारतीय संस्कृति किती प्राचीन आहे, याचे दिग्दर्शन केलें या प्रकरणात या संस्कृतीचे एक महत्त्वाचे अंग असलेल्या भारतीय राज्यव्यवस्थेचे त्रोटक वर्णन करावयाचे आहे. पण ते करण्यापूर्वी आधुनिक सामान्य सुशिक्षितांचे मनामध्ये स्वातंत्र्य (Freedom), राज्यपद्धति (Constitution), राज्यव्यवस्था (Administration किंवा Government) याचे स्वरूपासंबंधाने जो घोटाळा झालेला दिसून येतो, त्याचे निराकरण करणे अवश्य आहे.

' स्वातंत्र्य ' हा शब्द दिसावयास फार सुंदर असून, आधुनिक सुशिक्षितास तर त्याचे महत्त्व प्रत्यक्ष ईश्वराहूनही ज्यास्त वाटतेसे दिसते. पण हा शब्द वास्तविक सापेक्ष असून नैसर्गिक व सामाजिक बंधनानीं ' स्वातंत्र्य ' मुळातच फार मर्यादित होऊन बसलेले आहे. पक्ष्यास आकाशात हवे तिकडे संचार करण्याचे स्वातंत्र्य आहे, असे आपणास सकृद्दर्शनीं वाटते. पण या स्वतंत्र पक्ष्यास समुद्राचें उल्लंघन करता येत नाही, किंवा वातावरणातही विशिष्ट उंचीपलीकडे भरारी मारता येत नाही. हीच स्थिति ' जन्मतः स्वतंत्र ' म्हटलेल्या मनुष्याचीही आहे. मनुष्याच्या मनाने इच्छेच्या किती ही भराऱ्या मारल्या, तरी त्याची गति, सूर्यानें व तो ज्या समाजात राहतो त्या समाजाच्या मूळ नियमानी बरीच मर्यादित करून ठेवली आहे. ' मनुष्यप्राणी जन्मत. स्वतंत्र आहे, स्वातंत्र्य हा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे ' असे पाश्चात्त्याच्या उसन्या तत्त्ववादावर उड्या मारणारे सुशिक्षित खुशाल म्हणोत; पण त्याचे हे स्वातंत्र्य फारच मर्यादित आहे. किंबहुना आमच्या वेदान्त-दृष्टीने, कर्मोपाधीमुळें जीव जन्मास आले कीं, त्याचे स्वातंत्र्य नष्ट होऊन ते बंधनातच पडतात, ही गोष्ट खऱ्या तत्त्वज्ञान्यास व सत्यनिष्ठास पटल्याशिवाय राहणार नाही.

स्वातंत्र्याचा हा तात्त्विक विचार सोडून देऊन केवळ राजकीय स्वातंत्र्यासंबंधाने पाहिले, तरी तेथेही मर्यादा ही दिसून येतेच. राजकीय स्वातंत्र्यास दोन बाजू आहेत. एक बाजू अशी कीं, विशिष्ट देशाच्या राज्यपद्धतीत किंवा राज्यव्यवस्थेत अन्य देशाची कोडीचीही हुकमत नसली पाहिजे. स्वातंत्र्याच्या या बाजूस ' बाह्यस्वातंत्र्य ' असे नाव देता येईल. स्वातंत्र्याची दुसरी बाजू ही आहे कीं, राज्यव्यवस्थेस अत्यंत आवश्यक अशा बाबींखेरीज इतर सर्व गोष्टींत राज्यकर्त्यांची हुकमत प्रजेवर चालूं नये. स्वातंत्र्याच्या या स्वरूपास ' अंतः-

स्वातंत्र्य ' असे म्हणता येईल. बाह्यस्वातंत्र्यात अनेक राष्ट्रे किंवा देश यांचा परस्परसंबंध अपेक्षित आहे; व अंतःस्वातंत्र्यात राजा किंवा राज्यकर्ते व प्रजा यांचा संबंध उल्लेखिलेला आहे. अर्थात् एकाद्या देशास वरील प्रकारचे बाह्य-स्वातंत्र्य लाभण्या न लाभण्याशी त्या देशातील राज्यपद्धतीचा वास्तविक काही संबंध नाही. देशात अनियंत्रित राजसत्ताक पद्धति अंमलात असतानाही त्यास हें बाह्यस्वातंत्र्य असूं शकते, व उलट प्रजासत्ताक राज्यपद्धति असूनही त्या देशास हें बाह्यस्वातंत्र्य कधीं कधी पूर्णपणें नसते. अंतःस्वातंत्र्याचा व राज्यपद्धतीचा (Constitution) मात्र निकट संबंध आहे, असे कोणासही सकृद्दर्शनीं वाटतें. जगातील काही अर्वाचीन प्रजासत्ताक राज्यामुळें तेथील प्रजाजनांचे स्वातंत्र्य वृद्धिगत झालेलें दिसून येतें; व त्यावरून अनियंत्रित राजसत्ताक राज्य-पद्धति व प्रजेचे पारतंत्र्य, आणि प्रजासत्ताक राज्यपद्धति व प्रजास्वातंत्र्य याचा दृढ संबंध आहे, असें साहजिकच अनुमान करण्यात येते; व राज्यसत्तेचा वाटा प्रत्येक प्रजाजनास मिळाला, म्हणजे तो प्रजा स्वतंत्र आहे असे मानण्यांत येतें. पण वास्तविक हा संबंध नित्यसंबंध नाही. तसा तो आहे असे मानणे हा निव्वळ भ्रम आहे. राज्यपद्धति व राज्यव्यवस्था किंवा प्रजास्वातंत्र्य याचा परस्पर संबंध वस्तुतःसाधनसाध्यासारखा आहे. विशिष्ट राज्यपद्धति हे एक साधन व सुखकारक राज्यव्यवस्था किंवा प्रजास्वातंत्र्य हे त्याचे एक साध्य आहे. पण हर्बर्ट स्पेन्सरने म्हटल्याप्रमाणे (हर्बर्ट स्पेन्सरचे आत्मचरित्र-व्हाल्यूम १. पृ. ४३९) हा संबंध पुष्कळ सुशिक्षित लोक विसरतात. किंबहुना या दोनही गोष्टी भिन्न नसून एकच आहेत, अशीच त्यांची समजूत असते ! राज्यपद्धति अनियंत्रित राजसत्ताक असूनही प्रजाजनास स्वातंत्र्य असूं शकतें. उदाहरणार्थ, आपल्या प्राचीन ग्राम-संस्थाच्या लहान लहान लोकसत्ताक राज्यसंघाना बनलेली अनियंत्रित राज-सत्ताक पद्धतिच पहा. तींत दिसावयाला राज्यपद्धति राजसत्ताक असली तरी प्रजेस या ग्रामसंस्थामुळें बहुतेक बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असे. उलट राज्यपद्धति लोकसत्ताक असूनही तेथील राज्यकर्ते आपल्या स्वत्या कर्तव्यापलीकडे जाऊन, स्पेन्सरसाहेबांनी अपायकारक ठरविलेली,(over-government)फाजील सत्ता गाजवीत असतील,तर तेथील प्रजा स्वतंत्र आहे, असे कदापि म्हणता येणार नाही.

स्वतंत्र देशातील राज्यपद्धति पाहिल्या असता असे दिसून येते कीं, तेथील समाजरचनेचे व समाजव्यवस्थेचें तें एक महत्त्वाचे अंग असते. समाजाच्या आस्ति-त्वासाठी, स्थैर्यासाठी व अभिवृद्धीसाठी त्यास व्यक्तीकडून किंवा व्यक्तिसमुदायां-कडून अनेक कार्ये करून घ्यावीं लागतात. त्यांपैकी एक कार्य असें आहे कीं,

ल्या समाजाचे परसमाजापासून व समाजातील एका व्यक्तीचें किंवा वर्गाचें दुसऱ्या व्यक्तीपासून किंवा वर्गापासून संरक्षण करणें. समाजाचें हे एक कार्य ज्या संस्थेवर सोपविलेले असतें, ती राज्यसंस्था होय; आणि राज्यसंस्थेचें खरें व मुख्य कर्तव्य येवढेच आहे. या कर्तव्यापलीकडच्या टापूंत राज्यसंस्था जितकी ज्यास्त ढवळाढवळ करूं लागेल--मग तिची राज्यपद्धति कोणतीही असो-तर तेथिल प्रजेचें स्वातंत्र्य तितक्या प्रमाणाने कमीच होत जाणार; येवढेच नव्हे, तर राज्यसंस्थेचें खरें कर्तव्य परिपूर्ण होण्यास व्यत्यय येणार, हे उघड आहे. राज्यसंस्था हें समाजव्यवस्थेचे एक अंग असल्यामुळे, सामाजिक व नैतिक ध्येय आणि त्यामुळें बनलेले त्या समाजाचे शील ज्या स्वरूपाचें व दर्जाचें असेल, तशा स्वरूपाची सामान्यतः तेथिल राज्यपद्धती व विशेषतः राज्यव्यवस्था असते. राज्यपद्धति कोणतीहि असली तरी, समाजाची आध्यात्मिक, नैतिक व सामाजिक ध्येयें उच्च प्रतीचीं असतील, तर तेथील राज्यव्यवस्थाही त्याच ध्येयास अनुसरून प्रजेस सुखावह अशी होत असते. समाजात अशी ध्येयें खेळत नसली म्हणजे, राज्यपद्धति कितीही उत्तम असली तरी, तेथील राज्यव्यवस्थेंत व्यक्तीव्यक्तीमध्ये पक्षापक्षामध्यें व वर्गावर्गामध्ये द्वेष्यासाठी, व हक्कासाठी ('चढाओढ' हे गोंडस नाव मिळालेला) कलह माजल्यावाचून रहात नाही. युरोप व अमेरिकेंतील राज्यपद्धति बहुतांशी लोकसत्तात्मक असूनही तेथे असा मोठा कलह माजून राहिलेला असतो, याचे तरी बीज हेच होय. सत्तेच्या अधिष्ठानाचे दृष्टीने राज्यपद्धतींचें वर्गीकरण केले तर राजसत्ताक, महाजनसत्ताक, प्रतिनिधिसत्ताक, लोकसत्ताक वगैरे तिचे भेद होतील.पण प्रजाजनांचें सुख व भरभराट हीं एकच दृष्टि ठेवून विचार केला तर,असा सामान्य सिद्धांत निघेल की उच्च शीलाचे,उदार मनाचे,व्यापक सहानुभूतीचे, धीर सद्गुणाचे व श्रेष्ठ बुद्धिमत्तेचे लोकास मात्र जी राज्यपद्धति श्रेष्ठपदास चढविते आणि शीलहीन, हलक्या मनाचे,संकुचित दृष्टीचे, दुराचरणी व बुद्धीहीन लोकास श्रेष्ठतेस चढूं देत नाहीं. तीच राज्यपद्धति उत्तम होय.

कोणत्याही देशातील विनिश्चित काळची राज्यव्यवस्था चागली होती की वाईट होती, हें निश्चितपणे ठरविण्याची आणखी एक बिनचूक कसोटी इंग्लंडातील प्रसिद्ध मुत्सद्दी व राजनीतिज्ञ एडमंड बर्क याने नमूद करून ठेविली आहे. देशातील लोकसंख्या व संपत्ति हीं मुबलक व वाढती असली म्हणजे,-मग तेथील राज्यपद्धति राजसत्ताक की असेना-ती राज्यव्यवस्था चागली आहे, असे निःसंशय समजावें. याचे उलट लोकसंख्या व संपत्ति यातील एक किंवा दोनही कमी असून त्याची वाढही चांगलीशी होत नसली तर,

तेथें लोकसत्तात्मक राज्यपद्धति असूनही ती राज्यव्यवस्था वाईट, असे ठाम मानावे. ही कसोटी प्राचीन भरतखंडास लावून पाहिली तर, तेथील राज्यव्यवस्था उत्तम होती, असे कोणाचेही मत झाल्यावाचून रहाणार नाही. हायडास्पस (झेलम) व हायपानेसू ऊर्फ ह्यपासिस (बियास) या नद्यांचे दरम्यानच्या १ हजार नगरावर युक्टाइडीज् राजाची सत्ता चालत होती ' असे स्ट्रबोनामक ग्रीक इतिहासकार लिहितो. सदरहू दोन नद्यांचे दरम्यान १५०० नगरे असून त्या प्रत्येकाची लोकसंख्या कॉस शहराहून कमी नाही, असे आपोलोडोरस म्हणतो (एलफिन्स्टनचा हिंदुस्थानचा इतिहास पृ. २४१). हिंदुस्थानात एकंदर लहानमोठी १२० राष्ट्रे आहेत, असे मेगस्थनीसने लिहिले आहे ! आर्यावर्ताची लोकवस्ती अफाट असून त्यातील शहरांची मोजदाद करणे अशक्य आहे, असे एरियन ग्रंथकाराने लिहिले असून, इन्दोवरील सर्व राष्ट्रांत प्राचीन भारतीय राष्ट्र संख्येने सर्वांहून श्रेष्ठ होते, असे प्रो. मेक्स डंकर यांनी (History ov Antiquity Vol. V. P. 18) मत दिले आहे. ट्रोग्यसनामक ग्रंथकाराने तर यांचेही पलीकडे जाऊन असे म्हटले आहे की, ' इतर सर्व समकालीन राष्ट्रांची लोकसंख्या एकत्र केली असता जितकी होईल, तितकी प्राचीन हिंदुंची लोकसंख्या होती ! स्ट्रबो इतिहासकार लिहितो की, ' पालिबोथ्रा (पाटलीपुत्र) नगराची लांबी ८ मैल असून, त्याच्या विस्तीर्ण तटास ५७० बुरूज व ६४ वेशी होत्या ' ' किंवहुना सोळाव्या शतकातही कनोज शहरात ३० हजार तांबोळी व ६० हजार वाजंत्रीवाले होते. असेही एके ठिकाणी नमूद केलेले आढळते ! (Researches, Vol. II. p. 320). यावरून हिंदुस्थानात पूर्वी लोकसंख्या किती होती, याची कोणासही सहज कल्पना होईल. प्राचीन काळी भरतखंडातून अनेक लोक देशत्याग करून युरोप-अमेरिकेत वसाहत करण्यास अनेकदा गेले, व त्यांनी तिकडे प्रबळ राष्ट्रे स्थापन केली. (याचे वर्णन पुढे एका लेखात येणार आहे) यावरूनही प्राचीन काळच्या येथील प्रचंड लोकसंख्येचे अनुमान करता येईल.

संपत्तीची कसोटी लावून पाहिली असताही भारतीयांची राज्यपद्धति पूर्णपणे कसास उतरते, असे दिसून येईल. केवळ संपत्तीच्या विपुलतेवरूनच या देशास ' सुवर्णभूमि ' हे सार्थ नांव मिळाले आहे. (याचीही सविस्तर माहिती पुढे एका लेखात देण्याचा विचार आहे.) ' प्राचीन भरतखंडात चोरांचे नावही नव्हते ' असे स्ट्रबोने नमूद करून ठेवले आहे ! अत्यंत सुधारलेल्या पाश्चात्य

राष्ट्राची राजधानी म्हणजे सैतानाचे माहेर घर असून, रात्री रस्त्यातून फिरणे म्हणजे मरणाची तयारी करणे आहे व परक्याचे घरी निजावयास जाण्यापूर्वी आपले मृत्युपत्र करून ठेवणे आवश्यक आहे, असे ज्या काळाचे डां. जॉनसनने अत्युक्तीचे वर्णन केलेले आहे, त्या काळी घराचे दरवाजे का लावावयाचे व त्यास कड्या हल्ल्यें कशासाठी घालावयाच्या, हेही हिंदुलोकास माहीत नव्हते ! मेगस्थनीस याने असे लिहिले आहे की, चंद्रगुप्ताचे छावणीत एकदर ४ लक्ष लोक असूनही तेथे दररोज होणाऱ्या चोऱ्याचा माल सरासरीने ३० रुपयाहून जास्त किमतीचा नसे ! यावरून त्या काळच्या पोलिसच्या चोखपणाचीही साक्ष पटेल. इंग्लडमध्ये ह्रिहर्ड्यारया महाराणीचे कारकीर्दीपर्यंत व्यवस्थित पोलिसखाते अस्तित्वातही आलेले नव्हते, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति हिंदुंच्या स्वप्नातही आली नव्हती, किबहुना तो त्यांच्या राजकीय प्रकृतीस कधी मानवणारही नाही, असे पुष्कळ विद्वान म्हणत असतात; पण हे म्हणणे साफ चुकीचे आहे. " प्राचीनकाळापासून हिंदुस्थानातले प्रत्येक गाव किंवा शहर म्हणजे एक लहानसे पण स्वयंपूर्ण लोकसत्ताक राज्यच असे, व सर्व हिंदुस्थान म्हणजे अशा छोट्या स्वराज्याचा एक प्रचंड संघच होता. " असे ले. कर्नल मार्क विल्क्स (Historical sketches of the South of India Vol. I p. 119) म्हणतात. भरतखंडातील प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र आहे ' असे जे एरियनने आदर पूर्वक म्हटले आहे, ते याचकरता होय. हिंदुस्थानची प्राचीन राज्यपद्धति व कायदे यामध्ये लोकसत्ताक राज्याची बीजे स्पष्ट दिसत आहेत, असे मिलसारख्या दुराग्रही व अहंमन्य इतिहासकारासही कबूल करावे लागले आहे ! सर चार्लस मेटकाफ यानी तर या ग्रामसंस्थाचे मोठेच रसभरित गुणवर्णन केले आहे. ते लिहितातः—" या ग्रामसंस्थारूपी छोट्या लोकसत्ताक राज्यांच्या बहुतेक सर्व गरजा गावातल्या गावात भागत, त्याचेवर परकीय राजसत्तेचा शह कधीच बसला नाही. जेथे इतर सर्व गोष्टी क्षणभंगुर भासतात, तेथे या ग्रामसंस्था मात्र सनातन दिसतात. एकामागून दुसरे अशा अनेक राजघराणी जमीनदोस्त झाली. एकामागून एक राज्यक्रांत्या अनेक होऊन गेल्या. पठाण, मोंगल, मराठे, शीख, इंग्रज वगैरेच्या राजसत्ता आळीपाळीने या देशावर बसल्या, पण या सर्व उलथापालथीत ग्रामसंस्था आपल्या पूर्ववत् कायमच्या कायमच आहेत ! या ग्रामसंस्थारूपी लहान लहान लोकसत्ताक राज्याचा असा संघ बनल्यामुळेच

हिंदुलोकास राजकीय स्वातंत्र्य स्वावलंबन व राजकीय सुख याचा लाभ झाला आहे. "* पण ह्या लहान लहान ग्रामसंस्था वाळूच्या कणाप्रमाणे पृथक् असून त्याचा एकजीव नव्हता असें कोणास वाटेल, पण खरी स्थिति तशी नव्हती. राजानें प्रत्येक गावावर एकेक, दहा किंवा वीस गावाच्या समुदायावर एक, अशा पांच किंवा दहा समुदायावर एक, आणि अशा दहा महासमुदायावर एक याप्रमाणें अधिकारी नेमावे; व त्यानीं एकमेकांशी चढत्या क्रमाने जबाबदारीने वागावें, अशी पद्धत होती. (मनुस्मृति–अ. ७।११३,१२४.)

धर्मशास्त्र किंवा कायदे याचे स्वरूप व व्यापकता हींही राज्यव्यवस्थेच्या बरेवाईटपणाची एक कसोटी आहे. भारतीयाच्या धर्मशास्त्राचा मुख्य ग्रंथ मनुस्मृति हा होय. यांची रचना जशी साधी आहे, तसे त्यांतील नियम दूरदृष्टीचे व शहाणपणाचे पूर्ण निदर्शक आहेत. हे नियम वारंवार बदलणारे नसूनही ते समाजातील व्यक्तींच्या सर्व भिन्नभिन्न परस्परसंबंधास पुरतील इतके व्यापक आहेत. सर विल्यम जोन्स लिहितातः– " मनुस्मृति हीं ग्रीक स्मृतिकार सोलन किंबहुना लायकरगस याच्या कायद्याहूनहीं प्राचीनतर असली पाहिजे. तींत ग्रथित केलेले धर्मशास्त्राचे नियम समाजात प्रथमतः अंमलात आल्याचा काळ तर इजिप्त व भरतखंड येथे प्रथमतः राजसत्ता स्थापित झाली त्या सुमाराचा असावा. क्रीट बेटातील प्राचीन कायदे मनूच्या धर्मशास्त्रासारखेच असल्याचे दिसून येते; व हेच कायदे लायकरगसने स्पार्टामध्ये आणले असावेत. " (Houghton's Institutes of Hindu Law–प्रस्तावना पृ. १०. १२). ' धी बायबल इन् इंडिया ' नावाचा ग्रंथ लिहिणाऱ्या लेखकाचे तर असे

* The village-communities are little republics having nearly everything they can want within themselves and almost independent of any foreign nation. They seem to last where nothing lasts. Dynasty after dynasty tumbles down, revolution succeeds revolution; and Pathan, Moghul, Marhatta, Sikh, English are all Masters in turn, but the village communities remain the same. The union of village communities, each one forming a little state in itself, is in a high degree conducive to their (Hindoo) happiness and to the enjoyment of a great portion of freedom and independence. (Report of the Select Committee Vol. III. of the House of Commons 1832.)

मत आहे की, ' इजिप्त, इराण, ग्रीस व रोमन येथील कायद्यांची रचना मनुस्मृतीचेच पायावर केलेली आहे; व अजूनही युरोपखंडाच्या न्यायकचेऱ्यात मनुस्मृतीचेच प्राबल्य असल्याचे दररोज दिसून येते. (The मनुस्मृति was the foundation upon which the Egyptian, the Persian, the Grecian, and the Roman code of law were built and The influence of मनु was still every day felt in Europe.) ' डेसेमव्हरेटच्या अमदानीत ग्रीकांनी भारतीयांच्या स्मृत्यावरून आपले कायदे तयार केले असावे. व पुढे ग्रीककायद्यापासून रोमन व रोमनपासून इंग्रजी कायदे रचण्यात आले. प्रो. विल्सन लिहितात की, " हिंदूंच्या स्मृतिग्रंथात समाजांतील सर्व भिन्न भिन्न संबंध नियमित करणारे नियम दिले आहेत हे नियम प्रचलित असलेला समाज फारच सुधारलेला असल्यावाचून असे नियम अस्तित्वातच येणे शक्य नाही. "

हिंदूंच्या धर्मशास्त्रासंबंधाने मिल इतिहासकाराचा मात्र अतिशय दुराग्रह होता. " हिंदूंचे धर्मशास्त्र, स्मृति किंवा कायदे यांची रचना व वर्गीकरण ओवडधोवड असून त्यावरून हिंदूराष्ट्राचा रानटीपणा सिद्ध होतो. कोर्टात साक्ष देणे हा एक मोठाच गुण आहे असे हिंदुधर्मशास्त्र मानते. ह्या शास्त्रात अनिश्चितपणा फार आहे. तसेच धर्मशास्त्राचा अर्थ करताना एका पंडिताचे मत दुसऱ्याशी जमत नाही. यावरून मानवी धर्मशास्त्र हिंदुधर्मशास्त्रापेक्षा फार श्रेष्ठ आहे. " वगैरे वगैरे अनेक आक्षेप मिलने घेतले आहेत. (Mill's India, Vol II.) ज्या मिलचा हा इतिहास ज्यांना संपादिला त्या प्रो. विल्सनसाहेबांनी मिलची ही सर्व विधाने सप्रमाण खोडून काढून, त्यावरून मिलचा हिंदूविषयींचा पक्का दुराग्रह व गाढ अज्ञान याचे मात्र प्रदर्शन झाले, असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे ! " कायद्यांची रचना व वर्गीकरण पाहून राष्ट्राच्या सुधारणेचे मोजमाप करावयाचे असेल, तर हिंदूंपेक्षा इंग्रजी राष्ट्र सुधारणेत कमी दर्जाचे आहे, असेच ठरेल. गहाणाची पद्धत जर रानटीपणा दर्शवीत असेल, तर लंडनात गहाणाचा व्यवहार करणारे असंख्य pawn-brokers सावकार इंग्लंडाचाही रानटीपणा सिद्ध करतील. ' हिंदुधर्मशास्त्र खोट्या साक्षीस गुण समजते, हे मिलचे म्हणणे अगदी निराधार असून तें त्याच्या रोगट कल्पनाशक्तीचेच कुरूप अपत्य आहे. हिंदुधर्मशास्त्रात अनिश्चितपणा असेल तर इंग्रजी कायद्याचा विलंबही तितकाच घातक आहे. या

विलंबामुळेंच लाचलुचपत, फितवाफितवी व कारस्थाने यास अहर्सर सांपडतो हिंदू पंडितांत शास्त्रवचनाच्या अर्थासंबंधाने मतभेद होतो, तसा इंग्रजी राज्यांतही होत नाही असे नाही. मद्रासच्या चीफ जस्टिसचा निकाल लोकास फसविणारा व कायद्याचे सपशेल विरुद्ध आहे, असे बंगालचा चीफ जस्टिस म्हणूं शकतो ! मुसलमानी धर्मशास्त्रात शिक्षेचे बाबींत सुडाची रानटी कल्पना विशेष प्रबळ आहे, तशी ती हिंदुधर्मशास्त्रात मुळीच नाही. हिंदुधर्मशास्त्रांत करार व वारसा यासंबंधाने जितके परिपूर्ण व निश्चित वर्णन आहे तितके मुसलमानी शास्त्रात नाही ' असे प्रो. विल्सन यांनी पूर्णपणे सिद्ध केले आहे प्रो मॅक्स मुलर यांनी तर मिलच्या इतिहासावर निर्भीडपणानें पुढील शिक्का मारून ठेवला आहे.- " इंग्रजी भाषेत जर एकादा ग्रंथ अत्यंत खोडसाळ असेल तर तो मिलचा हिंदुस्थानाचा इतिहासच असून हिंदुस्थानावर आलेल्या कांही महान संकटांची जबाबदारीही या ग्रंथावरच आहे. मिलच्या इतिहासात इतके विष भरलेले आहे कीं, प्रो. विल्सन याच्या टीपांनी दिलेल्या विषप्रतिबंधक औषधानेही त्या विषाचा जोर कमी आलेला नाही. " अशा प्रकारे या ग्रंथासंबंधाने अभिप्राय देऊन प्रा. मॅक्स मुलर म्हणतात की, असला ग्रंथ सिव्हिल सर्विसच्या उमेदवारास अभ्यासास लावतात व त्यात त्याची परीक्षा घेतात ही दुर्दैवाची गोष्ट होय ! .

' Mythology of the Hindus,' नामक ग्रंथात (पृ.८) कोलमन् यानें असा अभिप्राय दिला आहे कीं, 'मनुस्मृतीच्या भाषेत कायद्याच्या ग्रंथास आवश्यक असे एक प्रकारचे गांभीर्य व उदात्तता असून त्यामुळे तत्संबंधाने मनात एक प्रकारचा आदरयुक्त दरारा वाटतो. ईश्वराखेरीज इतर सर्वासंबंधाने नियम सांगताना मनुस्मृतीने अत्यंत स्वतंत्रता स्वीकारल्याचे दिसून येत असून खुद्द

---

* The book which I consider most mischievous, nay which I hold responsible for some of the greatest misfortunes that have been wrought in India, is Mill's History of India, even with the antidote against its poison which is supplied by Prof. Wilson's notes (India, what can it teach us, P. 42).

राजाचीही न्यायनिष्ठुरपणें तिने केलेली कान उघाडणी तर खरोखर उच्च दर्जाची आहे.' (The style of मनु has a certain austere majesty that sounds like the language of legislation and extorts a respectful awe The sentiments of independence on all beings but God and the harsh admmistrations even to Kings are truly noble) तसेच डॉ. रॉबर्टसन यानी (Disquration concerning India Appe P 217) असे लिहिले आहे की, " विवेचन केलेल्या बाबींची संख्या व विविधता या दृष्टीने हिंदु मनुस्मृति, जास्टिनियनचे रोमन धर्मशास्त्र किंवा इतर कोणत्याही सुधारलेल्या देशाचे धर्मशास्त्र याच्या तोडीचे आहे. त्यातील कलमाचा अनुक्रम स्वाभाविक व स्पष्ट आहे. ही कलमे व्यापक व अनेक प्रकारची असून त्यातील विवेचन फारच सूक्ष्म व चिकित्सक दृष्टीने केलेले आहे. तसेच तीमध्ये केलेले निर्णय, जगात सर्वकाळी व सर्व स्थळी लोकास मान्य असलेल्या उच्च व सनातन अशा न्यायतत्त्वांचे पायावरच उभारलेले आहेत हे धर्मशास्त्र मान्य करणारा समाज अत्यंत वैभवशाली व सुधारलेला असाच असला पाहिजे, हे उघड दिसून येते. या स्मृतीमध्ये कित्येक बाबींसंबंधाने इतका व्यापक विस्तार व सूक्ष्म वर्गीकरण केले आहे की, याची पुष्कळ युरोपियन धर्मशास्त्रकारास कल्पनाही नव्हती. तीतील काही कलमावरून तर त्या समाजाच्या संस्कृतीची श्रेष्ठता तत्काळ पटते, व ही संस्कृति त्या समाजात फार प्राचीन काळी निर्माण झाली होती, हे पाहून मन थक्क होऊन जाते ! " हिंदुधर्मशास्त्रांतील पुराव्याचे शास्त्रासंबंधाने मद्रास हायकोर्टाचे चीफ जस्टिस सर थॉमस स्ट्रेंज यानीं तर असे लिहिले आहे की, " ह्या शास्त्राचे अध्ययन केल्यास प्रत्येक इंग्रज कायदेपंडिताचा फायदा होऊन त्याच्या नुसत्या वाचनानेही त्याचे मनात आदर व आनंद उत्पन्न झाल्या- वाचून रहाणार नाही. "

It (Hindu law of Evidence) will be read by every English lawyer with a mixture of admiration and delight, as it may be studied by him to advantage मनुस्मृतीचा टीकाकार कुल्लुक याच्या टीकेसंबंधाने सर विल्यम जोन्स यानीं असे मत दिले आहे:—" ही टीका सर्वात लहान पण सर्वाहून अर्थप्रकाशक आहे. तींत टीकाकाराची विद्वत्ता पूर्णपणें दिसून येत असूनही पांडित्याचें वृथा प्रदर्शन मात्र तींत मुळींच नाही. युरोप व आशिया खंडातील कोणत्याही प्राचीन व अर्वाचीन ग्रंथावर

कुल्लुकासारखी अत्यंत सखोल व सर्वमान्य टीका कोणीही केलेली नाहीं. " It is the Shortest yet the most luminous the least ostentatious yet the most learned, the deepest yet the most agreeable commentary ever composed on any author ancient or modern, European or Asiatic (Houghtoni's Institutes of Hindu Law प्रस्तावना पृ. १८)



प्रकरण ४ थें.

भारतीयांचें शील.

मागील प्रकरणांत भारतीयांची राज्यव्यवस्था कशी होती, ते सांगितलें भारतीयांची समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था श्रेष्ठ प्रतीची होती, या संबंधाचा आणखी पुरावा पाहिजे असल्यास, त्यामुळें भारतीयांचे जें शील बनलें तें पहावें. म्हणजे खात्री पटेल. प्राचीन भारतीय लोकांच्या नीतिकल्पना किती श्रेष्ठ होत्या व त्यांचे शील किती उच्च दर्जाचें होतें, यासंबंधाने भारतीय ग्रंथांचीं व पुराव्यांची साक्ष हवी तेवढी देतां येईल. परंतु या बाबतींत त्यांजवर आत्मश्लाघेचा आरोप येऊं शकेल, या दृष्टीने निःपक्षपाती तिऱ्हाइतांनींच दिलेले अभिप्राय विशेष महत्त्वाचे असल्यामुळें तेच आतां क्रमाने देऊं.

मनुष्याच्या मानसिक, बौद्धिक व अध्यात्मिक उन्नतीस आणि समाजाभिवृद्धीस जे सद्गुण आवश्यक आहेत, त्यांत सत्य हा सद्गुण सर्वांत श्रेष्ठ आहे. किंबहुना निरनिराळे सद्गुण किंवा नीतितत्त्वें हीं एका सत्याचींच भिन्नभिन्न स्वरूपें होत असेहीं म्हणतां येईल. असा हा श्रेष्ठ सद्गुण भारतीयांत फार उत्कटत्वानें वसत होता, यासंबंधाने सर्व देशांचे व धर्मांचे ग्रंथकार, प्रवासी व मुत्सद्दी यांचे एकमत आहे. 'असत्य भाषण करणारा भारतीय आजपर्यंत कोणासहीं आढळला नाहीं' असें एरियन नामक ग्रीक इतिहासकाराने (२ रे ख्रिस्ती शतक) लिहिलें आहे. तसेंच "भारतीय इतके प्रामाणिक आहेत कीं, त्यांना दारास कुलूप लावण्याची किंवा करार बंधनकारक करण्यास ते लेखी करण्याची गरजच वाटत नाहीं!" असें स्ट्रेबो इतिहासकाराने म्हटलें आहे 'सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग (Vol. II पृ. ८३) लिहितो.—'प्रामाणिकपणा व सरळपणा या गुणांत हिंदीलोक फार श्रेष्ठ आहेत; त्यांच्या राज्यव्यवस्थेतहीं हेच गुण दिसून येतात. ते अन्यायाने केव्हाहीं कोणाचेंहीं द्रव्य हरण करीत नाहींत. ते न्यायी तर इतके आहेत कीं कित्येक वेळां त्यांच्या न्यायास फाजिल औदार्याचें स्वरूप येतें. "हिंदी लोक सरळ, प्रामाणिक, सत्यनिष्ठ व न्यायी असून ते एकदां घेतलेली शपथ कदापि मोडीत नाहींत. त्यांचे अंगीं लबाडी व दुष्टपणा मुळींच नसून त्यास जशी जगण्याची तशीच मरणाचीहीं भीति वाटत नाहीं.' अशा

साक्षी सयामचा एक वकील सू-वे (सन १२३१), फ्रायर ओर्डेनस (४ थें शतक), चिनी वकील फी-टू (सन ६०५) व बेदी अब्ब झमान (१३ वे शतक) यांनां दिल्या आहेत (India, what can it teach us पृ. ५५ व २७५). अकराव्या शतकात लिहिलेल्या आपल्या भूगोलात इद्रिसी म्हणतो कीं, ' हिंदी लोक इतके न्यायी, विश्वासूक, प्रामाणिक व एकवचनी आहेत कीं, त्याच्या या गुणाची कीर्ति ऐकून परदेशातले अनेक रहिवासी चोहोंकडून त्या देशात जाऊन राहतात. तेराव्या शतकातील मार्को पोलो नामक एक प्रवासी लिहितो कीं, या ब्राह्मणाइतके सच्चे व इमानी व्यापारी जगात कोठेही नाहींत; कारण इहलोकच्या कोणत्याही फायद्याकरता ते कदापि असत्य भाषण करीत नाहींत.' कालिकत व विद्यानगर येथील दरबारी आलेला (सन १४१३-१४८२) खाकन देशचा मुसलमान वकील कमाल उद्दीन समरकंदी यानेही भारतवर्षातील व्यापाऱ्याच्या जीवितवित्ताचे संरक्षण उत्तम होते, अशी साक्ष दिलेली आहे. ' आपल्या सर्व व्यवहारात सत्य व अमर्याद इमान यास हिंदु लोक फार मान देतात ' असें आबुल फाजलने नमूद करून ठेवले आहे. सर जॉन मालकम यांनी असा अभिप्राय दिला आहे कीं, (मिलचा हिंदुस्थानचा इतिहास Vol. I, P. 523) ' हिंदूंची जशी सत्यनिष्ठा तसेच त्याचे धैर्यही श्रेष्ठ प्रतीचे आहे ! हिंदूंचे शीलाची परीक्षा करण्याची पात्रता कर्नल स्लीमन यास जितकी होती तितकी फारच थोड्या युरोपियनात असेल. ' परस्पराशी व्यवहार करताना लबाडी किंवा असत्य भाषण करण्याचे खेड्यातील लोकास माहीतच नाहीं ' याप्रमाणे अभिप्राय देऊन पुढें कर्नलसाहेब लिहितातः-'मजपुढे शेकडो खटले असे आले होते कीं, आरोपी खोटें बोलेल तरच त्याची मालमत्ता, स्वातंत्र्य किंवा प्राण वचावतील; पण अशा आणीबाणीच्या प्रसंगीही आरोपीनी खोटें बोलण्याचें साफ नाकारले आहे ! ' (I have had before me hundreds of cases in which a man's property, liberty and life has depended upon his telling a lie, and he has refused to tell it.) कर्नल साहेबाचें हें बहुमोल सर्टिफिकिट नमूद करून मॅक्स मुलरसाहेब विचारतात कीं, ' असे उद्गार इंग्लंडांतल्या किती इंग्रज जज्जाचे तोंडून निघतील ? ' (India, what can it teach us पृ. ५०) मॅक्स मुलरसाहेब पुढे लिहितात कीं, ' हिंदुस्थानाशीं ज्या ज्या परकीय लोकाचा संबंध आला

त्या सर्वांस, तेथील लोकाच्या राष्ट्रीय शीलांत सत्यप्रीति हा मुख्य व ठळक सद्गुण असल्याचे पाहून फार आश्चर्य वाटलेले आहे. हिंदु लोक म्हणजे लबाड, असा आरोप त्यांचेवर कोणीही केलेला नाहीं. साम्रत काळचे प्रवास लेखक, ग्रंथकार, परदेशातील लोकाच्या सत्यनिष्ठेचा बहुधा केव्हाही तारीफ करीत नाहींत. फ्रान्सात गेलेला इंग्रज प्रवासी फ्रेंचांचा प्रामाणिकपणा किंवा सत्यनिष्ठा यांबद्दल ब्रही काढीत नाही. उलट इंग्लंडांत आलेला फ्रेंच प्रवासी आपल्या प्रवासाचें वर्णन करताना (Perfide Albion) 'दगलबाज इंग्लंड' असा एकादा तरी टोमणा मारल्यावाचून राहत नाहीं! अशा स्थितींत हिंदु लोकाच्या सत्यप्रीतीचा गौरवपूर्वक उल्लेख प्रत्येक परदेशीय गृहस्थ करतो, यावरून यास मुळात तसेंच बलवत्तर कारण असलें पाहिजे, हें उघड आहे' [कित्ता पृ. ५७)

मॅक्स मुलरसाहेबाचे उद्गार वाचून कलकत्ता युनिव्हर्सिटीचे मंदिरांत वृद्ध-तरुण सुशिक्षितासमक्ष हिंदुराष्ट्राचे कपाळावर सरसकट 'लबाड' असा शिक्का मारणाऱ्या सत्यनिष्ठ कर्झनसाहेबाचें स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. सन १९०५ च्या फेब्रुआरी महिन्याच्या ११ वे तारखेस कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदानसमारंभाचे वेळीं जमलेल्या निवडक वृद्ध-तरुण बंगाली विद्वानाचीं लॉर्ड कर्झन यांनी चान्सेलर या नात्याने चागलीच पाद्यपूजा केली. 'सत्याचे अत्युच्च ध्येय हें मुख्यतः पाश्चिमात्यातच आहे.' 'पौर्वात्य नीतिशास्त्रात सत्यास श्रेष्ठपद प्राप्त होण्यापूर्वीच तें त्यास पाश्चात्य नीतिशास्त्रात मिळालेले होतें' वगैरे सिद्धात ठोकून देऊन लॉर्ड कर्झन यानीं असत्य व तोंडपुजेपणा याच्या पुढीलप्रमाणे व्याख्या सांगितल्याः—'आपले शील, दुसऱ्याचे वर्तन, किंवा जगात घडणाऱ्या गोष्टी याचे संबंधाने आपल्या ज्या भाषणानें किंवा वर्तनाने लोकांचा चुकीचा ग्रह होतो त्यास असत्य असे म्हणावे. तोंडपुजेपणा प्रामाणिकपणाचा किंवा अप्रामाणिकपणाचा असतो. पण हे दोन्ही प्रकार वाईटच असल्यामुळे त्याचा त्याग करावा. तोंडपुजेपणा प्रामाणिकपणाचा असला तरी तो असत्यच असतो; आणि तो अप्रामाणिकपणाचा असला तर तो असत्य असून शिवाय नीचपणाचाही असतो. लॉर्ड कर्झनसाहेबाच्या पूर्वोक्त उद्गारोद्धाराचा त्या वेळी सगळ्या हिंदुस्थानाने जोराने व एकमताने निषेध केला; पण त्यास तेव्हा कर्झनसाहेबानी मुळीच प्रत्युत्तर दिले नाहीं. पण पुढे ८ वर्षांनी त्यानीं एका मध्यस्थाचे मार्फत असें उत्तर दिले कीं, 'मी हिंदु लोकास सरसकट लबाड मुळींच म्हटलेले नाहीं. विवाहकाले रति

संप्रयोगे प्राणव्यये सर्वधनापहारे । धर्मस्य चार्थेऽप्यनृतं वदेत पंचानृतान्याहुरपातकानि ' ॥ या श्लोकात सांगितलेल्या पाच प्रसंगीं खोटें बोललें असता पातक लागत नाहीं, या हिंदु कल्पनेवरच माझा कटाक्ष होता. ' पण लोर्ड कर्झन-साहेबानीं अशा प्रकारच्या असत्य भाषणाचीं उदाहरणे काढण्याकरता महाभारत धुंडाळण्याचे वास्तविक काहीच प्रयोजन नव्हते. त्यानीं स्वतःच लिहिलेल्या Problems of the far east या ग्रंथाचा १५५ व १५६ वां पृष्ठे वाचून पाहिलीं असतीं, तर कोरियाचे फारिन ऑफिसच्या प्रधानापाशीं खुद्द आपणच सत्याचा श्रेष्ठ पाश्चात्य ध्येयाचा ' कोणता मासला दाखविला, हे त्यांचे त्यासच कळून आले असते. कोरियाचे बादशहाच्या भेटीस जाण्यापूर्वी त्या वेळचे मिस्तर कर्झन यानीं वरील प्रधानाचीं मुलाखत घेतली. तेव्हा प्रधानाने विचारले, 'आपले वय काय ?' कोरिया देशात थोड्या वयाचे तरुण पुरुषास मान मिळत नाहीं. ही गोष्ट कर्झनसाहेबास माहीत झाली होती. म्हणून त्यांनी न डगमगता ' चाळीस ' असे ठासून उत्तर दिले ! हा इंग्रज गृहस्थ वय ४० सांगतो पण दिसतो पुष्कळ तरुण, असे मनात येऊन प्रधानाने पुनः त्यास विचारले कीं, ' आपण वयाच्या मानानें इतके तरुण कसे दिसता ? ' तेव्हा कर्झनसाहेबाना उत्तर दिल कीं, ' कोरियासारख्या उत्तम हवेच्या देशात मी महिनाभर प्रवास करीत असल्यामुळे ४० वर्षांचा असूनही मी पुष्कळच तरुण दिसूं लागलो आहे. यावर कोरियन प्रधानाने प्रश्न केला कीं, ' आपण इंग्लंडच्या महाराणीचे अगदी जवळचे नातलग असाल ? ' या प्रश्नास मात्र कर्झनसाहेबानीं ' नाहीं ' असे खरा जबाब दिला. पण तो ऐकून प्रधानाचे चेहऱ्यावर तिटकारा उत्पन्न झाल्याचे पाहताच कर्झनसाहेबानीं ' बेशरमपणे ' (unscrupulous)' पण मी अजून अविवाहित आहे ' असे सांगून व आपण महाराणीचे जावई होण्याचा संभव आहे, असे ध्वनित करून वरील कोरियन प्रधानास खुष केले ! कर्झनसाहेबाच्या ' उच्च पाश्चात्य सत्यानेंचे ' हे वर्णन दुसऱ्या तिसऱ्या कोणी मत्सरी मनुष्याने केलेले नसून ते त्यानीच स्वतःच्या ग्रंथात वर्णिलेले आहे ! कर्झनसाहेबाना कलकत्ता युनिव्हर्सिटात ज्याचे लक्षण सांगितले ते असत्य व तोडपुजेपणा याचें एक उत्कृष्ट उदाहरण व्याख्या करणारानेच जगास अगाऊ दाखवून ठेवले होते ! हिंदु लोकाच्या वर दिलेल्या नीतिश्लोकातिल पाच अपवादातही कर्झनसाहेबाची वरील खोटीं भाषणें पडत नाहींत. कारण कोरियाचे प्रधानाशी बोलताना कर्झनसाहेबास

एकादी कोरियन नवरी मिळवावयाची नव्हती, रतिसंप्रयोगाचाही तो समय नव्हता, त्याच्या प्राणावर संकट आलें नव्हतें, त्याचें सगळें धन जाण्याचा प्रसंग आला नव्हता किंवा त्याना धर्मदृष्ट्या कोणाचे हितही साधावयाचे नव्हते. असे असूनहीं केवळ आत्मप्रतिष्ठस्तव लागोपाठ तीन धडधडीत खोटी विधाने करणारे, येवढेच नव्हे तर तीं आपल्या ग्रंथात फुशारकीने नमूद करणारे सद्गृहस्थच मोठ्या दिमाखाने हिंदु लोकास पर्यायाने असत्यभाषणी व तोडपुजे म्हणतात, हा धाष्टर्याचा कळसच म्हटला पाहिजे ! बटलरादि नोकरचाकर, पोटार्थी करून किंवा न्याड व लब्धप्रतिष्ठित रावसाहेब-रावबहादूर यांच्याशीच संबंध आल्यामुळे त्यांची असत्य भाषणे व तोडपुजेपणा हींच ऐकण्याची संवय झालेले इतरही अनेक युरोपियन हिंदुराष्ट्राच्या सत्यानिष्ठेसंबधाने असेच भलभलते तर्क करीत असतात. पण मॅक्स मुलरसाहेबानी दिलेली इशारत असल्या लोकानी लक्षात ठेवावी. ते लिहितात की, ' शितावरून भाताची परीक्षा, हा न्याय भातापुरताच बरोबर आहे. तो मनुष्याच्या समाजास किंवा राष्ट्रास लावूं पहाणे नित्य आहे. एका इंग्रजी आगबोटीवर एका इंग्रज पाद्र्यास एका फ्रेंच मुलास बाप्तिस्मा देण्याचा एकच प्रसंग आला होता. त्या मुलाचे नाक लांब असल्याचे पहिल्यापासून सदर पाद्र्याने पक्का सिद्धांतच बांधून ठेवला की सर्व फ्रेंच मुलाचीं नाकें लांबलचक असतात ! ' असलीच चुकी वरील न्याय माणसास लावणारे पंडितमूर्ख करतात. महाभारतांतील अत्यंत श्रेष्ठ पुरुष भीष्म पितामह याचे चारित्र्य पहा किंवा रामायणांतील रामचंद्राचे चारित्र अवलोकन करा. त्यात सर्वत्र सत्यासच अत्युच्च पद दिलेले असून सत्याकरितांच लागेल तो स्वार्थत्याग या व्यक्तींनी केलेला आहे. चुकून तोंडातून गेलेला शब्द खरा करण्याकरता हरिश्चंद्राने किती हाल सोसले ते जगजाहीरच आहे. वरील तीन महापुरुषाच्या तोडीची सत्यनिष्ठा धारण करणारा एक तरी पुरुष लॉर्ड कर्झनसारख्या निंदकानीं जगांतील कोणत्याही देशच्या खऱ्याखुऱ्या इतिहासांत किंवा कल्पित कादंबऱ्यांत दाखवून मग हिंदु लोकांवर आग पाखडण्यास खुशाल तयार व्हावे.

सत्यनिष्ठेखेरीज इतरही अनेक सद्गुण परकीय लोकास हिंदुलोकांत आढळून आले असून त्याबद्दल त्यानीं त्याचा मोकळ्या मनाने गौरव केला आहे. युरोपांत माहीत असलेल्या गुलामगिरीचे हिंदुस्थानात नांवही नसून तेथील पुरुषाचे शौर्य-धैर्य व स्त्रियाचे पातिव्रत्य हे गुण पाहून मेगस्तनीस यास त्याचे बद्दल फारच आदरबुद्धि उत्पन्न

झाली होती. तो लिहितो कीं, ' शौर्याचे बाबतींत ते इतर सर्व आशिआटिकांत श्रेष्ठ असून उद्योगी व व्यसनपराङ्मुख आहेत; त्यांचे शेतकरीही मेहनती व कुशल कारागीर असून ते स्वदेशी राजाचे अंमलाखाली शांतपणान रहातात, व ते कोर्टाची पायरी बहुधा चढतच नाहींत. ' (हंटरचे गॅझिटियर ' India ' पृ. २६६.) Religions of the World नामक ग्रंथांत (पृ. ४३) रे. मोरिस लिहितात कीं, ' कोणत्याही दृष्टीने विचार केला तरी शूद्र हे पूर्वी गुलामगिरींत असणे शक्य नाहीं, व ते साप्रतही गुलाम नाहींत. हिंदुस्थानांतले सर्व लोक स्वतंत्र नागरिक असल्याचे पाहून ग्रीक लोकांस मोठाच अचंबा वाटला'. (The sudras are not in any sense slaves, and never can have been such. The Greeks were surprised to find all classes in India free citizens). एलिफिन्स्टनसाहेब हिंदुस्थानच्या इतिहासात (पृ. २४३) लिहितातः—' हिंदूंच्या जुन्या नाटक-ग्रंथांतील इतर पात्रें राजाशी बोलताना लाँडपुजेपणा किंवा दैन्य मुळींच दाखवीत नाहींत, ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. ' ' धनी फाजील कदरखोर नसला म्हणजे हिंदु नोकर त्याशीं मोकळ्या मनाने व विश्वासूकपणाने वागतात; वरिष्ठाशीं बोलताना हिंदु लोक दैन्य किंवा हाजीहाजीखोरपणा मुळींच दाखवीत नाहींत. ' अशी साक्ष प्रो० विल्सन यानी दिली आहे. एलिफिन्स्टन साहेब आपल्या इतिहासात (पृ. २०२) पुनः लिहितात, ' नोकराशी धनी जर खरेखर दयाळूपणाने व सुविचाराने वागत असला तर हिंदु नोकरही त्याशी इतक्या इमानाने वागतात कीं, त्याहून अधिक इमानीपणा जगात कोठेच आढळणार नाहीं. आजारीपणात किंवा एकाया अडचणीच्या व संकटाच्या वेळी हिंदु नोकर इमान व स्वामिनिष्ठा यांचे कसोटींत पूर्णपणे उतरतात, असा युरोपियनाचा अनुभव आहे. ' हिंदु लोक धार्मिक, मोकळ्या मनाचे, परकीयाशीं सभ्यतेनें वागणारे, आनंदी, ज्ञाननिष्ठ, न्यायप्रिय, व्यवहारदक्ष, सत्यनिष्ठ आणि प्रत्येक व्यवहारात अति इमानी असे आहेत ' असें अबुल फजल ह्या कुशल व चतुर लोकनिरीक्षक मुसलमान इतिहासकाराने नमूद करून ठेवलें आहे, (टॉडकृत राजस्थानचा इतिहास Vol I, p. 643.) हिंदूंचा इमानीपणा, सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, निर्वाणीचें शौर्य, राजनिष्ठा आणि अबृच्या बचावाचा प्रश्न आला असता त्याचे अंगीं दिसून येणारी व तिन्हाइतांचेही मनास चटका

लावणारी स्वामिनिष्ठा, या सद्गुणांची तारीफ, अजमीर-मारवाडचे कमिशनर कर्नल डिक्सन (सन १८५०) यांनी केली आहे. नेबुहर लिहितो की, ' हिंदूंइतके परधर्मसहिष्णु लोक पृथ्वीचे पाठीवर दुसरे कोणीच नाहीत. तसेच प्राणिमात्रास होतां होईल तों कोणतेही दुःख द्यावयाचे नाहीं, ही प्रवृत्ति जगांत कोठें उत्कटत्वानें वसत असेल तर ती हिंदु लोकातच वसत आहे. मॉनियर विल्यम्स Modern India & Indians या ग्रंथांत (पृ. ३३) लिहितात की, ' हिंदी लोक जाणूनबुजून केव्हाही प्राणिहत्या करीत नाहींत. जगात आपणही जगावें व इतरांसही जगूं द्यावे, हे त्यांचे तत्त्व आहे. आकाश निरभ्र होऊन चक्क ऊन पडले असता इंग्रज गृहस्थास अति आनंद होतो; व या आनंदाचें प्रदर्शन म्हणून तो जंगलात जाऊन कांहीं निरुपद्रवी प्राणी ठार मारून टाकतो ! इंग्रजाच्या ह्या चमत्कारिक मनोवृत्तींची हिंदु लोकांस कल्पनाच होत नाहीं. ' एल्फिन्स्टनसाहेब आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासात (पृ. १९९) लिहितात :—' खेड्यांत राहणारे लोक निरुपद्रवी, गरीब, कुटुंबीयांवर प्रेम करणारे व शेजाऱ्यांशी ममतेने वागणारे असे असून सरकारांखेरीज इतर सर्वांशी ते प्रामाणिकपणाने व सच्चा दिलाने वागतात. ' सन १८१३ साला ब्रिटिश पार्लमेंटपुढे साक्ष देताना कॅप्टन सिंडनहॅम हिंदूंच्या अनेक सद्गुणांचे वर्णन करून म्हणाले की, ' त्यांची ग्राहकशक्ति व बुद्धि तीव्र असून ते उद्योगी व इमानी आहेत. धर्मादाय, परोपकार व मातापितृभक्ति या संबंधांचा सर्व कर्तव्ये योग्य कार्यी विनचूकपणे व मनःपूर्वक करण्याचे कामात हिंदु लोक जगांतील इतर कोणत्याही राष्ट्रांचा बरोबरी करतील (मिलचा हिंदुस्थानचा इतिहास पृ. ५२३). ' बाधवाबिपर्यांचीं आपलीं सामाजिक कर्तव्ये कोणतीं व तीं कशीं करावीं, हे हिंदु लोकांस युरोपियनाइतकेंच-किंबहुना त्यांपेक्षा जास्त चांगलें-समजतें ' असें अबे डुबोईस या प्रवाशाने मत दिले आहे. वर उल्लेख केलेल्या पार्लमेंटपुढील चौकशींत सर जॉन मालकम म्हणालेः—' बहार प्रांतांतले लोक शरीराने जसे उंच व ताकदवान् आहेत तसेच ते मनानेंही शूर, उदार, दयाळू, सत्यनिष्ठ व धैर्यवान् आहेत. इमान आणि अब्रू यासंबंधाची त्यांची निष्ठा फार उच्च दर्जाची आहे; व तीसंबंधाने नेहमी अशीं उदाहरणे घडून येत असतात की तीं इतिहासापेक्षा कादंबऱ्यांतच जास्त शोभतील, असे कोणीही इंग्रज म्हणेल. त्यांच्या इतके विश्वासू लोक तर मला दुसरे कोणतेच माहींत नाहींत. इंग्लंडशीं हिंदुस्थानाचा व्यापार खुलेपणाने सुरू झाला तर हिंदूंच्या

संस्कृतीची अभिवृद्धि होईल, असे तुम्हास वाटते काय ? असा प्रश्न विचारला असता **सर थॉमस् मनरो** यानी उत्तर दिलें कीं, ' धर्मभोळेपणा व दुराग्रह नष्ट करणारें उदार शिक्षण आणि राजनीति या दोन गोष्टींत हिंदु लोक युरोपियनापेक्षा कमी आहेत. परंतु श्रेष्ठ प्रतीची कृषिपद्धति, अद्वितीय हस्तकौशल्य, सोय किंवा चैन यास आवश्यक असलेल्या सर्व वस्तु निर्माण करण्याची योग्यता, प्रत्येक गावात लिहिणे, वाचणे व गणित शिकविणारी शाळा असणे, [१] एकमेकांशी सभ्यतेचे, आदरसत्काराचें व परोपकाराचे आणि विशेषत: स्त्रियांशी विश्वासाचे, आदराचे व मार्दवयुक्त वर्तन ठेवणे, हे गुण अंगी असणे ही जर सुधारलेपणाची लक्षणे असतील, तर या बाबतींत हिंदु लोक कोणत्याही युरोपियन राष्ट्राहून कमी नाहीत. सुधारणा किंवा संस्कृति ह्या वस्तूंची जर दोन राष्ट्रांत देवघेव करावयाची असेल तर हिंदुस्थानच्या हा माल आयात करण्यात इंग्लंडचाच पुष्कळ फायदा होईल, अशी मला खात्री वाटते ! ' '(If civilization is to become an article of trade between two countries, I am convinced that England will gain by the import cargo.) '

व्यक्तीचे किंवा राष्ट्राचे शील त्याच्या ग्रंथात व वाङ्मयात सहज व स्पष्टपणे दिसून येते; विशेषत: वाङ्मयविषयक वादविवादाची तऱ्हा व स्वरूप यावरून तर याची हटकून परीक्षा होते. अशा तऱ्हेचा वादविवाद हिंदुस्थानचे पंडित आणि युरोपियन संस्कृत ' स्कालर ' व इतर विद्वान आपसात व एकमेकांत करतात. याचा २० वर्षे अनुभव घेतल्यानंतर मॅक्स मुलर साहेबांनी असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे कीं, ' अशा तऱ्हेच्या वादविवादात युरोपियन पंडित एकमेकांवर व्यक्तिविषयक हल्ला करतात, वेडेच नव्हे तर विनोदवाद व सत्यापलाप याचाही अवलंब करतात. अमेरिकेत वादविवादात विजय व स्तुति यांपेक्षा सत्य व स्वाभिमान यास जास्त किंमतवान मानणारे पंडित कुचकामाचे होत. अशी त्यांची भावना असते. व तीस अनुसरून, वादविवाद करताना ते जाणूनबुजून

---

[१] हे विधान कित्येकांस आतिशयोक्तीचे वाटेल; पण तशी वस्तुस्थिति नाही. सरकारी शाळा सुरू होण्यापूर्वी बंगाल्यात ८० हजार गावठी शाळा होत्या; सन १८३५ मध्ये या शाळांचें प्रमाण ४०० माणसास १ असे पडत होते. मद्रासमध्येही ३ ते १ मुलगा या गावठी शाळांत शिकणारा असे, असे सरकारी रिपोर्टच आहेत !

खोटी विधाने करण्यासही कमी करीत नाहीत. पण हिंदुस्थानच्या पंडिताची तऱ्हा याचे उलट आहे. वादविवादात ग्राम्य शिव्या व उद्धट भाषा वापरणारा पंडित असभ्यच नव्हे तर अज्ञानीही आहे, असे ते मानतात. युरोप-अमेरिकेत वादविवाद चालला असता पंडितात जितकी सत्यनिष्ठा, औदार्य व उमदेपणा दिसून येतो, त्याहून ज्यास्त सत्यनिष्ठा, औदार्य व उमदेपणा हिंदी पंडितात दिसून आला आहे. ते वादविवादात चिकाटी व सत्याग्रह दाखवितात, पण उद्धटपणा त्यांच्यात कधीही दिसून आला नाही. चुकी झाली तर ती कबूल करण्यास ते नेहमी तयार असतात, व प्रतिपक्षाची चूक झाली तरी तीबद्दल ते त्याचा उपहासही करीत नाहीत (They have displayed a far greater respect for truth, and a far more manly and generous spirit than we are accustomed to even in Europe and America. They have shown strength but no rudeness When they were wrong they have readily admitted their mistake; when they were right they have never sneered at their European adversaries.) ' जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा हिंदुस्थानात व्यापारी दानत किंवा अब्रू ही ज्यास्त असून बिल नाकारल्याची उदाहरणे तिकडे बहुधा घडलेच नाहीत ' अशी ग्वाही इंग्रज व्यापाऱ्यांनी अनेकदा मजपाशी दिलेली आहे (India what can it teach us P. 13) हिंदुस्थानचे पहिले गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स यांनी पार्लमेंटच्या कमिटीपुढे साक्ष देताना सांगितले की, ' हिंदुलोक मानवी मनोविकारांच्या दुष्ट मार्गापासून इतर कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राइतकेच पराङ्मुख आ अन्यायाचा सूड उगविण्यापेक्षा उपकाराबद्दल कृतज्ञता दर्शविण्याचीच ज्यास्त तयारी असते. ' बिशप हेबर यांनी लिहिले आहे की ' सौम्य व स्वभाव, नैसर्गिक ग्राहकशक्ति व कुशाग्र बुद्धि हे गुण मानवजातीत सा आढळतात त्याहून ते अधिक प्रमाणात हिंदु लोकात वसत आहेत, असा अनुभव आलेला आहे. ' प्रो० विल्सन यांनी लिहिले आहे की, ' हिं सामान्यतः अगदी साध्या व सरळ स्वभावाचे असून त्यास व्यवहारांतील ह कळत नाहीत. युरोपियन सुधारणेचा प्रचार जेथे पुष्कळ काळ झाला आहे ते

लोकातून मात्र हे गुण नष्ट होत चालले आहेत. *विद्वान हिंदु लोकही उद्योगी, बुद्धिमान, आनंदी व मोकळ्या मनाचे असतात. बारा-तेरा वर्षांच्या हिंदु मुलात पुष्कळ वेळा अपूर्व व आश्चर्यकारक ग्राहकशक्ति आढळते. बुद्धिमत्ता, ग्राहकशक्ति व अभ्यासिपणा या गुणात हिंदु मुले युरोपियन मुलाहून वरचढ आहेत. घरंदाज व श्रीमान हिंदुलोकातही सभ्य चालरीत, बुद्धीची विशदता व व्यापकता, मनाचें औदार्य व वर्तनाचा बाणेदारपणा हे गुण इतक्या प्रकटत्वाने दिसून येतात की, जगातील कोणत्याही देशात त्यांची गणना सद्गृहस्थातच (Gentlemen) होईल. ' (मिलचा ब्रि. साम्राज्य इतिहास, Vol. I. P. 530-32.). ' हिंदु लोकाहून अधिक धार्मिक व कर्तव्यनिष्ठ लोक मला युरोपात कोणीही आढळले नाहीत ' असे प्रो० मोनियर विल्यम्स यानी लिहिले आहे (Modern India & Indians P. 88 & 128). एल्फिन्स्टन साहेब आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासात (पृ. ३७५-८१) लिहितातः-' हिंदु व इंग्रज यांची तुलना करता असे आढळून येतें का, हिंदूंत इतर कोणतेही दुर्गुण असले तरी त्यांच्यात मद्यपानाचे व्यसन व असभ्यता हे दोष नसल्यामुळे त्यांची चालचलणूक इंग्रजापेक्षा अधिक शुद्ध असते. इंग्लंडातल्या मोठ्या शहरातील अत्यंत कनिष्ठ दर्जाचे लोक जितके नीतिभ्रष्ट असतात, तितका हिंदूमधील अगदी कनिष्ठ वर्गही नीतिभ्रष्ट नाही. ' सन १८३२ साली पार्लमेंटपुढें आलेल्या रिपोर्टावरून काढलेल्या चार वर्षांच्या आकड्यांची खालील तुलना या बाबतींत पहाण्यासारखी आहे.

	इंग्लंड व वेल्स.	बंगाल.
लोकसंख्या.	१३० लक्ष	६ कोट.
शाळांची शिक्षा झालेल्यांची वार्षिक सरासरी.	१२३२	५९
शाळेत गेलेल्यांचे लोकसंख्येशी प्रमाण.	२०३२८१:१	१००४१८२.१
शिक्षेच्या लोकांचे प्रमाण	६७१७३.१	४०२०१०:१

सिद्ध शास्त्रज्ञ डार्विन याने प्रवासात असतांना पोर्ट लुई येथील तुरुंगात


The longer we possess a province, the more mon and grave does perjury become ' असे सर जी. यानीं लिहिले आहे. (S. Johnson 's Oriental Religions, Ina p. 288.)

हिंदु कैदी पाहिले. तेव्हा त्याची चालचलणूक पाहून या शास्त्रज्ञास आश्चर्य वाटले, व त्याचे मनात त्याविषयी मोठाच आदरबुद्धि उत्पन्न झाली. तो लिहितो—हे कैदी शांत असून त्यांचे वर्तन चागले आहे. त्यांचा बाह्य वर्तणूक, त्यांची स्वच्छता व रोजचे आपले धार्मिक आचार पाळण्यांतील त्याची तत्परता हीं पाहणारास, न्यू सौथ वेल्सच्या तुरुंगांतील आपल्या कैद्याचा जसा आपणांस तिरस्कार वाटतो तसा त्याचे संबंधाने वाटणे शक्यच नाही ' (A naturalist's Voyage round the world p. 454). हिंदूंच्या कृतज्ञतेसंबंधाने एल्फिन्स्टन साहेबानी असा अभिप्राय दिला आहे की, (हिंदुस्थानचा इतिहास पृ० २०१, २०२) ' बऱ्या इंग्रज अधिकाऱ्यानीं केलेल्या उपकाराबद्दल ते इतके कृतज्ञ असतात की, ते अधिकारी अधिकारच्युत व दरिद्री झाले तरी ते त्यास मदत करतात; किबहुना त्याचे पश्चात् त्याच्या कुटुंबाचाही परामर्ष घेतात. बंगाल्यातील असाच एक बडा अधिकारी बडतर्फ होऊन इंग्लंडात दारिद्र्यात दिवस कंठीत होता. त्यास एका मराठा ब्राह्मणाने या संकटकाली निरपेक्षपणे १ लक्ष रुपयांची मदत केली. एवढेच नव्हे तर पुढे हीं रक्कम परत करीत असताही तीं घेण्याचे त्याने नाकारले! ' हिंदी शिपायाच्या इमानाबद्दल हाच इतिहासकार लिहितो की, ' आर्णाबार्णाच्या प्रसंगी हिंदी शिपायानीं आपल्या परकीय धन्याबद्दल जितकी निष्ठा व जितके इमान दाखविले आहे, तितकी निष्ठा व तितके इमान दुसऱ्या कोणत्याही देशातील शिपायाचे वर्तनात स्वदेशीय धन्यासंबंधानेही आढळणे कठीण आहे ' (The fidelity of our sepoys to their foreign masters has been shown in instances which it would be difficult to match even among national troops in any other country.) ' शरीरे व घरेदारे स्वच्छ ठेवण्याचे बाबतीत हिंदुलोक दक्षिण युरोपातील लोकाहून श्रेष्ठ आहेत, येवढेच नव्हे तर स्वच्छता ठेवण्याच्या त्याच्या काही चाली उलट युरोपातील लोकानीही अनुकरण करण्यासारख्या आहेत ! ' असें एकाने लिहिले आहे.

मद्यमांसाविषयींचा हिंदूंचा तिटकारा जगप्रसिद्ध आहे.काहीं हिंदुजातीस मांसाशन निषिद्ध नाही हे खरे;पण त्याची स्वाभाविक प्रवृत्ति प्राणिमात्राशीं ममतेनें वागण्याची आहे मांस निषिद्ध नसलेल्या जातीचेही तें-मुसलमान किंवा युरोपियन याचे प्रमाणें-रोजचें अन्न नाही. आणि असें असण्याचे कारण धर्मांधता किंवा फाजिल

सोंवळेपणा हे नसून त्याचे मुळाशीं एक मोठेच शास्त्रीय तत्त्व आहे. ' सुधारणेचा इतिहास ' नावाच्या ग्रंथात बकल नामक प्रसिद्ध इंग्रज इतिहासकाराने असा सिद्धांत प्रणीत केला आहे कीं, (Vol. I. P. 64.) थंड देशातल्या लोकांपेक्षा उष्ण देशातल्या लोकाच्या शरीरपोषणास मांसादि कर्ब विशिष्ट (Carbonaceous) अन्नापेक्षा पिष्टाश (Starch)-विशिष्ट व (Oxygenous-) ऑक्सिजनविशिष्ट धान्यादिकांचीच जास्त आवश्यकता आहे. शिवाय उष्णदेशांतील हवेचाच नैसर्गिक परिणाम असा होतो कीं, मनुष्याचे हातून विशेष परिश्रमाचे काम एकसारखें होत नाहीं. तो लवकर थकतो व त्याचे मनास उत्साह राहत नाहीं. या गोष्टीचा अनुभव उष्ण देशातल्या लोकासही हिवाळा व उन्हाळा यांतील कामाचे प्रमाणावरून सहज येतो. हे दोन सिद्धांत लक्षात घेतले असता हिंदुलोकांत मांसाशनावद्दल इतकी पराङ्मुखता का, ते मुख्यतः शाका. हारांच का व त्यातही तांदुळावरच येवढी त्यांची मदार का, याचा सहज उलगडा होतो. इतर धान्यापेक्षा तांदुळात पिष्टाश जास्त असून थोड्या श्रमात त्याच पीक मुबलक येते, कारण भाताचे पीक मृळ बियाण्याचे ६० पट येते, असे प्रमाण आहे. अर्थात हिंदुलोक भातखाऊ बनण्यात केवळ निसर्ग-देवतेच्या नियमाचेच पालन करीत आहेत हे यावरून दिसून येईल. इंद्रियजन्य विषयसुखाच्या अति सेवनापासून शरीरावर व मनावर होणारा अनिष्ट परिणाम थंड हवेपेक्षा उष्ण हवेच्या देशात अधिक प्रमाणात व जास्त त्वरित होतो. अर्थात उष्णदेशात राहणाऱ्या लोकांस आपले राष्ट्र शारीरिक, मानसिक व बौद्धिक दोषनाश जोमदार स्थितीत अखंड राखण्याकरता शक्य तितके विषयसुखपराङ्मुख होणे भागच पडते. जीवनशास्त्र, मानसशास्त्र व अध्यात्मशास्त्र यास लागू पडणारा हा महाभिद्धांत आणि सामान्य माणसे वैद्याच्या उपदेशापेक्षा धर्माज्ञेवर जास्त विश्वास ठेवतात हा मनुष्यस्वभाव आर्य ऋषीस माहीत होता; म्हणूनच त्यांनी आर्य राष्ट्राचा मने धर्मबंधनानीं जखडून प्रवृत्तीपेक्षा निवृत्तीचेच मार्गाने नेऊन त्याचेवर महदुपकारच केले आहेत, असे कबूल करणे भाग आहे. असो; हिंदूंच्या या आहारपद्धतीचा परिणाम त्यांच्या मानसिक, शारीरिक व बौद्धिक स्थितीवर इष्ट असाच झालेला आहे. सन १८८१ सालीच सुमारास इंग्लंडमध्ये वेड्यांचे प्रमाण दहा हजारांत ३० होते, तेंच हिंदुस्थानात त्या वेळी सुमारे दहा हजारांत ३ असे होते. गेल्या खानेसुमारीत हिंदुस्थानात हे प्रमाण एक लक्षांत २६ व २७ यांचे दरम्यान पडले आहे. मुंबई इलाख्यात हे प्रमाण पारशांत १६०, युरोपियनांत १३० व

प्रकरण ५ वें.



भारतीयांचा क्षात्रधर्म.

मागील प्रकरणात भारतीयांच्या एकंदर शौर्यासंबंधाने पाश्चात्य प्रवासी व ग्रंथकार याच्या अभिप्रायांचे आधारे विवेचन केले. या प्रकरणात त्यांचे शौर्य धैर्य, देशभक्ति, धर्मयुद्ध-प्रीति अर्थात या सर्व गुणांचा अंतर्भाव करणारा जो त्याचा क्षात्रधर्म त्यासंबंधाने लिहावयाचें आहे. शौलात समाविष्ट होणाऱ्या येवढ्याच गुणाचा निराळा विचार करण्याचे कारणही उघड आहे. राष्ट्रात काय किंवा व्यक्तीत काय इतर सात्त्विक व राजस सद्गुण किंतीही असले, तरी त्याचे अंगी शौर्य, धैर्य, देशभक्ति, करारीपणा, इत्यादि क्षात्रवृत्ति कोणत्या तरी रूपानें वसत नसतील तर त्याला जगात कोठेही मान मिळणार नाही. ' यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः । स पंडितः सः श्रुतमान् गुणज्ञः ॥ स एव वक्ता स च दर्शनीयः । सर्वे गुणा काचनमाश्रयंति ॥ ' हें सुभाषित सामान्य व्यक्तिविषयक व्यवहारात खरें असलें तरी त्यातील तत्त्व राष्ट्रास लागू करताना, वित्त-काचनाचे जागी शौर्यादि शब्दच घालावे लागतील. जपानी राष्ट्राने रणभूमीवर पराक्रम गाजवून रशियास चारी मुंड्या चीत केल्याबरोबर जपानचे वैभव, जपानचा व्यापार, जपानचे वाङ्मय, जपानची चित्रकला, जपानची समाजव्यवस्था याचा चोहोकडे जयजयकार होऊं लागला, त्याचे तरी बीज हेच होय. साराश, शारीरिक नैतिक व मानसिक गोष्टींत मार्दव हा जसा स्त्रीजातीचा मुख्य गुण त्याचप्रमाणे या तीनही बाबतीत मर्दपणा अंगी असणे हा पुरुषवर्गाचा मुख्य पौरुषगुण होय. तो ज्या राष्ट्राचे अंगीं नसेल त्याचेबद्दल इतराना फार तर दया वाटेल व कीव येईल, पण आदर वाटणार नाही. करता या पौरुषवृत्तीच्या किंवा क्षात्रधर्माच्या कसोटीस भारतीय राष्ट्र कितपत उतरते ते आता पाहूं.

वर सांगितलेल्या पौरुषगुणांचा मुळाशी एक महत्त्वाचे तत्त्व किंवा मनोवृत्ति आहे. ती ही की,मनुष्यास सामान्यतः जरी आपले प्राण अत्यंत प्रिय असले,तरी त्यास प्राणाहूनही अधिक प्रिय अशी कोणती तरी वस्तु,कोणते तरी ध्येय असावे लागते.तें

नसेल तर त्याचे अंगीं पौरुषत्वाचाच नव्हे तर मनुष्यत्वाचाही तुटवडा आहे, असे खास समजावें. सामान्यतः गरीब असणारा शेतकरी जुलमी जबरदस्तीचे कोरडे दीनदुबळेपणानें पाठीवर सोशील; पण त्याच्या स्त्रीचें पातिव्रत्य किंवा त्याचा धर्म भ्रष्ट करूं पाहणाऱ्याच्या नरडीचा घोट घेण्यास तो धावून जाईल, प्रसंगी तो त्याकरता स्वप्राणत्यागही करील ! कुलीन प्रतिव्रता स्त्री दुष्ट चोरास भिऊन अंगावरचे सर्व दागिनें स्वतः काढून त्याचे हवालीं करील; पण एकादा दुष्ट कामुक तिचा पातिव्रत्यालंकार हरण करूं पाहील तर अन्य उपाय हरल्यास ती त्याचा तरी प्राण घेईल किंवा आपला तरी देईल ! याचें कारण हेंच कीं, तिला दागिन्यांपेक्षा प्राणाची किंमत अधिक वाटते; पण प्राणापेक्षाही ती पातिव्रत्यास जास्त मोलवान मानते. क्षात्रवृत्तीच्या मुळाशीही अशाच प्रकारचे तत्त्व आहे. स्वदेश, स्वराज्य अगर आपला राजा, त्याचे वैभव, इभ्रत किंवा स्वातंत्र्य, अगर आपलें इमान यांची योग्यता स्वप्राणाहूनही अधिक मानणे हे क्षात्रवृत्तीचे मूळ तत्त्व असून ते प्राचीन भारतीयात उत्कटत्वानें व अर्वाचीन लढाऊ जातीतही बहुताशानें वसत आहे. हें तत्त्व हा अभिमान व रोमरोमी खिळण्यास जीवन व मरण यांचे संबंधाचे भारतीयांचे तत्त्वज्ञानही पुष्कळ अंशी कारणीभूत झालेलें आहे. पूर्वजन्म-पुनर्जन्म आणि कर्मफलवाद हा हिंदुधर्माचा एक मोठा विशेष असून तो त्याच्या सर्व प्रकारच्या व्यवहारात प्रविष्ट झालेला दिसून येतो. दोन दिवसाच्या मधील जशी रात्रींची निद्रा तशी मृत्यु ही दोन जन्माचे मधील निद्रा होय; मरण म्हणजे जीवानें एक बिऱ्हाड सोडून नवें बिऱ्हाड करणे किंवा जुनीं वस्त्रें टाकून नवीं धारण करणें आहे. हे तत्त्व ज्याच्या मनोभूमींत कायमचे रुजले त्यास विशिष्ट उच्च हेतुकरिता येणाऱ्या मरणाचे किंवा प्राणत्यागाचें मुळींच भय वाटावयाचे नाहीं, हें उघड आहे. भरतखंडातले प्राचीन भारतीय योद्धे किंवा अर्वाचीन लढाऊ जाती यांचे अंगी दिसून येणाऱ्या मरणाविषयीच्या विलक्षण निर्भयतेचे खरे व मूळ कारण त्यांच्या या धर्मतत्त्वातच आहे. ' जेव्हा एकादें अनिवारणीय संकट अंगावर येऊन कोसळतें, तेव्हा हिंदु लोकांतल्या अगदी कनिष्ठ वर्गांतलाही पुरुष जी शांतवृत्ति दाखवितो, ती पाहून युरोपियन लोक तोंडात बोटच घालतील ' असे जें सर्टिफिकिट एलिफन्स्टनसाहेबांनी (हिंदुस्थानचा इतिहास पृ. १९८–१९९) दिलें आहे, त्याचें तरी कारण वरील तत्त्वातच सापडणार आहे.

दिग्विजयी शिकंदर बादशहाच्या मोहिमेंत त्याच्या ग्रीक सैन्यास ज्या

राष्ट्रांशी लढावे लागले, त्यांत त्यांस भारतीयांइतके शूर राष्ट्र दुसरे कोणतेच आढळले नाही, अशी त्यानी स्वतःच साक्ष दिलेली आहे (कित्ता पृ. १९७). शिकंदराच्या विजयी सैन्याने पंजाबापर्यंतकडे जाण्याचे नाकारले व त्यास तेथूनच परतावे लागले, यांचे मुख्य कारण मगधदेशच्या बलाढ्य हिंदु राजाच्या पराक्रमाची त्यास दहशत वाटत होती, हेच होय; व अलेक्झांडर पुढे चाल करून जाता, तर त्याच्या अखंड-विजयी सैन्यास कदाचित् पराभूतही व्हावें लागलें असते, असेही कित्येक इतिहासकारानीं लिहिले आहे ! अकबरकालीन इतिहासकार आबुल फाझल लिहितो कीं, ' विशेषतः संकटकाळी हिंदूंचे शील जास्तच उज्ज्वलता पावलेले दिसून येते. रणभूमीतून पाय काढून पळून जाणे हें रजपुतास मुळीं माहितच नाहीं. युद्धात यश येणार नाही. असे दिसूं लागताच तो पलायनाचा विचार करीत नाही; तर तो घोड्यावरून खालीं उतरतो व शत्रूंत घुसून प्राण जाईपर्यंत लढत रहातो ! ' प्राणांत होईपर्यंत लढण्याचा निश्चय झाला म्हणजे स्पार्टन योद्धे विशिष्ट केशरचना करीत, त्याप्रमाणे रजपूत शिपाई अशावेळीं केशरी पोषाख करीत. दारा व अवरंगझेब-मुराद यांचेमध्यें झालेल्या धोलपूरच्या युद्धात बादशाही फौजेसह दाराने पळ काढला, पण बुंदीचा रजपूत राजा मरेपर्यंत रणभूमीवर एकटाच लढत होता, ' रणातून पळून जाणाऱ्या म्याडाचा धिक्कार असो. मी बादशाही निमक खात असून माझे पाय या रणभूमीवर मी कायमचेच रोवले आहेत. विजय मिळाल्यावाचून तेथून जिवंत परत जाईल, तो निमकहराम होय. असे उद्गार या वेळी त्याने काढले ! उज्जयिनी व धोलपूर या दोन लढायात बुंदीच्या घराण्यातील १२ राजपुत्र व हाराराजपुताच्या सर्व घराण्याचे मुख्य कर्ते पुरुष ठार झाले ! अशी हकीगत देऊन कर्नेल टॉड (Where are we to look for such examples) शौर्याची व निष्ठची असली उदाहरणे आपणास कोठे सांपडतील ? असा आदराश्चर्ययुक्त प्रश्न विचारतात. (राजस्थानचा इतिहास Vol II. पृ.४८१.)

जहांगीर बादशहा वैभवाशिखरास चढला होता, अशा वेळीं त्यास त्याचेच छावणींत अचानक कैद करण्याचे,. मोगलांचे इतिहासातील जें अति अद्भुत धाडसाचे कृत्य, ते मोहबतखानाने सिसोदिया रजपुताच्याच साह्याने केले. खुद्द मोहबतखानही धर्माने मुसलमान पण जन्मानें रजपूत असून तो राणा प्रतापसिंह याच्या सावत्र भावाचा मुलगा होता. अकबर, जहांगीर व अवरंगझेब यास मिळालेल्या महत्त्वाच्या सर्व विजयांचें श्रेय त्याच्या रजपुत

दोस्त राजाकडेच आहे. मोंगलांकरतां हेच रजपुत अफगाणिस्थानाच्या हिममय डोंगराळ प्रदेशात आफगाणासारख्या कडव्या लोकाशी लढले आहेत. अशी साक्ष खुद्द बरील बादशहानी दिलेली आहे. मोंगलाच्या राज्यविस्ताराचे निमे अधिक श्रेय (लाख तलवार रहाटोरन) राहटोराच्या लाख तलवारी कडेच आहे. पण मोंगलबादशहांनी अशा शूर व इमानी दोस्ताच्या साह्याचे चीज केले नाहीं. जोधपूरच्या जसवंतासिंगास कावूल येथे व त्याचा पुत्र पृथ्वीसिंग यास दिल्ली येथे अवरंगझेबाने विषप्रयोग करवून मारविले. व मगच हिंदुंवर झिजियाची दुःसह डोईपट्टी वसविण्याची त्यास छाती झाली ! उघड युद्धात ज्याशी सामना करण्याचा आपणात वकूव नसेल त्यास विषप्रयोगाने नाहींसे करण्याच्या ह्या युक्तीचा अवलंब एकदा अकबरानेही केला होता म्हणतात. अकबराचे पश्चात सेलिमचे ऐवजी अकबराचा पुतण्या खुसु यास गादी मिळावी, असा अंबरचा राजा मानसिंग याचा इरादा अकबरास कळला. तेव्हा त्याने एक माजूमची वडी तयार करून तिच्या एका बाजूस विष लावले. पण वडी मोडून मानसिंगास देताना चुकून चांगला भाग मानसिंगाकडे गेला व विषारी भाग अकबराने खाल्ला ! अशा प्रकारचे कपटाचरण, साम्राज्यमद व धार्मिक बळ यानी रजपूत लोकास माजून मोंगलानी आपले कट्टे शत्रू बनविले नसते तर त्यानीं नादीरशहास दिलीची धूळदाण कदापि करूं दिली नसती. असो; रजपूत जसे शूर होते तसेच त्याचे शरीरसामर्थ्यही अचाट होते. खोरासानच्या बादशहाने दिल्लीच्या बादशहाकडे एक लोखंडी धनुष्य पाठवून ते वाकविणारा कोणी वीर तुम्हापाशी आहे काय, अशी उद्दामपणे पृच्छा केली होती. तेव्हा हे धनुष्य वाकविणारा दिल्लीस कोणीही निघाला नाही. पण मेवाडकुलवतला प्रचंड पुरुष सोनिगदेव याने हे धनुष्य वाकविले येवढेच नव्हे तर मोडूनही टाकले ! कर्नेल टोड लिहितात —' कुरुंशी तुलना करता त्याचे पुढे होमरचे वीर पुरुष क्षुद्र वामनमूर्तीच ठरतील. कुरुंचे हातातले कडे अजॅक्सला नुसते उचलता तरी आले असते की नाही याची शंकाच वाटते. ' (Homer's heroes were pigmies to the Kurus, whose bracelet we may doubt if Ajax could have lifted—टॉडचा इतिहास Vol II. पृ. ८१.)

प्राचीन भारतीय क्षात्रियाचा परंपरा रजपुतात मात्र कायम राहिली असून तीवरून प्राचीन क्षत्रियाच्या क्षात्रधर्माची बरीच स्पष्ट कल्पना करता येईल.

रजपुताइतकी शूर, इमानी व उमदी जात पृथ्वीच्या पाठीवर पूर्वीही कोणती झाली नाही व पुढेंही होणार नाही. कर्नल टॉड यांनी लिहिलेल्या इतिहासासारखा, महाकाव्यातच शोभतील अशा अद्‌भुत शौर्याच्या पण खऱ्याखुऱ्या कथानी भरलेला, इतिहास जगात दुसऱ्या कोणत्याही प्राचीन व अर्वाचीन राष्ट्राचा नाही. अर्थात रजपुतान्याच्या शौर्यादि क्षात्रवृत्तीची वरच्या सारखी उदाहरणे त्याच्या इतिहासातून हजारो देता येतील. येवढेच नव्हे तर रजपुताच्या उज्ज्वल इतिहासात अस्सल क्षात्रधर्म मूर्तिमंत उतरलेला कोणासही दिसून येईल. रजपुताच्या क्षात्रधर्माचें स्वरूप टॉडने दिलेल्या पुढील आशयाच्या अभिप्रायावरून कोणाचेही सहज लक्षात येईल. टॉडसाहेब (इतिहास Vol I. पृ. २५९) लिहितात कीं, " रजपुताचे रक्तात जसा उत्साह तसेच धाडसही भरपूर आहे. परंतु शत्रूचा निःपात करण्याची योग्य वेळ येईपर्यंत बाह्यतः औदासिन्यासारख्या दिसणाऱ्या धिमेपणाने व सहनशीलतेने वाट पाहण्याचेही सामर्थ्य त्याचे अंगी आहे. अनेक शतके राजकीय जुलूम, छल व पारतंत्र्य यात दिवस कंठावे लागल्यामुळे बहुतेक जमीनदोस्त झाल्यानंतर ज्यानी पुनः डोके वर काढले आणि संकटाच्या घर्षणानें जणूं धैर्य तीक्ष्ण होऊन वाडवडीलाच्या चालरीती व धर्म आणि संस्कृति ज्यानी कायम राखली असें मनुष्य जातीच्या इतिहासात एकटे रजपूत राष्ट्र आहे; व याचे सर्व श्रेय त्याच्या वरील गुणाकडेच आहे. काही रजपूत मोगलाकडे गेले, काही फितुर झाले; काहीनी धर्मांतर केले व काहीनी आपल्या लेकीही मोगल बादशहास दिल्या. पण अशा अभिमानशून्य व भ्रष्ट घराण्याची राज्ये नष्ट झाली किंवा संपुष्टात आली. पण ज्याने अखेरपर्यंत स्वधर्माचे व स्वातंत्र्याचे रक्षण केले व ज्याने सुरक्षितपणाकरता आपली अब्रू शत्रूस विकली नाही, ते मेवाडचे राज्य अद्याप अभंग कायम असून ते आपले पूर्वजांचे अभिमानाने संभाळीत आहे. रोमन लोकाच्या दडपणाखाली प्राचीन ब्रिटन लोकाची काय अवस्था झाली तो पहा. त्यानी आपली मंदिरे, पुरोहितवर्ग व वृक्षवने याचे संरक्षण करण्याचा खूप प्रयत्न केला; पण तो अखेर निःफळ ठरला. रोमन लोकाचे मागून सॅक्सन आले, त्याजपुढेही त्यानी माना वाकविल्या; डेन लोक आले तेव्हाही हाच प्रकार झाला. ह्या सर्व जातीच्या लोकापासून जन्मलेली मिश्र जातही अखेर नॉर्मन लोकानी पादाक्रांत केली. स्वारी करणाऱ्या शत्रूने एकाच युद्धाने सबंध राज्य जिंकावे आणि जित्याचा धर्म व समाज जेत्याच्या धर्मात व समाजात

पुरता बुडून मिसळून जावा, असाच प्रकार तेथे झाला. पण रजपुतांची स्थिति पहा. त्यांचीं कांहीं राज्ये नामशेष तर कांहीं संकुचित झालीं; पण त्यांनी आपला धर्म व रीतीभाती यांचा अल्पांशही शत्रूला पादाक्रांत करूं दिला नाहीं." (How did the Britons at once sink under the Romans and in vain strive to save their groves, their druids or the alters of Bal from destruction! To the Saxons they alike succumbed: they again, to the Danes; and this heterogeneous breed to the Normans. Empire was lost and gained by a single battle, and the laws and religion of the conquered merged in those of the conquerors. Contrast with these the Rajputs; not an iota of their religion or customs have they lost though many a foot of land and some of their states have been expunged from the map.)

क्षात्रधर्मामध्ये अंतर्भूत होणारा दुसरा गुण म्हटला म्हणजे देशभक्ति हा होय. स्वामिनिष्ठा व इमान यांचाही अंतर्भाव याच व्यापक गुणांत केला पाहिजे. देशभक्तिशून्य शौर्याची किंमत पातिव्रत्यशून्य सौंदर्याइतकी मानली पाहिजे. जो धन देईल तो धनी, असे मानून त्याचे सर्वेस आपले सौन्दर्य व तारुण्य अर्पण करणाऱ्या वेश्या आणि त्यास आपले शौर्य विकणारे भाडोत्री शिपाई, यांची योग्यता अर्थातच सारखी आहे. म्हणूनच व क्षात्रधर्मांत शौर्याइतकेच किंबहुना त्याहूनही जास्त देशभक्तीस महत्त्व दिलेले असते. या देशभक्तीच्या गुणातही रजपुताचा इतिहास भारतीय क्षत्रियाच्या श्रेष्ठत्वाची ग्वाही देत आहे. स्वदेशभूमीचे नावांतील अपूर्व जादूने रजपुतांची मने विलक्षण रीतीने भारून टाकलेली असतात. आपली धर्मपत्नी किंवा प्रेमसंबंधी स्त्री याचा परक्या माणसाने नुसता नामोच्चार केलेला--त्याचे नुसते नाव* काढलेलेही-अस्सल रजपुतास खपत नाही; तसेच स्वदेशाचेही नाव आदरशून्यतेने कोणी तोंडातून काढले तर तेही तो सहन करीत नाहीं. अशा वेळीं अस्सल रजपुतांची तरवार

* नाव काढणें म्हणजे वाटेस जाणें, अपमान करणे; असा जो मराठींत अर्थ झाला आहे, त्याचे मुळाशीं हीच रजपूत अभिमानवृत्ति असावी.

एकदम म्यानातून बाहेर पडते ' असे कर्नल टॉड यांनी (राजस्थानचा इतिहास व्हा. २ पृ. ४२९.) लिहिले आहे ! हिंदुधर्मशास्त्रकारांनी परदेशगमन सर्वांस निषिद्ध केले, यात हिंदू मनाची राजकीय अवनति व राजकीय अदूरदृष्टि दिसून येत असली, तरी अवनत स्थितींत परदेशी जाऊन आपली मानहानी करून घेण्यापेक्षा पवित्र स्वदेशभूमीतच आयुष्य घालविणे व तेथेच देह ठेवणे, हेच श्रेयस्कर होय व हीं दोन व्रतें जो पाळील त्यासच स्वर्गप्राप्ति होईल, ही देशभक्तिमय कल्पनाही या निषेधात स्पष्ट दिसत आहे. रजपुतांचा सगळाच इतिहास देशभक्ति व इमान यांनी भरलेला आहे. इंग्लंडचा राजसिंह (पहिला रिचर्ड,)—याचे प्रजाजन जर रजपूत असते तर तो आस्त्रियातील अंधारकोठडींत इतकीं वर्षे खचित कुजत पडला नसता. मेवाडचा महाराणा प्रतापसिंह व मारवाडचा ठाकूर दुर्गादास यांच्या तोडींचीं देशभक्ति प्राचीन वा अर्वाचीन कोणत्याही देशाच्या इतिहासात अत्यंत दुर्मिळच होय. प्रतापसिंहाची बिकट परिस्थिति आणि त्याच्या प्रतिपक्षीयाचे सामर्थ्य याचा विरोध लक्ष्यात घेता एकसारखे २५ वर्षे झगडणाऱ्या प्रतापसिंहाच्या देशभक्तीची जितकी कडक परीक्षा झाली तितकी कोणाचीच झाली नसेल व त्या परीक्षेत त्याच्या इतका कोणीच कसोटीस उतरला नसेल, असे कोणासही वाटल्यावाचून राहणार नाही. 'आशिआतील प्राचीन व अर्वाचीन राजामध्ये सर्वश्रेष्ठ ' असे नाव मिळालेला अकबरबादशहा प्रतापसिंहाचा प्रतिस्पर्धी होता. त्याला सुबंध मोंगल साम्राज्याच्या सामर्थ्याचे पाठबळ होते, येवढेच नव्हे तर मारवाड, अंबर, बिकानेर, बुंदी वगैरे संस्थानची रजपूत राजघराणीं अकबरासच अनुकूळ होऊन त्याचेकरिता आपल्या तरवारी व आपली मुत्सद्दीगिरी स्वधर्मीय व स्वजातीय प्रतापसिंहावर चालविण्यास एका पायावर तयार होतीं, किंबहुना खुद्द प्रतापाचाच सावत्र भाऊ सगरजी हाही अकबराचे पक्षास जाऊन मिळाला होता. इकडे प्रतापसिंहाची राजधानी चितोड ही शत्रूचे स्वाधीन झाली होती; त्याचे काहीं आप्तस्वकीय लोभाने फितूर तर कांहीं पराभवाने निराश होऊन गेले होते. इतर किल्ल्याचे ढोल्यापुढे, अकबराचे पक्षास जाऊन मिळाल्यास प्राप्त होणाऱ्या पदव्या, धनदौलत, मानमान्यता व सुरक्षितपणा यांचा मोह मुर्तिमंत उभा होता. खुद्द प्रतापसिंहास वीसपंचवीस वर्षे राण्या व राजपुत्र आणि थोडेसे निर्धाराचे अनुयायी यासह पर्वतात व अरण्यांत भटकत व कंदमुळावर उपजीविका करीत फिरावें लागलें. त्यातच त्याला तान्हा राजपुत्र अमरा यास अरण्यातील क्रूर

धारदें व क्रूरतर माणसें यांचें सहवासात वाढवावयाचें होतें. अशा विपन्न स्थितींत असताही, चितोड व मेवाड पुनः परत मिळवून आपल्या घराण्याची कीर्ति उज्ज्वल करावयाची हा आपला निर्धार त्यानें आमरणांत पाळला. संधि साधेल तेव्हा पर्वतातून बाहेर पडून मोंगली सैन्यावर विद्युद्वेगानें तुटून पडून त्याचा नाश करावयाचा व पुनः आरवली पर्वताचे आश्रयास जावयाचें, असा क्रम त्यानें अव्याहत २५ वर्षे चालविला होता! तर्तर बादशहापुढे बाप्पा रावळच्या वंशजानें मान वाकविणें किंवा आपल्या मुली त्याच्या जनानखान्यांत घालणें ही नुस्ती कल्पनाही त्याचे मनास मरणांतिक वेदना देई. साराश, एका पक्षाकडे प्रबल महत्त्वाकांक्षा, अतुल सामर्थ्य, अपूर्व मुत्सद्दीगिरी, अमर्याद साधन—सामुग्री आणि धर्मप्रसारोत्साह असून दुसऱ्या पक्षाकडे अपूर्व शौर्य, अभंग धैर्य, अतुल इमान व अद्वितीय निष्ठा ही असून उभयतांचा संग्राम पाव शतक सारखा चालला होता. पण अखेर त्यांत प्रतापाचीच अजिंक्य देशभक्ति विजयी झाली. कर्नेल टाड लिहितातः—'ग्रीसवर झर्क्सिसची जेव्हा स्वारी झाली तेव्हां ग्रीकांनी जे शौर्य व जी देशभक्ति प्रगट केली, ती पाहून सर्व जग चकित होतें. पण अकबराचें राज्य तत्कालीन सर्व राज्यांत अत्यंत बलाढ्य असून त्याचें सैन्यही संख्येनें व लढाऊ तयारीनें झर्क्सिसच्या सैन्यापेक्षा किती तरी श्रेष्ठ होतें. अशा बलाढ्य शत्रूशी अल्प सामुग्रीचें सैन्य घेऊन विकट परिस्थितींत २५ वर्षे लढणाऱ्या प्रतापाची सर कोणासही येणार नाही. आल्प्सपर्वत-तुल्य अरवली पर्वतांत अशी एकही खिंड नाही की जी प्रतापानें आपल्या विजयशाली पराक्रमानें किंवा अधिक कीर्तिकर पराजयानें पुनीत केली नाही. हळदीघाट ही मेवाडची थर्मपिली व देवोरचें रणमैदान हे मेवाडचें मॅराथॉन होय.'

ठाकूर दुर्गादासाची स्थिति प्रतापापेक्षा कांही अंशी निराळी होती; तरी त्याचा निर्धार, देशभक्ति, शौर्य व इमान हीं प्रतापाइतकींच जाज्वल्य होतीं. दुर्गादास हा राजघराण्यांत जमल्ला नसून राहाटोर घराण्याचें अंकित असलेला लहानसा सरदार-ठाकूर-होता. राहाटोराचा राजा जसवंत याचा काबुलास खून आला; त्याचा अज्ञान मुलगा अजित याजवरही तोच प्रसंग यावयाचा. पण राहाटोरानी या तान्ह्या राजपुत्रास गुप्त सुरक्षितस्थली नेऊन ठेवले, आणि सहा वर्षेपर्यंत हा राजपुत्र कोठे आहे, याचा त्यानीं मोंगलास सुगावाही लागूं दिला नाही. राजा जसवंताचा खून झाल्या वेळेपासून तो

अजितसिंह मोठा होऊन स्वराज्य संपादन करीपर्यंतच्या ३० वर्षांच्या अवधीत राहाटोर रजपूत व ठाकूर दुर्गादास यांनी प्रगट केलेल्या अपूर्व देशभक्तीस व राजभक्तीस जगात इतरत्र कोठेच तोड सापडणार नाही. या अवधीत राहाटोराचा प्रत्येक सरदार घरी खाटेवर मरण न पावता रणशय्येवरच मृत्यु पावला आहे ! तो काळ असा होता की, देशभक्ति व राजनिष्ठा याचा त्याग करून मोंगलपक्षाकडे जाणारांस संपत्ति, वैभव, सन्मान, अधिकार, वगैरे सर्व गोष्टी तात्काळ प्राप्त होत होत्या. दुर्गादासाचे मनापुढेही ह्या मोहाचे जाळे पसरण्यात आले होते. परंतु शौर्य व दूरदृष्टी याचेप्रमाणेच इमान व देशभक्ति या गुणांचा पुतळा असलेल्या दुर्गादासाने तिकडे ढुंकूनही पाहिले नाही. मोंगल बादशहानी त्यास पाच हजाराची मनसबदारी देऊं केली. तिला भुलून जर त्याने मोंगलाचा अंकितपणा स्वीकारला असता, तर त्याचा ऐहिक दर्जा पुष्कळ वाढला असता. दुर्गादासाने मोंगलाकडे येण्याबद्दल वाटेल ते मोल मागितले असते, तरी तें मोंगल बादशहानी त्यास तात्काळ दिले असते. पण दुर्गादासाचे देशभक्ति व राजभक्ति 'अमोलिक' होती. दुर्गादासाच्या खुद्द सख्या भावाचा खून शत्रुपक्षाने करविला होता. पण शत्रू प्रत्यक्ष हाती लागून सूड उगविण्याचा उत्तम संधि आला असताही उच्च हेतूकडे लक्ष देऊन आर्य औदार्य व धर्मयुद्ध नीति यास अनुसरून त्याने त्यास जीवदान दिले ! शत्रूचा जनानखाना हाती लागल्यास मोंगल बादशहा कसे वागत, ते महशूरच आहे. पण मोंगल शहाजादा अकबर याचे प्राण वाचविण्यासच नव्हे तर त्याच्या जनान्याची अब्रू राखण्यासही दुर्गादासच कारणीभूत झाला ! आग्रा येथील तिहेरी कोटाच्या राजवाड्यातील अंत पुरात मोंगलाच्या बादशाही जनानखान्याचे पावित्र्य जितके सुरक्षित असेल, त्याहून ते राहाटोराच्या छावण्यात शतपट अधिक सुरक्षित होते. अशा प्रकारच्या ठाकूर दुर्गादासाची स्मृति राजपुतान्यात अद्यापिही जागृत आहे पाठीच्या घोड्यावर बसलेल्या वृद्ध पण ताकदवान दुर्गादासाची तसबीर नाही, असा चित्रसंग्रह राजपुतान्यात एकही सापडावयाचा नाही.

शौर्य व देशभक्ति याचेप्रमाणेच धर्मयुद्धप्रेम हा तिसरा गुणही खऱ्या क्षात्रधर्मास अवश्यक आहे. शौर्य व देशभक्ति हे गुण अंगी असलेला योद्धा कदाचित् क्रूर, दुष्ट, निर्दय किंवा स्वार्थपरायण असू शकेल. क्षात्रवृत्तीतून ह्या दुर्विकाराचा अंश नाहींसा करण्याकरिताच धर्मयुद्धाची कल्पना अस्तित्वात आली. पशुपक्ष्यातीलही नरजातीत युद्धप्रेम दिसून येते; पण मनु यातील युद्धप्रवृत्तीतून सर्व प्राण्यास

सामान्य असलेलें हें युद्धप्रेम जितके कमी होईल व युद्धास परोपकाराचें किंवा कर्तव्याचें स्वरूप येईल, तितके मनुष्यत्वास अधिक श्रेयस्कर होय. दीन, अनाथ, अबला, शरणागत किंवा धर्मपरायण लोक याचे अगर धर्म, देश, राजा याचे संरक्षण करणें, याच हेतूने केवळ कर्तव्य म्हणून युद्ध करणें हा अस्सल क्षात्रधर्म असून यात अर्थातच स्वार्थास, सूड घेण्याच्या बुद्धीस किंवा शत्रूच्या द्वेषास अगर निर्दयतेस थाराच नाहीं. अशा प्रकारचे धर्मयुद्धाचें नियम पाळणारे क्षात्रियें आपल्या शत्रूच्या अडचणींचा अन्यायाने कधींही फायदा घेत नाहीं व तो पराभूत झाल्यास त्याशीं उदारपणानेंच वागतात. हे धर्मयुद्धप्रेम किंवा इंग्रजींत ज्याला (शिव्हलरी) Chivalry म्हणतात तीं क्षात्रवृत्ति प्राचीन भारतीय क्षत्रियांत व अर्वाचीन रजपुतांत पूर्णत्वानें वसत होती; इतकी कीं, रजपुती बाणा व धर्मयुद्ध हीं राजपुतान्यांत समानार्थी मानली जातात, ह्या संबंधाचा पुरावा रजपुताच्या इतिहासात हवा तितका सापडेल. युरोपांतील शिव्हलरीच्या युगांत तरुण व सुंदर स्त्रियांचे संरक्षण व सेवा करण्यांत तिकडील शिलेदार मंडळी मोठें भूषण मानीत पण या युरोपि मनोवृत्तींत राजस कामुकतेचा थोडा तरी अंश आहे. रजपुती शिव्हलरी याहून उच्च दर्जाची व सात्विक आहे. रजपुती वृत्तींत स्त्री तरुण किंवा सुंदर असली पाहिजे असें नाहीं; एखाद्या रजपूत वीराकडे राखी पाठविली व ती स्वीकारून त्याने आपले हातात बांधली कीं येवढ्या राखीबंधनाने तो स्त्रीपुरुषे एकमेकांचीं बहिणभावंडें होत; व तो वीरपुरुष राखीबंद भाई या नात्याने या आपल्या राखीबंद भगिनींचे संरक्षणाचे किंवा अन्य कोणतेंही कार्य प्रसंगी प्राणत्याग करूनही आनंदाने करी. आणि यांत विशेष हा कीं, या भाऊबहिणींनी एकमेकांस डोळ्यानीं पाहिलेलेंही नसे ! या राखीबंधनाचे बाबतींत वय, जात किंवा वर्ण याकडेही कोणी पहात नसे. चित्तोडच्या महाराणी कर्णावतीने हुमायूनला याच रीतीनें आपला राखीबंदभाई केलें होतें; व हे नाते पाळूनच हुमायूनाने तिचे कुमकेस येऊन चित्तोडला पडलेला गुजराथच्या बहादुरशहाचा वेढा उठवून त्याचे पारिपत्य केलें ' या शौर्यादि क्षात्रवृत्ति व धर्माकरता प्राणत्यागही करण्याचा करारीपणा एकट्या रजपुतातच आहे, असें नाहीं; तो इतर हिंदूलोकांतही आढळून येतो. एल्फिन्स्टन साहेब लिहितात (हिंदुस्थानचा इतिहास पृ १९९):—' हे लोक पुष्कळ प्रसंगी इतक शौर्य प्रगट करतांत कीं, जगांतील कोणत्याही लढाऊ लोकांस त्यांचेवर ताण करता येणार नाहीं. धर्म किंवा अब्रू याचे संरक्षणार्थ

अस्तित्वात नसतें, तर असिरियाच्या सेमिरामिस राणीच्या स्वारीची जशी धुळधाण उडाली तशी शिकंदराच्याही स्वारीची झाली असती, यात संशय नाहीं.

मुसलमानाच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या त्या वेळचा हिंदु-राजा पृथ्वीराज हाही शूर व देशभक्त होता; व त्याने गिझनीच्या घोरी घराण्याचे सुलतानाच्या स्वाऱ्या सात लढाया जिंकून परत फिरविल्या होत्या. पण जसे द्रौपदीचे स्वयंवर भारतीय युद्धास बीजरूपाने कारणीभूत झाले, त्याचप्रमाणें कनोजच्या संयोगितेचे स्वयंवरही भरतखंड परतंत्र करण्यास कारणीभूत झाले. संयोगितेचे मनात पृथ्वीराजास वरावयाचे होते पण तिचा बाप जयचंद याने त्यास स्वयंवरास बोलावलें नाहीं, येवढेच नव्हे तर त्याचा अपमान करण्याचे इराद्याने त्याचा पुतळा करून तो स्वयंवरमंडपाचे दरवाजापाशी रखवालदार या नात्याने उभा केला ' पण संयोगितेने आपल्या बापाची परवा न करता आणि स्वयंवरासाठी मंडपात जमलेल्या सर्व राजास धिक्कारून दरवाजावरच्या पृथ्वीराजाचे पुतळ्यासच माळ घातली ' इतक्यात पृथ्वीराजाने अचानक तेथें येऊन संयोगितेचे हरण केले; आणि सर्व राजाचा पराभव करून विजयी व यशस्वी होत्साता पृथ्वीराज राजधानीस परत आला. पण यावेळच्या पाच दिवस सारख्या चालेलेल्या धावत्या लढाईत त्याचे निवडक १०० शूरवीर सेनापति मृत्यु पावल्यामुळे त्याचे सामर्थ्य कमी झाले. पृथ्वीराजाच्या या पराक्रमाने कनोजचा जयचंद व इतर राजे जितके लज्जित तितकेच क्रुद्ध होऊन पृथ्वीराजाचा नाश करण्याचा संधि पाहूं लागले. त्यातच पृथ्वीराजास एकदम मुबलक भूमीगत द्रव्य सापडल्याचे वर्तमान ऐकल्यामुळे त्याचा मत्सराग्नी अधिकच भडकला. कनोजचा जयचंद, अन्हेलवाडा पट्टणचा राजा व हाओलीराव हमीर यांनी संगनमत करून शहाबुद्दीनशी गुप्त सख्य केले व त्यास सैन्यानिशी बोलावलें. त्याने हिंदुस्थानावर स्वारी करून व जयचंदाने सांगितलेले डावपेच लढवून पृथ्वीराजाशी लढाई केली. तींत तो पराभूत होऊन मुलतानाचे हाती लागला, त्याने त्यास कैद करून गिझनीस नेले, व त्याचे डोळे काढून त्यास कैदेत टाकलें ! पण पृथ्वीराजाचा इमानी मित्र चंदभाट त्याचे मागोमाग गिझनीस गेला. त्याने तेथें सुलतानाचे दरबारात प्रवेश करून घेऊन त्याचा मर्जी संपादन केली व पुढें युक्ति

प्रयुक्तीनें सुलतानासमक्ष पृथ्वीराजाच्या शब्द वेधित्वाचा तारीफ करून हें त्याचें कौशल्य पाहण्याविषयीं सुलतानाचें मन वळविलें. अंध पृथ्वीराजास सुलतानाचे समोर आणून त्याचे हातीं धनुष्यबाण देण्यात आलें. चंदभाट तेथे होताच. त्याने

चार बांस चौबीस गज अंगुल अष्ट प्रमाण ।
जा उपर सुलतान है मत चूके चौहाण ॥

अशी पृथ्वीराजास इशारत दिली. तीप्रमाणें पृथ्वीराजानें बाण मारून खुद्द सुलतानाचाच प्राण घेऊन आपले अपूर्व हस्तकौशल्य दाखविलें !

तैमूरलंगाचा वंशज **बाबर** ह्याने **हिंदुस्थानावर** स्वारी केली, तेव्हाही अशीच इतिहासाची पुनरावृत्ति झाली. **बाबर** स्वतः शूर सेनापति होता, त्याचे शिपाई शूर व कार्टक होते, आणि त्या सर्वांचे रक्तही धर्मप्रसाराचे इर्षेनें उसळलेले होतें. पण अशा स्थितीतही **बाबरास** विजयाची आशा **न** वाटून तो मोठ्या फिकिरीत पडला होता. **कारण दिल्ली** व माळवा येथील **मुसलमानी** राजांशी झालेल्या १८ युद्धात विजयी झालेला **राणा** संगाशी त्यास लढावयाचे होते. अशा स्थितीत युद्ध सुरू होऊन तें ऐन रंगात आले असता संगराण्याच्या आघाडीस असलेला एक तुवार सरदारच **बाबरास** जाऊन मिळाला; तेव्हा निरुपाय होऊन **राणा संगास** माघार घ्यावी लागली ! साराश, **भरत**खंडावर परकीय सत्ता जरी स्थापन झाली असली, तरी त्याचे खरे कारण परकीयांनीं **भरतखंड** जिंकले हे नसून, **भारतीयांनीच** आपली **मातृभूमी** स्वतःच्या हातानीं परकीयाचें हवालीं केली हेच होय.



प्रकरण ६ वें.

भारतीयांचा दांपत्यधर्म.

एकादा देश किंवा राष्ट्र कितपत सुधारलेले आहे व त्याच्या संस्कृतीचा दर्जा कोणता आहे, हें निश्चित करण्याचें एक प्रमुख साधन हर्बर्ट स्पेन्सर यानें असें सांगितलें आहे कीं, त्या देशातील अथवा राष्ट्रांतील स्त्रियांचा समाजात कोणता दर्जा आहे व त्यास पुरुषवर्ग कितपत मान देतो याची परीक्षा करावी, व तावरून त्या देशाच्या व राष्ट्राच्या संस्कृतीचे स्वरूप व उच्चनीचपणा बिनचूक ठरवावा. ही कसोटी लावून पाहिली असता प्राचीन भारतीय संस्कृति किती श्रेष्ठ दर्जाची ठरते, याचे केवल दिग्दर्शन या प्रकरणात करावयाचें आहे. दिग्दर्शन म्हणण्याचें कारण असें कीं, हा प्रश्न फारच व्यापक आणि समाजरचना व कुटुंबसंस्था याशीं अत्यंत निकट संबंध असलेला असा असल्यामुळें तो प्रकरणापेक्षा एकाद्या पुस्तकाचाच विषय होण्याच्या लायकीचा आहे; व म्हणूनच या प्रश्नाचे विवेचन मर्यादित व केवळ दिग्दर्शन स्वरूपाचें करणे जरूर आहे.

कोणत्याही समाजव्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या मूल कल्पनाचे स्वरूप, त्या समाजाच्या धर्मसमजुती व तत्त्वज्ञान याच्या स्वरूपावर बऱ्याच अंशानीं अवलंबून असतें. जगाची उत्पत्ति व नैतिक व्यवस्था यांची उपपत्ति लावताना पुरुषतत्त्व व स्त्रीतत्त्व–पुरुष व प्रकृति–याचा जो परस्पर संबंध तत्त्वज्ञान्यानीं ठरविलेला असेल त्याचेंच थोडेबहुत प्रतिबिंब त्या समाजातील स्त्री-पुरुषाच्या वैवाहिक व सामाजिक संबंधांत पुष्कळ अंशांनीं पडत असतें. या दृष्टीने विचार करता असें दिसून येते कीं, जगदुत्पत्तीची ख्रिस्ती, महंमदी वगैरे धर्मांत जी उपपत्ति दिलेली आहे तींत स्त्रीतत्त्वास–प्रकृतीस–मुळींच स्थान मिळालेले नाहीं. अर्थात् त्या धर्मातील परमेश्वर केवळ पुरुषतत्त्वात्मकच आहे. भारतीयाची उपपत्ति याहून फार भिन्न आहे. ब्रह्म–माया, पुरुष–प्रकृति, शिव–शक्ति ह्या जोडींची ताटातूट आमच्या तत्त्वज्ञानांत केलेली नाही. हींच कल्पना पुढे अधिक वाढून सगुण ईश्वराचें ध्यान व स्मरण यातहीं हे युग्मतत्त्व कायमच राहिलें आहे. शची–पुरंदर, शंकर–पार्वती, विठ्ठल–रखुमाई, सीता–राम, वगैरे जोड्यांची ताटातूट करणे आमच्या धार्मिक मनोवृत्तीस दुःसह वाटतें. शिवशक्तींच्या देहार्धधारी–अर्ध-

नारीनटेश्वरी–स्वरूपात तर ही कल्पना विशेषच परिणत झाली आहे. तींत पूर्वोक्त देवतामधले भिन्न–देहत्वही नष्ट झालेले आहे ! 'जगाचीं जनकें' असलेल्या शिवशक्तींचें–'देवो-देवीचे'–हें अभिन्नत्व ज्ञानेश्वरानी अमृतानुभवाचे प्रारंभीच अत्यंत मार्मिक व मनोहर रीतीने वर्णिले आहे.

सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः । ज्ञातुं न शक्यते लक्ष्मं..... ॥ आवडीचेनि वेगें । एकएकातें गिळिती आंगें ॥ ३ ॥ जेणें देवें संपूर्ण देवी । जियेविण कांहीं ना गोसावी ॥ किंबहुना एकोपजीवी । एकएकाचो ॥ १० ॥ जिहीं एक एकावीण । न कीजे तृणाचेंही निर्माण ॥ जिये दोघें जीवप्राण । जियां दोघां ॥ १२ ॥ स्त्री-पुरुष नामभेदें । शिवपण एकलें नांदे ॥ १७ ॥ दो दांडां एक श्रुती । दोहीं फुलीं एक दती ॥ दोहीं दिवी दीप्ती । एकाची जेवी ॥ १८ ॥ दो ओठां एकी गोष्टी । दो डोळां एकी दृष्टी ॥ १९ ॥ जे स्वामीचिया सत्ता । वीण असो नेणें पतिव्रता ॥ जियेविण सर्वकर्ता । कांहीं ना जो ॥ २१ ॥ जे कीं भातारचें दिसणें । भातारूचे जियेचें असणें ॥ नेणिजतां दोघेजणें । निवडूं जिये ॥ २२ ॥

" शिव-शिवा समरूप असलेमुळे कोणाचें अर्धांग कोणाचे अर्धांगास संलग्न झाले आहे हेच कळत नाहीं ! एकमेकाविषयीच्या प्रेमामुळें एकमेक एकमेकास शरीराने गिळीतच आहेत असे वाटते ! शिवदेवामुळेच देवीस पूर्णत्व येत: व देवीवण शिवगोसावीसही काहीच महत्त्व नाहीं ! किंबहुना हे जोडपें परस्परोपजीवीच आहे, यापैकीं कोणाही एकास दुसऱ्याचे साह्यावाचून गवताची काडीही निर्माण करता येत नाहीं व हे दोघे एकमेकांचे जीव कीं प्राण आहेत ! साराश हे एकच शिवपण नादत असून केवळ नामभेदाने ते स्त्रीपुरुष झाल आहे ! दोन दिव्यांपासून निघणारा आवाज जसा एक, दोन दिव्याचा प्रकाश जसा एक, दोन ओठाना उच्चारलेला शब्द जसा एक व दोन डोळ्यांची दृष्टि जशी एक, तसेच दोघा शिवशक्तींचे अस्तित्व एकरूपच आहे ! ह्या पतिव्रता स्त्रीस पतीचे अस्तित्वावाचून असणे माहीत नाही; व हिच्यावाचून शिवासही सर्वकर्तृत्व नाही. भ्रतार दिसणे हेच तिचे दर्शन व भ्रताराचे असणे हेच हिचे अस्तित्व. साराश, ह्या दोघाचे एकमेकापासून भिन्नत्व दाखवितांच येत नाहीं !" पुरुष-प्रकृति–शिवशक्ति–याच्या आनन्दनेचें वर्णन करता करता पतिपत्नीचाही एकता इतक्या

सुंदर रीतीने वर्णन केलेली कोणत्याही वाङ्मयांत दुर्मिळ असल्यामुळे तिची माधुरी रसिक वाचकांनीं मुळातच मनमुराद चाखावी, अशी त्यास शिफारस केल्यावाचून राहवत नाही.

ख्रिस्ती धर्मांत प्रकृतिस्त्रीत्व मानीत नाहीत हें वर सांगितलेच आहे. परंतु मनुष्यजातीचे पहिले मातापिता आडाम-ईव्ह यांची उत्पत्ति बायबलात अशी दिली आहे की, ईश्वराने स्वतःच्या स्वरूपास अनुसरून मातीचा पुतळा तयार केला, व त्याचे शरीरात-नाकात--आपला श्वास भरून त्यास सजीव केले; तोच हा आडाम--आदिम पुरुष होय. पुढें त्यास एकटें राहण्याचा कंटाळा आला, म्हणून त्याने आपल्याच माडीचे हाडापासून एक स्त्री निर्माण केली; व तीच ईव्ह होय. स्त्रीपुरुषभेदोत्पत्तीचा आमची कल्पना याहून भिन्न आहे.

द्विधा कृत्वाऽऽत्मनो देहमर्धेन पुरुषोऽभवत् ।
अर्धेन नारी तस्यां स विराजमसृजत् प्रभुः ॥

मनुस्मृति, अ. १।३२.

ब्रह्मदेवानेंच स्वतःच्या शरीराचे दोन भाग करून तो एका भागाने पुरुष व दुसऱ्या भागाने स्त्री झाला; व पुरुषरूपाने त्यानेंच त्या स्त्रीचे पोटी विराट्स्वरूपी जग निर्माण केले; असें मनुस्मृतींत सांगितलेले आहे. ' यो भर्ता सा स्मृतांगना ' (मनु. ९।४५) असेही तत्त्व याच स्मृतींत दुसरीकडे सांगितलेले आहे. अर्थात ही उपपत्ति किंवा वर सांगितलेली ज्ञानेश्वराची उपपत्ति ख्रिस्ती कल्पनेहून निःसंशय श्रेष्ठ प्रतीची आहे हे सांगावयास नकोच. पत्नी ही पतीची ' अर्धांगी ' ही कल्पना ख्रिस्तीधर्मांत नसली तरी समाजात रूढ आहे. पण त्यानीं या ' अर्धांगीस ' आणखी उत्तमत्वही (better half उत्तमार्धांगी) देऊन ठेवलेले आहे. पुरुषरूपी अर्धांगापेक्षा स्त्रीरूपी अर्धांग उत्तम, श्रेष्ठ (better) आहे, असे, ख्रिस्ती लोक मानतात; अर्थात त्यांची कल्पना श्रेष्ठ, असे सकृद्दर्शनीं वाटेल; पण तें खरें नाही. एका दंपतीची पतिपत्नी ही दोन अर्धांगे म्हटल्यावर त्यांत एकापेक्षां दुसरें उत्तम म्हटल्याने त्यांचे एकत्व नष्ट होऊन त्यांत भेदभाव अवश्यमेव उत्पन्न होतो. अर्थात श्रेष्ठ-कनिष्ठत्व-युक्त दोन अर्धांगे या कल्पनेपेक्षां अभिन्नत्वदर्शक केवळ दोन अर्धांगें ही कल्पना व ही उपपत्ति अधिक उच्च प्रतीची आहे. दुसरें असें कीं ख्रिस्ती समाजात ' उत्तमार्धांगी ' ची कल्पना रूढ असली तरी तींत अलंकारिकत्व आणि पोकळ व खोटें गौरव याचा अंश बराच आहे.

ख्रिस्ती राष्ट्रांतल्या पतिपत्नीसंबंधाचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास असें दिसून येईल कीं, धर्मार्थकाम या तीन पुरुषार्थांचे दृष्टीनें एकट्या कामाचे बाबतींत त्यांचें बरेंच ऐक्य असतें. पण धर्म (यास religion म्हणा कीं, duty म्हणा) व अर्थ या बाबतींत त्यांचे थोड्याशा सहकार्याने युक्त असे भिन्नत्वच असतें. भारतीयामध्ये याच्या उलट प्रकार आहे.

'धर्मे चार्थे च कामे च नातिचरामि नातिचरामि नातिचरामि ।' असें अभिवचन पति विवाहसमयी वधूस त्रिवार देतो. यांतही आणखी विशिष्टपणा असा आहे कीं, अर्थ व काम यास गौणत्व देऊन पत्नीस तो 'सहधर्मचारिणी' चें पद देतो. या पदाचा संपूर्ण अर्थ व्यक्त करणारा एकही शब्द ख्रिस्ती लोकाच्या भाषांत नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखे आहे. आर्यपद्धतीप्रमाणे ख्रिस्ती विवाहविधीतही वधूचा पिता कन्यादान करीत असतो. पण हा दानविधि तो एकटाच करतो, त्यांत वधूच्या मातेस मुळींच स्थान नसतें. पण आमच्याकडे कोणताही धार्मिक विधि सपत्नीक व्हावा लागतो, हीही गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे. ख्रिस्ती विवाहविधींत वधूवर एकमेकांस अभिवचनें देऊन प्रतिज्ञापूर्वक शपथक्रिया करतात; अर्थात् या विधीस एक प्रकारच्या करारांचे स्वरूप आहे. आर्यविवाहविधींत वधू काहींच वचन देत नाही किंवा शपथक्रियाही करीत नाहीं; पण वर मात्र वधूस आत्मसमाविष्ट करताना अग्निसाक्षिक प्रतिज्ञापूर्वक अभिवचने देतो.

पुरुषप्रकृति-तत्त्वोपपत्तिसंबंधाच्या वरील भिन्न कल्पनांचे परिणाम भारतीय व पाश्चात्य याच्या विवाहपद्धतींत व वैवाहिक स्थितींतल्या पतिपत्नींच्या परस्परसंबंधांत याहूनही अन्य रीतींनीं दृग्गोचर होतात. पाश्चात्य पद्धतींत व भारतीय पद्धतींत पहिला मोठा व ठळक भेद हा दिसतो कीं, तिकडे प्रत्येक स्त्रीचें लग्न झालेंच पाहिजे असा निर्बंध नाहीं; पण तो इकडे मात्र आहे. दोनही पद्धतीमधील यावाचून इतर भेद म्हटले म्हणजे पाश्चात्यांत वधूवर बरेंच प्रौढ असून पुरुषास स्त्रीच्या व स्त्रीस पुरुषाच्या सहवासाची प्रबळ इच्छा-कामवासना-उत्पन्न झाल्यानंतरच वधूवरशोधन सुरूं होतें; व ह्या वरवधूशोधनाची मुख्य जबाबदारी सर्वांशीं त्यांचेवरच असते. आणि पुढें हा वैवाहिकसंबंध एकासही हितावह किंवा सुखावह न झाल्यास हा संबंध तोडून परस्परांस पुनः नवीन संबंधही करता येतो. भारतीयांत कामवासनेचा प्रादुर्भाव होण्यापूर्वीच बहुधा वधूवरशोधन चालू होतें; पसंतीची जबाबदारी वधूवरावर मुळींच नसते; आणि घडलेला विवाह-

संबंध आमरणांत पाळावयाचा, असें उच्च ध्येय डोळ्यापुढें ठेवलेलें असतें. * या दोनही पद्धतींतल्या वर सांगितलेल्या विशेषांचें याहून अधिक व्यापक व सूक्ष्म दृष्टीनें परीक्षण केल्यास त्यांचे अंतःस्वरूप व मूल-तत्त्वें वाचकांचे लक्षांत येतील. स्थूलदृष्टीनें पाहणारासही असें दिसून येईल कीं, पाश्चात्य विवाह ते लोक करारान्वये स्वरूपाचे मानीत असून भारतीय पद्धतींचा विवाह जवळ जवळ ईश्वरघटित किंवा सृष्टिकर्तृकच आहे अशी आमची सर्वमान्य समजूत आहे. उत्पत्ति व वाढ हीं सृष्टीचीं मुख्य व महत्त्वाचीं कार्यें असून त्याचे दृष्टीनें स्त्रीपुरुषांची अविवाहित स्थिति सृष्टिक्रमाविरुद्ध आहे, तो सृष्टिदेवतेचा गुन्हा आहे, ते एक प्रकारचें पातक आहे, अशी आमची समजूत असल्यामुळें प्रत्येक स्त्रीचा विवाह अवश्यमेव झालाच पाहिजे, असा आमचेमध्यें निर्बंध आहे. विवाह हा एक महत्त्वाचा धर्मसंस्कार असून तो झाल्यावाचून स्त्रीपुरुषास आमचे समाजव्यवस्थेत नियमित व मान्य असें स्थान मिळत नाहीं.

वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्निपरिक्रिया ॥ मनु. २।६७

या मनुवचनात सांगितल्याप्रमाणें स्त्रियांचे इतर संस्कार पौराणिक असले तरी मुख्य विवाहसंस्कार वैदिकच असतो; आणि पुरुषांस उपनयनानंतर अध्ययनार्थ गुरुगृहवास व गृहस्थाश्रम स्वीकारानंतर अग्निसेवा हीं जशीं कर्तव्ये असतात, तसेच विवाह हेच स्त्रियांचें उपनयन असून पतिसेवा हाच त्यांचा गुरुगृहवास व गृहकृत्ये हींच त्यांची अग्निसेवा होय. ब्राह्मणादि वर्णांत ८ ते १२ पर्यंतच्या वयातच स्त्रियांचे विवाह का होतात, याचे हें सर्वांत जुनें व मुख्य कारण आहे, हीं गोष्ट बालविवाहावर हल्ला करणारे पुष्कळ लोक विसरतात.

* हिंदुस्थानातील कनिष्ठ वर्गांत काडी मोडण्याचें व पाटाचे प्रकार साप्रत सरसहा चालू आहेत. पूर्वी हीं काडीमोड व पाट जातींचे संमतीशिवाय होत नसत. साप्रतच्या व्यक्तिस्वातंत्र्याचे काळात हेंही बंधन उरलेलें नाहीं. पण या दोनही पद्धती हिंदुधर्मशास्त्राचें ध्येय व एकंदर धोरण याचे विरुद्ध आहेत. वरिष्ठ जातींत मुद्दाम घुसडला जाणारा पुनर्विवाह हाही याच कोटींत येतो. मनुस्मृतींत नियोग व विधवावेदन (पुनर्विवाह) हीं दोनहीं सारख्या योग्यतेचीं मानलीं असून 'अयं द्विजैर्हि विद्वद्भिः पशुधर्मो विगर्हितः' (मनु. अ. ९।६६) अशी त्यांची निंदा केली आहे. आणि विवाहमंत्रांत व विवाहविधींत नियोग व विधवावेदन मुळींच सांगितलेलें नाहीं, असें याचे मागल्या श्लोकांत स्पष्ट म्हटलें आहे. 'न द्वितीयश्च साध्वीनां क्वचिद् भर्तोपदिश्यते ।' असेंही स्पष्ट वचन (अ. ५।१६) आहे.

त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवर्षिकीं ।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीदति सत्वरः ॥

या श्लोकात (अ. ९।९४) मनूनें पुरुषाचा विवाहकाल जरी २४ ते ३० सांगितला आहे, तरी स्त्रियाचा विवाहकाल ८ ते १२ हाच प्रशस्त व ग्राह्य म्हणून नमूद केला आहे, याचे तरी बीज वरील कल्पनेतच आहे. साराश, आमच्यात विवाह हा एक महत्त्वाचा व अवश्य असा धर्मसंस्कारच मानला आहे. तसेच या संस्कारात वधूवराची इच्छा किंवा पसंती याला आमचे वहिवाट नाही. याचें एक कारण असें की,

देवदत्तां पतिर्भार्यां विंदते नेच्छयाऽऽत्मनः । अ. ९।९५

पुरुषास त्याच्या इच्छेप्रमाणे नव्हे तर देवाने दिलेलीच भार्या मिळत असते. अर्थात स्त्रीसहा देवदत्तच पति मिळत असतो, अशी आमची पूर्वापार समजूत आहे व म्हणूनच—

यस्मै दद्यात्पितात्वेनां भ्राता चानुमते पितुः ।
त शुश्रूषेत जीवंतं संस्थितं च न लंघयेत् ॥

या श्लोकात (मनु. अ. ५।१५१) पिता किंवा त्याच्या संमतीने भ्राता आपणास ज्या पुरुषास देईल, तो जिवंत असेपर्यंत त्याची सेवा स्त्रीने करावी. यदर्थेच नव्हे तर तो मृत्यु पावल्यावरही पतिव्रताधर्माचे उल्लंघन करूं नये, अशी आज्ञा केली आहे. विवाहाचे बाबतीत वधूवराची इच्छा किंवा पसंती यास प्राधान्य न देण्याचे दुसरे कारण असे की, ही जबाबदारी योग्य रीतीने पार पाडण्यास ते अपात्र असतात, अशी आमची रूढ समजूत आहे वधूवर निवडण्याचे काम त्याचे पसंतीवरच सोपवावयाचे म्हणजे तो अर्थात वरीचे तरुण पाहिजेत. पण अंतःस्वरूपापेक्षा बाह्य स्वरूपाचे मोहास त्वरित भुलण्याचे हे वय असल्यामुळे वधूवराकडून वास्तविक एकमेकाच्या अंतःस्वरूपाचे बहुधा नीट परीक्षण होत नाही; तो एकमेकाच्या सौंदर्यादि बाह्य किंवा तात्पुरत्या अगर उसन्या अथवा कृत्रिम गुणास लुब्ध होतात व स्त्रीपुरुषाच्या या नैसर्गिक आकर्षणशक्तीस—एक प्रकारच्या कामवासनेस—प्रेम मानून विवाहाने बद्ध होतात. पण मग वैवाहिक स्थितींत अंतःस्वरूपे प्रगट झाल्यावर पश्चात्ताप पावून संसार दुःखात कंठतात किंवा विवाहबंधने तोडून टाकतात. पाश्चात्य व भारतीय समाज याचे लक्षपूर्वक अवलोकन करणारे लोक अशी ग्वाही देतात की, पाश्चात्यापेक्षा भारतीय समाजांत एकंदरीत घटस्फोट्यांचे प्रमाण जास्त असते व त्या सौख्यात

टिकाऊपणाहीं अधिक असतो. वधूवराचीं पसंती त्यांचे त्यांचेवर सोपविल्यामुळें एकमेकांचे स्वभावगुण पाहूनच केलेला व म्हणून प्रेमजन्य मानलेला हा विवाह-संबंध वास्तविक कधींही न तुटणारा आणि कायमचा हितावह व सुखावह व्हावयास नको काय? पण पाश्चात्यांत पुष्कळ उदाहरणांत तसा तो होत नाहीं, असल्या संबंधांत हनीमूनची आठवण बुजते न बुजते तोंच थोडाफार धुसपूस सुरू होते, व तो विकोपास गेल्यास विवाहसंबंधही तोडण्यांत येतो. पाश्चात्य समाजांत हल्ली फार बोकाळलेल्या व दिवसेंदिवस कायद्यानें अधिक सुलभ केल्या जाणाऱ्या घटस्फोटास वस्तुतः ख्रिस्तीधर्माचा आधार नाहीं. त्याच्या विवाहांतील शपथ-वाक्यांत (I will love, cherish and obey you till death do us part) 'मृत्यु आपला ताटातूट करीपर्यंत मी तुम्हांशीं प्रेमाने, एकनिष्ठेने व आज्ञाधारकतेने वागेन' अशी शपथ वधू घेते; व obey हा शब्द वगळून बाकीच्या शब्दांचा उच्चार वरही करतो. अर्थात ख्रिस्तीधर्म एकाच्या मरणोत्तर दुसऱ्यास पुनर्विवाह करण्याची परवानगी देतो. पण एकमेकांचे हयातांत घटस्फोट करणे व द्वितीय संबंध करणे हीं गोष्टं त्यास मान्य नाहीं, हे स्पष्ट दिसते. पण ख्रिस्ती राष्ट्रांतील बहुतेक व्यक्तींना, धर्म ही एक केवळ विश्वासाची बाब असून त्याचा व्यावहारिक संबंध नाहीं, असेच जणूं काय ठरविल्याचे त्यांचे इतर बाबतींतील वर्तनावरून दिसून येत असते, तोच प्रकार याही गोष्टींत झालेला आहे. वधूवराची निवड करण्याचे काम ज्याचे त्याजवरच सोपवून जो होईल तोंच विवाह अधिक सुखावह व हितावह होणार, असे म्हणणारे लोक किती तरी गोष्टी गृहीत धरीत असतात. १ प्रत्येक तरुण स्त्री व तरुण पुरुष दुसऱ्याचे स्वभावपरीक्षण करण्यांत तरबेज व गुणज्ञ असतात २ ते हे काम निर्विकार मनानें व जबाबदारीने करूं शकतात. ३ प्रत्येक तरुण स्त्रीपुरुष आपापले स्वभाव व अंतः-स्वरूप गळ्यांतील दागिन्याप्रमाणे किंवा अस्तनीच्या बटणाप्रमाणे सर्वांस दिसेल अशा रीतीने दाखवीत असतो. ४ कामवासना व प्रेम यांतील भेद जाणण्या-इतकी निर्विकार मनःस्थिति त्यांची त्या वेळी असते. ५ आणि कोर्टशिपचे-प्रेमाकर्षणाचे-वेळी दिसलेले स्वभावगुण हे व लेप असून यांत पालट केल्हाही होत नाहीं! शेकडा ८० उदाहरणांत असंभवनीय असलेल्या या गोष्टी शक्य झाल्या तर मात्र प्रौढ वधूवराचा परस्पर पसंतीने होणारा विवाह सुखावह व हितावह होण्यासारखा आहे. यापेक्षा "आदौ कुलं परीक्षेत ततो विद्या ततो धनं ।" ही वधूवराचे पालकांस केलेली आमच्या धर्मशास्त्राची आज्ञा किती तरी जास्त

समंजसपणाची व हितावह आहे! वधूवर पसंतीची जवाबदारी त्यांचेवर न टाकण्याचें तिसरें कारण असे की, स्त्रीविषयक शुद्धतेची आमची कल्पना अधिक सक्त व सूक्ष्म दृष्टीची आहे. 'कर्मणा' च नव्हे तर 'मनसा वाचा'ही स्त्रीचा व्यभिचार होता कामा नये, असे आमचे श्रेष्ठ ध्येय आहे; व या ध्येयास अनुसरूनच स्त्रीची कामवासना एकपुरुषसंबद्धच असणे आवश्यक आहे. ही एकपुरुषसंबद्धता साध्य होण्यास कामवासना-प्रादुर्भावाचे वय नैसर्गिक कामवासनेचा विषय जो पति तो विवाहाने निश्चित करून ठेवला पाहिजे. किंवा प्रौढ विवाहाची चाल असल्यास निवडीचे काम वधूवरावर सोपवावयाचे नाही, एवढेच नव्हे तर विवाहापर्यंत वधूचे मन कामवासनेचे बाबतीत अगदी निर्विकार राहील, अशी तजवीज तरी केली पाहिजे, असा आमच्या समाजाचा कटाक्ष आहे. हिंदुस्थानात हे दोनही प्रकार आढळतात. उत्तर हिंदुस्थानात प्रौढविवाह अधिक प्रचलित आहे, तर तेथे गोषाही आहे; दक्षिणेत बालविवाह ज्यास्त प्रचलित आहे, व म्हणूनच तेथे गोषाची फारशी आवश्यकता नाही. आता बालविवाहामुळे अकालसंभोगाचा संभव व बालविधवाचा वर्ग उत्पन्न होणे हे सामाजिक दोष उत्पन्न होतात, हें कबूल केले पाहिजे. पण कोणतीही विवाहपद्धति घेतली तरी ती सर्वस्वी निर्दोष अशी कधींच असत नाही व असणे शक्यही नाही. बालविवाहाने बालविधवाचा वर्ग जसा निर्माण होतो तसा प्रौढ विवाहाने वृद्धकन्याचा वर्ग उत्पन्न होतोच होतो. विवाहबद्ध स्त्रीपुरुषास परस्पर सहवासापासून जें अवर्णनीय सुख होतें त्यास मुकणे, या दृष्टीने आमच्या बालविधवा व पाश्चात्यांच्या वृद्धकन्या सारख्याच दुर्दैवी आहेत. बालविवाहात अकालसंभोगाचा संभव आहे, तर प्रौढविवाहात-विशेषतः वधूवरांच्या स्वतःच्या निवडीने होणाऱ्या विवाहात-कामवासनेची म्हण, प्रेमोद्भवाची म्हणा, एकपुरुषनिबद्धता कायम रहात नाही. मनोभूमीत वरचेवर प्रेमाकुर उद्भवावे, व ते काही कारणाने विवाहरूपाने सफल न झाले तर ते निर्दयपणे उपटून टाकावे आणि पुनः प्रेमाकुर उत्पन्न होण्यास मनोभूमि तयार ठेवावी, असे अनेकदा करण्यात विशेषतः तरुण स्त्रीहृदयास किती दुःख होते व एकेकीने त्यांच्या मनोवृत्तींची नैतिक धार किती बोथट होते, याचा कटु अनुभव सुदैवाने भारतीयांतील स्त्रियास येत नाही: त्याचा भयंकरपणा पाहण्यास पाश्चात्यांतील वृद्धकन्यांचे हृदयाचा ठाव घेतला पाहिजे. कामवासनेचें किंवा प्रेमोद्भवाचे असले अपायकारक खेळ तरुण स्त्रीपुरुषास खेळूं देण्यापेक्षा अकालसंभोगाचा संभव शतपट बरा, असे

आमचे लोकास नैतिकदृष्टीनें वाटत असतें. आम्हांत प्रत्येक स्त्रीस विवाहाची एक तरी संधी अवश्य मिळेल, अशी तजवीज असते. पाश्चात्यविवाहपद्धतींत पुष्कळ स्त्रियांस इच्छा असूनही एकदा सुद्धा वैवाहिक सुख अनुभविण्याची संधी मिळत नाही.

वधूवरांच्या स्वतःच्या पसंतीने होणाऱ्या पाश्चात्य विवाहपद्धतीचा दुसरा ठळक दोष म्हटला म्हणजे त्यांतील प्रेम निरपेक्ष नसते, आणि त्यास सात्विक व कर्तव्याचे स्वरूप बहुधा नसते. ह्यांतील प्रेम बहुधा सौंदर्यादि बाह्य किंवा स्वभावादि अंतर्गत गुणामुळें उद्भवतें. अर्थात् हे प्रेम निरपेक्ष नसून विवाहानंतर सदरहू गुणांत कमतरता उत्पन्न झाल्यास किंवा या गुणांत अधिक असे स्त्रीपुरुष एकमेकांस भेटल्यास आणि विवाहबंधन तोडण्याची शक्यता असल्यास ते प्रेम डळमळावयास लागण्याचा फार संभव असतो. पण पालकांनी घडवून आणलेल्या विवाहांतील–विशेषतः बालविवाहांतील–प्रेम गुणनिरपेक्ष, कामवासनानिरपेक्ष व सात्त्विककर्तव्यस्वरूपी असतें. या दोन विवाहपद्धतींतील भेद थोडक्यांत असा सांगता येईल की, पाश्चात्यांत वधूवरांचे प्रेम एकमेकांवर बसतें म्हणून ते विवाह करतात; आणि आमचेकडे वधूवर विवाहनिबद्ध होतात म्हणूनच ते एकमेकांवर कर्तव्यबुद्धीने प्रेम करीत असतात. आई, बाप, मुले, भाऊ, बहिणी यांचीं एकमेकांवरील प्रेमे अशींच गुणनिरपेक्ष असतात. आई मुलावर प्रेम करते याचे कारण ते तिचे मूल आहे या पलीकडे काहींच नसतें. पाश्चात्य तरुणीस 'तुझें आपल्या पतीवर प्रेम का जडले?' असा प्रश्न केल्यास (He was so Kind, so generous &) अशा प्रकारचें काहीं तरी उत्तर ती देईल. पण तोच प्रश्न कुलीन हिंदु विवाहित स्त्रीस विचारून पाहिल्यास 'हें काय तुमचें विचारणें?' येवढेंच उत्तर ती लाला देईल. त्या उत्तराचा अर्थ असा कीं, 'पतीवर प्रेम हे केलेच पाहिजे व तें प्रेम असावयाचेच, तसें विचारण्याचें कारणच नाहीं.' आमच्या समाजांत क्वचित् पतिपत्नीचें प्रेम एकमेकांवर बसले नाहीं, तरी विवाहित धर्मपत्नी या नात्याचे तिचे हक्क नवऱ्यास नष्ट करतां येत नाहींत; किंबहुना व्यभिचारादि दोषाने स्त्रिया पतित झाल्या तरी 'वस्त्रान्नपानं देयं तु वसेयुश्च गृहांतिके' त्यांस आपल्या घराजवळच ठेवून त्याच्या अन्नवस्त्रांची तजवीज करावी, अशी आमच्या धर्मशास्त्रांची आज्ञा (मनु. अ. ११।१८८) आहे. पण पाश्चात्यांत पतिपत्नीचें परस्परप्रेम नष्ट झाले कीं, सगळ्याच संसाराची राखरांगोळी होऊन त्यांत गृहसौख्याची पूर्णाहुति पडते. आयर्लंडचे सुप्रसिद्ध पुढारी पार्नेल

याचें जें एक चरित्र त्याच्या पुनरूढा पत्नीने प्रसिद्ध केले आहे, त्यात हा दोष ठळकपणें नजरेस येतो. या बाईचे पूर्वीचे नांव मिसेस ओशी असे असून ही पार्नेलचे जिवलग मित्र कॅप्टन ओशी याची बायको होती. उभयता पतिपत्नींचे प्रेम कांहीं कारणामुळे लोपूं लागले, व याच वेळी मिसेस ओशी व पार्नेल यांचे प्रेम परस्परावर जडले. उभयतांचा हा गुप्त प्रेमसंबंध दहा वर्षें सारखा चालला होता! पार्नेल साहेब पार्लमेंटमधील होमरूलची प्रचंड लढाई लढून रोज रात्री ओशीबाईचे घरींच निजावयास जात! या संबंधापासून त्यास एक अपत्यही झाले! ही सर्व हकीकत याच बाईने या चरित्रांत सविस्तर दिली आहे; येवढेच नव्हे, तर कॅप्टन ओशीचे व माझे परस्पर प्रेम नष्ट झाल्यामुळे असल्या प्रेमशून्य विवाहाच्या बंधनानें मी किंवा पार्नेल बांधलेले नव्हतो व म्हणूनच हा विवाह-शून्य पण खराखुरा प्रेमसंबंध ठेवण्यास आम्हास मोकळीक आहे, असे आम्हीं ठरवलेले, अशा आशयाचे समर्थनही या बाईने केले आहे!

बालविवाह आणि विवाहाचे बाबतींत वधूवराचे इच्छेचा किंवा पसंतीचा संबंध येऊ न देणे, या पद्धतीविरुद्ध पाश्चात्त्यांच्या उठ्या व उसन्या विचारावर पुष्ट झालेल्यांचा असा आक्षेप येत असतो की, विवाहविधीचे महत्त्व व गांभीर्य यांचें जबाबदारी ज्यांना कळत नाही, किंबहुना नवरा म्हणजे काय व बायको म्हणजे काय ह्याची अस्पष्ट जाणीवही ज्यास नाही, अशा अर्भकास विवाहबंधनाने बद्ध करणे हा अन्याय आहे; आणि जन्माच्या गांठी ज्या विवाहाने पडावयाच्या त्या-बाबतींत खुद्द त्याचाच विचार न घेणें किंवा ही बाब त्यांचेच पसंतीवर न सोपविणें हा जुलूम आहे, असे या लोकांचें म्हणणें असते. पण हा आक्षेप घेणारे लोक 'विवाह हा एक करार आहे' हीं गोष्ट गृहीत धरून चालतात; पण ही गोष्ट भारतीय समाजव्यवस्था मुळींच मान्य करीत नाही, हे मात्र ते विसरतात. त्यांची अशी समजूत झालेली असते की, विवाह म्हणजे एक प्रकारची व्यावहारिक partnership (भागीदारी) आहे. अर्थात् या भागीदारीची जबाबदारी शिरावर घेणारे उभयता भागीदार सज्ञान पाहिजेत, तीं जबाबदारी त्यांनीं स्वतःपीने व पसंतीने स्वीकारली पाहिजे, त्या भागीदारीला शर्ती पाहिजेत, व शर्ती मोडल्यास भागीदारी बंद झाली पाहिजे, असे त्यांचे म्हणणें! पण आमचा समाज विवाहाविषयी हा एक धर्मसंस्कार आहे असे मानतो, तो एक भागीदारीचा व्यवहार आहे असे मानीत नाही. अर्थात् त्यांचे हे सर्व आक्षेप आमच्या विवाह-विधीस गैरलागू आहेत. दुसरे असे की, संसारात व्यक्तिव्यक्तींचे जे निकटचे

संबंध जडतात, त्यापैकी एकासही सज्ञानावस्थेची किंवा परस्पर पसंतीची गरज लागत नाही. या संबंधात त्यापैकी एक किंवा दोनही व्यक्ति अज्ञानावस्थेत असतानाच हे संबंध जडतात. पतिपत्नीसंबंधाच्या जोडीस बसाविण्यासारखे इतर निकट संबंध म्हटले म्हणजे आईबाप व मुले आणि भाऊ व बहिणी ह्यांचे होत. हे संबंध जडण्याचे वेळी उभय पक्ष सज्ञान नसतात, या संबंधांची जबाबदारी त्यास कळत नाही, व हे संबंध जडविण्यापूर्वी उभयपक्षांची पसंती घेणे हेही अशक्य असते. असे असूनही हे संबंध जडणे म्हणजे अन्याय आहे व जुलूम आहे, असे अर्वाचीन सुधारकही मानीत नाहीत ! आईबाप व मुले आणि भाऊबहिणी यांचे संबंध अधिक नैसर्गिक असल्यामुळे त्यांचा न्याय पतिपत्नीसंबंधास लावता येत नाही, असे कोणी म्हणतील. पण स्त्री-पुरुष-संयोग विवाहाने निर्बंधित होणे हाच कुटुंबसंस्थेचा व सुव्यवस्थित समाजसंस्थेचा पाया आहे. हा पाया जेथे नसेल तेथे कुटुंबसंस्थाच अस्तित्वात येत नाही. व कुटुंबसंस्था नसेल तर आईबाप, मुले, भाऊ, बहीण ह्या नैसर्गिक संबंधास सामाजिक महत्त्वही येत नाही. म्हणूनच पतिपत्नीसंबंध वरील संबंधाइतकाच किंबहुना त्याहूनही जास्त सात्त्विक व केवळ कर्तव्यमूलक आहे, तेव्हा तसा तो असला पाहिजे; तरच संसार खरा हितावह व सुखावह होईल, अशी आमची समजूत आहे, व म्हणूनच आमची विवाहपद्धति तदनुरूप बनली आहे.

परस्पर पसंतीनेच होणाऱ्या विवाहपद्धतीचा नैतिक व सामाजिक दृष्टीने फार अनिष्ट असा आणखी एक परिणाम होत असतो. तो हा की, पुष्कळ स्त्रीपुरुषास आजन्म अविवाहित स्थितीत दिवस कंठावे लागतात. कामवासना व कामव्यवहार विवाहाने नियमित व एकव्यक्तिनिबद्ध होणे हे पुरुषांहूनही स्त्रियांच्या नैतिक हिताचे दृष्टीने अधिक आवश्यक आहे. विवाहानबंध-रहित असा कामव्यवहार—व्यभिचार—हा पापपुण्याचे दृष्टीने पुरुषास व स्त्रीस सारखाच त्याज्य व घातकावह आहे.

न हीदृशमनायुष्यं लोके किंचन विद्यते ।
यादृशं पुरुषस्येह परदारोपसेवनं ॥

मनु. अ. ४।१३४.

परदारागमनाइतके पुरुषाचे आयुष्यहानि करणारे काहीच नाही, या शास्त्रवचनाचा हाच इत्यर्थ आहे. पण या व्यवहाराकडे केवळ सामाजिक दृष्टीने पाहिल्यास तो पुरुषापेक्षा स्त्रीचेच नैतिक हानि अधिक करतो. स्वैर कामव्यवहार

करून पुरुष मोकळा होतो व त्या पातकी व्यवहाराचें दृश्यचिन्ह त्याजपाशी कांहींच राहत नाहीं; पण या पापी व्यवहाराचे स्पष्ट चिन्ह गर्भरूपाने स्त्रीजवळ राहून तिच्या बेअब्रूची टिमकी सर्व समाजात वाजते. असे होण्यास सृष्टीचा घटनाच–तिला अन्यायाची म्हणा पाहिजे तर- कारणीभूत होत असते. याकरतां या बाबतींत पुरुषापेक्षा स्त्रियांस अधिक जपणे जरूर आहे. हीच गोष्ट लक्षात धरून आम्हामध्ये प्रत्येक पुरुषाचे लग्न झालेच पाहिजे, यापेक्षा प्रत्येक स्त्रीचा विवाह झालाच पाहिजे, असा कटाक्ष विशेष ठेवलेला आहे, व तो याच दृष्टीने हितावह आहे. असा कटाक्ष ज्या समाजांत नाहीं, तेथे अविवाहित वृद्धकन्याचा मोठा वर्ग निर्माण होतो; त्यास उदरपोषणार्थ परस्पराशी व पुरुषाशी भयंकर चढाओढ करावी लागते; या चढाओढींत त्यांची शारीरिक, मानसिक व नैतिक अधोगति-निदान हानि-होते; आणि बिनवारशी व बेकायदा संततीचाही वर्ग-सामाजिक ढिलेपणाचे एक जिवंत स्मारक म्हणून–समाजात कायमचा घुसून बसतो ' पाश्चात्य समाजातील विचारी पुरुषास ही स्थिति स्पृहणीय वाटत नाहीं. व म्हणूनच ' इंग्लंडातील अविवाहित स्त्रियांपैकी शे. ५०, विधवांतील शे. ३० व विवाहित स्त्रियांतील शे. १० स्त्रियांस स्वोदरपोषणार्थ शारीरिक व मानसिक कष्ट करावे लागतात. ' असा हिशेब **लॉर्ड कॉर्टने** यांनी प्रसिद्ध करून स्त्रियांच्या या दुःस्थितीबद्दल कळवळा व्यक्त केला आहे ! परस्परपसंतीने होणारा प्रौढविवाह सुधारकांचे इच्छेप्रमाणे आमच्या समाजात जारीने सुरू झाल्यास येथेही हीच नैतिक व सामाजिक संकटे ओवटल्यावाचून राहणार नाहींत. सालीना ४।५ हजार रु. प्राप्ति असणारे बॅरिस्टर, वकील, प्रोफेसर किंवा सरकारी नोकरच जोपर्यंत परस्पर पसंतीच्या विवाहाचा खेळ आपल्या तरुण मुलामुलींकडून खेळवीत आहेत, तोपर्यंत त्यांच्या अविवाहित प्रौढ कन्यावर हा प्रसंग येणार नाहीं. पण ही सुधारणा मध्यम वर्गात त्याचे इच्छेप्रमाणे दुर्दैवाने शिरल्यास इंग्लंडातील परिस्थितीची घातक पुनरावृत्ति इकडेही झाल्यावाचून राहणार नाही !

पुरुष-प्रकृतीच्या परस्परसंबंधाविषयींच्या आमच्यातील तात्त्विक व धार्मिक उपपत्तीचा आमच्या विवाहपद्धतीवर कोणता इष्ट परिणाम झाला, याचे विवेचन येथपर्यंत केले. आता या उपपत्तीचा आमच्यातील पतिपत्नींच्या परस्परसंबंधावर काय परिणाम झाला हें पहावयाचें आहे. नवरा-बायको, पति-पत्नी असे निकटसंबंधदर्शक शब्द इतर भाषाप्रमाणे आमच्याही भाषेत आहेत. इंग्रजीतल्या

' Couple ' प्रमाणें आम्हातही ' जोडपें ' हा शब्द आहे. पण पतिपत्नींचें सासारिक व अध्यात्मिक अभिन्नत्व दर्शविणाऱ्या ' दंपती ' शब्दासारखा किंवा इंग्रजांतल्या family व wife या दोन्ही अर्थांचें एकीकरण करणाऱ्या मराठी ' कुटुंब ' शब्दासारखा शब्द मात्र इतर भाषात असलेला दिसून येत नाही. पाश्चात्यात Home चा-स्वगृहाचा-" Home Home, Sweet Home, There is no Place like Home, " अशी स्तुति कवि गात असतात. पण आम्ही या ' मधुर स्वगृहा ' चा व त्या गृहाच्या देवतेचा-गृहिणीचाही-एकाच श्लोकात मोजक्या पण खोल अर्थाच्या शब्दानी अशी स्तुति करतो की—

न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।
गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते ॥

शहाणे लोक ' गृहाला गृह न म्हणता गृहिणीलाच गृह म्हणतात; कारण गृहिणी नसलेले गृह रानापेक्षाही भयंकर असते. ' गृहिणीचे व गृहस्थाश्रमाचें माहात्म्य वर्णन करणारी अशी किती तरी सुभाषिते आमच्यात असून 'धन्यो गृहस्थाश्रमः' असा आम्ही सिद्धांतच काढलेला आहे ! साराश, पाश्चात्यात पतिपत्नींचा जीवितक्रम एकमेकासन्निध पण भिन्नपणे एकाच दिशेकडे जाणाऱ्या समांतर रेषासारखा असतो. या रेषा एकमेकास कारणा भिडत नाहीत, प्रसंगी त्या एकमेकांस छेदून नेही भलत्या दिशाकडे जातात. पण आम्हात पतिपत्नींचा जीवितक्रम असा आहे की, भिन्न दिशेने येणाऱ्या दोन रेषा एकदा एकमेकास येऊन मिळाल्या म्हणजे त्या एकरूपानेच एकाच दिशेस बहुधा सतत जात राहतात. पाश्चात्यात पतिपत्नीचे नाते भिन्नत्वयुक्त समानतेचे असतें असे म्हटले,तर आम्हातील हें नाते भिन्नत्व नष्ट करून समानतेच्या पलीकडेच जे एकत्व ते संपादन करते !

पण असले हें श्रेष्ठ नातेंही समतेच्या खोट्या कल्पनेच्या नादी लागलेल्या आमच्यातील काही सुशिक्षितास आवडत नाही. ' स्त्रियांचा परवशता ' या मिलच्या ग्रंथातील सगळी प्रमाणे उसनी आणून तीं ते आमच्या पतिपत्नीसंबंधाविषयीच्या कल्पनावर फेकीत असतात ! पण मिलच्या या ग्रंथातील तत्त्वज्ञान तिकडे आता जुनेपुराणे झाले असून ते अमलात आणल्याने स्त्रीसुधारणेचा व अबलोन्नतीचा प्रश्न सुटलेला नाही; तर विवाहबंधनाचा कंटाळा, विवाहितांचा संततीसंबंधाचा कंटाळा आणि लोकसंख्या हटत जाणें वगैरे अनेक अधिकच भानगडीचे, बिकट व नाजुक असे नवेनवे प्रश्न उपस्थित होऊं लागले आहेत.

साहेब लोकाचे जुने फर्नीचर व जुने कपडे सेकंड हँड किंवा लिलावात खरेदी करून त्यानीं आपलीं घरें व शरीरें शृंगारणारे जसे लोक आमच्यात आहेत, त्याचप्रमाणें इंग्लंडात जुनी पुराणी झालेली व सत्यतेबद्दल संशय उत्पन्न झालेली मतें आमच्यातील आळशी, निरीक्षणशून्य व स्वाभिमानशून्य मंडळी आयती उचलून आणून हिंदुसमाजावर त्याचे अस्त्रक्षेपण करावयास लागतात' पण उसन्या जिन्नसावर आपली मालकी कधींच स्थापन होत नाही; ते केव्हांना केव्हा खऱ्या मालकास परत करावे लागतात; व पुरी कल्पांत न आलेले अस्त्र ते सोडणारावरच उलटत असते, हे या मंडळींनीं लक्षात ठेवावे. "आम्ही आमच्या स्त्रियास अज्ञानांत ठेवतों, त्यास सज्ञान मानीत नाहीं, त्यास गुलामाप्रमाणें किंवा जनावरासारखे लेखतों; त्याना आम्ही कसलेही स्वातंत्र्य न देता कायमच्या पारतंत्र्यांत व गोषांत कोंडून ठेवतों." इ. इ. आमच्यातील दांपत्यधर्मावर या मंडळींचे आक्षेप असतात. परक्या घराण्यातील कन्या पतिगृहीं येऊन तेथील संसाराशीं व पतीशीं एकरूप होऊन तिच्या संसाराचे स्वतंत्र अस्तित्व राहत नाहीं, या दृष्टीने आमच्यांत पत्नीस स्वतंत्रता नाहीं हा गोष्ट कोणाही मान्य करील. पण यांत वाईट काय आहे ते मात्र कळत नाहीं. कृष्णा व कोयना नद्यांचा प्रीतिसंगम होईपर्यंत कोयनेचे स्वतंत्र अस्तित्व आहे, पण पुढे कोयनेचे नाव व स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन कृष्णेचेच नाव पुढील ओघास चालू राहते. पण तेवढ्यावरून कृष्णेच्या पुढील ओघांत कोयनेचे पाणी मुळींच नसतें, असें म्हणता येत नाहीं. याच न्यायाने परकीय कन्येचे पतिगृहीं आल्यानंतर जरी स्वतंत्र सासारिक अस्तित्व नष्ट झालें, तरी तिला संसारांत कांहीच महत्त्व नसतें, तिची योग्यता गुलामापेक्षांकेट नसते, हे म्हणणें खोटें आहे. स्त्रियांच्या अज्ञानाबद्दलची हाकाटी याच मासल्याची आहे. हिंदु स्त्रिया अज्ञान, अशिक्षित आहेत असे म्हणणाऱ्याच्या आक्षेपाचा खरा अर्थ एवढाच असतो की, पुरुषास हवी मिळते तसलें पुस्तकी शिक्षण त्यास मिळत नाहीं, म्हणून त्या अशिक्षित व अज्ञान होत! पण आपण साक्षरता व सुशिक्षितपणा हीं एकार्थक मानून चालत आहों हें मात्र याच्या लक्षात येत नाहीं. आमचा सामान्य स्त्रीसमाज 'निरक्षर' असेल, पण तो तेवढ्यावरून केवळ 'अज्ञान' व 'अशिक्षित' असतो असे मात्र म्हणता येणार नाहीं. साक्षरता हे ज्ञानाचे व शिक्षणाचें 'एक' साधन आहे; तें नसले तरीही मनुष्य सज्ञान व शिक्षित असूं शकतो. निरक्षर असलेल्या आमच्या स्त्रीपुरुषांसही धर्माची, नीतीची व सदाचाराची

जाणीव व स्पष्ट कल्पना असते, त्याचे महत्त्वही कळतें व त्याप्रमाणे तीं यथामति आचरणही करतात; तर त्यास अशिक्षित किंवा अज्ञान म्हणणें अयोग्य होय. सांप्रतकाळी स्त्रियानाही साक्षरतेचा, पुस्तकी ज्ञानाचा व बहुश्रुतपणाचा जरूर नाही, असे कोणीही म्हणत नाही. पण आमच्या स्त्रिया व त्याचे द्वारें आमचा समाज पाश्चात्य वळणावर नेण्याची सुधारणा घडवून आणण्याचें एक मुख्य साधन याच हेतूने जोपर्यंत स्त्रीशिक्षणप्रसार आमच्या सुधारकाकडून करण्यांत येईल, तोंपर्यंत जुनी ध्येये व जुना आचार याचा अभिमान बाळगणारे लोक या शिक्षणापासून आपल्या स्त्रिया अलिप्तच ठेवणार, व तें त्याचे करणें रास्तही आहे. मग याबद्दल सुधारकांनी त्यास कितीही शिव्याशाप दिले तरी त्यांची ते परवा करणार नाहीत. स्त्रियांस आम्ही समान मानीत नाही, या आक्षेपाचें उत्तर वर दिलेच आहे. पाश्चिमात्यांची ओरडही अशीच दुराग्रह, विपरीत ग्रह आणि अज्ञान यांना द्योतक झालेली आहे. गोपाचा खरा हेतु स्त्रीचें पावित्र्य व शुद्धता कायम राखणें हाच आहे. यात स्त्रियावर जुल्म करण्याचा किंवा त्यास गुलामगिरीत ढकलण्याचा मुळींच उद्देश नाही. गुलामगिरी हा गोपाचा अवश्य परिणाम असता, तर ज्या रजपुतांत गोपा फारच सक्त आहे त्याच्या स्त्रियांत तर गुलामगिरी-पासून उत्पन्न होणारे दुर्गुण ओतप्रोत भरलेले दिसले असते. पण रजपुत स्त्रियांचा खरा बाणा काय आहे, त्याची साक्ष देण्यास टॉड साहेबाचा रजपुताचा इतिहास मूर्तिमंत उभा आहे. गोपातल्या रजपुत स्त्रियाइतके तेज, बाणेदारपणा, स्वार्थत्याग, सत्यानिष्ठा, मानीपणा, धर्माभिमान व देशाभिमान पूर्णपणे स्वातंत्र्य मिळविलेल्या पाश्चात्य स्त्रियांतही आढळून येणार नाही. 'आपल्या चालीरीती सर्वोत्कृष्ट असे मानून त्याच मापाने परकीय राष्ट्राच्या चालीचे मोजमाप घेणारा उथळ दृष्टीचा परकीय प्रवासी किंवा ग्रथकार परोपकार बुद्धीचा मोठा आव घालून व हिंदु स्त्रियाच्या दीन व अवनत स्थितीबद्दल अश्रु ढाळून मुखोद्गार काढीत असतो; पण खुद्द हिंदु स्त्रियासच आपली स्थिति अवनत व दीन आहे, असे मुळींच वाटत नाही.' असा आभिप्राय देऊन पुढे कर्नल टॉड लिहितात:—

He particularly laments her want of liberty and calls seclusion imprisonment. From the knowledge I possess of the freedom, the respect, the happiness, which Rajput women enjoy, I am by no means inclined to deplore their state of captivity

(हिंदु स्त्रियास स्वातंत्र्य नाही, याबद्दल या थोर्‍या गृहस्थास विशेषच वाईट

वाटत असतें; आणि या स्त्रियांच्या मर्यादेस व पडदपोशीस हा कैद असें नांव ठेवतो ! पण पडद्यातील रजपुत स्त्रियास वास्तविक किती स्वातंत्र्य असतें, त्या किती सुखी असतात आणि त्याजबद्दल पुरुषास किती आदर वाटतो, याची मला प्रत्यक्ष माहिती असल्यामुळें त्याच्या ह्या स्थितीस "कैद" हें नाव देण्यास मी मुळींच तयार नाहीं !) स्त्रियांचा गोषा म्हणजे त्यांची गुलामगिरी, हें अनुमान कोणत्या तर्कशास्त्राचे आधारें आक्षेपक काढतात तेंच आधीं कळत नाहीं. मनुष्य पुष्कळ गोष्टी गुप्त ठेवतो. त्यांतील कांहींचा गुप्तपणा त्याच्या हीनतेमुळे त्यास ठेवावा लागतो; पण इतर कांहींचा गुप्तपणा त्याच्या अंगच्या पावित्र्यामुळे किंवा [illegible]यानाम्णामुळें तो राखीत असतो. पातकाचा गुप्तपणा पहिल्या प्रकारचा आहे. घरचे देव अगदी एका बाजूस स्वतंत्र व बंदिस्त देवघरात ठेवून आत जाण्याची मोकळीक फारच थोड्यास असते. तसेच आपली धनदौलतही मनुष्य एका बाजूच्या खोलींत अवजड तिजोरींत बंद करून ठेवीत असतो. अर्थात् स्त्रियास आम्ही विशेष पवित्र मानीत असल्यामुळें व त्याच्या पावित्र्याची आम्हास फार किंमत वाटत असल्यामुळे आमच्या या गृहदेवतांस व गृहलक्ष्मीस शक्य तितकें गृहातच ठेवण्याची व त्याचा परपुरुषांशीं फारसा संबंध न येऊं देण्याची आमची वहिवाट आहे. पण आमच्या या शुद्धहेतुमूलक कृतीचा विपर्यास होऊन आक्षेपकाचे दृष्टीस गोषा व पडदपोशी यांचे जागीं गुलामाचे गुलामखानेच दिसूं लागतात ! !

स्त्रियाच्या गुलामगिरीसंबंधाने ओरड करणाऱ्या या स्त्रीस्वातंत्र्यवादी लोकाचा मनुस्मृतीतील एक श्लोक फारच आवडता आहे; व या प्रश्नाच्या वादात तो ते वारंवार प्रतिपक्षाचे तोंडावर फेकीत असतात. पण हा श्लोक त्याचें तोंड बंद करण्यास समर्थ नसल्यामुळे उलट खाऊन शिवधनुष्याप्रमाणें आक्षेपकाचें छातीवर जाऊन बसतो !

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
रक्षंति स्थाविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥

मनु. अ. ९ ३.

असा हा श्लोक आहे. यांचे मदर्तास 'न भंजेत स्त्री स्वतंत्रताम' (अ. ५।१४८) हेही वचन कधी कधी देण्यात येत असते. या वचनावरून स्त्रिया स्वातंत्र्यास पात्र नाहीत, अर्थात् त्यास पारतंत्र्यात, गुलामगिरीतच ठेविले पाहिजे असें भारतीयांचें ध्येय हीं मंडळी अनुमित करतात. पण हा अर्थ साफ

चुकीचा आहे, हे संदर्भाचा विचार करणारास तेव्हाच कळून येते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या वाक्याचे पूर्वीच्या तीन वाक्यात 'रक्षणा' संबंधाचा त्रिवार उल्लेख केला आहे; आणि त्यात कौमार्य, यौवन व वार्धक्य या तीनही काळात अनुक्रमे पिता, पति व पुत्र यानीं स्त्रियाचे संरक्षण करावे असें सांगितले आहे. हे संरक्षण अर्थात् केवळ शारीरिक नसून मानसिक व विशेषतः नैतिक स्वरूपाचेच आहे. शिवाय त्यात पालनाबरोबर पोषणाचाही अंतर्भाव होतो. ह्या मार्गाल तीन वाक्याचा विचार करता 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' याचा खरा अर्थ, स्त्रियास गुलामगिरीत कोडावें हा नसून, कोणत्याही स्थितीत स्वतःच्या पालन-पोषणाची जबाबदारी स्त्रियावर टाकूं नये, त्याचे शारीरिक, मानसिक व नैतिक पालन आणि पोषण पुरुषानींच करावे, हाच याचा खरा अर्थ आहे.

भार्याया भरणाद्धर्ता पालनाच्च पतिः स्मृतः ।

महाभारत, आदि. अ. १०४

भार्येचे पोषण करतो म्हणून 'भर्ता' व पालन करतो म्हणून 'पति' असे जे महाभारतात वचन आहे, त्यावरून हाच अर्थ सिद्ध होतो. 'भर्तव्या रक्षणीया च पत्नी हि पतिना सदा ।' (म. भा. वन. अ. ६९) हे व्यासवचनही हेच स्पष्टपणे सांगत आहे. स्त्रियाचे अशा प्रकारे पालनपोषण करावयाचे ते त्याच्यावर सत्ता गाजविण्याकरता नव्हे, तर त्याचे सामाजिक, धार्मिक व पारलौकिक बाबतीत फारच महत्त्व आहे, याच दृष्टीने करावयाचे आहे. व या विधानास खुद मनुस्मृतीनच भरपूर पुरावा आहे. उदा० स्त्रियाना घरात कोंडून व गुलामगिरीत पचवून शुद्ध ठेवूं पाहणे नियच नव्हे तर अशक्यही आहे, स्त्रियास स्वतःच स्वतःचे संरक्षण करण्यास समर्थ केल्यानेच त्या अधिक सुरक्षित होतात, असे मनुस्मृतीतील

न कश्चिद्योषितः शक्तः प्रसह्य परिरक्षितुम् ।

मनु. अ. ९।१०.

अरक्षिता गृहे रुद्धाः पुरुषैराप्तकारिभिः ।
आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः ॥

मनु. अ. ९।१२.

या श्लोकात स्पष्ट सांगितले आहे. रक्षणीय अशा ज्या अनेक मोलवान् वस्तु असतात, त्यात स्त्री ही सर्वांहून मोलवान् आहे; व म्हणून तिचे संरक्षण चारी वर्णाच्या लोकांनी सर्वांहून अधिक केले पाहिजे: (**चतुर्णामपि वर्णानां दारा**

रक्ष्यतमा सदा । अ. ८।३५९) एवढेच नव्हे तर (**सूक्ष्मेभ्योऽपि प्रसंगेभ्यः स्त्रियो रक्ष्या विशेषतः । द्वयोर्हि कुलयोः शोकमावहेयुररक्षिताः ॥**) अगदी क्षुल्लक वाटणाऱ्या लहानसहान मोहोत्पादक प्रसंगापासूनही त्याचे विशेष दक्षतेने रक्षण केले पाहिजे. कारण तसें न केल्यास माहेर व सासर या दोनही कुळावर दुःख व पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येईल: असा (अ. ९।५) मनुस्मृतीत स्त्रियाच्या नैतिक संरक्षणासंबंधाने विशेष कटाक्ष ठेवला आहे, व त्यास अनुसरूनच भारतीय समाज अजूनही बहुतांशी वागत आहे.

विवाहित स्त्री-पुरुषानी एकमेकाशी अव्यभिचारी निष्ठेनें आमरणात राहणें हें नैतिक व सामाजिक दृष्ट्या अगत्याचें आहे, असेंच मनूचें मत असून त्यामध्यें यात पुरुषाविषयी पक्षपात दाखविलेला नाही. परदारागमनासारखा पुरुषाच्या आयुष्याची हानि करणारी दुसरी कोणतीच गोष्ट नाही, अशा आशयाचे मनुवचन मागें दिलेच आहे.

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यास्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥

मनु. अ. ३।६०.

अन्योन्यस्याव्यभिचारो भवेदामरणांतिकः ।
एष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्रीपुंसयोः परः ॥

मनु. अ. ९।१०१.

" भार्या व भर्ता हीं ज्या कुलात एकमेकासंबंधाने सदैव संतुष्ट असतात, त्या कुळाचें शाश्वत कल्याण होतें. आमरणात एकमेकासंबंधाने अव्यभिचाराचे-अनन्यत्वाचें-वर्तन असणे, हेच विवाहित स्त्री-पुरुषाच्या श्रेष्ठ वैवाहिक नीतीचे सार आहे " असें मनुस्मृतीत स्पष्ट सांगितले आहे. याबरोबरच स्त्रियाच्या नैतिक शुद्धतेसंबंधाने व पावित्र्यासंबंधाने विशेष कटाक्ष ठेवला आहे. पण तो पुरुषाविषयाच्या पक्षपातामुळें नव्हे, तर स्त्रियाच्याच नैतिक पक्षपातामुळें ठेवला आहे. स्त्रियाचे इतक्या दक्षतेने संरक्षण का करावयाचें यासंबंधाची कारणें व हेतु हीही मनुस्मृतीत स्पष्ट शब्दानीं सांगितलीं आहेत. तीं पाहिलीं असता मनुप्रभृति स्मृतिकार पक्षपाती नव्हते, जुलमी नव्हते व रानटीही नव्हते, हें कोणाही समंजस व विचारी माणसाच्या लक्षात आल्यावाचून राहणार नाही. मनुस्मृतीतील हीं वचनें पुढे दिल्याप्रमाणे आहेत:—

स्वां प्रसूतिं चरित्रं च कुलमात्मानमेव च ।
स्वं च धर्मं प्रयत्नेन जायां रक्षन् हि रक्षति ॥
पतिर्भार्यां संप्रविश्य गर्भो भूत्वेह जायते ।
जायायास्तद्धि जायात्वं यदस्यां जायते पुनः॥
तस्मात्प्रजाविशुद्ध्यर्थं स्त्रियं रक्षेत्प्रयत्नतः ॥

मनु. अ. ९।७ ते ९.

" प्रयत्नपूर्वक पत्नीचे नैतिक संरक्षण केलें असतां आपली संतति, आपले चारित्र्य,आपले कुळ,आपण स्वतः व आपला धर्म या सर्वांचेंच आपोआप व सहज संरक्षण होतें. पति हाच स्वतः भार्येचे पोटी प्रवेश करून गर्भरूपाने पुनः जन्मतो. अर्थात् भार्येचे पोटीं पतिच पुनः जन्म घेत असतो, म्हणूनच भार्येस ' जाया ' असें म्हणतात. यासाठीं संततीची शुद्धता राखण्याकरता पुरुषानीं प्रयत्नपूर्वक–मोठ्या दक्षतेने–स्त्रियांचे नैतिक संरक्षण करीत असावे. " या वचनात ' रक्षण ' सांगितले असून रक्षणाचा हेतुही तितक्याच स्पष्ट शब्दांनीं सांगितला आहे.

लोकानन्त्यं दिवः प्राप्तिः पुत्रपौत्रप्रपौत्रकैः ।
यस्मात्तस्मात्स्त्रियः सेव्याः कर्तव्याश्च सुरक्षिताः ॥

मुलगे, नातू, पणतु इत्यादींचे उत्पादन करून तद्द्वारा आपणास स्वर्गप्राप्ति करून देणाऱ्या व लोकसमाजाची परंपरा अविच्छिन्न ठेवणाऱ्या ज्याअर्थी स्त्रियाच आहेत, त्याअर्थी त्यांचे विवाहबंधनपूर्वक सेवन करावे व त्यांचे चांगले रक्षणही करावे, असे याज्ञवल्क्य स्मृतीतिही स्पष्टवचन आहे. (अ. २।७८) ' योऽकामां दूषयेत्कन्यां स सद्यो वधमर्हति ' (अ. ४।३६४) या मनुवचनात कन्येवरील बलात्कारास वधाची कडक शिक्षा सांगितली आहे, तिचा तरी कटाक्ष स्त्रीशुद्धतेवरच आहे. स्त्रियांच्या नैतिक संरक्षणाच सामाजिक व धार्मिक महत्त्व तेवढेंच सांगून मनुस्मृति स्वस्थ बसलेली नाही. स्त्रियांची ही शुद्धता कायम राहण्यासाठीं काय उपाय योजावे यांचेही तिने स्पष्ट दिग्दर्शन केले आहे; आणि स्त्रियांचे स्वभाव, नैसर्गिक मनोधर्म व शारीरिक रचना ही पूर्णपणे लक्षात घेऊन त्याशीं विरोध न करता त्याचा विकासच होईल अशा धारणाने या उपायांची योजना केलेली आहे. यासंबंधानें मनुस्मृति स्पष्ट सांगते की—

अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत् ।
शौचे धर्मेऽन्नपक्त्यां च पारिणाह्यस्य चेक्षणे ॥ मनु. अ. ९।११

सदा प्रहृष्टया भाव्यं गृहकार्येषु दक्षया ।
सुसंस्कृतोपस्करया व्यये चामुक्तहस्तया ॥

अ. ५।१५०.

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥

अ. ३।५५.

" द्रव्यसंग्रह व द्रव्यव्यय, गृहादिकांची स्वच्छता, अन्नपाककिया व गृहांतील सामानसुमानांची देखरेख हीं कामें पुरुषांनीं स्त्रियांवर सोपवावीं. स्वतः स्त्रीनेंही सदोदित आनंदित राहून गृहकृत्यांत दक्ष असावें. तसेंच घरांतील सर्व वस्तु स्वच्छ व टापटिपीनें ठेवून खर्चही तिनें काटकसरीनें करावा.' अशा प्रकारें गृहकार्यांकडे नियोजित केलेल्या स्त्रियांस पुरुषांनीं कायदेशीरपणें स्वयंपाकीण किंवा मोलकरीण यांचे पलीकडे मान देऊं नये असें, सुधारकाच्या म्हणण्याप्रमाणें मनुस्मृति सांगत नसून उलट स्त्रियांचा पुरुषांस अशी आज्ञा आहे कीं, " स्वतःचे व स्वकुलाचे कल्याण इच्छिणाऱ्या बायांनीं व भावांनीं, नवऱ्यांनीं व दिरांनीं स्त्रियांस भूषणादिक द्यावें व त्याजविषयीं पूज्यभाव मनांत बाळगून त्यांशीं वर्तन ठेवावें. सुधारक मंडळी प्रतिपादितात त्याप्रमाणें स्त्रियांस जर मनुप्रभृति स्मृतिकार गुलाम मानीत असते तर गृहें म्हणजे गुलामखानें आणि संसार म्हणजे स्त्रियांचीं गुलामगिरी व पुरुषांचीं या गुलामावर धनिपणा गाजविण्याचीं सुसंधी असल्यानें त्यांनीं त्यांना स्त्रियांकडे व संसाराकडे पाहिलें असतें; पण तसा प्रकार मुळींच दिसत नाहीं. उलट स्त्रियांच्या नैसर्गिक व संपादित गुणांचीं आणि त्या गुणांच्या कौटुंबिक व सामाजिक महत्त्वाचा त्यांनीं सहृदय व मार्मिकदृष्टीनें इतकी स्तुति केली आहे कीं, तितकी स्तुति स्त्रियांचे दास्यावमोचन करून त्यांस समानतेच्या पायरीवर ठेवणाऱ्या लोकांचे वाङ्मयांत तरी सांपडेल का नाहीं याची शंकाच आहे. देवीची स्तुति करणाऱ्या एका स्तोत्रकारानें तर तिला उद्देशून, " तूंच ' राजलक्ष्मी राजगेहे गृहलक्ष्मी गृहे गृहे ' आहेस ' असें म्हटलें आहे ! सामान्यतः स्त्रियांच्या—विशेषतः पत्नीपदारूढ स्त्रियांच्या—आमच्या स्मृतिकारांनीं गाइलेल्या महात्म्याचा थोडासा मासला पुढें देत आहें, त्यावरून हीं गोष्ट कळून येईलः—

यत्र नार्यस्तुपूज्यंते रमंते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राऽफलाः क्रियाः ॥

शोचंति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलं ।
न शोचंति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ॥

मनु. अ. ३।५७, ५७

प्रजनार्थं महाभागाः पूजार्हाः गृहदीप्तयः ।
स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति किंचन ॥
उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम् ।
प्रत्यहं लोकयात्रायाः प्रत्यक्षं स्त्रीनिबंधनम् ॥
अपत्यं धर्मकार्याणि शश्वत्सा रतिरुत्तमा ।
दाराधीनस्तथा स्वर्गः पितृणामात्मनश्च ह ॥

मनु. अ. ९।२६ ते २८

अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।
भार्यामूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥
भार्यावंतः क्रियावंतो भार्यावंतः श्रियान्विताः ।
भार्यावंतः प्रमोदंते सभार्या गृहमेधिनः ॥
सखायः प्राविवेक्तेषु भवंत्येताः प्रियंवदाः ।
पितरो धर्मकार्येषु भवंत्यार्तस्य मातरः ॥
आत्माऽत्मनैव जनितः पुत्र इत्युच्यते बुधैः ।
तस्माद्भार्यां नरः पश्येन्मातृवत्पुत्रमातरम् ॥

महाभारत, आदि. अ. ७४.

न च भार्यासमं किंचिद्विद्यते भिषजां मतम ।
औषधं सर्व दुःखेषु .....वन. अ. ६१.

" जेथे स्त्रियास पूज्य भावाने वागविले जाते तेथे प्रत्यक्ष देवताच आनंदाने रमत असतात; पण जेथे त्यांचेविषयी पूज्यभाव नसतो तेथील सर्व क्रिया निष्फळ होतात. ज्या कुलातील स्त्रिया शोकमग्न असतात, तें कुल लवकरच नष्ट होते; पण जेथील स्त्रिया दुःखित नसतात त्या कुळाची नेहमी आभ्युदयच होते. प्रजोत्पत्तीचें मुख्य साधन या नात्याने या महाभाग्यशाली स्त्रियास पूज्य भावाने वागविले पाहिजे; शिवाय स्त्रिया ह्या गृह प्रकाशमय करणाऱ्या दीप्तीच आहेत; किंबहुना स्त्रिया ह्याच गृहाची शोभा व वैभव आहेत; दोहोंत फरक मुळींच नाहीं. अपत्याचे उत्पादन, जन्मलेल्याचे परिपालन किंबहुना रोजची लोकयात्रा

किंवा सामाजिक संसार हा प्रत्यक्ष स्त्रियावरच अवलंबून आहे. अपत्योत्पादन, धर्मकार्ये, शुश्रूषादिसेवा, श्रेष्ठ प्रकारचा सात्त्विक कामोपभोग, किंबहुना आपली स्वतःची व आपल्या पितरांची स्वर्गप्राप्तिही विवाहित स्त्रियांचेच हाती आहे."

"भार्या ही मनुष्याची अर्धांगी आहे तसेच भार्या हाच सर्वांहून श्रेष्ठ असा मित्र, धर्मादि तीन पुरुषार्थांचे मूळ व संसार तरून जाण्याचे मुख्य साधन आहे. भार्यावान् पुरुषच कर्तृत्ववान् व वैभवशाली असतो, भार्यावंतानाच खरा आनंदानुभव मिळतो, व भार्यावंतच खरे गृहस्थाश्रमी होत. भार्या ही एकांतात प्रियभाषण करणाऱ्या मित्रासारखी, धर्मकार्यांचे बाबतीत पित्यासारखी व आजारात मातेसारखी असते. आपणच आपणास जे उत्पन्न करतो त्यासच 'पुत्र' असे शहाणे लोक म्हणत असतात; म्हणून पुरुषाने आपल्या पुत्राच्या आईस स्वमातेप्रमाणेंच पूज्य मानावे. सर्वच प्रकारच्या दुःखामध्ये वैद्यासही संमत असे भार्येसारखे दुसरे औषधच नाही."

आमचे स्मृतिकार पत्नीपदारूढ स्त्रियांचे माहात्म्य इतके मोकळ्या मनाने गाणारे असूनही, स्त्रियाविषयी तिरस्कारबुद्धि व पुरुषाविषयी श्रेष्ठत्वबुद्धि मनात बाळगूनच त्यांनी धर्मशास्त्रे रचली, असे वरचेवर प्रतिपादन करणाराचे तोंड ब्रह्मदेवासही धरता येणार नाही. स्त्रियांना गृहकार्यांत व पतिसेवेतच गुंतवून ठेवून त्यास सार्वत्रिक व इतर स्वातंत्र्य स्मृतिकारांनी दिले नाही हाच गुलामगिरी होय, असे कोणी म्हणतील; पण हे त्याचे म्हणणे अज्ञानमूलक किंवा दुराग्रहमूलक आहे, ही गोष्ट कोणासही थोड्या विचारांती कळून येईल. मनुष्याच्या ज्या अनेक लहानमोठ्या गरजा आहेत, त्यात त्याच्या मूळ अस्तित्वासच कारणीभूत होणारे खाद्यपेय व त्या अस्तित्वावर घाला न येण्यास जरूर असे संरक्षण या दोन गरजा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्याचप्रमाणे समाजाचे पोषण, संरक्षण व संवर्धन होऊन त्याची परंपरा अव्याहत राखणे, हे सामाजिक नियमाचे पहिले व मुख्य कार्य आहे. हे कार्य चागल्या प्रकारे पार पडेल अशा प्रकारची बंधने समाजातील घटकानी मुकाट्याने स्वहितास्तव मान्य केली पाहिजेत. समाजबंधनाचे हे जे महत्त्वाचे पहिले कार्य त्याचे दृष्टीने विवाहशून्य व म्हणूनच पशुतुल्य स्त्रीपुरुषसंबंधास सामाजिक महत्त्व काडीचेही नाही; उलट असले संबंध समाजाचा पाया व महत्त्वाचा मूळघटक जे कुटुंब त्याच्या उत्पत्तीस विघातक असल्यामुळे ते संबंध सामाजिकदृष्ट्या हानिकारकच आहेत. विवाहबद्ध होऊन केवळ रतिसुखावर आसक्ति ठेवून तदनुरूप वर्तन करणाऱ्या व या

मुखाचे आड येणाऱ्या संततीचा कंटाळा किंवा हयगय करणाऱ्या लोकासही सामाजिक दृष्टीनें मुळींच किंमत नाहीं. अपत्योत्पादन, अपत्यसंगोपन व अपत्यसंवर्धन योग्य प्रकारें व कर्तव्यबुद्धीनें करून कुटुंबसंस्था स्थिर, शुद्ध व अजरामर राखणारे लोकच समाजाचें अस्तित्व अखंड कायम ठेवण्यास खरी मदत करीत असतात. म्हणूनच स्त्रियाच्या इतर गुणांपेक्षा त्यांची मातृत्वशक्ति ह्या गुणाचेच महत्त्व आम्हास अधिक वाटतें, व म्हणूनच आमचे शास्त्रकार ' न मातुः परदैवतं ' असें कंठरवाने सागतात. अशा प्रकारें ' उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनं ' हें ' लोकयात्रेचें मुख्य व रोजचे निबंधन ' प्रत्यक्ष स्त्रियाचेच हातीं असून तें योग्यप्रकारें करण्याची जबाबदारी शिरावर घेण्यास स्त्रियाच नैसर्गिक व मानसिक गुणानी विशेष लायख आहेत. सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या ह्या कार्याचा बोजा त्यास उचलावयाचा असल्यामुळें उदरपोषणार्थ पुरुषाप्रमाणे घराबाहेरचे धंदे करण्याचा व पुरुषाशी समानत्व येण्याकरिता त्यासच योग्य असलेले सर्व शिक्षण संपादण्याचा बोजाही, सापत्तिक स्वातंत्र्याच्या व समानतेच्या खोट्या व घातक मोहास बळी पडून, त्याचेवर मुधारणावादी लादतील किंवा स्त्रियाच स्वतः उचलतील तर त्याची शारीरिक, मानसिक व नैतिक हानि हे ईल येत्रदेच नव्हे, तर त्याच्या संततीचे संगोपनावर अर्थात् समाजाच्या भावी अस्तित्वावरही अनिष्ट परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. इंग्लंडादि पाश्चात्य देशात हा बिकट प्रश्न उपस्थित झाला असून तो सोडविण्यास तिकडील समाजशास्त्रवेत्ते अटोकाट प्रयत्न करीत आहेत, तरी तो त्यांस अद्याप सुटलेला नाहीं. पाश्चात्यातला हा प्रकार साप्रत मुंबईच्या गिरण्या वगैरेमध्यें जाऊन काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रियामध्यें थोडाथोडा दिसून येऊं लागला असून त्याचेमध्ये बालकाच्या मृत्यूचे प्रमाण भयंकर वाढलें आहे. तेवढ्यावर वेळींच सावध होण्याचो सुबुद्धि, स्त्रियास सापत्तिक स्वातंत्र्याचा लाभ देऊ इच्छिणाऱ्यास होणार नाहीं काय ? अपत्योत्पादन व अपत्यपरिपालन ही कार्ये फार महत्त्वाची, फार बिकट, फार कष्टाचीं व फार नाजुक आहेत. ही ज्यांचे शिरावर आहेत त्याजवर इतर सामाजिक कर्तव्याचे बोजे जितके कमी बसतील तितके समाजदृष्टीने हितावह आहे. वरील प्रकारचें महत्त्वाचें सामाजिक कार्य करणाऱ्या स्त्रियास जर इतर कोणते कार्य झेपण्यासारखें आणि मुख्य कार्यास सोयीचे व पोषक असे असेल तर तें गृहकार्य हेंच आहे; व तेच आमच्या स्मृतिकारानीं त्याजवर सोपविले आहे. स्त्रियाची दृष्टि व्यापक व मने प्रगल्भ होऊन त्यांना बहुश्रुत होणे सध्याच

काळीं फार जरूर आहे हें कोणीही नाकबूल करीत नाही. तसेच दुर्दैवानें बाल-वैधव्य आल्यामुळे ज्याचेवर अपत्योत्पादन व अपत्यपरिपालन ह्या कर्तव्याचा बोजा येतच नाही, त्यानी मनमुराद सुशिक्षण संपादून इतर सामाजिक कर्तव्याचे बोजे शिरावर घेतल्यास तें सामाजिक दृष्टीने अपायकारक नसून उलट हितावहही आहे. प्राचीन ब्रह्मचारिणींचें ध्येय डोळ्यापुढे ठेवून ज्ञानसंपादन करण्यास लायक असा आमच्या स्त्रीसमाजात जर कोणता वर्ग असेल तर हाच आहे. पण आमचे सुधारकबंधु यास पुनः संसारांत पाडण्याचाच अटोकाट प्रयत्न करीत असतात; किंवा त्यास 'सुशिक्षित' बनवून 'अशिक्षित' स्त्रीसमाजातून फोडून काढून सुशिक्षित स्त्रीपुरुषांशीच दळणवळण ठेवावयास लावीत असतात ! आधुनिक साधनांचा पूर्ण उपयोग करून पण प्राचीन ब्रह्मचारिणींचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून बालविधवांचा वर्ग सुशिक्षणसंपन्न केला, आणि सुशिक्षित होतांच आपल्या अशिक्षित भगिनींचा संगति त्याज्य मानून सुशिक्षित स्त्री-पुरुषातच मिसळण्याची त्याची प्रवृत्ति सुटेल व अशिक्षित म्हटलेल्या संसारी स्त्रियातच पूर्ववत् मिलाफाने तो वर्ग वागेल, तर या उत्तरोत्तर स्त्रियांचीही दृष्टि व मन त्याचे सहवासाने व्यापक व बहुश्रुत होईल; आणि तेही अनायासे व त्यांच्या मुख्य सामाजिक कर्तव्याची हानि न होतां होईल.

वरील कारणांकरिता स्त्रियांस सार्वत्रिक स्वातंत्र्य न दिल्यामुळें त्यांच्या पोषणाची हयगय कोणत्याही स्थितीत होऊं नये, अशीही आमच्या धर्मशास्त्रकारांना तजवीज केलेली आहे. मुलाबरोबर मुलीनाही वडिलार्जित मालमत्तेचा वाटा मिळत नाही, म्हणून आमच्या स्त्रिया गुलाम व आमची संस्कृति खालच्या दर्जाची, असे म्हणता येत नाही. संस्कृतीच्या उच्चनीचतेची ही कसोटी खरी मानली तर आरब लोक सर्वांहून जास्त सुधारलेले आहेत असे मानावे लागेल ! मुलगे हयात असल्यावर मुली वारस होत नसल्या, तरी त्याना मालमत्तेचा कांहींच अंश मिळत नाही, हे म्हणणें साफ चुकीचे आहे. आऊ हयात असता मुलांना जरी बापाच्या मालमत्तेचा वारसा मिळत नाही, तरी त्यांच्या व मातेच्या अभावा मुलीच वारस होतात; व बापाकडून मिळालेल्या या इस्टेटीची मालकी त्यांचे नवऱ्याकडे न जाता हयातीपर्यंत त्याचेकडेच राहून पश्चात् त्यांचे मुलाकडे जाते. शिवाय स्त्रीधनावर स्त्रीचीच अप्रतिबद्ध सत्ता असते. त्याचा विनियोग ती स्वसंपादित मालमत्तेप्रमाणे वाटेल तसा करूं शकते. अशा विनियोगानंतर राहिलेली मालमत्ता तिचे मुलास न मिळता मुलीस मिळते. दुसरें असे

की, दीर किंवा इतर नातेवाईक यास वडिलार्जित इस्टेट कोडीची जरी मिळाली नाही, तरी त्याजपासून व त्याचे अभावी इतर आप्तापासून तिला हक्काने पोटगी मागता येते. तसेच निपुत्रिक नवऱ्याच्या इस्टेटीची पत्नीच आपल्या हयातीपर्यंत मालक होत असते व तिचे अभावी मग मुलीच मालक होतात. साराश, आमची कौटुंबिक रचना पुत्र-परंपरामूलक असल्यामुळे स्त्रियास जरी वारसदारीत गौण मानले असले, तरी सापत्निक किंवा इतर कोणत्याही दृष्टीने त्यास गुलामासारखी स्थिति खास पूर्वी नव्हती व हल्लीही नाही; आणि आमचा दांपत्यधर्म अनेक दृष्टीनी श्रेष्ठ दर्जाचा आहे, हे वरील विवेचनावरून कोणासही सहज दिसून येईल.

आतापर्यंत केलेल्या विवेचनात पति वगैरे पुरुषानी स्त्रियाशी कसे वागावे, या संबंधाच्या भारतीय ध्येयाचे मुख्यतः निरूपण केले. स्त्रियानी पति वगैरे पुरुषाशी कसें वर्तन ठेवावयाचे यासंबंधाचे भारतीय ध्येय जगजाहीरच आहे. हिंदु स्त्रियाची अद्वितीय व निरपेक्ष पतिनिष्ठा तर सर्व जगात मान्य व उत्तम नमूनच होऊन बसली आहे. त्याची ही पतिनिष्ठा व पतिप्रेम अलौकिक व दिव्य पदास पोचून त्या पतिबरोबर सहगमन करीत, तो प्रकार प्रत्यक्ष पाहून तर परदेशीय प्रवाशानी थक्क होऊन तोंडात बोटेच घातली असेल !

विशीलः कामवृत्तो वा गुणैर्वा परिवर्जितः ।
उपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत्पतिः ॥
नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम् ।
पतिं शुश्रूषते येन तेन स्वर्गे महीयते ॥

मनु अ. ५।१५४.१५५.

" पति शीलभ्रष्ट, चैनी किंवा गुणहीन असला तरीही साध्वी स्त्रियानी पतीस देव मानून त्याची सतत सेवा करावी. पतिसेवेवाचून स्त्रियास निराळा यज्ञ, व्रत किंवा उपवास सांगितलेला नाही. तिनें पतिची शुश्रूषा केली म्हणजे तेवढ्यानेच तिची स्वर्गी मानमान्यता होते " या मनुवचनाप्रमाणे भारतीय स्त्रिया अद्यापही वागत आहेत. पण या त्याच्या निरपेक्ष व उच्च कर्मयोगासच व्यक्तिस्वातंत्र्यवादी सुधारक गुलामगिरी हें नाव देत असतात. व्यक्तिस्वातंत्र्याचे हे तत्त्व वेदवाक्य मानून त्याप्रमाणे संसारातील वेगवेगळे संबंध व नाती मोजू गेल्यास बालकाकरता प्राण टाकणारी माता व देशाकरता तळहातावर शीर घेणारा देश-

भक्त आणि राजाकरता रणांत प्राणातापर्यंत लढणारा राजनिष्ठ शिपाई हेहीं गुलामाच्याच सदरात येतील ! हिंदु स्त्रिया आपल्या पतीची एकनिष्ठेने जी सेवा करतात तिची किंमत व तिचें स्वरूप सुधारकास मनातून कळत नाहीं असें नाहीं; पण तें बाहेर दाखविणे त्यांस अडचणीचे व अनिष्ट वाटते. तथापि प्रसंग पडला म्हणजे ते कळत किंवा न कळत बाहेर पडल्यावाचून रहात नाहीं. स्त्रिया सुशिक्षित झाल्या, म्हणजे आपल्या योग्यतेची जाणीव त्यांचेमध्यें उत्पन्न होऊन त्या अधिक स्वाभिमानी होतील व मग त्या नवऱ्यापुढें बटकीप्रमाणे न वागता समान योग्यतेच्या मित्राप्रमाणें वागतील, असें सुधारक प्रतिपादन करीत असतात. पण हा त्याचा अंदाज कांहीं थोड्या ' सुशिक्षित ' स्त्रियांचे बाबतींत खरा ठरला तरी, तो इतराचे बाबतींत व सर्वांशी खरा ठरेल असें म्हणवत नाहीं. त्यांचें प्रत्यंतर पहावयाचे असल्यास श्री. रमाबाई रानडे यांचें ' आमच्या आयुष्यांतील आठवणी ' हे एकाद्या कादंबरीहूनही सरस असलेले व कुलीन हिंदु स्त्रीची हृदयें प्रकट करणारें पुस्तक वाचावें. जुन्या चालीची एकादी अशिक्षित म्हटलेली स्त्री स्वयंपाकपाणी वगैरे गृहकृत्ये करून पतीचे पाय चेपणे वगैरे प्रकारची त्याची सेवा करीत असते. पण श्री. रमाबाई त्याहीं सर्व सेवा करून शिवाय न्यायमूर्तीचा शिष्य, रीडर, प्रायव्हेट सेक्रेटरी व नोकरही बनत; आणि न्यायमूर्तीस पुस्तकें वाचून दाखविणें, त्यांची खाजगी पत्रे लिहिणें, पुरुषानी पाहावयाच्या संसारातील अनेक बाबींची तजवीज करणें, किंबहुना ते बाहेरून घरात आले म्हणजे त्याच्या अंगावरचे कपडे स्वत: काढून जेथल्या तेथे ठेवणे हींही कामें त्या करीत ! हिंदु-ध्येय मान्य करणारे लोक या कर्तव्यमूलक वर्तनास मुळींच नावें ठेवणार नाहींत. व्यक्तिस्वातंत्र्यवादी व समानतेचे अभिमानी असलेल्या सुधारकाच्या कोटिक्रमाप्रमाणे मात्र या वर्तनास वास्तविक गुलामगिरी नाव मिळावयास पाहिजे; पण ना. गोखले यानीं या पुस्तकाचे प्रस्तावनेत या वर्तनास ' उच्च प्रकारची सेवावृत्ति ' असें नाव दिलें आहे, व ते हिंदु-ध्येयाचे दृष्टीने योग्यही आहे एका सुधारकाग्रणीच्या पत्नीच्या एकनिष्ठ वर्तनास ' श्रेष्ठ पतिसेवा ' हे नाव जर द्यावयाचे तर जुन्या चालीच्या स्त्रियानीं त्याच भावनेने केलेल्या तसल्याच स्वरूपाच्या वर्तनास गुलामगिरी का म्हणावयाचे, याचा खुलासा झाला पाहिजे. पत्नी जुन्या चालीची म्हणून तिचा त्याग-निदान तिरस्कार-करणारे सुधारक पुरुष सांपडतील. पण त्याच्या स्त्रियांकडे पाहिले तर-पतीस देव मानण्याचे वरील ध्येय पिढ्यानुपिढ्या अंगीं मुरल्यामुळें-त्याही बहुतेक

लवकरच स्वतः सुधारक बनतात. ज्या स्वतः सुधारक न बनता जुन्या चालीस व ध्येयास चिकटून राहतात, त्याही आपल्या सुधारक पतींचा धिक्कार किंवा त्याग न करतां त्यांचे पाशींच राहून संसार करीत असतात ! हिंदु स्त्रियांच्या या श्रेष्ठ कर्मयोगाचे रहस्य व महत्त्व, स्वातंत्र्य व समता यांच्या खोट्या कल्पनांनी डोके फिरलेल्या सुधारक पुरुषास जर कळले नाही तर ते त्यांचेच दुर्दैव होय !

पाश्चात्य व भारतीय यांच्या दांपत्यधर्मांचें आतापर्यंत जे तुलनात्मक विवेचन केले, त्यावरून वाचकांचा गैरसमज होऊं नये, यासाठी त्यास शेवटी एक इषारा देऊन हें बरेच लांबलेले प्रकरण पुरे करतों. पाश्चात्यांचा दांपत्यधर्म आमच्याहून कमी प्रतीचा आहे, असें म्हटल्याने आमच्यांतील सगळ्याच स्त्रिया पाश्चात्यांतील सर्व स्त्रियांहून वैवाहिक नीतीनें श्रेष्ठ आहेत, असे म्हणण्याचा रोख आहे असें कोणी समजूं नये. (एका समाजशास्त्रज्ञाने असा एक ठोकळ नियम सांगितला आहे की, समाजांतील बंधन किंवा इतर परिस्थिति कशीही असली, तरी त्यांतले एकतृतीयांश लोक सद्वर्तन कदापि सोडीत नाहींत आणि दुसरे एकतृतीयांश लोक असद्वर्तनी व नीतिभ्रष्टच असतात. पण मधला जो तिसरा एकतृतीयांश वर्ग उरला तो मात्र समाजबंधने किंवा सामाजिक परिस्थिति जशी अनुकूल प्रतिकूल असेल त्या मानाने नीतिमान किंवा नीतिभ्रष्ट बनतो. अर्थात समाजिक निबंधन व नियमन करणाऱ्यानीं अशीं समाजबंधने निर्माण केला पाहिजेत की, हा मध्यमवर्ग कनिष्ठ वर्गांत न जाता वरिष्ठ वर्गांतच समाविष्ट होईल; मग अशा बंधनानीं श्रेष्ठ वर्गांतल्या एकतृतीयांश लोकांचे व्यक्तिस्वातंत्र्य थोडेबहुत मर्यादित झालें, तरी हरकत नाहीं. या दृष्टीने विचार करता भारतीयांचा दांपत्यधर्म पाश्चात्यांहून नीतिमत्तेस अधिक अनुकूल आहे, एवढेच वरील विवेचनाचें तात्पर्य आहे. पाश्चात्यांचा दांपत्यधर्म व स्त्रीपुरुषांचा सामाजिकसंबंध व्यक्तिस्वातंत्र्य-प्रधान आहे; तर आमचा व्यक्तिपावित्र्य-प्रधान आहे. पावित्र्यास श्रेष्ठ मानणाराचे स्वातंत्र्य बरेच कमी होणार व स्वातंत्र्यास श्रेष्ठ मानणाऱ्यांच्या पावित्र्यासंबंधाच्या कल्पना बऱ्याच ढिल्या असणार. आमच्यामध्ये या पावित्र्यकल्पनांनी स्त्रीपुरुषांचे-विशेषतः तरुणपणात-सामाजिक दळणवळण सक्त रीतीने नियमित व मर्यादित केलेले आहे.

मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।
बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥ मनु. अ. २।२१५

" इंद्रियसमूह बळवान असल्यामुळे तो ज्ञात्या व शहाण्या माणसांसही बलात्काराने मोहाकडे ओढून नेतो; याकरता तरुण सावत्र आई, बहिण किंवा मुलगी याजबरोबर पुरुषाने एकातात राहूं नये. " अशा प्रकारचा सक्त नियम पाळणाराचे पावित्र्य राहिलें, तरी स्वातंत्र्य बरेंच कमी व्हावयाचें. उलट सामाजिक स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या लोकात पावित्र्य इतक्या श्रेष्ठ दर्जाचे असणेही अशक्य आहे. पाश्चात्यापैकी पुष्कळ स्त्रीपुरुषाचें पातिव्रत्य व पत्नीव्रत्य श्रेष्ठ प्रतीचे असलें, तरी योग्य वय झाल्यानंतर समाजात मोकळेपणाने वावरूं लागणाऱ्या तरुण स्त्रिया प्रेमाकर्षणाचें—वरशोधनाचें व वरपसंतीचें—कार्य करीत असता त्यास परपुरुषस्पर्शाचे बाबतीतच नव्हे तर चुंबनादिकामध्येही आमच्या इकडच्याइतकी सक्त दृष्टि ठेवता येत नाही, ठेवता येणे शक्यही नाही व तो ठेवणें तिकडे जरूरही मानीत नाहीत. त्याच्या मधले बोलण्या नाचाचे प्रकार त्यास जरी निरुपद्रवी वाटत असले, तरी वरील मनुवचन शेकडो पिढ्या अंगवळणी पडलेल्या आमच्या समाजातील पूर्ण स्त्रीस्वातंत्र्यवाद्यासही ते नुसते पाहवणारही नाहीत, मग प्रचारात आणण्याची गोष्ट दूरच राहिली. धर्म व नीति या बाबतीत विशेष कटाक्ष ठेवणाऱ्या पाश्चात्यातील काही पुरुषास बोलचे प्रकार मुळाच संमत नसून, पतिपत्नीतील चिमटे व अखेरचा घटस्फोट यांची बीजे प्रथमतः ' बालरूम ' मध्येच पेरली जातात, असे त्याचे मत आहे. तसेच विवाहापूर्वी स्त्रीशी संबंध ठेवला तरी तिजशी त्या पुरुषाने पुढे विवाह लाविला म्हणजे त्याचे पूर्वीचे पातक धुवून निघाले, असे मानण्याचा तिकडे जो एक प्रघात आहे त्यावरूनही वरील गोष्टीस स्पष्ट होते. स्वातंत्र्यास श्रेष्ठ मानणाऱ्या पाश्चात्याचे पावित्र्य तुलनेने कमी असले तरी तो त्यातील व्यक्तीचा बिलकूल दोष नसून समाजव्यवस्था व सामाजिक ध्येय यांचाच तो दोष आहे, व यांचे तात्त्विक दृष्टीने आतापर्यंतचे तुलनात्मक विवेचन केलेले आहे, हे वाचकांनी लक्षात ठेवावें.

प्रकरण ७ वें.



भारतीयांच्या वसाहती व परराष्ट्रसंबंध.

जगातील निरनिराळ्या देशात सांप्रत जे अनेक आर्यवंशीय लोक आहेत, त्यांचें मूळस्थान कोणतें? आणि त्या मूळस्थानापासून ते का, कसे व कव्हा देशोदेशी वसाहत करीत गेले? यासंबंधाने प्राचीन शोधकांत तीन प्रकारच्या उपपत्ति प्रचलित आहेत. या उपपत्तीतील मुख्य मतभेद मूळस्थानासंबंधानेच उत्पन्न झालेले आहेत. उत्तरध्रुव-प्रदेश आणि काकेशस पर्वत अथवा मध्य आशिया अशीं तीन वेगळीं मूळस्थानें तीन उपपत्तींचे पुरस्कर्ते मानतात. त्या तीनही उपपत्ति खऱ्या असण्याचा संभव आहे. म्हणजे आर्यलोक उत्तरध्रुव-प्रदेशांतून हिमप्रलयामुळे जे दक्षिणकडे निघाले ते प्रथम काकेशस पर्वत व मध्य आशियापर्यंत येऊन तेथ त्यांनी वसती केली; व तेथून पुढे काहीं कारणानीं आर्यांची एक शाखा युरोपात, एक शाखा असिरियापासून इराणपर्यंतच्या मुलखात व तिसरी शाखा अफगाणिस्थान, हिंदुस्थानाकडे गेली असण्याचा संभव आहे पण या तीन उपपत्तींहून भिन्न अशी एक तिसरी उपपत्ति असून तिचेही पुरस्कर्ते बरेच आहेत. मनुष्यप्राण्याचे, निदान आर्यवंशीय मनुष्यजातीचें, मूळस्थान भरतखंडच असून येथूनच त्यांच्या वसाहती जगातील निरनिराळ्या देशात भिन्न भिन्न काळी पसरल्या, असे या उपपत्तीच्या पुरस्कर्त्यांचे म्हणणे आहे. या वसाहती परदेशी होण्यास अतिप्राचीन काळापासून सुरुवात झाली असून ती पुढे अनेक सहस्रके चालूच होती. अर्वाचीन जी प्रचंड वसाहत भरतखंडातून गेली ती भारतीय युद्धानंतर लवकरच गेली, असे या उपपत्तीच्या पुरस्कर्त्यांचे मत आहे. त्यांचे मते भारतीय युद्धाने भरतखंडाच्याच नव्हे तर सगळ्या जगाच्याच इतिहासात मोठी क्रांति घडवून आणली. भारतीय युद्धाचे मूळ कारण हस्तिनापूरच्या गादीसंबंधाचे तंटे हेच होतें. पण या तंट्याचे पर्यवसान भरतखंडातील बहुतेक सर्व आर्यवंशीय क्षत्रियच नव्हे, तर म्लेच्छ-यवन-शबर-शक या आर्येतर ज्ञातींचे क्षत्रियही नष्ट झाले; आणि त्यामुळे कलियुगास व तदुत्पन्न अधोगतीस प्रारंभ होऊन पुढील परदेशीयांच्या महिमा व राज्यस्थापना यांची संभवनीयता पक्की होऊन बसली. भारतीय युद्धानंतर लवकरच अनेक क्षत्रियज्ञाति थोडथोड्या

ब्राह्मणांसह देशत्याग करून परदेशांत वसाहत करावयास गेल्या; व त्यानी इराणपासून इंग्लंडपर्यंतच्या पश्चिमखंडांत आधुनिक सुधारणेचीं व इतिहासाचीं मूळ बीजें पेरलीं. असे वरील तिसऱ्या उपपत्तिवाद्याचें म्हणणें आहे. सदरहू वसाहतनी केव्हा व कसकशा होत गेल्या, त्याचा अंदाज करण्याकरिता कलियुग व भारतीय युद्ध याचा काल ठोकळ मानानें निश्चित करणे जरूर आहे. करिता या संबंधाने जुन्या भारतीय पंडितांचे काय मत आहे, तें आतां पाहूं.

भरतखंडाच्या विस्तीर्ण इतिहासातील निरनिराळ्या गोष्टींचे काळ निश्चित करण्याचे कामीं मोठी अडचण इतिहासग्रंथांची अत्यंत उणीव ही होय. या ग्रंथांचे अभावीं तुटक वाक्यें, तुरळक उल्लेख व फुटकळ शिलालेख याच्या पायावर कल्पनाची व अनुमानाची इमारत रचूनच कालनिर्णय करणे शोधकास भाग पडते. पण प्राचीन इतिहासग्रंथांची भरतखंडांत उणीव आहे, यावरून भारतीयास इतिहासलेखनाची कला अवगतच नव्हती किंवा त्यानी इतिहास लिहिलेच नव्हते, असे मात्र कोणी ऐतीहासिकपणानें अनुमान करूं नये. इतिहासविषयकच नव्हे, तर इतर शास्त्रकलासंबंधाचेहीं आमचे प्राचीन वाङ्मय अडाणी, दुराग्रही व निर्दय परकीय मुसलमान राजानी हरप्रयत्न करून बुडविलें आहे. कांहीं विषयाचे वाङ्मय समूळ नष्ट झाले आहे, तर कांहींचे वाङ्मय अत्यंत छिन्न व भ्रष्ट स्वरूपात अवशिष्ट राहिलेलें आहे. साराश: हल्ली हिंदुस्थान देश दरिद्री आहे म्हणून तो पूर्वी कधींही श्रीमान् व संपन्न नव्हता, हे अनुमान जसे खोटे, तसेंच सांप्रत प्राचीन ऐतिहासिक वाङ्मय उपलब्ध नाहीं म्हणून आम्हांत पूर्वी हे वाङ्मय मुळींच नव्हतें किंवा ते लिहिण्याची कलाच आम्हास अवगत नव्हती, हें अनुमानही तितकेंच निर्मूळ व असत्य आहे.

अरब, अफगाण, तातर इ० अर्ध सुधारलेल्या लोकाचा इतिहास पहा, यानी हिंदुस्थानच काय पण इजिप्त, ग्रीस, इराण यातीलहीं जुन्या ग्रंथाचा सरसहा नाशच केला आहे. अलेक्झांड्रिया येथील पुरातन व प्रचंड ग्रंथसंग्रहालयाचा विध्वंस करून मुसलमानानीं तिकडील संस्कृति एक हजार वर्षे मागे हटविली! पण भरतखंडातील जुनी ग्रंथसंग्रहालयें नष्ट करणारानीं तर अवघ्या जगाचें अपरिमित नुकसान केलें आहे. बुद्धगया येथील प्राचीन संग्रहालयास महाग्रंथोला (महाग्रंथालय) असे म्हणत असून त्याचा इमारत नऊ मजली होती! तींत प्राचीन बुद्धाच्या अनेक मूर्ति बसविलेल्या होत्या. नालंद येथील 'धर्मगंज' संस्थेचे 'रत्ननिधि' नामक ग्रंथालयही नऊ मजली असून त्यात

बौद्धधर्माच्या महायान व हीनयान पंथांचे सर्व ग्रंथ संग्रहीत केलेले होते. उदंतपुरी येथील विहारात तर बौद्ध व ब्राह्मणी धर्मग्रंथांचा फारच मोठा संग्रह असून त्याची इमारत वरील दोहोंहूनही प्रचंड होती! पण बखत्यार खिलजीचा सेनापति महंमद बेनसाम याने सन १२१२ सालीं ह्या ग्रंथांची होळी केली! (हिंदुस्थान रिव्ह्यू, मार्च सन १९०६.) गुजराथेतील अन्हलवाडा पाटण येथील ग्रंथालय अल्लाउद्दीन खिलजीने जाळले! कोहाना येथील असेच एक मोठें ग्रंथालय फिरोजशहा तखलघाने जाळले, असे 'तारीख फिरोजशाही' या मुसलमानी ग्रंथात म्हटले आहे. अवरंगझेब स्वतःस सुलतान शिकंदर म्हणवी. याशी समकालीन असलेल्या सय्यद गुलाम हुसेन नामक मुसलमान इतिहासकाराने 'सैर मुताखरीन' नामक ग्रंथात लिहिले आहे कीं, हिंदूंचे ग्रंथ जेव्हा जेव्हा व जेथे जेथे सापडतील तेव्हा तेव्हा व तेथे तेथे तो ते जाळीत असे! साराश; युरोपात पूर्वी गोथ व व्हँडल लोकानी जो धुमाकूळ घातला त्याचेच अनुकरण आरब व तार्तर लोकानी केले!

हिंदुलोक खरा इतिहास मुळींच लिहून ठेवीत नसत; इतिहास म्हणून त्याच्यात जे ग्रंथ आहेत, त्या ब्राह्मणांनीं रचलेल्या निव्वळ भाकडकथा आहेत असे फेरिस्ताचे मत होतें. पण ते साफ चुकीचे आहे, असे मि. डौ हे आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासाचे प्रस्तावनेत लिहितात. दाक्षिणेत हिंदूंनीं लिहिलेले अनेक इतिहास अजूनही आढळतात. ओरिसामध्ये अनेक बखरी स्टर्लिंगसाहेबांस आढळल्या; व टॉडसाहेबांस तर ह्या राजपुतान्यात मुबलकच मिळाल्या; असे सांगून मि. विल्सन लिहितात (Mills India, Vol. II पृ. ६७ टीप) कीं, "It is incorrect to say that the Hindus never compiled history." (हिंदूंनीं कधींच इतिहास लिहिले नाहीत, हे म्हणणें चुकीचे आहे.) काश्मीरचा इतिहास ग्रथित करणाऱ्या 'राजतरंगिणी'-वरून तर असले वाङ्मय पूर्वी भरतखंडात मुबलक होतें असे दिसतें व अजूनही शोध केल्यास असले ग्रंथ आणखी सापडण्याचा संभवही आहे, असे प्रो. होरेस लिहितात. हिंदुस्थानात सर्वत्र वंशावळी व बखरी लिहिण्याची पद्धत अद्यापही कायम आहे. राजपुतान्यात तर 'जागे' नांवाच्या लोकाचा हा धंदाच असून निकडील रजपुतास आपल्या पूर्वीच्या वीसवीस पिढ्यातील पुरुषांची नावे व त्यांची राहण्याचीं ठिकाणें माहीत असतात! टॉडसाहेब राजपुताऱ्याच्या इतिहासाचे प्रस्तावनेत लिहितात:—'महंमदाच्या

स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्यापासून तेथे झालेल्या अनेक कृत्या व मुसलमानी बादशहाची निष्ठुर धर्मांधता याचा विचार करता हिंदुस्थानात इतिहासग्रंथ शिल्लक राहिले नाहींत, याचें आश्चर्य वाटावयास नको, व हिंदूंना इतिहास लिहिणे माहीतच नव्हते, असें अशक्य अनुमानही काढावयास नको. इतर सुधारलेल्या देशांत अतिप्राचीन काळापासूनच इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति दिसून येत असून ती अति सुधारलेल्या हिंदुराष्ट्रांत मात्र नव्हती, हे म्हणणें मुळींच शोभत नाहीं. सूक्ष्म व व्यापक दृष्टीवर अवलंबून असणारी ज्योतिष-गणितादि शास्त्रे ज्यांनी पूर्णत्वास नेली; शिल्प, मूर्ति, काव्य, गायन या कला ज्यांनीं निर्माण केल्या येवढेच नव्हे, तर त्यासंबंधाचे अति सूक्ष्म व व्यापक नियमही ज्यांनीं घालून देऊन त्याची शास्त्रे बनविलीं, त्यास राजाचे स्वभाव, त्याची चरित्रें व त्याचे कारकीर्दीत घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याची साधी व सोपी कला मुळींच माहीत नव्हती, अशी कल्पना तरी करता येईल काय ? (Is it to be imagined that a nation so highly civilized as Hindus, amongst whom the exact sciences flourished in perfection, by whom the fine arts, architecture, sculpture, poetry, music were not only cultivated, but taught and defined by the most and most elaborate rules, were totally unacquainted with the simple art of recording the events of their history, the characters of their princes and the acts of their reigns ?) राजतरंगिणीचे कार्ते नशाच प्रकारचे दुसरे इतिहास नव्हते असें म्हणावें तर आबूल फाझलने हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची जी माहिती दिली, ती त्याने कशावरून घेतली याचा खुलासा व्हावयास पाहिजे. चंदाच्या 'पृथ्वीराज रास' ग्रंथातील उल्लेखावरून असें अनुमान होतें कीं, त्याचे वेळीं असलेच दुसरेही बरेच ग्रंथ प्रचलित असले पाहिजेत. चंद वगैरे भाट अडाणी होते असें कोणी मानूं नये. राज्यकारभार, परराष्ट्रसंबंध, राजनीति वगैरे संबंधाचेही जे अध्याय चंदाचे ग्रंथात आहेत, त्यांवरून भाट अडाणी होते असे दिसत नाही. राजपुतान्यांत विजयविलास, सूर्यप्रकाश, खिमात, जगद्विलास, राजप्रकाश, जयविलास, खोमानरासा, मानचरित्र इ. अनेक इतिहासग्रंथ साप्रतही उपलब्ध असून गुजराथचा प्राचीन इतिहास सांगणारी 'रासमाला' तर सुप्रसिद्धच आहे.

कलियुगारंभ, युधिष्ठिरकाल व भारतीय युद्ध हीं जवळ जवळ समकालीनच आहेत, अशी सामान्य लोकांची समजूत आहे. पण हिंदु सिद्धांतज्योतिषी यांचें यासंबंधानें थोडे निराळे मत आहे.

यातः षण्मनवो युगाने भमितान्यन्यग्युगांघ्रित्रयं ।
नंदाद्रीन्दुगुणास्तथा शकनृपस्यांते कलेर्वत्सराः ॥

असें 'सिद्धांतशिरोमणीं' त वचन आहे. या श्लोकाच्या दुसऱ्या चरणांत असे सांगितले आहे कीं, शककालारंभी (नंद–अद्रि–इंदु–गुण) कलियुगाचीं ३१७९ वर्षें झालीं होतीं. अर्थात् सांप्रत ३१७९+शक १८३६=५०१५ इतकीं वर्षें कलियुगाचीं झालीं आहेत.

'ज्योतिर्विदाभरण' नामक ग्रंथ संवत २४ सालीं लिहिलेला असून त्यांत विक्रमाच्या कारकीर्दीचा इतिहास दिलेला आहे. ह्या ग्रंथलेखनाचे काळीं कलियुगाचीं ३०६८ वर्षें होऊन गेलीं होतीं, असें त्यांत म्हटले आहे. अर्थात् सांप्रत ३०६८+२४+संवत् १९७१=५०१५ वर्षें कलियुगास सुरवात होऊन झाली.

आसान् मघासु मुनयः शासति पृथ्वीं युधिष्ठिरे नृपतौ ।
षट्त्रिकपंचाद्रे (२५२६)-युतः शककालस्तस्य राज्ञश्च ॥

असें वचन वराहमिहिराचे बाराहीसंहितेत आहे. युधिष्ठिरकालीं सप्तर्षि मघा नक्षत्रांत असून शककालांत २५२६ वर्षे मिळविलीं म्हणजे युधिष्ठिर शक येतो, असे हे वचन सांगते. अर्थात् २५२६+१८३६=४३६२ वर्षांपूर्वी म्हणजे कलियुगाचीं २५३२ वर्षें झाल्यानंतर युधिष्ठिर जन्मला, असें यात सांगितले आहे.

शतेषु षट्सु सार्धेषु त्र्यधिकेषु (६५३) च भूतले ।
कलेर्गतेषु वर्षाणामभवन् कुरुपांडवाः ॥

असें कल्हणाने राजतरंगिणीत सांगितले आहे, ते वरील बाराही संहितेतील वचनास जुळत आहे.

कलियुगारंभानंतर ६६६$\frac{1}{2}$ व ६६२$\frac{1}{2}$ वर्षांनीं भारतीय युद्ध झाले, असे अनुक्रमें पाराशर व आर्यभट्ट या ज्योतिष्याचे मत आहे. पण वृद्ध गर्गाचें मतें कलि-द्वापर-संधीला सप्तर्षि मघा नक्षत्रांत होते, अर्थात् त्याच वेळीं युधिष्ठिर झाला, असें आहे. युधिष्ठिर शकाचा ३०४४ वर्षें झाल्यानंतर विक्रम सिंहासनावर बसला, असें एनी अकबरीत म्हटले आहे. म्हणजे ३०४४+१९७१=५०१५ वर्षेंच येतात.

कलादगी जिल्ह्यांत 'यहोला' गांवीं नजीकच्या एका टेंकडीवर एक जैनमंदिर असून त्यावरील शिलालेखांत पुढील वचन आहे:—

त्रिंशत्सु त्रिसहस्रेषु भारतादाहवादितः ।
सप्ताब्दशतयुक्तेषु गतेष्वब्देषु पंचसु ॥ (३७३५)
पंचाशत्सु कलौ काले षट्सु पंच शतासु च । (५५६)
समासु समतीतासु शकानामपि भूभुजाम् ॥

हे मंदिर चालुक्यवंशीय दुसऱ्या पुलकेशीने जेव्हां बाधलें, त्या वेळीं भारतीय युद्ध होऊन ३७३५ व शककालाचीं ५५६ वर्षे झालीं होतीं, असे वरील शिलालेखांत म्हटले आहे. अर्थात् शककालापूर्वी ३७३५–५५६=३१७९ व्या वर्षी म्हणजे ३१७९+१८३६=५०१५ वर्षांपूर्वी भारतीय युद्ध झालें, असें होते.

साराश; कालियुगास सांप्रत ५०१५ वर्षे होऊन गेलीं, या बाबतींत सर्व हिंदु ग्रंथकारांचें एकमतच आहे. पण भारतीय युद्धकालासंबंधाने मात्र ज्योतिष्यांत मतभेद आहे ते युद्ध कलि–द्वापरसंधीला न होता कलीच्या सातव्या शकाचे मध्याचे सुमारास (६५३ राजतरंगिणी, ६६६ पाराशर, व ६६२ आर्यभट) झाले, अशी त्यांचा मते आहेत.

भारतीय युद्धकालासंबंधाने लौकिक समजूत व हिंदु ज्योतिषसिद्धातकार याचे मध्यें व खुद्द सिद्धातकारात कसाही मतभेद असला तरी सुमारें ४॥ हजार वर्षांपूर्वी भारतीय युद्धानंतर हिंदुस्थानातून पूर्व, पश्चिम व उत्तर दिशाकडे हजारो लोकानीं दूरदूर जाऊन मोठमोठ्या वसाहती स्थापिल्या, यांत शंका नाहीं. पूर्वेकडील वसाहती ब्रह्मदेश, सयाम, चीन, जपान, जावा, सुमात्रा वगैरे बेटे व अमेरिका यात; उत्तरकडच्या तुर्कस्थान, सायबेरिया, स्कांदिनेविया, जर्मनी, ब्रिटन, इराण, ग्रीस, रोम या भागांत आण पश्चिमेकडील वसाहती पूर्व आफ्रिका व इजिप्त यात झाल्या. इजिपशियन, असीरियन, ग्रीक, जर्मन, स्कांदिनेवियन व ड्रुइद लोकाचा धर्म, तत्त्वज्ञान, प्राचीन पौराणिक कथा व संस्कृति यांचा उगम भरतखंडातूनच झाला आहे. असे मागें सांगतलेल्या पंथाच्या शोधक पंडिताचे मत आहे. सर वाल्टर राले यानी आपल्या जगाचे इतिहासात (पृ. ९९.) भरतखंडात प्रथमतःच मनुष्यप्राणी जन्मास आला व तेथूनच तो सर्व पृथ्वीवर पसरला, असे म्हटलें आहे. 'आरारात' हे आशियामायनरमधील प्रसिद्ध पर्वताचें नांव 'आर्यावर्त' शब्दाचाच अपभ्रंश होय, असे या पंथाच्या पंडिताचे म्हणणें आहे. कौंट जॉर्नस्टजर्ना (Theogony of Hindus, पृ. १६८.) व कर्नल आल्कॉट–(थिआसफिस्ट, मार्च १८८१.) यांनीही

हिंदुस्थान हेच मानवजातीचे व मानवसंस्कृतीचे मूळस्थान होय, असे प्रतिपादन केले आहे. पाथागोरस, सॉक्रेतिस, प्लेटो, अरिस्टाटल, होमर, झेनो, सिसरो, ह्हर्जिल वगैरेचीं मतें—वेदव्यास, कपिल, गौतम, पतंजलि, कणाद, जैमिनी, नारद, मरीचि, पाणनी यांच्या ग्रंथांतील तत्त्वांशीं तुलना करून पाहता तीं दुसऱ्याचीं प्रतिबिंबेच दिसतात. एकमेकांचा दृढसंबंध असल्यावाचून इतके सादृश्य उत्पन्न होणें अशक्य आहे. आणि प्राचीन इजिप्शियन लोक हिंदुस्थानातूनच गेले असून ग्रीस-रोमचे प्राचीन पंडित ज्ञानसंपादनार्थ इजिप्तमध्येंच गेलेले होते, असें आल्काटसाहेबाचे म्हणणे आहे. बहार प्रांतास 'पलाश' असे दुसरें नांव असून त्यातून पुष्कळ लोक युरोपात वसाहत करण्यास गेले; व म्हणूनच ग्रीसच्या प्राचीन लोकास 'पेलासजिक' हे सामान्य नाव मिळालेले आहे, असें मि. पोकॉक (India in Greece, पृ. २९-३२.) लिहितात.

या पंथाच्या पंडितांचें व शोधकाचे आणखी एक प्रमाण ज्योतिषविषयक आहे. हिंदु, पारसीक, इजिप्शियन व चिनी लोकांचे प्राचीन पूर्वज वर्षांचे दिवस ३६५¼ व महिने १२ च मानीत; तसेच दिवसाचे तास २४, क्रांतिवृत्ताचे विभाग १२ व आठवड्याचे दिवसही ७ च मानीत. हे विभागीकरण नियमबद्ध नसूनही या चारी प्राचीन लोकांत सारखेंच कसें झालें, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या चारी लोकांहून प्राचीन व सुसंस्कृत असे एखादें पांचवें राष्ट्र असून त्याजपासून हे विभाग चारी लोकांना उचलले असले पाहिजेत, किंवा या चारींपैकी एकापासून तरी बाकीच्यानीं घेतले असले पाहिजेत. या चाराहून प्राचीनतर असे पांचवें राष्ट्र जगावर असल्याचा पुरावा नसल्यामुळें दुसराच पंथ स्वीकारावा लागतो व वरील विभागीकरणाचा उगम भरतखंडातच मानावा लागतो. वरील चार प्राचीन लोकांचे जुने ज्योतिषग्रंथ हे बाल्यावस्थेंत असलेलें शास्त्र दिसत नसून अतिसुसंस्कृत अशा प्राचीन शास्त्राचा अल्प असा अवशिष्ट भाग असलेले दिसत असल्यामुळे, प्रत्येकाने आपापल्या परी स्वतंत्र रीतीनें वरील विभाग पाडले असेही म्हणता येत नाही.

भरतखंड हींच जगातील सुधारलेल्या मनुष्यांची व त्यांच्या संस्कृतींची जन्मभूमि आहे; आणि येथूनच गेलेल्या लोकांची सर्व जगातील निरनिराळ्या देशात भिन्नभिन्न काली वसाहत झाली, असे मानणाऱ्या पंडितांची व शोधकांचीं या संबंधांचीं प्रमाणे पुढें दिल्याप्रमाणे आहेत:—

१. इजिप्त व इथिओपिया—आपण 'पंत' नामक देशातून इजिप्तात

आलो, असें प्राचीन इजिप्ती लोकांचें म्हणणे आहे. या मूळ देशाचे वर्णन दर-एल-बाहरी येथील हासलीटोप राणीच्या देवालयाचे भिंतीवर चित्रलिपीने लिहून ठेवलेले आहे. या वर्णनात त्या मूळ देशातील पशु व वनस्पात-विशेषत: किंमतवान् लाकडे-याची जीं नावें व माहिती आली आहे, ते पशु व वनस्पति निवळ हिंदुस्थानातलेच आहेत, ते इतर देशात उत्पन्नच होत नाहींत, असे दिसून येते. अर्थात् इजिप्ती लोकांचे प्राचीन पूर्वज हिंदुस्थानातून-विशेषत: सिंधु-नदीच्या मुखाजवळच्या भागातून-तिकडे गेले असे दिसून येते. हे लोक ८।१० हजार वर्षांपूर्वी जहाजात बसून समुद्रकिनाऱ्याने सफर करीत जे निघाले ते बलुचिस्थान, इराण, अरबस्थान याच्या किनाऱ्यानें प्रवास करीत करीत व इराणचे आखात, आरबासमुद्र, तांबडासमुद्र, पहात पहात अखेर इजिप्तच्या न्यूबिया व इथिओपिया यांच्या पूर्व किनाऱ्यावर उतरले, असे कर्नल आकॉट (थिआसाफिस्ट, मार्च १८८१.) व पोकॉक ((India in Greece, पृ० ४२.) याचे म्हणणे आहे. अटकच्या दक्षिणेस सुमारे १० मैलापर्यंत सिंधु-नदाचे पाणी खोल व स्वच्छ असून त्याचा वेगही मोठा आहे; त्याचे खाला काळाबागपर्यंतच्या १०० मैलात तर त्याचा ओघ फारच जोरदार असून पाण्याचा रंग काळसर निळसर झालेला आहे. तेथे सिंधुनदीस ' नीलाब ' (नील+आप्) हें नाव मिळाले आहे, व याच नावाचें एक गावही अटकेचे दक्षिणेस १२ मैलावर नदीकाठी आहे. अर्थात येथील लोकांनी इजिप्तमध्ये वसाहत केल्यानंतर तेथील मोठ्या नदीसही तेंच (नाईल-नीला) नाव दिले. या शिवाय इजिप्तमधील इतर नद्यांचीं व प्रांतांचीही नावें हिंदुस्थानच्या नद्यांचे, शहरांचे व प्रांतांचे नावावरून पडलीं आहेत; कांही राजांचीं नावे (रामेसीस) भारतीय रामवंशीयावरून पडलेलीं आहेत; उभय देशातील शिल्पपद्धतींचे विषय व स्वरूप यांचेही निकट साम्य आहे; व बऱ्याच प्राचीन इजिप्ती शब्दांचे रूपांतर व भाषांतर संस्कृतातून सहज व स्वाभाविक रीतीने होते. असेही मि. पोकॉक यांनी (India in Greece, पृ. २०१.) म्हटले आहे. ख्रि. पू. १७ व्या शतकाच्या सुमारास ग्रीसमधील चित्रलिपीतील एका लेखात माकडाला ' कपि ' हाच संस्कृत शब्द दिलेला आहे ! मां. ब्लूमेनबाश यानीं जगातील निरनिराळ्या वर्णाच्या लोकांच्या डोकींच्या कवट्यांचा संग्रह केला असून त्यांतील भारतीय व इजिप्ती लोकांच्या कवट्यांचा आकार व रंग यात विशेषच साम्य दिसून येतें, असा प्रो. हीरन याचा अभिप्राय आहे. (Asiatic nations Vol. II.

पृ. ३७३.) प्राचीन इजिप्ती लोकांच्या रीतीभाती, समाजरचना, धर्मसमजुती व राजसत्ता यांचे भारतीयांच्याशी विलक्षण साम्य आहे, असेही यांचे म्हणणे आहे.

प्राचीन इथिओपियामध्ये अर्वाचीन **न्यूबिया, अबिसीनिया, डोंगाला** वगैरे प्रांताचा समावेश होत असे. यातही **सिंधु**प्रांतातूनच जाऊन लोकांनी वसाहत केली. **सिंधु**ला 'अबुसिन' असे ग्रीक नाव असून तेथील लोकांनी वसाहत केलेल्या प्रांतास ते सहजच ' अबुसिनिया ' म्हणू लागले. **फिलोस्ट्रेटस, युसेबियस, ज्यूलियस आफ्रिकॅनस,** वगैरे प्राचीन ग्रीक ग्रंथकारांनीही असेच नमूद केले आहे. **हिंदुस्थानातील** एका राजाचा विश्वासघाताने खून केला म्हणून काही लोकांस भरतखंडातून हाकून देण्यात आले व त्यांनीच इथिओपियात वसती केली, असेही **फिलोस्ट्रेटस**ने लिहिले आहे **अबुसिनिया व भरतखंड** याचा व्यापारीसंबंध पुढेही पुष्कळ वर्षे चालू होता, व अनेक **हिंदु** व्यापाऱ्यांनी त्या भागात जाऊन वसतीही केली होती. **गँबिया** व **सेनिगाल** नद्यांच्या खाड्यातील मुख्य व्यापारी बंदरास जी नावे आहेत, त्यांचे अंत्य ' कुंड ' (उदा० तंबा-कुंड) असे आहे ! साम्रत युद्ध चालू असलेल्या **जर्मन** ईस्ट आफ्रिकेतही **मेरु**-मोठ्या पर्वतास मौंट शंभू व मौंट मेरु अशी नावे दिलेली आढळतात ! **मंगो पार्क**ने आफ्रिकेत केलेल्या प्रवासाचे वर्णन लिहिले असून त्यातील ज्या ज्या शहरे वगैरेंची नावे संस्कृत किंवा संस्कृतोत्पन्न आहेत, त्यांची एक यादच **एशिआटिक** जर्नल (Vol. IV पृ. ३२४) मध्ये दिलेली आहे !

२. **इराण**—परशुरामाचे अनुयायी ' **परसू** ' नावाचे असून त्यांचे मुख्य शस्त्र ' परशु ' हे होते; यांनी भरतखंडातून येऊन **पर्शिया**त वसाहत केली व त्या देशास हे नाव दिले. शिवाय युफ्रेटिस हे तेथील मुख्य नदीचे नावही ' यु-भारत-ईश ' या शब्दापासूनच निघाले आहे, असे मि. **पोकॉक** यांचे मत आहे (India in Greece, पृ. ४५.). **हिंदुस्थान**च्या वायव्य व उत्तर भागातून येऊन प्राचीन इराणी लोकांनी इराणात वसती केली; आणि ' आर्य ' हा शब्दच नव्हे तर काही अंशी धर्मविधीही त्यांनी **झोरोआस्ट्रियन** धर्मात शुद्ध स्वरूपात राखले, असे **मॅक्स मुलर**ही म्हणतात (Science of Language, २३२-२५३.) प्राचीन इराणी किंवा ' पल्हवी ' जातीचे लोक मूळचे **भारतीय** क्षात्रियच असून कर्मलोपाने वृषल झाले, असे **मनुस्मृतीत** (अध्याय १०, श्लोक ४३-४५.) म्हटले आहे. **संस्कृत** व **झेंद** भाषांचे अत्यंत निकट साम्य

आहे. झेंदच्या कोशांतल्या दहा शब्दांतले निदान सहासात तरी शब्द शुद्ध संस्कृत असतात, हे पाहून सर विल्यम जोन्स यास फार आश्चर्य वाटलें. चंद्रवंशीय बुधाचा पुत्र पुरूरवा. या पुरूरव्यास त्याच्या आईच्या ' इला ' नावावरून ऐल किंवा ऐर म्हणतात. त्याचे वंशज आपणास ऐरान् म्हणवूं लागले, आणि यांनींच इराणात वसती करून त्यास इराण हे नाव दिले. इराण व तुराण यांत्ते मध्ये मोठी युद्धें झाल्यानंतर प्राचीन इराणी लोक इराणांत वसाहत करण्यास आले, असे इराणचे जुने इतिहासकार लिहितात. याचा अर्थ असा की, (इराणी) ऐरान् व (तुराण) सूर्यान्–चंद्रवंशी व सूर्यवंशी–राजाची मोठी युद्धे झाल्यानंतर पराभूत झालेले ऐरान् इराणात रहावयास आले. तैग्रीस नदीवर (Cossoei) ' कौसी ' नावाचे लोक प्राचीन काळी रहात होते, ते काशीहून तेथे गेले असे इतर शोधकाचे मत आहे. ब्राह्मणी धर्मातील काही बाबींसंबंधाने मतभेद झाला व तो पुढें तीव्र होऊन त्यावर धार्मिक रणे माजली; आणि त्याचे अखेरीस प्राचीन इराणी लोक इराणात जाऊन राहिले, असे दोनही लोकांचे देव, देवता, विभूति, यज्ञविधि, गृह्यसंस्कार यांची तुलना करून मि. हॉग यांनी मत दिले आहे (Essays on the Parsees, पृ २८७–२८८.) अजमीढ व नीला किंवा नीलिनी यास पांच पुत्र होते; त्यांपैकी फक्त दोघांचे वर्णन पुराणात आहे, इतराचे नाहीं. अर्थात् हे तिघे व त्यांचा वंश दूर देशी गेला असावा अजमीढाच्या या तीन पुत्राचे वंशज आसेरियातील ' मीडी ' लोक असावेत. या मीडी लोकांचे सांकेतिक चिन्ह ' मेढा ' (अज) हेच दिलेले आहे, हें लक्षात ठेवण्यासारखे आहे, असे टॉड लिहितो. (राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ४१.) इराणांत वसती होऊन बरींच वर्षे झाल्यानंतर झोरोआस्टर–जरदुष्ट्र–जन्मास आला त्याचा काल ग्रीक लेखकांनी निरनिराळा दिला आहे ट्रोजन युद्ध ख्रि. पू. १८०० चे सुमारास झाले. त्याचे पूर्वी सुमारे ६०० वर्षे हा जरदुष्ट्राचा काल, असे ख्रि. पू. ४७० तला ' झेंथुस ' ग्रंथकार लिहितो. आरिस्टॉटलचे मते प्लेटोचे आधी ६००० वर्षे व इतराचे मते ट्रोजन युद्धाचे पूर्वी ५००० वर्षे असे त्याचे काळ आहेत. बाबिलोनियाचा ग्रीक इतिहासकार बरोसोस याने हा काल ख्रि. पू. २२०० असा दिला आहे. तथापि इराणची वसाहत भारतीय युद्धापूर्वी बरींच काळ झालेली होती, असे ठोकळ मानाने म्हणता येईल. ' मनुष्यप्राण्यास भी अत्यंत सुपीक भूमि दली; हा भूभाग (इराणचे) पूर्वेस उंच भागी आहे. तेथून जमशेद आपल्या अनुयायी-

सह इराणात आला; तेव्हां तेथे ग्राम्य किंवा वन्य पशु अगर मनुष्यप्राणी मुळींच नव्हता ' असें हुरमज्द-ईश्वर-जरदुष्ट्राला सांगत असल्याचें ' वेंदिदाद ' मध्यें वर्णन आहे. वरील मुलीक, पूर्वेकडील व उंचावरची भूमि म्हणजे काश्मीर व अफगाणिस्थान हींच होय, असे (Theogony of the Hindus) कौंट जार्नस्टजर्ना हे लिहितात.

३. आशयामायनर—या प्रांतातले प्राचीन ' खाल्डियन ' लोक हे हिंदुस्थानचेच प्राचीन आर्य होते. ' कुल-देव ' नामक ब्राह्मणांनीं वसाहत केलेला जो देश तो ' अपभ्रंश होत होत ' खालडिया ' बनला. ' प्राचीन खाल्डियन व बाबिलोनियन लोकांची संस्कृति हिंदुस्थानातूनच आलेली होती ' असे कौंट जॉनस्टजर्ना लिहितात. (Theogony of the Hindus, पृ १६८.) साप्रतच्या युरोपियन आणि [illegible] ट्रोजन महायुद्धात ' अवंती ' (Abanti) नावाच्या एका जातीचे योद्धे सामील झाले होते; ते माळव्यांतील सुप्रसिद्ध ' अवंती ' च्या राज्यातलेच होते, असे मि. पोकांक यांचे मत आहे. (India in Greece, पृ. ३३.) असीरियनांचा प्राचीन राजा ' बाल ' किंवा ' बेल ' (Baal, Bel) या नावाचा होता. हा राजा म्हणजे भरतखंडावर व कांबोडियापासून ग्रीसपर्यंतच्या देशावर प्राचीनकाळी ज्याचे विस्तीर्ण साम्राज्य होते तो ' बलि ' राजाच होय, असे कित्येक ग्रंथकाराचे म्हणणे आहे. पालेस्टाइनमधील इस्त्रायली लोकाच्या पूर्वीची वसती तार्तर देशातून आलेली असून तार्तर व हिंदुस्थान यातली गावे वगैरेंची पुष्कळ नावें एकसारखींच आढळतात. यहुद्यापूर्वीच्या पालेस्टाईनमधील लोकांची व हिंदुस्थानच्या प्राचीन लोकांची मूर्तिपूजा सारख्याच स्वरूपाची आहे; आणि पालेस्टाईनमधील प्राचीन क्षात्रिय व भरतखंडांतले रजपूत याचेमध्येही चालीरीतींत विलक्षण साम्य आढळून येते. म्हणून पालेस्टाईनमधील प्राचीन लोक हिंदुस्थानातून निघून तार्तर देशातून तेथे वसाहतीस गेले असावे, असें मि. पोकाक यांचें अनुमान आहे. (India in Greece, पृ २२९.)

४. ग्रीस—ग्रीक व संस्कृत या दोनही भाषा बहिणीबहिणी असून त्यांची जननी निराळीच असावी, असे म्हणणाऱ्या शोधकाचा एक पक्ष आहे. पण ग्रीक भाषा संस्कृतोत्पन्न आहे, असे पुष्कळ भाषाशास्त्रज्ञांचें मत आहे. ग्रीक भाषा जर संस्कृतोत्पन्न तर ग्रीक लोक मूळचे भरतखंडातलेच, हे अनुमान ओघानेच निघते. ग्रीक लोकांचे मूळस्थान भरतखंडच होय, हे मत प्रथमतः कर्नल टॉड

व कर्नल विल्फोर्ड याना प्रतिपादिले; व पुढे अनेक पुरावे गोळा करून मि. पोकॉक यांनीं याच मताची परिपूर्ति करून ' India in Greece ' नावाचा एक स्वतंत्र ग्रंथच लिहिला. होमरचे काव्यात वर्णिलेल्या समाजव्यवस्थेचे सूक्ष्म व विस्तृत परीक्षण केल्यावर, ही व्यवस्था आशिआटिक-विशेषतः भारतीय-स्वरूपाची आहे, येवढेच नव्हे तर दोन्ही देशातील भाषा, धर्म, तत्त्वज्ञान, राज-संस्था, किंबहुना पर्वताचीं व नद्यांचीं नावे यातही विलक्षण साम्य आहे. असे मि पोकॉक यानीं सिद्ध केलें आहे. ग्रीसमधील वसाहती मुख्यतः मगध देशा-तूनच येऊन भारतीयानीं केल्या. मगधाची राजधानी ' राजगृह ' त्यावरून तेथील या लोकाचे ' राजग्रैहिक ' किंवा नुसते ' ग्रैहिक ' असे नाव पडले. या ' ग्रैहिक ' नावावरूनच क्रमाने ग्रैकोस, ग्रीकस् व ग्राक हीं नावे उत्पन्न झाली आहेत. ग्रीकाचे आधीं ग्रीसमध्ये जे आले त्याचे नाव ' पेलासर्जा ' असे होते; बहार प्रातांचे प्राचीन नाव ' पलाश ' असे आहे. अर्थात् सदर पेलासर्जा लोकाचे मूळस्थान ' पलाश ' देशच होय. या लोकाचा पहिला राजा पिलास-गस हा (Gaia) गैयापासून झाला, असे एशियस नामक प्राचीन ग्रीक कवि म्हणतो बहारचा राजधानी ' गया ' यावरून याचे विलक्षण साम्य आहे. याचप्रमाणे (मॉसिडॉनिया-माकडोन-मगध; यूबिया, यू-बाबू-याज,-यु-बाहुजाः) मासिडॉनियात मगधानी व युबियात बाहुजानी-क्षत्रियानी-वसाहती केल्या. ' कैलास ' हे नाव देवाचें वसतिस्थान या अर्थी ग्रीकात ' सिलास ' व ' कैलॉन ' आणि रोमनात ' कोलोम ' अशी रूपांतर पावले आहे. वहुद (झेलम) नदीवरील लोक ग्रीसमध्ये विओशियन बनले. त्याचप्रमाणे काश्मी-रचा मूळ संस्थापक काश्यप यावरून ' कोसोपी ' लोकांनी आपले नाव ठेवले. क्षत्रियईन-क्षत्रियेन हे ग्रीसमध्ये कस्ट्राईन बनले. हेलपाचे ' हेलिपास ' व हेल देशाचे ' हेलेडास ' अशा रूपांतरे झाली हेलनामक पर्वताची मोठी ओळ बल्र्झचस्थानात असून त्याचे भोवतालच्या प्रदेशास हेल आणि तेथील लोकास व राजास हेल-ईन हेलेन म्हणत, याचे ग्रीक रूपांतर 'हेलेनीस असे झाले आहे. उत्तर कुरूंचेही ओटोरोक्युरी असे ग्रीक रूपांतर झालें अशा प्रकारचीं अनेक साम्ये दाखवून त्यावरच मि. पोकॉक यानीं ' India in Greece. ' ह्या ग्रंथाची इमारत उभारली आहे.

'१ रोम—प्राचीन ग्रीकाप्रमाणे प्राचीन रोमन लोकाच्या देवदेवता ह्या दुसऱ्या कोणी नसून हिंदुस्थानातल्या प्राचीनतर वीरपुरुषांचीच तीं दैविक रूपा-

तरें होत. रोमन लोक ज्या ट्रोजनाचे वंशज ते स्वतःही हिंदुस्थानातून आलेल्या आर्यवसाहतवाल्यांचेच वंशज होते. 'रोम' नाव वास्तविक लॅटिन नाहीं त्याचे मूळचे रूप 'राम' हे आहे ! संस्कृतातील 'आ' चा लॅटिनमध्ये 'ओ' होतो, असें मि. पोकॉक म्हणतात (India in Greece, पृ १४२ व १६६). ग्रीसमध्ये भारतीयांची वसाहत झाली, त्याच काळाचे सुमारास त्यांचे पैकी काहीं लोकांनी इटालीतही वसती केली; व हेच प्राचीन 'इट्रुस्कन' लोक होत. यांचा धर्म व त्यांतील अनेक धर्मविधि याचे इजप्शियन व हिंदु धर्मविधींशी विलक्षण साम्य आहे, असे कौंट जॉर्नस्टजर्नाप्रभृतींचे मत आहे.

६. तुर्कस्थान व सायबीरिया—शापग्रस्त तुर्वसु व त्याचे वंशज हे तुरानियनाचे प्राचीन पूर्वज होत, असें मॅक्स म्युलर याचे मत आहे. (Science of language, पृ २४२) कित्येकांचे मते तुर्क तुरुष्काचे वंशज होत. चंद्रवंशाच्या यादव व बाल्हीक शाखांनी भारतीय युद्धानंतर खोरासानमध्ये राज्ये स्थापिलीं, असे जेसलमीरच्या रजपुती इतिहासात लिहिले आहे. श्रीकृष्णाचे पुत्र प्रद्युम्न, गद व सांब यांनी वज्रपुराचा राजा लढाईत मारला गेल्यावर तेथे अनेक ब्राह्मण-क्षत्रियासह जाऊन राज्य स्थापले. व श्रीकृष्ण निजधामास गेल्यावर यादवांचे सात्वनाथे ते भरतखंडात पुन. एकदा आले होते, असे हरिवंशात (विष्णुपर्व, अ. ९७.) वर्णन आहे. हे वज्रपूर आलताई पर्वताचे उत्तरेस होते. सायबिरियातील सामोयेदांज व जोर्दास जातींचे लोक या श्याम यादवांचेच वंशज असून त्यांची भाषा संस्कृताला जवळ आहे. सायबीरियात जाताना वाटेत मध्यआशियात ते जेथे थांबले, त्यास अद्याप यदूर्का-डांग (टेकडी) असे म्हणतात ! यादवांच्या काहीं शाखा झाबुलीस्थान व समरकंद या भागात गेल्या व गजनीहीं त्यांनीच वसाविली. (टॉडकृत राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ८५.) हिरातचे प्राचीन नाव 'हेरी' असे असून सीस्तानचे शोत-स्थान हे मूळरूप आहे, असेही टॉड लिहितो इराण, सायबिरिया व तुर्कस्थान यांतील काहीं शहरातून काहीं हिंदु अद्यापही तुरळक आढळतात. देवामिता व अजाश्व याचा पुत्र 'अश्व' हा चंद्रवंशीय असून त्याचे नांववरून अस्सी' हीं ग्रीक जात झालेली आहे; व एशिया हे नांवही याच लोकांवरून पडले आहे, असेही त्याचे म्हणणे आहे. युरोप-याचे प्राचीन मूळरूप यू-रूप (संस्कृत सु-रूप) असे आहे. संस्कृत सु व ग्रीक यू याचा अर्थ एकच आहे.

७. **जर्मनी**—जर्मन लोक 'टयूटोन' वंशाचे असून या वंशाचे मूळ पुरुष (Manus) 'मेनस्' होता असें **जर्मनपुराणकथात** म्हटलें आहे. **भा**रतीय **आर्यां**तही 'मनुः' हाच साप्रतच्या **मन्वंतरा**तला आदिपुरुष मानला आहे. **इंग्र**जींतील 'Man' व जर्मनमधील 'Mann' हे शब्द संस्कृतातील 'मनुः' शब्दापासून झालेले असून **जर्मन**मधील 'Mensch' व संस्कृतातील 'मानुष' हे शब्द एकच होत. (**मॅ**निंगकृत Ancient and Mediaeval India, Vol. I. पृ. ११८.) प्राचीन **जर्मन**चा सैल व फैलावलेला झगा आणि डोक्या-वर आणून गाठ देऊन बांधलेले सडक केस हे दोनही प्राचीन ब्राह्मणाच्या सारखेच होते तसेच प्राचीन **जर्मन** लोकात सकाळी निजून उठल्याबरोबर शौचनानादि नित्यचे पहिले कृत्य म्हटले म्हणजे प्रातःस्नान हे असे. ही चाल अर्थातच **जर्मनी**सारख्या थंड देशात उत्पन्न होणे शक्य नसून ती आशियाखंडा-तील उष्णदेशातूनच आलेली असावी, असे **कर्नल टॉ**ड याचे अनुमान आहे. (राजस्थानचा इतिहास, भाग १, पृ. ६३ व ८०.) प्राचीन **जर्मन** सूर्य, चंद्र, अग्नि यांची उपासना करीत; प्रेतें न पुरता दहन करीत; त्यांच्यात सतीची चाल असून पुनर्विवाह नव्हता, असें 'टॅसिटस' या ग्रीक इतिहासकाराने नमूद केलें आहे ! ब्राह्मणाच्या प्राचीन नावाचे पुढे बहुधा 'शर्मा' असे पद लावीत असत, ब्राह्मणापासून 'ब्राह्मण्य' हे जसे भाववाचक किंवा समुदायवाचक नाम झाले, तसेच 'शार्मण्य' हेही नाव बनले. श, ज, य हा तीन अक्षरे पुरुकळ शब्दात समान मानतात व म्हणूनच 'शार्मण्या' चे 'जर्मन' झालेले आहे, असे काहा भाषणपंडिताचे मत आहे ! अर्वाचीन हंगेरियन लोकही तेथील प्राचीन हिंदु वसाहतवाल्यांचेच वंशज असून त्यांची भाषा, चालरीत व वेश याचे मूळ संस्कृतातच सापडेल असे, तिबेटी भाषेचा कोश तयार करणाऱ्या एका युरो-पियन पंडिताने त्याचे प्रस्तावनेत लिहिले आहे. **जर्मनी**तील 'सॅक्सन' लोकही वास्तविक भरतखंडाच्या वायव्यभागात रहाणाऱ्या शाकांचेच वंशज होत. 'शक-सूनुः' व 'सॅक्सन' याचे साद्दश्य उघडच आहे. शिवाय प्राचीन सॅक्सन लोकात स्वर्गास 'हिम्मेल' (Himmel) असे नाव असून ते 'हिमालया' पासू-नच झालेले स्पष्ट दिसत आहे. इंग्लंड वगैरे देशातल्या अत्यंत प्राचीन सॅक्सन प्रार्थनामंदिरावरील जुन्या चित्राचे हिंदुस्थानातील कन्हैया व गोपी यांच्या चित्राशी असलेले साद्दश्य पाहून कर्नल टॉड याचे असें मत झाले आहे कीं, सॅक्सन लोकाचे पूर्वज असलेल्या स्कँडिनेवियातल्या 'अर्श्वा' लोकांनी भरत-

खंडांतून जातांनाच हीं चित्रे बरोबर नेलीं असावीं. (राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ५७.)

८. **स्कांदिनाविया**—(स्वीडन-नॉर्वे) या देशांतील लोकांचे प्राचीन पूर्वज हिंदुस्थानांतूनच आलेले क्षत्रिय होते. ' स्कंदनाभी ' पासून वरील नाव निघालें आहे. ' स्कंद ' हीं क्षत्रियांचींच देवता असून ' स्कंदनाभि ' हे एखाद्या क्षात्रिय कुलाचे नांव असावे स्कांदिनीवियन लोकांचा प्राचीन धर्मग्रथ ' एद ' (Edda) नावाचा असून त्याचे ' वेदा ' शीं असलेले साम्य स्पष्टच दिसत आहे, असे कौंट जॉर्नस्टजर्ना म्हणतात. (Theogony of the Hindus, पृ. १०८.). त्या ग्रंथांत असे लिहिले आहे की, स्कांदिनावियात प्रथम वसाहत करावयास ' जीटी ' किंवा ' जित् ' (Getes किंवा Jits) लोक आले असून त्यांचे दुसरे नाव ' अर्शा ' (Asi) असें होते, व त्यांचे मूळस्थान (Asigard) ' अर्सिगर्ड ' होते. अर्सिगर्ड म्हणजे अर्सिगड होय. ख्रि. पू. ५०० चे सुमारास ' आदिन ' स्कांदिनीवियात आला व त्याचा वारस ' गोतम ' होय. अखेरचा बुद्ध ' महावीर ' असून (ख्रि. पू. ५३३) त्याचाही पट्टशिष्य गौतमच होता. स्कांदिनीवियनांचा प्राचीन वीररसप्रधान पुराणे व काव्ये यांचे इकडील तसल्या वाङ्मयाशी पुष्कळच साम्य आढळतें. (राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ६४,६८.)

सातीं वारांस नावे देण्याची तऱ्हा भरतखंड व स्कांदिनीविया यात सारखीच दिसून येते; हे खालील कोष्टकावरून कळून येईल.

भारतीय नांव.	स्कांदिनीवियन नांव.
आदित्यवार	Sondag (Son=सूर्य.)
सोमवार	Mondag (Mon=चंद्र)
मंगळवार	Tis-dag (This=एक वीरपुरुष.)
बुधवार	Ons-dag (oden=वोडन.) (बोद्धम्, बुद्ध.)
बृहस्पतिवार	Thors-dag (Thor=मुख्य देवता.)
शुक्रवार	Frej-dag (Freja=सौंदर्य देवता.)
शनिवार	Lor-dag (Loger=स्नान.)

यावरून स्कांदिनीवियन-पुराणकथांचा मूळ उगम भरतखंडच होय, असें कौंट जार्नस्टजर्ना—हे स्वतः स्कांदिनीवियन आहेत—म्हणतात ! (Theogony of the Hindus, पृ. १६९.)

" आशिया व युरोपखंडांचे उत्तरेस राहणारे प्राचीन ' **हायपरबोरियन** ' लोक हे मूळ **खैबरपुराहून** येऊन वसाहत करून राहिलेले होत. खैबरपुरी लोकांची दुसरी वसाहत थसली प्रातात **फोनिक्स** नदीचे तीरी झाली होती; व ते लोकही आपणास ' खिफारा ' किंवा ' **खिफेरा** ' म्हणवीत. हायपरबोरियनाच्या शेजारचे लोक ' पेशवारन ' (pashwaran) हे असून यांनी To-Mars (तो-मारोस) पर्वताचे दक्षिणेस वसाहत केली होती. तो-मारोस म्हणजे सुमेरु; व पेशवारन लोक पेशावरचे असून त्याचे ग्रीक भाषेत Passaron (पासारोन) असे रूप झालेले आढळते. " असे मि. **पोकॉक** (India in Greece, पृ. १२७,१२९.) लिहितात.

९. **ग्रेटब्रिटन**—या देशातल्या प्राचीन लोकांचा पहिला सुमावा ' ड्रुइड ' नांवाचे जे मठवासी असत, त्यांचे हकीकतीत सापडतो. **पोकॉक** वगैरे शोधकांच्या मते हे मूळचे **बौद्धधर्मीय** ब्राह्मण असून **काश्मीर** वगैरे प्रांतातल्या राजपूत जातीं बरोबर घेऊन **ब्रिटनमध्ये** वसाहत करण्यास गेले. ड्रुइड लोक पूर्वजन्म व पुनर्जन्म मानीत. विश्वाची उत्पत्ति, पालन व क्षय करणाऱ्या तीन भिन्न देवताही यांच्यात होत्या. धर्मज्ञानरक्षण व त्याचे अध्यापन यांनाही सर्वस्वी आपणाकडेच ठेवले होते. हे **ड्रुइद** लोक राजाचाही मुलाजा न ठेवता त्यास शाप देत; ' कोयत्याचे झपाट्यापुढे गवत जसे तुटून पडते तसे राजलोक ड्रुइदाच्या शापामुळे **जमीनदोस्त** होत ' असे वर्णन आहे ! (Theogony of the Hindus, पृ. १०४) ब्रिटनातील लोकांचा सुप्रसिद्ध जयघोष ' हुरा ! हुरा ' हा तेथील प्राचीन रजपुतांच्या ' हरा ! हरा ! ' (हरहर) या सिंहनादाचाच अपभ्रंश होय, असे मि. **पोकॉक** याचे म्हणणे आहे ! (India in Greece, पृ. ११४.) ब्रिटनातील ' स्टोन हेज ' नावाचे इमारतींचे प्राचीनावशेष हे या **बौद्धधर्मीय** लोकांचेच होत. ड्रुइड–द्रुइद–द्रुइ-देश–द्रुह्यदेशीय अशी यांची पीठिका असावी, असे कित्येकांचे अनुमान आहे. द्रुइद लोक अर्धचंद्र चिन्ह वापरीत यावरून ते इंदुवंशीय असावे असे **पोकॉक** प्रभृतींचे म्हणणे आहे. **रोमन** लोकांनी **ब्रिटन** जिंकल्यानंतर हे द्रुइद लोक ' आइल ऑफ मॅन ' मध्ये जाऊन राहिले त्या नावाचे प्राचीन रूप ' ओइल ऑफ मान ' किंवा ' मॉनचे बेट ' असे होते. ' मान ' —Sans असा अर्थ असून तो संस्कृत ' मुनी ' सारखाच आहे. अर्थात् , आइल ऑफ् मन ' म्हणजे द्रुइदांचे ' मुनिद्वीप ' च होय ! कित्येक **पाश्चात्य** पंडितांनी ' **कॉल्टिक** ' व ' **संस्कृत** ' भाषांचे व त्यांतील प्रयोगांचे विलक्षण साम्य

दाखवून त्या भाषा बोलणाराचा निकट संबंध सिद्ध केला आहे. हिंदुस्थानातून जाऊन ब्रिटनात वसाहत केलेल्या प्राचीन हिंदूंचेच द्रुइड लोक हे उपाध्याय होते. असे मत गॉडफ्रे हिगिन्स या ग्रंथकाराने "Celtic Druids" या ग्रंथात सप्रमाण प्रतिपादले आहे.

१० पूर्वआशिया—भरतखंडातून पूर्वदिशेकडे गेलेल्या वसाहतींनी ब्रह्मदेश, कांबोडिया, जावा-सुमात्रादि बेटे, चीन, आष्ट्रेलिया व दक्षिण अमेरिकेतील पेरू वगैरे देश व्यापले होते. ब्रह्मदेशातील लोकांच्या चालरीती, धर्मनीति व समाजव्यवस्था याचे जसे चिनी तसेच हिंदी संस्कृतीशीही साम्य आहे. ब्रह्मी लोक मूळचे भरतखंडातले म्हणून व बौद्ध धर्माचा प्रसार चिनात झाल्यापासून त्याशी निकट संबंध आल्यामुळे ब्रह्मी लोकात या दोन्ही संस्कृतींचे मिश्रण झालेले आढळते. मुसलमानी अंमलानंतर हिंदुसमाजात जारीने सुरू झालेली सक्त पडद्याची चाल ब्रह्मी लोकात न शिरता ते निजपासून अलिप्तच राहिले, याचे तरी कारण हेच होय. मनुस्मृतीवरील एक विस्तृत टीका हा ब्रह्मी लोकाचा धर्मशास्त्र ग्रंथ असून त्यास ते 'धर्मसाथ' म्हणतात असे आवा येथील ब्रह्मी राजाकडे गेलेले इंग्रज वकील सिम यानी लिहिले आहे. तिबेटी व ब्रह्मी संस्कृतींचा उगम भरतखंडातच आहे, असे विल्सनसाहेबही म्हणतात. जसा ब्रह्मदेश तसाच कांबोडिया हा शब्दही उघड उघड संस्कृतोत्पन्न आहे. 'कांबोज' पासूनच 'कांबोडिया' रूप बनले आहे एरियन नामक ग्रीक इतिहासकाराने 'कंबिस्थोली' असे एका जातीचे नाव दिले आहे. त्याचे मूळरूप अर्थातच 'कंब-स्थळ' असे असले पाहिजे. अर्थात् या कंबस्थळातील लोकानी कंबजानी-कांबोजानी-कांबोडियात वस्ती केली असली पाहिजे. (Wilsons Vishnu purana, Vol. II. पृ १८२.) सदरहू कांबोडियात १८८२ साली एका मोठ्या हिंदु देवालयाचे अवशेष एका फ्रेंच शोधकाने जमिनीतून उकरून काढले. चीनची वसाहतही मूळची हिंदुस्थानातील लोकांनीच केली. चीन व तातर या तील प्राचीन वंशावळीत मूळ पुरुष 'अवर' हा दिलेला असून तो पुरूरव्याचा पुत्र होता. (राजस्थानचा इतिहास, Vol I. पृ. ३५) फोहो नामक पुरुषाबरोबर चिनी लोकांचे प्राचीन पूर्वज ख्रि. पू. २९०० चे सुमारास पश्चिमकडील डोंगराळ व उंच प्रदेशातून येऊन चिनात वसती करून राहिले, असे 'शू-किंग' नामक चिनी ग्रंथात लिहिले आहे. अर्थात् चीनची वसाहत काश्मीर, लदक, तिबेट व पंजाब येथील लोकांनी वसाविली असे

दिसूल येते. चिनी लोकांचा धर्म व संस्कृति याचा उगम भरतखंडातच आहे हें सांगावयास नकोच; खुद्द 'चीन' हें नाव संस्कृतच असून बायबलात त्याचें रूप 'सिनिम' असें आढळते. 'मगध' शब्दाचे चिनी रूपांतर 'मो-किआतो' असे झालें आहे. मगधाच्या राजधानीस कुसुमपूर व पाटलीपुत्र अशी दोन नावे होतीं. यांचीं 'किआ-सो-मो-पानलो' व 'पाटोली-त्से' अशीं रूपांतरें चिनी लोकांनीं केलीं. शेवटल्या शब्दांतल्या 'त्से' पदाचा अर्थ 'पुत्र' (मुलगा) असाच आहे. (रॉयल ए. सो. जर्नल, Vol. V.) नावांचीं रूपांतरें किंवा अपभ्रंश करताना चिनी लोकांनीं अशी भाषांतरें केल्यामुळे मूळचें नावाचा संस्कृत मागमूस उरलेला नाहीं. चीन व हिंदुस्थान याचा फार प्राचीन कालापासून संबंध होता, याबद्दल हवे तितके पुरावे आहेत. कालीदासाने रेशमी वस्त्र या अर्थी 'चीनांशुक' असा योजलेला शब्द सुप्रसिद्धच आहे. चिनी दरबारात हिंदुस्थानातून अनेकदा वकील आल्याचे उल्लेख जुन्या चिनी इतिहासकारांचे ग्रंथात आहेत.

अमेरिकेतील पेरूकडे जाणाऱ्या लोकांनीं आरंभीं जावा व सुमात्रा द्वीपसमूहात वसती केली होती. हे लोक सूर्य-सूर्यवंशीय क्षत्रिय-होत; आपण त्यांच्या पुराणकथा व ऐतिहासिक वीरकथा अजूनही तिकडील देवालयात चित्रित केलेल्या व ग्रंथात लिहिलेल्या आढळतात. कलिंगातील ब्राह्मणादि लोकांनी प्रथमतः जावाबेटात वसती करून मूळचे लोक सुधारून राज्ये स्थापलीं. तेथे त्यांचा जुना शक अद्याप चालू असून त्याचा आरंभ इ. पू. ७५ हा आहे. (एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास, पृ. १६८.) या बेटातील दुसरी वसाहत सातव्या शतकाचे आरंभीं गुजरथेतील एका राजाने केली; त्याजबरोबर आरंभी ५००० व मागाहून २००० लोक तेथे रहावयास गेले. त्यांचा धर्म बौद्ध होता व त्यांनीच त्या बेटात या धर्माचा प्रसार केला. (रॉयल एशि. सोसा. चे जर्नल, १९०६ पृ. ४०२) चौथ्या शतकात या बेटात प्रवास केलेल्या चिनी प्रवाशांसही तेथे हिंदूंचाच वसती आढळली. या बाजूचे सर्वात मोठें बेट बोर्निओ हे आहे. हिंदुपुराणांतील कथाप्रसंगांची शेंकडों कोरलेली अनेक देवळें या बेटांतील अंतर्भागीही आढळतात. बिनाबालुन ४०० मैल आत असलेलीं देवालये तर फारच श्रेष्ठ शिल्पकलेचीं दर्शक आहेत. जावाचे पूर्वेस असलेल्या 'बली' द्वीपांत तर अद्यापही प्राचीन हिंदु वसाहतवाल्यांचे वंशज रहात असून त्यांचे मध्ये भारत-रामायणाच्या कविभार्येतल्या प्रतीही आढळतात. आपला मूळपुरुष सर्वार गेदिंग हा

होता, व तो आपला मूळ धर्मसंस्थापक 'बेंतारा गुरु' याचा पुत्र होय, असे सेलिबीज बेटातले बुगीलोक सांगतात. धर्मसंस्थापकाचे वर्तुल नाव उघड भारतीय दिसत आहे. सुमात्रा बेटातही अंडरसन नामक मिशनऱ्यास अनेक जुनी हिंदु देवालयें व जुन्या भग्नमूर्ति आढळल्या. आस्त्रेलियात सापडणारे बरेच अवशेष भरतखंडाशी संबंध असलेले आढळतात. तेथील वानटी लोक 'बूमरंग' नावाचे एक लाकडी हत्यार वापरतात. याचा आकार बाकदार व एका टोकाकडे चपटा असून ते शत्रूस प्रहार करून फेकणाराकडे पुन्हा परत येतें! शत्रूस प्रहार करून पुन्हा वर्तुळाकार गतीने परत येणाऱ्या व भारतात वर्णिलेल्या बाणाची ही अगदीधोबड नक्कल असावी तथापि आस्त्रेलियात फार वर्षे न राहता भारतीय लोक तेथून निघून दाक्षण अमेरिकेत परदेशात गेले असावे, असे अनुमान आहे.

११. अमेरिका—प्राचीळ काळीं बहुतेक उत्तर अमेरिकाखंड दाट जंगलाने व्याप्त झालेले होते; पण मध्य व दक्षिण अमेरिकेची स्थिति तशी नव्हती. प्राचीन शहरें, किल्ले, पूल, तलाव, पाट, रस्ते याचे अवशेष बॅरन हंबोल्ट प्रभृति प्रवासी व इतर शोधक यास तिकडे इतके सापडले आहेत की, प्राचीन काळी या खंडात अत्यंत सुधारलेले लोक राहत होते, याबद्दल आता संशय राहिलेला नाही. या अवशेषाच्या शिल्पाचे स्वरूप भारतीय शिल्पपद्धतीशी फारच जुळून आहे. प्राचीन अमेरिकनाच्या धार्मिक चालीरीती व समजुती यातही असेच साम्य आढळते. (१) भारतीय लोक ज्याप्रमाणे धरित्री माता किंवा पृथ्वी माता ही एक देवता मानतात; त्याचप्रमाणे प्राचीन अमेरिकन मानीत. (२) बौद्ध, हिंदु व मारवाडी लोक ज्याप्रमाणे बुद्ध, कृष्ण व अजयपाळ याच्या दगडावर उमटलेल्या पावलांची पूजा करतात, तीच तऱ्हा मेक्सिकन लोकात आहे. (३) ग्रहणकाली राहु व केतु, चंद्र-सूर्यास गिळतात. ह्या इकडच्या कल्पनेप्रमाणेच अमेरिकनाची समजूत असून त्याचा राहु-केतु 'माल-ओयो' नावाचा आहे. (४) इकडील शिव, काली याचेप्रमाण अमेरिकन धर्मसंस्थापकांचे व इंद्र यायाचे चित्रातही गळ्याभोवती सर्पाची वेटोळीं काढतात. (५) 'गज वदन गणेशाच्या मूर्तीची पूजा मेक्सिकन लोकातही आढळते. हा प्रकार पाहून बॅरन हंबोल्ट यानी असे लिहिले आहे की, 'It presents some remarkable and apparently not accidental resemblance with the Hindus Ganesh' (हा मेक्सिकन देवता हिंदूंच्या गणेशासारखा थेट दिसत असून हें आश्चर्यकारक साम्य केवळ काकतालीयन्यायाने आलेले दिसत नाही.) (६) जलप्रलयाची कल्पना अमेरिकनातही आहे. (७) पृथ्वी एका प्रचंड

कूर्माचे पाठीवर असून हें कासव समुद्रावर पोहत आहे व हे जेव्हा समुद्रात बुडते, तेव्हा पृथ्वीवर जलप्रलय होतो, ही कल्पना उत्तर अमेरिकेतील इंडियनात आहे. (८) सर्प व नाग यांची पूजा हिंदु व प्राचीन अमेरिकनातच नव्हे तर इजिप्शी, असिरियन, ग्रीक, चिनी व स्कांदिनीवियन या लोकांचेही पुराणग्रंथातूनही आढळते. प्राचीन अमेरिकन लोक पूर्वजन्म व पुनर्जन्मही मानीत. मूळच्या अमेरिकन लोकाचा पेहेराव हिंदुप्रमाणेच असून ते वाहाणाच वापरीत; त्याच्या स्त्रियांचा लुगडें नेसण्याची तऱ्हा तर थेट भारतीय होती म्हणतात ! दाक्षण अमेरिकेची ही वसाहत केव्हा झाली ते नक्की कळत नाही. पण ही वसाहत रामाचे कालानंतर केव्हा तरी झाली असली पाहिजे कारण पेरू देशातल्या मूळच्या अमेरिकनाचा मोठा उत्सव उत्तर हिंदुस्थानातल्याप्रमाणे रामलीलेचाच आहे. येवढेच नव्हे तर या उत्सवास ते ' राम-सित्वा ' असेच म्हणतात ! राम हा सूर्यवंशीय असून त्याच्या आईचे नाव कौसल्या व पत्नीचे नाव सीता, असेच पेरूवियन लोक सांगतात; हे पाहून सर विल्यम जोन्स-प्रभृति शोधकास फार आश्चर्य वाटून पेरूवियन लोकाचे मूळस्थान भरतखंड याबद्दल त्यास संशय राहिलेला नाही ! (Asiatic researches Vol. I, पृ, ४२६.)

मनुष्यजातीचे, निदान आर्यवंशीय लोकाचे, मूळस्थान हिंदुस्थानच असून येथूनच त्यांच्या वसाहती जगातील निरनिराळ्या देशात झाल्या, अशा उपपत्तीचे पुरस्कर्ते तिच्या समर्थनार्थ जे पुरावे पुढें आणतात, त्याचा गोषवारा आतापर्यंत वर दिला. भरतखंडातील प्राचीन पौराणिक परंपरा पाहिली तर तीही याच उपपत्तीस अनुकूल असलेली दिसून येते. ' पृथ्वीवरील सर्व मनुष्यानी आपापला सदाचार भरतखंडातील ब्राह्मणापासून समजून घ्यावा ' अशी जी मनूची आज्ञा (अध्याय २, श्लोक २०.) आहे, ती जगातील सर्व देशात चातुर्वर्ण्यविशिष्ट-निदान चातुर्वर्ण्य मानणारा-समाज अस्तित्वात होता त्या काळास अनुलक्षून केलेली आहे. पृथ्वीवरील दूर दूर देशांत पसरलेल्या शेकडो क्षत्रिय ज्ञातींचा ब्राह्मणाशी संबंध तुटला, त्याचा सदाचार व धर्माचारही सुटला व त्यामुळे या सर्व जाती आर्यधर्मास व समाजव्यवस्थेस अचवल्या. पण त्यांपैकी काहीं आर्यभाषा बोलणारे राहिले, इतर मात्र भाषाही म्लेच्छ बोलूं लागले व सर्व दस्यु बनले, असे आमच्या धर्मशास्त्रकाराचे मत आहे. एका प्राचीन संस्कृत ग्रंथकाराने

आर्येतर मुख्य भाषा पारसीक, यवन, रोमन व बर्बर या आहेत, असें लिहिले आहे. यांपैकीं पहिल्या तीन फारशी, ग्रीक व लातिन या होत; पण चौथी कोणती तें कळत नाही, असे मि. कोलब्रुक यांचें म्हणणें आहे. मनुस्मृति व महाभारत यात (मनु. अध्या. १०; म. भा. अनुशासन पर्व, अ. ३४; शांति-पर्व, अ. ६४; व हरिवंश.) अशा क्षत्रियजातींचा नामनिर्देश आला आहे. पौंड्रक, चौड, द्रविड, काम्बोज, यवन, शक, पारद, पल्हव, चीन, किरात, दरद, खश, कर्णिद, पुलिंद, उशीनर, कोलिसर्प, माहिषक, मेकल, लाट, कोन्वशिर, शौंडिक, दर्व, चौर, शबर, बर्बर, गांधार, तुशार, कंक, आन्ध्र, मद्रक, पुलिन्द, रमठ, केरल वगैरे, सुमारे ३२।३३ परदेशीय पण आचारभ्रष्ट आर्य क्षत्रियज्ञातींचा उल्लेख वर सांगितलेल्या ग्रंथात आला आहे. विष्णुपुराणात तर हूणादि इतर मिळून २०० जातींचा याद दिली आहे ! सगराने आपला पिता बाहुक याचे-बद्दल सूड उगविण्याकरतां सर्व हैहयवंशाचे लोक ठार मारले. शक, यवन, काम्बोज, पारद व पल्हव याजबरही हाच प्रसंग आला होता. पण ते वसिष्ठास शरण गेले; व त्याचे आज्ञेवरून सगराने वेदाध्ययन व वषट्कार यांचा त्यास मनाई केली. (अ. ३२६.) आणि यवनांनी शिर मुंडावे, शकांनी निमे डोके मुंडावे, पारदांनी डोक्याचे केस सबंध ठेवावे व पल्हवांनी दाढ्या राखाव्या, अशी सगराने आज्ञा केली, आणि त्यास आर्य समाजातून हाकून दिले, असे विष्णु-पुराणात वर्णन आहे. वरील पाचात कोलिसर्प, माहिष, दर्व, चोल व केरळ या आणखी पांच जातींचा समावेश करून हीच कथा हरिवंशातही दिली आहे. या वरील इतर जाति म्हणजे कोणत्या, त्यांचे अर्वाचीन वंशज कोण व त्यांनी कोणत्या देशात वसाहती केल्या, या संबंधाने अनेकांनी अनेक तर्क केले आहेत,पण सर्वांची निश्चित ओळख अद्याप झालेली नाही. यवन (ग्रीक), पल्हव (पेह-लवी भाषा बोलणारे मोडी), काम्बोज (काम्बोडियातले), चीन (चिनातले), वगैरे काही स्थळे मात्र निश्चित झाली आहेत. भारतीयांच्या प्राचीन पूर्वजास पृथ्वीची भौगोलिक स्थूल माहिती होती यात संशय नाही. ' सप्तद्वीपा वसु-धरा ' हे वचन महशूरच आहे. हीं द्वीपे म्हणजे जंबु, प्लक्ष, पुष्कर, क्रौंच, शाक, शाल्मलि व कुश हीं होत. येथे द्वीप म्हणजे बेट असा अर्थ नसून इंग्रजीत ज्यास (continent) किंवा मराठींत खंड म्हणतात, त्या अर्थी हा शब्द योजलेला आहे. जंबुद्वीपाचा एक लहान भाग भारतवर्ष आहे, असे सांगितले आहे, त्यावरून हेच सिद्ध होते. ह्या सात द्वीपांचीं वर्णने पुराणातून विस्तृत रीतीने

केलेलीं आहेत; पण त्याजवरून ही द्वीपे म्हणजे खंडे कोणतीं याचा बिनचूक उलगडा होत नाही. त्यासंबंधाने अनेकांनी अनेक तर्क मात्र केलेले आहेत पृथ्वीच्या साप्रतच्या अवस्थेचा भौगोलिक दृष्टीने विचार केला तर उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, आफ्रिका, आशिया-युरोप, आस्त्रेलेशिया आणि दक्षिण व उत्तर ध्रुवप्रदेश अशी सात खंडें होतील. आशिया-युरोप याचे भिन्नत्व भौगोलिक नसून भाषा व वर्ण या दृष्टीचेच आहे. या सात खंडासच वरील द्वीपांची नावे दिलेली आहेत, की ही द्वीपे आत जुनी असून जलप्रलयामुळे त्यातली काही बुडून व काहींचे स्वरूप बदलून हल्लीची खंडे निर्माण झाली आहेत, हे निश्चयात्मक रीतीने ठरविण्यास तूर्त काहीच साधन नाही.

भरतखंड हे मनुष्यजातीचे किंवा आर्यवंशाचे मूळस्थान नव्हे. त्याचे मूळस्थान मध्य आशिया किंवा उत्तर ध्रुव प्रदेशच होय, अशा उपपत्तींच्या पुरस्कर्त्यांचेच म्हणणें खरे आहे असे मानले किंवा सिद्ध झाले तरी भारतीयांचा इतर सुधारलेल्या परराष्ट्रांशी प्राचीनकाळापासून निकट संबंध आहे, ही गोष्ट संशय पुराव्यावरून सिद्ध होण्यासारखी आहे. रुदास रुस्राटान सगळे जग व त्यातील सर्व देश निकले होते, असे ऐतरेय ब्राह्मणात वर्णन आहे. 'त्रिदशा: समुद्रे या द्वीपा आसन पुरूरवा:' असे महाभारताचे आदिपर्वात वचन आहे; त्यावरून पुरूरव्याचा अमल समुद्रातील १३ बेटांवर चालत होता. असे कोणी अनुमान केले आहे. तसेच सगर व त्याचे ६० हजार पुत्र यांचे कर्तृत्वावरून, ह्या राजाचे सागरावर वर्चस्व असून त्याचे जवळ ६० हजार खलाशी होते, असा अर्थ कर्नल टॉड यानी काढला आहे (राजस्थानचा इतिहास, Vol. I. पृ. ६०२.) आणि पुराणकार्‍यी या राजाजवळ सर्व पृथ्वी जिंकण्यास जरूर इतके शूर शिपाई कोठून आले ? असा कोणी प्रश्न करतील. पण भारतीय युद्धात झालेला भयंकर संहार व त्यानंतर लवकरच भरतखंडातून बाहेर वसाहती करण्यास गेलेले लक्षावधि लोक, याचा विचार करिता भारतीय युद्धकाळाचे पूर्वी भरतखंडाची लोकवसती पुष्कळच अधिक होती, असे अनुमान करण्यास हरकत नाही. ब्रिटिश जनरल सर हॅमिल्टन यानी रूसो-जपानी युद्ध प्रत्यक्ष पाहून त्यासंबंधाने काही टिपणें प्रसिद्ध केली आहेत. त्यात ते लिहितात की, "There is material in North of India and in Nepal sufficient and fit, under good leadership to shake the artificial society of Europe to its foundation" (उत्तर हिंदुस्थानात व नेपाळात शूर व लढवय्ये जातीचे पुरेसे व लायक लोक

असून ते चांगल्या सेनापतीचे नेतृत्वाखाली दिले तर युरोपांतील कृत्रिम समाज-व्यवस्थेची इमारत पायापर्यंत गदगदा हलावितील !) सन १८८८ सालातील ' कॉंटेंपोररी रिव्ह्यू ' मासिकाचे जूनचे अंकांत मि. टौनशेंड यानी दिलेला अभिप्राय तर याहून स्पष्ट आहे. प्रशियातील सक्तीच्या लष्करी शिक्षणाची पद्धति हिंदुस्थानात अंमलात आणली, तर बेटें व स्थानिक सैन्य वगळून २५ लक्षाचे खडें सैन्य हिंदुस्थानात तयार होऊन त्यात दरसाल ८ लक्ष नवे लोक लष्करी शिक्षण मिळविण्यास येतील; असें कळवून मि. टौनशेंड म्हणतात कीं, " A force with which not only Asia but the whole world might be subdued " (या सैन्याचे बलावर आशियाखंडच नव्हे, तर सगळेच जग जिंकता येईल !) साप्रतच्या हिंदुस्थानवासीयाच्या संबंधाने जर ही स्थिति तर प्राचीनकाळच्या मुबलक लोकवसतीच्या क्षात्र काळात जग जिंकणे ही गोष्ट अशक्य होती, असे म्हणता यावयाचे नाही.

हा अतिप्राचीन काळ सोडून देऊन थोडे अर्वाचीन काळांत आल्यास प्लिनी नामक ग्रीक इतिहासकाराचे सांगण्यावरून असे कळते कीं, एका काळी इराणचा तीन चतुर्थांश भाग भारतीयांचे अंमलाखाली होता. इराणचा बराच मोठा भाग मासिडोनियन लोकानी हिंदूंस दिला होता, असे स्ट्रेबोही सांगतो. अफगाणिस्थानातील गझनी शहर गजसिंग नामक यादववंशीय राजानेच मूळ वसविले होते. व ही गोष्ट शहराचे नावातही स्पष्ट दिसते. जेसलमीरच्या यादव-वंशाच्या जुन्या बखरीतून असे सांगितले आहे कीं, भारतीय युद्धानंतर यादव-वंशीय लोक पश्चिमेकडे गेले, त्यानी गझनीपासून समरकंदपर्यंत राज्य स्थापिले; पण मुसलमानी धर्माचा उदय झाल्यावर त्याना पुन्हा सिंधुनदीचे अलीकडे येऊन वसती केली. मेवाडच्या राण्याचा मूळपुरुष बाप्पा रावळ याने चित्तोड येथे आपला राजवंश स्थापल्यावर खोरासानला जाऊन तेथेही राज्य स्थापिले. मुसल-मानी धर्म स्थापित होण्याचे सुमारास अफगाणिस्थान, इराण व मध्य आशियात हिंदूंचीच राज्ये होती, असे कर्नेल टॉड यानी (राजस्थानचा इतिहास, Vol. II. पृ. २२२–२३१.) अनुमान काढले आहे.

सेल्युकसचा वकील मेगस्थनीस, ॲंटिओकस व डायोनिशिअस याचा डिमे-कस व दुसऱ्या टॉलमीचा बासिलिस हे वर्कल चंद्रगुप्त व त्याचा मुलगा अमृत-घट याचे दरबारी आले होते. ख्रि. पू. २१० चे सुमारास ॲंटिओकस (थर्ड ग्रेट) यान यादवकुलातील सुभगसेन राजाशी संयोग–संधि केला होता; पण पुढे

दोघात वितुष्ट आले, व अखेर यादवराजाने अँटिओकसचा पराजय करून त्यास लढाईत ठार मारले. (राजस्थानचा इतिहास, Vol. II. पृ. २३०.) ग्रीकराजा सेल्युकस याने तर आपली कन्या चंद्रगुप्तास दिली होती. या ग्रीक राजकन्येबरोबर ग्रीसमधून अनेक तरुण व सुंदर दासी पाटलीपुत्रास आल्या होत्या. तेव्हांपासून या यवनीस दासी म्हणून ठेवण्याची चाल भारतीय राजांनी पाडली. या यवनी मोल देऊन आणीत किंवा खंडणी म्हणून घेत. नेहमी राजाबरोबर राहून त्यांची हरएक कामे या करीत. इराणचा राजा नशिरवान यानेही आपली मुलगी चितोडच्या महाराण्यास दिली होती. उज्जयिनीच्या राजाचा ऑगस्टसशी पत्रव्यवहार होता, असें जस्टिन नामक ग्रंथकार लिहितो. या ऑगस्टसला सामोस येथे भरतखंडातून आलेले वकील भेटले; व त्यांनी त्यास हत्ती, मोती व हिरे याचे नजराणे भारतीय राजातर्फे दिले. आणखी एकदा क्लॉडियसकडे हिंदुस्थानातून ४ वकील असेच आल्याचे प्लिनी सांगतो. याच वकिलाकडून प्लिनीला लंकेची माहिती कळली व ती त्याने आपल्या ग्रंथात लिहिली. ट्राजन व अँटोनियस पायस या रोमन बादशहाकडेही हिंदुस्थानातून दोनदा असेच वकील आले असून रोम व भरतखंड याचा हा दरबारी-संबंध इसवी सन ५३० पर्यंत अखंड चालला होता. पांड्याचे राज्याची स्थापना दक्षिण हिंदुस्थानात ख्रि. पू. ५ वे शतकात झाली. यानंतर काही वर्षांनी या राज्यातून एक वकील ऑगस्टसकडे आला व उभयतांची मुलाखत सिरियात झाली, असे स्ट्रेबो लिहितो. या वकिलाबरोबर एक ब्राह्मण अथेन्सला गेला होता; तेथें काही कारणाने या ब्राह्मणाने अग्निकाष्ठे भक्षण केली, तें पाहून ग्रीकास अत्यंत आश्चर्य वाटलें. सिरियाचा अँटिओकस, इजिप्तचा टोलमी फिलेडेल्फास, मसिडोनचा अँटिगोनस गोनेटस, कोरिनीचा मगस व एपिरसचा दुसरा अलेकझाडर, इतक्या ग्रीक राजांची नावें अशोकाचे शिलालेखात आलेली आहेत.

भारतीय युद्ध झाल्यानंतर भरतखंडात कलियुग सुरू होऊन त्याची अनेक बाजूंनी सारखी अवनति होत होती, तरीही त्याचेबद्दल बाहेरच्या जगात एक प्रकारचा पूज्यभाव, आदरबुद्धि व दरारा वाटत होता. पडल्या काळी सुद्धा अलेकझाडरचे स्वारीपर्यंत हिंदुस्थानाने अनेक परकीयांच्या मोहिमास दाद दिली नाही. असिरियाचे साम्राज्याच्या वैभवाचा कळस सेमिरामिस राणीचे काळी झाला. तिने तीन वर्षे जंगी तयारी करून हिंदुस्थानावर स्वारी केली. तिज-

बरोबर ३ लक्ष पायदळ, ५ लक्ष स्वार व २००० नावा असून उंटाच्या पाठीवर घालून तिने पुष्कळ कृत्रिम हत्तीही बरोबर घेतले होते म्हणतात ! पण अखेर ह्या सैन्याचा पूर्ण मोड होऊन त्यातले पुरें ३ सैन्यही परत गेलें नाही ! कित्येकांचे मते सेमिरामिस राणीही याच लढाईत मारली गेली. अलेकझांडरशी लढण्यात भारतीयांनी कसा पराक्रम दाखविला आणि अखेर आपसातील फूट व भाऊबंदकी यांनी ग्रस्त झाल्यामुळें भरतखंड परकीय सत्तेखालीं कसे गेलें, त्याचे वर्णन पूर्वी एका प्रकरणात केलेच आहे.

भारतीयांची भाषा, लिपी व वाङ्मय.

जगातील कोणत्याही राष्ट्री लोकाच्या जीवनक्रमाकडे पाहिलें असता असे दिसून येतें की, त्यांचेमध्ये भाषा अगदीं आरंभी उदयास येते. भाषेतील भिन्न-भिन्न ध्वनींची भिन्नभिन्न चिन्हे कल्पून भाषेची लिपी बनावयास बराच काळ लोटावा लागतो. हा काळ लोटून लिपी बनली म्हणजे तो समाज संस्कृतींत बराच उच्च दर्जास पोंचला आहे, असें खास समजावें. भाषा व लिपी याचा हा प्रचार पुष्कळ काळ चालू राहिला म्हणजे त्या लोकांत हळूहळू वाङ्मय निर्माण होत जाते. सारांश: कोणत्याही राष्ट्राची संस्कृति, बुद्धिवैभव व मोठेपणा याचे नक्की मोजमाप करावयाचे असल्यास त्याची भाषा, लिपी व विशेषतः वाङ्मय यांची रचना, स्वरूप व योग्यता ठरविणें हें एक मुख्य व अचूक साधन आहे. राष्ट्राची विद्वत्ता, शहाणपण, संस्कृति, विद्याकला व सुधारणा या सर्वांची नोंद वाङ्मयात झालेली असते; वाङ्मय हे राष्ट्राच्या बुद्धिवैभवाचे व मनोरचनेचे स्पष्ट चित्र असते; आणि राष्ट्राचे विचार, उच्चार व आचार ही त्याच्या वाङ्मयात आरशाप्रमाणें स्पष्ट पहावयास सापडतात. म्हणूनच राष्ट्राची बरीवाईट स्थिति आणि त्याच्या संस्कृतीचा दर्जा व स्वरूप ठरवितांना त्याची भाषा, लिपी व वाङ्मय यांचाच विचार समाजशास्त्रवेत्ते व इतिहासकार नेहमी प्रथमारंभी करीत असतात. भारतीयांची संस्कृत भाषा, लिपी व वाङ्मय आणि तिजपासून निर्माण झालेल्या हिंदुस्थानातील अनेक देशी भाषा, लिपी व वाङ्मये यांची जगातील कोणतीही प्राचीन व अर्वाचीन भाषा, लिपी व वाङ्मय यांशीं तुलना करणारास भारतीयाच्या श्रेष्ठत्वाचा सहज व तात्काळ प्रत्यय पूर्वी आलेला आहे व पुढेही येईल.

संस्कृत वाङ्मयाच्या युरोपियन पंडितात सर विल्यम जोन्स हे बुद्धीची कुशाग्रता व मर्मज्ञता या गुणात सर्वांहून श्रेष्ठ होते. ते संस्कृत भाषेसंबंधाने

लिहितातः—" संस्कृत भाषेचे स्वरूप व घटना हीं आश्चर्यकारक असून तिची रचना ग्रीक भाषेहून परिपूर्ण व तिची शब्दसंपत्ति लॅटिनहून जास्त आहे, आणि शिवाय या दोहोहूनहीं तींत अद्वितीय सुसंस्कृतता आहे. (More perfect than the Greek, more copious than the Latin and more exquisitely refined than either. Asiatic Researches, Vol I. पृ. ४२२). संस्कृत भाषेइतके दीर्घ समास जगातील कोणत्याही भाषेत नाहींत, कित्येक समास तर १५६ अक्षराचे आहेत ! " (Asiatic Re. Vol. I. पृ. ३६०). अनेकभाषाकोविद प्रो. बॉप् लिहितात कीं, " ग्रीक व लॅटिन भाषाहून संस्कृत भाषा अधिक परिपूर्ण व शब्दसंपन्न असून त्या दोहोहून तींत सौंदर्य व वक्तृत्व जास्त भरलेलें आहे. " (एडिंबरो रिव्ह्यू, व्हा ३३, पृ. ४३). प्रो. मॅक्समुल्लर म्हणतात कीं, " संस्कृत ही भाषांची भाषा (Language of Languages) आहे ! ज्योतिषाशीं गणिताचा जो संबंध तोच संस्कृत भाषेचा भाषाशास्त्राशीं आहे, हें विधान अगदी खरें आहे. " (Science of Language, पृ. २०३.). सदरहू प्रो. बॉप् यानीं सन १८४८ साली संस्कृत व इतर आर्य भाषा यांचे तुलनात्मक व्याकरणावर एक ग्रंथ लिहिला, तेव्हापासूनच पाश्चात्यांचे तौलनिक भाषाशास्त्र निर्माण झालें. अर्थात्, संस्कृत भाषा व वाङ्मय यांचा युरोपियनास परिचय झाल्यामुळेंच हें शास्त्र जन्मास आलें आहे, हीं सर विल्यम हंटर यानीं दिलेली कबुली (गॅझिटियर, इंडियन, पृ. २६४.) यथार्थच आहे. प्रो. हीरन लिहितातः—" जगांत अत्यंत संपन्न व सुसंस्कृत अशा ज्या भाषा आहेत, त्यात संस्कृत भाषेची गणना केली पाहिजे. शिवाय या भाषेची वाङ्मयसंपत्तिही फार मोठी आहे. तिच्यांतील काव्यें जितकीं मनोहर व सुंदर आहेत, तितकेंच तिच्यातील तत्त्वज्ञानविषयक वाङ्मयही संपन्न आहे; कारण अत्यंत सूक्ष्म अमूर्त कल्पनाचे निदर्शक असे हजारों पारिभाषिक शब्द त्यात आहेत ! " (Historical Researches, Vol. II. पृ. १०९-११०) संस्कृत भाषेच्या लॅटिनहून श्रेष्ठ अशा शब्दसंपन्नतेचा गौरव करतांना लोपेरा पाओलिनो नामक ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं," या भाषेत एकाच वस्तूचे दर्शक अनेक शब्द असे आहेत. उदाहरणार्थ; सूर्यवाचक ३०, चंद्रवाचक २०, गृहवाचक २०, दगड या अर्थी ६, पर्णवाचक ५, कविवाचक १० व गाईचे वाचक ९ वेगवेगळे शब्द आहेत ! " पाओलिनोच्या या मतावर टीका करून मिल्ल इतिहासकारानें हिंदूंविषयींचा आपला दुराग्रह व भ्रष्ट अभिरुचि प्रगट

केली आहे. " एका वस्तूचा दर्शक एकच शब्द असावा, जास्त असूं नये, हा भाषेचा मोठाच गुण मानला पाहिजे. " असे हे साहेब म्हणतात. पण यावर प्रो. विल्सन याचा असा सवाल आहे का " भाषेत एकवस्तुवाचक अनेक शब्द आहेत म्हणजच तींत सौंदर्य, विविधता, सौष्ठव व ओज येते. याऐवजी भाषेत एका वस्तूचा वाचक एकेकच शब्द असता तर तींत काव्य, वक्तृत्व, वाङ्मय, बुद्धिविलास यापैकी काय घरे शिल्लक राहील ? " (रमेशकृत हिंदुस्थानचा इतिहास. Vol. II. पृ. ९१) सुप्रसिद्ध जर्मन पंडित श्लेजेल लिहितात की, ' संस्कृत भाषा खरोखरच ' सुसंस्कृत ' व परिपूर्ण आहे. घटना व व्याकरणनियम आणि शब्दसंपत्ति यामध्ये ती ग्रीक भाषेसारखीच आहे; पण तिची रचना ग्रीकहून अधिक प्रमाणबद्ध व म्हणून जास्त सरस आहे. ग्रीक भाषेचे घटनासौंदर्य आणि कोणताही अर्थ थोड्या शब्दात बिनचूक सांगण्याचे लॉटिनचे सामर्थ्य संस्कृत भाषेत आहे. शिवाय तिचे मूळ धातु फारशी व जर्मन भाषेतल्या धातूंशी साम्य असून या दोनही भाषांतील उत्साह व ओज हीं तिजमध्ये आहेत. ग्रीक भाषेची शब्दसंपन्नता, रोमनचे गांभीर्य व ओज आणि हिब्रू भाषेतील दैवीस्फूर्ति हीं संस्कृतात आहेत. व्याकरणग्रंथांची प्रमाणबद्ध घटना आणि परिपूर्ण नाद या दृष्टीनें विचार करता संस्कृत भाषा ग्रीक व लॉटिनहूनही श्रेष्ठ ठरते. " श्लेजेलकृत (History of Literature, पृ. १०५, १०८, १०९). मि. टेलरनामक ग्रंथकार लिहितो. " अनेक राज्यक्रांत्या व कालपरिवर्तने आली तरीही, हिंदुस्थानात संस्कृतसारखी अद्वितीय, संपन्न व विविधस्वरूपी भाषा कायम आहे. युरोपांतील ज्या लॉटिन, ग्रीक वगैरे भाषास आम्ही ' क्लासिकल ' (अभिजात) मानतो, त्या सर्वांची ती जननी आहे, व तींमुळेच ग्रीक भाषेतील लवचिकपणा व रोमन भाषेतील ओज यांचा उगम संस्कृतांतच आहे, हीं गोष्ट जेव्हा युरोपला प्रथमतः कळून आली तेव्हा ते आश्चर्याने थक्कच झाले. " (रॉ. एशि. सोसा. जर्नल, Vol. II. १८३४).

" पश्चिम आशिआखंडातील सर्व प्रकारच्या वर्णमालाचा उगम ' देवनागरी ' लिपीतच आहे " असे सर विल्यम जोन्स हे लिहितात (Asiatic researches, Vol I. पृ. ४२३). अर्थात् भारतीयांचें तत्त्वज्ञान, विद्वत्ता व संस्कृति यांचा तिकडे व पुढे युरोपात प्रसार होण्यास वर्णमालाचा हा संबंधच कारणीभूत झाला. जगांतील ज्या भाषास इंडोयुरोपियन ही संज्ञा आहे, त्या सर्वांची जननी

संस्कृतच आहे. या भाषातले मूळ धातु व इतर आवश्यक शब्द **संस्कृतपासूनच** निघाले आहेत. **इंडो-युरोपियन** भाषांतील जो काही भाग सर्वांत सारखा आहे, तो त्यास **संस्कृतपासूनच** मिळालेला आहे. **ग्रीक** व **इराणची** प्राचीन भाषा **झेंद** या **संस्कृतापासूनच** झाल्या आहेत, असे मि. **पोकॉक**, डा. **प्रिचर्ड** व प्रो. **हीरन** याचे मत आहे. **झेंद** भाषेच्या कोशांतल्या प्रत्येक दहा शब्दांत निदान ६।७ शब्द **संस्कृतोत्पन्न** आहेत ! एकापासून दहापर्यंतच्या अंकांची जुन्या भाषांतील नावेही **संस्कृतोत्पन्नच** आहेत.

संस्कृत.	**लॅटिन.**	**ग्रीक.**
एक	युन्	हेन
द्वि	दु	दु
त्रि	ट्रि	ट्रि
चतुर	क्वाटुर	तसर
पंच	क्विक	पेंट
षष्ठ	सेक्स	हेक्स
सप्त	सेप्तम	हप्त
अष्ट	आक्टो	ओक्टो
नव	नोवेम	एनया
दश	डेसेम	डेका.

संस्कृत.	**झेंद.**	**ग्रीक.** (डोरिक)	**लॅटिन**
प्रथम	फ्रथेमा	प्रोटा	प्रायमा
द्वितीय	बित्य	दूटेरा	आल्टेरा
तृतीय	थ्रित्य	ट्रिटा	टार्शिया
चतुर्थ	तुर्य	टरटार्टा	क्वार्टा
पंचम	पुम्धा	पेम्पटा	क्विंटा
षष्ठ	क्षत्व	हेक्टा	सेक्सटा
सप्तम	हप्तथ	हेब्डोमा	सेप्तिमा
अष्टम	अंथ्मा	ओगडोआ	आक्टेव
नवम	नौमा	एनोटा	नोवा
दशम	दशेमा	डेकाटा	डेसिमा

इतर काहीं शब्दांचीं व रूपांचीं साम्यें पुढील कोष्टकावरून कळून येतील.

संस्कृत.	झेंद.	ग्रीक.	लॅटिन.
तिष्ठामि	हिस्ठामि	हिस्टेमि	स्टो
तिष्ठति	हिस्ठोति	हिस्टेटि	स्टाट
ददामि	दधामि	डिडोमि	डो
ददति	दधैति	डिडोटि	डाट
अस्मि	अहमा	एमि	सुम्
अस्ति	आइ	एस्टि	एस्ट
भरामि	बरामि	फेरो	फेरो
भरंति	बरैन	फेरेई	फर्टे
वहाम	वझामि	एको	वेहो

संस्कृत.	लॅटिन.	संस्कृत.	लॅटिन.
स्थातुं	स्टेटम्	अक्तुं	अक्टम
दातुं	डेटम	स्थानेतुं	सोलिटं
जातुं	नोटम	वामतु	व्होमिटं
पातुं	पोटम्	पेटृ	पिष्टं
एतुं	इटम	जानितुं	जोनिटं

मागाशी आंत प्राचीनकाळी जगातील सर्व आर्यजाति संस्कृत भाषा बोलत असून साम्यतेच्या सर्व आर्यभाषांची जननी संस्कृतच आहे, ही गोष्ट सर्व प्रमाणांनी सिद्ध होत असून ती डो बालेंटाइन प्रो. बॉर्, डुर्येइस, मिस कार्पेन्टर, मेक्स म्युलर वगैरे शोधकांनी व पंडितांनीही मान्य केली आहे.

भारतीयांची असामान्य वाक्शक्ति आणि त्यांची आश्चर्यकारक कल्पनाशक्ति या दोहोंच्या सहाय्याने त्यांनी संस्कृत भाषा निर्माण केली. ह्या भाषेची पुढें इतकी वाढ झाली की, त्याच्या बुद्धिवैभवास व बुद्धिविलासास ती सर्वतोपरी साजूं लागली; इतकेंच नव्हे तर संस्कृत वाङ्मयांत अद्वितीय सुसंपन्नता, व्यापकता व उदात्तपणा उत्पन्न करण्यासही या भाषेचे फारच साहाय्य झाले. या भाषेची वाढ व परिणति शास्त्रशुद्ध पायावर प्रमाणबद्ध झाली असल्यामुळे जगांतील कोणत्याही जुन्या नव्या भाषापेक्षा ती अधिक परिपूर्ण असून 'देववाणी' हे तिला मिळालेले नाव नावाचे नसून सर्वार्थी सार्थच आहे. संस्कृत भाषेचे हे अद्वितीय स्वरूप पाहून ही भाषा कधीं काळी सामान्य लोकांच्या बोलण्यातली नसून अर्वाचीन 'एस्परंटो' भाषेप्रमाणें ही ब्राह्मण पंडितांनी कृत्रिम बनविली

असावी, असेही अनुमान पाश्चात्य पंडित काढीत असत, परंतु हा त्यांचा निव्वळ भ्रम किंवा दुराग्रह असून पाणिनिकाली व तत्पूर्वी संस्कृत ही भाषा सामान्य लोकाच्याही नित्य व्यवहारातली होती असे पंडित श्यामजी कृष्णवर्मा यानी सन १८८१ साली बर्लिन येथे भरलेल्या ओरिएंटालिस्ट काँग्रेसपुढे वाचलेल्या निबंधात सिद्ध केले आहे. संस्कृत भाषेला 'मृत भाषा' असेही कोणी कोणी म्हणतात; पण त्यातही फारसे तथ्य नाही. हिंदुस्थानातल्या हिंदी, बंगाली, मराठी वगैरे निरनिराळ्या देशी भाषा संस्कृतांचीच रूपांतरे आहेत हा शोध सोडून दिली, तरी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जुन्या परंपरेने पाळत होंच भाषा आपसातील संभाषणात व पत्रव्यवहारात उपयोजीत आहेत ही गोष्ट प्रसिद्धच आहे. मॅक्स म्युलर म्हणतात.—(India. what can it teach us ? प. ७८. ७९). " हिंदुस्थानच्या भूत व वर्तमान काळात इतकी पूर्ण संगति व सातत्य आहे की अनेक सामाजिक कार्ये, धर्मकार्ये व राज्यकार्ये झाल्या तरी अद्याप हिंदुस्थानात सर्वत्र बोलली जाणारी संस्कृत हीच भाषा आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. इंग्रजी राज्य व इंग्रजी विद्या यांचा प्रसार होऊन एका शतकाहून ज्यास्त काळ प्राप्त लोटला आहे, तरीही डाट करवीचे काळी युरोपात लॅटिनचे जितका प्रचार होता त्याहून अधिक प्रचार संस्कृत भाषेचा अद्यापही हिंदुस्थानात आहे.

भाषा व लिपी यांचा परस्परसंबंध कोणता, हे आरंभी थोडक्यात सांगितलेच आहे. आकाशातील सूर्य या वस्तूचा 'सू' व 'र्य' या दोन संयुक्त ध्वनींचा लागोपाठ केलेला उच्चार हा निदर्शक ऊर्फ प्रतिनाधि होय. पुनः या दोन ध्वनींच्या उच्चाराची 'सू' व 'र्य' या दोन अक्षरांना बनलेली संयुक्त आकृति निदर्शक ऊर्फ प्रतिनिधि होय. म्हणजे देव, त्याची मूर्ति व मूर्तीचे चित्र यांचा जो परस्परसंबंध तोच—मूळ वस्तु, वाङ्मयात्मक शब्द व वर्णात्मक शब्द यामध्ये आहे. ध्वनि व वर्ण किंवा भाषा व लिपी यांचा हा संबंध लक्षात आणल्यास शास्त्रीय दृष्टीने कोणती लिपी किंवा वर्णमाला श्रेष्ठ व निर्दोष आणि कोणती कनिष्ठ व सदोष यांची कोणासही सहज कल्पना करता येईल. लिपीमध्ये पहिला गुण हा असला पाहिजे की, भाषेत जितके मूळ ध्वनि असतील तितकी अक्षरे किंवा वर्ण लिपीत असले पाहिजेत. हा गुण देवनागरी लिपीत पूर्णपणे आहे. म्हणजे संस्कृत भाषेत स्वरात्मक व व्यंजनात्मक मूळ ध्वनि अनुक्रमे १३ व ३३ आहेत, तर तिच्या लिपीतही तितकेच वर्ण आहेत. इंग्रजी लिपी या दृष्टीने फार सदोष

आहे; कारण तींतील ४३ भिन्न भिन्न मूळ स्वनांचे चिन्हीकरण फक्त २६ च वर्णांवर भागवावे लागले! या एका दोषामुळेच इंग्रजी व इतर सर्व युरोपियन लिपींत दुसरेही अनेक दोष उत्पन्न झाले आहेत. लिपीमध्ये दुसरा गुण हा पाहिजे की, एका स्वनाचे दर्शक एकच चिन्ह किंवा वर्ण असला पाहिजे; व अर्थातच एका चिन्हाचा एकच उच्चार झाला पाहिजे. देवनागरी लिपींत 'क' स्वनाचा दर्शक 'क' हा एकच वर्ण आहे, व 'क' या वर्णाचा अन्य स्वनि किंवा उच्चार कदापि होत नाहीं. आतां या गुणाच्या दृष्टीने इंग्रजी वर्णमाला किती सदोष आहे पहा. पहिली गोष्ट ही की, इंग्रजी वर्ण स्वनांचे मानाने एकीकडून अपुरे आहेत तर दुसरी कडून जास्तीहून ज्यास्त आहेत. उदाहरणार्थ: C या इंग्रजी अक्षराचे 'स' या स्वनाचे कार्य S ने होत आहे; या वर्णाच्या 'क' स्वनाचे कार्य K ने होत आहे व X या वर्णाच्या 'क्स' या स्वनाचे कार्य KS या वर्णांनी होत आहे. अर्थात C व X हे वर्ण इंग्रजी वर्णमालेत फालतु आहेत' असा फालतु वर्ण देवनागरीत मुळीच नाहीं. इंग्रजींत g चा उच्चार कधी 'ग' होतो तर कधी 'ज' होतो' इंग्रजीतील a, e, i, o, u, या स्वरांच्या उच्चारसंबंधाने तर अतिशयच घोटाळा आहे. a या वर्णाचे उच्चार अ, आ, ऑ, ए वगैरे अनेक होतात' पुढच्या स्वराचाही हाच प्रकार. but बट का' व put पुट का' हे प्रयोग तर सुप्रसिद्धच आहेत! देवनागरी लिपीत असला गोंगळेपणा मुळीच ठेवलेला नाहीं. इतकेच नव्हे तर प्रत्येक स्वनास एक वर्ण निश्चित व कायमचा करून दिलेला आहे. अ, आ इ व उ या मूळस्वरांचेच नव्हे तर त्यांच्या दीर्घांचीं आणि ए, ऐ, ओ, औ या संयुक्त स्वरांचीही वेगळीं चिन्हे नियमित करून लिपींत ज्यास्त सुगमता व शास्त्रशुद्धता आणली आहे. इंग्रजीप्रभृति वर्णमालेचा क्रमही शास्त्रशुद्ध नाहीं; देवनागरीत आधी मूळ स्वर, नंतर संयुक्त स्वर, नंतर कंठापासून क्रमाने ओष्ठापर्यंतच्या अवयवांच्या साहाय्याने उच्चारली जाणारीं व्यंजने व पुढे इतर व्यंजने असा क्रम असून पुनः त्यातही मृदु, कठोर, महाप्राणादि शास्त्रीय भेद व क्रमही दाखविले आहेत. इंग्रजी वगैरे वर्णमालेत या प्रकाराचा अभावच आहे हे सर्व दोष लक्षात आणूनच डावडसन व ऑलकॉक या इंग्रज वैय्याकरणांनी " English alphabet is redundant, defective and inconsistant." (इंग्रजी वर्णमाला फालतु, सदोष व असंबद्ध आहे.) असा सूत्रात्मक अभिप्राय दिलेला आहे!

देवनागरी लिपीच्या श्रेष्ठत्वासंबंधाने विचार करताना भारतीय आर्यांस

लेखनकला केव्हापासून अवगत झाली, ह्या प्रश्नाचा पाश्चात्य पंडित वारंवार खल करीत असतात. युरोपियन सुधारणेचा उगम ग्रीक वाङ्मयापासूनच झालेला आहे; तेव्हा संस्कृत लिपी ग्रीक लिपीहून प्राचीन आहे, अशी कबुली देण्यास युरोपियन पंडिताचे मन बरेंच कचरते. पण या बाबतींत विशेष आश्चर्याची गोष्ट ही की, मॅक्स म्युलरसारख्या विद्वान्, शोधक व समदृष्टि पंडितान्याही बुद्धीची या बाबतींत चुकमूल झाली असून ख्रि. पू. ३५० च्या पूर्वी भारतीयास लेखनकला अवगत नव्हती, असे त्यानी विलक्षण प्रतिपादन केले आहे ! मॅक्स म्युलरखेरीज दुसऱ्या एकाद्या पंडिताने जर असे मत प्रतिपादिले असते, तर त्यास इतरानी वेड्यातच काढले असते ! ' भारतीयास लेखनकला फार प्राचीनकाळापासून माहीत होती ' असे प्रो. वेबर याचे मत आहे. (India : Literature पृ. ५) प्रो. विल्सन याचे मते तर भारतीयाची लेखनकला त्याच्या वाङ्मयाइतकीच प्राचीन आहे. (मिलकृत हिंदुस्थानचा इतिहास, पृ ४५). प्रो. हीरन याचेही असेच मत असून, ' प्राचीन काळी भरतखंडात लेखनकलेचा उपयोग शिलालेख, ताम्रपटापुरताच होत नसून लोकाच्या रोजच्या सामान्य व्यवहारातही तो होत असे ' असेही त्याचे म्हणणे आहे. (हीरनकृत Historical Researches Vol. II. पृ.२०२). " हिंदु लोकास लेखनकला ख्रि. पू. २८०० वर्षापासून अवगत असून, त्याजजवळ हस्तलिखित धर्मग्रंथ त्या काळापासून होते " असे कौंट जार्नस्टजर्ना म्हणतात (Theogony of the Hindus, पृ २६). वैदिक वाङ्मयातल्या ' प्रातिशाख्या ' च्या कर्त्यापुढे हस्तलिखित ग्रंथ होते, असे प्रो. गोल्डस्टकर, वोथलिंग, व्हिटने व रॉथ याचेही मत आहे.

प्रो. मॅक्स म्युलरप्रभृतींचे स्वपक्षसमर्थनाचे मोठे प्रमाण म्हणजे हे की, वेदास ' श्रुति ' हे नाव आहे; (श्रु ऐकणे) अर्थात् संहितांचे अध्ययन निव्वळ श्रुतिद्वारा तोंडी चालत असून, वेदकाळी लेखनकला माहीत नव्हती. पण असला कांटिक्स लढवूं लागल्यास ' स्मृ=आठवणें ' या धातूच्या अनुरोधाने स्मृतिकाळीही लेखनकला माहीत नव्हती, असे मानावे लागेल ! पण स्मृतिकारास लेखनकला अवगत असल्याचे स्पष्ट व निर्विवाद उल्लेख स्मृतिग्रंथातून शेकडों सापडतात. दुसरे असें की, लेखनकलेवाचून वाङ्मयाचे केवळ तोंडी अध्ययन होण्यास वाङ्मय पद्यमयच असावें लागते. पण मॅक्स म्युलर यानी ठरविलेल्या ख्रि पू. ३५० च्या पूर्वी संस्कृत वाङ्मयात शास्त्रीय विषयावरही किती तरी

ग्रंथ झालेले होते ! ' बेंली ' नामक ज्योतिष्याच्या गणितावरून ख्रि. पू. ३००० वर्षांच्या काळीं भारतीयांत ज्योतिष व भूमिति हीं शास्त्रें फार श्रेष्ठ पदास पोचली होतीं, असें सिद्ध होतें. प्रो. मॅक्स डेंकर यासही मॅक्स म्युलर याचें वरील मत मुळींच मान्य नाही. ' ब्राह्मण ' ग्रंथांचा काळ पाश्चात्य पंडित सामान्यतः ख्रि. पू. ८०० ते ३०० यांचे दरम्यानचा मानतात. " या ग्रंथांत ' शब्दा ' चाच नव्हे तर ' अक्षरा ' चाही जर उल्लेख आला आहे, तर ख्रि. पू. ८०० वर्षांच्या पूर्वीच वेदसंहितांचे हस्तलिखित ग्रंथ झाले होते व ते ' ब्राह्मण ' कर्त्यांच्या समोर होते असे मानावेच लागते." असें प्रो मॅक्स डेंकर लिहितात. (History of Antiquity, Vol. II. पृ १५६ १५७.)

ऑक्सफोर्डच्या बेलियल कॉलजचे ओरिएंटल लेक्चरर पंडित श्यामजी कृष्णवर्मा हे हिंदुस्थानसरकारचे प्रतिनिधि या नात्याने सन १८८३ साली ' लंडन ' येथे भरलेल्या ओरिएंटलिस्ट कांग्रेसला हजर होते. त्यानीं त्या वेळी याच विषयावर एक निबंध वाचून मॅक्स म्युलर प्रभृतींच्या तर्कांचे मार्मिक व व सप्रमाण खंडण केले आहे; व लेखनकला भारतीयांस वैदिककालापासूनच माहीत आहे, असे सिद्ध केले आहे. त्यांच्या विवेचनातील पहिला मुद्दा हा आहे की, पाणिनिकाळी व त्या पूर्वीही गद्य वाङ्मय बरेच निर्माण झाले होते; किंबहुना वैदिक वाङ्मयातील ऋग्वेदसंहिता खेरीजकरून इतर बहुतेक सर्व ग्रंथ गद्यात्मकच आहेत. अर्थात् यवढे विस्तृत वाङ्मय काही तरी कृत्रिम लेखनाचे साधन असल्याशिवाय कसे निर्माण झाले व कायम राहिलें, याचा खुलासा व्हावयास पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, यज्ञयागात लागणाऱ्या वेदी व कुंडे याच्या रचनेचे जे सूक्ष्म नियम सांगितले आहेत, त्यावरून व वेदांगज्योतिषावरून त्या काळी भूमिति, गणित व ज्योतिष ही शास्त्रेंही बरीच श्रेष्ठ दर्जास पोचली होतीं, असे स्पष्ट दिसून येते. मग भूमिति, गणित व ज्योतिष ही शास्त्रे लेखनकलेशिवाय इतक्या ऊर्जित दशेस कशीं आलीं, हे गूढ मॅक्स म्युलर-प्रभृतींसही उकलता यावयाचे नाही ! ' यत्र पंचत्वमापन्नो लेखकः सहसाक्षिभिः ' (दस्तऐवजाचा लेखक व साक्षीदार हे जिव्हा हयात नसतांना) असे कात्यायनाचे वचन आहे. नारद, याज्ञवल्क्य व इतर स्मृतींत दस्तऐवजाचा उल्लेख आला आहे. सूत्रकारास लेखनकला अवगत होती, असे खुद्द मॅक्स म्युलर यासही कबूल करावे लागले आहे. पण लेखनकला याहूनही प्राचीन आहे, असे दाखविता येते.

उत त्वः पश्यन्न ददर्श वाचमुत त्वः शृण्वन्न शृणोत्येनाम् ॥

असें ऋग्वेदात (मंडळ १० वे, सूक्त ७१।४) म्हटलेले आहे. " वाणीला पहात असूनहीं तीं एकाला दिसत नाहीं; व वाणीला ऐकत असून तीं दुसऱ्यास ऐकूं येत नाहीं—" (उदाहरणार्थ, निरक्षर माणसाने लेख पाहिला तरी तो न पाहिल्यासारखा होतो; तसेच वेदवचन ऐकलें तरी ते न ऐकल्यासारखेच असते, कारण त्याचा त्यास अर्थ कळत नाहीं.) असा या वचनाचा अर्थ आहे. ' वाणी पाहणे ' हीं पदें सार्थ होण्यास ह्या सूक्तरचनाकाळीं लेखनकला व ग्रंथ अस्तित्वात असणे जरूर आहे. लेखनकला ज्ञात होण्यापूर्वी ग्रीक लोकांत १० हजार आकड्यापर्यंतच संख्यावाचक पारिभाषिक शब्द होते, व रोमन लोकांत फक्त १००० पर्यंतच होते ! पण शुक्ल यजुर्वेदात दशलक्षापर्यंत संख्येची प्रत्यक्ष मोजदादच असून दश लक्ष, दश कोटि किंवहुना दश सहस्र कोटिसंख्येपर्यंत पारिभाषिक नावेंहीं आलेलीं आहेत. संख्याना अशीं नावे मिळणे व त्यांची मोजदाद होणे हीं गोष्ट संख्यावाचक कोणी दृश्य चिन्हे अस्तित्वात आल्यावाचून शक्य नाहीं. वैदिक वाङ्मयात ' काड व पटल ' असे शब्द ' भाग, प्रकरण, अध्याय या अर्थी येतात; त्यावरून हीं वाङ्मयास ग्रंथाचे रूप पूर्वीच प्राप्त झाले होते असे दिसून येते. पाणिनीचे काळीं अनेक हस्तलिखित ग्रंथ उपलब्ध असले पाहिजेत; कारण त्याखेरीज त्यास अष्टाध्यायीसारखे अद्वितीय व्याकरण रचताच आले नसते. शिवाय यास खुद्द अष्टाध्यायीतहीं पुरावे आहेत. अष्टाध्यायीतील ' अधिकार (प्रकरणाचे शिरोलेख) स्वरित दाखविलेले आहेत. यावरून पाणिनीने आपले व्याकरण तोंडी न सांगता लिहून काढले होते, असे सिद्ध होते. शिवाय, तीत ' अष्टकर्ण्या, पंचकर्ण्या ' गाईंचा उल्लेख आला आहे, अर्थात लोक आपल्या गाईंच्या कानावर खुणेसाठी आठ व पांच हे आकडे टांगीत, असे स्पष्ट दिसते. ' लिपि व लिबि ' या नाण्यांचा उल्लेख आणि ' लिपि व लिबि ' हे दोन शब्दही अष्टाध्यायीत आले आहेत; त्यावरून पाणिनिकाळापूर्वी पुष्कळ काळ लेखनकला प्रचारात येऊन चुकली होती असेच म्हणावे लागते.

भारतीयांच्या लिपीचे सौंदर्य ग्रीक लोक नेहमी वाखाणीत. (Strabo Lib, XV. पृ. ४९३) मेलाच्या नकाशावर अंतर व दिशाही दर्शविण्यासाठी भारतीय लोक अक्षराचा उपयोग करतात, असे मेगास्थानीस म्हणतो. ' भारतीय लोक झाडाच्या मऊ सालीवर लिहितात ' असे कर्टियस लिहितो. ' कापूस चोपून घट्ट करून त्यावर भारतीय लोक लिहितात ' असे नीरकस

म्हणतो. ' ख्रिस्ती शतकापूर्वीपासून आर्यावर्तात कापसाच्या कागदाचा उपयोग करीत आहेत ' असें फादर पॉटिनो याने लिहिले आहे. (Historical Researches, Vol. II. पृ. १०७).

संस्कृत भाषा व लिपी याचेप्रमाणेंच संस्कृत वाङ्मयासंबंधानेही युरोपियन पंडितांनीं आश्चर्याचे, आदराचे व आनंदाचे उद्गार काढले आहेत ! मि. टेलर लिहितात कीं, " संस्कृत भाषेतील तत्त्वज्ञानाचा जुनेपणाचे दृष्टीनें विचार केला, तर त्याचे पुढे पायथागोरसचे तत्त्वज्ञान कालपरवाचेंच ठरेल; आणि कल्पनेच्या व बुद्धीच्या उच्च भराऱ्याचे दृष्टीने तुलना केली तर प्लेटोच्या उच्चतम कल्पनाही नीरस व सामान्य भासतील. आपणास पूर्वी माहीत असलेल्या सर्व काव्याहून संस्कृत काव्यात शुद्धबुद्धीचे विलास ज्यास्त दिसून येतात. त्या भाषेतील शास्त्रें तर इतकी प्रौढ आहेत की, त्यांचा कालनिर्णय करताना ज्योतिषशास्त्रासही हात टेकावे लागतात ! अशा प्रकारच्या या प्रचंड वाङ्मयाचे खरें स्वरूप वर्णन केले तरीही ते अतिशयोक्तीचें व फाजील घमेंडीचें वाटण्याचा संभव आहे ! पण हें वाङ्मय आपल्या स्वतंत्र व श्रेष्ठ पदावर दुसऱ्या कोणत्याही आधारावाचून आरूढ होऊन आज तागायत तेथेच उभें राहिलें आहे ! संस्कृत भाषा व वाङ्मय यात प्रावीण्य मिळविण्यास जवळ जवळ जन्मभर परिश्रम करावे लागतात. कारण त्यावें वाङ्मय अमर्याद असल्याचा भास होतो. मनुष्यानें आपली कल्पनाशक्ति कितीही ताणली, तरी त्यास संस्कृतातील पुराणकथाच्या अमर्याद विस्ताराची कल्पनाही करता येणार नाहीं. संस्कृत तत्त्वज्ञानात मानसशास्त्रातील प्रत्येक गूढ व बिकट प्रश्नाचा विचार केलेला आहे. संस्कृतातलें धर्मशास्त्रही, तें ज्याचेकरता रचिलें त्या ज्ञातीइतकेच, विविधस्वरूपी आहे. "

(A philosophy, compared with which, in point of age, the lessons of Pythagoras are but of yesterday, and in point of daring speculation Plato's boldest efforts are tame and common-place. A poetry more purely intellectual than any of those of which we had before any conception; and systems of science whose antiquity baffled all power of Astronomical calculation. This literature with all its colossal proportions, which can scarcely be described without the semblance of bombast and exaggeration, claimed of course a place for itself--it stood alone and it was able to stand alone. To acquire the mastery of this language is almost the labour of a

life, its literature seems exhaustless. The utmost stretch of imagination can scarcely comprehend its boundless mythology. Its philosophy has touched upon every metaphysical difficulty; its legislation is as varied as the caste for which it was designed रॉयल एशि. सोसा. चे जर्नल, Vol. II १८३४).


कौंट जॉन्स्टजर्ना लिहितात (Theogony of the Hindus, पृ० ८५):-" हिंदुस्थानचे वाङ्मय प्राचीन काळातील एका थोर राष्ट्राचा आपणास परिचय करून देते; आणि या राष्ट्राने विद्येची प्रत्येक शाखा हस्तगत केली असून मानवी सुधारणेच्या इतिहासात या राष्ट्रात सदैव श्रेष्ठ पदच मिळेल अशीही तें आपली खात्री पटवितें. " **मि. ब्रौन** नामक लेखकाने तर असे लिहिले आहे कीं, (दि डेली ट्रिब्यून-सॉल्टलेक सिटी, ता०२०।२।१८८४) " जगातील निरनिराळीं सर्व वाङ्मये व धर्मकल्पना यांचा मूळ जनक **भारतीय** राष्ट्रच आहे!" **प्रो. मॅक्स म्युलर** लिहितात.—" विद्येची व ज्ञानाची कोणतीही शाखा घ्या, **हिंदुस्थानातील** प्राचीन वाङ्मयाने तींवर नवीन प्रकाश पाडला नाही किंवा तींत नवे चैतन्य उत्पन्न केले नाही, असे घडलेच नाही. पण त्यातले खात जगातील निरनिराळे धर्म व पुराणकथा यांजवर या वाङ्मयामुळे पडलेला प्रकाश तर फारच अपूर्व महत्त्वाचा व अत्यंत उज्ज्वल आहे यात सशय नाही. " (India what can it teach us? पृ. १४०). **जनरल कनिंग हॅम** हे आपल्या **शीखांचे** इतिहासात लिहितात कीं, " **भारतीयांचे** प्राचीन गणितशास्त्र इतके पूर्णावस्थेस पोचले होते व ज्योतिषविषयक गणित तर ते इतके विसच्चूक करीत कीं, **सूर्यचंद्राचे** गमनमार्ग व गति हीं त्यानीं अचूक मापलीं होतीं. सामान्य जनसमूहाच्या धर्मकल्पना व थोड्या विद्वानाचे तत्त्वज्ञान यांचा इतर देशात बहुधा फारखत असते, पण **भरतखंडात** विद्वानाचे तत्त्वज्ञान सामान्य जनसमूहाचें धर्मकल्पनात पूर्णपणे जिरलून गेले आहे. **ईश्वराचे** एक-मेवाद्वितीयत्व व सृष्टिकर्तृत्व, आत्म्याचे अमृतत्व व जीवाची कर्मबद्धता हीं **भारतीय** तत्त्वज्ञानातील चार मूलतत्त्वे सामान्य लोकाच्या धर्माचीही मूलतत्त्वें बनली आहेत. ज्या पुनर्जन्मतत्त्वाचा **मोझेसने** मुळींच उल्लेख केलेला नाही किंवा केला असेल तर फारच संदिग्ध व अस्पष्ट केला आहे; तसेंच ईश्वराचे जे एकत्व व सर्व शक्तिमत्त्व अनेक देवतावादी **ग्रीक** व **रोमन** सामान्य जनसमूहास किंवा द्वैती **मिथेइक** धर्मशास्त्रकारासही अज्ञात होतें तें तत्त्व **गंगानदीतीरावरील ऋषीनी भरतखंडातील** सगळ्या जनतेस पूर्वीच पटविले होतें. शिवाय पापाचरणाबद्दल फार भयंकर

शासन होते हा सिद्धांत सामान्य जनसमूहाचे मनात ठसवून त्याची पारंपारिक जाज्वल्य राखण्याचे कामी त्यांनी प्लेटोपेक्षाही ताण केला आहे.' **प्रो. हीरन** यांना असा अभिप्राय दिला आहे की, " **संस्कृत** वाङ्मय—शास्त्रीय विषय, गद्य आणि पद्य—या सर्व शाखांतही सुसंपन्न आहे.' " भारतीय वाङ्मयाच्या एक दोन शाखांचे संपूर्ण अध्ययन करूं म्हटले तरी त्यास एक जन्माचे संबंध आयुष्य पुरे होणार नाही " असे **सर विल्यम जोन्स** यांनी मत दिले आहे. ' ज्यांची हस्तलिखिते सांप्रत उपलब्ध आहेत, असे **संस्कृत** भाषेत दहा हजार निरनिराळे ग्रंथ आहेत असा, **मॅक्स म्युलर** यांनी हिशेब केला आहे ! ' **ग्रीस** व **रोम** या दोनही देशांचे सर्व प्राचीन वाङ्मय एकत्र केले तरीही यांवरही ग्रंथसंख्या भरणार नाही " असे **मॅक्स म्युलर** (India what can it teach us ? पृ. ८४) म्हणतात. **रे. वार्ड** लिहितात (Antiquity of Hinduism Vol. IV. Conclusion) की " **भारतीयांत** बहुतेक प्रत्येक शास्त्राचे अध्ययन चालू होते, असे त्यांच वाङ्मयावरूनच दिसून येते शिवाय त्यांची ज्या ज्या विषयांची पाठ्यपुस्तके पाहिली तर विद्वत्तेत ते कोणत्याही लोकांस हार जाणारे नाहीत, याचाही प्रत्यय येतो. त्यांचे तत्त्वज्ञानविषयक वाङ्मय व धर्मशास्त्रे यांचे जसजसे परिशीलन करावे, तसतशी त्यांच्या विद्वत्तेची व शहाणपणाची खात्री पटत जाते. **रामेश मानगर्थाइ** (Ancient and medieval India Vol. II पृ. १४६) लिहितात की ' मानवी मन व बुद्धि यांची मजल जेथपर्यंत पोचणे शक्य आहे, तेथपर्यंतची पूर्ण **भारतीयांच्या** मनोबुद्धीने खास गाठली आहे ' "

सारांश, **भारतीयांच्या** बुद्धीचे व मनोबलाचे श्रेष्ठत्व इतके होते की, त्यांचे हातून फार पोक्त व उदात्त असेच वाङ्मय काही झाले तरी निर्माण झाले असते, पण त्यांच्या या मनोबुद्धिगुणास आपला प्रभाव दाखविण्यास **संस्कृतसारखी** सर्वांगपरिपूर्ण, कर्णमनोहर व शब्दसंपन्न भाषा मिळाल्यामुळे तर त्याचे **संस्कृत** वाङ्मय सर्वांत सुसंपन्न व सुंदर निर्माण झाले. येवढेच नव्हे तर त्यांची व्यापकता व सूक्ष्मता हीं पाहून सगळ्या जगाने आश्चर्याने तोंडात बोट घातले, तर त्यांत नवल ते काय ?

भाग २ रा.

प्रकरण १ लें.



भारतीयांचें वाङ्मय.

एकाद्या राष्ट्राच्या इतिहासाचा योग्य बोध होण्यास ज्याप्रमाणे त्या राष्ट्राची संस्कृति, त्याचे ध्येय, त्याची विचारपरंपरा, त्याचे सृष्टिनिर्मित कर्तव्यक्षेत्र आणि शील याचे ज्ञान असणे जरूर आहे. त्याचप्रमाणे वाङ्मयाचीही स्थिति आहे. वाङ्मय हे राष्ट्राच्या विचाराचे प्रतिबिंब असते. वाङ्मयाचे ज्ञान सुबोध होण्यास इतिहासाचा फारच उपयोग आहे.

इतिहासाचे कालमानाने व विषयमानाने भाग पाडले म्हणजे तें आकलन करण्यास जसा सोपा होतो, त्याचप्रमाण वाङ्मयाचेही वर्गीकरण विषय समजण्यास फार सोईचे असते.

संस्कृत वाङ्मयाचा परिच्छेद तीन प्रकारे करतात (१) वैदिक वाङ्मय, (२) पौराणिक वाङ्मय व (३) ललित वाङ्मय. आता ह्या अंगाचा निरनिराळी उपांगे आहेत त्याचा क्रमशः विचार करूं.

वैदिक वाङ्मय.

वैदिक वाङ्मयाचे वेद, ब्राह्मणे व सूत्रे असे तीन प्रकार आहेत.

ऋक, यजुस्, साम आणि अथर्व असे वेदाचे चार भाग आहेत. परंतु त्यापैकीं ऋग्वेद आणि यजुर्वेद हे फार महत्त्वाचे आहेत. जडसृष्टि, मन व आत्मा याचे सत्यरूप ज्ञान संपादन करून त्याचा उपयोग कसा व कोठे करावा हाच या दोन वेदाचा प्रतिपाद्य विषय आहे. संस्कृत वाङ्मयातच नव्हे तर जगातील सर्व वाङ्मयात वेदग्रंथांचा अत्यंत श्रेष्ठ दर्जा आहे. मॅक्समुल्लर साहेब म्हणतात कीं, "मानव वंशाच्या शिक्षणरूप ग्रंथात वैदिक वाङ्मयाचा एक स्वतंत्र भाग असून त्याला कोठेच तोड नाही."

प्राचीन भारतवर्षांत ज्ञानाच्या सर्व शाखांचा पूर्ण विकास झाला होता व त्यावर ग्रंथरचनाही भरपूर झाली होती, परंतु महत्त्वाचे असे सर्व शास्त्रावरील

ग्रंथ सर्वभक्षक काळाच्या उदरात लुप्त होऊन गेले आहेत, व त्याचा मागमूसही लागण्याची आशा नाही. असे असता त्या सर्व श्रेष्ठ ग्रथातील रत्ने असे जे वेद, ते पूर्ण सुरक्षित व शाबूद रहावे हा एक दैवी चमत्काराचाच प्रकार आहे असें म्हणावे लागते. धर्मग्रंथातील फार जुना असा मनुस्मृति ग्रथ, व त्या काळातील इतर ग्रंथ, रामायण, महाभारत वैगरे सर्वमान्य व श्रेष्ठ ग्रंथ ह्यामध्ये कित्येक ठिकाणी पाठभेद, पाठलोप व नवीन भर असे प्रकार घडून आले आहेत, परंतु वेदाच्या अतुल भाषासौंदर्याने आणि अप्रतिम विषयगाभीर्याने त्यामध्ये असा प्रकार घडून येणेच अशक्य झाले.

वेदाचा उगम केव्हा झाला हें अद्यापही एक मोठे कोडे आहे आणि याच कारणामुळे त्यास कालमर्यादा नाही व ते अपौरुषेय आहेत असे हिंदु लोक मानतात. ज्ञानगंगेचा उगम वेदात असून, जगातील सर्व वाङ्मयाचे जनकत्वही याकडेच आहे, वेदातील तत्त्वे आधुनिक सूक्ष्मशास्त्राच्या (True science) प्रमयाशी पूर्णपणे जुळतात याचा एक मजेदार मासला खाली दिला आहे.

स्वामी दयानंद सरस्वतीच्या टीकाधार लाहोरचे पंडित गुरुदत्त याना वेदातील काही थोड्या मंत्राचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला होता. ऋग्वेदाच्या दुसऱ्या सूक्तातील सातव्या मंत्राचा अर्थ लावताना त्यास खालील चमत्कारिक शोध लागला व यायद्दल त्यास पराकाष्ठेचे आश्चर्यही वाटले. तो मत्र असा आहे:—

मित्रं हुवे पूतं दक्षं वरुणं च रिशादसम् । धियं घृताचीं साधन्ता

ऋ. अ १ । सू २ । मंत्र ७

पंडित गुरुदत्त म्हणतात की, " घनाचा व साधन्ता या दोन द्रव्याच्या मिश्रणापासून पाणी कसे तयार होते याची पद्धति त्यात दिली आहे. साधन्ता शब्दाच्या द्विवचनावरून असें दिसते की पाणी दोन भिन्न मूलद्रव्याच्या संयोगापासून तयार होते. ही दोन मूलद्रव्ये कोणती, हे ठरावणे हेच फार महत्त्वाचें आहे. या दोन मूलद्रव्याची मित्र व वरुण अशी नावे या मंत्रात दिली आहेत.

मित्र या शब्दाचा मूल अर्थ मोजणारा असा आहे व पुढे ज्या पदार्थास हें मापनाचे कार्य करावे लाग त्यास ' मित्र ' हे नाव देण्यात येऊ लागले व तेच पुढे परिमाण बनले.

मित्र हे किंमत अथवा धनता याचे परिमाण आहे.

मित्र याचा दुसरा अर्थ जोडीदार असा आहे, व तोच या मंत्रात अभिप्रेत आहे. मित्र हा वरुणाचा जोडीदार आहे असे या मंत्रात म्हटले आहे. आता

वरुण म्हणजे " आक्सीजन " वायु हा अर्थ कसा ते पाहूं. हायड्रोजन हा सर्वांत हलका वायु असून इतर वायूंची घनता मोजण्याचे तो पारमाण आहे. आक्सीजनपाशी याचा फार शीघ्र संयोग होतो, म्हणून मित्र यास वरुणाचा—म्हणजे आक्सीजनचा—जोडीदार असे म्हटलें आहे. वेदांतील मित्र व वरुण हेच आधुनिक शास्त्रांतील हायड्रोजन व आक्सीजन असावेत, असे त्याच्या गुणधर्माच्या अनुमानावरून व तुलनेवरून दिसून येते. वेदांत कित्येक ठिकाणी मित्र हा शब्द उदानवायूच्या समानार्थी योजलेला दिसतो, आणि हलकेपणा व उड्डाणक्षमत्व ह्या दोन अर्थांनी तो सर्वश्रुत आहे.

" त्यानंतर आपणास वरुण या तत्त्वाचा विचार करणे प्राप्त आहे. वरुणाची सर्व सजीव प्राण्यास फार जरूरी आहे. कारण त्याशिवाय प्राणधारणाचे कार्य होणार नाही. अर्थाधित धातूवर गंज चढणे, दहनाक्रिया होणे, शरीरशास्त्रदृष्ट्या रक्ताशी संयोग होऊन ते शुद्ध रहाणे व शरीरांत जीवनकला चालू रहाणे इत्यादि विज्ञानदृष्ट्या (Science) याचे धर्म आहेत. परंतु ऋग्वेदाने याच अर्थावर येथे विशेष कटाक्ष आहे. मुख्यत्वेकरून हा अर्थ व वर दिलेले इतर अर्थ या सर्वांचा विचार केला असता वरुण म्हणजे आक्सीजन असला पाहिजे असे खात्री पटते.

याच मंत्रांत आणखी 'पूत-दक्ष' असा एक शब्द योजलेला आहे. त्यापैकी पूत—म्हणजे शुद्ध, मलाभाव व दक्ष म्हणजे सामर्थ्य, शक्ति.

या मंत्राचा संपूर्ण अर्थ असा आहे — ज्या कोणाचा दोन मूलपदार्थांच्या संयोगापासून पाणी तयार करण्याची इच्छा असेल त्याने अत्यंत शुद्ध असा शुद्ध मित्र वायु (Hydrogen) व ऋग्वेदधर्मी वरुणवायु (Oxygen) घेऊन त्याचा संयोग करावा म्हणजे पाणी तयार होते.

वेदाचे प्राचीनत्व सर्वमान्य आहेच, परंतु सर्व ज्ञाननिकष, त्रिकालसत्यासिद्धांतधारणसामर्थ्य, भाषासौष्ठव, परमात्मज्ञानसंग्रह, ऋजुता व प्रमाणपणा मानववंशाचा प्राचीन इतिहास इत्यादि गुणांच्या दृष्टीने त्याचे महत्व अत्यंत थोर आहे. परंतु दुर्दैवाने भरतभूमीत त्याचा अभ्यास बंद पडला आहे, सूत्र व वेदांगे ही वेदार्थाची मुख्य साधने असून त्यांचे ज्ञानही फार थोडासा आहे, अशी स्थिति असल्यामुळे हिंदुलोकांतील अत्यंत विद्वान म्हणून वाखाणण्याच्या फारच थोड्या लोकांस ते समजतात अशी शोचनीय स्थिति आमची झाली आहे; त्यातून पार पडावे, अशी परमेश्वरी इच्छा दिसते, आणि

आमच्या हलगर्जीपणाबद्दल योग्य शासन मिळावे, म्हणून आमच्या पूज्य ग्रंथाबद्दल आम्हास इशारारूप सूचना पाश्चात्य पंडितांनी आपआपल्या ग्रंथांत दिल्या आहेत एवढ्याने तरी आमचे डोळे उघडून आपल्या खऱ्याखुऱ्या स्थितीचा बोध व्हावा व खऱ्या कार्यास लागावे अशीही ईश्वरी—इच्छा असेल, ज्यांच्या चालीरीति भिन्न, विचारपरंपरा निराळी, संस्कार अत्यंत विसदृश आणि नैसर्गिक गोष्टी व पारमार्थिक यांच्यामध्येही एकरूपता मुळीच नाही, अशा पाश्चात्य पंडितांनी आजन्म परिश्रम करून वेदार्थ समजून घ्यावा, त्यांतील अत्यंत थोर विचारांनी मोहून जावे, गंभीर तत्त्वज्ञानाने त्यांचे डोळे दिपून जावे, मोहक, शुद्ध व गोड भाषासरणीने व सरस-काव्यमाधुर्याने ज्यांनी आपल्या आयुष्यांतील सर्व दुःखे विसरून जावीत त्याकडून वेदाबद्दल अत्यंत प्रशंसापर उद्गार निघाल्यास आश्चर्य नाही. मात्र आम्हास आमच्या हलगर्जीपणाबद्दल अत्यंत लज्जा वाटावी हेच युक्त. झाल्या गोष्टीस इलाज नाही. आता तरी यापुढे आमचे ग्रंथ आम्ही अभ्यासल्यास फार मदत होईल व त्याचा अर्थ समजण्यास पाश्चात्य विद्वानांचे श्रमही सहाय्यभूत होतील आम्ही पाश्चात्य ग्रंथांची मदत घेतलीच पाहिजे. अशीही दैवी इच्छा असेल व तदनुरूप वागण्याशिवाय आम्हास इलाजच नाही. आम्ही स्वतः त्याचे अध्ययन करण्यास सुरवात केली का, त्यांतील तत्त्वावबोध व आनंद ही आपोआपच आम्हास प्राप्त होतील. सध्या पाश्चात्य पंडितांचे निवडक प्रशंसापर अभिप्राय उद्धृत करितो.

सर हेनरीसाहेब म्हणतो की, "ह्या पूज्य ऋग्वेदाचा काळ अगम्य आहे," मानवजातीच्या पुस्तकसंग्रहांतील वेद हे अत्यंत जुने ग्रंथ आहेत" असा मॅक्स म्युलर साहेबाचा अभिप्राय आहे. हीरन नामक प्रोफेसरास हा अभिप्राय मान्य आहे.

ऋग्वेदाची एक प्रत जेव्हा व्हाॅलटेअर यास अर्पण करण्यात आली तेव्हा तो म्हणाला की, ही देणगी खरोखर अमूल्य असून त्याबद्दल पौरस्त्य राष्ट्रांचे व पाश्चात्य राष्ट्रांना अखंड ऋणीच राहिले पाहिजे. वेदाच्या गाभीर्याने व श्रेष्ठत्वाने लेऑन रलवॉस साहेबाचा उत्साह व आनंद अमर्याद होऊन ते म्हणतात की, "ग्रीस व रोममधील प्रत्येक स्मारकांची योग्यता ऋग्वेदाच्या खालीच लागेल." शेवटी मॅक्स म्युलर साहेबाचा सर्वांस असा कळकळीचा उपदेश आहे की, "इतर कोणत्याही मानवी ग्रंथाने जे काम झाले नसते ते वेदांना जगाच्या इतिहासात केले आहे; सबब ज्याला ज्याला म्हणून स्वतःचा, पूर्वजांचा व आपल्या इति-

हासाचा अभिमान आहे व जो आपल्या बौद्धिक विकासाची इच्छा करतो, त्या प्रत्येकाने वेदाचा अभ्यास करणे जरूर आहे." वेद हे ईश्वर-प्रकाशरूप (revelation) असल्यामुळे त्याचे ज्ञान प्रत्येकास असणे फार अगत्याचे आहे असे हिंदु लोक मानतात.

भारतवर्ष व संस्कृत भाषा ह्या दोघांखेरीज तिसऱ्यास अशा प्राचीन व मूल्यवान् ठेव्याची बढाई मारता येणार नाही. ज्याच्या सौंदर्ययुक्त भव्यपणाची सर इतरास येणार नाही, आणि ज्याची ओजस्विताही इतरास दुष्प्राप्य आहे अशा ह्या पवित्र वेदरूपी जिनगीवर जगातील हिंदु-राष्ट्राखेरीज इतरास हक्कही सांगता येणार नाही. आपल्या अतुल तेजाने सर्व मानव्याच्या प्रगतीस दिव्य प्रकाश देत हे वेद एकटेच असे चिरंतन राहणार यात बिलकुल संशय नाही.

वेदाच्या खालोखाल ब्राह्मणास महत्त्व आहे. ब्राह्मण हे ग्रंथ वेदांचेच भाग आहेत असे कित्येक मानतात, परंतु हा त्यांचा चूक आहे हे ग्रंथ टीका अथवा भाष्य या स्वरूपाचे आहेत. यज्ञयागाचे वेळी कोणते मंत्र केव्हा म्हणावे, अगर यज्ञक्रियेला आरंभ कोणत्या देवतेच्या आवाहनाने करावा, यज्ञाची अधिष्ठात्री देवता कोणती असावी, ती तशी का मानावी यासंबंधी दृष्टांतपूर्वक माहिती या ग्रंथात दिलेली आहे एवंच कर्मकांडाचे आचरण कसे करावे, याचे ज्ञान होण्यास हे फार उपयोगी पडतात आणि वैदिक वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्यास याचे ज्ञान असणे अवश्य आहे. प्रत्येक वेदाचे असे टीकारूप ब्राह्मणग्रंथ आहेत. उदाहरणार्थ: ऐतरेय अथवा आश्वलायन आणि कौषितकी अथवा सांख्यायन हे ऋग्वेदाचे, शतपथ हा यजुर्वेदाचा इत्यादि. ब्राह्मणग्रंथाची रचना ज्या काळी झाली त्यासंबंधी प्रो. वेबर म्हणतो, " ज्या काळी मानवी मनाला अत्यंत कठिण अशा वाटणाऱ्या विषयाचे विवेचन व उद्घाटन करण्यात ब्राह्मण मोठ्या उत्साहाने व आनंदाने मग्न असत. आणि वेदांतासारख्या पवित्र विषयांतील सिद्धान्त स्थिरापुढे मांडण्यात येऊन त्या आपल्या उत्साहयुक्त कल्पकतेने व ज्ञानजिज्ञासेने त्या सिद्धान्ताच्या गूढ प्रदेशात शिरून व मर्म हुडकून काढून पुरुषासही विचाराच्या गांभीर्याने, खोलपणाने व वजनाने आश्चर्यचकित करून सोडीत त्या काळाचा प्रातिभ या ग्रंथात उठलेली आपणास दिसते."

सूत्र हा वैदिक वाङ्मयातील तिसरा व शेवटचा भाग आहे. त्याचे सहा भाग खाली दिल्या प्रमाणे आहेत.

१ शिक्षा (स्वर-विधि संहिता.) २ छंदस् ३ व्याकरण. ४ निरुक्त (वेदशब्द—प्रकाश.) ५ ज्योतिष. ६ कल्प. (वैदिककर्मांची विधिसंहिता.)

सूत्रे हीं वेदाचे एक अंग असून त्याचाहीं वेदार्थबोध होण्यास फार उपयोग होतो. त्याचे सहा विभाग पाडले आहेत व ते वर अनुक्रमाने दिले आहेत. त्यापैकीं आपण व्याकरण हा भाग घेऊं, व त्याचा वैदिक काळीं किती ऊहापोह झाला होता तें पाहूं. ह्या एका भागाची वैदिक काळात झालेली चर्चा पाहिली म्हणजे प्राचीन आर्यांच्या ज्ञानाभिरुचीचे किती कौतुक करावे असे होते, व त्याची ज्ञानलालसा व शास्त्राभ्यास केवढा जबर होता आणि त्या मानानेच त्या काळाची संस्कृति किती थोर होती याची कल्पना सहज करता येईल. याचे अध्ययन त्या काळी चार पांच प्रकारें झाले होते. व्याकरण हे स्वतंत्र शास्त्र मानण्यात येत असे व त्याकरितां अभ्यासशील ऋषींनीं आजन्म खटपट केली होती व व्यासंग ठेविला होता असें दिसून येते व्याकरणाचे (१) स्वरशास्त्र, (२) स्वर व व्यंजनें यांचे योग्य वर्गीकरण, (३) व्याकरणाची यथायोग्य व सुबोध परिभाषा, (४) शब्दोत्पत्तिशास्त्र, (५) शब्दजातिभेद इत्यादि प्रकारें त्याचे फार खोल व सूक्ष्म विवेचन झाले होते असें दिसते. शिक्षेचा प्रातिशाख्य म्हणून एक पोटविभाग आहे, त्यामध्ये वेदांतील स्वराच्या संबंधीं फार बारकाईनें विचार केला असून, त्यांच्या स्थानासंबंधीं अर्थाच्या दृष्टीने किती काळजी घेतली पाहिजे हें दाखविले आहे. स्वराचे स्थान चुकल्यास किती अर्थहानि होते हेंही त्यात फार विस्तृतपणे सांगितले आहे. प्रत्येक वेदावर असे एकेक स्वरावबोधक प्रातिशाख्य आहे. प्रो. विल्सनसाहेब प्रातिशाख्यासंबंधाने म्हणतो, "इतर कोणत्याही राष्ट्राच्या वाङ्मयात मानवी भाषाशास्त्राच्या स्वरूप-लक्षणाचे इतके सूक्ष्म, व्यापक, खोल आणि विस्तृत विवेचन झालेले नाही."

" प्रातिशाख्यात नाम, क्रियापद, सर्वनाम, विशेषण, अव्यय इत्यादि व्याकरणाच्या सर्व अंगाचा विचार अत्यंत विस्तृतपणे व सावधानतेनें झालेला आहे. परंतु प्रातिशाख्यानंतर किती तरी काळाने ग्रीक लोकास अशा वर्गीकरणाची आवश्यकता भासली! प्लेटोचे सर्व काम नाम व क्रियापद याजवरच भागलें. त्याचा शिष्य अॅरिस्टॉटल यालाही बराच वेळपर्यंत यापलीकडे जाण्याची आवश्यकता भासली नाही. परंतु भाषाशास्त्राचे विवेचन व नियमसंघटना करताना, त्यास उपपदे व उभयान्वयी अव्यये यांची भर घालावी लागली. झेनोडोटस याने सर्वनाम व ॲरिस्टार्कस् याने शब्दयोगी अव्ययांची भर घातली."

आग्रा कॉलेजचे मुख्याध्यापक व प्रसिद्ध शब्दव्युत्पत्तिशास्त्रज्ञ थॉमसन याच्यामते संस्कृतातील व्यंजनव्यवस्था अपूर्व असून मानवी बुद्धिमत्तेच्या विलासाचा तो एक उत्कृष्ट मासला आहे. युरोप या बाबतीत अशा विज्ञानशास्त्रप्रकर्षाच्या (Scientific age) कालीं २५०० वर्षे मागे आहे व सर्व ध्वनींचीं वाचक अशीं अक्षरें इंग्लिश भाषेंत नाहींत. याबद्दल त्यानीं खेद व्यक्त केला आहे. रे. वॉर्ड म्हणतो की, आर्यांच्या शब्दव्युत्पत्तिशास्त्राने तर इतर प्राचीन व अर्वाचीन राष्ट्रांवरही मात केली आहे.

प्राचीन भारतामध्ये भाषाशास्त्राच्या व्याकरण या अंगाची इतकी वाढ झाली होती की त्याची तुलना करणेच अशक्य आहे. अथवा साहित्यशास्त्राच्या इतिहासातील तो एक चमत्कारच आहे असे म्हटल्यास काही अतिशयोक्ति होईल असे वाटत नाहीं पाणिनि हा व्याकरणशास्त्राचा प्रवर्तक आहे व त्याचा ग्रंथ म्हणजे मानवी मनाच्या अत्यंत प्रगल्भतेची कसोटीच आहे. साहित्यप्रासादातील अत्यंत मान्य व पूज्य सिंहासनावर जगातील सर्व पंडितानी मोठ्या कृतज्ञतेने, थोर प्रशंसेने आणि उदार बुद्धीने त्यास आरूढ केले असून त्यास तेथून पदभ्रष्ट होण्याची भीति आहे असे कोणाही विद्वानास वाटत नाही. पाणिनीची अलौकिक व असामान्य बुद्धिमत्ता पाहून पाश्चात्य पंडित किती भारून गेले आहेत, त्याचे मन आदर व आश्चर्य यानी कसे भरून गेले आहे, त्याच्या प्रखर बुद्धितेजाने ते कसे दिपून गेले आहेत व त्याचे गुणवर्णन करून अल्पाशाने तरी ऋणमुक्त व्हावे म्हणून कसे उत्सुक झाले आहेत, हे खालील एक दोन उताऱ्यावरून व्यक्त होईल. प्रो. वेबर म्हणतो. "पाणिनीचे ग्रंथ उघडताच असे वाटते की, आपण एका अत्यंत भव्य प्रासादात शिरलो आहो. त्या भव्य मंदिराच्या द्वारतोरणावरील कलाकुसरीचे नामलेख पाहिला म्हणजे मन क्षणभर आश्चर्याने व कौतुकाने भरून येते. भाषासृष्टीतील सर्व प्रसंगाचे यथायोग्य व समर्पक स्पष्टीकरण केलेले पाहून त्या पुरुषाची आश्चर्यकारक कल्पकशक्ति व मानवमात्रांचे सखोल व परिपूर्ण आकलन याविषयी पूर्ण खात्री पटते व मनावर त्याच्या बुद्धिप्रकर्षाविषयी सकौतुक आदराचे फार वजनदार दडपण पडते."

सर हंटर म्हणतो. "विधानाचा बिनचुकपणा, धातुपृथक्करणाची परिपूर्णता, आणि शब्दघटनातत्त्वाची शुद्धता या तीन बाबतीत जगातील सर्व व्याकरणग्रंथात पाणिनीचा ग्रंथ अत्यंत श्रेष्ठ आहे. कित्येक ठिकाणी थोडी दुर्बोधता आली आहे, तेवढी सोडून दिली तर बीजगणितासारखी परिभाषा निर्माण करून त्याने

आपल्या ग्रंथात जो खोचदार संक्षिप्तपणा आणला आहे तो तर केवळ निरुपमच आहे. मानवी प्रयत्नाने व कल्पकतेने केवढी उज्ज्वल कामगिरी करता येते याचे त्याने संस्कृत भाषेतील सर्व गोष्टींचा तार्किक पद्धतीने जो मेळ घालून दिला आहे त्यावरून प्रत्यंतर येते. संस्कृत भाषामंदिरातील शब्दनिर्मितीचे असंख्य नियम व स्वरभेद, अनेकावयवी साधित शब्द, दहा गण, बहुविध भूतकाळ व काळांची एक लाख लाख रूपे इत्यादि बहुविध गोष्टींचा पसारा पाहिला म्हणजे कधी काळी ही व्यवहाराची भाषा होती किंवा नाही, अशाबद्दल जबरदस्त शंका येऊ लागते.''

भाषेची प्राणभूता व उपासना ज्या व्याकरणाच्या थोर व उदात्त तत्त्वांनी होत त्याचा अजून यूरोपास मागमूसही नाही. अशा स्थितीत पाणिनीची अर्वाचीन पाश्चात्य व्याकरणकारांशी तुलना करणे म्हणजे शुद्ध अन्यायाचे आहे.

मॅनिंगवाई म्हणतो. यूरोपातील व्याकरणकारांचे समाधान ज्या प्रकारच्या व्याकरणग्रंथांनी होते त्यापेक्षा संस्कृतातील व्याकरणग्रंथ अगदी संशय किती तरी पटीने श्रेष्ठ आहेत.'

हटर व प्रोफेसर मॅक्स म्युलर यांच्या मते ''व्याकरणातील पृथक्करण'' व 'मानवी भाषाशास्त्रातील तत्त्वांची मांडणी'' या दोन बाबतीत प्राचीन आर्यांचा हात धरण्याचे साहस व योग्यता कोणाही अर्वाचीनाच्या ठेवा नाही.

पाणिनीसारखा अद्वितीय व्याकरणकर्ता निर्माण होण्यापूर्वी व्याकरणाच्या सूत्रांची मशागत 'आपिशली', 'काश्यप', 'गार्ग्य', 'गालव', 'शुक्लवर्मन्', 'भारद्वाज', 'शाकटायन', 'शाकल्य' 'स्फोटायन' इत्यादि व्याकरणकारांना करून ठेविली होती. व त्यात पाणिनीसारखे सुदैव कलम तयार होऊन त्यापासून पुढे भव्य व जगद्व्याळ वृक्ष तयार झाल्यास त्यात काही विशेष आश्चर्य नाही.

पाणिनीच्या व्याकरणावर वार्तिककार कात्यायन याने भाष्य लिहिले व व्याकरण महाभाष्यकार पतंजली याने साधकबाधक टीका लिहिली. पाणिनि, पतंजली व कात्यायन या त्रिमूर्ति व्याकरणशास्त्रात अधिकारसंपन्न व जगमान्य आहेत. या त्रिकुटाने व्याकरणशास्त्रास असामान्य ऊर्जितावस्थेस आणून, त्याची शास्त्रीयदृष्ट्या जी थोरवी वाढविली आहे, त्याबद्दल त्यांच्या वंशजांनी व अखिल जगाने त्याचे ऋणी झाले पाहिजे हेच सरळ व न्याय्य आहे

व्याकरणाप्रमाणेच कोशग्रंथाचीही प्राचीन कालीं वाढ झाली होती. संस्कृतामध्यें लहान मोठे असे ५२ कोश आहेत असे म्हणतात; परंतु त्यापैकीं फारच थोडे प्रचारात आहेत. निघंटु, मेदिनी, हेमचंद्र, वाचस्पत्य, अमरकोश इत्यादि प्रमुख असून व्यवहारात याचाच उपयोग नेहमी करतात. कोशवाङ्मयासंबंधीं रेव्हरंड वार्ड म्हणतो, "प्राचीनकाली संस्कृत भाषा किती परिणतावस्थेस आली होती हें कोश ग्रंथावरून स्पष्ट दिसून येते आणि याबद्दल हिंदु विद्वान लोक अत्यंत थोर आदरास पात्र आहेत."

प्रकरण २ रें.

येथवर वैदिक वाङ्मयाचा विचार झाला. आता भारतीयाच्या काव्यसंपत्तीकडे वळूं. ही काव्यसंपत्ति एवढी अफाट आहे का, परकीय लोकास त्याबद्दल राहून राहून अत्यंत आश्चर्य वाटते. प्रो० मॅक्स डंकर म्हणतो की, संस्कृतामधील काव्य-भांडाराचा मुळीं ठावच लागत नाही. परंतु भारतीयाची नैसर्गिक प्रवृत्ति काव्यमय असल्याने त्याच्या हातून इतके असंख्य काव्यग्रंथ निर्माण झाले यात काय आश्चर्य ? सध्या उपलब्ध असलेल्या ग्रंथसंख्येने जर आपण इतके मोहित झालो, तर पुच्छ विषाणहीन नरपशूंच्या धार्मिक अत्याचारास बळी पडून ज्यांची राख-रांगोळी झाली, त्या ग्रंथांची नक्की संख्या आम्हास माहीत झाली तर आमच्या आश्चर्यास सीमाच उरणार नाही. नैसर्गिक काव्यप्रकृति हीच या अफाट ग्रंथसंपत्तीचे कारण होय. कायदेशास्त्र काव्यमय, ज्योतिषशास्त्राची उभारणी काव्याच्या पायावर, इतर विज्ञानशास्त्रांची भाषा काव्य-युक्त धर्मशास्त्र काव्यवर्णाने बोल-लेले, सारांश कोणत्याही लेखनाचे कामा काव्याचा सहज लीलेने उपयोग कर-ण्याचे त्यास मुळीच जड जात नसे. जे ऋषी त्रिकाल सत्यवेद आपल्या अत्यंत रसाळ, सरळ, मोहक आणि काव्यरसाने थबथबलेल्या वाणीने बोलले त्यांच्या वंशजास कवित्वशक्ति परंपरेनें प्राप्त आली असल्यास त्यात नवल ते कोणते ? काऊंट जानस्टर्ना म्हणतो,—" भरतभूमीत काव्याचेच साम्राज्य आहे; अमूर्त भावनामय शास्त्रांचीच नव्हे तर धर्मग्रंथांची सुद्धा भाषा काव्यछटेनें रंगलेली असून शिवाय त्यात काव्याचा मोहकपणा आणि आकारसादृश्य हे दोन गुणही कांहीं कमी नाहींत. "

प्रो० हॉरनच्या मते हिंदुलोक हे निसर्गतःच काव्यप्रवृत्त आहेत; यास्तव अशा लोकाच्या हातून काव्याची विलक्षण वाढ आणि विकास झाला व निरनिराळ्या शाखांचे संवर्धन, होऊन तो विलक्षण पूर्णत्वास पोचली, तर त्यात काय आश्चर्य ? वृत्तान्तपर, नाट्यविषयक, भावपूर्ण, बोधपर, आख्यायिकात्मक इत्यादि शाखांची संस्कृतकाव्यात पूर्ण वाढ झालेली आपणास दिसते, आणि त्या त्या शाखामध्ये अत्यंत श्रेष्ठ प्रतीचे ग्रंथफलेही भरपूर निर्माण झालेली होती.

एल्फिन्स्टन साहेब म्हणतो—ज्यांनी ज्याना संस्कृतामधील वीररसप्रधान काव्ये वाचली आहेत, त्याना त्यांनी हर्षभरित चित्ताने व मोठ्या प्रेमाने त्याचे गुणवर्णन करून फारच वाहवा केली आहे. स्वतः त्याच प्रकारचे काव्ये रचण्याची ज्यास शक्ति आहे अशा तज्ञ व रसिकवर्यांचा त्या काव्याचा रसाळपणा व सौंदर्यविषयांचा अभिप्राय फारच स्पष्ट व हृदयस्पर्शी आहे. केवळ पौर्वात्य-भाषाचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करणाऱ्या विद्वानानाच संस्कृत वाङ्मयाने मोहून टाकले आहे असे नाही; तर इतर पाश्चात्य पंडितही प्रत्यक्ष संस्कृत ग्रंथ न वाचता, केवळ भाषांतरादि इतर रीतीने मिळालेल्या ज्ञानाने लुब्ध होऊन गेले आहेत. विल्सन जोन्स या संस्कृत पंडिताप्रमाणेच मिल्मन आणि श्लेजेल हेही संस्कृत वाङ्मयाची तारीफ करण्यात रंगून जातात. कोणापासून सरळ भाषा-सरणी, ऋजुता व स्वतंत्र विचारशक्ति, तर कोणापासून गांभीर्य, सौंदर्य व हृदय-भेदी कारुण्यभाव हे आम्हास शिकता येतील. संस्कृत नाटकांतील पात्राचे नैसर्गिक धीरोदात्त वर्तन, आचारांतील धार्मिक पवित्रपणा व ग्रंथकाराचे गाढ कल्पना-चातुर्य इत्यादि गुण इतर अनेक पाश्चात्य पंडितानी निर्दिष्ट केले आहेत.

यानंतर आपण महाकाव्याकडे वळूः-

भारतीय वाङ्मयात महाकाव्याचा भाग बराच आहे. लहानमोठा अशी विविध महाकाव्ये संस्कृत वाङ्मयाकाशात सूर्य चंद्र व तारकाप्रमाणे चमकताना व प्रकाशताना पाहून अखिल मानवजातीस कौतुक व आनंद वाटला, तर त्यात आश्चर्य ते कोणते ? रामायण व महाभारत ही त्यापैकी दोन अत्यंत श्रेष्ठ आहेत. जगातील इतर कोणत्याही वाङ्मयात त्याच्या तोडीची महाकाव्ये मिळणार नाहीत.

ग्रीक भाषेतील दोन विख्यात महाकाव्ये "इलयड" व "ओडिसी" होत. परंतु प्रोफेसर मोनियर विल्यम्ससारख्या आग्लपंडिताने असे म्हटले आहे की, "या दोन ग्रीक महाकाव्याना रामायण व महाभारत याच्या पंक्तीस केव्हाच

बसविता येणार नाहा. त्याची व याची तुलना करणे. हे नगाधिराज हिमालयातील बर्फाच्छादित प्रदेशात उगम पावून ठिकठिकाणी लहानमोठ्या नद्यानाल्यांच्या संयोगाने विस्तृत होणाऱ्या, कांही ठिकाणी अफाट उथळ पात्रातून वहाणाऱ्या तर कित्येक ठिकाणी भिन्न दिग्गामी, खोल, अनेक प्रवाहात रूपांतरित होणाऱ्या 'गंगा' 'यमुना' यासारख्या महानद्याना व 'ऑटका' आणि 'थेसाली' प्रांतातील डोंगरी ओढ्याना एकाच माळेत ओवण्यासारखेच आहे. संस्कृत वाङ्मयाच्या इतर शाखांमध्ये जशी अफाट ग्रंथसंपत्ति आहे तीच गोष्ट महाकाव्याची परंतु यूरोपातील विद्याप्रिय मनुष्याच्या दृष्टीला एवढा अफाट ग्रंथसमूह अपरिचित असल्याने त्यास संस्कृतातील ग्रंथभांडार पाहून फार अचंबा वाटतो."

अशा महाकाव्यांपैकी, रामायण हे जुने असून महाभारत हे अत्यंत विस्तृत आहे. काव्यविषयक अत्युच्च गुणासंबंधाने तर बोलावयासच नको. कारण त्याची बरोबरी करणे हे काम इतर कोणत्याही भाषेतील वाङ्मयाच्या अवसानाबाहेर आहे, परंतु पाश्चात्य मार्मिक पंडितानाहि ह्या दोन ग्रंथाच्या विस्तारानेच कोडे अजून सुटत नाही. कारण 'महाभारताच्या' २००००० ओळी आहेत व 'रामायणाच्या' ४८००० ओळी आहेत. परंतु होमरच्या 'इलियडच्या' फक्त १५६९३ ओळी आहेत तर व्हर्जिलच्या 'इनियडच्या' फक्त ९८०८ च ओळी आहेत. होमरच्या दोन्ही (इलियड व ओडसी) महाकाव्यांच्या ओळींची संख्या अवघी २००००० भरते. अर्थात रामायण यांच्या दिडपटींपेक्षा मोठे आहे. हे निराळे सांगणे नकोच.

आता रामायणाच्या अंतरंगाकडे वळूं. रामायण हा ग्रंथ कोणासंबंधी लिहिला आहे, त्यातील कथाभाग काय आहे, त्यात कोणती तत्त्वे कथेस सांगावयाची होती, व त्या ग्रंथापासून समाजावर काय परिणाम झाला आहे, हे सांगण्याची मुळीच गरज नाही. कारण हिंदुलोक त्या ग्रंथास वेदाप्रमाणे पूज्य मानतात व त्याची शिकवण कथा, पुराणे, प्रवचने इत्यादि मार्गानी प्राचीन कालापासून सुरू आहे. कोणाही कुणाच्यास विचारले, तरी सुद्धा त्यास रामचरित्र माहीत नाही असे कधीही होणार नाही; आणि समाजात ह्या काव्यातील नायक, नायिका व इतर लक्ष्मण, भरतभेट, अंगद ह्या उपपात्रास देवाप्रमाणे मानण्याची चाल आहे. उत्तर हिंदुस्थानात तुलसीदास, आपल्या इकडे रामदास व इतर अनेक साधुसंतांनी आपल्या समाळ, भक्तिप्रचुर, मोहक व

प्रासादिक वाणीने राममहिमा गाऊन समाजास अनेक धर्मकार्यातून सुखरूप पार नेले आहे. व लोकांचा धार्मिकबुद्धि कायम ठेऊन त्याचे ठिकाणीं परचक्राचे, जुलुमाचे व इतर आपत्तीचे आघात सहन करण्यास समर्थ केले आहे. तेव्हा या ठिकाणीं मूलग्रथाचे सार अथवा त्यातील मुख्य पात्राचे सविस्तर गुणवर्णन न करता फक्त या ग्रंथासंबंधा पाश्चात्य पंडितास केवढा आदर वाटतो व त्याचें राम व सीता यासंबंधी काय म्हणणें आहे, हे थोडक्यात देण्याचे योजिले आहे. कारण की, मानसिक दौर्बल्य व परवशता आपल्या समाजात फार वाढल्याने प्रत्येक गोष्ट-चांगली अगर वाईट-पाश्चात्यांच्या दृष्टीने पाहण्याची आम्हास संवय जडली आहे. आमच्या संस्था, संस्कार, रितीभाती, धार्मिक चाली, आमचे धर्मग्रथ, आमचे वाङ्मय व इतिहास, आमचे वीर, राष्ट्रपुरुष, साधु, धर्मसंस्थापक इत्यादि राष्ट्रसंवर्धनाच्या ज्या ज्या बाबी आजपर्यंत घडल्या, अथवा ज्यायोगें आमचे राष्ट्र हीन स्थितीप्रत पोचले, त्याविषयी स्वतः विचार करून, त्यासंबंधी चर्चा करून उपाय चिंतनाच्या व योजनेच्या मार्गास आमच्या समाजातील फारच थोडे पुढारी लागले आहेत. जरी गेल्या १०-१२ वर्षांच्या अवधीत थोडा इष्ट मार्गाने सुधारणा चालू आहे व लोकांत स्वाभिमानाचा अंकुर ज्योत पेटली आहे, तरी त्या पूर्वीच्या काळात वर निर्दिष्ट केलेली मानसिक अवस्था फार प्रामुख्याने आढळून येत होती, आणि अद्यापिसुद्धा तिचा पगडा समाजात बराच आहे; तरी तिचा निरास व्हावा व पाश्चात्य ग्रंथकार जे जे म्हणतील, ते ते वेदवाक्य असे मानण्याची प्रवृत्ति पार नष्ट व्हावी अशी इच्छा असणे अगदी स्वाभाविक आहे, व त्यासच अनुसरून या पाश्चात्य पंडितांच्या आभ-प्रायाने काहा विवेक-शून्य व विचार-शून्य लोक असतील त्यांच्या डोळ्यात अंजन पडावे व आमच्या अवतारी राष्ट्रपुरुष बद्दल योग्य अभिमान उत्पन्न व्हावा, म्हणून खाली काहा अभिप्राय उद्धृत करणार आहों.

रामायण ग्रंथासंबंध कोठेही परस्पर भेद आढळून येत नाहीं. भाषा अत्यंत सुंदर असून कल्पना तर फारच बहारीच्या आहेत. सर मोनियर विल्यम्स म्हणतो की, " संस्कृत वाङ्मयामध्ये रामायणाइतके मोहक काव्य दुसरे कोणतेच नाहीं. भाषेतील साधेपणा, स्पष्टता व निर्दोषत्व हे आभिजात काव्यातील गुण, शुद्ध काव्यभावनेच्या सुंदर छटांची विपुलता, वीररसात्मक प्रसंगाचा अक्षरशः वर्णने, ग्रंथातील अत्यंत भव्य देखाव्यांचा शब्दचित्रे, मानवी चित्तातील निर-निराळ्या विचारांचे कसकसे युद्ध चालते, यांविषयी पूर्ण ज्ञान आणि त्यातील

अत्यंत विशुद्ध भावनांशी पूर्ण परिचय इत्यादि गुणांनी जगांतील कोणत्याही भागात, कोणत्याही काळी निर्माण झालेल्या अत्यंत सुंदर व मनोरम काव्यामध्ये यांची (रामायणाची) योग्यता फारच मोठी आहे. निसर्गप्राप्त वाढीने भरारलेल्या व विस्तारलेल्या उपवनाची उपमा रामायणास दिल्यास खरोखर काहीही वावगे होणार नाही. गोड व सुंदर उपदेशपर श्लोक हींच कोणी फलपुष्पे, त्रिकालाबाधित सत्य तत्त्वे हेच चिरंजीव, अच्छोदकाचे झरे व परस्परान्वयी विस्तृत व उदात्त कथाभाग हीं गर्द वृक्षराजी अशाप्रकारे ही उपमा किती तरी सार्थ होणार आहे बरं ! रामचरित्र तर किती उत्तम रीतीने रेखाटले गेलें आहे ! रामचरित्रात अल्पल्प सूत्र अखेरपर्यंत जें नेखार्थी वर्तन दृगोचर होत आहे, त्यावरून त्याची मानुषी जीवनक्रमाबद्दल मनात मोठी शंका येऊन हा खरोखर परमेश्वरी अंशच असला पाहिजे, अशी मनाची समजूत होते. त्याच्या अतिमानुष कृत्यांनी कधी कधी आमच्या मनाची मोठी चमत्कारिक स्थिति होऊन काही वेळ तर मन केवळ भावावून जाते, परंतु असे प्रसंग फार वेळ टिकत नाहींत निदान पूर्व भागात तरी एकाद्या शूर, उदारमनस्क, पवित्र व सद्गुणी मनुष्यापेक्षा कवीने जास्त असे रामचरित्रात मुद्दामच दाखविले नाहीं. आज त्याचे शौर्य, निर्लोभता, औदार्य, पित्राज्ञाप्रामाण्य, विमल पत्नीप्रेम, सहोदरप्रेम व क्रोधमय विचारांचा पूर्ण अभाव' इत्यादि गुणांचीं मात्र जितकी तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. आपल्या सापत्न मातेच्या क्रोधास जेव्हा तो बळी पडतो, तेव्हा त्याच्या मुखावाटे एकही रागाचा शब्द निघत नाहीं; जेव्हा त्याचा पिता त्यास वनवासास पाठविण्याचा ठरावितो, तेव्हा तो हूं का चूं सुद्धा करीत नाहीं; आपल्या पित्याच्या माथी प्रतिज्ञाभंगाचे पाप येण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या सुखाची होळी करण्यास तो तयार होतो. व सीतेविषयी तर बोलावयासच नको, कारण तो केवळ गृहलक्ष्मीच होय व तिजमध्ये सद्गुण मूर्तिमंतच अवतरले होते असे दिसतें. "

स्त्रीजातीला सीता हा उत्तमोत्तम आदर्श आहे. तिची थोर पातिव्रत्यनिष्ठा, तिचे अमर्याद प्रेम, पतिपत्नीच्या शाश्वत व दैवी संबंधाविषयी तिची अत्युच्च कल्पना इत्यादि बाबतीत कवीने जी ध्येये कल्पिलेली आहेत, तीं श्रेष्ठपणाच्या व उदात्तपणाच्या दृष्टीनें इतर कोणत्याही भाषेत अगर वाङ्मयात कोठेही पहावयास मिळणार नाहींत

प्रोफेसर डाउडन, प्रिन्सिपॉल ग्रिफिथ, मिसू मेरी स्कॉट इत्यादि विद्वानांनीं व विदुषींनी राम व सीता या दांपत्याच्या गुणवर्णनपर काव्यांनीं आपल्या प्रेममय व स्तुतिपूर्ण निर्झरास वाट मोकळी करून आपले सहृदयत्व व गुणग्राहकत्व प्रकट करून रामायण काव्याची थोरवी, संस्कृत भाषेची प्रभुता व कवीचे अलौकिक रचनाचातुर्य, अप्रतिम शब्दचित्रकौशल्य व गाढविज्ञान इत्यादि गोष्टी आपल्या ग्रंथात ठिकाठिकाणीं कबूल केल्या आहेत.

आतापर्यंत दिलेल्या उताऱ्यावरून रामायणाबद्दल पाश्चात्याच्या हृदयात केवढी पूज्यबुद्धि आहे, त्याचे अध्ययन यूरोपीयन पंडित व विदुषी किती आस्थेने करीत आहेत, त्यांत रामायणाच्या कर्त्याबद्दल केवढा आदर आहे व खुद्द ग्रथांतील प्रत्येक पात्रोपपात्राचा स्वभावपरिपोष, सृष्टिनिरीक्षण, नैतिकशिक्षण रसपरिपोष, वाग्योजनाचातुर्य इत्यादि दृष्टीने त्याचा त्या ग्रंथाचा अभ्यास कसा काळजीपूर्वक व आस्थेने चालला आहे हे दिसून येईल.

आता आपण महाभारत ग्रंथासंबंधी पाश्चात्य व अमेरिकन पंडित, वर्तमानपत्राचे संपादक व इतर विद्याव्यासंगी लोक काय बोलतात तें थोडक्यात पाहूं.

महाभारत ग्रथाची निर्व्याज स्तुति करण्याच्या भरात डॉक्टर हॅसलर नामक अमेरिकन पंडित म्हणतो की, " दैवी स्फूर्तीने भारलेले प्राचीन आर्यावर्तातील अत्यंत थोर महात्मे यांनी जो महाभारत नामक ग्रथ निर्माण केला आहे, त्याचे इतका थोर ग्रथ आजपर्यंत माझे पाहण्यात दुसरा नाही, व माझ्या पूर्व आयुष्यातील अनुभवावरून मी असे म्हणतो की, या ग्रंथाने मला जितकें वेड लावून सोडले, तितके वेड मला इतर कोणत्याही ग्रंथाचे यापूर्वी लागलें नाही. या ग्रथाचा अहर्निश अभ्यास करून मी त्यातून एक हजारावर उतारे घेऊन माझ्या पुढील आयुष्यातील अभ्यासाकरिता त्यांची मांडणी केली आहे. महाभारत म्हणजे एक अभिनव सृष्टीच आहे असे मला वाटते व त्यातील सत्यपक्षप्रीति, ज्ञान, चातुर्य व सत्य इत्यादि गुणसमुच्चयाचे वर्णन वाचून तर मी अगदीं तल्लीन होऊन जातो परंतु एवढ्यानेच त्याचा मोठेपणा संपला असे नाही, तर माझ्या मनाने परमात्मा व जगदुत्पत्ति यासंबंधी जे काही सिद्धान्त बांधले होते, तेच या ग्रंथात सुंदर व स्पष्ट भाषेत सांगितलेले पाहून मला या ग्रंथाबद्दल फारच आदर वाटू लागला, व त्याची थोरवी किती गाऊ असें मला होऊन गेले आहे. "

हॅमिल्टन डेली स्पेक्टेटर या पत्राच्या ३१ मे १८८८ च्या अंकात खालील उतारा आहे:—"हे काव्य म्हणजे धर्म, नीति, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान व राजकारण इत्यादि विषयांमधील तत्त्व-रत्नांचा कथारूप सूत्रांमध्ये गुंफलेला हारच होय. दोन हजारांपेक्षा अधिक वर्षांपूर्वी आर्यावर्तातील लोकांचा जीवनक्रम रीतीभाती, राजकारण, धर्म व तत्त्वज्ञान यांचे हुबेहूब चित्र आम्हास या ग्रंथातून पहावयास मिळते. एवढेच नव्हे तर अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे काव्य आणि अत्यंत थोर व गहन विचारांची पैदास जी या जगावर झालेली दिसते, त्यापैकी बरेच या ग्रंथात आढळून आल्याने यांची अपूर्वता व महत्ता फार वाढते.

बाबू पी. सी. रॉय यांनी मोठ्या नेटाने महाभारताचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध करण्याचे काम चालविले होते व त्या वेळी व्यास अमेरिकन जेरेमिआ कर्टिन नामक मानववंशशास्त्रज्ञाकडून असे पत्र आले की, 'महाभारताचे २ रे भाग सावधतपणे व काळजीपूर्वक मी नुकतेच वाचून संपविले आहेत, व त्यावरून माझी खात्रीच अशी समजूत झाली आहे की, या ग्रंथाइतका श्रेष्ठ ग्रंथ दुसरा नाही, व यापासून मला जेवढा आनंद झाला, तेवढा इतर कोणत्याही ग्रंथामुळे आजन्मात आला नाही. आर्यांच्या बुद्धिमत्तेविषयी व स्वच्छ शीलाविषयी या ग्रंथवाचनाने सर्व लोकांच्या नेत्रांत चांगलेच अंजन पडेल. तुम्ही जे कार्य हाती घेतले आहे त्यायोगे केवळ हिंदुस्थानचेच हित होईल असे नाही, तर सर्व आर्यवंशाचेही कल्याण त्यायोगे होणार आहे. मह भारत ही एक फार विशाल खाण आहे व तीमधील संपत्तीचा अद्यमास अजून जगाला लागलेला नाही. यातील रत्ने जसजशी बाहेर येतील तसतसे याचे महत्त्व जगास कळू लागेल. या ग्रंथातील माहितीने आर्यवंशाचा इतिहास कळावा, अशी ज्यास तीव्र लालसा आहे त्यांचे समाधान होईल, व देव हुबेहूब मानव आणि अत्यंत शक्तिमान सर्वव्यापी परमात्मा यांचे काय नाते आहे याचाही बोध स्पष्टपणे यावरून होणार आहे.'

१९८६ च्या सप्टेंबरच्या अंकात सान्हिलेर पॉर्टेल्मी नामक एक फ्रेंच मार्सिककार म्हणतो की, 'सुमारे १०० वर्षांपूर्वी विल्किन्स नावाच्या गृहस्थाने महाभारतातील काही वेचे छापून प्रसिद्ध केले, आणि भगवद्गीतेच्या प्रसंगाने या प्रचंड ग्रंथाचा परिचय जगास करून दिला. या ग्रंथाचा भव्यपणा पाहून सर्व पाश्चात्य जग थक्क झाले. होमर हा महाभारतकार व्यास यांजपुढे कःपदार्थ असे सर्व लोक मानू लागले व आर्यावर्त ग्रीसपेक्षा श्रेष्ठ आहे, अशी सर्वांची खात्री झाली, आणि गतकालीन मानवी बुद्धिमत्ता व परिश्रम यांचे हे भाग-

नीय महाकाव्य म्हणजे अति श्रेष्ठ व भव्य स्मारकच होय, याबद्दल सर्वांचे ऐकमत्य झाले. " सर एडविन आरनोल्ड, टीटस मनसनकोन, ए. बार्थ इत्यादि पौंडित व वाटर-प्राऊन पोस्ट, हॉमल्टन डेली स्पेक्टेटर वगैरे वर्तमानपत्राचे संपादक यान्या मतांचा निष्कर्ष काढला असता खाली दिलेले विशेष महाभारतात आढळून येतात.

' महाभारताचे काही भाग लेखनकला अवगत होण्यापूर्वी तयार झाले आहेत, काही पौराणिक कालापूर्वी रचलेले आहेत व काही होमर आणि हाजिऑयन लोकांचा आद्य मनु मोसेस यान्याही कालापूर्वी लिहिलेले आहेत. एकंदरीत पाहता जगातील कोणत्याही भाषेतील महाकाव्यापेक्षा हे संस्कृतभाषेतील महाभारत नावाचे महाकाव्य अत्यंत श्रेष्ठ, सुने मोठे, मजेदार व चमत्कृतजनक आहे. यात नैतिक व सदुपदेशपर, अद्भुतरसात्मक भाग ठिकठिकाणी फारच असून, एकंदर कथाभाग फारच मोठ्या प्रमाणावर आखलेला आहे. व यातील पात्रे व पात्रांतील स्त्रिया इतर कोणत्याही भाषेतील पौराणिक व ऐतिहासिक वीरांपेक्षा व सावित्र्यांपेक्षा फारच श्रेष्ठ प्रतीचे आहेत. यात कित्येक ठिकाणी जे युद्धप्रसंग उत्साहोत्पादक प्रसंग आणि अतुल, कोमल व हृदयस्पर्शी भागभाग आहेत असे इतरत्र कोठेही आढळणार नाहीत. राष्ट्रीय नीतीचे शास्त्र्याचे व प्रतिपादनाचे हे भांडारच आहे. काव्याचा पोषक असलेले मार्मिक नीतिशास्त्र व्यास पाहणे असल्ते यानेच महाभारताचे सर्वाकर्षक झाले. त्यांचे स्वभावचित्रण कार्य इतक्या कुशलतेने झाले आहे की, असंख्य पात्रे असून प्रत्येक ने स्वभावविशेषाने वेगळेपणा राखिले आहे इतकेच नव्हे तर त्यान्या कौशल्यपूर्वक निरनिराळ्या स्वभावछटांचा योग्य उठाव झाल्याने प्रत्येकाची स्वतंत्र नीतिधर्म एकमेकाच्या स्वभावविशेषाकडेला सहायभूतच झाला आहे. पात्रांच्या परस्परांचे कार्यसौंदर्य मनोरंजक रितीभाती, विचित्र गहणी व नैसर्गिक आनंदी मनोभावना, यांचाही चित्रपट फारच सुंदर रंगलेला आहे. एकंदर पंथाचा भाषा प्रौढ, नियमबद्ध व दीर्घ परिशीलनाने सुसंस्कृत असून भाषाप्रयोजकांच्या ज्या काही पायऱ्या म्हणून मानल्या जातात, त्यांपैकी फारच वरच्या पायरीवर बसण्यायोग्य खास आहे. यात वर्णिलेली शहरे व राजगृहे पूर्ण वैभवशाली व अलंकृत आहेत, यातील रणक्षेत्रेसुद्धा एका प्रकारांने भावनाच आहेत. कारण त्यात कोठेही बेसुमार व किळसवाण्या क्रौर्याचे प्रकार वर्णिलेले नाहीत प्रत्येक कथेच्या मुळाशी वासनातत्त्व अस्पष्टपणे का असेना पण

आरोपीत केलेले आहे, जितकी जितकी एकादी कल्पित
दिसेल, तितकें तितके तिच्यामध्ये सत्यासत्य युद्धाचे गहन
तेने प्रतिपादलेले आढळून येईल; व आत्मसंयमन, इंद्रि
इत्यादि गोष्टींनी परिकरबद्ध चिरंजीव सत्याच्या भयंकर
व विजयाची आशा सोडून लढत कशी चालू ठेविली पा
फार सुंदरपणे यात दिलेले आपणास आढळेल. मनुष्या
भावनामय झाले पाहिजे, असा सर्वत्र कटाक्ष दिसून येतो व
मधील रानटी, क्रूर मनोभावना कोणत्याही प्रकारे उत्तेजित ह
फार खबरदारी घेण्यात आली आहे. सर मोनियर विल्यम्स
' गार्हस्थ्यधर्म व पतिव्रताधर्म या दोहोचे उद्बोधन यात फारच सुदर
अनेक प्रकारच्या उदाहरणांनी हे धर्म मनावर बिंबवण्याचा अत्यंत आर्य आ
सफल झाला आहे कौटुंबिक व सामाजिक सुखाचे मनोहर व मर्मस्पर्शी
तर फारच बहारीचे आहे. सर्वत्रसिद्ध व सर्वकाल सत्य अशा मानवी स्वभा
वातील सर्वजनसामान्य भावना व स्फूर्ति याचे यथायोग्य निदर्शन व कौटुंबिक
प्रेमप्रसंगाचे चित्रकर्म ह्या बाबतीत संस्कृत महाकाव्यांची सर कोणासच येणार
नाही. आतापर्यंत निरनिराळ्या पंडितांच्या अभिप्रायाचा जो गजबजा विणण्यात
आला, त्यावर जरतारीच्या सूत्राचें आच्छादन घालण्याकरिता आपण असे
म्हणूं कीं, मानवी बुद्धि-सुंदरीच्या अत्यंत विशुद्ध व सुंदर विलासाचे महाभारत
म्हणजे केवळ क्रीडागणच होय.

मधुर, दिव्य गीर्वाण भाषेतील जी अत्यंत श्रेष्ठ अशी दोन महाकाव्ये,
याचा येथवर विचार झाला. आता यापुढे महाकाव्याच्या जातींचे अर्थात
महाकाव्यांचे गुणधर्म कमी अधिक प्रमाणाने असलेली इतर जी काही आहेत
त्यांचा फक्त जाता जाता नामनिर्देश करूं. रघुवंश, शिशुपालवध, किरातार्जुनीय
भट्टिकाव्य, कुमारसंभव, नलोदय, राघवपांडवीयविजय व नलदमयंती इत्यादि
काव्यामध्ये वर निर्दिष्ट केलेले गुण कमी अधिक प्रमाणाने आढळून येतात.

वरील काव्यामध्ये जे जे गुण अथवा रस कवींच्या अचाट बुद्धिसामर्थ्याने,
अलौकिक कल्पनाशक्तीने, संस्कृत भाषेच्या अनुपम प्रगल्भतेने व माधुर्याने परिपक्व
दशेस आणले गेले आहेत, ते पाहून यूरोपियन पंडितांची बुद्धि कुंठितच होऊन
जाते. याला कारण त्यांचे ठिकाणी बुद्धिप्रकर्षाचा अभाव आहे असे नाही
परंतु हा भेद दोन राष्ट्रांतील परिस्थितिभिन्नत्वामुळे उत्पन्न झाला आहे. भिन्न

विचारसरणी, व संस्कृति याचाही थोडाबहुत परिणाम या कामी झाला असलाच पाहिजे. ग्रीस, रोम व आर्यावर्त यान्या नैसर्गिक माडर्णाकेंड लक्ष दिले तर आपणास असें आढळून येईल की, या कामी निसर्गाची भारतायास फार मदत झाली आहे. ज्या पारिस्थितींत आपण वाढतो, तत्सदृश होणे हा स्वभावसिद्ध धर्मच आहे. यादृष्टीने पाहिल्यास संस्कृत महाकाव्यातील पात्रे अद्भुत शक्तिमान्, महातेजस्वी, अग्नितुल्य पवित्र, पर्वताप्रमाणे धैर्यवान्, पृथ्वीप्रमाणें सहनशील, सत्वाला जागण्याकरिता जीवावर उदार, या प्रकारची आपणास आढळून येतात, प्रत्येक गुण घेऊन तो पराकोटीला पोचाविला आहे. असेच पात्रांच्या वर्णनावरून दिसते. या कामी आर्यग्रंथकाराच्या अप्रतिहत कल्पनाप्राचुर्याची व मनचक्षुंच्या अफाट पल्ल्याचा जरी बराच मदत झाली असली, तरी सभोवतालच्या परिस्थितीचाही तितकाच उपयोग झाला आहे.

आर्य—आचार्य, कवि व ऋषि याचा अखंड सहवास गगनभेदी पर्वत, प्रशांत, गंभीर व विस्तृत पात्रे आण समोवार पसरलेला अफाट व अमर्याद भूभाग, ह्या नैसर्गिक वस्तूंशी जडल्यामुळे त्यान्या स्वरूपाची प्रतिक्रिया यान्या काव्यानिर्मर मनावर आल्याशिवाय राहिली नाही तो कशा प्रकारची झाली याची साक्ष संस्कृत वाङ्मयावरून मिळतच आहे. यूरोप व आर्यावर्त यामधील निसर्गभिन्नत्व सर्वप्रसिद्धच आहे. यूरोपातील भूमीवर वाढलेल्या पाश्चात्यान्या बुद्धीत संकुचितपणा व मनुत्व फार आहे, याचे कारण नैसर्गिक स्थितीच होय. कारण कोणही असो त्याची चिकित्सा करण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु यूरोपियन पंडितान्या ग्रंथावरून असे स्पष्ट दिसते की, त्यांना प्रत्येक भारतीय वस्तु वैभवसंपन्न, श्रेष्ठ, विशाल व कौतुकपूर्ण दिसते. प्रोफेसर हारनसारखा विद्वान म्हणतो की, हिंदूंच्या पौराणिक कथा इतर राष्ट्रांतील कथाप्रमाणे भरपूर तर आहेतच. पण शिवाय सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीन त्या अत्यंत सरस असून, काव्यगुणाची, भाषासौंदर्याची, नीतिबोधाची तर त्यात अगदी रेलचेल आहे.

आता शेवटी एका गोष्टीचा विचार करून हे बरेच लांबलेले प्रकरण पुरे करूं. असा एक वाद बरेच दिवसापासून प्रचलित आहे की, इलियडचा कथाभाग रामायणावरून घेतला आहे, आणि त्याच्या पुष्टयर्थ निरनिराळ्या पंडितानी त्या दोन काव्यामधील पात्रांची अनेक दृष्टीनी तुलना करून ही गोष्ट सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्याच्या वसाहती' या प्रकरणामध्ये असे स्पष्ट दाखविण्यात आले आहे की, तेथील [illegible] मूळचे आर्यावर्तामधील होते आणि ही

गोष्ट एकदां मान्य केली म्हणजे मग हिंदु लोकाच्या पौराणिक कथावरून आणि महाविख्यात व दुर्गम प्रतीच्या महाकाव्यावरून स्वपरिस्थितीला साजेल, चालि-रितीला जमेल व संस्कृति, लोकरुचि याला पटेल अशा स्वरूपात त्यांचे रूपांतर झाले असेल यात कोणासही शंका येणार नाही. दुसरी गोष्ट अशी कीं, ग्रीक लोकाच्या वाङ्मयामध्यें एक जो विशेष आढळून येतो, तो इतर वाङ्मयात कोठेंही दिसत नाही. वाङ्मयाची भूमिका बरेच दिवस कसावी लागते, अप्रसिद्ध लेखरूपी असंख्य कुर्षीवलांनी बहुत कष्ट करून व बरीच मशागत करून ती महा-काव्याच्या पिकाला तयार करावी लागते. वाल्मिकी व व्यास हे महाकवि निर्माण होण्यापूर्वी कितीं तरी दिवस संस्कृत वाङ्मयाची मेहनत सुरू होती. रोमन लोकामध्ये व्हर्जिल व इंग्लिश लोकामध्ये मिल्टन हेच रोमन व इंग्लिश वाङ्मयाचे आद्यजनक नसून त्याच्यापूर्वी फार दिवस या दोन्ही भाषेमध्ये तत्पूर्व ग्रंथकाराचे परिश्रम चालू होते, आणि व्हर्जिल व मिल्टन यांना आपली काव्ये रचण्यास व अभिप्राय प्रसिद्ध करण्यास त्या तयार झाल्या होत्या ग्रीक लोकाच्या वाङ्मयाशी येऊन पोचलो म्हणजे मात्र सर्वच उलट दिसून येते. होमर-च्यापूर्वी कोणीही कवि झाला नसून, त्यानेच ग्रीक वाङ्मयाचा पाया घातला व त्याने जी काव्ये निर्माण केली ती अपरिपक्व, अप्रगल्भ व असंस्कृत भाषेमध्ये लिहिली नसून, महाकाव्याचे सर्वगुण मुख्यत्वेंकरून व छानदारपणे धारण करणाऱ्या भाषेमध्ये लिहिली आहेत. परंतु ही गोष्ट सृष्टिक्रमाच्या व इतर वाङ्मयाच्या वृद्धीच्या इतिहासाला सोडून झमल्यानंतर वर जो सिद्धान्त मांडला आहे, त्याला बळकटी येते. ग्रीक काव्यामधील व इतर गद्य प्रबंधामधील पात्र, कथासूत्रे व प्रसंग यांची संस्कृत ग्रंथामधील पात्रांशी, प्रसंगांशी व कथासूत्रांशी इतकी एकरूपता आहे कीं, संस्कृतावरील हा ग्रीक पोशाख असावा अथवा निदान संस्कृतामधील पुष्कळ विचार तरी घेतले असावे हे खास.कर्नेल विल्फोर्ड, कौट, जॉनस्टर्ना व प्रोफेसर मक्स डंकर या पाश्चात्य पंडितांच्या मताने हीं गोष्ट जवळ जवळ सर्वसंमत झाली आहे. ते असे स्पष्ट म्हणतात कीं, रामायण व महाभारत या ग्रंथामधून पुष्कळ कथाप्रसंग घेऊन प्राचीन ग्रीक लोकांनी आपल्या भाषेत, आपल्या रुचीप्रमाणे, देशाराजाप्रमाणे व संस्कृतीला धरून त्यावर पुष्कळ काव्ये लिहिली आहेत

येथवर दाखविल्याप्रमाणे महाकाव्ये जितकी महत्त्वाचीं, सुंदर व मननीय आहेत तितकेच संस्कृतामधील नाट्यग्रंथही आहेत. हिंदुस्थान म्हणजे सर्व जगाचा लहान मासला आहे, असें मानण्याचा बराच प्रघात आहेत अर्थात् जगातील

लहान मोठी प्रत्येक वस्तु, वनस्पति, सर्व प्रकारची हवा, सर्व रुचीचे पाणी, बहुतेक सर्व धान्ये, नानाप्रकारचे रमणीय देखावे, बहुतेक प्रकारचे धातू वगैरे जिन्नस हिंदुस्थानांत पैदा होतात ही गोष्ट कांही खोटी नाहीं. वर वर्णन केल्या प्रमाणें जरी स्थिति असली, तरी काव्य व नाटके याविषयीं बोलताना फक्त हिंदुस्थानातील भूभाग व नैसर्गिक परिस्थिति हींच स्पष्टपणें अभिप्रेत असलीं पाहिजेत; आणि याचे प्रत्यंतर आपणास संस्कृत काव्ये व नाटके वाचून येणारे आहे. सृष्ट-वर्णन हा संस्कृत कवींचा विशेष गुण आहे व त्याचे संवर्धन संस्कृत वाङ्मयामध्ये जितके झालेले आढळेल, तितके प्राचीन अथवा अर्वाचीन इतर कोणत्याही वाङ्मयामध्यें झालेले आढळणार नाही. हिंदुलोकांत असलेली सौंदर्याभिरुचि व कौतुकास्पद सूक्ष्म निरीक्षणशक्ति, याच्या योगे सृष्टीतील अत्यंत विस्मयकारक देखावे व मनोवेधक रमणीय स्थळे याजकडे त्याचे लक्ष आकर्षिले जावे हे अगदी साहजीक आहे, परंतु हिंदुलोकामध्ये जरी हे गुण असले, तरी याच्यापेक्षा श्रेष्ठ प्रतीचे इतरही गुण त्यांचेमध्ये आहेत व त्या सर्वांमध्ये अत्यंत श्रेष्ठ म्हटला म्हणजे मानसीक परिस्थितीचे संशोधन व विचार आणि भावना याचे सूक्ष्म पृथक्करण करण्याची तीव्र लालसा.

याच गुणाच्या बळावर मानवी मनाच्या अंधकारमय कोठडीमध्ये अज्ञात असलेल्या वाच्छा, भावना, विचार, आवडीनावडी, प्रेमविषय, प्रवृत्ति, गुणावगुण याचा मार्मिक पारदर्शक व बरोबर चित्र नैसर्गिक काव्यप्रचुर प्रतिभेने काढलेले, आपणास संस्कृतामधील ग्रंथात ठिकठिकाणी पहावयास सापडते. म्हणून या बाबतात संस्कृत वाङ्मयाची बरोबरी इतर कोणत्याही वाङ्मयास करिता न आल्याने ते सर्व जगास अत्यंत वंदनीय झाले आहे यात कांही नवल नाही. निसर्गधर्माचे यथास्थित आकलन करून त्याचे बरोबर शब्दचित्र उठविणे, हा संस्कृत नाटकाचा विशेष गुण आहे. त्याचप्रमाणे पात्राचा स्वभावपरिपोष यथासांग पूर्ण करून, प्रत्यक्ष सृष्टींत दिसणाऱ्या परिस्थितीशी किंमपि विरोध कधीही घडलेला दिसावयाचा नाही. अप्रस्तुत वर्णन, विषमता आणि अतिक्रम हे अवगुण पात्राच्या स्वभावांत अथवा कथानकात कोठेही आढळून येणार नाहीत. या कडक शिस्तीमुळे वाङ्मयप्रदेशाचे यथास्थित आचरण केल्यामुळे फक्त शेक्स्पियरखेरीज इतर कोणत्याही पाश्चात्य कवींना संस्कृत कवींची बरोबरी करिता आली नाही.

भाषेची तूर गोष्टच काढावयास नको. कारण सौंदर्य व गांभीर्य या बाबतींत

इतर भाषांना गीर्वाणवाणीचे प्रभुत्व मान्य केलेच पाहिजे, अशी तिची योग्यता आहे याबद्दल कोठेही द्वैतमत आड्डून येणार नाही.

येथवर सामान्यपणे संस्कृत नाट्यकवींचा प्रतिभा-विशेष वर्णन केल्यावर नंतर नाट्यसंपत्तिकडे वळणे हे ओघानेच प्राप्त होते. ख्रिस्ती शकाच्या पूर्वी एक शतक विक्रमादित्य हा साहित्यप्रेमी व विद्वज्जन पुरस्कर्ता राजा होऊन गेला. याचे कारकीर्दीत कवि, तत्त्वज्ञानी, गणिती इत्यादि गुणीजनाच्या बुद्धिसामर्थ्याचे योग्य चीज होऊन एकंदर वाङ्मयाची सर्वांगीण वाढ होण्यास बरीच मदत झाली असली पाहिजे. प्रोफेसर हीरनच्या मते कालिदास उत्पन्न होण्यापूर्वी पुष्कळ वर्षे सर्व राष्ट्राची बौद्धिक प्रगति बरीच झाली असली पाहिजे. कारण अशा जगद्विख्यात कवि-कृतीचा रसास्वाद घेण्यास राष्ट्रामध्ये एक प्रकारची लोकाची तयारी असावी लागते. एरवी असे कवि निर्माण होणे व त्यास उत्तेजन मिळणे अशक्य असते. कालिदास होण्यापूर्वी पुष्कळ थोर कवि होऊन गेले असले पाहिजेत. आणि त्यापैकी दंडी हा एक होय. परंतु दुःखाची गोष्ट ही की, त्याच्या ग्रंथापैकी आज एकही उपलब्ध नाही, व याबद्दल सर्व सुधारलेल्या गुणज्ञ जगाला अखंड बाईट वाटून, ते आपल्याला दुर्दैवी समजेल यात काही शंका नाही. साहित्याच्या इतर शाखा व विज्ञान यांची त्या रसशून्य व नाशप्रिय काळाने ज्या प्रकारची संभावना केली तीच दंडीच्या ग्रंथाची केली असली पाहिजे. काळाच्या हातून जे काही चुकून राहिले होते, त्याची वाट मुसलमानांनी लावली. यावरून आपणास असे म्हणता येईल का, ह्या देशी मुसलमानाचे आगमन होण्यापूर्वी काळाच्या तडाक्यातून जे काही शिल्लक राहिले होते, त्याचा विध्वंस करण्यात मुसलमानांनी आपल्या गुरुवर उत्तमच ताण केली अर्थात आता जे शिल्लक राहिलेले दिसत आहे, ते वरील दोन मानुष व अमानुष सहारकाच्या हातून. परंतु सर विल्यम जोन्सच्या मते ही अवशिष्ट ग्रंथसंख्यासुद्धा यूरोपातील एका आधुनिक वाङ्मयाच्या किती तरी पट आहे ! यावरून संस्कृत ग्रंथसंपत्तीची विपुलता किती होती याचा कोणासही अदमास करता येईल. परंतु नष्ट संपत्तीचा मोजदाद जरी बुद्धिसामर्थ्याचा थाग घेण्यास उपयोगी पडली तरी शेवटी मनुष्यस्वभावानुरूप दुःख होणे हे साहजिकच आहे. मनाची अशी विव्हल स्थिति बाजूला सारून प्रत्यक्ष असलेल्या ग्रंथसंपत्तीचा उपभोग घेणे, व गुणावगुणाची चर्चा करणे, त्यात तल्लीन होऊन जाणे, हेच समाधानाचे साधन आहे. याकरिता आपणसुद्धा तेच काम हाती घ्यावे हे बरे.

प्रोफेसर विल्सन म्हणतो की, " जे थोडे नाट्यग्रंथ उपलब्ध आहेत ते केवळ आपल्या स्वतःच्याच तेजाने व सामर्थ्याने काळाच्या कात्रीतून निसटले असले पाहिजेत अशाच नाट्यविषयक ग्रंथापैकी ' दशरूपक ' या नावाचा ग्रंथ आज हयात आहे. संस्कृतमध्ये नाटकाला रूपक असे नाव आहे. या ' दशरूपक ' ग्रंथात नाटकाचे दहा प्रकार दिले आहेत. त्यावरून हिंदुलोकांमध्ये या शास्त्राची केवढी वाढ झाली होती हे स्पष्ट दिसून येईल.

प्राचीन ग्रीक वाङ्मयामध्ये नाट्यविषयाची चागलीच वाढ झाली होती; परंतु तिची बरोबरी संस्कृत नाट्यशास्त्र व ग्रंथसंपत्ति याजपाशी केव्हाही करिता येणार नाही. संस्कृत नाट्यशास्त्रांत खाली दिलेले ठळक महत्त्वाचे गुण आढळतात.

(१) संस्कृत नाट्यशास्त्रात नऊ रस सांगितले आहेतः--शृंगार, वीर, करुण, भयत्सा, भानक, भीम, हास्य, अद्भुत, शातरस

(२) संस्कृत नाटकातील शृंगार इंद्रियविशिष्ट नसून भावनाजन्य आहे. अर्थात् इंद्रियादि सौष्ठवामुळे त्याची उत्पत्ति नसून केवळ शुद्ध प्रेमरूप भावनेमुळेच असते. तसा प्रकार ग्रीक अथवा लातीन भाषेतील आनंदपर्यवसायी नाटकात आढळत नाही.

(३) सस्कृतातील वाग्रस विवेकहीन नसून प्रशात व स्वाधीन असतो.

(४) स्त्रीपात्राच्या बाबतीत भूमिकातराचा प्रकार क्वचितच आढळेल.

(५) योग्य प्रसंगी व कथासूत्रास धरून नाटकाचे अंक पाडण्याची पद्धति ग्रीक लोकात केव्हाही ठाऊक नव्हती.

(६) आधुनिक नाटकामध्ये " स्वगत " " एकीकडे " इत्यादि प्रकार रंगभूमीवरील कामाकरिता ज्याप्रमाणे उपयोगात आले आहेत, तसेच ते संस्कृत नाटकातही त्याच कार्याकरिता उपयोगात आणलेले आहेत.

(७) शोक व गाभीर्य याचे हास्यविनोद व लघुता—याजबरोबर असलेले अव्याहत व अवश्य साहचर्य संस्कृत नाटकामध्ये उत्तम रीतीनें रंगविलेले सर्वत्र दिसेल.

(८) नाट्यकलेपासून थोर उद्देश व मोठे परिणाम घडून येणे शक्य आहे, या गोष्टीची संस्कृत नाटककारास केव्हाही विस्मृति झालेली नाही, आणि संस्कृत नाटकाची थोरवी आहे ती यातच. प्रोफेसर विल्सन एक उदाहरण घेऊन असे म्हणतो की, परस्त्री हा नाटकातील कृष्णकारस्थानाचा, कपट कृत्याच

अथवा नाट्यविलासाचा विषय झाला आहे, असे संस्कृत भाषेत एकही नाटक आढळून येणार नाही. या जगांत भुकेच्या खालोखाल देहधर्मामध्ये शृंगाराची योग्यता आहे, व जगातील प्रत्येक नाट्यवाङ्मयाचा तर तो केवळ प्राणच आहे. मिसेस मॅनिंग नावाची विदुषि म्हणते कीं, भारतीय काव्याखेरीज जोरदारपणे परंतु मार्दवानें शृंगाररसाची मांडणी केलेली इतरत्र आढळून येणे दुरापास्त आहे.

वर दिल्याप्रमाणें संस्कृत नाटकाचे आठ विशेष गुण आहेत, व प्रोफेसर विल्सनप्रभृति पाश्चात्य पंडितासुद्धा संस्कृत नाट्यशास्त्राची सर्वांगीण वाढ किती मान्य आहे, हें याच्या अभिप्रायावरून कळून येईल. यापुढे आपण जगमान्य संस्कृत नाटककार कालिदास व भवभूति यासंबंधाने पाश्चात्य पंडित प्रेमाने, आदराने, कौतुकाने व अंतःकरणपूर्वक काय काय म्हणतात तें सहज थोड-क्यांत पाहूं.

ख्रिस्ती शकाच्यापूर्वी एक शतक राजा विक्रमादित्य याचे कारकीर्दीत कालि-दास होऊन केला व त्याचे नंतर बऱ्याच शतकांनीं भवभूति निर्माण झाला. कालिदास हा या जगात अत्यंत श्रेष्ठ नाटककार होऊन गेले. त्यापैकी एक होता असे सर्वांचे मत आहे. 'शाकुंतल' ही त्याची अत्यंत श्रेष्ठ कृति होय त्यातील कथाभाग महाभारतातून घेतलेला आहे हे हिंदी वाचकास नव्याने सांगणे नकोच. ह्या नाटकाची कीर्ति अत्यंत लाबवर पसरलेली आहे. यातील सौंदर्य, मोहकपणा, कोमलता, व मृष्टीची बरोबर नक्कल इत्यादि गुणानीं जगांतील नाट्यवाङ्मयात ते प्रमुख स्थानी जाऊन बसलेले आहे. प्रोफेसर हर्डर नामक पंडित आनंदातिरेकाने म्हणतो कीं, "कालिदास जन्माला येऊन त्याने आपल्या राष्ट्राचेंच नाव अजरामर केले, असे नसून सर्व सुधारलेल्या जगाच्या कीर्तीत त्यानें अपूर्व भर टाकली."

आगस्टस श्लेजेल, अलेकझांडर हंबोल्ट, गटे इत्यादि गीर्वाण भक्तांनीं कालि-दासाच्या शाकुंतल कृतीविषयी अंतःकरणपूर्वक अत्यंत प्रशंसोद्गार काढलेले आपणांस सर्वत्र ऐकावयास सांपडतात.

शकुंतलेचा शोक व प्रेम यावर गटे नामक महाविख्यात जर्मन कवीने, एक काव्य रचलें आहे. एकंदरीत संस्कृत नाटकाच्या भाषेविषयी प्रोफेसर विल्सन म्हणतो कीं, कालिदास व भवभूति यांच्या नाटकांतील श्लोकांची भाषा इतकी

मंजुळ, सुस्वर, भारदस्त व उदात्त आहे की, त्याप्रमाणें दुसरी भाषा कोठे पहावयास मिळेल अशी आशा करणें हें सुद्धा वेडेपणाचे होईल.

ख्रिस्ती शकाच्यापूर्वी एक शतक अथवा त्याहून पूर्वीच्या काळांतील नाट्य वाङ्मय आपणास उपलब्धच नसल्याने त्याच्या गुणावगुणासंबंधी काही बोलताच येत नाही. परंतु ज्या काळातील अत्यंत जुनें म्हणून नाट्य–वाङ्मय आपणास मिळालें आहे, त्यावरून पाहतां भाषा, व काव्यरचना याच्या अभ्यासाची परमावधि झालेली आपणास पहावयास मिळेल, आणि प्रोफेसर हरिनच्या मतें विक्रमादित्याची कारकीर्द म्हणजे जगाविख्यात कवींच्या अत्यंत थोर कृतींचा प्रसवकाळच होय.

शाकुंतलच्या खालोखाल विक्रमोर्वशी या नाटकाचा योग्यता आहे. प्रो. विल्सन यानें ह्या दोन नाटकाची फार बारकाईने तुलना करून असा अभिप्राय दिला आहे कीं, " दोन्ही नाटकांतील वर्णनसौन्दर्य, भावनामार्दव, कोमलविचार, चारुता व भाषासरणींतील अत्यंत श्रेष्ठ थाटमाट, हे गुण दोहोमध्ये सारखेच आहेत. कोणाला सरस ठरवावे हा प्रश्न फार अवघड आहे. परंतु विक्रमोर्वशीच्या कथेची रचना इतक्या चातुर्याने व खुबीने झाली आहे, आणि त्यातील प्रसंग एकामागून एक असे इतक्या नैसर्गिक पद्धतीने व क्रमानें आले आहेत की, क्षणभर शाकुंतलसुद्धा त्या बाबतींत मागे पडेल. त्याचप्रमाणे दुसरा प्रमुख गुण म्हटला म्हणजे त्यांतील काव्य हा असून एकंदर गोष्ट परिस्थिति व पात्रे या बाबतींत उच्च प्रकारचे कल्पना-प्रभुत्व दिसून येते उर्वशीची गोष्ट कालिदासाने कोठून घेतली व मुळातील पुराणकथेत त्याने नाटकाच्या दृष्टीने काय काय फरक केले, हें पाहिले म्हणजे त्याच्या बुद्धि-चातुर्याबद्दल, कविकल्पनेबद्दल व नूतन रचनाकौशल्याबद्दल मन अगदी आश्चर्यस्तंभित होऊन जाते.

आता थोडेबहुत भवभूतीकडे वळणे बरे. याची " उत्तररामचरित " व " मालतीमाधव " अशी दोन फार प्रख्यात नाटके आहेत. पैकी पहिल्यांत म्हणजे " उत्तररामचरितांत " करुणरसावर फार भर दिलेली आहे. ह्याच्यांतील विशुद्ध व नैसर्गिक करुणरसासारखा करुणरस इतर संस्कृत नाटकात कोठेंच पहावयास मिळणार नाही कुसुमकोमल भावनाचे अद्भुत हातोटीने केलेले प्रदर्शन खेरीज करून रणशूर राजपुत्राच्या आदर्शभूत स्वभावाचें चित्रही फारच मार्मिकपणें व सुबकपणे कोंदलेलें आहे. राम व सीता या जोडप्याच्या जीवनक्रमास,

अत्यंत सफाईने या नाटकात जो तेजोमयपणा व दैदीप्यपणा आणलेला आहे, त्यापेक्षा जास्त भाषणें, हे मानवी काव्यकारागिरीच्या शक्तीबाहेरचे काम आहे. सरळपणा व सौंदर्य या दृष्टीने पाहिले असता, ह्या नाटकात आणखीही जी निरतिशय व थोर प्रभेची विचाररत्ने सर्वत्र विखुरलेली दिसतात त्याना तर इतर कोणत्याही वाङ्मयात तोड च नाहीं.

अत्यंत दुराराध्य, असे जरी कोणाचे मन असलें, तरीसुद्धा त्याचे या नाटकानें क्षणभर समाधान झाल्यावाचून राहणार नाहीं. हे नाटक व युरोपातील इतर निरनिराळ्या भाषेतील बरींच नाटके, याजमध्यें एक प्रकारचे मजेदार साधर्म्य आहे. त्याचा व याचा समानधर्म मनोविकारात आहे. युरोपियन लेखकाना आशियामधील लोकाविषयी लिहितांना ते फार मनोविकारवश असतात. त्यांची मने बेताल असून त्यावेवर विवेकाचे दडपण फारच थोडे असते. इत्यादि प्रकारे लिहिण्याची फार दुष्ट खोड लागलेली आहे, तो या नाटकाच्या अभ्यासाने व यात दाखविलेल्या समतोल मनोविकाराने बराच दूर होईल, अशी आशा करण्यास बरीच जागा आहे. मालतीमाधवामध्ये अनुरागाचे जे रमणीय, जोरदार, उठावदार व स्पष्ट चित्र काढलेलें आहे, तशासारखे इतरत्र आपणास कोठेच पहावयास मिळत नाहीं.

येथवर अतिश्रेष्ठ अशा कवींच्या दोन शृंगारप्रधान कृतींतील उत्तमोत्तम गुणांचे कथन केले. आता हिंदूच्या चालिरीती व राजकीय जीवनक्रम ज्यात प्रतिबिंबित झाला आहे, असें विशाखदत्ताचे मुद्राराक्षस नाटक पाहूं. शहरांतील गजबजाट व कार्यमग्नता, राजकीय व दरबारी कारस्थानामध्ये दिसून येणारी अफाट कल्पकता; आणि सेवकजनांची निस्सीम व दृढनिष्ठा इत्यादि प्रकार या नाटकात परिपूर्ण आहेत. आधुनिक काळातील कपटनीतीचा प्रख्यात पुरस्कर्ता मार्किएव्हेली याला प्राचीन काळातील आर्यचाणाक्य असे म्हणतात. ह्या आर्यचाणाक्याची राजकीय कणिकनीति ह्या नाटकात उत्तम रीतीने दाखविलेली आहे. दुय्यम प्रकारच्या अनेक कथानकाचा उपयोग करून मुख्य कथानक रंगविण्याची अप्रतिम हातोटी यात दिसून येते. वरील नाटकाच्या खालोखाल मृच्छकटिक, प्रबोधचंद्रोदय, वेणीसंहार, इत्यादि फार चांगली नाटके अगदी अलीकडील काळापर्यंत निर्माण होत होती. ही सुंदर नाटकनिर्माणपरंपरा मुसलमानांच्या ह्या देशावर स्वाऱ्या होऊन त्याची वस्ती व राज्य या देशांत चालू होईपर्यंत अव्याहत सुरू होती, परंतु पारतंत्र्यशृंखलेने राष्ट्र शरीर जखडून

गेले म्हणजे मनसुद्धां खुरटूं लागते व चलनवलन व्यापाररहित पाणी ज्याप्रमाणे नासून जाते, त्याप्रमाणे हे प्रत्यही खुरटणारे व जीवनक्रियेच्या जोरदार प्रवाहाच्या अभावामुळे तें रोगट होत जाते म्हणतात. त्याचा उत्तम मासला आपणांस येथे पहावयास मिळतो असतु. यापुढे स्वाभाविक प्रेरणेने उत्पन्न होणारी ग्रंथाची वाढ का बंद पडली त्याचे विवेचन येथे अप्रस्तुत होणार आहे. मात्र सुज्ञ वाचकांच्या एवढे ध्यानांत येईल की, स्वातंत्र्य नष्ट झाल्याबरोबर स्वतंत्र ग्रंथही उत्पन्न होण्याचे बंद पडले, व याचे प्रत्यंतर संस्कृत नाटकाच्या अभ्यासावरून मिळणार आहे.

प्रकरण ३ रें.

गीर्वाण वाङ्मय.

वीणाकाव्यें.

वीणाकाव्ये रचताना कथासूत्र फारच लहान असल अथवा कांहीं एकाद्या वस्तूच्या दर्शनाने–उदाहरणार्थ नदी, नाला, मेघाडंबर, पर्वत, नीलाशखरें, धबधबा, पक्षी, कूजित, रम्य उपवन, कोमल बाल, फूल इत्यादि इत्यादि कवीच्या प्रतिभेला धक्का बसून त्यास स्फुरण आले, तर वर्ण्यविषयाच्या तनुत्वामुळे त्याची वीणाकाव्ये फारच लहान होतील व त्रुटितही असतील. आणि श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर म्हणतात त्याप्रमाणे " असल्या वीणाकाव्यामधून कवीच्या प्रतिभेचे तेज चमकून गेले, तरी त्याच्या मनाचा विस्तार किंवा खोली यांची कल्पना त्यावरून करता येत नाही. एका सुवर्णाच्या कणातील सोने आणि सबंध सोन्याच्या लगडीतील सोने हीं कसाला सारखींच भरतील, परंतु सोन्याची लगड पाहून त्याविषयी जी महत्त्वबुद्धि वाटते ती कसोटीच्या दगडाच्या पृष्ठभागास चिकटलेला एखादा कण पाहून वाटत नाहीं. " हा आरोप अर्थात आधुनिक वीणाकाव्याच्या त्रुटित कवितांवरील होय व तो त्याना यथार्थपणें लागू पडतो पण आपणास येथे मराठी वीणाकाव्याचे परीक्षण करावयाचें नसून संस्कृत वीणाकाव्य संबंधी पहाणे आहे.

या ठिकाणीं ज्या संस्कृत वीणाकाव्यासंबंधीं लिहावयाचें आहे, तीं 'गीत-गोविंद' 'ऋतुसंहार' व 'मेघदूत' होत. हीं काव्यें बरींच विस्तृत असून त्यांतील वर्ण्यविषय चिरपरिणामी आहे (Impressive). ह्या काव्यांचे कर्ते सरस्वतीच्या कंठांतील हारामधील अत्यंत उज्ज्वल रत्नें आहेत. त्यांची कीर्ति आखिल अवनीवर दुमदुमून गेली आहे व त्यांच्या काव्यांनीं जगाच्या सर्व भागांतील विद्वानांस वेड लावले आहे.

जी गोष्ट प्रथम विचारांत घेणें अत्यंत अगत्याचे आहे ती ही कीं, ह्या जगद्वंद्य काव्याच्या भाषांतराने त्यांची मूळ गोडी कळणे अशक्य आहे. तीं मुळांतच वाचलीं पाहिजेत. नाहीं तर त्यांचीं यथार्थ कल्पना होणें बाजूस राहून भलताच ग्रह होणें संभवते. ज्या संस्कृत भाषेत हीं काव्ये रचलेलीं आहेत, ती भाषा अत्यंत मधुर व काव्यमय आहे. हिंदूंचीं हीं वीणाकाव्यें सर्व जगतीतलावर आपल्या अतुल तेजाने व लखलखाटाने केवळ निरुपमेय अशीं झालेलीं आहेत.

आर्यांच्या विशिष्ट चालरीति, जीवनक्रम, भावना व चारित्र्य याचा भाषांतरांत हुबहूब ठसा उमटणे अशक्य होते, व त्यामुळे यूरोपियन लोकांना अशा काव्याचे संपूर्ण आकलन होत नाहीं, व त्यांचा माधुरी चाखणें हीं गोष्ट त्यांच्या आवाक्याबाहेरील होते. वरील गोष्टींचा आपण १।२ उदाहरणें घेऊं, म्हणजे तिची यथार्थता पटल्याशिवाय राहणार नाहीं. 'राम वनवासास निघून गेल्यावर भरत त्याच्या पाठोपाठ जातो व त्यास परत फिरण्याचा आग्रह करतो' ही गोष्ट हिंदूंना इतकी साधी व सहज वाटते कीं, त्याबद्दल कोणासच आश्चर्य वाटत नाहीं; उलट बंधुप्रेमाचे उदात्त उदाहरण म्हणून आम्ही त्याची तारीफ करतों. परंतु "टालबाईस् व्हीलर" यासारखे हिंदुस्थानचे इतिहासकार यास ही गोष्ट मानवी मनोधर्माच्या अगदीं विरुद्ध दिसते. रुचिवैचित्र्याचा व भिन्न संस्कृतींचा हा परिणाम आहे. यासंबंधीं आपण कसे पर्यवसान करणार? कैकयीला वचनबद्ध झालेला दशरथ, राम वनास जाण्यास निघालेला पाहून जेव्हा धाय मोकलून रडूं लागतो तेव्हा तो हे निव्वळ ढोंग करतो, असा यूरोपियन इतिहासकार व्हीलर याच्या दृष्टीस भास होतो, परंतु हे सुद्धा वर सांगितल्याप्रमाणे हिंदुस्थानच्या संस्कृतीचे सर्वस्वी अज्ञान होय. एवढा इतका तीव्र विरोध कसा उलगडावयाचा? सबब ज्यास एखाद्या राष्ट्राच्या काव्याचे यथार्थ अध्ययन करावयाचें असेल, त्याने केवळ शब्द व व्याकरण याचे ज्ञान

संपादून पुरे करीन म्हटले तर भागणार नाही. त्याने त्या राष्ट्रामध्ये राहून तेथील देशस्थिति, आचारविचार, रीतिभाति नैतिक व धार्मिक समजुती आणि ईश्वरज्ञानकल्पना यांचें पूर्ण अध्ययन केले पाहिजे व सर्वस्वी तन्मय बनले पाहिजे; तेव्हाच त्यास परकीय काव्याचे पूर्ण आकलन होईल, व त्याच्या शब्दास काही मोल येईल. नाही तर हल्ली ज्याप्रमाणें आपण पहातों, त्याप्रमाणे केवळ गौरवर्ण हा कांहीं सर्वज्ञतेचा निष्कर्ष नव्हे; एका काळी भारदस्त व प्रमाणभूत म्हणून मानलेल्या ह्या परकीयांच्या [illegible] त्यांच्या कागदाइतकी सुद्धा हल्ली कोणी किंमत देत नाहीं. स्वतःचा जीव धोक्यात असला, तरीसुद्धा विनय-दृष्टीने आपल्या जिवलग माणसाशी बोलणे हें लौकिक नीतीच्या आड येते असे वाटल्यास मरण पतकरून अशा प्रकारे बोलणे हे अप्रशस्त असे ठरविण्याच्या अर्थी स्त्रियांना पाहून परकीय पंडितांना काय बरे वाटेल! विनय, आज्ञाधारकपणा, कर्तव्यजागृति इत्यादि बाबतींत हिंदूंच्या कल्पना इतर लोकाप्रमाणे अगदी सध्या, कामचलाऊ व सोयीच्या स्वरूपाच्या नसून जरा जास्त गुंतागुंतीच्या, क्लिष्ट व गूढ स्वरूपाच्या आहेत. सबब अपूर्ण ज्ञानाने परकीय इतिहासकार व पंडित आम्हांविषयी बोलताना ज्या चुका करतात, त्यामुळे आमच्या संस्कृतीवर टपकत येत नसून उलट पक्षी त्यांची विद्वत्ताच नकली व बेगडी दिसते, असे म्हणणे औघानेच प्राप्त होते. परंतु एकंदरीत पाहता वीणाकाव्याबद्दल यूरोपियन पंडितांचे मत फार उदार व स्तुतिप्रचुरच आहे. त्याने थोडे मासले खाली दिले आहेत.

'गीतगोविंद,' हा हयात असलेल्या अत्युत्कृष्ट वीणाकाव्याचा एक सुंदर मासला आहे व त्याच्या सारखे सौंदर्य व माधुर्य दुसऱ्या कोठेही पहावयास मिळत नाही. ग्रिफिथ म्हणतो की, "हे काव्य मूळ संस्कृतामधून वाचल्याखेरीज त्याच्या कवितेची समग्र सुस्वरता प्रत्ययास येणार नाही." सर विल्यम जोन्स व जर्मन पंडित लासेन, रुकर्ट, श्लेजेल इत्यादिकांनी या काव्यावर अत्यंत परिश्रम करून ते समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे; त्यापैकी श्लेजेल म्हणतो की, "कोमल व नाजूक भावना आणि Elegaic love याच्या प्रखर प्रेमचे विशाल आवरण हिंदूंच्या काव्यावर पडलेले दिसते." प्रोफेसर हॉरेस म्हणतो की, "नियम-कपणा व अनुप्रास ह्या बाबतींत ग्रीक वीणाकाव्ये हिंदूंच्या वीणाकाव्याबरोबर केव्हाच तुलनेत टिकणार नाहीत. गद्य भाषांतराने मूळकाव्याच्या रूपाची केवढी हानि होते याचे वर्णन करणे अगदी अशक्य व अस्थानी आहे. परंतु असे गद्य

भाषांतर वाचून सुद्धा "गीतगोविंदाचा" परिणाम मनावर झाल्याशिवाय रहात नाहीं. अशा भाषांतरांत सुद्धा कवीच्या कल्पनेची अत्यंत विपुलता व सुंदर, मोहक वस्तूंच्या विषयीं असलेली तीव्र, निर्दोष व कोमल लालसा याचे जोरदार व रसरशीत वर्णन आपणास पदोपदीं दिसून येते.

ऋतुसंहार हें दुसरें वीणाकाव्य असून त्याचेवर ग्रिफिथ, मिसेस मॅनिंगबाई, सर विल्यम जोन्स, हंटर प्रभृति पंडितांनीं फार व्यासंग केला आहे. त्यापैकीं जोन्स म्हणतो कीं, "सृष्टिविषयक सुंदर व हुबेहुब वर्णनानीं हे काव्य भरलेलें असून त्याचे माझ्या हातून पूर्ण भाषांतर होत नाहीं. याबद्दल वाईट वाटते." वीणकाव्याची कला आर्यावर्तांत फारच पूर्णावस्थेस गेली होती. सर हंटर म्हणतो कीं, "मध्ययुगांतील ब्राह्मणांना ईश्वरस्वरूपज्ञान (theology) वीणाकाव्ये इत्यादि बाबतींत विस्मयकारक दीर्घोद्योग केलेला आढळतो." एकंदरींत मॅनिंग बाईच्या मतें हिंदूंनीं जें "प्रेमवृत्तीचे कित्येक स्थलीं नाजूकपणें व कित्येक स्थलीं फार जोरदारपणें वर्णन केलें आहे, तें तर केवळ अपूर्व होय."

वर्णनपर काव्याचा मेघदूत हा उत्तमोत्तम मासला होय.

मॅनिंगबाई म्हणते कीं, "असल्याप्रकारच्या काव्यामध्ये हे फारच महत्त्वाचे आहे व सर्व यूरोपियन लोकांना तें फार आवडले आहे."

शेवटीं प्रोफेसर विल्सनसाहेबाचा अभिप्राय देऊन विराम पावणें बरें मेघदूतामध्ये समासाचा भरणा बराच आहे; परंतु तेणेकरून त्यांत कसलाही दोष आलेला नाहीं व एकंदर वाक्यरचना अगदीं साहाजिक व सरळ आहे. सुस्वरपणा व भारदस्तपणा यांचे विलक्षण सामंजस्य मेघदूताच्या वृत्तांनें फारच उठावदार व गोड झालेले आहे. कोणत्याही मृत अथवा चालू भाषेमधील समवृत्तविषयक काव्याशीं या मेघदूत काव्याची तुलना केल्यास हे सर्व तत्क्षणीं श्रेष्ठ ठरेल यांत तिलप्राय शंका नाहीं

नीतिबोधपर काव्यें.

कथासरित्सागर, वेतालपंचावशा, सिंहासनद्वात्रिंशती, शुकसप्तति, हितोपदेश, पंचतंत्र इत्यादि जीं नीतिबोधपर काव्यें आर्यपुरुषांनीं रचलीं, त्यावरून त्यांची लोकोत्तर बौद्धिक श्रेष्ठता सर्व जगाच्या निदर्शनास आली आहे वाङ्मयाच्या सर्व बाजूंबरोबर याहीं भागाची आर्यांनीं केलेली वाढ पाहून सर्व जग आश्चर्यानें तोंडांत बोटें घालीत आहे. या वाङ्मयाने यूरोप, अमेरिका इत्यादि जगाच्या

दूर कोपऱ्यात असलेल्या प्रदेशात सुद्धा प्रवेश केला आहे, व यांचा तेथील लोकांवर पडलेली छाप व त्याच्या मनावर बसलेला जबरदस्त अम्मल पाहिला. म्हणजे या काव्यजनकाच्या बुद्धीच्या सर्वग्राहकतेचे कौतुक करावे तेवढे थोडेच असे वाटते.

प्रोफेसर विल्सन म्हणतो की, सुस्थतीत असलेल्या व उत्कर्षोभिमुख समाजामधील लोकाचे खाजगी व सार्वजनिक व्यवहार सर्व बाबतीत सुयंत्रित चालून समाजाचा सर्व बाजूने उत्तम विकास व्हावा याकरिता काही तरी नीतिनियमाची जरूरी असते व याकरिता अनेक शास्त्रशाखापेक्षा त्याची एक स्वतंत्र शाखाच करावी लागते. अशा प्रकारची नीतिशास्त्राचा उभारणी संस्कृतामध्ये सुरस कल्पित कथावर केलेली आहे व त्यायोगे दररोजच्या व्यवहारामधील वर्तन कसे असावे याबद्दल सुंदर उपदेश केलेला आहे. अशा प्रकारच्या कल्पित कथामध्ये राजपुत्र, राजकन्या, मंत्री, साधु, यति व कित्येक ठिकाणी अगदी हलके लोक, पशुपक्षी इत्यादिकामध्ये संभाषणाचे प्रसंग मोठ्या चातुर्याने घालून त्यायोगे राजपुत्र, दरबारी लोक व साधारण व्यवहारातील माणसे यानी कसे वर्तन ठेवावे याचे फार मार्मिक विवेचन केलेले आहे या गोष्टींचे विषय वर सांगतलेले आहेत तेवढेच नसून आंतरराष्ट्रीय संबंध, साम, दान, भेद, दंड, जीवनयात्रेतील निरनिराळ्या अडचणी व प्रसंग इत्यादि कालचक्राच्या परिभ्रमणामध्ये आपण कसे वागावे, धर्म कोणता, अधर्म कोणता, कर्तव्य काय इत्यादि बाबींची चर्चा गोष्टीरूपाने व सहज रीतीने बोधप्रद करण्याची हिंदूंची हातोटी काही अजब आहे खरी."

हल्लीच्या दळणवळणाच्या साधनाविपुलतेमुळे व इंग्लिश भाषेसारख्या जगमान्य भाषेच्या योगाने दुसऱ्या राष्ट्रात अशा प्रकारचे वाङ्मय कसकसे वाढत गेले आहे हे समजणे फार सोपे झाल आहे. इतर राष्ट्रातील अशा प्रकारचे वाङ्मय भाषांतरावरून वाचले असता एक चमत्कारिक गोष्ट आमच्या प्रत्ययास आल्यावाचून रहात नाही; तो अशी की, त्यातील पुष्कळशा कल्पना, प्रसंग व पात्रे हीं आमच्या कथामधूनच घेतली आहेत असे वाटते व कित्येक ठिकाणी तर शब्दशः अनुवाद केलेला आढळतो. तर हे असे कसे झाले आमच्या गोष्टीवर परप्रांतातील अथवा देशातील समजुतींचा चालिरितीचा, कल्पनाचा, देशपरिस्थितीचा पोषाख कसा चढला; आमच्या समाजात तरुण मुलामुलाकरिता जो उपदेशपर, मनोरंजक व चटकदार कथासंग्रह तयार झाला होता तो यूरोप अगर अमेरिका यासारख्या दूरदूरच्या देशामध्ये जाण संभवनीय आहे काय. इत्यादि विचार परकीय देशातील याच प्रकारच्या वाङ्मयाचा अभ्यास सुरू केला असता डोक्यात घोळूं

लागतात व पूर्ण विचारांती ही गोष्ट शक्य आहे असें आपणास मानण्यास काही हरकत वाटत नाहीं व ही गोष्ट आपण प्रत्यक्ष प्रमाणांनींही सिद्ध करूं. परंतु असें करण्यापेक्षा परकीय भाषेतील पंडितांची जर कबुली मिळाली तर आपल्या संशयाचे आपाआप निरसन होईल व त्यानीं आपल्या पूर्वजाविषयीं सकौतुक व आदरपूर्ण काढलेले उद्गार वाचले म्हणजे धन्यताही वाटेल व थोडीबहुत स्वाभिमानाची स्फूर्तीही होईल; याकरिता त्याचेच आभप्राय येथे देणे जास्त श्रेयस्कर आहे.

पंचतंत्र हा कल्पित गोष्टींच्या वाङ्मयामधील अत्युत्कृष्ट ग्रथ आहे. केवळ हिंदुस्थानातच हा सर्वोत्कृष्ट ठरला आहे असें नसून जगाच्या कल्पित कथा-वाङ्मयामध्यें सुद्धां हा अपूर्व असल्याने सर्व विद्वज्जनास त्याने माना तुकवावयास लाविल्या आहेत. सर्व जगांतील कल्पित गोष्टी याच ग्रंथाच्या कमिअधिक आधारानें रचलेल्या आहेत असेही म्हणावयास हरकत नाही. एलफिन्स्टन म्हणतो की, " कल्पित गोष्टी व इतर प्रकारच्या नीतिपर कथा रचण्याच्या कामीं हिंदु लोक सर्व जगाच्या गुरुस्थानी बसण्यास सर्व प्रकारें योग्य आहेत असे दिसते. पाश्चात्य राष्ट्रात अत्यंत पुराणकालीन गोष्टी म्हटल्या म्हणजे बिडपाईच्या. परंतु त्याचें काळजीपूर्वक निरीक्षण केलें असता असे दिसते की भाषा खेरीज करून विचार, कल्पना इत्यादि बाबतींत त्या सर्व तऱ्हेने हिंदीच आहेत. यूरोपियन भाषेच्या झिरझिरीत पापाखातून त्याचे स्वाभाविक हिंदी रूपच जास्त स्पष्टपणे नजरेत भरते.

कोलब्रुक, बॅरन् डी सॉसी, प्रो विल्सन इत्यादि पंडितानीं अत्यंत परिश्रमपूर्वक असे सिद्ध केले आहे की,यूरोपातील सर्व देशाच्या कल्पित नीतिबोधपर वाङ्मयात ज्या ज्या गोष्टी कथन केलेल्या आहेत त्या कमिजास्त प्रमाणात बिडपाईच्या गोष्टीचीं भिन्न भिन्न रूपेच होत व पर्यायानें अर्थात त्याचाही अपत्यसंबध पंचतंत्राशींच येतो.

डॉ. सर डब्ल्यू हंटर म्हणतो की, " इसॉपच्या काळापासून आज तागायत पाश्चात्य राष्ट्रामध्ये प्राण्यासंबंधी ज्या गोष्टी प्रचलित आहेत त्याचे मूलस्थान हिंदुस्थानातच आहे. ग्रीक भाषेतील सिंह व खोकड यांची जी गोष्ट आहे ती वस्तुस्थितीस धरून नाही; परंतु संस्कृतामधील सिंह व कोल्हा याच्यामधील संबंधाचा आधार घेऊन त्यावर ती रचलेली आहे. पचतंत्राचे प्रथम भाषातर प्राचीन इराणी भाषेमध्यें झाले आणि त्यावरून आशियामायनर व यूरोप यातील देशाच्या भाषात

त्यांची निरनिराळी रूपांतरें झाली. हिंदुस्थानांत अत्यंत प्राचीन काळीं निरनिराळ्या प्राण्यांवरून ज्या कल्पित गोष्टी रचिलेल्या आहेत त्याच सांप्रत काळीं इंग्लंड व अमेरिका या देशांतील प्रत्येक घरांत लहानपणीं मोठ्या प्रेमाने मुलांस सांगितल्या जातात. वनदेवता, अप्सरा, यक्ष, किन्नर इत्यादि देवकोटींतील उपदेवतांवरून ज्या गोष्टी वर्सविलेल्या आहेत त्यांत हिंदूंच्या बुद्धिप्रभावाचे सुंदर चित्र उमटलेले आहे, व इराण, अरबस्थान आणि ख्रिस्तधर्मीय देश यांच्या वाङ्मयांत पुढे ज्या अशाच प्रकारच्या गोष्टी गुंफल्या गेल्या त्यांच्या मातृस्थानीं संस्कृतामधील मूळ गोष्टीच आहेत."

प्रो. मॅक्समुल्लर म्हणतो की, "इराणचा राजा खुस्रू नौशेरखान (५३१–५७९) याने बारझोईनामक आपला राजवैद्य पाठवून पंचतंत्राचे पल्हवी भाषेमध्ये भाषांतर करविले" आणि मॅनिगबाईंच्या मते जगांतील साधारण विख्यात भाषेमध्ये ज्या ज्या म्हणून बोधपर गोष्टी आहेत त्या सर्व हितोपदेशांतून घेतलेल्या आहेत. हिंदुस्थान व ग्रीस या दोन देशांमधील कल्पित गोष्टी बहुतेक एकाच ठिकाणीं उगम पावलेल्या आहेत; त्यावरून त्या किती प्राचीन काळीं रचल्या गेल्या असतील याची कोणासहि सहज कल्पना येईल. "वर ज्या प्रकारच्या गोष्टींसंबंधाने ऊहापोह केला त्याच प्रकारच्या परंतु थोडा विषय बदलून दनदेवता, यक्षिणी, डाकिणी यासंबंधी अद्भुतरसाने भरलेल्या गोष्टीहि संस्कृतवाङ्मयात फार आहेत; आणि त्यामध्ये हिंदूंच्या सुविकसित बुद्धीची विशिष्ट चास्ता व विनाकष्टकल्पना हे गुण फारच ठळकपणाने दृष्टीस पडतात." असे प्रो. वेबर लिहितो. शेवटी पंचतंत्रासंबंधी आणखी एकच अभिप्राय नमूद करून आपण इतर ग्रंथाकडे वळूं.

मॅनिगबाई म्हणतात कीं, "पंचतंत्रातील प्रत्येक गोष्टीत ऐहिक जीवनक्रमांतील विविध प्रसंगांचे सोदाहरण उपपादन केलेले आहे अथवा आचारधर्मांतील निरनिराळी तत्त्वे घेऊन तीं गोष्टीरूपाने शिकविण्याचा फारच नामी प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे ह्यांतील गोष्टी असंबद्ध रीतीने व अव्यवस्थितपणे मांडलेल्या नसून त्यांची एका विशिष्ट क्रमाने व हेतूने मांडणी केली असून एकांतील कथासूत्र दुसऱ्यांत गोवून दिलेले आहे. अथवा काही तत्त्वे अनेक कथांच्या साखळीने एकत्र केलेली आहेत व त्यांचे प्रतिपादनही क्रमप्राप्त व पद्धतशीर आहे असें आढळून आल्याशिवाय रहाणार नाही."

'आरबी भाषेतील सुरस गोष्टी' या पुस्तकाचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास असें आढळून येईल कीं, त्या पुस्तकातील गोष्टी जरी इराणी विशिष्ट पेहरावांत व चालिरीतींनीं रंगलेल्या अशा दिसल्या तरी मुळांत त्या हिंदीच आहेत व त्यांतील विचारांचा एकंदर रोख व कल्पनांचें मूळस्वरूप भारतीयच आहे. काउंट जॉनस्टर्न व लासेन ह्या पंडितद्वयांचें असेंच मत असून त्यापैकीं पहिला म्हणतो कीं, ह्या पुस्तकाचें संस्कृत नांव बृहत्कथा असे आहे. प्राच्यविद्याकोविदांनीं 'अरेबियन नाइट्स' बद्दल असें सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं, त्याचा मूळ उगम संस्कृतवाङ्मयातून झालेला आहे आणि हें संस्कृतवाङ्मय इराण, अरबस्थान वगैरे देशांत कसे व कोणी नेलें याबद्दलहि ऐतिहासिक भरपूर पुरावा आहे. परंतु एवढ्यावरच न थांबता अंतःप्रमाणावरून असे सिद्ध करता येईल कीं, या प्रकारच्या वाङ्मयशाखेचा घडा प्राचीन आर्यावर्तानें सर्व जगास घालून दिलेला आहे. अर्थात् हिंदुस्थानाकडे गुरुपणाचा मान येणें हेंही अगदी साहजिक आहे. जरी कोणी विकारवशतेनें अथवा साप्रतच्या सुस्थितीनें, भरभराटीनें, विद्याधनमदानें, हिंदुस्थानच्या दुःस्थितीमुळें व पडल्या काळामुळें ही गोष्ट छपवून ठेवली व आपल्या ज्ञानाचा टेंभा व संस्कृतीची दिवटी सर्व जगभर नाचावण्याचा प्रयत्न केला तरी त्याची तीं धेंडें प्रत्यक्ष प्रमाणापुढें जिरलींच पाहिजे. 'अरेबियन नाइट्स' मध्ये इटर्ब्याच्या जोडण्यांची जी गोष्ट आहे तींवरून वरील विधानास फारच पुष्टि मिळते. अरेबियन नाइट्समध्यें ही गोष्ट आहे काय ? आरबीभाषेंत टिट्वी हा शब्द आहे; परंतु त्याचा मूलार्थ काय, तो कोणत्या शब्दापासून सिद्ध झाला ह्याचा काहींच समाधानकारक तपास लागत नाहीं. परंतु संस्कृतमधील टिट्टिभ शब्द शीं त्याचें निकट साम्य दिसतें. बंगाली टिटव व हिंदुस्थानी टिटिहरी हीं रूपें जशीं टिट्टिभ शब्दाचीं अपभ्रष्ट आहेत त्याचप्रमाणें टिट्वी हे सुद्धा असेल असें मानण्यास हरकत नाहीं. दुसरी गोष्ट कलाल व दम्न ही घेतली तरी हें नांव सुद्धा संस्कृत नामाशा बरेंच जुळत आहे. बगेबर उच्चार काय आहे ? पंचतंत्रांतील गोष्टींत बैलाचें नांव 'संजीवक' असें असून त्याचें आरबीमध्ये शान्झेबेह' असें रूपांतर झालें असलें पाहिजे; आणि कोल्ह्याचीं नांवें करटक, दमनक अशीं आहेत त्यापासून कलाल दम्न अशीं रूपें होणें अगदीं साहजीक आहे.

अहंमद व प्यारीबानू या गोष्टींतील प्यारीबानू हा शब्द हिंदी नाहीं असा कोणासच संशय येणार नाहीं. हुसेन राजपुत्राला नूरन निहरची प्राप्ति होण्या-

करिता अशी एक अट होती की, त्यानें आजपयत माहित नसलेली अशी एकादी अद्भुत व लोकविलक्षण वस्तु पैदा करावी; याकरिता तो भटकत असतां अत्यंत धनाढ्य व लोकानीं अतिशय गजबजलेल्या अशा विसानगर नामक शहरी तो येऊन पोचला. या गोष्टींतील ' विसानगर ' शहर हे हिंदुस्थानात नसेल असे कोणालाहि म्हणता येणार नाही.

डेप्लॉगशॅम्यस म्हणतो की, " सिंदबाद दर्यावर्दी याची गोष्ट मूळची संस्कृतच आहे; आणि त्याशिवाय पुढे दिलेल्या तीन गोष्टी याही मुळात संस्कृतच असल्या पाहिजेत. (१) आरबी राजा, राजपुत्र, खुशामत्ये व सात वजीर (२) हिब्रूभाषेंतील सेंडेबारची गोष्टीरूप अद्भुत कथा (३) ग्रीकभाषेतील सिंटीपासची कल्पितकथा. दुसऱ्या गोष्टीच्या आधारें रोमनभाषेत लिहिलेले " सातसाधु " नामक पुस्तक तीन शतके फार लोकप्रिय झालेले होते."

प्रो. विल्सन असे लिहितो की, " ब्रिटिश म्युझिअममध्ये सेंडेबारच्या गोष्टीच्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत होती. त्याला लाटीन भाषेत लिहिलेल्या ज्या टिपा जोडलेल्या होत्या त्यात असे स्पष्ट म्हटलेले होते की, हे पुस्तक हिब्रूभाषेत आरबी अथवा इराणी यांपैकी एकामधून भाषांतरित केलेले आहे. परंतु आरबी व इराणी भाषेमध्ये जेव्हा ते लिहिण्यात आले तेव्हा त्यास आधार संस्कृताचा हिंदी भाषेतून घेतलेला होता अशी या पुस्तकाची थोडक्यात पूर्वपीठिका आहे. "

मसूदी नामक ग्रंथात आरबी लेखकाने आपल्या 'मिराजुल झहेब' नावाच्या पुस्तकात एक प्रकरण हिंदुस्थानातील प्राचीन राजे या विषयाला वाहीलें घातले आहे; त्यात तो लिहितो की, कुरुश राजाच्या समकालीन सिंदबाद नामक हिंदू तत्त्वज्ञानी होता व त्याने " सात वझीर, अध्यापक, राजपुत्र व राणी " या नावाचे एक पुस्तक लिहिले होते आणि यावरूनच सिंदबाद दर्यावर्दी याची गोष्ट लिहिलेली असली पाहिजे.

प्रो. विल्सन याने ' सिंटीपास, ' ' सेंडेबादचे दृष्टान्त ' या पुस्तकाचे मनोरंजक विवरण करून तीं सुद्धा आर्यांच्याच मेंदूरूप खाणीतून निघालेली आहेत असे सिद्ध केले आहे. याखेरीज आणखीही पुष्कळ पुस्तकाचे माहेरघर हिंदुस्थानच आहे असे त्याने सप्रमाण दाखविले आहे. सर जॉन मालकम् म्हणतो की, " प्राच्य राष्ट्रात ज्यांची नांवें बुद्धिप्रकर्षाबद्दल सर्वतोमुखी झालेली आहेत अशा कवींनीं आपल्या बुद्धीची सर्व करामत नीतिबोधपर कल्पित कथा रचण्यांत खर्ची

घातलेली आहे; व ज्या नीतितत्त्वांचा पुरस्कार करण्याची त्याची इच्छा होती त्याच्या सौंदर्यात इतकी भर घालून त्यावर असे सुंदर ग्रंथ रचले कीं, जगांतील प्रत्येक देशाच्या पुस्तकसंग्रहालयात त्यांचा प्रवेश होऊन त्यास फार उच्च स्थान मिळाले आहे. "

सोनारानें कान टोचले म्हणजे हूं का चूं होत नाहीं; सर्व कांहीं मुकाट्यानें चालतें. त्याचप्रमाणें पाश्चात्य ग्रंथकारांनी स्पष्ट दिलेले कबूलीवजा अभिप्राय वाचले म्हणजे आम्हामधील आत्मनिंदकांचीं निंदान तोंडे तरी बंद होतात व ज्यांचे ठिकाणीं स्वाभिमान सुप्तावस्थेत असतो त्यास अशा प्रयत्नाने जागृत केल्याचें श्रेय मिळते व उद्दिष्ट हेतु थोड्याबहुत अंशाने साध्य होतो. म्हणून वर दिलेला मार्ग आम्ही मुद्दाम पत्करला, जरी त्यायोगें त्यास उच्छिष्टान्नाचे किंचित् स्वरूप आलें तरी पत्करले; परंतु दुष्काळात जिवावर प्रसंग आला म्हणजे नेहमींचे सर्व नीतिनियम बाजूस ठेवून प्रथम आत्मसंरक्षण करावे लागते. त्याचप्रमाणे हल्ली आपल्यामध्ये स्वाभिमानाचे व आत्मनिष्ठेचे प्राणोत्क्रमण सुरू असता त्यास वर दिलेल्या जलपानाच्या घुटक्यानी शुद्धीवर आणले म्हणजे क्षणभर उच्छिष्टत्वाचा आरोपसुद्धां पत्करण्यास दिक्कत वाटत नाही; याच हेतूने वर भरपूर उतारे घेतलेले आहेत व त्यावरून वाङ्मयाच्या या शाखेमध्ये आर्यांच्या बुद्धीनें केवढी अलौकिक कामगिरी बजावली आहे हें स्पष्ट दिसून येईल. प्राचीन, अर्वाचीन, यूरोपीय अथवा आशियामधील कोणत्याही राष्ट्राने केव्हांही अशा प्रकारचें बुद्धिकौशल्य, रचनानैपुण्य, उपदेशलालसा आणि नीतिप्रेम यांचें प्रदर्शन पुष्कळ ग्रंथ रचून त्यांत केलेले दिसत नाही.

प्रो. हीरन म्हणतो की, " हिंदूंच्या काव्यात नीतीची जी मजेदार शिकवणूक आहे तशी अन्यत्र कोठेंही पहावयास मिळत नाहीं. या जगात नवी नवी तत्त्वें शिकणे व शिकविणे हेंच मानवजातीचे पवित्र कार्य आहे. आखल जीवनाबद्दीत हीच आमची इतिकर्तव्यता आहे आणि ऐहिक जीवनाचें हेंच रहस्य आहे; हें आर्यांना जसें ओळखिलें तसें इतर कोणीही ओळखिले नाही.

पुराणें.

उत्तरकालीन संस्कृत वाङ्मयामध्ये पुराणानां फारच मोठें स्थान पटकाविलें आहे. यातील विषय एकच नसून नानाविध आहेत. त्याची मुख्य कामगिरी धार्मिक बाबतीत दिसून येते. ईश्वरविषयक चर्चा, ईश्वरोत्पत्ति, निरनिराळे अव-

तार, सृष्टयुत्पत्ति, नीतिबोधचर्चा व धार्मिक प्रवचनें इत्यादि विषयांचें विवेचनें यांत केलेले आहे. हिंदुलोक या ग्रंथांस सर्वंकट धार्मिक ग्रंथ असें मानतात. परंतु खरोखर पहाता यांस संस्कृत ज्ञानकोष हेच नामाभिधान बरोबर शोभेल. परमेश्वरस्वरूपज्ञान, (ईशस्वरूपज्ञान) प्राचीन कथा, इतिहास, युद्धनीति, राजनीति, तत्त्वज्ञान, भौतिक शास्त्रें, (विज्ञान) कला इत्यादि विषय प्रसंगाप्रसंगानें सुबोध व रसाळ भाषेत यांत प्रतिपादलेले आहेत. वर दिलेल्या विषयाची चर्चा अत्यंत भारदस्तपणें केलेली जरी यात आपणास दिसते तरी वेदांचे महत्त्व या ग्रंथास केव्हाही देता येणार नाहीं. परंतु आर्य जातीच्या अवनतीचा काळ जसजसा डोकावूं लागला, आर्यांच्या प्राचीन उदात्त कल्पना, जोरदार व तेजस्वी प्रार्थना व अत्यंत तेजस्वी अशा अंतःकरणात उचंबळणाऱ्या सर्व विषयांसंबंधी कल्पना व विचार जसजसे खुरटत जाऊन त्याचा भरधाव ओघ ओसरूं लागला आणि साधी रहाणी व विशाल विचारसरणी हा त्याच्या जीवन-क्रमातील मनोधर्म नष्ट झाला तेव्हा ते पुराणाना जास्त महत्त्व देऊं लागले. वेद, उपनिषदे या दिव्य ज्ञानाच्या खाणीतून अमूल्य विचाररत्नें काढण्याची शक्ति जसजशी कमी होत गेली तसतशी या ज्ञानकोशरूपी पुराणावर जास्त जास्त भिस्त ठेवणें बरे असे त्यास वाटूं लागलें. व कालांतराने विचार करण्याची, स्वतंत्र स्फूर्तीने ग्रंथ रचण्याची आणि मूळ असलेलें अवलोकन करण्याची हिंमत पूर्णपणे नाहींशी झाली व पुराणे सर्व वैदिकधर्माचें रहस्य होऊन बसलीं. वेदातील देवता मागे पडून नवीन नवीन देवता पुराणात घुसूं लागल्या. त्याची उन्नति, त्याची अन्योन्यश्रेष्ठता, त्यांची वर्गवारी, त्यांच्या आवडीनिवडी, इत्यादि गोष्टी, त्याचप्रमाणें व्रतें, वैकल्ये, नेमधर्म, यात्रा, जत्रा, या गोष्टींस फाजील महत्त्व चढून खरा धर्म मागें पडला. या नवीन बोजड परावलंबी आचारविशिष्ट व कर्मकांडात्मक धर्माने मूळच्या अध्यात्मिक व शास्त्रशुद्ध वैदिकधर्मास हुसकून लावून जिकडे तिकडे आपला अंमल बसविला. समाजशास्त्र, पौराणिक कथा, ईशस्वरूपज्ञान इत्यादि प्रकारानीं बनवलेली पुराणें ही एक गोधडीच आहे असे वाटल्याशिवाय रहात नाहीं.

परराष्ट्रांतील लोकाच्या टोळधाडी जेव्हा हिंदुस्थानावर पडूं लागल्या तेव्हा तत्कालीन नेत्या पुरुषाना असें वाटलें की आपली क्रियाकर्में बरोबर चालणें अशक्य आहे; वेद, उपनिषदें इत्यादि ज्ञान लुप्त होऊन जाणार; अधर्म प्रबल होणार; सर्व राष्ट्र क्षत्रियकामामध्यें गढून गेल्यामुळे देवदेवतादिकाची पूजाअर्चा

बरोबर होणार नाहीं. सबब ह्या कारणाने होणारा ईश्वरीकोप टाळावा आणि अपौरुषेय वेद व परंपरागत संचित झालेलें ब्रह्मज्ञान यांचें योग्य संरक्षण व्हावें म्हणून त्यांनीं हें काम ब्राह्मणवर्गाकडे सोपविलें. हें काम फार जोखमीचें, मेहनतीचें, बुद्धिमत्तेचें, दृढनिश्चयाचें, असल्याने ब्राह्मणाखेरीज तें उचलण्यास कोणी पुढें झाला नाहीं हें साहजिक आहे. कामाच्या रंगरूपाप्रमाणे तें अंगावर घेणाऱ्याच्या ठायीं तत्सिद्धयर्थ व तत्पोषक गुणही असावे लागतात. अर्थात् ते गुण त्याकाळीं ब्राह्मणाचे ठायीं असल्याशिवाय इतर वर्णांनीं तें त्याच्याकडे सोपविलें असें म्हणता येणार नाहीं. ब्राह्मणांनीं ते काम फार चोख रीतीनें बजाविलें याबद्दल सर्व जग आज त्यास धन्यवाद देत आहे. व केवळ त्याच्याच परिश्रमानें जगातील अत्यंत प्राचीन धर्म आपल्या सर्व धर्मग्रंथासह व तत्त्वज्ञानग्रंथासह आज हयात असून आजपर्यंत अनेक धर्मप्रवर्तकाना त्यानें स्फूर्ति देऊन जगामध्ये नवीन ज्ञानाची भर घातली आहे. लोकानीं वेळोवेळीं नवीन धर्मसंस्थापनेच्या रूपाने मनःशुद्धि केली आहे व आपण शेवटीं सर्व जगातील अर्ध्यापेक्षा जरा कमी लोकाचा मोक्षमार्ग बनून शिवाय जगास आज तत्त्वज्ञान शिकवीत आहे. धन्य आहे तुझी आर्यधर्मा ! असंख्य कालचक्राच्या फेऱ्यातून सुटून तुझें मूळ रूप इतकें विशुद्ध व इतकें तेजोमय कसें राहिले, म्हणून आज सर्व जग आश्चर्याने तोंडात बोट घालीत आहे. परंतु या कामीं तत्कालीन ब्राह्मणाचे निरपेक्ष श्रम, श्रद्धा, शुचिर्भूतपणा इत्यादि कडकडीत गुणच कामीं आले यात संशय नाहीं. अशा गुणिजनाना इतर वर्गातील लोकांनीं मान दिला व देवासमान मानिलें म्हणून काहीं आश्चर्य नाहीं. परंतु मनुष्याने ही मर्त्यभूमि जोंपर्यंत सोडली नाहीं, तोंपर्यंत त्यास अखंड देवत्व येणें अशक्यच आहे. याच न्यायाने कांहीं कालातराने मूळच्या तेजस्वी, कडकडीत, तपोनिष्ठ, व स्वाध्यायरत ब्राह्मणांचे वर निर्दिष्ट केलेले गुण लोपले व त्याचे ठिकाणी स्वार्थाची पुंजी वाढत चालली स्वार्थ व परार्थ हे पूर्वपश्चिम दिशांप्रमाणें अगदीं भिन्न असल्याने स्वार्थाची सरशी होण्याबरोबर परार्थाने मागे पाय काढला व त्याबरोबरच तदनुषंगिक दैवी व सात्त्विक गुण अस्तंगत झाले. परंतु चमत्कार असा झाला कीं, पूर्वकालीन ब्राह्मणांचा दरारा, वचक व वजनही समाजात कायम राहून गुण मात्र तेवढे नष्ट झाले; तेणेकरून उत्तरोत्तर स्वार्थाची बेसुमार वाढ होऊन ब्राह्मणांनीं इतर वर्णांतील लोकाच्या हयगयीपणामुळें ह्या ब्रह्मज्ञानाचा ठेवा आपल्याकडे ठेवून दिला. मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं, त्यास देणें व दुखणें ही दकाराची दुक्कल नको

असते. तशांत ब्राह्मणांनी हा ठाव परिश्रमाने संपादन केलेला, जतन करून वाढविलेला, तेव्हा त्याबद्दल त्याचे ठिकाणीं ममत्व उत्पन्न होऊन त्यावर परक्यांनी हक्क सांगू नये असें वाटणे मनुष्यस्वभावास धरूनच आहे. दुसरें कारण असें आहे कीं, हें वेदपठनाचें काम अत्यंत दगदगीचें, सोशिकपणाचे, निष्कामाचरणाचें, व किफायत तर मुळींच नाहीं; तेव्हां इतर वर्णांनीं तिकडे दुर्लक्ष केलें यातही काहीं सृष्टक्रमास सोडून आहे असे नाहीं; कोणी म्हणतील कीं, जर ब्राह्मण हे सर्व वर्णांचे गुरु असे मानले जात होते, तर त्यांनीं गुरुच्या ठिकाणीं असणाऱ्या शिष्यप्रेमाने इतर वर्णांस त्यांनी न विचारता हे अध्यापनाचें काम करावयास पाहिजे होते; व सर्वांस सारखेंच सज्ञान ठेवावयास पाहिजे होतें. परंतु हें म्हणणें अगदीं अनुचित आहे. कारण 'शीक' 'शीक' म्हणून पाठीस लागल्यानें कोणी शिकत नसतो व जेव्हां हे गुरुपण एकाद्या वर्णाकडे असतें तेव्हा त्या सबंध वर्णाने इतर वर्णांस शिकावण्यासाठी त्याच्या पाठीस लागावें हें सयुक्तिक दिसत नाहीं.

अशा रीतीने इतर वर्णांचा दृष्टगय व ब्राह्मणाचा वाढता स्वार्थ याचा परिणाम असा झाला कीं, ब्राह्मणास हे ज्ञान म्हणजे खासगत मालमत्ता असे वाटूं लागले; व त्याची पूर्ण मालकी पुढे या उभयविध कारणांनी त्याचेकडेच राहिली. पुढे चालीरीतींचे अभेद्य तट पडून विचारसरणीही दूषित झाली आणि निकृष्टवर्गांनीं वेदाविद्येचा अभ्यास करूं नये अशी समाजात दुष्ट चाल पडली. मात्र याला कारण सर्वस्वीं ब्राह्मणच होते असे केव्हांही म्हणता येणार नाहीं.

पुराणाचा जरी कोणीं वर वर अभ्यास केला तरी सुद्धां त्यास त्यातील रहस्य कळून आल्याशिवाय रहाणार नाहीं व त्याची वास्तविक योग्यता केवढी आहे हेही सहज प्रत्ययाला येईल. तरी अशा पुस्तकांचा योग्य अभ्यास होऊन त्यातील ज्ञान सर्व जनतेला मिळावें हेच सर्वांचें म्हणणे असणार दुसरें काय?

जगाच्या सुधारणेचा गाडा फार भरधाव सुटला आहे. विचारात भयंकर क्रांति होऊन एकंदर जीवनक्रमाला फार निराळे वळण मिळाले आहे पूर्वीच्या कल्पना व आचार आता अक्षरशः पाळणें अशक्य असून तसे करण्याचा कोणी अविचार केल्यास त्याचें अपरिमित नुकसान झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हिंदुस्थान देश निसर्गतःच सर्व बाजूंनीं नैसर्गिक मर्यादानीं परिवेष्टिलेला आहे, आणि त्यात शास्त्रांनीं परदेशगमन बंद केलें! देश धनधान्यसमृद्ध असून सर्व तऱ्हेनें आत्मतंत्र व स्वावलंबी असा होता तेणेंकरून लोकांस बाहेर जाणे अवश्य नव्हतें. परंतु

सांठलेलें फार खोल पाणी सुद्धां बिघडतें, तशी स्थिति या भारतभूची झाली ! लोक अडाणी, व संकुचित दृष्टीचे झाले; दळणवळणानें खळबळ व हालचाल सुरू असते ती बंद झाल्यानें आचारविचारांत शैथिल्य आलें; नवीन विचारांचे झरे कोंदाटले; संघट्टण, घर्षण व सहवास यानीं विचारांची अदलाबदल होऊन सफाई होते व अध्यात्मिक जीवन सतेज व पुष्ट राहतें; परंतु या देशाची स्थिति सर्व उलट. येथें परका म्हणजे तो अतिशूद्रापलीकडे मानण्याचा प्रघात पडला; लोक चालिरीतींचे गुलाम बनले. मग परदेशस्थ प्रवाशाची वास्तपूस्त घेणे अर्थातच बंद झालें दुराग्रह व हेका असा की ते अतिशूद्र, चाडाल; सर्व ज्ञान काय तें आम्हापाशी ! स्वदृष्टीच्या टप्याबाहेर जग आहे, तेथे येथल्याप्रमाणें व्यवहार चालतात, लोक विचारी, धनवान्, नीतिमान्, अभ्यासशील, विद्याप्रिय आहेत ही जाणीव कोणाला ? अशा रीतीने अहंभाव वाढून सुधारणेचे, बुद्धीच्या सफाईचे, नूतन संस्काराचे व ज्ञानवृद्धीचे सर्व मार्ग बंद झाले; स्वदेशात खालील वर्ग जास्त पतित होत चालले; असा भयंकर अधःपात झाला तरी राष्ट्रातील कर्त्या वर्गाचे डोळे उघडूं नयेत हें आश्चर्य होय ! विचारी वर्गाची अशी दिशाभूल होऊं नये व सामर्थ्याची हानि बंद व्हावी, इजिप्त, इराण, बॉबिलोनिया ग्रीस या राष्ट्रांची जी अवस्था झाली व काळाच्या उदरांत त्याचा स्मृतिरोपरहित जसा बळी पडला, तसा प्रसंग आपल्या आर्यावर्तावर येऊं नये याकरिता ऋषिकालीन केवढी भरभराट व समृद्धि होती, चालू काळ कसा पूर्ण दैन्यवाणा आहे व योग्य समर्थ उपाययोजना न झाल्यास वरच्या राष्ट्राप्रमाणें आपलीही गति झाल्याशिवाय रहाणार नाही. अशा रीतीचें यथार्थ दर्शक व भडक चित्र राष्ट्रापुढें माडून त्यास सन्मार्गावर आणणे हाच एक उपाय आहे. निकृष्ट वर्गास वरिष्ठ वर्गानें बंधूप्रमाणें हाताशी धरून एकमेकानीं एकमेकास साहाय्य करून राष्ट्राच्या जीवन-संवर्धनाचे उपाय योजिले पाहिजेत, त्यास पूर्वीच्या कीर्तीस शोभेल असे वागविलें पाहिजे, प्रगतीच्या मार्गावर आणून सोडलें पाहिजे, आणि कोणाच्याही मागें न राहता हल्लीं जगांत जे जोरदार प्रवाहाचे आंदोलन सुरू आहे त्यात आपणही सामील होऊन आपलें प्राक्कालीन श्रेष्ठत्व प्रस्थापित करणें आणि हल्लींही आपणामध्यें तसेच अपूर्व वैशिष्ट्य आहे व यापुढें अभूतपूर्व कामगिरी करण्याचे सामर्थ्य आहे हें दाखविणें हेंच उचित आहे. या कार्मा अनेक रसप्रधान पुराणांचा उपयोग करून घेणे हें किती बरे प्रशस्त आहे ? पुराणें झालीं तरी वेदोपनिषदाचींच विकृत, मलिन व अपकृष्ट रूपांतरे आहेत. त्यामध्ये कांहीं हीन भाग

आहे ही गोष्ट खरी; परंतु लोकाना त्याचा आज फार दिवसापासून परिचय असल्यानें त्यास दूर लोटून चालावयाचे नाहीं. शिवाय यांत सुद्धा तात्त्विक व ब्रह्मज्ञानाचा भाग काही थोडा नाहीं म्हणून त्यांच्याच साहाय्यानें त्यासच धरून, त्यांच्याच द्वारें लोकास उपदेश करून, शहाणे करून वेद व उपनिषदें यानीं घालून दिलेला थोर व पवित्र नीतितत्त्वे व सिद्धान्त आपलेसे करून घेणे हे चालू काळांत अत्यंत शहाणपणाचें व धोरणीपणाचे काम आहे; आणि त्याविना अन्य गति नाहीं हें निश्चित आहे.

व्यास, वाल्मिकासारख्या जवद्वंद्य महाकवींच्या हातून पुराणाची रचना झाली नाहीं ही गोष्ट खरी आहे. परंतु एकंदरीनें पाहता प्रस्तुत पुराणाच्या रचनाकारांनीं शक्य तेवढी मेहनत घेऊन आपल्या अहर्निश वाचनाचा, विद्याव्यासंगाचा व त्या योगाने प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उत्तम ठसा यांत उठवून दिला आहे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. पुराण या शब्दाचाच अर्थ गत काल असा आहे; आणि एकंदर ग्रंथाचा रोख असा आहे की, सार्वजनिक उत्सवप्रसंगीं ते पाठ म्हटले जावे व लोकाना सर्व विषयाचे ज्ञान सहज प्राप्त व्हावे. पद्यात्मक रचना असल्याकारणाने तीं पाठ करण्यास सोपी जात व लोकाच्या तोंडात सारखी घोळत राहिल्याने नैतिक व धार्मिक उपदेशाचे कार्य सुलभ होई. त्यांत सांख्य व वेदान्त तत्त्वज्ञानाचा सुंदर मिलाफ करून वैदिक क्रियाकर्माच्या व कायद्याच्या नियमाचा पद्धतशीर संग्रह केलेला आहे.

बऱ्याच प्राचीन कालापासून या ग्रंथाच्या रचनेचें कार्य चालू आहे. ते काम अनेक व्यक्तींच्या हातून भिन्नभिन्न काळी झालेले आहे; व विचारात जे जे फरक पडले ते सर्व यात सहजच अंतर्भूत झालेले आहेत. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य या सांख्य धर्मप्रवर्तकाच्या मतांचा यात संग्रह केला आहे. ग्रंथाचें स्वरूप संभाषणात्मक असून लोमहर्षण अथवा सोमहर्षण या व्यास शिष्यानें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें म्हणून तीं लिहिली आहेत.

या पुराणाचे सात्त्विक, राजस व तामस असे तीन भाग आहेत व प्रत्येक भागामध्यें विवक्षित पुराणें नमूद केलेलीं आहेत तीं अशाः—

सात्त्विकः—विष्णुपुराण, नारदपुराण, भागवतपुराण, गरुडपुराण, पद्मपुराण व वराहपुराण.

राजसः—ब्रह्मांड, वैवर्त, मार्कंडेय, भविष्य, वामन, ब्रह्म.

तामसः—मत्स्य, कूर्म, लिंग, शिव, स्कंद आणि अग्नि.

सात्त्विकपुराणें वैष्णवमतांचीं आहेत, तामस शैव आहेत व राजस गोस्वामी व वल्लभाचार्य यांचीं मतें प्रसार करणारीं आहेत.

वर दिलेल्या अठरा पुराणांखेरीज इतर १८ उपपुराणें आहे; व सर्वांची श्लोकसंख्या लौकिक समजुतीनें एक कोटी आहे; परंतु प्रत्यक्ष गणनेनें ती चार लक्षावर आहे.

अठरा उपपुराणांचीं नावें खालीं दिल्याप्रमाणें आहेतः—

१ सनत्कुमार, २ नारदीय, ३ शिव, ४ वरुण, ५ अंसनस, ६ आदित्य, ७ नारसिंह, ८ पराशर, ९ कपिल, १० साब, ११ कलिक, १२ भागवत, १३ दुर्वास, १४ महेश्वर, १५ मनव, १६ नंदी, १७ सौर, १८ वशिष्ठ.

श्रीभागवत पुराणात वृत्रासुर याच्या हननाची कथा दिली आहे. गायत्री मंत्राची प्रारंभीच चर्चा केलेली आहे. सारस्वतकल्पांतील लोकाचाराचे यात उत्तम विवेचन केले आहे. त्यानंतर वराह, प्रल्हाद, ध्रुव, वेन, पृथा, मन्वंतराची व प्रजापतींची उत्पत्ति, कपिलावतार, मत्स्यावतार, समुद्रमंथन, कृष्णावतार, यादव–निषूदन, उद्धवोपदेश कलियुगचर्चा इत्यादि विषयाचें यात वर्णन आहे. त्याचप्रमाणें अग्निपुराणांत ईशानकल्प, रामकृष्णवतार, शिवपूजेचे गूढ प्रकार, पृथ्वीचें वर्णन, निरानिराळे वंश, वैद्यक, भाषा, अलंकार, व्याकरण, लष्करी हालचाली इत्यादि विषयाची हकीकत यात आलेली आहे. अग्निपुराणांत शस्त्र-विद्या व धनुर्विद्येचे विवेचन आलेलें आहे व धनुर्वेदाची जी हानि झालेली आहे, त्यामुळें या पुराणास फार महत्त्व आलेलें आहे. देवपुराणात ब्रह्मास्त्र, पद्मपुराणात भारतीय विस्तृत भूगोल व एकंदर विश्वाचा सामान्य भूगोल, गरुडपुराणात सामुद्रिक व फलज्योतिष, काहीं पुराणात कला व उद्योगधंदे; अशा रीतीने निरानिराळ्या पुराणात निरनिराळ्या विषयांची हकीकत आलेली आहे. पुष्कळ भरकट व निरुपयोगी गोष्टींची यांत गर्दी झालेली आहे हें खरें; परंतु तत्त्वार्थी व शोधक मनुष्यास निःसत्त्व पदार्थांचे भूस व कोंडा काढून सुद्धां यात बरेंच तथ्य मिळेल. गतकालावर बराच प्रकाश पडेल व तत्कालीन सर्व गोष्टींचा संग्रह या दृष्टीनें तर त्याचा फारच उपयोग आहे. एकादा चित्रकार ज्याप्रमाणे कुरूप मातीच्या ढेकळांना आपल्या कौशल्याने सुंदर रूप देतो. त्याप्रमाणेंच या पुरा-णांचा उपयोग करून घेतला पाहिजे. व्यर्थ नाकें मुरडून उपयोग नाही. वाड-वडिलांना फुकट दोष कोणासही देतां येईल, कारण त्यास श्रम पडत नाहीत; परंतु या पर्वतप्राय ग्रंथसंपत्तीचा मननपूर्वक अभ्यास करून त्यातील तत्त्वांचा,

उपयुक्त गोष्टींचा व ज्ञानकणांचा संग्रह करण्यास असामान्य चिकाटी, उद्योग व बुद्धीची तरतरी लागते. या गोष्टी ज्याचे ठायीं असतील व ज्याने असा व्यासंग केला असेल, त्यासच फक्त अधिकारानें बोलता येईल. नाहीं तर 'मुखमस्तीति वक्तव्यं' यांत काहीं अर्थ नाहीं.

शेवटीं प्रोफेसर विल्सन याचे मत देऊन पुरें करणें बरें. त्यांच्या मतें यांतील कांहीं गोष्टी ख्रिस्ती शकाच्या तीन शतके पूर्वीच्या काळातील आहेत. इतर राष्ट्रांतील तत्कालीन लोकांचे धर्मसमज, चमत्कारिक संस्था व नानाप्रकारच्या अतर्क्य गोष्टी यांची उत्पत्ति होण्यापूर्वी यांपैकी कांहींची रचना झालेली आहे.

प्रकरण ४ थें.

आर्यांचें तत्त्वज्ञान.

मनुष्य जातीने आजपर्यंत हजारों साम्राज्यें निर्माण केलीं; परंतु कालाने केवळ लीलेनें तितकींही जमीनदोस्त केलीं. मानवी कर्तबगारीचा अवशेष कोणत्याही रूपात राहूं नये असा दुष्ट कालाचा कटाक्ष दिसतो. आजतागायत प्राचीन कलांचे, वाङ्मयाचे व बुद्धिविलासाचे बरेच अवशेष शाबूत आहेत; परंतु 'काल निरवधि व पृथ्वी विपुला' असल्याने त्यांपैकी पुढे किती शिल्लक राहतात याबद्दल मन फारच साशंक रहातें. कारण काळाच्या दुर्विलासितापासून कधी शमेल असे, आजपर्यंतच्या अनुभवावरून, अनुमान करवत नाहीं. मात्र एका गोष्टीपुढें कालास हात टेंकावे लागले व काल जर जडरूप असता तर त्याजपासून मानवजातीने त्या बाबतींत आजिबात्यपत्र चोपून घेतले असतें. अशी कोणती जबरदस्त वस्तु मानवी हातामध्ये सापडली असेल असा पुष्कळ जणास संशय येईल! प्रत्यक्ष इंद्राचें वज्र जरी येथें मानवजातीच्या मदतीस येते तरी तें काळच्या माऱ्यापुढे बोथट होऊन निरुपयोगी झाल्याशिवाय रहाते ना. मग जेथें इंद्राच्या वज्राचा पाड नाहीं तेथें इतर सर्व हत्यारें लटपटतील यात काय आश्चर्य? परंतु परमेश्वरी लीला पाहण्यास मिळते तीं येथेंच. मनुष्याच्या जड इंद्रियांचा जर कोणी आधार घेईल तर त्याची

फसगत झाल्याविना राहणार नाहीं. कारण मानवी देह बोलून चालून नश्वर. जोडीस जोड मिळाल्याशिवाय कोठे शत्रु चीत झाला आहे काय? काळ अदृश्य व कल्पनागम्य सबब त्याच्याच रूपाचे मानवी मन जेव्हा त्यास विरोध करण्यास भेटलें, तेव्हा मात्र काळाने हात टेकले. मानवी मनाच्या परिश्रमाचे फळ तें तत्त्वज्ञान. या एका हत्याराने मात्र काळास बरेच पाणी दाखविले व आपले पृथ्वीवरील साम्राज्य आजपर्यंत अबाधित टिकवले आहे. इतर सर्व साम्राज्यें गेलीं; परंतु याचें मात्र जसेंच्या तसेंच टिकून त्याचा उत्तरोत्तर उत्कर्षच चालू आहे. अशा साम्राज्याने मानवजातीस घेरून टाकावे व त्याच्या मनावर अम्मल चालवावा यात काय आश्चर्य? यच्चावत् प्राणी तत्त्वज्ञानरूप सम्राटापुढें प्रणिपात घालीत आहेत. लहान असो, थोर असो, प्रबल असो, निर्बल असो, राव असो, रंक असो; सर्वांसच हा सारखा प्रिय आहे. याचा अंमल फार करडा, अनियंत्रित व बिनहरकत असला तरी, प्रजेस सुख, समाधान व शांति भरपूर लाभत आहे. हा अजातशत्रु असून याच्या राज्यात सर्वत्र प्रेमळपणा व आनंदच पसरलेला आहे.

महान् महान् तत्त्ववेते व सर्वांगपरिपूर्ण तत्त्वज्ञान-पद्धति यावरून राष्ट्राचा मोठेपणा ठरविणे योग्य असेल तर त्या बाबतींत हिंदुस्थानास फारच उच्च स्थान मिळाले पाहिजे हे कोणीही समबुद्धीचा माणूस कबूल केल्याशिवाय रहाणार नाहीं. तत्त्वज्ञानाचा उगम केव्हा होतो व त्याची वाढ होण्यास राष्ट्राची स्थिति कशी असावी लागते, याबद्दल प्रोफेसर मॅक्स-म्यूलर याने एक सिद्धांत काढला आहे, तो असा:—राष्ट्रात जिकडे तिकडे शांतता असून धनधान्याची समृद्धि आहे; काही ठळक ठळक कुटुंबाजवळ विपुल संपत्ति साठलेली आहे; सर्व लोकाना विद्या व कला यांचें ज्ञान होण्यास लागणारीं विद्यालये व विद्यापीठे भरपूर आहेत; अशा स्थितींत पोटाकरितां अहर्निश झटणाऱ्या लोकसमूहामधून थोड्याना विद्या-कला अशा सारख्या गोष्टींकडे लक्ष देण्यास सवड मिळते व त्यांतूनही फारच थोड्याना त्याचा ध्यास लागलेला असतो. अशा अल्पसंख्येतून भावी तत्त्वज्ञानी व सर्व जनाच्या चित्ताना आल्हाद व शांति देणारे तत्त्वज्ञानी निर्माण व्हावयाचे असतात. हाच नियम जर हिंदुस्थानास लावला तर तो पूर्णपणें खरा ठरलेला पाहावयास मिळतो; आणि येथील जगविख्यात तत्त्वज्ञान्यांची मोजदाद केल्यास वरील नियमान्वयें हिंदुस्थान सर्व जगाच्या गुरुस्थानींच शोभेल यांत कांहीं संशय नाहीं.

येथील भूमींत तत्त्वज्ञानाचें बीज उत्तम प्रकारें रुजून त्यापासून निरनिराळे तत्त्वज्ञानपद्धतिरूपी प्रचंड वृक्ष सर्व जगापुढें उभे आहेत. साराश—भरतभूमि म्हणजे

तत्त्वज्ञान्यांची खाणच आहे. बुद्धिप्रागल्भ्य व श्रेष्ठ संस्कृति या दोन बाबतींत प्राचीन व अर्वाचीन लोकापेक्षा हिंदु लोक निःसंशय श्रेष्ठ आहेत व त्याच्या विचाराचे क्षेत्र अमर्याद आहे असा मॅनिगसाहेबाचा अभिप्राय आहे.

श्लेजेल म्हणतो की, " हिंदूंच्या विचारांत तडफ, भारदस्तपणा व विशुद्धता फार आहे ग्रीक लोकांना ज्या ज्ञानाबद्दल फार अभिमान वाटतो, तो हिंदूंच्या ज्ञानापुढे केवळ फिक्का पडल्यावाचून रहाणार नाही; आणि या दोघास सूर्य व काजवा यांचीच उपमा शोभेल. "

प्रो. वेबर, मॅक्समूलर व श्लेजेल या तिघांनी हिंदूंची अगाध बुद्धिमत्ता, अचाट कल्पनाशक्ति, लोकविलक्षण तात्त्विक पृथक्करण, निसर्गदत्त प्रगल्भता, जन्मसिद्ध शोधकबुद्धि इत्यादि गुणांविषयी फारच तारीफ केलेली आहे व तत्त्वज्ञान आणि व्याकरण या शास्त्रात त्यांनी जे परिश्रम केले आहेत त्यांची थोरवी त्यांनी आपल्याकडून होईल तेवढी गाइली आहे.

आर्यावर्तातील सर्व सृष्ट पदार्थ व प्राचीन आर्यांच्या कला व शास्त्रें ज्याप्रमाणे अत्यंत विशाल आहेत, त्याचप्रमाणे त्याचे तत्त्वज्ञानही जगद्व्याळ आहे. त्यात सर्व मतांचा, सर्व तर्कपद्धतींचा, सर्व विचारप्रवाहांचा समावेश झालेला आहे. जगातील इतर कोणत्याही भाषेत प्रतिपादन झालेले मत आर्यतत्त्वज्ञानांत नाही असे कधीच झाले नाही. महाभारतात नाही असे काहींच नाही. ॥ यदिहास्ति तदन्यत्र, यन्नेहास्ति न तत्क्वचित् ॥ असे वाक्य महाभारतासंबंधी लोकविश्रुत आहे. परंतु तेच जरी बरोबर आर्यतत्त्वज्ञानास लावले तरी तंतोतंत लागू पडेल.

हंटरच्या मते " बुद्धि, मन, जड इंद्रियें, आत्मा, दुःखोत्पत्ति, आत्म्याचे आत्यंतिक सुख, नियतिवाद, प्रयत्नवाद, सृष्टि व सृष्टिकर्ता यांतील परस्परसंबंध, परमेश्वराचे कारुण्य व मानवी प्राण्याचे दुःखमय जीवन, सुखदुःखविषमता इत्यादि अत्यंत कठिण विषयांचे विवेचन आर्यतत्त्वज्ञानात विस्तारपूर्वक केलेलें आहे. ग्रीक, रोमन, मध्यकालीन व अर्वाचीन शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ यांच्या बुद्धीस वर दिलेले व त्याच जातीचे इतर विषय फारच अवघड व गूढ वाटले व त्यांची ते सोडविण्याकरितां फार प्राचीन कालापासून धडपड चालू आहे. आर्यतत्त्वज्ञान्यांनी आपल्या बुद्धिप्रकर्षाने, वक्तृत्वपूर्ण वाणीने व शोधक मनाने त्यांचे कोडे प्राचीन कालीच उकलून ठेवले, आणि ह्याच प्रयत्नाचे फल म्हणजे पाश्चात्य राष्ट्रांतील तत्त्वज्ञानाची वाढ होय. असें म्हणणे कदाचित् प्रथम धाडसाचें वाटेल;

परंतु याच प्रकरणांत ते कसें सत्य व वस्तुस्थितीस धरून आहे हें दाखविण्यात येईल.

आर्यांचें तत्त्वज्ञान सर्वव्यापी आहे. जगातील सर्व तत्त्वज्ञानमतें आर्यतत्त्वज्ञानाच्या पोटांत समाविष्ट झालीं आहेत. आर्यतत्त्वज्ञानाचा पाया उपनिषदावर रचलेला आहे. उपनिषदामध्ये जगामधील सर्व प्रचलित मते संग्रहीत झाली आहेत. त्यांपैकीं कित्येक विचारपद्धति फोल असून त्यांच्या खटाटोपापासून प्रत्यक्ष फायदा फारच थोडा झालेला आहे. बरीच ग्रंथसंख्या असले शुष्कवाद माजविण्यात व्यर्थ खर्ची पडलेली आहे. विनाकारण अनेक पंथ उत्पन्न झाले ह्या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी मानसशास्त्रदृष्ट्या असे म्हणता येईल कीं, केवळ एकाद्या विचारी पुरुषाच्या डोक्यात एकादी कल्पना आली म्हणजे तिचा अखेर निर्णय होईपर्यंत दरम्यानच्या स्थितींत मानवी बुद्धि कसकसे खेळ करते, तिच्या कसरती कशा चालतात, आत्मसमर्थनाचे कसकसे प्रकार असत त व केवळ अदृष्ट कल्पनामय विचारसृष्टींत मनुष्याच्या बुद्धीस किती उंच भराऱ्या मारता येतात हें पाहिले, म्हणजे मन क्षणभर स्व-सामर्थ्याच्या जाणिवेने उल्लसित होते.

अशा प्रकारच्या तेजस्वी आर्यबुद्धीने प्रसृत केलेला सर्वेश्वरवाद, स्पिनोझा व हेजेल याचा तत्त्वज्ञानवाद, विश्वरूपी परमेश्वर, अध्यात्मज्ञान व अध्यात्मिक आचरण, जीवात्म्याचे परमात्म्यात निमीलन, जन्ममरणाचे रहाटगाडगे इत्यादि विषयावर पूर्वी जो प्रकाश पडला आहे त्यापेक्षां आधुनिक तत्त्वज्ञान्याना त्यात कोणतीही भर घातलेली नाही. अशा थोर तत्त्वज्ञानी आर्यांबद्दल सर विल्यम जोन्स त्यास हस्तगत झालेल्या माहितीवरून असे म्हणतो कीं, " न्यूटनसारख्या जगद्विख्यात तत्त्वज्ञान्याची कोणत्याही तऱ्हेने कोडाईतकी अप्रतिष्ठा करण्याची माझी इच्छा नाही; परंतु त्याचे ईश्वर-स्वरूपज्ञान व त्याच्या तत्त्वज्ञानाचा कोही भाग हीं उपनिषदापेक्षां कोणत्याही बाबतींत निराळीं नाहीत अथवा उपनिषदातील तत्त्वज्ञानाचा तो अगदी लहानसा भाग शोभेल. त्याचप्रमाणे सर्व सृष्ट पदार्थांमध्यें अदृष्ट असलेली सूक्ष्म इच्छाशक्ति व जिच्या योगाने आकर्षण, प्रतिसारण, उत्सर्ग, प्रतिबिंब, वक्रीभवन, विद्युत्, चेतना, स्नायूची हालचाल इत्यादि क्रिया घडतात, तिला प्राचीन आर्यतत्त्वज्ञानात पांचवें आकाशतत्त्व असें मानलेले आहे. हें आकाशतत्त्व परब्रह्मापासून निघाले असें उपनिषदात स्पष्ट म्हटलेलें आहे. आकाशापासून अग्नि, अग्नीपासून जल, या उत्क्रांततत्त्वाला त्याचाच मुख्य आधार आहे. सबब ह्याही शोधाबद्दल न्यूटनला विशेष बहुमान दिला पाहिजे असे नाही. "

प्राचीन काळीं ह्या देशांत तत्त्वज्ञानाचा इतका कसून अभ्यास झाला कीं, तें केवळ वादाचा विषयच न राहता त्याचें व्यवहारातही संक्रमण झालें असावें असें कोणासही वाटेल; व हा तर्क हिंदूंच्या आचाराचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास खरा आहे अशी खात्री पटते. मॅक्समूलर म्हणतो की, हिंदू लोक तत्त्वज्ञानाची चर्चा रस्त्यात करतात. दीर्घ संस्कार असल्याखेरीज ही गोष्ट शक्य नसते हे निराळें सांगणे नको. स्वामी रामतीर्थ, विवेकानंद याचे हेच म्हणणें असून त्यांना तें सिद्धही केले आहे. आणि त्याच्या श्रमाचे फल आज प्रत्यक्ष पहाण्यास मिळत आहे. आत्म्याचें अमरत्व ही गोष्ट हिंदूंच्या हाडींमाशीं इतकी खिळल्यामुळेंच त्यास तत्त्वज्ञान म्हणजे तळहातावरील मळ वाटतो. प्राचीन काळी ग्रीक व रोम शहरामधील पंडितास ही गोष्ट सर्वस्वीं मान्य नव्हती. साक्रेटीस, प्लेटो, याना शेवटीं नाइलाजाने ती गोष्ट मान्य करावी लागली; परंतु याच्या उलट स्थिति हिंदुस्थानात पहावयास मिळेल. चंद्रमौळी खोपटामध्ये राहणारा कुणबी, स्वयंपाक-गृहातील कामगिरी बजावून धर्माचरणाची सिद्धता करण्याकरिता वार्ताचे ढीगच्याढीग पाडणाऱ्या व पुराण श्रवण करणाऱ्या विधवा, संसाराची दगदग पार पाडता पाडता मेटाकुटीस आलेला व जीवनयात्रेचा अर्धाअधिक पल्ला गाठ-ल्याने अध्यात्मिक विचाराचे डोकावणे ज्याच्या पलित डोक्यामध्यें सुरू झालें आहे व कधीं कधी अशाच बुद्धीने कथा-पुराणाचा ओझरता परामर्ष घेणारा वयातीत गृहस्थ, अशा प्रकारच्या संसाराच्या सर्व स्थितींतील हिंदी माणसाना आत्म्याच्या अमरत्वाबद्दल कोणतेही आश्चर्य वाटणार नाही; इतकेच नव्हे, तर इतरही वेदान्तांतील तत्त्वे तीं भराभर म्हणूं लागतील अशी वेदान्ताची हिंदु-स्थानात स्थिति आहे; आणि याच कारणाने अर्ध्या अधिक जगातील लोक-संख्येवर आर्यतत्त्वज्ञानाचा पगडा बसला आहे व बाकीच्या लोकांना कमी अधिक प्रमाणात याची गोडी लागली आहे.

इतका दीर्घ व्यासंग ज्या लोकाचा होता व ज्यांना तत्त्वज्ञान म्हणजे जवि-नाचा एक भाग आहे असेच वाटत होतें अशा हिंदूंना जगाच्या गुरुत्वाचा मान मिळावा हें साहाजिक आहे. प्राचीन ग्रीक व इजिप्सियन लोक हिंदुस्थानात येऊन अभ्यास करून परत जात आणि ग्राक तत्त्वज्ञान म्हणजे आर्यतत्त्वज्ञा-नाच्या कांहीं भागाचे प्रतिबिंबच आहे असे पौर्वात्य भाषाकोविदांनी सप्रमाण सिद्ध केलें आहे. काउंट जॉनस्टन, कोलब्रूक वगैरे पंडितांनीं ही गोष्ट सिद्ध करून आर्यतत्त्वज्ञानाचा संचार युरोपात कसकसा होत गेला व पाश्चात्य तत्त्वज्ञान

म्हणजे आर्यतत्त्वज्ञानाचे अपत्य आहे हें मोठ्या खुबीदार व खात्रीलायक प्रमाणांनी आपल्या ग्रंथात विशद करून ठेवलें आहे.

आर्यावर्तांतील तत्त्वज्ञानास जगद्गुरुत्वाचा मान सर्व देशातील पंडितांनीं मोठ्या आनंदानें दिला आहे. पतिपत्नी, जनन्यपत्य ह्या जोड्या जशा आपण व्यवहारात पाहतो, तशीच गुरुशिष्याचीही जोडी मानण्याचा प्रघात आहे. शिष्याविना गुरूचें महत्त्व फोल होय. संपत्ति जरी पुष्कळ असली, तरी सुवर्णालंकारांनीं शरीर जर सुशोभित केले नाही, ऐहिक सुखोपभोग मर्यादेत अनुभविले नाहींत अथवा दानधर्मानें तिचा सव्यय केला नाहीं, तर जमिनीच्या पोटात अशोधित अवस्थेत ती असली काय व लाकडी भिंतीच्या अंधार कोठडीत ठेविली काय सारखीच ! उपभोग, सद्व्यय, दान इत्यादि प्रकारानीं संपत्तीच्या अस्तित्वास उजळा येऊन तिचे तेज जसे वाढीस लागते त्याचप्रमाणें ज्ञानसंपत्तीचे दानाक्रिया, अध्यापन इत्यादि प्रकारानें प्रदर्शन झाले पाहिजे. केवळ मनाच्या पेटींत ठेवून उपयोग काय ? अध्यापनाने तिचे सौंदर्य, महत्त्व व खानदानीपणा सर्व जगाच्या दृष्टीस पडला पाहिजे. आर्यांच्या तत्त्वज्ञानाने जो जगभर संचार केला तो उत्तमोत्तम शिष्याच्या बळावर केला. सर्व जगाचे विद्यापीठ प्राचीनकाली आर्यावर्त होतें. याच विद्यापीठातून ग्रीक आद्य तत्त्ववेत्ता पायथागोरस तत्त्वज्ञान शिकून गेला व त्याने तें मायभाषेतून सर्व पाश्चात्य जगास शिकविलें. पायथागोरसनें हिंदुस्थानात येऊन आर्यतत्त्वज्ञानाचा अभ्यास केला व पुनर्जन्मवाद शिकून तो स्वदेशीं गेला. डा. एनफिल्डच्या मते पायथागोरस, अॅनाक्झार कस, पायन्हो इत्यादि तत्त्ववेत्ते हिंदुस्थानातूनच शिकून गेले. या मतास डॉ. एनफिल्डखेरीज इतरही विद्वानाचे पाठबळ आहे. स्वीडनमधील काउंट, पोकॉक, श्लेजेल, प्रिन्सेप, सर मोनियर विल्यम्स, अलेक्झांडर पोलिस्टर, वॉर्ड इत्यादि बडीं बडीं धेंडे या गोष्टीबद्दल स्पष्ट कबूली देत आहेत; तेव्हां यापुढे आणखी जास्त पुरावा देण्याचें कारणच दिसत नाहीं. पायथ्लॉनिझम, मिथ्राइक इत्यादि नास्तिक वादाचे जे प्रकार आपण पाश्चात्य देशांत पाहतों, ते सर्व गौतमाच्या उपदेशापासून निघालेले आहेत. कारण पायथागोरस, पायन्हो, गौतम हे सर्व समकालीन होते असें वॉर्ड, प्रिन्सेप यांचें म्हणणें आहे. व हें जर खरें तर गौतमासारख्या जगत्श्रेष्ठ धर्मसंस्थापकांची तत्कालीन पाश्चात्य तत्त्वज्ञान्यावर छाप पडली व त्यांनीं गौतमाचें अनुकरण केलें या गोष्टी अशक्य आहेत असे मानण्याचें कोणासच कारण नाहीं. प्राचीन ग्रीक लोक आर्यतत्त्वज्ञानाचा अभ्यास

करण्यासाठीं इकडे येत असत हें वरील विवेचनावरून स्पष्ट होत आहे. आतां ते कोणत्या मार्गानें येत असत व ग्रीक लोकांशिवाय इतर कोणकोणते लोक आर्यलोकांशीं कोणकोणत्या बाबतींत दळणवळण ठेवीत हे आपण पाहूं. प्रोफेसर विल्सन म्हणतो कीं, " ख्रिस्ती धर्माच्या उदयकाली तांबड्या समुद्राच्या मार्गाने युरोप व हिंदुस्थान याचे दळणवळण चालू होते व ज्ञानसंपत्ति आणि व्यापाराचे सर्व जिन्नस हे हिंदुस्थानातून अलेक्झांड्रिया येथे आणले जात. " डेव्हिसच्या मते " स्किथिॲनस या नावाचा मनुष्य हिंदुस्थानाशीं व्यापार करीत असे. तो ख्रिस्ताच्या बारा प्रमुख शिष्यांशी समकालीन होता. व्यापार करीत असतांना त्याने तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला व जेव्हा जेव्हा तो हिंदुस्थानात येई, तेव्हा तेव्हा येथील तत्त्वज्ञानाचाहीं पाठ घेऊन परत जात असे. असा क्रम चालू असता त्याचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास बराच वाढला. त्याने एक चार भागांचें पुस्तक रचले, त्यावरून पुढे मनिचींच्या मताचा प्रादुर्भाव झाला, जसा एपिफॅनियस, युसेबियस, एपिफॅनियस व सिरिल याचा त्याजवर मोठा आरोप आहे.

याच वेळीं ॲमोनियस् सॅकस् याने अलेक्झांड्रिया येथें प्लेटोचें नूतनानुयायि मंडळ स्थापले. या दोघावरही तत्कालीन समाजाच्या कल्पनेप्रमाणे चेटकीपणा, भोंदूपणा, कापट्य असे नानाप्रकारचे आरोप आले. कारण कीं, समाजात रूढ असलेल्या तत्त्वज्ञानाच्या प्रदेशात न वावरता हे नवीन तत्त्वे प्रसृत करूं लागले. त्या काळीं परमतासहिष्णुता फार प्रबल असल्याने त्याचेवर असे आरोप आले यात काहीं नवल नाहीं. मात्र आपणास वरील मुद्याच्या दृष्टीने एवढेच पाहावयाचे कीं, हीं नवीन मतें त्यांचीं स्वःचीं नसून हिंदुस्थानातील दळणवळणाचा तो परिणाम होता; व तीं आपण हिंदुस्थानापासून शिकलो हीं गोष्ट त्या तत्त्ववेत्त्यानीं सुद्धा आपल्या ग्रंथांतरीं नमूद करून ठेविली आहे. असा हा प्रत्यक्ष पुरावा सापडल्याने युरोप व हिंदुस्थान याच्या दरम्यान दळणवळण चालू होतें कीं नाहीं हा संशयच रहात नाहीं; त्याचप्रमाणें खऱ्या तत्त्वज्ञानाचा उदय कोठें झाला याबद्दल वादहि रहात नाहीं. आत्मा अविनाशी व अनंत असून जीव विनाशी व क्षणभंगुर आहे; परमेश्वर अंशरूपानें प्रत्येक प्राणिमात्रात वास्तव्य करितो, अशा प्रकारची आर्यांच्या तत्त्वज्ञानाची रूपरेखा आहे.

खरोखर मानवी मनाच्या वाढीच्या इतिहासांत हे वेदना-विचार अगदीं क्रांतिकारकच समजले पाहिजेत व त्याच्या उत्पादकाचे नांव प्रत्येकास अत्यंत प्रिय व ईश्वरनामतुल्य वाटावे यात काय आश्चर्य ? प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयांत

वास करणाऱ्या परमेश्वरी अंशास ब्रह्म असे मानावे, हा शोध प्रथम शांडिल्य मुनीनें लावला. याच ब्रह्माचे वर्णन, विवेचन व उद्घाटन उपनिषदात केलेले आहे. गोल्डस्टकरच्या मतें उपनिषदांशिवाय त्याच्याच तोडीचे संस्कृत ग्रंथ असंख्य होते: परंतु कालौघामध्यें ते गडप होऊन गेल्यामुळे मनुष्यजातीची फार हानि झालेली आहे. याच नष्ट झालेल्या ग्रंथाच्या आधारें हल्लीची षड्दर्शने तयार केलेलीं आहेत. याशिवाय निरीश्वरवादी, अज्ञेयवादी जैन व बुद्ध मतप्रतिपादक असंख्य ग्रंथ आज हयात आहेत; परंतु आपण षड्दर्शनाकडेच प्रथम वळूं. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्व व उत्तरमीमांसा ही त्या दर्शनांचीं नावे होत.

न्यायदर्शन.

या दर्शनाचा कर्ता गौतम हा आहे व याच्या मतें पदार्थमात्राचें सत्य व यथार्थज्ञान होणे हाच मुक्तीचा खरा मार्ग आहे. पदार्थांचे खालां दिल्याप्रमाणें त्यानें भाग पाडिले आहेत.

(१) प्रमाण (२) प्रमेय (३) संशय (४) प्रयोजन (५) दृष्टान्त (६) सिद्धान्त (७) अवयव (८) तर्क (९) निर्णय (१०) वाद (११) जल्प (१२) वितंड (१३) हेत्वाभास (१४) छल (१५) जाति (१६) निग्रहस्थान. वरील पृथक्करणानंतर प्रमेय, प्रमाण, त्याच्या भिन्न भिन्न जाति आणि आत्मा, शरीर, मन, इंद्रिये इत्यादि गोष्टींचा त्यानें विचार केला आहे. यानंतर शरीर व आत्मा याच्या मधील व्यापार मनातर्फे होत असतात; आत्म्यास पुनर्जन्म घ्यावा लागतो; परमेश्वर सर्वसाक्षी व सर्वज्ञानी असून तो अनंत जीवापासून अगदीं भिन्न आहे; वेद हे प्रत्यक्ष परमेश्वरी आदेश आहेत व त्याच्या शिकवणीप्रमाणें मनुष्यमात्रास वागलें पाहिजे; अविनाशी परमाणूंचे जगत् बनलेले आहे इत्यादि सिद्धान्त त्यानें आपल्या ग्रंथात स्पष्टपणे सोडवून दाखविले आहेत. सरतेशेवटीं नास्तिक मताचे खंडण करून परमेश्वरावर आपण विश्वास कां ठेवला पाहिजे याचे विवेचन केलें आहे. या दर्शनाचा संपूर्ण अभ्यास न करणारास असे वाटेल कीं, अनेक तर्कपद्धतींपैकीं ही एक होय. परंतु असे मानणें चुकीचें होईल. कारण न्यायदर्शनपद्धति ही एक वेदान्ततत्त्वज्ञानाची स्वतंत्र व संपूर्ण शाखाच आहे. हीमध्ये बुद्धि, स्पष्ट ध्वनि, जाति, नानाविधपणा, व्यक्तित्व इत्यादि गोष्टींचें व्याख्यान फारच बहारीचे व अधिकारयुक्तवाणीनें केलेलें आढळेल. व यात काहीं गोष्टी अशा आहेत की, त्या युरोपियन पंडिताच्या अद्यापि लक्षातही आल्या नाहीत. मॅनिगबाई म्हणते कीं, " तर्कगम्य मानवी

मनांतील अत्यंत गूढ प्रश्न गौतमाने साध्या व्यावहारिक भाषेने सोडविलेले पाहिलें म्हणजे त्याच्या अफाट बुद्धिसामर्थ्याचें कौतुक करावें तेवढे थोडेंच असें वाटतें. " शास्त्रीय परिभाषेचे व शब्दांचें प्रथमतः योग्य वर्गीकरण करून त्याच्या पायावर विवेचनरूपी वरील इमारत उठवलेली आहे. असे युरोपांतील तर्कशास्त्राच्या अभ्यासावरून मत बनणे स्वाभाविक आहे; परंतु न्यायदर्शनांतील विवेचनपद्धति अगदीं स्वाभाविक व स्फूर्तीजन्य आहे. त्याचा प्रथम अभ्यास करून नंतर त्यांतील परिभाषेचें व शब्दांचें पृथक्करण करणे जरूर वाटल्यास करावें; नाहींपेक्षा त्याची मुळीच गरज नाहीं. मासल्याकरिता एक उदाहरण घेऊं ' राजे लोक मर्त्यजीवाच्या वर्गांतील असल्याने ते सुद्धा मर्त्यच आहेत. ' हा सिद्धांत युरोपियन व आर्यतत्त्वज्ञान या दोहोंस सारखाच संमत आहे. कारण मर्त्यपणा व मनुष्यपण हे दोन धर्म दोघानाही सारखेच मान्य असल्याने वरील सिद्धांत कोणासच खोटा म्हणता येणार नाहीं. परंतु त्याची मांडणी करताना युरोपियन तर्कशास्त्र म्हणेल कीं, ' सर्व लोक मर्त्य आहेत ' व हिंदु तर्कशास्त्र म्हणेल कीं, ' जेथे मनुष्यत्व हा धर्म आहे, तेथे मर्त्यपणा हा असलाच पाहिजे. ' दोघाचाही युक्तिवाद जरी एकच असला तरी हिंदूंची पद्धत जास्त सोपी व परिणामकारक आहे असे वाटल्यावाचून रहाणार नाहीं. श्लेजेल म्हणतो कीं, गौतमाचें न्यायदर्शन कल्पनावादाचेच एक स्वरूप असून त्याचे प्रतिपादन फारच सोपे व तर्कानुगामी असे आहे. ग्रीक लोकास ही कला कंव्हाच अवगत झाली नव्हती त्याचप्रमाणे मॅक्समूलर व एलफिन्स्टन म्हणतात कीं, आधुनिक कालाने गौतमापेक्षा अजून काहीं जास्त शोधून काढले नाहीं. व ग्रंथसंख्येच्या दृष्टीने पाहिले तर ब्राह्मणांनी या शास्त्रावर असंख्य ग्रंथ तयार केले होते असे कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

वैशेषिक.

न्यायदर्शन व वैशेषिक दर्शन या दोघामध्ये कोणताही तात्त्विक फरक नसून तीं एकमेकाचीं पूरकच आहेत असें म्हटल्यास चालेल. न्यायदर्शनाचा विशेष विस्तार वैशेषिक दर्शनांत केलेला आढळतो. या दोन दर्शनाचा समावेश मनःशास्त्रात होतो. वैशेषिक दर्शनाचा कर्ता कणाद आहे. विश्वामधील सर्व वस्तूंचे सात प्रकारें वर्गीकरण कणादाने केलें आहे. ते सात प्रकार असेः—(१) द्रव्य (२) गुण (३) कर्म (४) सामान्य (५) विशेष (६) समवाय व (७) अभाव.

कणादाच्या ग्रंथाचे दहा भाग आहेत. न्यायदर्शनांत पदार्थमात्राचे १६ प्रकार दिले आहेत. ते ६ पाहिजेत असे पहिल्या भागात प्रतिपादन केले असून अभाव जो सातवा प्रकार त्याने नवीन सांगितला, त्याचे विवेचनही दिले आहे. कणादापूर्वी पदार्थांचे सहा प्रकार मानले जात होते. त्यात कणादाने सातव्याची भर टाकली. आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या भागात द्रव्य, तिसऱ्यात आत्मा व अंतःकरण, चवथ्यात व पाचव्यात बाह्यसृष्टीचा मानवी शरीरावर घडणारा परिणाम, सहाव्यात वैदिक धर्माचे मंडण, सातव्यात गुण व समवाय, त्याचे धर्म, जाति व परिपाक, आठव्यात पारमार्थिक ज्ञान, नवव्यात बुद्धि व विशेष, आणि दहाव्यात आत्मा व त्याचे गुण याप्रकारे अनुक्रमे विषयाचे विवेचन केलेले आहे. न्याय व वैशेषिक या दोन दर्शनामध्ये फरक नाही असे मागे सांगितले; परंतु विचारसरणींत जो दोन ठिकाणी फरक आहे तो असाः—

(१) न्यायदर्शन विश्वातील वस्तूंचे १६ भाग पाडते तर वैशेषिकात फक्त सातच आहेत. (२) न्यायदर्शनात प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द अशी चार प्रमाणे सांगितली असून, वैशेषिक दर्शनास प्रत्यक्ष व अनुमान एवढी दोनच मान्य आहेत. यांपेक्षा या दोन दर्शनामध्ये आणखी फरक नाही.

भाषापरिच्छेदाच्या प्रस्तावनेत डॉ. रुअर म्हणतो की, कणादाचे परमाणुतत्त्व प्रॉक तत्त्वज्ञानापेक्षा फारच उच्चदर्जाचे आहे. आणि मॅनिगबाईच्या मते वैशेषिक दर्शनाची विचारसरणी अतींद्रिय शास्त्रांपेक्षा जडशास्त्राकडे ज्यास्त झुकलेली दिसते. आधुनिक युरोपातील विज्ञानदृष्टीने पाहिले असता ध्वनिशास्त्राचा प्राचीन आर्यावर्तात जो विचार झाला तो योग्य असून साप्रत प्राप्त असलेल्या उपकरणसामुग्रीच्या अभावी त्याना हें कार्य त्या वेळी कसे करता आले याबद्दल मन बुचकळ्यात पडते व त्याच्या बुद्धिमत्तेबद्दल राहून राहून आश्चर्य वाटते. भाषापरिच्छेदाचा कर्ता विश्वनाथ हा स्पष्ट व अस्पष्ट ध्वनि याचे योग्य स्पष्टीकरण करून असे म्हणतो की, काहींच्या मते ध्वनि म्हणजे एक प्रकारची हवेत उत्पन्न होणारी तरंगपरंपरा आहे. व दुसऱ्याच्या मते ध्वनि हा कदंबकलिकेप्रमाणे आहे. याच मतसाप्रदायाचा दुसरा एक सिद्धान्त तर्कसंग्रहात दिलेला आहे तो असाः— आकाश अनंत व सर्वव्यापी असून त्यात ध्वनीचा धर्म आहे. आतां वर दिलेले ध्वनिसंबंधीचे दोन सिद्धांत आधुनिक जडशास्त्राच्या निष्कर्षावर लावून पाहिले असता कोणत्याही प्रकारें हिणकस ठरत नाहीत. यावरून त्या काळी आर्यांच्या चौकस व जिज्ञासु बुद्धिचा किती विकास झाला होता याचा कोणालाही तर्क

बांधता येईल. आर्य रसायनशास्त्राच्या इतिहासकर्त्याने असे म्हटले आहे कीं, " कणादाच्या ध्वनिसिद्धाताने सर्वांस सादर विस्मय वाटल्यावाचून रहाणार नाही. उष्णता व प्रकाश हीं एकाच मूल पदार्थाचीं दोन भिन्न दृश्य स्वरूपे आहेत. ह्या त्याच्या शोधाबद्दल तितकाच आदर व विस्मय प्रत्येकाचे हृदयांत उत्पन्न होईल. सांख्यदर्शनाचा कर्ता कपिल याने कणादाच्या काहीं सिद्धांतांचे त्याच्या पूर्वीच कथन केले आहे. "

न्याय व वैशेषिक या दोन्हीं दर्शनास अनुमानाचे पांच प्रकार मान्य आहेत. ते असः— (१) प्रतिज्ञा (२) हेतु (३) उदाहरण (४) उपनय व (५) निगमन.

उदाहरणार्थः— (१) वान्हिमान् पर्वतः
(२) यतःस धूमवान्
(३) यत्र यत्र धूमस्तत्र तत्र वन्हिः
(४) अयं धूमवान
(५) तस्मात् उक्तपूर्वेण प्रकारेण अयं वन्हिमान

पंचप्रमाणात्मक अनुमानपद्धतीवर अपुरेपणी व व्याख्येची सदोषता असे दोन आरोप केले जातात; परंतु त्यात विशेष अर्थ नाही. कारण नैय्यायिकाच्या मनाचा निष्कर्ष या पंचप्रमाणात्मक अनुमानपद्धतीत आला आहे. या अनुमान-पद्धतीचा ते फार अवलंब करतात. कारण तर्कशास्त्र व वक्तृत्वशास्त्र हीं एकमे-कांचीं साहाय्यक आहेत. चिकित्सापूर्वक जे तत्त्व शोधून काढलेले असते ते लोकास पटवून देण्याकरिता—त्याची सत्यता सिद्ध करण्याकरितां—वक्तृत्त्वाचे अंग असणे अवश्य आहे व त्याचकरिता न्यायशास्त्राबरोबर वक्तृत्वशास्त्राची वाढ आर्य व ग्रीक तत्त्वज्ञानात झालेली आपणास पहावयास मिळते. प्रथम गौतमाने आपलें न्यायदर्शन द्विप्रमाणात्मक अनुमानपद्धतीनेच माडलें होते; परंतु जेव्हां त्यास असे आढळून आले कीं, याचा व्हावा तसा परिणाम होत नाही; तेव्हा त्याने आणखी दोन प्रकार त्यात घातले, व शेवटी जो सिद्धात कथन केला तो पांचवा प्रकार. अशा रीतीने हल्लींची पंचप्रमाणात्मक अनुमानपद्धति बनली आहे. आर्य व ग्रीक अनुमानपद्धतींत जो फरक आहे तो दोघाच्या मनोरचनेचा आहे. ग्रीक लोकाची दृष्टि फक्त वादच जिंकण्याकडे होती; परंतु हिंदूची दृष्टि वादापेक्षा प्रतिपक्षाचे पूर्ण समाधान करणे ह्या गोष्टीकडे विशेष असल्यानें त्यानी ही पद्धति उपयोगात आणली. असे हिचें समर्थन डॉ. बॅलंटाईन व मॉनिंगबाई यानीं केलें आहे.

सांख्यदर्शन.

ख्य शब्द सम् व ख्या या दोन शब्दांपासून झालेला आहे; व त्यावरून संयोगात्मक तर्कशास्त्राचा बोध होतो. हा तत्त्वज्ञानपंथ अत्यंत जुना असून त्याचा संस्थापक कपिलमुनी आहे. याच्या मतें विश्वात मूलतत्त्वे २४ असून २५ व्याला पुरुष अथवा आत्मा म्हणतात. ही पदार्थसंख्या कपिलानी निश्चित केली यामुळेंच त्यांच्या पंथास हें नाव प्राप्त झाले असले पाहिजे. या २४ तत्त्वातील प्रकृति हे जगाचें आदिकारण आहे. पुरुष व प्रकृति असे जगतात दोन पदार्थ आहेत असे कपिलांचे तत्त्व असून येथूनच सांख्यांचा व वेदान्ताचा विरोध सुरू झाला. प्रकृति जड असून तींत उत्पत्तीचे सामर्थ्य नाही. मुळात ती अक्रिय व चेतनारहित आहे. फक्त पुरुषाच्या सानिध्याने लोहचुंबक न्यायाने तिच्यात चेतना व कार्यक्षमत्व उत्पन्न होते. दुसरे विरोधाचे कारण असे की. जीवात्मा हा देहापासून भिन्न असून अणुपरिमाण आहे. हे जिवात्मे असंख्य असून अमर आहेत; प्रत्येक जीवात्मा भिन्न आहे, आणि एका शरिरांतून दुसऱ्या शरिरांत जाणारा आहे. पुरुष हा ईश्वर आहे असें त्यानी कोठे म्हटले नाही. या विचारसरणीने कपिलाची गणना गौतम, कणाद, बुद्ध अशासारख्या निरीश्वरवादी लोकांमध्ये झाली. आस्तिकवादी म्हणतात की, आत्मा भिन्न नसून सर्व ठिकाणी अदृश्यपणे भरलेला आहे. हे अद्वैत वेदान्ताचे मुख्य तत्त्व आहे. अर्थात याच ठिकाणी साख्याचा विरोध आहे; परंतु एका दृष्टीने त्याना निरीश्वरवादी असे जरी म्हटले तरी वास्तवीकरीत्या ते सर्वेश्वरवादी होते. योगसूत्रकार पंतजली हा पक्का सर्वेश्वरवादी असून त्याने आपले योगशास्त्र सर्वत्र साख्यमताच्या पुष्टीस अर्पण केलेले दिसतें. अत्यंत प्राचीन कालीं सुद्धां साख्य व योग याची अभिन्नता वर्णिलेली आहे, व तिचाच अनुवाद सौतीने महाभारतात केला आहे. तेव्हा अशा पुरुषास निरीश्वरवादी म्हणण्यापेक्षा सर्वेश्वरवादी मानणे हेच अधिक युक्त आहे. निरनिराळ्या मताचा इतिहास पाहून त्यावरून हे ठरविणे जास्त चागलें. येथें फक्त निरनिराळ्या दर्शनाचा त्रुटित गोषवारा आम्हास द्यावयाचा आहे. सबब वरील अवघड वादात आम्ही शिरत नाही.

न्याय व सांख्य यांमधील भेद.

न्यायदर्शनानें पुरुषाच्या ठिकाणी निष्क्रियत्व आरोपित केलेले नसून तो क्रियावान् आहे व कर्मफलभोगी आहे असे मानलें आहे; परंतु साख्याच्या मते पुरुष सुखदु:खांहून भिन्न व अलिप्त मानला असून कर्म व कर्मफलाची त्यास

मुळींच बाधा होत नाहीं. कारण त्यांचे ठिकाणीं त्यांनीं पूर्ण नैष्कर्म्य कल्पिलेलें आहे. पुरुष व प्रकृति यांचें जेव्हां सानिध्य घडतें व लोहचुंबकाजवळ लोखंड आलें असतांना तें जसें हालचाल करूं लागतें त्याप्रमाणे प्रकृतीमध्यें पुरुषाच्या सहवासानें भावना व विचार उत्पन्न होतात. परंतु मनुष्य अज्ञानानें पुरुषाच्या ठायीं भावनाचा व विचारांचा आरोप करितो व त्यास सुखदुःखाचा उपभोगी समजतो. साख्याच्या मतें पुरुष प्रकृतींहून निराळा आहे सर्व क्रिया व सुखदुःखे प्रकृतींच्या ठिकाणीं आहेत असें ज्ञान मनुष्याला झालें म्हणजे त्यास मोक्ष मिळतो, आणि हेंच अत्युच्च ज्ञान होय. साख्यांचें दुसरें मत असें आहे कीं, मुळातच जें नाहीं त्यापासून अन्य वस्तू उत्पन्न होणें असंभाव्य आहे. जी वस्तू कोणत्याहीं स्वरूपांत अस्तित्वात आहे तिला काहीं तरी मूलाधार असलाच पाहिजे. त्याविना तिचें चालू अस्तित्वच संभवत नाहीं. गोल पदार्थ बनविण्याला ज्याचा तो बनविलेला असतो त्याचे ठिकाणीं गोलपणाचे बीज अत्यंत सूक्ष्म रूपानें वसत असतें जरी जड दृष्टीस ते (बीज) भासमान होत नसलें तरी अदृश्य स्वरूपात ते त्यामध्यें असतेंच म्हणून त्यापासून दृश्य वस्तू उत्पन्न होते, व तत्समान आकार धारण करिते. न्यायाचा यास अगदीं विरोध आहे.

मिसेस मॅनिंग म्हणतें कीं, "मानवी जीवनाच्या अत्यंत गूढ तत्त्वाचा उद्बोध करून तीं सर्व जगास पटवून देण्यात साख्यांनीं जे परिश्रम केले ते केवळ बिनमोल आहेत. मनुष्य व त्याचप्रमाणे सर्व विश्वही विनाशी आहे. मनुष्याला वाटतें कीं, माझ्या ठिकाणीं फार मोठमोठे गुण व अनंत सामर्थ्य आहे; परंतु जेथें सर्व विश्वच विनाशी तेथे यःकाश्चत् मनुष्याचा काय पाड? फक्त परमात्माच सत्य असून अविनाशी व अनंत आहे. विश्वाचा विनाशीपणा सिद्ध करण्यात व मानवी जीविताचा फोलपणा दाखविण्यात साख्याची चतुराई व कौशल्य कांहीं अपूर्वच दिसते. हीं गोष्ट त्याच्या प्रतिपक्ष्यासहीं मान्य असून प्राचीन व अर्वाचीन सर्व पंडित याबद्दल त्याजवर स्तुतीचा वर्षाव करित आहेत; परंतु पुरुषाचे अनंतत्व व चिरकालित्व सिद्ध करण्याचे कार्मा साख्यानीं आपला हात आखडला असून बहुतेक मुग्धपणाच धरला आहे; आणि एकंदर विवेचनावरून असें वाटतें कीं, त्यानीं जें लिहिले आहे त्यापेक्षा त्याचे ठिकाणीं पुष्कळच अधिक विचार शिल्लक होते. मग कारण कांहीं असो. कदाचित् त्याचा निरीश्वरपणाच कारणीभूत असेल."

सर हंटर म्हणतो कीं, "विश्वाची उत्पत्ति, व्यवस्थिति व उत्कर्ष याचे जें

विस्तृत विवेचन साख्यानीं केलें आहे त्याचाच केवळ अनुवाद हल्लींच्या उत्क्रांतीवाद्यानीं नवीन दृष्टीनें व नवीन भाषेनें केला आहे, व त्याच्यापेक्षां याची काहीं जास्त करामत आहे असे म्हणवत नाहीं.

योगदर्शन.

परमात्मा व जीवात्मा याचे स्वरूप कळण्यास, मानवी अंतःकरणातील गूढतम गोष्टींचा थाग लागण्यास, आणि मनुष्यप्राण्याच्या हृदयात प्रामाणिक, यथार्थ व खरेखरे विचार काय आहेत याचा बोध होण्यास योगशास्त्राखेरीज अन्य साधन नाहीं. अथवा दुसऱ्या तऱ्हेनें असे म्हणता येईल कीं, अतींद्रियशास्त्र व मानसशास्त्र याची उत्पत्ति व वाढ योगशास्त्राशिवाय होणे दुर्घटच आहे. पतंजलीनें आपल्या योगशास्त्रात हेच सिद्ध केले आहे. त्याच्या ग्रंथाचे चार भाग आहेत. पहिल्या भागात आत्म्याच्या स्वरूपाचे व योगाचे विवेचन केलेले आहे. आणि योगाच्या आठ पायऱ्याचे वर्णन दिलेले आहे. त्या आठ पायऱ्या अशाः—

(१) यम (अ) अहिंसा, (आ) सत्यवचन, (इ) अस्तेय, (ई) ब्रह्मचर्य, (उ) दानाचा स्वीकार न करणे, (२) नियम (अ) शौच, (आ) इज्या, (इ) तपस् (ई) स्वाध्याय, (उ) उपस्थ-निग्रह. (३) शत आसने. (४) प्राणायाम पूरक, रेचक, कुंभक. (५) प्रत्याहार. (६) धारणा. (७) ध्यान. (८) समाधि.

याप्रकारें आठ पायऱ्या सागून झाल्यानंतर समाधी व तिचे प्रकार यांचे वर्णन पहिल्या भागात दिलेले आहे. दुसऱ्या भागात समाधी लावण्याची पद्धति सांगितलेली आहे. तिसऱ्या भागात योगी मनुष्याला समाधीपासून केवढे अचाट सामर्थ्य प्राप्त होते, समाधीपासून निरनिराळ्या स्थळी निरनिराळी शक्ति कशी प्राप्त होते, स्थान व समाधि यांचे परस्पर संबंध, उदाहरणार्थ चंद्रलोकावरील योग्याचे सामर्थ्य गुरुलोकावरील योग्याच्या सामर्थ्यापेक्षा कसे निराळे असते वगैरे व्याख्यान ह्या भागात केलेले आहे. शेवटी चवथ्या भागात मोक्षाचा विचार केलेला असून योग्याला भूतभविष्याचे ज्ञान, मृत्युकाल, दुसऱ्याच्या मनातील विचार व अन्य प्राण्याच्या ध्वनीचे ज्ञान कसे होते याचा विचार केलेला आहे.

हिंदुस्थानांत योगी लोकाच्या अचाट, अतिमानुष अशा पराक्रमाच्या गोष्टी, त्याचे अतींद्रिय ज्ञान, त्याचें भविष्यकथनसामर्थ्य, त्याची समाधिस्थितींत झालेली प्रत्यक्ष परमेश्वराची भेट व ब्रह्मसाक्षात्कार करवून देण्याची शक्ति इत्यादि प्रकार योगशब्दाबरोबर संबद्ध झालेले आहेत. हिंदुसमाजात नुसत्या योगशब्दाला अर्थच

नाहीं. जर काहीं रूढ अर्थ असेल तर वर नमूद केलेल्या गोष्टींशीं तो संलग्न आहे. म्हणून हिंदु म्हणविणाराला त्याचे विशेष आश्चर्य वाटत नाहीं. पण जर याच्या उलट स्थिति असेल म्हणजे एकादा मनुष्य योगाची तालीम करित असेल, पतंजलीच्या आदेशाप्रमाणे वर्तत असेल, आणि जर योगानें प्राप्त होणारे सामर्थ्य मुळींच संपादन झालेले नसेल तर मात्र आश्चर्य. काहीं दिवस युरोपियनांना हे सर्व झूट, नजरबंद, गारुडीपणा, हातचलाखी, गौडबंगाल इत्यादिकांपैकीं काहीं तरी असावें, खुळचट व भ्रमिष्ट लोकांचा हा खेळ आहे, शहाण्या मनुष्यानें इकडे लक्ष देण्याचे कारण नाहीं असे वाटे. त्यांना योग म्हणजे शास्त्र होय असे वाटत नसे, हा सर्व भोळ्याभाबड्या लोकाच्या अज्ञानाचा परिणाम आहे असे ते समजत; परंतु पुढें युरोपियन पंडितांचा व खऱ्या योगनिष्ठ पुरुषांचा गाठ पडली व त्यानी त्याचा गर्वपरिहार करून वेदान्तधर्माचे व हिंदुविद्येचे त्यास यथार्थ स्वरूप दाखविलें. अशा प्रसंगापैकीं एक-दोहोंचे येथे वर्णन करूं म्हणजे खात्री होईल. अर्थात खालील उतारे युरोपियन लोकानीं स्वानुभवानें लिहून ठेविले आहेत एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या खरेपणाविषयी संशयच राहणार नाहीं.

प्रो. विल्सन याने लिहून ठेविले आहे कीं, "एकदा एक ब्राह्मण हवेत अधान्तरी बसलेला आपण पाहिला. तशा स्थितींत तो एकदा बारा मिनिटें व दुसऱ्या खेपेस ४० मिनिटें असलेला दिसला."

डा. मॅग्रेगोर याने शीखांचा इतिहास लिहिला आहे त्यांत खालील चमत्कारीक गोष्ट दिली आहे.

"१८३७ सालीं एका बागेचात फारच विस्मयकारक गोष्ट घडली. एकदा एक फकीर लाहोर येथे आला व त्याने जाहीर केले कीं, अन्नपाण्याशिवाय वाटेल तितक्या दिवस लाकडी पेटींत कोंडून जमिनींत पुरून ठेविले तरी आपणास काहीं होणार नाहीं. प्रथमः रणजितसिंग याचा या गोष्टीवर विश्वास बसेना, व म्हणून त्याने ती गोष्ट प्रयोग करून खरी आहे की नाहीं हे पाहण्याचे ठरविले. रणजितसिंगाने त्या फकिरास सांगितले कीं, आपणास ही गोष्ट प्रत्यक्ष पहाणे आहे. लागलीच त्या फकिराने त्याच्या म्हणण्यास रुकार दिला. सर्व तयारी करण्यांत आल्यावर फकीर लाकडाच्या पेटींत बसला, ती पेटी एका खोलींत पुरून टाकली व ज्या बागेच्या मध्यभागी ही खोली होती त्या बागेच्या सभोवार कोट होता आणि दरवाज्यावर सशस्त्र पाहरा ठेविला होता. हेतु हा की, कोणीही कोणत्याही मिषाने आत जाऊं नये; व त्या फकिरास अन्नपाणी व हवा मिळूं नये.

बंदोबस्त अत्यंत कडक होता. अशा रीतीने ४० दिवस व ४० रात्री निघून गेल्यावर स्वतः रणजितसिंगमहाराज, त्याचा नातु, काही सरदार, सेनापति, वेंटुरा, जमादार 'वाड' Wade व स्वतः मी इतकी मंडळी त्या फकिरास जमिनींतून वर काढून पेटींतून खुला केल्यावर तो जिवंत आहे कीं नाहीं हें पाहण्यास मुद्दाम गेलों होतो. त्यास बाहेर काढल्याबरोबर तो आमच्यापाशीं बोलूं लागला. तेव्हां आमचा आनंद गगनांत मावेना व आश्चर्यास तर पारावारच नव्हता. लागलीच तोफांची सरबत्ती देऊन गावांत जिकडे तिकडे ही चमत्कारीक हकीगत जाहीर करण्यात आली, व ठिकठिकाणीं आनंदोत्सव करण्यात आले. महाराजानीं त्यास लागलीच एक सोन्याची साखळी देऊन त्याचा निरोप घेतला."

अशा प्रकारच्या गोष्टी हिंदुस्थानात प्रत्यहीं घडत असतात. व त्या करून दाखविणारे योगी, संत, महंत ठिकठिकाणीं आहेत. फ्रायरला एका योगी पुरुषाने सूर्याकडे सारखी दृष्टि लावून ठेविली म्हणून आश्चर्य वाटले. युरोपांत ही शक्ति अज्ञात असल्याने त्यांस याबद्दल राहून राहून कौतुक वाटतें. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानात ह्या गोष्टीचे कोणासच काहीं वाटत नाहीं.

मीमांसा.

दर्शनाच्या शेवटल्या जोडीला मीमांसा असें म्हणतात. मीमांसेचे पूर्व व उत्तर असें दोन प्रकार आहेत. ते कालवाचक नसून क्रमवाचक आहेत. पूर्व मीमांसेंत ब्राह्मणग्रंथांत दिलेल्या कर्मकांडाचा विचार केलेला असून उत्तर मीमांसेंत परब्रह्माच्या स्वरूपाचा विचार केलेला आहे. अर्थात् या ज्ञानाला उपनिषदांचाच सर्वस्वीं आधार आहे. किंबहुना ब्राह्मणग्रंथाच्या पाठीमागून उपनिषदग्रंथ तयार झाले असल्याने व त्यांच्याच आधारें हीं दर्शने निर्माण झालीं असल्याने त्यास हें नांव प्राप्त झालें.

पूर्व मीमांसेंत यज्ञयाग, अग्निहोत्र, दान इत्यादि क्रियांचें सविस्तर व सूक्ष्म वर्णन केलें आहे. या ग्रंथाचा कर्ता जैमिनी. याने धर्म, अधर्म याचा खल करून असें ठरविलें कीं, वेदाज्ञाप्रमाणें वागणें हाच खरा धर्म होय व त्यापासूनच सुखाची प्राप्ति आहे.

उत्तर मीमांसेचा कर्ता प्रख्यात व्यास महर्षी हा होय. षड्दर्शनांपैकीं हे सर्वांत श्रेष्ठ असून याने वेदान्तधर्माचा जोराने पुरस्कार केला आहे. वेदान्तामध्यें परमात्मा व जीवात्मा यांच्या परस्परसंबंधाची चर्चा केलेली असते व ह्या पंथाचा

उत्तर मीमांसा ग्रंथ प्रमाणभूत मानलेला आहे. ह्या ग्रंथामध्ये हिंदूंच्या असामान्य व लोकोत्तर बुद्धीचा जो विलास पहावयास मिळतो तसा इतरत्र कोठेही आढळून येणार नाहीं. व्यासांनीं नास्तिक वादाचा पाडाव करून पुनश्च सर्वेश्वरवादाचें निशाण अध्यारोपित केले आहे. आत्मज्ञानानेंच मुक्ति प्राप्त होणार आहे असा ब्रह्मसूत्रांचा मुख्य सिद्धांत आहे.

ब्रह्मसूत्रांविषयीं प्रो. मॅक्समूलर असें म्हणतो कीं, " प्रत्यक्ष प्राणापलीकडील गोष्टही दूर लोटण्याचे सामर्थ्य आलें पाहिजे म्हणजे मग दुसरी प्रियतम गोष्टच उरणार नाहीं. अशी जेव्हा मनाची तयारी होईल तेव्हा सर्व जीवात्म्यांचा ईश जो परमात्मा, त्याची भेट होईल. यमनियमयुक्त ज्ञानाची जेव्हा इतकी पराकाष्ठा होईल तेव्हा प्रत्यगात्मा व परमात्मा याची एकरूपता होईल; परमात्म्यांत जीवात्म्याचे प्रतिबिंब दिसावयास लागेल, जीवशिवाचें ऐक्य होईल; जीवनस्थितीस शुद्धधर्माचा आदर्श, परमतत्त्वज्ञानाची प्रतिछाया व सत्यधर्माचे रहस्य यापैकीं कोणतेंही नाव शोभेल." "याच मूळ कल्पनेचा विस्तृत ऊहापोह वेदान्तांत केला आहे; व ज्याने बर्कलेचे तत्त्वज्ञान समजून घेऊन शिवाय उपनिषदें व ब्रह्मसूत्रे याच्यातील ज्ञान आधिगत केले आहे त्यास खात्रीपूर्वक असे सागतां येईल कीं, उपनिषदे व ब्राह्मण यातील तत्त्वज्ञानापुढे बर्कलेचे तत्त्वज्ञान अगदींच तुटपुंजें व खरटे दिसते."

परमात्मा व जीवात्मा याच्या संबंधाबद्दल मतैक्य कोठेच दिसून येत नाहीं. रामानुजाचार्यांना ह्या दोघामध्ये सेव्यसेवकाचा संबंध दिसतो. ते दोघे अगदीं स्वतंत्र असून जीवात्मे असंख्य आहेत असे त्याचें म्हणणे आहे. याच्या उलट शंकराचार्य म्हणतात कीं, परब्रह्म एकच असून त्या व्यतिरिक्त काही नाहीं. डोळ्यांस जे दिसते ते सत्य नसून भ्रामक आहे. व त्यास ते माया असें म्हणतात.

स्वामी दयानंदसरस्वती याचे मत रामानुजाप्रमाणें आहे व परमात्मा व जीवात्मा याचें ऐक्य कधींहि होणें शक्य नाहीं असें ते म्हणतात. परंतु लोकमतावर शंकराचार्यांच्या मताची विलक्षण छाप असून, सार्वत्रिक शंकराचार्यांच्या मताचाच अनुवाद केला जातो. हिंदु लोकात सर्वेश्वरवादाचें प्राबल्य अतीशय असून आजतागायत मानवी बुद्धीने तत्त्वज्ञानाचे जे निरनिराळे सांप्रदाय संस्थापित केले आहेत त्यांपैकी सर्वेश्वरवाद अतीशय श्रेष्ठ आहे.

सर वुइल्यन जोन्स म्हणतो कीं, "आचार्यभाष्यासारख्या सुंदर ग्रंथाचे एकाया

युरोपियन भाषेत संपूर्ण भाषातर झाल्याशिवाय तत्त्वज्ञानाचा इतिहास पुरा होणार नाहीं. प्रत्यक्ष सरस्वतीस सुद्धा आचार्यभाष्यार्चा महती गातांना शीण आल्याखेरीज रहाणार नाहीं."

जड सृष्टीचा विस्तार व तिचा अभेद्यपणा हे प्रकार प्रत्यक्ष दृष्टीस दिसत असता ते नाकबूल करण्यात काय हाशील? परंतु वेदान्ताचे मुख्य तत्त्व असें आहे कीं, जरी हे प्रकार आपणास दिसले तरी ते खरे नव्हेत; दृष्टीच्या विकृत कार्याचा तो दोष आहे; त्याचे यथार्थ स्वरूप जसे दिसते तसें नसून फार भिन्न आहे. मानवी दृष्टीचा हा भ्रम आहे. मानवी मनाच्या कल्पनेने निर्मित केलेली ही सृष्टी आहे.

परब्रह्मज्ञानाच्या दृष्टीने हे सर्व आभासरूप आहे. मनुष्याच्या कल्पना व्यक्त व दृश्य स्वरूपाने दिसूं लागल्या कीं, त्यास सृष्टि असे म्हणतात. सृष्टीचे बाह्य व नयनगोचर देखावे आणि तज्जन्य भावना ह्या आभासमूलक आहेत. जर यातील आधारभूत चैतन्य क्षणभर आपले कार्य बंद ठेवील तर त्याचा परिणाम दृश्यमान सृष्टीचा सर्वनाश हाच होईल. लौकिक समज दृश्य सृष्टि खरी मानण्याकडे असतो; तो दुरुस्त करून खरें रहस्य सागणें हींच वेदान्ताची मुख्य कामगिरी आहे. एपिकारमस व प्लेटो याचे हेच मत असून साप्रत याच मताची मोठ्या आढ्यतेने तरफदारी केली जाते; परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, त्याबद्दल आधुनीक लोकप्रिय लेखकास आदर वाटत नाहीं. कदाचित् याचे कारण असें असूं शकेल कीं, आधुनीक पंडिताना ईश्वराचे सर्वसाक्षित्व, सौजन्य, सर्वज्ञता इत्यादि गुणाबद्दल खात्री नसेल; परंतु हिंदूंचे मत याच्या उलट असून ईश्वराच्या वरील गुणावर त्याचा पूर्ण भरंवसा आहे, व अशा अव्यभिचारी भक्तीच्या पायावर त्यानी वेदान्तशास्त्राची इमारत उभारली आहे." सर जेम्स मॅकिन्टॉश म्हणतो कीं, वेदान्त-तत्त्वाची कल्पना अतिशय विशुद्ध, सुंदर, खुबीदार, स्वाभाविक व स्वतंत्र आहे.

मीमासा ग्रंथाच्या विवेचनपद्धतींत प्रथम पूर्वपक्ष सागून नंतर उत्तरपक्ष माडलेला असतो व शेवटी मुख्य सिद्धात कथित केलेला असतो. ह्या पद्धतीचे प्रो. मॅक्समूलर यास फारच कौतुक वाटले व त्याने असे लिहून ठेविले आहे की, "आजपर्यंत जगात चमत्कृति-जनक अशी बरींच काव्ये व ग्रंथ निर्माण झाले; परंतु ह्या ग्रंथाची थोरवी काही अपूर्वच आहे. धन्य आहे त्या महाभागाची कीं ज्याच्या बुद्धींतून असले पुस्तक उदयास आले. प्रत्येक प्रकारच्या ज्ञानप्रसारास असलें साधन उत्पन्न करून ते इतके सुव्यस्थित, सोपे, सर्वसंग्राह्य बनाविणाऱ्या हिंदूंच्या कल्पक बुद्धीची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे."

साहीं दर्शने वाचणारा व अभ्यास करणारा युरोपियन पंडित खरोखरच विरळा; त्यास मुख्यत्वेंकरून भाषेची अत्यंत दुर्बोधता, तत्त्वज्ञानातील परिभाषा-काठिण्य आणि आध्यात्मिक व बौद्धिक पारपक्वतेचा अभाव इत्यादि अडचणी फार जाचतात असें दिसते. आर्यतत्त्वज्ञानाच्या कारंज्यांत उपनिषदाच्या झऱ्यांचे जोमदार प्रवाह वहात आहेत. उपनिषदाची संख्या एकंदर ५२ आहे. उपनिषदात तत्वज्ञानात्मक विषयावर व्याख्याने लिहिली असून त्याच्या उपदेशरूप मंदानिलापासून आध्यात्मिकतेच्या व महानुभावित्वाच्या लहरी सर्वत्र प्रसार पावतात, त्या लहरी सारख्या अन्यत्र कोठेंही पहावयास मिळणे फारच दुरापास्त. उदात्त तत्त्वज्ञान, गाढ विद्वत्ता, चिरस्थायी सिद्धान्त व सत्यपूर्ण तत्त्वे याचा उपनिषदात जो संग्रह केलेला आहे तो मानवी मनाच्या अजबखान्यातील एक बिनमोल पदार्थ म्हणून मानला जाईल, व हिंदूच्या दृष्टीने पाहिल्यास त्याच्या अप्रतिम बुद्धिवैभवाचे तें एक अत्युत्कृष्ट स्मारक म्हणून जगापुढे सदैव उभे राहील.

कान्ट व शोपेनहौर याच्या तत्त्वज्ञानाशीं उपनिषदाचा पूर्ण मिलाफ असून जेथे कमीजास्त भाग दिसतो तेथें उपनिषदाचीच सरसता प्रत्ययास येते. शोपेनहौर व डयुसन यानीं जेव्हा मानवाच्या धार्मिक वृद्धीचा हिशेब घेतला तेव्हा त्यास ख्रिस्ती धर्मातील न्यू टेस्टामेंट (नवा करार) व उपनिषदग्रंथ यातील धर्माभिमुखता फार आवडली व त्याचे असे मत झालें की, जगात जोंपर्यंत हे ग्रंथ जिवंत आहेत तोंपर्यंत मानवी जनावरील धार्मिक दडपण नाहींसे होऊन जगात जिकडे तिकडे पशुवृत्तींचा धुमाकूळ होण्याची भिती नाहीं; परंतु त्या दोन ग्रंथामध्ये उपनिषदग्रंथ फारच उच्च कोटीतील आहेत असे त्याचें म्हणणे आहे.

जर्मनतत्त्वज्ञ शोपेनहौर याचे उद्गार मननीय आहेत. " ज्यू धर्मातील अंधश्रद्धायुक्त समजुती व वेडगळ समज यांचें मनावर जे कीट वाढले होतें व अशा अंधश्रद्धेच्या पायावर रचलेल्या तत्त्वज्ञानाने जो मनाला पंगुपणा आला होता तो सर्व उपनिषदवगाहनाने नाहींसा होऊन मन कसे प्रफुल्लित व जोमदार होतें तें पहा. सर्व जगात उपनिषदग्रंथाच्या अभ्यासापेक्षा दुसरा कोणताही अभ्यास फलदायी व मनाच्या उच्च स्थितीप्रत नेणारा नाही. माझ्या आयुष्यांतील उपनिषदध्ययन हेंच श्रेष्ठ सुख व मरणोत्तर प्राप्त होणारे आत्यंतिक सुखही तेच. "

एलफिन्स्टनसाहेबाची ग्रीक व प्राचीन आर्य यामधील तुलना खरोखर सदैव ध्यानात ठेवण्याजोगी आहे. तो असे म्हणतो की, " हिंदूचें सर्व विषयातील ज्ञान बरेंच वाढलेलें होतें; तरी पण ईश्वर-स्वरूपज्ञानाचा जो भव्य दीप भारतीय

आर्योजवळ होता व ज्याच्या सहाय्याने त्यानीं सर्व आध्यात्मिक प्रदेश हिंडून त्यात अभूतपूर्व व दुःसाध्य शोध लावले त्याचा एकादा मंद किरण सुद्धां विशाळ व गाढ ग्रीक विद्वत्तेला पैदा झाला नाहीं. तेणेकरून तिला संशयरूप अंधकार व नास्तिकवादरूपी खाचखळगे यातून मार्ग काढणें फार कठीण झालें. "

भगवद्गीता.

भगवद्गीता हा ग्रंथ वेदान्त तत्त्वज्ञानाच्या मुगुटावरील अत्यंत दैदीप्यमान हिरा होय. याच्या प्रभेनें त्या मुगुटांतील किंचित् हिणकस व कालातराने मलीन झालेला भाग पुन्हा उठावदार, तेजोमय व सुंदर दिसूं लागला; व एकंदर वेदान्त तत्त्वज्ञानास यानें अगदीं अपूर्व शोभा आली आहे या जगात ब्रह्माखेरीज इतर सर्व माया आहे. ब्रह्म तेवढें सत्य असून इतर सर्व मिथ्या व आभासरूप आहे. असल्या विचारसरणीने काही असामान्य, अलौकिक बुद्धिमान पुरुषास मनन करण्यास अवाढव्य क्षेत्र मिळाले, त्यांत ते तल्लीन झाले व जगास विसरून गेले: साधारण लोकांची बुद्धि असल्या कठीण विषयावर घासल्याने फारच बोथट झाली: त्यास कोणत्या मार्गाने जावे हे कळेना. श्रेयस्कर व निःसंशय हितप्रद मार्ग कोणता हें न कळण्याने समाज बेलगामी होऊन धरबंध सर्व सुटला; कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाहीं. जिकडे तिकडे स्वतंत्र बुद्धीचे वारे खेळूं लागले; परंतु सुकाणू मात्र कोणाच्या हातात नाहीं. अशा स्थितींत समाजाचीं शकलें होणार हे ओळखून व्यासासारख्या त्रिकालज्ञ महर्षींनी हा ग्रंथ तयार केला व त्याची योजनाही चमत्कारिक ठिकाणी केली. महायुद्धाचे तोंड लागणार व जिकडे तिकडे एकच रणधुमाळी माजणार अशा प्रसंगी गीतेस आरंभ केला हे कसें ? हा प्रश्न विचार करण्यासारखा असून बहुतेक विद्वानांनी तो आपआपल्या मतीने सोडविला आहे. परंतु अशाच ठिकाणीं तो वाद अप्रस्तुत होईल सबब सोडून देणें बरे. शेवटीं कोणाही युरोपियन अगर हिंदी विद्वानाचे प्रशंसापर अभिप्राय न देता हे प्रकरण पुरे करतो. कारण आर्यतत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची परिपूर्ती गीतेखेरीज होत नाहीं. सबब प्रत्येक पंडितास सानंद व साश्चर्य उद्गार काढावे असे वाटणें हा या ग्रंथाचाच विशेष आहे. परंतु त्याची योग्यता वाढविण्यास कोणाच्या प्रशंसेची त्यास जरूर नाहीं तो स्वतः स्वयंभुव, रवीसारखा तेजस्वी असून सर्व जगाचे आध्यात्मिक जीवन नियमित करण्यास समर्थ आहे. सबब अशा ग्रंथाचा अध्ययनकाल हा प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यातील अत्यंत आनंददायी काल गणला जाणे अगदीं योग्य आहे. शेवटीं फिरून एकवार सर्वांस या ग्रंथाचा व्यासंग सवडीनुसार करण्यास सागून रजा घेतो

प्रकरण ५ वें.

भारतीय वैद्यशास्त्र.



प्रमाणे भारतीय आर्यांनी इतर सर्व शास्त्रे पूर्ण वृद्धिगत केली त्याचप्रमाणे त्यांनी वैद्यशास्त्रासही वाढीच्या अत्युच्च शिखरास नेऊन पोचविले होते. सूक्ष्म निरीक्षणाची फार मोठी शक्ति, सर्वसामान्य सिद्धान्त काढण्याची अजब युक्ती व पृथक्करणात्मक विवेचनाची जबर हौस इत्यादि गोष्टींना धिमेपणाच्या उद्योगाचा जोड मिळाल्यावर शास्त्राचा उत्कर्ष व्हावा यांत काय नवल ? परंतु एवढ्याच गोष्टी त्यास अनुकूल होत्या असे नाही तर त्याची मायभूमी, खानज, वनस्पत्य व इतर औषधींय लहान लहान झाडे याच्या अफाट संपत्तीने परिपूर्ण असल्याने ह्या शास्त्राची वाढ होण्यास फार मदत झाला. सर्व हवेत, ऋतूंत, व सर्व भूमीत वाढणाऱ्या औषधींची येथे वाण नसल्याने या शास्त्राचा अभ्यास करण्यास त्यांस फारच सोईचे पडले. स्वतंत्र आर्यवैद्यकशास्त्र ज्यांनी बनविले त्यांनी त्यावर पुष्कळच ग्रंथ रचले असले पाहिजेत ही गोष्ट कोणासही पटण्यासारखी आहे. परंतु दुर्दैवाने काळाच्या आसुरी लीलेने त्याचा नाश होऊन आज फारच थोडे ह्यात आहेत. त्यामुळे त्या शास्त्रात आर्यांनी किती प्राविण्य संपादन केले होते याचा नक्की ठाव लागत नाही. तत्त्वज्ञान, व्याकरण इत्यादि विषयावरील असंख्य ग्रंथ आज उपलब्ध आहेत; परंतु वैद्यशास्त्राची तशी स्थिति नसल्यामुळे त्याचा ह्या अत्यंत महत्त्वाच्या शास्त्रांतील शोधात किती प्रवेश झाला होता हे ठरविणे दुरापास्त झाले आहे. वास्तविक पाहता वैद्यशास्त्र हे व्यावहारिक व प्रयोगात्मक शास्त्र आहे, म्हणून त्याची अशी हेळसांड होऊं नये; परंतु त्याच्या अगदी उलट प्रकार दिसतो त्यास नाइलाज आहे. तत्त्वज्ञान, व्याकरण, ईश्वरस्वरूपज्ञान वगैरे शास्त्रे कल्पनात्मक, विचारात्मक व चित्ताल्हादक असून प्रत्यक्ष उपयुक्ततेच्या दृष्टीने कमी किंमतीची आहेत; परंतु वैद्यशास्त्र सदैव व्यवहारोपयोगी असून यच्चावत् मनुष्यास त्याची जरूर आहे असे असता त्याचा नाश व्हावा हे दुर्भाग्य तर खरेच, परंतु त्याब-

रोबर हयगय व अदूरदर्शीपणा हे आरोप आपोआप येऊन चिकटतात. असो. आतां अवशिष्ट वैद्यक ग्रंथ व प्राचीन संस्कृत ग्रंथ यांचा नाश होण्यापूर्वी इतर भाषेंत त्यांचीं जीं भाषांतरें झालीं असतील त्यावरून या शास्त्राच्या वाढीचा काही इतिहास सापडल्यास पाहूं.

प्रथमतः ह्या शास्त्राचा उत्पादक कोण यांची चर्चा करूं. हिंदू लोकांत असा समज आहे कीं, या शास्त्राचा मूल उत्पादक धन्वंतरी असून त्याने आपला शिष्य सुश्रुत यास हे शास्त्र पढविले. दुसरी उपपत्ति अशी लागते की, चरक नांवाचा जो प्रख्यात वैद्यकग्रंथकार यास अग्निवेश याने शिकवून तयार केले व अग्निवेशाला ही विद्या आत्रेय मुनीपासून मिळाली. चरक म्हणतो कीं, मी मूल ग्रंथात जेथें अतीशय लांबट भाग होते ते लहान व बेताचे केले व जे भाग अगदी लहान होते ते थोडेबहुत वाढविले. एकंदरींत पाहता हल्लीं जे वैद्यकावर प्रमाणभूत ग्रंथ म्हणून मानले जातात ते या दोघांचे—(चरक व सुश्रुत)–आहेत.

आर्यवैद्यकात कोणकोणते विषय प्रतिपादले आहेत ते पाहूं. १९०५ सालीं मद्रास इलाख्याचे गव्हर्नर असलेले लार्ड ऑंप्थिल म्हणतात कीं, " हिंदुशास्त्रांत आरोग्याचे नियम हल्लीप्रमाणेच सुधारलेल्या स्वरूपाचे होते; व प्रख्यात धर्मशास्त्रकार मनु यांचा आरोग्यरक्षक म्हणून फार दूरवर कीर्ति पसरली आहे. जगांतील अतीशय नामांकित आरोग्यसुधारक माणसांमध्ये त्यांचा फारच उच्च दर्जा होता. "

सर वुइल्यम हंटर म्हनतो कीं, " आर्यवैद्यक इतर पूरक शास्त्रांशी फारच एकरूप झालेलें होतें. शरीररचना, अवयव, जोड, स्नायू, रक्तवाहिन्या व शरीर घटक tissue धातु याचा आर्यवैद्यकात विस्तृत विचार झालेला आहे. हिंदूंच्या सर्वमान्य व सर्वसंग्राहक वैद्यक ग्रंथात वनस्पत्य, खानज, प्राणीविषयक सर्व वस्तूंचा समावेश झाला आहे; त्यांची नामावळी बेसुमार विस्तृत झाली असून ह्यातून बरींच नांवे युरोपीय वैद्यकाने उचललेली आहेत औषधक्रिया मोठी खुबीदार असून, औषधाच्या वर्गीकरणाचे व सेवनाचे नियम फारच सूक्ष्म अतएव लाबलचक आहेत. आरोग्य, अन्नसेवन व आहार याकडे फार बारीक दृष्टि दिलेली आहे. प्रो. विल्सनच्या मतें भारताय आर्यांचे निदान अगदी तंतोतंत प्रकृत स्थितीशी जुळते असून लक्षणांची व्याख्या व पृथक्करण सूक्ष्मगामी आहे. ह्याचप्रमाणे शस्त्रक्रियाही बरीच वाढली होती व औषधयोजनेंत तर त्याचा हातखंडाच असे. कारण की, नैसर्गिक अनुकूलतेमुळे कोणत्याच औषधीची कधी वाण

नसे; शिवाय त्यांची चोकस बुद्धि, मेहनती स्वभाव, सूक्ष्म व खोल दृष्टि इत्यादि गुणांमुळें व वनस्पतींच्या विपुलतेमुळे ह्यांची फारच भराभर वाढ झाली."

सांप्रतच्या युरोपियन व प्राचीन भारतीय वैद्यशास्त्रात मोठा फरक म्हटला म्हणजे शस्त्रक्रियेचा. हल्ली शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वी, सुपरिणामी व गुणकारी होण्याला त्याजबरोबर इतर भौतिक शास्त्रांची जी प्रगति झाली आहे ती बरीच उपयोगीं पडली हें शब्दशः सत्य होय. परंतु यावरून असें म्हणता येणार नाहीं कीं, प्राचीन काळीं शस्त्रक्रिया नव्हती. तत्कालीन शास्त्राच्या व ढीप्रमाणें या शाखेचीही वाढ झाली होती. बेवर, एल्फिन्स्टन, व मॅनिंगबाई यांच्या मते आर्य-वैद्यककालीं शस्त्रक्रिया फार पुढें गेलेली असून कित्येक बाबतींत चालू काळी सुद्धा त्यापुढें आपलें गेलें नाहीं असें म्हणावें लागते. नाक, कान इत्यादि अवयव कापून नवे बसविणें हीं सध्या कष्टसाध्य असलेलीं कामें त्या काळीं सहज करीत असत. त्याचप्रमाणें या कामीं लागणारी शस्त्रें सुद्धां विलक्षण तीक्ष्ण, नाजूक व सूक्ष्म असत. फार काय, पण केससुद्धां उभा चिंजून देत असत असें म्हणतात. हस्तलाघव, धीटपणा वगैरे या कामीं लागणारे गुणही भरपूर दिसून येत. चिर-फाड करणें, छाट मारणे, रक्तप्रवाह बंद करणें, सूक्ष्म हत्यारें तयार करणें, वनस्प-तींचे पापुद्रे व काडी यावर प्रयोग करून विद्यार्थ्यांस शिकवणें, सुईणपण करणें, जिवावरील कामें करताना धीर न खचणें, बायकामुलांची पाहणी करणें इत्यादि गोष्टी फार धिटाईनें, चतुराईने, निश्चलपणें व काळजीने केल्या जात. वर्गीकरण, कारणे, चिन्हें, शुश्रूषा, निदान, भावी लक्षणें या गोष्टींचा आर्यांच्या शारीर-शास्त्रांत प्रामुख्यानें अंतर्भाव होत असे. अश्वव्याधि, गजव्याधि यांचाही थोडा फार विचार झाला होता. परंतु प्रयोग व निरीक्षण या दोन गोष्टी शस्त्रक्रियेंतील मुडदेफाडीपेक्षां अधिक श्रेयस्कर असें सुश्रुताचे मत आहे.

अश्वरोगशास्त्रावरील एका ग्रंथाविषयीं एलियटसाहेबाने पुढील उद्गार काढले आहेत. " लखनौ येथील राजग्रंथसंग्रहालयांत अश्वरोगशास्त्रावर एक ग्रंथ आहे. त्याचें भाषांतर ग्यासुद्दिन महंमदशहा खिलजीनें करविलें. या फारशी भाषां-तरांत त्यास ' कुरटुल्मुल्क ' हें नांव दिलेले आहे. सुश्रुताचा गुरु शालिहोत्र या नागाचा एक ब्राह्मण होता व त्याच्याच नावावरून हें नांव त्या पुस्तकास मिळालें, व हें भाषांतर १३८१ सालीं करण्यांत आले.

ह्या ' कुरटुल्मुल्क ' फारशी ग्रंथास जी प्रस्तावना जोडण्यात आली आहे त्यात असें म्हटलें आहे कीं, कुधर्मी व भ्रष्ट हिंदु लोकाच्या भाषेकडे वारंवार

जावें लागूं नये व त्यांजपाशीं संपर्क नको म्हणून हें पुस्तक तयार केलें आहे. जरी ह्या पुस्तकाच्या भाषांतराचे १३८१ असें साल दिलेले आहे तरी तें चुकीचे असावे असें वाटतें; कारण ह्या तारखेशीं सुलतान ग्यासुद्दिन महंमद शहाची कारकीर्द जुळत नाहीं; तर तो ग्यासुद्दिन तखलग असेल तर हे साल ६० वर्षें मागें नेले पाहिजे; बरें याच नांवाचा माळव्याचा सुलतान होता असें समजलें तरी १०० वर्षांची चूक होते; सर्वसाधारणपणे असे म्हणण्यास हरकत नाहीं कीं, हें पुस्तक अकबराच्या पूर्वी तयार झालें आहे. या पुस्तकाचे ११ भाग व सूत्र ३० प्रकरणें आहेत. खालीलप्रमाणें भागाची वर्गवारी दिलेली आहे.

(१) जाती व नामे (२) अश्वारोहण, निपज, गंध (३) तबेल्याची व्यवस्था व गोमाशांचा बंदोबस्त, (४) वर्ण व तऱ्हा, (५) ठिपके व वर्ण-च्छटा, (६) रोग व उपाय, (७) रक्तस्राव, (८) अवयवरचना, (९) भक्ष्य व आहार, (१०) स्थूल दिसण्याकरिता कोणतें अन्न द्यावें, (११) दातांवरून वयोमर्यादा कशी ठरवावी.

याच विषयावर संस्कृतामधून अरबी भाषेत ' किताबुलबैतारत ' या नावाचे दुसरें एक पुस्तक बगदाद येथे तयार झालें होतें; परंतु त्याचा नामनिर्देशसुद्धा कुरातुलमुल्क ' च्या संपादकाने केला नाहीं. यावरून ते त्याच्या पहाण्यात आलें नसावे. असे वाटतें. त्याचप्रमाणे याच विषयावर आणखी एक पुस्तक शहाजहानच्या कारकीर्दीत तयार झाले होते. त्याचे नाव ' शालोटारी ' असे होतें. मूळ ज्या संस्कृत ग्रंथाचें हे भाषांतर आहे त्याची १६०० श्लोकसंख्या आहे. मेवाडचा राणा अमरसिंह याजवर जहांगिरच्या कारकीर्दीत जेव्हा स्वारी झाली तेव्हां इतर संस्कृत पुस्तकांबरोबर हे पोडश सहस्रात्मक श्लोकांचे पुस्तक सय्यद अबदुल्लाखान बहादुरजंग यास सापडले व त्याचे त्याने भाषांतर केलें. अशा रीतीच्या या तीन ग्रंथांचा पूर्वेतिहास आहे. यावरून हें शास्त्र देखील किती पुढे गेलें होते याची कल्पना येईल शारीरशास्त्रासंबंधी सर्वसाधारणपणे प्रो. वेबर म्हणतो की, " वेदकालीन प्राण्याच्या शारीरशास्त्राचें बरेंच ज्ञान आर्य लोकांस अवगत होतें. कारण प्रत्येक अवयवास भिन्न व योग्य शब्द सापडतो व ही गोष्ट शास्त्राच्या वाढीशिवाय होणें शक्य नाहीं. मग मनुष्याच्या शारीर शास्त्राची गोष्ट कशाला हवी ? अमरकोशामध्ये मनुष्याचें शरीर व रोग यांसंबंधीं जे शब्द दिलेले आढळतात त्यांवरून वरील अनुमानच काढणे प्राप्त आहे. " प्रोफेसर विल्सनच्या मतें संस्कृतमध्यें वैद्यकग्रंथांची बरीच मोठी संख्या असून त्यापैकीं

प्रख्यात ग्रंथांचीं आरबी भाषेंत भाषांतरें झालीं आहेत. या भाषांतर ग्रंथामध्यें वैद्यकशास्त्राच्या शस्त्रक्रियेसुद्धा सर्व शाखांचा ऊहापोह केलेला आहे व बिनचूक निरीक्षण आणि सप्रमाण, यथान्याय व यथाशास्त्र औषध–योजना दिलेल्या आहेत.

सर्व सुधारणांची जननी, विद्येचें माहेरघर, कलाचें विश्रामस्थान, धर्म व तत्त्वज्ञानाची मूलभूमी असें हे प्राचीन आर्यावर्त असल्याने सर्व जगानें याच्या तोंडाकडे पहावें, यापासून शिकावें, याजकडून न्यावें व उपकृत व्हावे यात काय आश्चर्य ? शिक्षणानें व अध्यापनाने आर्यभूमीचे सर्व जगावर उपकार झालेले आहेत हे खरें; परंतु मनुष्यास जोपर्यंत शरीर ही वस्तु अत्यंत प्रिय वाटणार तोपर्यंत या बाबतींतले भारतीयांचे उपकार जगाने विसरणे म्हणजे महान् कृतघ्नपणा होय. सर्व युरोपने प्राचीन हिंदुस्थानांतून वैद्यकाची कला नेलेली आहे. " मद्रास किंग् इन्स्टिट्यूट ऑफ् प्रिव्हेन्टिव्ह मेडिसीन् " या नावाची संस्था उघडण्याचे वेळीं मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड ॲथ्लिसहिब म्हणतात कीं, " खरोखर हिंदू लोकांनीं कर्नल किंगसाहेबाचे सदैव ऋणी असले पाहिजे; कारण कीं त्यानें पुढील अभिमानाची गोष्ट प्रथम हिंदूस समजावून दिली. ' युरोपखंड अगदीं गानटी स्थितीत होत त्या वेळी हिंदुस्थानात उपचारात्मक व प्रतिरोधात्मक दोन्ही पद्धतींचीं औषध तयार करण्याची तत्त्वें सर्वत्र महशूर झाली होतीं. वैद्यकशास्त्र हिंदुस्थानात तयार होऊन नंतर त्याचा प्रवेश युरोपांत झाला ही गोष्ट सर्वांस अवगत आहे की नाहीं कोण जाणें; परंतु वस्तुस्थिति अशी आहे. युरोपातील वैद्य १७ व्या शतकापर्यंत आरबी ग्रंथावरून हे शास्त्र शिकत; व स्वतः आरबानीं ते हिंदुस्थानातून नेले होतें. प्राचीन सुधारणा पूर्वेकडून पश्चिमेस गेली असता त्या सुधारणेच्या जन्मभूमींत–आर्यावर्तांत तिचा मागमूसही उरूं नये हें केवढें आश्चर्य ?

आता हें शास्त्र हिंदुस्थानांतून बाहेर कसें गेलें या हकीगतीकडे वळूं. या शास्त्राच्या देशांतरास ८ व्या शतकापासून प्रारंभ झाला. ७५३–७७४ च्या दरम्यान सिंधप्रांत आरबी खलीफ मनसूब याचे ताब्यांत होता. त्या वेळेस वकील–मंडळाबरोबर आणखीही विद्वान् येत, येथे अभ्यास करीत, पसंत पडतील त्या ग्रंथांचीं भाषांतरें करीत, जे हिंदू विद्वान् त्याच्या बरोबर जाण्यास तयार असतील त्यास बगदाद येथे घेऊन जात असा क्रम चालू होता. जे विद्वान् येथून बाहेर गेले त्याबरोबर ब्रह्मगुप्ताचा ब्रह्मसिद्धान्त व खंडखाद्यक हे ग्रंथ बाहेर गेले.

या पंडितांच्या साहाय्यानें अल्फाझारी व याकूब हबन तारीक यांनीं या ग्रंथांचीं भाषांतरें केलीं. तेव्हांपासून या ग्रंथांचा फार प्रसार होऊन आरबी लोकांवर त्यांची फार छाप पडली, व आरबाना टॉलेमीच्या पूर्वी ज्योतिषशास्त्राचें याच ग्रंथावरून ज्ञान झालें. याच ज्ञानगंगेचा दुसरा ओघ हरूनच्या काली म्हणजे ७८६-८०८ च्या दरम्यान वहात होता. वैभवशिखराच्या उत्तुंग शिखरावर आरूढ झालेलें बरमाक नामक प्रधान कुटुंब बल्खहून राजघराण्याबरोबर बगदादला आलें होतें. मूळ बल्ख शहरीं त्यांचा पूर्वज बुद्धधर्मी असून तेथील विहाराचा तो अधिपति होता. परंतु पुढें बुद्ध अंमल नष्ट झाल्यावर हे मूळचें बुद्ध कुटुंब महंमदानुयायी बनलें. परंतु त्या कुटुंबाचे ठिकाणीं मुसलमानी कट्टेपणा नसून लोकांनाही ते कुटुंब मूळ शुद्ध मुसलमानी धर्माचे आहे असे वाटत नसे. या कारणाने म्हणा अथवा आनुवंशिक संस्कारांच्या प्रभावामुळें म्हणा, त्याचा हिंदुस्थानाकडे फार ओढा होता. त्यामुळें त्यानीं हिंदुस्थानात विद्वान् पाठवून त्यांस वैद्यशास्त्र व औषधें तयार करण्याची कृति पढवून नेलें. तसेच हिंदुस्थानांतील विद्वान् व पंडित यास बगदाद येथें बोलावून त्यांस राजवैद्य व रुग्णालयपति केले आणि त्याच्याकडून आरबींमध्ये वैद्यशास्त्र, विषोपचारशास्त्र औषधाची रासायनिक कृति, तत्त्वज्ञ न, ज्योतिषशास्त्र व इतर विषय याजवर ग्रंथ तयार करवून घेतले. यानंतर खुद्द मुसलमानपंडित बारमाकचे वकील म्हणून हिंदुस्थानात येऊन हेंच काम करीत. उदाहरणार्थ अल्मुबांफक या नावाचा एक पंडित अल्वेरुनीच्या अगोदर थोडेच दिवस येऊन गेला होता.

त्याचप्रमाणें ९५०-६० मध्ये बगदाद येथें राज्य करणारा खलीफः ७५३-७७४ मधील आलमानसूरः; सासोनेयन राजा नोशिरेवन (५३१-५७२) याचा समकालीन बर्झोयह; बगदाद येथें राहणारे काहीं ग्रीक, आधं आरब ग्रंथकार सेरापियन, आलमानसूरपाशीं असलेला ज्हाशी; शेख राहस् अथवा अबूअल्ली सिना (१०३६ मृत्यू) फिरोझशहा बादशहाचा नोकर आयाझुद्दन खालीद या गृहस्थानीं अत्यंत परिश्रमानें, काव्जीने व दीर्घ व्यासंगाने संस्कृत वैद्यक ग्रंथांचीं आरबी भाषेत भाषांतरें करून आरबी वैद्यकशास्त्र तयार केले. यापैकीं कांहीं स्वतः बादशहा असून बाकीचे पंडित होते. आरबी बादशहानीं फार धूर्तपणानें, दूरदृष्टीने, प्रजाहिततत्परतेनें, शास्त्रज्ञान-लालसेनें आपल्या दरबारातील पंडिताकडून त्यास मोठीं इनामें देऊन संस्कृत ग्रंथाच्या आधारें आरबी वैद्यक ग्रंथ तयार केले व काही ठिकाणीं निव्वळ भाषांतरें करविलीं. ह्या पंडिताच्या

ग्रंथामध्यें अश्विनीकुमार, चरक, सुश्रुत यांचीं नांवें ठिकठिकाणीं आलीं असून त्याचे गुणानुवाद मोठ्या उदार मनाने गाइले आहेत; त्यांच्या बुद्धिमत्तेची तारीफ केलेली आहे; व त्याच्या परिभाषाकौशल्याचे कौतुक केलें आहे. त्या वेळीं हिंदु विद्वानास सर्वत्र पाचारण केले जात असे, त्यास मोठ्या सत्काराने नेऊन त्यांचा द्रव्यद्वारा उत्तम परामर्ष घेतला जात असे व त्यांजकडून भाषांतराचें काम करून घेण्याबद्दल त्यांची मनधरणी केली जात असे. याचीं खालीं दोन उदाहरणे देतों. अबूओसाहिबा नामक आरबी ग्रंथकार म्हणतो की, मंकानामक एक प्रख्यात आयुर्वेदविशारद होता. तो हिंदुस्थानांतून इराण येथे गेला; खलीफ हरून अलरशिद यास त्याने बरे केलें; चरकाचा पारशी भाषेत एक विषारी द्रव्यावरील ग्रंथ यानेच भाषांतरित कला. असाच सालेह नामक दुसरा हिंदु विद्वान् होता असें अबूओसाहेबा लिहितो. तो तत्कालीन पंडितामध्यें अग्रगण्य असून आर्यवैद्यकाच्या पद्धतीने उपचार करण्यात अत्यंत कुशल होता. हा सुद्धा हरूनच्या कारकीर्दीत इराक येथेच रहात असे. पुढें तो इजिप्त, पालेस्टाईनमधून प्रवास करीत असता वाटेत मरण पावला. तेव्हां त्यास इजिप्तमध्येंच पुरण्यात आले.

वरील एकंदर विस्तारावरून एवढे लक्षात येण्यास हरकत नाहीं की, वैद्यकशास्त्र मूळचे हिंदूंचें असून त्यानीं त्याची सर्व शाखांसह पूर्ण वाढ केली होती. अशा सर्वांग सुश्लिष्ट शास्त्राचा उपयोग युनानी पद्धत उभारण्यास सर्वांशी झाला. यावरून मुसलमानी वैद्यशास्त्राचा सर्व डोलारा आर्यवैद्यकावर उभारला होता; व आरबी भाषेतून पुढे हें शास्त्र युरोपांतील निरनिराळ्या देशानीं उचलले. १७ व्या शतकापर्यंत युरोपियन वैद्यकशास्त्रास सर्वस्वी याचाच आधार होता. चरकाचे नाव लाटीन भाषेतील भाषांतरात ठिकठिकाणी पहावयास सांपडते. ज्याअर्थी या लाटीन भाषेतील ग्रंथावरून पुढे आधुनिक युरोपियन भाषात आर्यवैद्यक उतरले आहे त्याअर्थी हल्लीच्या युरोपातील वैद्यकशास्त्राचा सुद्धां मुख्य आधार आर्यवैद्यकच आहे असें म्हटल्यास काहीं वावगें होणार नाही.

वरील विवेचनावरून आर्यवैद्यक कोणकोणत्या मार्गानीं युरोपात गेले हे कळणे सुलभ आहे. पहिला मार्ग सिंधमधून आरबी समुद्राच्या मार्गाने व दुसरा अफगाणिस्थान, इराण व अरबस्थानांतून. आरबाप्रमाणे पूर्वी ग्रीक लोकानी सुद्धा आर्यवैद्यकज्ञानाचा प्रसार व संरक्षण मोठ्या दक्षतेने केले. आपलआरियस नामक ग्रीक वैद्य व दुसरा ईट्रियस या दोघांनी त्रिफळा कसा करावा याचें वर्णन

आपल्या ग्रंथात केलें आहे. यावरून केव्हांपासून आर्यवैद्यकाचा अभ्यास प्राचीन लोक आस्थेनें करीत होते हें दिसून येईल.

सर्व जगास ज्या आर्यवैद्यकाने शहाणें करून सोडलें त्यावर प्रो. विल्सन म्हणतो त्याप्रमाणे शेकडो ग्रंथ झाले असल्यास काय नवल ? यांपैकी काही मुख्य ग्रंथकारांचीं नांवें पुढें देतों.

आत्रेय, अग्निवेश, चरक, धन्वंतरी, सुश्रुत, भारद्वाज, कपिस्थळ, भेल, लातुकर्ण, पाराशर, हरित, कश्यपरु, आश्वलायन, बादरायण, कात्यायन, वैजवापी, कुश, संस्कृत्यायन, बाभ्रव्य, कृष्णात्रेय, औद्दालकी, श्वेतकेत, पंचाल, गोनर्दिय, गोणीकपुत्र, सुबंधु, शंकर, कंकायन.

नियरकस म्हणतो कीं, अलेक्झांडरच्या दरबारीं असलेल्या ग्रीक राजवैद्यांना सर्पदंशावर उपाय माहीत नव्हता, परंतु त्याच दरबारी असलेल्या हिंदी वैद्यानीं सर्पदंशावर ताबडतोब उपाय योजून रोगी बरे केले व जितके सर्पदंशाचे रोगी असतील तितके आपण बरे करूं असे जाहीर केले. या ऐतिहासिक पुराव्यावरून सर्पदंशासारख्या अत्यंत प्राणघातक गोष्टींत विलक्षण सिद्धि मिळवून किती अनाथ लोकाना त्यानी जीवदान दिले असेल याची वाचकानीच कल्पना करावी.

आतापर्यंत पुष्कळ गोष्टीच विवेचन झाले. आतां भारतीय रसायन कोठपर्यंत पोंचलें होतें याबद्दल विद्वानांचे काय मत आहे ते पाहूं. एल्फिन्स्टनसाहेबाचा असा सरसकट शेरा आहे कीं, हिंदूंचे रासायनिक कौशल्य कल्पनातीत अतएव विलक्षण आश्चर्यकारक होते. ह्या पुस्तकात मोठ्या दुःखाने एक गोष्ट वारंवार लिहावी लागते याबद्दल वाईट वाटतें; ती ही कीं, काळाच्या सपाट्यात ' माधव ' नामक वैद्यग्रंथकाराने निर्दिष्ट केलेले बहुतेक ग्रंथ नाश पावले व त्यापैकीं हल्ली ' रसार्णव ' हा एकच शिल्लक आहे. भारतीय रसायन शास्त्राच्या इतिहासकाराने आणखी एक रसरत्नाकर म्हणून ग्रंथ सांगितला आहे. तो म्हणतो कीं, रसार्णव व रसरत्नाकर हे प्रयोग-प्रतिपादक ग्रंथ असून त्यात सहजासहजीं किमयेच्या प्रश्नाचा विचार केला आहे. याशिवाय *रसरत्नसमुच्चय* म्हणून एक प्रढतशीर व बराच मोठा ग्रंथ असून त्यांतील विवेचनशैली, शास्त्रीय परिभाषा व विषयमांडणी इतकी सुबक व सफाईदार आहे कीं, तो ग्रंथ गेल्या थोड्या वर्षांच्या काळात कोणी तरी लिहिला असावा असे वाटतें. यात औषधे तयार करण्याची कृति, औषधाचीं नांवें व गुणधर्म आणि औषधोपयोगी वस्तु हीं सर्व दिलेलीं आहेत.

सुश्रुतासंबंधीं डॉ. रॉय म्हणतो कीं, सुश्रुताच्या ग्रंथांत (कॉस्टिक अल्कली) तयार करण्याच्या कृतींत लोहपात्रात सोडाखाराचे मिश्रण ठेवावे ही जी सूचना दिली आहे ती चालू प्रयोगास व रसायनशास्त्रज्ञानास किती धरून आहे हे जर ताडून पाहिले तर भारतीय आर्यांच्या इतक्या प्राचीन शोधाबद्दल व औषधें तयार करण्याच्या नैपुण्याबद्दल मन अगदीं आश्चर्याने मुंग होऊन जाते. हा प्रयोग ढोंगीपणाचा, जडीबुटीचा, भोंदूपणाचा नसून सर्वांशीं शास्त्रसंमत आहे; बर्थेलॉट नामक एका विद्वानाने नवीन शोध लावून असे सिद्ध केलें आहे कीं, तो प्रकाश ११ व्या शतकात माहीत होता; परंतु सुश्रुताच्या ग्रंथावरून या शोधाचें सर्व महत्त्व संपुष्टात येऊन आर्यांच्या कल्पकतेचें यथार्थ कौतुक होणें शक्य नाहीं असेच मनास वाटूं लागते. रसायनशास्त्राचा उपयोग वैद्यशास्त्रांत करून पाऱ्याच्या रसायनाचा उपयोग पोटात घेण्याच्या कामीं प्रथम पॅरॅसेलस (१४९३–१५४१) याने केला असा गौरवपर उल्लेख युरोपांतील प्रत्येक भाषेंतील रसायनशास्त्राच्या इतिहासांत केलेला आहे; परंतु भारतीय रसायनशास्त्राचा इतिहासकार म्हणतो कीं, पॅरॅसेलस याने पूर्वेकडील देशातून हे ज्ञान पैदा केलें असे मानण्यास बळकट आधार आहे.

धातूंच्या रसायनासंबंधीं डॉ. रॉय आपल्या 'भारतीय रसायनशास्त्राचा इतिहास' नामक ग्रंथात अस लिहितो कीं, "आतापर्यंत जी कारणे दाखविली त्यावरून पाऱ्याचीं रसायने तयार करण्याचे कामीं हिंदूंनीच सर्वांपेक्षा आघाडी मारली असें दिसून येईल. अथवा तीं तयार करणे हा त्यांचा आवडताच विषय होता असें म्हटल्यास चालेल. सुश्रुत, चरक या दोघांचेच ग्रंथ जरी पाहिले व इतरांचे सोडून दिले तरी पोटात घेण्यासाठी धातूंच्या रसायनाचा उपयोग प्रथम हिंदूंनीच केला असे निःसंशय ठरते."

थोरल्या प्लिनीच्या काळापर्यंत पाऱ्याचे कोणकोणते औषधी गुणधर्म आहेत याचा युरोपांत निश्चय झाला नव्हता. प्लिनीनें पाऱ्यास सर्व धातूंमध्ये कनिष्ठ ठरवून त्यास विषाची उपमा दिली आहे. यावरून प्लिनीच्या काळापर्यंत युरोपाचे वैद्यकविषयक ज्ञान किती दाढले होते याची कोणासही कल्पना करिता येईल.

पुढील एल्फिन्स्टनच्या उताऱ्यावरून आर्यवैद्यकाची व्याप्ती केवढी होती याची कल्पना करण्यास सोपें जाईल.

" तेजाब, नत्रिकाम्ल, लोह, ताम्र व शिसें, कथील व जस्त यांचीं प्राणील मिश्रणें; लोह, ताम्र, पारद, अंज व सोमल यांचीं गंधयुक्त मिश्रणें; व लोह आणि शिसें यांचीं कारबानमय लवणें यांच्या कृति संस्कृत ग्रंथात दिलेल्या असून त्या थोड्या चमत्कारीक आहेत. आर्यवैद्यक यांचा बिनदिक्कत उपयोग करीत असे. केवळ पारद व इतर खनिज पदार्थ पोटात घेण्यास देत असत, एवढेंच नव्हे तर धुराच्या कामीं रक्तपादाचा उपयोग करून त्यापासून त्वरित व सुखकर लालास्राव उत्पन्न करीत; लस टोचण्याचाही त्याचा प्रघात असे; व शस्त्रकलाभिज्ञास भूषणभूत व अभिमानास्पद अशी गोष्ट म्हणजे गर्भ कापून काढीत असत शस्त्रक्रियेच्या १२७ हत्यारांचीं नावे संस्कृत वैद्यकग्रंथांत दिलेलीं आहेत. "

राष्ट्रीय विश्वविद्यालयावर व्याख्यान देत असता १९०६ सालीं बेझंटबाई असें म्हणाली कीं, " भौतिक शास्त्रे व रसायनशास्त्र यात तुम्ही फारच मजल गांठलेली आहे; पण वैद्यकात तुम्ही विशेष पुढें गेला आहा. पाश्चात्य देशांत वैद्यक हे शास्त्र नसून अजून अंदाजावरच त्याचे बरेचसें काम चालले आहे. औषधे तयार करण्याच्या पाश्चात्य पद्धतीपेक्षा हिंदुस्थानातील आर्य व युनानी या दोन्ही भेषजपद्धति फारच पुढे गेलेल्या आहेत. " प्राचीन भारतात भेषज-शास्त्र, आरोग्यशास्त्र व रसायनशास्त्र इत्यादि शास्त्राचा किती विकास झाला होता हे सध्या उपलब्ध असलेल्या ग्रंथावरून व चिकाटीने शोध लावणाऱ्या चिकित्सक विद्वानाच्या परिश्रमावरून दिसून येत आहे. भारतीय वाङ्मयामध्ये जों जो जास्त शोधकबुद्धीने प्रवेश करावा तों तों प्राचीन तत्त्वज्ञानावर व शोधावर नवीन प्रकाश पडल्याशिवाय रहात नाही हें कोणासही प्राचीन वस्तुसंशोधकाच्या वार्षिक अहवालावरून व मासिक पुस्तकावरून वळून येईल.

किंग इन्स्टिट्यूट ऑफ प्रिव्हेन्टिव्ह मेडसिन् या संस्थेच्या सुरवातीस प्रारंभ करण्याच्या वेळी मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड ऑंथिल् यांनी जें भाषण केलें त्यावरून वरील म्हणण्याची प्रतीति आल्याशिवाय रहाणार नाहीं.

" प्राचीन आर्यावर्तातून मुसलमान लोकांनी वैद्यकशास्त्राचे ज्ञान स्वदेशीं नेले होतें तें त्यांनीं हिंदुस्थानावर स्वारी करून येथे राज्य करण्यास आल्यावर परत आणले. मध्यंतरी पुष्कळ शतकें या ज्ञानाचा लोप झाल्यासारखा वाटत असे, परतु मुसलमानांच्या आगमनानें तें ज्ञान परत स्वदेशी आलें. उत्तर हिंदुस्थानांत मोंगल बादशहांनीं जीं जीं शुद्ध जलसंचयाचीं कामे करून लोकाच्या आरोग्याची

तरतूद केली त्यापैकीं बरीच सध्या सुस्थितीत आहेत; त्यावरून मोंगल राजे आरोग्यसुधारक होते, त्यानीं प्रजेच्या शरीरस्वास्थ्याची व अनामयत्वाची पुष्कळच काळजी घेतली असे दिसते. हल्ली ब्रिटिश अमदानींत म्युनिसिपालट्यांच्या संस्थापनेनें व कारभारानें त्याच प्रकारच्या लोकांच्या सुखसोयी वाढविण्यात येत आहेत. शुद्ध जलसंचय, जलशुद्धिकरणाचीं कामें, पाण्याच्या दाबाचा उपयोग, लौकिक सुखाकरितां करून घेण्याकरितां बांधलेलीं कामें, दवाखाने, रुग्णालयें, वैद्यकपाठशाळा साथींचा प्रसार न होण्याबद्दल केलेले कायदे, लोकांचें आरोग्यसंवर्धन होण्याकरिता म्युनिसिपालट्या (नगरमंडळ्या) व ग्रामंडळ्या यांजवर लादलेलीं जबाबदारी, इत्यादि गोष्टी नवीन वाटतील, परंतु प्राचीन काळीं आर्यावर्तात अस्तित्वात असलेल्या गोष्टींचें हे फक्त अनुकरण आहे व यात नवीन असे काहीं नाहीं.

मध्यंतरीं अवनतीच्या फार प्रबल माऱ्यापुढें या सर्व लोकहितकारी गोष्टी नष्ट झाल्या, त्याचा अवशेष सुद्धां क्वचित् राहिला नाहीं, यामुळें हिंदुस्थानातील लोकांस त्या नवीन वाटत असून ब्रिटिश अंमलाबरोबर ज्या पुष्कळ गोष्टी आल्या त्यापैकींच हीं आहे असे वाटते. परंतु खरी गोष्ट अगदीं उलट असून शिष्याबर गुरूस शिकविण्याची पाळी आली आहे. एवढेच नवीन आहे. काळाच्या असंख्य कौतुकास्पद लीलापैकी ही एक आहे यापेक्षा दुसरे काय ? इतिहासकार व प्राचीन वस्तुसंशोधक याच्या परिश्रमाने या गोष्टी प्रकाशांत येऊन प्राचीन आर्यावर्ताचें ज्ञानवैभव केवढें होतें, अवनतीच्या फेऱ्यात सापडल्यामुळें किती हानि होते, समर्थांच्या पदरीं केवढा दैन्यपणा येतो या सिद्धान्ताचें स्पष्टीकरण पहावयास मिळतें. या जगात नवीन असें कांहीं नाहीं. हल्ली जें आहे ते प्राचीन काळीं होतें, फक्त स्वरूप भिन्न असेल, पेहराव निराळा असेल, अथवा लौकिक ज्ञान व समजूत सर्वसामान्य नसेल एवढाच फरक; सर्वस्वीं नवीन असे कोठेही आढळणार नाहीं. याच तत्त्वाचें सत्यत्व हल्ली रोगप्रातबधकपद्धतींत दृग्गोचर होते. संसर्गाने व स्पर्शाने रोगाचा प्रसार होतो हें तत्त्व हल्ली सर्वत्र सर्वज्ञात झाले असल्यासारखे दिसतें; परंतु कर्नल किंग म्हणतो कीं, तें प्राचीन काळीं लोकास माहीत असून अधम व कनिष्ठ जातींच्या स्पृश्यास्पृश्यतेच्या चालीवरून समाजांत रूढ होतें हें कोणाही विचारी मनुष्यास समजल्याशिवाय रहाणार नाही त्याचप्रमाणें हिंदु व मुसलमान लोकांत देवीची लस टोंचून देवींच्या साथीचा प्रतिकार करण्याची चाल होती. जेन्नरनें जो देवीच्या लसीचा शोध लावला तो नवीन नसून मागील ज्ञानात थोडीफार भर टाकली असें म्हणतां येईल. कारण जेन्नरच्या पूर्वी युरोपांत सुद्धां

हा उपाय माहीत होता, व तो कान्स्टांन्टिनोपलाहून युरोपांत गेला. तुर्की मुलुखांत व युरोपलगतच्या आशिया खंडाच्या भागात वैद्यशास्त्र जें भरभराटीस आलें तें मूळ हिंदुस्थानांतूनच तिकडे गेलें याबद्दल कोणासच संशय घेण्यास जागा नाहीं." कारण ही गोष्ट मागील विवेचनांत स्पष्टपणे सिद्ध केलेलीच आहे. सबब गव्हर्नरसाहेबाच्या म्हणण्यास त्या गोष्टीचा पुरावा मिळून मागील विवेचन व हें भाषण हीं परस्परपोषकच झालीं आहेत. गव्हर्नरसाहेब पुढें त्याच भाषणात म्हणतात कीं, " कर्नल किंगने गाईंच्या फोडातून लस घेऊन ती मुलांच्या दंडांत घालणें व एका मुलाच्या फोडातून लस घेऊन तिने दुसरें मूल टोचणे हा देवीच्या साथींतील उपाय धन्वंतरीच्या ग्रंथात आढळतो असें सिद्ध केलें आहे.

धन्वंतरीच्या ग्रंथांत पुढील शब्द आहेत:—' गायीच्या बेबीतून निघणारे प्रवाही द्रव्य अथवा मनुष्यप्राण्याच्या दंडातून मिळणारें पातळ द्रव्य हें एका सुईच्या अग्रावर घ्या व त्यानें दंडातून रक्त निघेपर्यंत टोचा म्हणजे ते रक्तात मिसळेल. असें केल्यानें देवीचा ताप येईल.' हल्लीच्या देवी टोचण्याच्या उपायाहून हा कोणत्याही प्रकाराने भिन्न नाही व जेन्नरच्या पूर्वी प्राचीन काली हिंदूंनी हा शोध लाविला होता असे मानण्यास कोणताच प्रत्यवाय नाही त्याचप्रमाणे हल्ली प्लेगच्या दिवसात स्थानत्याग व हवा शुद्ध करण्याचे जे प्रकार योजण्यात येतात ते सुद्धा हिंदु वैद्यकशास्त्रात सांगितलेले आहेत असे मानण्यास कर्नल किंगच्या शोधाचा बळकट पुरावा आहे."

प्रकरण ६ वें.

गणित.

मनाची एकाग्रता व विचारांचें केंद्रीकरण या दोन गोष्टी प्राचीन हिंदु लोकास फार उत्तम साध्य झाल्या असल्याकारणाने मानसिक स्वास्थ्य व आनंद यांचा त्यांना पूर्ण लाभ झाला होता. अशा मनस्थितीच्या लोकाच्या हातून काय होणार नाहीं? मात्र यांना किती वर्षांचीं खडतर तपश्चर्या, केवढा मनोनिग्रह व कसला आत्मविश्वास पाहिजे याचा अनुभव प्रत्यक्ष तो प्रयत्न सुरू केल्याशिवाय कळणार नाहीं. परिणामीं गोड ते सर्वत्र गोड या न्यायानें आर्यांच्या ठायीं हे गुण मुळा

पासून होते असें गृहीत धरण्यास कोणतीच अडचण दिसत नाहीं. अशा प्रकारच्या मनाच्या तालमीनें त्यास कोणतीही इंद्रियगोचर अथवा अतींद्रिय गोष्ट साध्य करणें कठीण जात नसे. या प्रकारच्या मनःस्थितीला प्रत्यक्ष प्रमाणे असून शिवाय त्यांच्या वाङ्मयांत तीं पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येत. अशा मनोविकासी शिक्षणानें त्याच्या मेंदूची तरतरी फार वाढून त्याची धारणाशक्तीही जबरदस्त झाली होती. ही गोष्ट साध्य झाल्यानें सर्व प्रकारचीं चित्तैकाग्रतामूलक व मानसविकासात्मक शास्त्रें, उपशास्त्रें, त्यांस केवळ लीलेने उत्कट स्थितांप्रत नेतां आलीं. मनाची एकाग्रता व कल्पनाचें केंद्रीकरण याच्या भक्कम पायावर ज्या गणितशास्त्राची इमारत नेहमीं उभारली जाते त्याचा हिंदू लोकांस अत्यंत छंद लागावा हें अगदीं साहजीक आहे. याला पुरावा पाहिजे असल्यास भारतीय ज्योतिषाचा बस्स आहे. आर्यावर्तात ज्योतिषशास्त्र किती प्राचीन काळीं भरभराटीस आले, हें पाहिलें म्हणजे वरील गोष्टीस निराळा आधार देण्याची मुळीं जरूरीच उरत नाहीं अर्थात ज्योतिषाबरोबर गणितही आलेंच. गणित हें केवळ कल्पनागम्य शास्त्र असता त्याचा हिंदूंनीं सर्व बाजूंनीं पूर्ण विकास करून त्याची मदत ज्योतिषशास्त्रास दिली हें पाहिलें म्हणजे क्षणभर असें वाटतें कीं, ह्या लोकाना प्रत्यक्ष सरस्वती प्रसन्न होऊन त्याच्या घरी दासीप्रमाणे वागत होती की काय? अथवा सृष्टिदेवीनें आपलें सर्व कल्पनाधन याच्या चरणीं अर्पण करून यास जगाच्या शिक्षणासाठीं पाठविले होतें की काय न कळे. तें काहीं असो; याबद्दल सर्व विद्वानाचे ऐकमत्य असून गणितशास्त्राचे भारतीय लोक उत्पादक आहेत असें ठरलेले आहे. ज्यानीं गणितशास्त्राची उभारणी केली, त्यांनी अंकपद्धती शोधून काढली असेल याबद्दल शंकाच रहात नाहीं. कारण त्याशिवाय गणितशास्त्राचे एक क्षणभरही चालणार नाहीं. प्रख्यात जर्मन चिकित्सक श्लेजेल म्हणतो कीं, "मनुष्यानें आजपर्यंत जे जे शोध लावले त्यापैकी लिपीचा शोध पहिल्या प्रतीचा असून त्याच्या खालोखाल दशाश पद्धतीचा आहे असें इतिहासकारांनी मानलेले आहे; व यापैकी दशाशपद्धतीहि हिंदूंचीच कल्पना आहे असा सर्वसंमत सिद्धांत आहे."

प्रो. मॅक्डोनल्ड म्हणतो कीं, "विज्ञानशास्त्रांत सुद्धां युरोपखंड भारतभूमीचें अत्यंत ऋणी आहे. अंकपद्धतीचा प्रथम फार मोठा शोध करून आर्यांनी जगावर उपकार केलेले आहेत. कारण ही पद्धत आधुनिक जगानें त्यापासून उचललेली आहे. त्यानंतर मोजमापनाच्या कामीं फार फायदेशीर अशी दशांशपद्धति सुद्धा त्यांनींच

शोधून काढली; हिचा परिणाम गणितशास्त्राच्या वाढीवर झाला नसून जगांतील सर्व सुधारणेवर व संस्कृतीवर झाला आहे. तेव्हां या गोष्टींची थोरवी मानावी तेवढी थोडीच होणार आहे. आठव्या व नवव्या शतकांत हिंदूंपासून आरबांनीं हीं शास्त्रे उचललीं व नंतर तीं आरबांबरोबर पाश्चिमात्य राष्ट्रांत आलीं. याच कारणानें बीजगणितास आरबी नाव प्राप्त झालें, परंतु त्याची खरी उत्पत्ति हिंदुस्थानांतच आहे." वर जो प्रो. मॅक्डोनल्ड यांचा विस्तृत उतारा दिला आहे त्याचाच अभिप्राय पुढील लेखकाच्या याच विषयावरील लिहिण्यांत थोड्याफार शब्दफरकानें व्यक्त झाला आहे. सर मोनियर विल्यम्स, मॅनिंग, सर हंटर, प्रोफेसर वेबर व प्रो. विल्सन यांनीं जवळजवळ सारख्याच शब्दात वरील गणितशास्त्राचें देशातर कबूल केलें आहे. बीजगणितांतील पृथक्करणपद्धति, अंकपद्धति, दशांश लेखनपद्धति, ह्या गोष्टींच्या कल्पना हिंदू डोक्यातून निघून त्यास त्यानी पुढें शास्त्रीय स्वरूप दिलें. एकापासून नवापर्यंत आंकड्यांची जीं नावें आहेत त्याच्या आद्य अक्षरात व अंकाच्या लेखनपद्धतींत एक चमत्कारीक साम्य आहे. ह्या सर्व गोष्टींचें ज्ञान आरबांनीं करून घेतलें व त्याजपासून ते पुढें युरोपात फैलावलें हा मुख्य सिद्धान्त वर दिलेल्या युरोपियन पंडितास मान्य आहे व तो त्यानीं स्पष्ट व सरळ शब्दात व्यक्त केला आहे.

अंकगणित.

मॅनिंगबाई, प्रो. वेबर व सर विल्यम हंटर यांच्यासारख्या अत्यंत मेहनती विद्वानानीं निर्भीडपणें व स्पष्ट रीतीनें असें कबूल केलें आहे की, "बीजगणित व सर्व प्रकारचें अंकगणित यात हिंदु लोकानीं अत्यंत प्राविण्य संपादिलें होतें व या कामीं त्याना कोणाचीही काडीमात्र मदत नव्हती."

प्रख्यात इंग्लश गणितज्ञ प्रो. वॉलिस म्हणतो की, "लीलावती ग्रंथांत अंकगणिताचा बहुत विचार केलेला आहे. अंकगणित शास्त्रातील सर्वसाधारण नियम या ग्रंथात दिले आहेत, एवढेच नव्हे तर त्याचा व्याज, देवघेव, मिश्रण combination अंकपाश, श्रेणी, श्रेणींची बेरीज, अनिर्णीत प्रश्न व घनाकृतींचें मापन इत्यादि ठिकाणीं कसा उपयोग करून घ्यावयाचा हे सुद्धा सांगितले आहे. हे नियम बिनचूक असून हल्लींच्या संशोधनाच्या रीतीनें पाहिले असता अगदी सोपेही आहेत. यावरून उत्तरें सहज काढतां येतात दशांशलेखनपद्धतींच्या उपयोगाचें यांत फारच सुंदर विवेचन आहे."

परंतु लीलावती हा ग्रंथ अगदीं अलीकडच्या कालातील असल्यानें त्यावरून हिंदुस्थानांतील खऱ्या गणितशास्त्राच्या वाढीचे ज्ञान होणार नाहीं. चेबरच्या

क्रमिक व शालोपयोगी अंकगणितावरून सर्व गणितशास्त्राची कल्पना करणे जितकें अप्रयोजक होईल तितकेंच लीलावतीवरून सर्व जुन्या भारतीय गणितशास्त्राचें ज्ञानमापन करणेंही अप्रयोजक होईल. आकड्याच्या घडामोडीचा व्याप कल्पनातीत वाढल्यानें त्याकरिता प्राचीन आर्यगणितज्ञांनीं जी कोष्टके व परिमाणें बनविलीं आहेत तीं पाहिलीं म्हणजे त्यांच्या गणितज्ञानाच्या वृद्धीचें अनुमान करण्यास सोपें जाईल.

भूमिति.

भूमितिशास्त्रात प्राचीन भारतीय आर्यांनीं अलौकिक कीर्ति संपादन केली होती हें तर महशूरच आहे. प्रो. वॉलेस याचा खालील लांबलचक उतारा घेणें जरा अप्रशस्त दिसेल, परंतु विषयाच्या महत्त्वाकडे दृष्टि दिली असता तो गुणी जनास रुचेल अशी आशा धरून तो घेण्याचें आम्ही धाडस करितो.

"ज्या एकाद्या पुस्तकांत त्रिकोणमितिशास्त्राचें उद्घाटन केलेलें आहे तें जरी कितीही प्राचीन कालीं रचलेलें असले तरी विज्ञानशास्त्राच्या प्रारंभकालीं तें केव्हांहि निर्माण होणें शक्य नाहीं. सूर्यसिद्धान्ताचें लेखन होण्यापूर्वी भूमितिशास्त्र हिंदुस्थानास अवगत असलेच पाहिजे. सूर्यसिद्धांत हा ग्रंथ ख्रिस्ती शकापूर्वी निदान २०० वर्षे तयार झाला होता हें युरोपियन शोधकानींच कबूल केलें आहे.

ग्रीस व अरेबिया ह्या देशांत त्रिकोणमितीतील जी अकरणिगत पद्धति रूढ होती तीहून सूर्यासिद्धान्त ग्रंथातील पद्धत फारच भिन्न आहे. युरोपात व्हीटा नामक प्रख्यात गणितज्ञाच्या पूर्वी सुमारें दोनशें वर्षे जे गणिती होऊन गेले त्यांस भूमितीतील जो एक सिद्धान्त अवगत नव्हता. त्याच्याच आधारावर सूर्यसिद्धांतातील त्रिकोणमितीची इमारत उभारली होती. या हिंदी त्रिकोणमितींत जी कसज्या (sine of arc) योजलेली आहे ती ग्रीक लोकांस माहीत नव्हती; ते फक्त दुप्पट कंसाच्या पूर्णज्येचा chords of double arc उपयोग करीत असत. ज्या-चा (Sine) शोध आरबांनीं लावला असें मानतात; परंतु ग्रीक लोकापेक्षा जें हें जास्त ज्ञान आरबास झालें तें हिंदूपासून असे मानल्यास कोणतीहि चूक होणार नाही. परिघाच्या भागेंत वर्तुलाची त्रिज्या सागणे हा प्राचीन हिंदूंचा एक अपूर्वच शोध होय. टॉलेमी व इतर ग्रीक गणिती यानीं त्रिज्येचे भाग पाडण्याच्या कामी परिघाचा काहीं संबंध आहे असे मुळींच मानलें नाहीं. ग्रीक लोकांस माहित नसलेला ज्या (Sine)

चा उपयोग हाच हिंदू व ग्रीक त्रिकोणमितीतील महत्त्वाचा फरक होय. रेखा-मापनाच्या कामीं ग्रीक लोक जो नियम पाळीत असत तो विज्ञानशास्त्रातील एक फार मोठा शोध होय. आधुनिक काळांत ग्रीकानंतर प्रथमतः याचा उपयोग ब्रिग्जनामक गणितज्ञाने केला.

हल्लीं तज्ज्ञानीं असा शोध लावला आहे कीं, हिंदुस्थानात भूमितीच्या सहाय्यानें तयार केलेलीं ज्योतिर्विषयक कोष्टकें होतीं; परंतु तीं केव्हा तयार झालीं याचा पक्का अदमास लागत नाहीं. काहीं विद्वानांचें असें म्हणणें आहे कीं, फार प्राचीन काळी प्रत्यक्ष वेध घेऊन तीं तयार केलेलीं असावीं व तो प्राचीन काल म्हणजे ख्रिस्तापूर्वी तीन हजार वर्षांचा असला पाहिजे असें बेली वगैरे विख्यात ज्योतिर्विदांचे म्हणणें आहे. आतां हें मत जर ग्राह्य धरावयाचें तर त्याबरोबर चें त्या काळी अगर त्या कालाच्या पूर्वी पुष्कळ वर्षे हिंदुस्थानात भूमितिशास्त्राची वाढ झाली असली पाहिजे असें मानणें प्राप्त आहे. हीं दोन्हीं तत्त्वें मान्य झाल्यावर भूमितींतील प्रास्ताविक व आरंभींचे कांहीं सिद्धांत हिंदुस्थानातून युरोपात म्हणजे ग्रीसमध्यें गेले असले पाहिजेत हें म्हणणें कोणासहि सहज पटण्यासारखें आहे.

भूमितींतील एक प्रख्यात सिद्धांत असा आहे कीं, काटकोन त्रिकोणाच्या वर्णावरील चौरसाचें क्षेत्रफळ त्याच काटकोन त्रिकोणाच्या इतर दोन बाजूंवरील चौरसाच्या क्षेत्रफळाच्या बेरजेबरोबर असतें. तीन बाजूंचीं लांबी दिली असतां एकाथा त्रिकोणाचें क्षेत्रफळ काढतां येतें हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. हे दोन्हीं सिद्धांत ग्रीक लोकांस ठाऊक नव्हते व यांच गोष्टींवरून हिंदु भूमिति-कोविदांची थोरवी सर्व जगाच्या प्रत्ययास येण्यासारखी आहे."

परंतु सूल्वसूत्रांची रचना ख्रिस्ती शकापूर्वी ८ व्या शकात झाली व युक्लिडच्या पहिल्या पुस्तकातील ४७ वा सिद्धांत पायथागोरासने प्रथम सिद्ध केला असें जें मानण्यात येतें तें बरोबर नाहीं. कारण पायथागोरसच्या पूर्वी निदान दोन शतकें तरी तो हिंदूंना माहीत होता याबद्दल पुरावा आहे. म्हणून पायथागोरसनें हिंदूंपासून भूमितीचें बरेंच ज्ञान उचललें असें जें थ्रूडरचे म्हणणें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

एल्फिन्स्टन म्हणतो कीं, " त्रिकोणाचें क्षेत्रफळ त्याच्या बाजूंनीं व्यक्त करतां येतें ही हिंदूंस पूर्ण अवगत असलेली गोष्ट क्लॉवियसनें युरोपात प्रसिद्ध करीपर्यंत कोणास माहीत नव्हती. त्याचप्रमाणें ज्या व परिघ यांजमधील परस्परप्रमाण

हिंदू लोक जें मानीत व तें ज्या मापनानें मोजण्यात येई ते हल्लींच्या शोधावरून निघालेल्या प्रमाणाशीं पडताळून पाहता अगदीं तंतोतंत जुळते आहे. त्रिकोण व वर्तुळ याच्या गुणधर्माचे उद्घाटन वरील दोन उदाहरणावरून केलेले पाहिलें म्हणजे हिंदूंच्या भूमतीज्ञानाच्या खोलपणाची खात्री पटते. अगदी गेल्या शतकापर्यंत ह्या गोष्टी युरोपियनास माहीत नव्हत्या व त्याच हिंदूंस हजारों वर्षांपूर्वी माहीत असाव्या यापेक्षा त्यांची श्रेष्ठता सिद्ध करण्यास आणखी पुरावा तो कोणता पाहिजे ? "

प्राचीन ग्रंथाचा जितका जितका जास्त शोध लागेल तितका तितका प्राचीन भारतीय आर्यांच्या ज्ञानराशीवर जास्त प्रकाश पडून आधुनिक ज्ञानधनमोद्धत युरोपियन पंडित याच्या डोळ्यात झणझणीत अंजन पडून त्याची दृष्टि निवळेल व हिंदुस्थानाबद्दल यथार्थ ज्ञान करून घेण्याची त्यास इच्छा होईल असें दिसते. असो. शेवटी काऊन्ट जानस्टर्ना याने दिलेले एक उदाहरण देऊन हे भूमितीचें प्रकरण आटपूं.

काऊन्ट जानस्टर्ना म्हणतो की, " अकबर बादशहाच्या आयने अकबरी नामक सरकारी पुस्तकात वर्तुलाचा व्यास परिघाच्या १२५०—३९२७ ह्या प्रमाणात असतो असें दिलेले आहे अर्थात् हे प्रमाण हिंदूंपासून घेतले आहे यात शंका नाहीं. मेटियसचे ११३—३५५ हे प्रमाण व १२५०-३९२७ हे प्रमाण यात वस्तुतः विशेष फरक नाहीं. आता हें प्रमाण बसावण्यास एका वर्तुल मध्ये ७६८ भुजांचा बहुकोण काढता आला पाहिजे व तो काढण्यास नुसत्या अंकगणिताच्या ज्ञानाने पुरे पडणार नाही. त्याकरता वक्ररेषा व नवमाशाचे Ninth power दशमस्थानापर्यंत वर्गमूळ काढता आले पाहिजे. अर्थात् इतके ज्ञान असल्याशिवाय त्यानी वरील प्रमाण ठरावणे अशक्य आहे. परंतु या गोष्टी ग्रीक अथवा आरब यापैकी कोणासच माहीत नव्हत्या. त्या ते पुढे हिंदूंपासून शिकले असले पाहिजेत. "

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे प्राचीन काळीं हिंदूंचे भूमितीचे ज्ञान अफाट वाढलें होते, व त्याजपासून पुढ सर्व जगान ते घेतले ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी ढळढळीत असल्याने त्याजविषयी यापेक्षा जास्त लिहिण्याची जरूरी नाही.

बीजगणित.

बीजगणितातील प्राचीन भारतीय आर्यांस कोणकोणत्या गोष्टी माहीत होत्या हें पाहूं. प्रो. वॉलिस व कोलब्रूक याच्या मतें करणीपद्धतीचें (surd roots) गणीत,

अनेकवर्ण समीकरणाची सामान्य पृथक्करणपद्धति, एकवर्ण समीकरणाच्या अनिर्णित सिद्धान्तांचें सामान्य उत्तर काढण्याची रीति, अनेकवर्ण समीकरणाचे एक उदाहरण अनिश्चित पद्धतीनें सोडविले असता त्यावरून अनेक उत्तरे काढण्यासाठीं सर्वसाधारण नियम योजणें, नियमित संख्येस शून्यानें भागलें असता भागाकार असंख्य येणें, अनेकवर्णात्मक समीकरणाचे उत्तर प्रथम तीं एकवर्णात्मक अगर वर्गसमीकरणाच्या रूपात विच्छेदून नंतर त्यास नित्य सामान्य नियम लागू करणें इत्यादि प्रकार त्यास माहित होते. ह्या पद्धति म्हणजे अदमासाचें काम नसून शास्त्रशुद्ध, नित्य, सर्वसंमत सिद्धांत आहेत; आणि त्यांचें ज्ञान त्यांनां पद्धतशीर रीत्या संपादलें होते हें प्राचीन ग्रंथावरून दिसून येतें. ला ग्रांज (La Grange) याच्या संशोधनानें गणितशास्त्रात पुढे जी प्रगति झाली त्या काळापर्यंतच्या युरोपियन गणीतज्ञानाइतकें हें आहे हे कोणीही कबूल करील.

प्लेफेअर म्हणतो की, " बीजगणिताची परिभाषा ज्योतिषशास्त्राच्या पुस्तकात वापरणें व या दोन शास्त्राचा उपयोग परस्परांच्या परिपोषास करून घेणे अशी स्थिति येण्यास अनेक वर्षांचा अभ्यास व अनेक विद्वानांचे अव्याहत परिश्रम अवश्य असावे लागतात. " हिंदूंच्या एकंदर गणितशास्त्राचा अभ्यास केल्यास प्लेफेअर म्हणतो तशी स्थिति आहे असें दिसून आल्याशिवाय रहाणार नाहीं. ह्या वरून हिंदूंची गणितशास्त्रांत झालेली प्रगति, त्याच्या गणिताचा पुराणकालीनपणा व त्यांची स्वाभाविक कुशाग्र बुद्धि आणि योजकता हे गुण स्पष्ट होतात.

मागील अंकगणित व भूमिति यांच्या प्रतिपादनांत हिंदूच्या अचाट बुद्धिचातुर्याचें व कल्पकतेचें जें समर्पक व आदरयुक्त युरोपियन पंडितांचें वर्णन दिलेले आहे तें येथें फिरून देण्याची आवश्यकता दिस्त नाहीं. कारण कीं, त्यांच्या कीर्तीचा परिमल त्रिखंड भेदून राहिला असल्यामुळें वास्तविक या आगंतुक युरोपियन पंडितांच्या शिफारशीची मुळींच जरूरी नाही. परंतु हल्ली आम्हांमधील आत्मप्रत्यय कमी झाल्यानें व ज्या त्या गोष्टींत परक्याकडे पाहण्याची संवय झाल्यामुळें प्राचीन शास्त्रग्रंथात स्वतंत्र संचार करून पूर्वजांच्या कौतुकास्पद गोष्टींचा व कृतींचा परिचय करून घेणें होत नाही. सबब दुधाची तहान ताकाने भागवून घेणाऱ्याच्या साठी (आम्हासाठीं) कित्येक वेळां पुनरुक्तीचा दोष पतकरून युरोपियन पंडितांचे आपल्या पूर्वजांबद्दलचे प्रशंसापर उद्गार द्यावे लागतात.

कोलब्रूक, मॉनिगबाई, प्रो. मोनियर विल्यम्स, एल्फिन्स्टन याचे मागें उद्धत केलेले उतारे परत देण्याची जरूर नाहीं. ह्यावरून एकच गोष्ट प्रामुख्याने दिसते

तीं अशी कीं, ज्याप्रमाणें अंकगणित व भूमिति या दोन शास्त्रांत जगाचें गुरुत्व हिंदुस्थानाकडे प्राचीन काळी होते त्याचप्रमाणें बीजगणितातही होते.

' एडिन्बरो रिव्ह्यू ' नामक मासिकात पुढील उतारा आहे. " $Ax^2 + B$ (अक्ष^2 + व.) ही पूर्ण वर्गात्मक संख्या 'क्ष' च्या कोणत्या किमतीनें होईल, असा प्रश्न आहे. या प्रश्नाचा मोठा मजेदार इतिहास दिलेला आहे. डायॉफॅन्टस यानें हा प्रश्न सोडविण्याचा थोडाबहुत प्रयत्न प्रथम केला. नंतर फरमाट (Feremat) याने १७ व्या शतकात त्याच पद्धतीत आणखी फरक करून तो प्रश्न इंग्रजी बीजगणितज्ञाकडे पाठविला. शेवटी त्याचे संपूर्ण व समाधानकारक उत्तर प्रत्यात यूलर नामक गणितज्ञाने दिले. परंतु शेवटी यूलरची (Euler) रीत व भास्कराचार्यांची रीत एकच आहे असे आढळून आले. "

पुढे त्याच मासिकाच्या २९ व्या भागाच्या १५३ पानावर असे म्हटले आहे कीं, " भास्कराचार्यांनी जें विशिष्ट उदाहरण दिलेले आहे तेच लार्ड ब्रॉकर यानें १६५७ सालीं स्पष्ट करून सांगितले, आणि त्याच प्रश्नाचे जे सामान्य उत्तर १७६७ सालीं डीलाग्राज याने दिले तें ब्रह्मगुप्त याने दिलेल्या उत्तरापेक्षा मुळींच निराळे नाहीं. "

हिंदू व ग्रीक बीजगणितज्ञ यांजमध्ये जो एल्फिन्स्टनच्या मते मुख्य फरक आहे तो नवीन शोधांच्या बाबतींत नसून रीतीच्या सोपेपणात आहे. हिंदूंची बीजगणितातील पृथक्करणाची एक फार आवडती रीत होती तिचा १६२४ पर्यंत जगास पत्ताही नव्हता. ती प्रथम बाचेट डी मेझेरिक याने युरोपात प्रसिद्ध केली, व यूलरने जिचा अंगिकार केला ती ह्याहून मुळींच भिन्न नव्हती.

हिंदूंच्या ज्योतिर्विषयक शोधात व भूमितीच्या उपपादनात बीजगणिताचा उपयोग केलेला दिसतो तो त्याचाच शोध आहे व हा उपयोग करण्याची हातोटी पाहून सर्वांस त्याबद्दल मोठा विस्मय व आदर वाटतो.

हिंदूंच्या अंकगणित, बीजगणित व भूमिति, या शास्त्रावरील ग्रंथासंबंधानें कोलब्रूक म्हणतो कीं, " हल्ली एकंदर गणितशास्त्राची जी वाट झाली आहे त्या समयीं व सांप्रतच्या सुधारलेल्या पृथक्करणात्मक पद्धतीच्या काली ह्या पुस्तकाच्या भाषांतरापासून विशेष लाभ होईल असे वाटत नाहीं. परंतु गणितशास्त्राच्या इतिहासाच्या दृष्टीनें मात्र थोडाफार फायदा झाल्याशिवाय राहणार नाहीं. जेव्हा गणितज्ञाचे लक्ष प्रथम हिंदूंच्या ज्योतिषशास्त्राकडे व तत्संलग्न इतर विषयाकडे

वधले गेले त्या काळी जर हे भाषांतराचे काम झाले असते तर बीजगणितास त्या वेळी मदत झाली असती. व गेल्या शतकांत ज्या रीती शोधून काढाव्या लागल्या व संशुद्ध कराव्या लागल्या त्या कराव्या लागत्या ना. "

हिंदूच्या पडत्या काळात समाजाची व शास्त्राची वाढ होण्याचे बंद पडून कांही प्राचीन अवशेष शब्दांच्या माऱ्यापुढे व आसुरी नाशलालसेपुढे शिल्लक उरतात कीं नाही याबद्दल अत्यंत धास्ती वाटावयास लागली होती. परंतु अशी स्थिति येण्याच्या पूर्वी साधारणतः गणितशास्त्राची किती वाढ झाली होती हे दाखविण्यास ' ललितविस्तार ' नामक ग्रंथातील एक उदाहरण घेऊं.

विष्के म्हणतो की, " बुद्धाच्या जन्माच्या पूर्वी त्याची परीक्षा घेण्यांत आली. त्या वेळी त्यास एका योजनात किती परमाणु बसतात असा प्रश्न घालण्यात आला होता, व त्याचे त्याने जे उत्तर दिले त्यावरच विख्यात शास्त्रज्ञ आर्चिमेडिज यान आपले ' आरिनारीयस ' पुस्तक रचले. "

आता गणितशास्त्रातील एका भागाचा किंचित विचार करून या शास्त्राचा निरोप घेऊं.

शून्यलब्धी (Differential calculus) याचा शोध आपण लावला असे पाश्चात्यांचे म्हणणे आहे; परंतु जगविख्यात गणिती भास्कराचार्य यानें या पद्धतीचा उपयोग केलेला आहे. मात्र एवढें खरें कीं, त्यानें पूर्वीच्या लेखकाप्रमाणे या विषयाचा सहज उपन्यास करून तो पुढे वळला आहे; सविस्तर वर्णन देण्याच्या व लाबलचक प्रतिपादन करण्याच्या भानगडींत तो पडला नाहीं असे त्याच्या ग्रंथावरून दिसते

स्प्राटशवूड व लेथाब्रज हे म्हणतात कीं, साम्प्रतच्या शून्यलब्धीसारखी एक पद्धति भास्कराचार्यांच्या ग्रंथांत आढळते, व त्याच्या सारख्या ज्योतिष्यास ती अवश्य असल्यानें ती त्यास माहीत असली पाहिजे. हल्लीच्याच स्वरूपात अगर परिणत अवस्थेत ती असल असे जरी आग्रहानें व नेटानें सागता आले नाही तरी ती त्यास व त्याच्या पूर्वगामी गणितज्ञास माहित असली पाहिजे यांत कांही शंका नाहीं.

प्रकरण ७ वें.

ज्योतिषशास्त्र.

ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाने मन अतिशय प्रफुल्लित होतें. अगणित तारकांचें अफाट प्रदर्शन पाहून कोणाचें मन प्रशांत होणार नाहीं ? विश्वाच्या दरबारातील अनेक वस्तूंपैकीं तारकामय नभोमंडळ ही एक अत्यंत मूल्यवान् चीज आहे. निकट सहवासामुळें आपणास त्याचें विशेष कौतुक वाटत नाहीं, परंतु हे नभोवितान जरी दररोज दृष्टीस पडणारें आहे, त्यांतील असंख्य तारका व नक्षत्रे दररोज उगवतात व मावळतात हीं गोष्ट जरी चिरपरिचयाची आहे तरी त्याचें मनोहारित्व केव्हांही नष्ट झालेलें नाहीं. रजनीच्या प्रशांत समयीं जर एकादा निसर्गभक्त झोंपेस दूर सारून उघड्या प्रदेशांत येऊन बसला, व आकाशाकडे टक लावून नक्षत्राच्या राशीसंबंधानें विचार करूं लागला, तर त्याची रात्र केव्हाच निघून जाईल. रात्रींच्या वेळीं आकाशांत घडणारे फेरबदल व घडामोडी त्याच्या दृष्टीस आपोआप पडतील व जिव्हेस शीण न देतां, घसा कोरडा न करितां, कोणत्याही प्रकारचें पुस्तकादि साहित्य न बाळगतां त्यास किती तरी ज्ञान होईल ! मिल्टन कवीने म्हटल्याप्रमाणें आकाश हे परमेश्वराने मनुष्यास दिलेलें पुस्तक आहे. त्यातून त्या जगन्नियंत्याच्या उपदेशाचें पठण करणें, ईश्वरी आदेश समजून घेणें व परमेश्वरी स्वरूपाचें ज्ञान करून घेणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. ज्या मानानें त्या पुस्तकाचा तयारी होईल त्या मानानें प्रत्येक राष्ट्रास सुधारणासंपन्नतेचा चांद मिळेल. ईश्वरी विश्वविद्यालयांत ज्योतिषशास्त्राचा विषय प्रमुख असून त्यांत प्रत्येक राष्ट्ररूपी छात्रास पदव्या मिळू शकतात. या पुस्तकांत जे मुख्य विषय आहेत ते असे:—सृष्टीच्या सर्वांगाचा अभ्यास, दिव्य तेजाने प्रकाशणाऱ्या गोलांच्या हालचाली, उत्पात, उल्कापात, ग्रहणें, युति भिन्न ग्रहांचे उदयास्त, धूमकेतू, निरनिराळ्या ग्रहांपासून एकमेकांवर घडणारे परिणाम, परस्परांचीं अंतरें, —इत्यादि, इत्यादि. या विषयांचा अभ्यास जगाच्या आरंभापासून सुरू आहे व त्यांत प्रत्येक राष्ट्र आपल्या शक्तीप्रमाणें भर घालीत असून व प्राविण्याबद्दल जगा-

कडून धन्यवाद घेत आहे. तरी अजून कशास कांहीं पत्ता नाहीं. अशी या शास्त्राची स्थिति आहे. विद्वानांच्या मतें ज्योतिषशास्त्र हें राष्ट्रसुधारणेचे चिन्ह असून संस्कृतीचें माप आहे. आतापर्यंत ज्योतिषशास्त्राबद्दल विद्वान मंडळींत काय काय समजुती रूढ आहेत या पाहिल्या म्हणजे त्यापुढें त्याच्या अनुरोधानें हिंदुस्थानच्या स्थितीचे प्राचीन काळापासून परीक्षण करण्यास बरे पडेल. डॉ. सर विल्यम हंटर व एल्फिनस्टन या दोन विद्वानाच्या मताने हिंदुस्थानात प्राचीन काली या विषयाची लोकास फार मोठी अभिरुचि असून, त्यात त्यानी अत्यंत प्रावीण्य संपादन केलें होतें. सध्या जीवंत असलेले ज्योतिषवाङ्मय प्राचीन आर्यांच्या अफाट बुद्धीचे यथायोग्य प्रदर्शन करितें व त्याच्या विमल आणि सात्त्विक संस्कृतीचें बिंब-प्रतिबिंबन्यायाने सर्व जगास उदाहरण घालून देतें. परंतु एवढीच जर त्याची कामगिरी असती तर त्यास इतके महत्त्व प्राप्त झाले नसते. त्यास जी एवढी किंमत येते ती त्यापासून हिंदु संस्कृतीचा प्राचीन काळ ठरतो म्हणून. ऐतिहासिक अवशेष शिल्लक नसता, प्राचीन लेख वगैरे मिळणें शक्य नसता आणि इतर सर्व साधनाचा पूर्ण अभाव असता हिंदुस्थानचा प्राचीन काळ ठरविणे फारच अवघड जाते. अशा स्थितीत ज्योतिषग्रंथ हे त्या कामीं फार सहायभूत होत असल्यानें ह्या शास्त्राची मातब्बरी विशेष वाढली आहे ज्योतिषशास्त्राचा इतिहासकार बेली म्हणतो की, " हिंदूंच्या ज्योतिषविषयक वेधाच्या तक्त्यावरून अनुमान काढता त्याचा प्राचीन इतिहास फार दूरपर्यंत जाऊन पोचतो; व त्याचा हेब्रयू शास्त्राशी मुळीच मेळ बसत नाही. आजपर्यंत हेब्रयू शास्त्रें प्राचीन काल ठरावेण्यास अत्यंत विश्वासार्ह, प्रमाणभूत व खात्रीलायक आहेत अशी विद्वानाची समजूत असे, परंतु अलीकडे बेलांच्या अत्यंत परिश्रमपूर्वक केलेल्या गणतावरून तो विश्वास डळमळून पडला आहे व विद्वानाचें लक्ष आर्य ज्योतिषाकडे प्राचीनकालानिर्णयार्थ लागलें आहे; व प्राचीन आर्यांच्या संस्कृतीबद्दल, आश्चर्यकारक विद्वत्तेबद्दल व आदरणीय संस्थाबद्दल पूर्ण ऐकमत्य दिसून येऊं लागलें आहे. परंतु एवढे ध्यानात ठेवणे अवश्य आहे की, हल्लीचे ग्रंथ अवशेष रूप असून, ज्यास व्यापक शास्त्र म्हणतात व ज्यावर दाडगी ग्रथसंपत्ति असावी लागते ती सर्व नष्ट झाली आहे. "

वेबरच्या मतानें हिंदुस्थानात खिस्तपूर्व २७८० मध्यें ज्योतिषाचा अभ्यास सुरू होता, परंतु कॅसिनी, बेली, जेंटिल, फेफेअर इत्यादि ज्योतर्विदाच्या मतें तीन हजार वर्षापेक्षा सुद्धा जास्त मागील काळात हिंदुस्थानात या शास्त्राचा

अभ्यास सुरू असून त्या वेळचे ग्रंथसुद्धां अजून अस्तित्वांत आहेत व त्यावरच वरील मंडळींची मोठी मिस्त आहे. अशा प्राचीन काळीं केलेल्या गणिताचें एक उदाहरण घेऊं. कलियुगाच्या प्रारंभीं ज्योतिषशास्त्र हिंदुस्थानात पूर्णपणें भरंभराटीस आले होते असे काउन्टजॉन्स्टर्ना याने सप्रमाण सिद्ध केलें आहे. तो म्हणतो कीं, " हिंदूंच्या ज्योतिर्विषयक गणितावरून कलियुग ख्रिस्ताच्या पूर्वी ३१०२ या वर्षी फेब्रुआरीच्या २० व्या तारखेस २ तास २० मिनिटें व ३० सेकंदें या वेळीं सुरूं झाले असे सिद्ध करिता येतें. हिंदू असें समजतात कीं त्या वेळीं ग्रहाच्या संस्मरणीय युति होत्या व असें त्यानी आपल्या कोष्टकात लिहून ठेवलें आहे. याच वेळचे गणित बेलीने करून असे ठरविलें आहे कीं त्या वेळीं गुरु व बुध हे बरोबर क्रान्ति वृत्तावर होते, मंगळ ८° अंशावर असून शनि फक्त सातच अंशावर होता. त्याच्या अशा स्थितीत ते सूर्य-तेजानें निस्तेज होऊन कांहीं काळ अदृश्य होणें साहजिक आहे; व हिंदू ज्या चार ग्रहाच्या युति लिहून ठेवतात ते शनि, मंगळ, गुरु व बुध हेच क्रमाने असावेत असें उघड दिसते त्या वेळीं शुक्र जरी दिसणे शक्य नव्हतें तरी या ग्रहाची युति होण्यास कोणतीच हरकत दिसत नाही हल्लीं त्या काळचे गणित करून पाहिले असता ब्राह्मणाच्या तत्कालीन गणेताशीं इतकें तंतोतंत जुळतें कीं त्यानी प्रत्यक्ष वेध घेऊन ते केलें असलें पाहिजे, ही समजूत ठाम होते.

" फ्रान्सचा राजा १४ वा लुई याने लॉ बेरी नामक ज्योतिष्यास सयामच्या राजाकडे वकील म्हणून पाठविले होतें. त्याने १६८७ सालीं तेथे दिसलेल्या सूर्यग्रहणांची कोष्टके बरोबर आणली. त्याचप्रमाणें कर्नाटकमधील पॅट्रुलेट पाद्री व तिरवेल्लूर येथील जेंटिल यानीही काही तक्ते हिंदुस्थानांतून पाठविले होते. व ते सर्व पडताळून पाहता इतके बरोबर जमले कीं सर्वानीं आश्चर्याने तोंडात बोटें घातलीं; व मजा अशी कीं त्यापैकी प्रत्येकाने आपआपले तक्ते हिंदुस्थानच्या निरानिराळ्या प्रातातून व निरानिराळ्या वेळीं पाठविले होते; परंतु काकतालीय-न्यायानें ते सर्व तक्ते एका ठिकाणीं होऊन त्यातील प्रमाणानी एकाच सिद्धान्तास पुष्टि येण्यास मदत झाली. यावर बेलीचा काय अभिप्राय आहे, तो पहा. ४३८२ वर्षांपूर्वी हिंदु ज्योतिषशास्त्रज्ञानीं घेतलेले वेध, लॉ बेरीने पाठविलेले तक्ते व अलीकडच्या काळात कॅसिनी व मेयर यांनीं केलेलीं गणिते यामध्ये एका मिनिटाचा सुद्धां फरक पडत नाहीं. यावरून प्राचीन आर्यांनीं ते शोध घेण्याच्या कामी केवढी दक्षता व सूक्ष्मदृष्टि योजलेली असेल याची कोणासही सहज कल्पना

करिता येईल. चंद्राच्या गतीत हिंदू ज्योतिष्यांनीं जे संस्कार शोधून काढले तेच टायकोब्राही यांसही मिळाले. या सर्व गोष्टींवरून व प्रमाणांवरून हिंदू संस्कृतीचा काळ किती जुना आहे व त्यांचा ह्या शास्त्रात केवढा पारंगतता होती हें दिसून येईल. जर ३००० वर्षांपूर्वी बेलीच्या गणिताप्रमाणें भूमिति व ज्योतिष या दोन शास्त्रांत हिंदूंनीं इतके अपूर्व प्राविण्य संपादले होते तर तें ह्या स्थितीप्रत येण्यास याच्यामागे किती वर्षांचा अभ्यास कारणीभूत झाला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. कारण कीं त्या वेळीं अर्वाचीन मुद्रणसाहित्य नसल्याने ज्ञानाचा प्रसार जलद होत नसे व अशा साधनाभावीं मन सुसंस्कृत, परिपक्व व स्वतंत्र विचारक्षम होण्यास त्यास धडपडीमेच चालावे लागले असेल. एरवीं अशा गोष्टी साध्य होत नाहीत. ''

अनेक उदाहरणावरून आर्यांच्या ज्योतिषज्ञानाच्या प्राचीनतेबद्दल सर्वांची खात्री पटण्यासारखी आहे. फार प्राचीन कालापासून त्यांची कीर्ति सर्वत्र प्रसृत झालेली आहे आरबी ग्रंथावरून लातिन भाषेत ज्या ज्योतिष ग्रंथांचे भाषांतर झालेले आहे त्यात गृहकक्षेच्या शिरोबिंदूला जो संस्कृत शब्द आहे तो तसाच योजण्यात आला आहे. संस्कृत ' उच्च ' शब्दावरून पुढें इतर युरोपीयन भाषांत ऑक्स (Oux) हा शब्द बनलेला आहे; त्याचप्रमाणें रोमनशाहीत ' कानिकॉल पाशेल ' नामक जें राजदप्तर लिहिण्यात येत असे त्यात योजिलेला ' अण्डुबॅरियस ' अथवा ' अड्रबॅरियस ' हा आर्यभट्टाचाच अपभ्रंश असला पाहिजे व आरबानांही ' अर्जबहार ' म्हणून त्यांची थोरवी गायिलेली आहे.

आर्यावर्तात–ज्योतिषशास्त्र प्राचीन काळी सर्व राष्ट्रांच्या अगोदर उदयास आले म्हणून त्याची वाहवा करावयाची असे नाही. केवळ प्राचिनत्वामुळे आर्यावर्तास कांहीहा महत्त्व देणार नाही. त्यांत टिकाऊ, सर्व काळी लागू पडणारे व बिनचूक असे सिद्धान्त प्रतिपादले गेले आहेत म्हणूनच त्यास एवढी मोठी किंमत आहे. उदाहरणार्थ; सत्तावीस नक्षत्रे, बारा राशि, ग्रहांच्या मध्यम गति, विषुवचलन, पृथ्वीचे अंतरिक्षात अधांत्री रहाणे अगर आलंबशून्य स्थिति, आपल्या आसाभोवती पृथ्वीची दैनंदिन फेरी, आपल्या आसाभोवती चंद्राची प्रदक्षिणा, त्याचें पृथ्वीपासून अंतर, ग्रहाच्या कक्षेची परिमाणे, ग्रहणांचे गणित या सर्व ज्योतिर्विषयक बाबी बिनचूक निरीक्षणाने व यथायोग्य अनुमानानेंच ठरविलेल्या आहेत व त्यामुळें आर्य ज्योतिषशास्त्राचे नाव जगभर गाजलेलें आहे. इतका अभ्यास व अशी बिनचूक व सर्वमान्य अनुमानें अति महान् संस्कृतीशिवाय

केव्हाहीं अस्तित्वात येणे शक्य नाहीं. प्रगल्भशास्त्रांचीं निपज म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे. वर्षेंच्या वर्षे लोटावीं तेव्हा कोठें एकादा सिद्धान्त अस्तित्वात येतो. शास्त्रसंगोपन व वाढ हें काळजीचे, अभ्यासाचे, कालाचें व अभिरुचीचें काम आहे व या सर्व गोष्टी केवळ सुसंस्कृत राष्ट्रच करूं शकतात. रानटी स्थिति व शास्त्रप्रगति यांचे साहचर्य कोणीहीं क्षणभरसुद्धा कांल्पणार नाहीं. अशा अफाट व अगाध बुद्धिप्रकर्षाने ज्यानीं ज्योतिषशास्त्राचीं उभारणी केली त्याच्या सिद्धान्त सोडविण्याच्या रीती, गणिताच्या पद्धति, वेध घेण्याचे प्रकार व शोध करण्याचीं हातोटी अपूर्वच असणार यात काय संशय ? हीं गोष्ट एल्फिन्स्टन, प्रो. व्हिल्सन यानीं प्राजलपणे कबूल केली आहे. सूर्यसिद्धान्ताचे भाषांतर प्रो. व्हिटनेने आपल्या अमेरिकन प्राच्यमंडळाच्या नियतकालिकात छापल्यावर असा वाद निघाला का नक्षत्रे कोणीं शोधून काढलीं ? पारिसमधील प्रख्यात बायोनामक ज्योतिषी व बर्लिनमधील प्रो. बेबर याजमध्ये हा वाद चालू झाला. पहिल्याचें म्हणणें कीं हिंदूनीं नक्षत्रे स्वतः कल्पिलेला नसून तीं चिनी लोकापासून त्यानीं घेतलीं. परंतु चिनी लोकाचा स्यू हा शब्द (Sieu) व हिंदूंचा नक्षत्र हा शब्द या दोन शब्दात फार अंतर आहे. स्यूचा अर्थ फक्त एकच तारा असा आहे. याच्या उलट नक्षत्राचा अर्थ तारकासमूह अथवा तारकामय व्योमभाग असा आहे. ख्रिस्ती शकापूर्वी फार तर २००-३०० वर्षे हा शब्द चिनी लोकांस माहीत असावा; परंतु नक्षत्र हा शब्द वेदग्रंथात आढळून येतो असे बेबरचें म्हणणें आहे. यावरून हिंदूंची कल्पना व पुराणत्व आपोआप सिद्ध होत आहे.

आरब हे हिंदूचे शिष्य असून आपले ज्योतिषशास्त्र त्यांनीं बहुतेक आर्य ज्योतिषावरून रचले प्रो. बेबर व सर हंटर याच्या मतें आरबांनीं सातव्या व आठव्या शतकात हिंदू ग्रंथाचीं भाषांतरे करून नेलीं, व ते, ब्राह्मणज्योतिषाजवळ शिकले. हिंदू ज्योतिषाना आदरपूर्वक बोलावणे खलिफ हरूनल राशिद व अल्मामन याच्या दरबारी दिलेले असे, व तेथे पुष्कळ विद्वान् लोक हिंदुस्थानातून जात; याच लोकाच्या साहाय्याने खालीं दिलेल्या सिद्धान्तांचें भाषांतर झालेलें आहे. आरबी भाषेत सिद्धाताला सिन्दहेड असा शब्द वापरलेला आहे. एकंदर नऊ सिद्धान्त आहेत ते असेः—

(१) ब्रह्मासद्धान्त, (२) सूर्यसिद्धान्त, (३) सोमसिद्धान्त, (४) बृहस्पति-सिद्धान्त, (५) गार्ग्यसिद्धान्त, (६) नारदसिद्धान्त, (७) पाराशरसिद्धान्त, (८) पुलस्त्यसिद्धान्त, (९) वसिष्ठसिद्धान्त.

युरोपीयन लोकांस माहीत असलेल्या या सर्व सिद्धांतांत श्रेष्ठ म्हणजे सूर्य-सिद्धांत होय. हा फार पुराणकालीं रचलेला असावा असा त्यांतील दोन श्लोकावरून तर्क आहे.

कल्पादस्माच्च मनवः षड् व्यतीताः ससन्धयः ।
वैवस्वतस्य च मनोर्युगानां त्रियनो गतः ॥ २२ ॥
अष्टाविंशाद्युगादस्माद्यातमे तत्कृतं युगम् ।
अतः कालं प्रसंख्याय संख्यामेकत्र पिण्डयेत् ॥ २३ ॥

प्रत्येक मनु–कृत, त्रेत, द्वापार व कली अशा–चार युगांचा मिळून झालेला असतो.

अर्थ—चालू वैवस्वत मन्वंतरापूर्वी संधिकालासह सहा मनु होऊन गेले आहेत व चालू मनूची तीन युगें पुरी झाली आहेत. सबब एकंदर बेरीज केली असता पहिल्या कृतयुगापासून आजपर्यंत एकंदर २७ युगें होऊन गेली व चाल अठ्ठाविसावें आहे. अशा तऱ्हेनें कालाचे मापन करून एकंदर संख्या काढावी. सूर्यसिद्धान्तरचनेच्या कालासंबंधी वरील श्लोक लक्षात ठेवण्यासारखे आहेत. डेव्हीस व हाउटन यांच्या मतें पाराशरमुनि अनुक्रमें ख्रिस्तापूर्वी चवदाव्या व बाराव्या शतकाच्या अखेरीस असावा असे खुद्द त्याच्या गणितावरून यानीं काढले आहे. अर्थात् काउन्ट जान्स्टर्ना म्हणतो त्याप्रमाणे खाल्डियन, अरब व ग्रीक याच्यापूर्वी हा होऊन गेला यांत काहींच संशय राहत नाही.

पाराशर मुनीच्या नंतर आर्यभट्ट फलज्योतिषी झाला. याचा नक्की काल अजून ठरला नाहीं; परंतु तो विक्रमादित्यापूर्वी होऊन गेला हे निश्चित आहे. युरोपिअन पंडितांच्या मतें यास पृथ्वीची दैनंदिनगति, सूर्यचंद्राच्या ग्रहणाचे-सिद्धान्त व अयनबिंदु व विषुव याचे चलन इत्यादि गोष्टी माहीत होत्या. याचे मुख्य ग्रंथ तीन आहेतः—

(१) आर्यभाट्टिका, (२) दशगीतिका, (३) आर्याष्ट-शतक.

आर्यभट्टानंतर अत्यंत विख्यात वराहमिहिर नावाचा फलज्योतिषी होऊन गेला. ज्योतिषी म्हणून जरी याची कीर्ति कमी नसली तरी मुख्यत्वेकरून हा फलज्योतिषी म्हणूनच प्रसिद्ध आहे. याने ज्योतिषशास्त्रावर थोडीबहुत ग्रंथरचना केली आहे. परंतु याचे मुख्य ग्रंथ फलज्योतिषावरच लिहिलेले आहेत. हा ख्रिस्ती शकापूर्वी पहिल्या शतकात होऊन गेला व विक्रमादित्याच्या नवरत्नांत याची गणना होत असे. नवरत्नांचीं नांवें पुढील श्लोकांत दिलेली आहेतः—

धन्वंतरिः क्षपणकोऽमरसिंहशंकु—।
वेतालभट्ट-घटखर्पर—कालिदासाः ॥

वराहमिहिराचे मुख्य ग्रंथ पुढें दिल्याप्रमाणें आहेतः— (१) बृहज्जातक. (२) बृहत्संहिता, (३) पूर्वीच्या पंचसिद्धान्तांचा सारांश.

मॅनिंगबाई लिहिते कीं, " बृहत्संहिता पुस्तकातील अत्यंत चित्तार्षक गुण म्हटला म्हणजे विस्तृत सुबोध विवेचन होय. या ग्रंथाची प्रख्यात आरबी फलज्योतिषी अल्बिरुणी याने फारच वाहवा केली आहे. यात भूगोल, वाधकाम. खोदकाम इत्यादि विषयाची माहिती (फलज्योतिष या मुख्य विषयाशिवाय) भरपूर दिलेली आहे "

शेवटचा जगविख्यात ज्योतिषी भास्कराचार्य होय. हा अगदी अलीकडच्या काळीं म्हणजे १२ व्या शतकांत होऊन गेला. गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धातावरील सुबोध व खुबीदार विवेचन व इतर अनेक गणितग्रंथ याबद्दल याचें नांव अखिल ज्ञानी जनास अवगत झालेले आहे

पृथ्वीच्या वर्तुलाकारासंबंधीं ऐतरेय ब्राह्मणात पुढोलप्रमाणें उल्लेख आहेः—

" ह्या इंद्रलोकतुल्य सभारंभाने वसिष्ठऋषीचा मुलगा तुर याने जनमेजयास पावन केले व नंतर त्याने सपूर्ण वर्तुलाकार पृथ्वी जिकली. '

त्याचप्रमाणें भट्टीकाव्यातहीं वर्णन आहे

पञ्जरमध्ये कक्षया पारेवेष्टितः खमध्यगतः
मृज्जलाशेखिवायुमयो भूगोलः सर्वतोवृतः

पृथ्वी, आप, तेज व वायु यांना युक्त असलेला हा भूगोल पिंजऱ्यामध्यें ठेवलेल्या पोपटाप्रमाणे आकाशाच्या पोकळींत फिरत राहिलेला आहे; व याच मताचा अनुवाद भास्कराचार्यांच्या गोलाध्यायात केलेला आहे.ज्योतिषशास्त्रज्ञांची परंपरा पुढें कायम होती तेराव्या शतकानंतर सतराव्या व अठराव्या शतकापर्यंत कित्येक ज्योतिषी होऊन गेले व त्यांपैकीं राजा जयसिंग याची हकिगत पुढे दिली आहे. केशव व गणेश दैवज्ञ हे मधल्या ३०० वर्षात प्रख्यात ज्योतिषी होऊन गेले. परंतु ही परंपरा चालविणारे ज्योतिषी मध्ये होत असून त्याच मालिकेतील शेवटचा राजा जयसिंग होय.

आर्यभूमींत तत्त्वज्ञानी, कवि, ज्योतिषी, गणिती इत्यादि निरनिराळ्या शास्त्रातील पंडितांची एकसारखी परंपराच लागली होती असे दिसतें. मध्यतरी अनेक घडामोडी झाल्या, असंख्य राज्यक्रांत्या घडल्या, समाजपरिवर्तनेही त्याचप्रमाणें

अगणित झाली. परंतु इतर प्रकारच्या वैभवास जशी ओहोटी लागलेली दिसते तशी ज्ञानलालसेस लागलेली दिसत नाही. याचा ताजा नमुना म्हणजे राजा जयसिंग होय. हा प्रख्यात ज्योतिषी नुकताच दोनशे वर्षांपूर्वी होऊन गेला. जयपूर, उज्जयिनी, मथुरा, काशी, दिल्ली इत्यादि ठिकाणी यानें वेधशाळा बांधलेल्या असून त्यापैकी काशी येथील वेधशाळा अजून त्याच्या कर्तबगारीची साक्ष देत आहे. याने १७०२ सालीं प्रसिद्ध झालेलीं डी ला हायरची ज्योतिर्विषयक कोष्टकें दुरुस्त केली आहेत; व आपण स्वतः " झिज मद्दमदशाही " नामक एक नक्षत्रांचा वर्गीकरणात्मक यादी लिहिली असून तिजवरून त्याच्या बुद्धिमत्तेची कल्पना करता येते; अथवा थोडक्यात बोलावयाचे म्हणजे त्यानें स्वहस्ताने उभारलेले हे शास्त्रविषयक आपले स्मारकच होय.

सर्व शास्त्रापेक्षा या शास्त्रास उपकरणबाहुल्याची फार जरूर आहे. हल्लींप्रमाणे अति सूक्ष्म यंत्रांची, वेधसाधनांची, निरीक्षणोपकरणांची मदत नसता वर सिद्ध केल्याप्रमाणे अति प्राचीन काली सुद्धा इतका गहन अभ्यास व्हावा हे खरोखर तत्कालीन विद्वानास अत्यंत भूषणास्पद आहे यात काय संशय ? प्रख्यात युरोपियन ज्योतिषी फअर म्हणतो कीं, " ब्राह्मणांचा शोध लावण्याची **चपलता व विनचूक शैली** खरोखर आश्चर्यकारक आहे " या एकाच वाक्यावरून सर्व शास्त्राच्या बाढीची उपपत्ति लागेल. पुढेही यासच पुष्टि देणारा उतारा प्रो. सर विल्यमच्या लेखणीतून उतरला आहे. "ब्राह्मणपंडित दशलक्ष, महापद्म इत्यादि सारख्या गणितातील संख्या सहज कल्पितात, व त्याचा उपयोग गणितांच्या कामी करून घेतात; या सारख्या संख्या काय आहेत, त्याचा कसा व कोठे उपयोग करावयाचा, अशी भूस्तरशास्त्रज्ञ, ज्योतिषी वगैरे इतर देशातील पंडितास मोठी अडचण पडते. परंतु हिंदू पंडितांना त्याचे काहींच वाटत नाही. अनंतपट्टी, असंख्यपणा, व याच्या खालोखालच्या संख्या कल्पिण्यास, त्यांना नावे देण्यास, त्या, लोकांच्या बुद्धीच्या आटोक्यात आणण्यास व गणितात रूढ करण्यास त्यास काहींच अडचण भासत नाही. अडचण भासल्याबरोबर त्यांनी काल्पनिक वस्तूस सत्य व व्यवहार्य सृष्टीत आणून सोडलेच; त्याच्या बुद्धिच्या टप्प्यात कोणती गोष्ट येत नव्हती असे कधींच झालें नाहीं. परंतु आमच्या कर्म नशिबाने त्याच्या बुद्धिविलासाचीं ग्रंथरूपी फले फारच थोडी आजतागायत हयात आहेत. परंतु त्यात सुद्धा अजून असें काही सिद्धान्त लिहिलेले आढळतात की त्याची युरोपीअन विद्वानास फोड व्हावयाची आहे असे सर विल्यमचे म्हणणे आहे. उदाहरणार्थ,

सूर्यसिद्धान्ताच्या दुसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभी ग्रहाच्या गतीसंबंधी जो एक चमत्कारिक सिद्धान्त केला आहे त्याचे कोडे अजून कोणासच उकललें नाहीं. असतु. एवढ्यावरून आपल्या पूर्वजांनी ज्योतिषशास्त्रात केवढी भर टाकली, त्यांतील अक्षय सिद्धांत कसे अल्प साधनानीं परंतु सूक्ष्मभेदी दृष्टीनें हुडकून काढले; त्यांचें प्रतिपादन किती उत्तम तऱ्हेनें व मनाजोगें केलें आहे; हे पाहिले म्हणजे मति अगदीं गुंग होऊन जाते, व आपणास त्यांचे वंशज म्हणवून मिरविण्यास क्षणभर लाज वाटते. परंतु अजूनही जोपर्यंत संस्कार नष्ट झाले नाहींत; आम्ही अवनतीच्या कर्दमात पूर्ण गाडले गेलो नाहीं; तोपर्यंत कामास लागल्यास त्यांच्या आशीर्वादाने पुन्हा पूर्वस्थितीवर येण्यास कांहीं वेळ लागणार नाही. आर्यभूवर परमेश्वराची पूर्ण कृपा आहे; परंतु तिचा प्रज्ञाच नादान निघाली तर देवानें तरी काय करावे ! सबब हा आमच्या वरील आरोप आम्ही कुनीनें काढून टाकूं तर पूर्वजांचे यश मलिन करण्याच्या आरोपातून आपली सुटका होईल. नाही तर आजपर्यंत जी स्थिति भोगली तिच्यापेक्षा कष्टकर स्थिति भोगणे प्राप्त होईल हे निराळे सांगणें नकोच.

प्रकरण ८ वें.

युद्धकला व युद्धशास्त्र.



ऋग्वेदादि आद्य ग्रंथांपासून तों महाभारत, रामायण व अगदी अलीकडील काळातील संस्कृत व प्राकृत ग्रंथ घेतल्यास त्यात युद्धाचीं रम्य वर्णनें, वीरांचे पराक्रम, धर्मयुद्धाचे नियम, सैन्याचीं हालचाल, व्यूहांची रचना इत्यादि गोष्टी आपणांस पदोपदी पाहावयास मिळतील. त्याचप्रमाणें कित्येक ठिकाणचीं पराक्रमाचीं वर्णनें वाचण्यास तीं खरोखर कपोलकल्पित आहेत असें वाटल्याशिवाय राहणार नाही. परंतु ज्या देशात बलभीम, अर्जुन, भीम, बली, सगर, परशुराम इत्यादि पौराणिक योद्धे होऊन गेले त्यांच्या अनुमानावरून हीं वर्णनें खोटीं आहेत असें मानणें म्हणजे फारच धाड-

सावें होईल. दुसरी गोष्ट अशी कीं, आर्यांनीं जेव्हा हा देश पादाक्रान्त केला त्या वेळचीं सुस्थिति, विपुलता, निर्भयता, स्वातंत्र्य वगैरे अनुकूलता लक्षांत घेतली असतां असे पराक्रमी पिंड पोसणार नाहींत असें तरी कां मानावें ? (वसाहतींच्या भागांत सांगितल्याप्रमाणे) ज्यांनां त्या वेळीं ज्ञात असलेलें सर्व जग पादाक्रांत केलें, त्यांचे पराक्रम असामान्य असल्यास आश्चर्य काय ? सबब कविकल्पनांवें अवगुंठन काढून टाकल्यास जो भाग राहिल तो तत्कालीन योध्यांच्या वर्णनाचा; व असा भाग कांहीं सामान्य प्रतीचा राहील असें कोणाही विचारी माणसास वाटणार नाहीं. हल्लीं मात्र सर्व भूतलावर वसाहति स्थापणें म्हणजे धाडसावें व कौशल्याचें शतकृत्य असे मानलें जावें, आणि तत्कालच्या सिद्ध गोष्टी मात्र सब झूट म्हणून झिडकारिल्या जाव्या हा कोण जुलूम, पक्षपात व वृथाभिमान ? जर हे दुर्गुण टाकून निर्मल दृष्टीने आपण प्राचीन इतिहासाकडे पाहिलें तर त्या काळच्या वीरांचे लष्करी पराक्रम, नाविक कौशल्य, दर्यावर्दी धाडस, व्यूहरचनाचातुर्य इत्यादि गुण आपल्या डोळ्यात भरल्याशिवाय राहणार नाहींत. त्या वेळचे व्यापारी किती दूरच्या दर्यावर्दी फेऱ्या करीत व अगणित संपत्ति आणीत हें पाहिलें म्हणजे तत्कालीन राजाजवळ नाविक बल असलें पाहिजे, व त्याच्याच मदतीने ते अशा व्यापाराचे रक्षण करीत असावे हें आपणास दिसून येईल. मनु व स्ट्रॅबो या दोघाच्या ग्रंथात असे नाविक बल व सरकारच्या अठरा कारखान्यांपैकी नाविक कारखाना असल्याचें दिसून येतें. अर्थात हे ज्ञान लोकामध्य रूढ होण्यास त्या कालीं कांहीं साधने असलीं पाहिजेत. राजाकडून शिक्षण मिळो, व्यापारी स्वतःच्या हिंमतीवर प्रत्यक्ष सकटाशी तोड देऊन व्यापाराने राष्ट्राची संपत्ति वाढवून अनुभविक शहाणे बनोत अथवा कांही ग्रंथ असोत, कोणत्या हि का रीतीनें होईना; लोक युद्धशास्त्रात व दर्यावर्दी युद्धात प्रवीण होते एवढी गोष्ट खरी. भारतभूमीच्या व वसाहतींच्या राज्याचें दान ईश्वराने त्याच्या हातावर सोडले असें कांहीं कोणासच मानता येणार नाहीं. शिवाय जरी धनुर्वेद हल्ली लुप्त आहे तरी त्याचे नाव सर्वतोमुखा असता भलतेच अनुमान करणे केव्हाही शहाणपणाचें होणार नाहीं. मात्र महाभारतात, अग्निपुराणात व इतर ग्रंथात या विषयावर व्याख्यान रूपाने कोठे कोठें काही माहिती आली आहे त्यावरून पूर्वी असा एक ग्रंथ असावा, त्यात इतक्या प्रकारचे विषय प्रतिपादलेले असावे असें खात्रीलायक मानता येतें. यासंबंधाने डॉ. हंटर म्हणतो की. "सैन्याच्या हालचाली, रचना, तळ, सैन्यपुरवठा यासंबंधी सविस्तर नियम असून

त्यांपैकीं बरेच महाभारतांत दिलेले आहेत." दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी कीं, त्या वेळीं सैन्याचें आधिपत्य प्रत्यक्ष राजांच्या हातीं असून युद्धाचा बराबाईट परिणाम त्यांच्या धोरणावर, कौशल्यावर, रणविद्येवर व पुढारीपणावर अवलंबून असे. परंतु राजे लढाईंतून नामोहरम होऊन परत आल्याचीं उदाहरणें फारच क्वचित् आढळतात. कारण अशा राजास त्याच्या आया, बहिणी व पत्नी तोंड दाखवूं नका असें साफ उत्तर देत. सबब हा घरांतील अपमान पत्करण्यापेक्षा रणशय्येवर अखेरच्या प्रसंगी पडणेंच त्या काळच्या वीरास ज्यास्त श्रेयस्कर वाटे. आणखी जे राजे असे पराक्रम करीत, व अखिल पृथ्वीचे राज्य जिंकून राजसूय यज्ञ करीत त्यास लष्करी शिक्षण मिळत नसेल असें कसें म्हणता येईल? उलट तो एक क्षत्रियाच्या शिक्षणातील महत्त्वाचा भाग असे असें आपणांस पुराणावरून दिसतें. गुरुगृहीं ही विद्या त्यास शिकविली जाई. राम व इतर राजपुत्र विश्वामित्रापाशी धनुर्विद्या शिकले; लहुकुशास वाल्मीकीने पढविले, पांडवांचा गुरु द्रोण असून त्याने ती विद्या परशरामापासून घेतली होती इत्यादि गोष्टी उघड उघड दिसत असतां लष्करी शिक्षणाची उपेक्षा होत होती असें कोणासहि म्हणता येणार नाहीं. सबब ते कसें दिले जात असे, त्यात कोणकोणत्या अस्त्रांचा उपयोग होत असे ते पाहूं. हिंदू लोक युद्धाच्या कामीं ज्या युक्त्याप्रयुक्त्या योजीत त्या फारच महत्त्वाच्या आहेत हिंदु लोक सैन्याची विभागणी खालीं दिल्याप्रमाणें करीत.

(१) उरस्, (२) कक्षा, (३) पक्ष, (४) प्रालिग्रह, (५) कोटी, (६) मध्य व (७) पृष्ठ.

विभागणी केल्यानंतर शत्रुपक्षाच्या हालचाली, सामर्थ्य, स्थलाची अनुकूलता इत्यादि पाहून निरनिराळ्या विभागाची मांडणी व आखणी करावी लागत असे. विभागाचे रचनेस व्यूह असे म्हणत. त्याचे दोन प्रकार आहेत. (१) मध्यभेदी व (२) अंतर्भेदी. या शिवाय त्याचे पोटभेद दिलेले आहेत व त्यांचीं नांवें आकारसादृश्यावरून ठेवलेलीं आहेत. पहिल्या व्यूहाचे सहा प्रकार आहेत. (१) मकरव्यूह, (२) श्येनव्यूह, (३) शकटव्यूह, (४) अर्धचंद्र, (५) सर्वतोभद्र (पोकळ चौरस), व (६) गोमूत्रक.

दुसऱ्या भेदाचे चार प्रकार आहेतः—(१) दण्ड, (२) भुज, (३) मंडल, व (४) असंहत. यांखेरीज पोटभेद आहेत.

उदाहरणार्थ दंडाचे सतरा, भुजाचे पांच व मंडल आणि असंहत यांचे आणखी बरेच पोटभेद आहेत. अशा रीतीने सर्व युद्धरचना शास्त्रोक्त असे. परंतु पुष्कळ वेळां सेनापतींच्या कल्पकतेवरून व परिस्थितींच्या मानाने आणखीहि प्रकार उपयोगात आणावे लागत. ज्याप्रमाणे जरूरी भासते व अडचणी जास्त येतात त्याप्रमाणें दुसरे उपाय योजणें भाग पडते. अशा रीतीनें शास्त्राची वाढ होत असते. शास्त्रांची वाढ खुंटली म्हणजे राष्ट्राची अवनति खास सुरू झाली असे समजावे. हाच न्याय आपणांस महाभारतकालीं दिसतो. त्या वेळीं हिंदू राष्ट्रात चैतन्याचें वारें पूर्ण खेळत होतें. अर्थात् मागील लोकांनी आपल्या अनुभवानें घालून दिलेले नियम त्या कालीं पुरे पडेनात. उदाहरणार्थ युधिष्ठिरानें अर्जुनास सूर्वी. मुखव्यूह रचण्यास सांगितलें असता अर्जुनाने वेळ प्रसंग पाहून वज्रव्यूहाचा उपयोग केलेला दिसतो व दुर्योधनानें त्यावर अभेद्यव्यूहाची तोड योजलेली दिसते. परंतु पुढें हिंदू राष्ट्राच्या ऱ्हासास प्रारंभ झाल्यावर स्वतंत्र कल्पनाशक्ति नष्ट झाली व याचाच परिणाम वडिलांच्या संपत्तीवर अल्पसंतुष्टपणें लोक समाधान मानूं लागले. हा न्याय सर्वत्र सारखाच लागू असलेला दिसतो.

सैन्याचे मुख्यतः चार प्रकार असतः—(१) अश्वदल, (२) गजदल, (३) रथदल, आणि (४) पदाति. गजदलाचा उपयोग मेकॉलेनें म्हटल्याप्रमाणे सजीव लोह—दंडासारखा. शत्रूच्या संरक्षणसाधनाचा संहार व चुरा करण्याच्या कामीं करीत. प्रो. मॅक्समुंकर म्हणतो कीं, " चंद्रगुप्तानें सेल्यूकसला गज-बल दिलेलें होतें व त्याच्या जोरावर त्यानें ॲंटीगोनस वर फ्रिजियामध्यें इप्सस येथें विलक्षण जय मिळवून सीरिया व आशियामायनर हे प्रांत काबीज केले." टेसियसच्या (Ctesias) मताप्रमाणें हिंदुस्थानातील हत्तींच्या जोरावर सीरस (Cyrus) चा पराभव होऊन तो मारला गेला.

आता यापुढें हिंदू लोकाच्या लष्करी गुणांचें थोडक्यात कथन करूं. युद्धाच्या कालीं जिवाची पर्वा न धरता शत्रूवर तुटून पडणें, कधीं माघार न घेणें, धन्याकरिता वाटेल ते हाल सोसणें, नेकी, इमान, सोशिकपणा, कर्तव्यदक्षता, साहस, पराक्रम, धैर्य, मितपणा इत्यादि गुण प्रमुखपणें पाळले जात. अर्काटच्या वेळ्याच्या वेळीं हिंदू शिपायानीं दाखविलेला दिलदारपणा सर्वश्रुतच आहे. दुसरें उदाहरण १७८२ सालच्या टपूवरोबरच्या लढाईतलें आहे. सेनापति मेंध्यू सर्व शिपायांसह शत्रूच्या हातात सांपडला होता त्या वेळीं बाहेरच्या शिपायांनी हरतऱ्हेनें व कोणत्याहि संकटास न जुमानता आपल्याजवळची प्रत्येक पै किल्लयांत

पाठविण्याची शिकस्त केली व त्यांस सांगून पाठविलें कीं, "आमचें कसेंहि होईल, आम्हांस काय वाटेल ते चालेल; परंतु आपले मात्र मासाशिवाय चालणार नाहीं. सबब आम्हीं आपल्या शक्तीप्रमाणें मदत पाठविली आहे त्याचा स्वीकार करावा." शांततेच्या काळीं परकी राजकर्त्यांच्या मुखातून व परकी लेखकांच्या लेखणींतून अशा प्रकारच्या गुणांचे वर्णन होतें तेव्हां त्यांत सत्यता असेल याबद्दल कोणासच शंका घेण्यास जागा नाहीं. युद्धाच्या धुमश्चक्रींत आपल्या सैन्यास त्वेष व स्फुरण यावें म्हणून कोणीही परकी अथवा स्वजातीय सेनापति काय वाटेल ते प्रशंसापर उद्गार काढतील, परंतु युद्धाच्या उष्णतेबरोबर अशा प्रलापांतील गरमपणाही थंड होतो. शांततेच्या थंड काळीं लेखकाच्या थंड डोक्यातून धन्यवादाचे उष्ण विचार व शब्द जेव्हा बाहेर पडतात तेव्हां मुळांत लेखकाच्या मेंदूवर अशा गुणांनी खोल परिणाम केला असला पाहिजे असें मानल्यावाचून गत्यंतरच रहात नाहीं. अशा लेखकांपैकीं सर चार्लस नेपियर, सेनापति वूल्से, एल्फिन्स्टन, क्राइव्ह, लॉरेन्स, स्मिथ, कूट, हॅलिबर्टन इत्यादि प्रमुख होत.

अशा पराक्रमी हिंदूंचीं हत्यारें काय होतीं हे जाणण्याची प्रत्येकास जिज्ञासा असणें अगदीं स्वाभाविक आहे. साधारणतः प्राचीन कालीं धनुष्याचा उपयोग सर्वत्र हीन असलेला आपण पाहतों; परंतु हिंदूंची धनुर्विद्येंत फारच गति होती असें दिसतें. एका धनुष्यामधून एकाच वेळीं चार ते नऊ बाण सोडल्याचें प्रो. विल्सन सांगतो. अशा रीतीचें धनुर्विद्यानैपुण्य प्राचीन हिंदूंत सर्वत्र दिसतें. अर्जुनासारखे धनुर्धर. पृथ्वीराजासारखे शब्दवेधी, मत्स्यवेधी, अचुक नेम मारणारे कसलेले तिरंदाज, आपले बाण परत आणणारे पटु तिरंदाज सर्वत्र असत. आस्ट्रेलियन रानटी लोकांत 'बूमरँग' नावाचें फिरून मागें येणारें बाणासारखें हत्यार पाहिल्यानंतर युरोपीयन लोकांची खात्री झाली. तोपर्यंत त्यास हिंदू लोक आपले बाण काम झाल्यानंतर परत घेत ही गोष्ट सुद्धा वेडेपणाची कल्पना आहे असें वाटे. दुसरें अतिशय उपयोगांत असलेलें हत्यार म्हणजे तरवार होय. त्याची परकीयांस इतकी भीति वाटे व हिंदू लोक इतक्या कुशलतेनें याचा उपयोग करीत कीं, त्याचें नांव सर्व लोकांत महशूर झालें आहे. या तरवारींच्या निष्ठुर व कौशल्यपूर्ण उपयोगावरून इतर भाषांत तद्दर्शक शब्दप्रयोग रूढ झाले आहेत. उदाहरणार्थ एक फारशी म्हण घेऊं. ती अशी आहे कीं, हिंदू उत्तर देणें म्हणजे हिंदुस्थानांतील तरवारीनें जखम करणें. त्याचप्रमाणें एका 'सोबाब मो आलक' या प्रख्यात अरबी काव्यांत असें म्हटलें आहे कीं, " जवळच्या नात-

लगाचा जुलूम हा हिंदू तरवारीच्या घावापेक्षा फारच कडक व वेदनादायक आहे."

वरील दोन्ही परकीय भाषेतील अवतरणावरून एवढे अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, हिंदू तरवारीची चव परकीयांस मिळाली असली पाहिजे. ज्या अर्थी भाषेमध्ये एवढा शब्दप्रचार रूढ होण्यापर्यंत मजल गेली त्या अर्थी हिंदूंनीं आपली तरवार कशी गाजविली असेल, त्याचा दरारा केवढा असेल, परकीय लोक त्यास प्रथम कसे चळचळा कापत असतील, यांचा त्यावरून यथार्थ कल्पना होईल. हीं जशीं पराक्रमाचीं गोष्ट झालीं तशीं या हिंदू हत्याराचे पाणी व धातु हीं सुद्धां उत्कृष्ट असत. कित्येक वर्षें त्याजवर गंज चढत नसे. त्यांचा उपयोग होत असताना तीं सहसा मोडण्याची भीति नसे; अशा तऱ्हेनें धातूची कमाई केलेली असे. वर दिलेल्या दोन हत्याराशिवाय आणखीहीं पुष्कळांचा ते उपयोग करीत. त्यांचे मुख्यतः पांच वर्ग कल्पिलेले आहेत:—(१) यंत्रमुक्त—यंत्राच्या अगर कळीच्या साह्याने फेकलेली अस्त्रे, (२) हस्तमुक्त—हातानें फेंकलेली, (३) मुक्तामुक्त—जंबिया, त्रिशूल, (४) तरवार, गदा वगैरे, (५) नैसर्गिक—मूठ वगैरे. या खेरीज पुराणकालीं भिंदिपाल, तोमर, नाराच, परशु, कृपाण, क्षेपणी, पाश इत्यादि हत्यारें उपयोगात असत.

साप्रतच्या युद्धांतील वरील हत्यारांशिवाय तोफ हे एक विशेष हत्यार आहे. प्राचीन काळी दारूचा उपयोग हल्लींइतका होत नसे हीं गोष्ट खरी; म्हणून धुराची दारू प्राचीन लोकांस मुळींच माहीत नव्हती असे म्हणणे निव्वळ वेडेपणाचे होईल. युरोपीयन लोकांची हीं समजूत आहे व आपणच कायते धुराच्या दारूचे शोधक असा त्यास फार अभिमान आहे. परंतु प्राचीन ग्रंथांतील उताऱ्यावरून आपणास तिच्याविषयीं कांहीं माहिती मिळाल्यास पाहूं. प्रत्यक्ष महाकाव्यातून व पुराणांतून वाटेल तेवढीं उदाहरणें देता येतील. मात्र एवढे खरें कीं, पूर्ण खात्रीलायक शास्त्रीय ग्रंथ लुप्त झाल्याने आपली तहान अशा रीतीने निवडलेल्या असंबद्ध श्लोकावर व वाक्यावर भागवून घ्यावी लागते. परंतु या गोष्टीस इलाज नाहीं. असें जरी आहे तरी या तुरळक व तुटक माहितीवरून ही कला प्राचीन कालीं बरीच वाढीस लागली होती असे स्पष्ट दिसतें. प्रथम मध्ययुगाकडेच दृष्टि पोंचवूं. त्या वेळीं तोफा व बंदुका याचा उपयोग सरास होत असे. 'पृथ्वीराज' ग्रंथांत २५ व्या श्लोकांत म्हटले आहे कीं, 'तोफा व बंदुका याचा आवाज दहा कोस ऐकूं गेला.'

नृप पंग नयर लूटे अराब । कोटह कंगूर चढि चढि सिताब ॥
जंबूर तोप छूटही झनंकी । दश कोश जाय गोला भनंकि ॥
सिरदार मार बाराह रोह । लंगी अभंग वर हनै कोह ॥

अयोध्येच्या राजाच्या दरबारीं असलेला राजा कुंडनलाल नामक हिंदु इतिहासकार म्हणतो कीं ' लिच्छम ' नामक एक फार मोठी तोफ अयोध्येमध्यें होती. पण यापूर्वी ती अजमीरच्या महाराजापाशीं होती. टपालाची पद्धत व खातें असून युद्धशास्त्राबद्दलही त्यानें माहिती दिली आहे. (मुताखाब टाफसी–अल अखबर पान १४९–५०)

मार्फी म्हणतो कीं," अग्न्यस्त्रांचा उपयोग करण्यांत हिंदूंची पोर्च्युगीज लोकांवर फार कडी आहे. " फरि आई सुझा म्हणतो कीं, पोर्च्युगीज लोकावर तोफानीं हल्ला करणारें एक हिंदी जहाज आपण पाहिले आहे. १५०२ सालीं कालिकत बंदरात अशीच जहाजें होती व १५०३ सालीं ३८० तोफांनीं झामोरिनच्या लोकांना हल्ला केला. "

यापुढें प्राचीन कालाकडे वळून तोफखान्यासंबंधी कांही माहिती मिळाल्यास पाहूं. महाकाव्यें व पुराणें वाचीत असतांना आपणांस अस्त्र हा शब्द फार आढळतो. उदाहरणार्थः—रामास निरनिराळी अस्त्रें देतांना विश्वामित्र खालील दोन अस्त्राचा उल्लेख करतो.

आग्नेयमस्त्रन्दयितं शिखरन्नाम नामतः । (रामायण.)
आग्नेयमस्त्रं लब्ध्वा च भार्गवात्सगरो नृपः ।
जिगाय पृथिवीं हत्वा तालजंघान्सहैहयान् ॥ (हरिवंश)

" भार्गवापासून आग्नेय अस्त्र मिळवल्यानंतर सगर राजाने पृथ्वी जिंकली व तालजंघ आणि हैहय यांना ठार मारिलें. "

उर्वस्तु जातकर्मादि तस्य कृत्वा महात्मनः ।
अध्याप्य वेदानखिलांस्ततोस्त्रम्प्रत्यपादयत् ॥
आग्नेयन्तु महाबाहुरमरैरपि दुस्सहम् ।
स तेनास्त्रबलेनाजौ बलेन च समन्वितः ॥

अर्थः—त्या महात्म्याचा जातकर्म उर्व ऋषीनें करून त्याजकडून वेदाभ्यास करविला व नंतर देवांना सुद्धां असह्य असें जे आग्नेय अस्त्र ते त्यास दिलें. अशा तऱ्हेनें चतुरंग बल व अग्न्यस्त्र यांनीं युक्त असा तो राजा राम युद्धामध्ये सज्ज असे.

ब्रह्मास्त्र या शब्दाचा उपयोग संस्कृत ग्रंथामधून वारंवार केलेला पहावयास मिळतो.

प्रोफेसर विल्सन आपल्या संस्कृत कोशात त्याचा अर्थ ब्रह्मापासून (ब्रह्म-शब्दापासून) निघालेलें जे काल्पनिक अस्त्र त्यास ब्रह्मास्त्र असे म्हणतात असा देतो.

श्रीमद्भागवतांत द्रोणपुत्र व अर्जुन याचे ब्रह्मास्त्राने झालेले युद्ध वर्णिले आहे.

रेव्हरंड बानर्जी म्हणतो कीं, ब्रह्मास्त्र म्हणजे आधुनिक तोड्याची बंदूक होय.

क्लॅव्हट्स्की म्हणतो कीं, "प्राचीन काली हिंदु लोक अग्न्यस्त्राचा उपयोग करीत नसत असे म्हणता येणार नाहीं."

काश्मीरचा राजा व हल याच्यामध्ये युद्ध झाल त्या वेळीं मातीचे हत्ती करण्यात आले व ते योग्य प्रसंगी फुटून तिकडे तिकडे धूर झाला असे लिहिले आहे. यावर टीका करताना एलियट लिहितो कीं, फक्त आपोआप भडका उडाला असे कसे होईल? त्याकरिता काहीं तरी ज्वालाग्राही पदार्थाची योजना केली असली पाहिजे.

अरिस्टाटल यास पाठवलेल्या पत्रात अलेक्झांडर लिहितो कीं, "हिंदुस्थानात माझ्या सैन्यावर भयंकर ज्वालायुक्त पदार्थ पडले."

त्याचप्रमाणे थॉमस म्हणतो कीं, "हिंदुस्थानांतील ब्राह्मण दूर उभे राहून जळणाऱ्या व गर्जना करणाऱ्या हत्यारांना लढतात."

वरील उदाहरणावरून स्पष्टपणे एवढेच दिसते कीं, हिंदु लोक अशा अग्निमान अस्त्रांचा भरपूर उपयोग करीत. मात्र परदेशीय लोकास त्याचा उपयोग माहीत नसल्याने त्याचा फार संहार होई व त्यास अत्यंत विस्मय वाटे. प्रो. विल्सन म्हणतो कीं, "अशाच अस्त्रांपैकीं एक वज्रास्त्र म्हणून असे. त्याचा उपयोग दूर अंतरावर असलेल्या पदार्थांचा नाश करण्याच्या कामी केला जाई. त्यास गति मिळण्यास दारूसारखा गतिदायक काहीं तरी पदार्थ असला पाहिजे यात संशय नाहीं." याशिवाय वैद्यक ग्रंथ वाचले असता दारूची कृति आर्यांस माहीत नसावी असें मुळींच म्हणता येणार नाहीं. ज्या देशांत सोरा, गंधक व कोळसा हे दारूचे घटक मुबलक सांपडतात व ज्यांच्या वैद्यक ग्रंथात सर्व खनिज पदार्थांचे सूक्ष्म विवेचन केलेलें आढळते त्यास या प्रत्येक अथवा तिघाच्या मिश्रणाचा ज्वालाग्राही धर्म माहीत नसेल असे मुळींच मानता येणार नाहीं. सबब हिंदुस्थानांत अस्त्रे होतीं, त्याच्या कामी दारूचा उपयोग करीत हे मागें सांगितलेले

अनुमान सिद्ध आहे असें मानण्याशिवाय इलाज नाहीं. वर दिलेल्या अनुमानापेक्षां जास्त स्पष्ट पुरावा रामायणांत मिळतो.

अयोध्येचे वर्णन करताना व इतर ठिकाणींही असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, ज्याप्रमाणें स्त्रियास दागिने त्याप्रमाणें नगरीस गोपुरें व प्रासादतले असतात. त्याचें संरक्षण करण्यास तोफांची फार जरूरी आहे व त्या तटावर ठेवलेल्या असत.

पुराणांतरीं युद्धाचे व किल्ल्याचे वर्णन करतांना तोफाना शतघ्नी असें म्हटले आहे. शतघ्नी म्हणजे शंभराना मारणारी. संस्कृत कोशामध्ये जें यंत्र लोखंडाचे लहान गोळे अथवा इतर पदार्थ फेकून शेंकडो माणसे मारतें त्यास तोफ असें म्हणतात अशी शतघ्नीची व्याख्या दिली आहे; व तिला वृत्रघ्नी, काली असेही म्हणतात.

शतघ्नी व इतर त्याच जातीचीं यंत्रे रामायणांतील खालील श्लोकात सांगितली आहेत.

सर्ग.....	.....श्लोक.
३	१२, १३, १६, १७.
४	२३.
२१	शेवटचा.
३९	३६.
६०	५४.
६१	३२.
७६	६८.
८६	२२.

शतघ्नी लोखंडाची केलेली असून तिचा आकार झाडाच्या लट्ट फांद्या अथवा खोडं यासारखा असतो असें सुंदरकांडात म्हटले आहे व पुढेही त्याच काव्यात अशा तोफा केवळ किल्ल्यावर चढवून ठेवावयाच्या नसून त्या रणांगणावर ओढून नेतात असें म्हटले आहे. रामायणाशिवाय पुराणात निरनिराळ्या ठिकाणी तोफा व बंदुका याना ' सहस्रघाती ' ' उल्हाट यंत्रे ' अशी नावे दिलीं आहेत.

" राजपुरुषानें (Magistrate) विषयुक्त हत्यारे, तोफा, बंदुका, अस्त्र अथवा एकादे कपटयंत्र यांच्या साहाय्याने युद्ध करूं नये " या हिंदुधर्मशास्त्रातील वाक्यावर टीका करताना हालहेड म्हणतो की, " अलेक्झांडर यास हिंदु-

स्थानांत तोफा व बंदुका ही हत्यारें पहावयास सांपडली ह्या आजपर्यंत भ्रामक वाटणाऱ्या विधानावर यापुढे लोकांचा विश्वास बसूं लागेल. हिंदुस्थान व चीन या देशांत फार प्राचीन काळापासून दारूचा उपयोग माहीत आहे. अग्न्यस्त्र म्हणजे वेळूच्या एकाद्या नळींतून सोडलेला अग्निमुखाचा बाण. पूर्वी याच्या पुष्कळ तऱ्हा होत्या. त्यांपैकी एक चमत्कारिक अशी होती कीं, 'हे अस्त्र सुटल्यादर त्याचे हवेंत पुष्कळ विभाग पडत. असे विभाग पडल्यादर तें एकाद्या झाडाच्या फादीसारखे दिसे. त्यांतील प्रत्येक भाग पेटलेला असून तो विझवणें फार अवघड जात असे;' परंतु अलीकडे हे हत्यार नष्ट झालें आहे. या सर्व हत्याराचा शोधक विश्वकर्मा होता असे म्हटले आहे."

हिंदुस्थानचा परराष्ट्रीय मंत्री एलियट (१८४५) यानें प्राचीन काळीं हिंदुस्थानात अस्त्राचा उपयोग लोक कसा, कोठें व कितपत करीत असत, त्याचें स्वरूप कोणत्या प्रकारचें होतें, तीं उडावेण्याची पद्धत काय होती, इकडी अंतरावरून तीं सोडलीं जात वगैरे सर्व गोष्टींची चर्चा केल्यावर शेवटी म्हणतो कीं, "गंगाकाठच्या प्रदेशात निसर्गसिद्ध सोरा (Saltpetre) व उत्तर हिंदुस्थानात गंधक मुबलक सांपडत असल्याने व ह्या पदार्थांच्या ठिकाणीं भडका होणें, पेट घेणें वगैरे सहजप्राप्त धर्म असल्याने त्याचा अस्त्रांच्या कामी उपयोग केला जात असे असें म्हणण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. अथवा हिंदुस्थानांत हे पदार्थ मूबचे विपुल असल्यान त्यापासून अशा अस्त्राची युक्ति सुचली असावी असे हिंदूंच्या इतर सर्व विद्या व कला याबद्दल मानण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं."

येथपर्यंत तोफा, बंदुका वगैरे सर्व प्रकारची दग्ध्युत्पादक अस्त्रे याविषयीं चर्चा केली. यानंतर अस्त्रासंबंधी काही माहिती मिळाल्यास पाहूं. मूळचे शास्त्रग्रंथ लुप्त झाल्यानें हिंदुस्थानात प्राचीन काळीं येऊन राहिलेले परदेशीय ग्रंथकार काय म्हणतात याजवर एकाद्या भिकाऱ्यासारखें विसंबून रहावें लागतें. त्यांची माहिती सर्वस्वी विश्वसनीय आहे असे म्हणण्याचा आमचा कटाक्ष नाहीं. उलट आम्ही असें म्हणतों कीं, त्यास भाषेच्या अडचणीमुळें, देशस्थिति, चालिरीती, अल्पकालीन राहणें या सर्व गोष्टींमुळें विश्वसनीय माहिती मिळणें कठीण; परंतु त्याचे लेख म्हणजे इतिहास व आमचीं पुराणें म्हणजे ब्राह्मणानीं रचिलेलीं थोतांडे, त्यांस शास्त्रीय ग्रंथाची किंमत देणें अयोग्य, असा अलीकडे समज प्रस्त होत चालल्यामुळें अशा आक्षेपकाचें समाधान सुदर्णकार— कर्णछिद्र न्यायानें करणें बरें

अशी आमची समजूत असल्यामुळें विशेषतः परदेशीय लेखकांचेच उतारे आम्ही उद्धृत करतों.

टेसियस, एलेयन, फिलॉस्ट्रेटस, लासेन, युसेबी, सालबर्टी इत्यादि सर्व ग्रंथकार प्राचीन कालीं हिंदु लोक युद्धाच्या कामीं दाहक पाण्याचा उपयोग करीत असें नमूद करतात. या दाहक जलाचे घटकावयव काय होते हें नक्की माहीत नाहीं; परंतु शत्रूंचीं नगरें, किल्ले, वाहनें, हत्यारें व लोक यांचीं जाळून राखरांगोळी करण्याच्या कामीं त्याचा उपयोग होत असे असें त्यानीं म्हटलेलें आहे. असतु.

वरील सर्व निरूपणावरून वाचकाच्या लक्षात एक गोष्ट आली असेल की, अर्वाचीन अत्यंत सुधारलेल्या युरोपियन युद्धशास्त्रास मात करणारी अशी एक विद्या प्राचीन कालीं भारतीय आर्यांस अवगत होती व याच गोष्टीमुळें त्याचे महत्त्व प्राचीन कालापासून लोक मान्य करीत आले आहेत. ती विद्या म्हणजे अस्त्रविद्या होय; व तिचा उपयोग चालू काळातील शिपाईगड्यास, रणधुरंधर सेनापतीस, रणगाजी महायोद्ध्यास माहीत नाही याबद्दल प्राचीन हिंदु लोकांचा त्यांस हेवा वाटावा हें अगदीं साहाजिक आहे. वर सविस्तर वर्णन केलेल्या दोन अस्त्राखेरीज धूमास्त्र, वायव्यास्त्र, वर्षास्त्र अशी अनेक अस्त्रें प्रचारांत होतीं. त्या योगाने शत्रूच्या बलावर, धुराचा, पावसाचा, वायूचा चोहोकडून मारा करून त्याची दृष्टि मंद व जड केली जात असे. हवेमध्ये नाना तऱ्हेचे विषारी पदार्थ, अनेक आकृतींचीं भयंकर जनावरें, हिंस्र पशु, नाग वगैरे प्राणी मिसळून दिले जात; त्यामुळें त्यास डोळे उघडण्याची छाती होत नसे. विषारी व रोगट धुरामुळे त्याचे घसे गुदमरून श्वास कोंडत असे. कधीं कानठळ्या बसविणारे असह्य ध्वनि एकदम उठत तर कधी एकाएकीं महापूर आणणारा जलौघ दृष्टीस पडे. कधी कधीं तर निबिड अंधकार सर्वत्र पसरून शत्रु कोण, मित्र कोण याची ओळख पडेनाशी होई. कधीं कधीं विजाचा कडकडाट होऊन सर्व शत्रुसैन्य गर्भगळीत होत असे; अशी एक ना दोन अनेक अस्त्रे प्रसंगावेशेषी उपयोगात आणलीं जात. दुसऱ्या बाजूने सोडलेली अस्त्रे पाहून एकमेक निवारक व प्रतिबंधक अस्त्रे सोडीत. रामायण, कार्तिकमाहात्म्य व इतर पुराणे या ग्रंथांत अशा प्रकारच्या अस्त्राच्या अनेक मौजा सांगितल्या आहेत.

शेवटीं प्राचीन युद्धाच्या एका अंगासंबंधीं दोन शब्द लिहून हें प्रकरण पुरे करूं. राम पुष्पक विमानांत बसून अयोध्येस परत आले, पुण्यवान लोकांना देव विमानें

पाठवीत, तुकाराम सदेह विमानांतून वैकुंठास गेले वगैरे प्रकारच्या अनेक गोष्टी आपण पुराणांत वाचतो व ऐकतो. देव-दानवांचें युद्ध चाललें असतां कित्येक वेळां रणसंग्राम विमानांतून हवेंत चाले असेंहि वाचल्याचें प्रत्येकास आठवेल. आता हा प्रकारसुद्धां हिंदूंच्या सुपीक मेंदूचें एक फळ होय असे अगदीं कालपर्यंत सर्व पंडितांस वाटत नसे; परंतु महायुद्धानें ज्या अनेक खुळचट समजुतींचा निरास केला त्यापैकींच ही एक होय. समुद्रसंचार करणें ही गोष्ट सुद्धा एका काळीं अशक्य कोटींतलीच समजली जात असे; परंतु जगच्छिक्षक कालाने हळुहळू ती गोष्ट खरी करून दाखविली व पुढे पुढे त्या गोष्टींचें लोकास काहींच वाटेनासें झालें आणि भूप्रवास व जलप्रवास सारखेच वाटूं लागले.

भूभागाप्रमाणेंच जलपृष्ठावरही राष्ट्रीय मालकी प्रस्थापित करण्याची धडपड निरनिराळ्या राष्ट्रामध्ये चालू झाली व त्यांचेंच महायुद्ध हें दृश्य चिन्ह होय. ह्या युद्धात कल्पनागोचर विमानाचा प्रत्यक्ष उपयोग होऊं लागला व पुढे काही कालाने वातावरणावरही सत्ता स्थापण्याकरिता राष्ट्राराष्ट्रामध्ये चढाओढ लागली व त्यामुळें यापुढें युद्धशास्त्रामध्यें क्रांति होऊन आजपर्यंतचे सर्व समज बदलून जाऊन लोकांच्या जीवनक्रमावर सुद्धां याचा परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही, असे दिसतें. आम्हास जें काही सांगावयाचे आहे तें हेंच कीं, प्राचीन हिंदु लोकांच्या कल्पना जगास एकदम पचनी पडत नाहीत; कारण आर्यांची शक्ति व इतर जगाची शक्ति यामध्यें फार तफावत असल्याने एकाचा आहार दुसऱ्यास न मानवल्यास कांही आश्चर्य नाहीं. परंतु आजपर्यंत सर्व जगास इतर गोष्टी पचनी पडण्यास इतका काळ लागला त्याचप्रमाणें ही विमानाची युक्तिसुद्धा सर्व जगास पटून आर्यबुद्धीचे कौतुक करण्यात व त्याच गुणानुवाद गाण्यात सर्व जगास धन्यता वाटेल असा एक दिवस उजाडल्याखेरीज राहणार नाही अशी आमची खात्री आहे. अर्वाचीन हिंदूंनीं कालाप्रमाणें योग्य फरक आचरणात करून, बाकी पूर्वजांच्या पावलावर पावलें टाकीत चाललयास, ज्याप्रमाणें पूर्वजांची जीवनयात्रा क्षेमकर, सुखकर, कीर्तिप्रद झाली, त्याप्रमाणें आमचीहि झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र त्याच्याप्रमाणें आध्यात्मिक जीवन ठेऊन निष्कलंक आचरणाने, अचाट तपश्चर्येन, अंतर्बाह्य शुचिर्भूतपणानें वागण्याचें असिधाराव्रत त्यानीं सांभाळले पाहिजे.

प्रकरण ९ वें.

संगीत व इतर शास्त्रें.

चिनी लोक संगीताला राजशास्त्र (शास्त्राणाम् राजा) असें मानतात. संगीताचा उद्भव मनुष्याच्या वृत्ति अगदीं तल्लीन असतात तेव्हांच होतो. सांसारिक काळजींच्या काचणीतून मनुष्याचें मन पूर्ण स्वतंत्र असतें, बाह्य परिस्थितीच्या एखाद्या आघातानें मनाची आनंदीवृत्ति जागृत होते, त्या वृत्तीचा विचारशक्तीवर पूर्ण अंमल बसतो सजीवतेचा वायु फक्त त्या एकाच वृत्तिरूप नलिकेच्या द्वारें बाहेर पडतो, अथवा क्षणभर मनुष्यामधील अहंभाव नष्ट होऊन त्या भावनेशीं जेव्हा तो तद्रूप होतो, अशा प्रशांत, एकांत व समाधीच्या वेळीं त्याच्या मुखावाटे जे ध्वनि बाहेर पडतात तेंच शुद्ध संगीत होय. अशा संगीताला इतरत्र तोड मिळणें अशक्य आहे. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे वेद होय. वेदांना जें इतकें महत्त्व आलें आहे त्याचें कारण हेंच होय. वेदांना अपौरुषेय म्हणतात व अत्यंत विशुद्ध गीतांचें भाण्डार म्हणतात, यांचे कारण वेदद्रष्ट्या ऋषींची समाधियुक्त मानसिक स्थिति व एकतानता. मनुष्य जेव्हां अहंभाव विसरून परमात्मज्ञानामध्ये गर्क होतो, मानवी जीवाची परमात्म्याशीं एकतानता होते, तेव्हां अर्थात् ऐहिक बंधनें त्यास न बाधतां त्याच्या मुखांतून अत्युच्च स्थितीचे उद्गार लीलेनें निघूं लागावेत व असे दैवी स्फूर्तिरूप गोड आलाप अपौरुषेय वेद मानले जावेत हें कांहीं अनुचित नाहीं. पूर्वसंस्कार व शिक्षणसंस्कार यांच्या संयोगापासून उच्च मनोवृत्तीचे बीज रुजून पुढें मनाच्या कैवल्य स्थितीमुळें व निस्संग एकतानतेमुळें त्या बीजरूप मनोवृत्ति उफाड्याच्या व पूर्ण वाढीच्या सुरम्य वल्ली दिसाव्या व त्यापासून येणाऱ्या गानरूप वायुलहरींनीं मनास अत्यंत आनंद व्हावा यांत काय आश्चर्य ? भारतीय आर्यांचा संगीतप्रिय स्वभाव आहे. दिवसाच्या प्रत्येक भागांत बाह्य परिस्थितीप्रमाणें निरनिराळीं गाणीं गावीं असे त्यांस आवडतें. भारतीय आर्यांच्या संगतींत वर्षेच्या वर्षे घालवावीं तेव्हां कोठें त्याच्या मनःस्थितीचें कोडें परदेशीय लोकांस उकलणें शक्य आहे. अर्थात् असें न करितां केवळ जाता जाता दृष्टि फेंकून अथवा रस्त्यांतून जाताना निकृष्ट वर्गांतील लोकांच्या तोंडून ऐकलेली

पानचट संगीतशून्य गाणी, रस्त्यांतून निघालेल्या मिरवणुकींच्या वेळी गायलीं जाणारीं पद्यें व वाजविली जाणारीं वाद्यें यावरून सरसकट विधान ठोकून देण्याची घातुक व घमेंडखोरपणाची संवय युरोपीयनांस लागलेली आहे. अशा बेजबाबदार घमंड्यानंदनाचे शब्द वेदतुल्य मानणारे आमचे स्वाभिमानशून्य व बालिश सुधारक आत्मनिंदात्मक स्वरात बसविलेली गद्यगाणी जेव्हा व्यासपीठावरून गाण्यास सुरवात करितात तेव्हा त्यांची टर उडावी, नंतर त्यांनीं बहुजनसमाजावर रुसावे व लोकांनीं त्यांच्या शब्दास कवडीचें मोल द्यावे हें अगदीं यथायोग्य आहे.

आर्यांचा स्वभाव संगीतप्रिय आहे असे ॲन विल्सन व कोलमन यांचें विधान मागे दिलेलेच आहे. यापुढे कर्नल टॉड काय म्हणतो तें पाहूं.

" आर्य संगीत किती प्रगल्भ दशेस आले होते व त्याची तुलना युरोपांतील संगीताशीं करणें हे अद्याप सुद्धा अशक्य आहे. या गोष्टी प्राच्यविद्याविशारदांस अवगत नसून अभ्यास करण्यास योग्य आहेत हें कोणीही निःपक्षपाती विद्याव्यासंगी व शास्त्रभक्त पंडित कबूल करील. ग्रीसचे नांव विद्या व कला यापाशीं अत्यंत निर्गांडत झालेले असले तरी ज्या वेळी भरतखंडात ऋषींच्या तोंडून दिव्यगायनाचें कर्णमधुर आलाप सहज लीलेने गायले गेले व पुढे त्याजवर आर्यसंगीतशास्त्राची स्वतंत्र इमारत उभारली गेली तेव्हा ते राष्ट्र रानटी स्थितीतून बाहेर पडले नव्हते. " इतक्या जुनाट आर्य संगीत शास्त्राची अखंड परंपरा हिंदूंनीं चालू ठेविली आहे. यापासून पुढें हे शास्त्र प्रो. वेबर व बेनफी यांच्या मतें इराणी लोकांनी घेतले; इराणांतून अरबस्थानांत गेलें व अरबस्थानातून गिडोड अरोझो यानें जकराव्या शतकात युरोपांत नेले असा याच्या प्रवासाचा क्रम मानण्यात येतो. परंतु हा क्रम जरी हल्ली सर्वमान्य झाल्यासारखा दिसतो तरी याच्यापूर्वी बरींच शतके आर्य संगीतानें युरोपात संचार केला असला पाहिजे. कारण स्ट्रॅबो म्हणतो की, " काहीं ग्रीक लोक संगीत शास्त्राची उत्पत्ति हिंदुस्थानात झाली असे मानतात. सिटिरा (cittiara) नबला हीं वाद्येसुद्धां हिंदुस्थानांतीलच आहेत असेंहि त्याचे म्हणणे आहे. परंतु कर्नल टॉड म्हणतो की, ' शुद्धलेखनाच्या दृष्टीने सिटिरा (cittiara) व नबला ह्या शब्दाचे विवरण केल्यास ते मुळचे सतार व तबला असावेत असें मानण्यास मुळीच प्रत्यवाय नाही. यावरून हें शास्त्र अकराव्या शतकापूर्वी स्ट्रॅबोच्या वेळी ग्रीकांस माहीत होतें हें उघड आहे. दुसरें प्रमाण कर्नल टॉड म्हणतो त्याप्रमाणें असे आहे

कीं, ग्रीक लोकांची लाबलचक, कर्णकटु, कंटाळवाणी संगीत लिपी, व टायमॉथिअसनें शोधून काढलेली द्विश्रुतिक स्वरपंक्ति ही (chromati scale) सुद्धां अलेक्झाडरच्या वेळीं हिंदुस्थानातून युरोपांत नेली असली पाहिजे; व यावरून हा अकराव्या शतकाचा काळ किती मागें ओढावा लागेल याची कोणासहो सहज कल्पना होईल.

हिंदुस्थानांत वैदिक कालापासून संगीताची गोडी लोकांस किती आहे हें वरील विवेचनावरून कळून येईल.

संगीत पद्धतीनें ज्या प्रार्थना म्हणण्यात येत त्याचा समावेश सामवेदांत होतो. ऋचा ऋग्वेदातील, परंतु त्या तालसुरात बसवून त्याचा स्वतंत्र सामवेद तयार करण्यात आला. यावरून ऋषींना संगीताची किती गोडी होती हें कळून येणार आहे. यावरून पुढे स्वतंत्र गंधर्ववेद तयार करण्यात आला होता व त्यांत संगीताचा कला आणि शास्त्र या उभय दृष्टीनें ऊहापोह केलेला होता. परंतु दुर्दैवानें इतर अनेक अमूल्य ग्रंथाप्रमाणें हाही काळाच्या जबड्यात सापडून लुप्त झाला व याजसंबंधाने इतर ग्रंथात जे ठिकठिकाणी उल्लेख आलेले आहेत त्यावरूनच त्याची महती व संगीत शास्त्राची सर्वांगीण वाढ यांची कल्पना बांधावी लागते; असें जरी आहे तरी त्या गोष्टीस इलाज नाहीं. परंतु ठिकठिकाणच्या उल्लेखावरूनही या शास्त्राच्या वाढीविषयी अभ्यासशील विद्वानाची खात्री पटते. परंतु ज्यास व्यासंग न करितां केवळ आत्मप्रौढीवरच हिंदूंचा गचाळपणा सिद्ध करावयाचा असेल त्याकडे लक्ष देण्याचे मुळीच कारण नाहीं.

हल्लीं हिंदुस्थानात ज्या प्रकारचा शास्त्रीय संगीताचा अभ्यास चालतो तें पाहूं. प्रथमतः रूढ असे सहा मुख्य राग असून त्यापासून छत्तीस रागिणी निघालेल्या आहेत. या छत्तीस रागिणींपैकीं प्रत्येकीतून आणखी तीन उपरागिणी बनविलेल्या आहेत व या उपरागिणींमधून आणखी अनेक सूक्ष्म रागिणी निर्माण करण्यात आलेल्या आहेत. मात्र लक्षात ठेवण्याची गोष्ट अशी कीं, या प्रत्येक रागिणींत, उपरागिणींत व सूक्ष्म रागिणींत मूळ रागामध्यें असलेल्या स्वराकडे किंचितसुद्धा दुर्लक्ष केलेले नाहीं. मग कोणी असें म्हणेल कीं, इतक्या रागिणी तयार करण्याची काय जरूर ? तर त्याचें उत्तर असें कीं, कंठाला तालीम देऊन सृष्टीतील असंख्य आलापाचें अनुकरण करिता यावें म्हणून शास्त्रीय पद्धतीनें बसविलेले हे पाठ होय. सृष्टींत जे विविध आलाप ऐकूं येतात तेच सर्व आपल्या कंठानें व्यक्त करितां येतात हें आर्यांनीं रागरागिणींच्या साहाय्यानें प्रत्यक्ष सिद्ध

केले आहे. या रागिणींचा मोजदाद करीत बसण्यांत काय अर्थ आहे ? या सृष्टींत मानवकोटीपासून सूक्ष्म कीटकयोनींपर्यंत किती आलाप आहेत याची संख्या कोणी ठरविली आहे काय ? याकरिता प्राचीन शास्त्रकारानीं समुद्रांतील लाटाप्रमाणे त्या असंख्य आहेत असें जें ठरविलें आहे तें किती यथार्थ आहे बरें ?

याप्रमाणें रागरागिणींचा विचार केल्यानंतर स्वराचा विचार केलेला आहे. स्वराचे दुय्यम व सूक्ष्म असे भेद पाडिलेले आहेत अष्टमाचे हिंदू पद्धतीनें बावीस दुय्यम स्वर पाडले आहेत. परंतु पाश्चात्य पद्धतीनें ते फक्त १२ च पाडिलेले दिसतात. स्वराचे आरोह, अवरोह व मध्यमावस्था आणि रागाच्या अनुरोधानें, प्रसंगाच्या अनुकूलतेनें व रसपरिपाकाच्या प्रचुर ज्ञानानें त्यात कमी अधिक फेर-बदल करणें हें प्रत्येक गवयाच्या नैपुण्याचे द्योतक आहे. पुष्कळ वेळां संगीतपटु युरोपीयनास ह्या सूक्ष्म भेदांचें आकलन व अनुकरण करणें अत्यंत अवघड जातें. म्हणून ते हिंदूंस नावें ठेवून आपलें अज्ञान झाकण्याचा प्रयत्न करितात; परंतु असला प्रयत्न सिद्धीस जाणें कधीं तरी शक्य आहे काय ? व याच कारणाकरिता हिंदू गवई, युरोपीयन तज्ज्ञाच्या अभिप्रायास बहुशः फारशी किंमत देत नाहींत.

राग, रागिणी, स्वर व ताल यास वाद्याची जोड देणे फार अवश्य असून तशी ती हिंदु शास्त्रकारानी दिलेली आहे. मुख्य चित्र उठावदार पार्श्वभागाशिवाय फिकें दिसतें. अत्यंत लावण्यसुद्धा दाक्षिण्याशिवाय साधारणतः डोळ्यात भरत नाहीं. तोच न्याय स्वराचा. ताना, स्वर याना योग्य वाद्याची साथ मिळाली म्हणजे दुधात साखर घातल्याप्रमाणें होते. असो. ही विद्या नुसती कंठगतच न राहता तिला लौकिक प्रचारात आणण्यासाठीं व ती सर्व जनास सुलभ करण्याकरिता योग्य अशी पारिभाषा बसवून स्वतंत्र संगीत लिपी अथवा स्वरचिन्हमाला तयार करण्यात आली. प्रो. विल्सनच्या मते हिंदूंनी संगीत शास्त्र पूर्ण प्रगल्भ दशेस आणण्याकरिता स्वरसप्तक, स्वरमाला, ताल, सूर, स्वराचें सूक्ष्म वर्गीकरण, द्विश्रुतिक स्वरग्राम व अनेकश्रुतिक स्वरग्राम इत्यादि गोष्टी निर्माण केल्या. यावरून त्याचा व्यासंग, जिज्ञासा व आवड ही व्यक्त होतात.

इतकी चर्चा केल्यावर एक मुख्य गोष्ट सांगावयाची राहिली ती अशी कीं, हे राग, रागिणी व ताल बसविण्यात शास्त्रकाराचा करमणुकीशिवाय दुसरा एक हेतु होता. करमणूक करून घेणें हा प्राणिमात्राचा धर्मच आहे; परंतु शास्त्रांचा

कामगिरी निव्वळ करमणुकीपेक्षां अगदीं निराळी आहे. एखाद्याच्या ठिकाणीं उपजतच तत्त्वज्ञानाचा उदय होऊन त्याला ब्रह्मप्राप्तीचा मार्ग खुला होईल; परंतु यामुळें जगास काय उपयोग ? याकरितां शास्त्राचि जरूरी लागते. त्याचप्रमाणें एकादा निसर्गसिद्ध उत्तम गवई असेल; परंतु त्याची ती विद्या व करमणुकीचे साधन त्याजबरोबर लुप्त न होतां जगास त्याचा अखंड उपयोग व्हावा याच शुद्ध व सर्वप्रेमी बुद्धीनें शास्त्राची रचना करण्यांत आलेली असते. याच न्यायास अनुसरून भिन्न वेळीं भिन्न मनोभावना जागृत करून सर्व श्रोतृगणास समरस बनविणे हाच गायनशास्त्राचा प्रधान हेतु आहे. रागाचे मुख्य सहा भेद पाडिले आहेत ते असेः—

(१) हिंदोल—पुष्प-प्रसूनाचा सुगंध व मधुमासांतील मधु याचा मधुर ठसा मनावर उठविण्याकरिता याचा उपयोग करण्यात येतो.

(२) श्रीराग—सूर्यास्तकालीन नितान्त प्रशांतपणा व निस्तब्धता.

(३) मेघमल्हार—वर्षाऋतूंतील मेघनाद व विजेचा कडकडाट.

(४) दीपक—हा संध्या लुप्त आहे. त्यायोगे गायकाच्या शरीरातून ज्योति निर्माण होऊन सभोवारच्या प्रदेशांत लखलखाट होतो व या ज्योतीमुळें स्वतः गवई गतप्राण होतो.

(५) भैरव—आगामी सूर्योदय, हिमबिंदुनिपात, विहगकूजित, प्रातःकालीन सुगंधी व बलदायक वायु इत्यादि.

(६) मालकंस—मानसिक चेतना व प्रस्फुरण.

हिंदु व पाश्चात्य पद्धतीमधील साम्य अर्थर व्हिटन याने पुढीलप्रमाणे वर्णिलें आहे. " द्विश्रुतिक सरणी व स्वरसप्तक ही दोघामध्ये सारखीच आहेत.

अष्टमत्रय, खरज, मधुरा व तार हा स्वरभेद उभयशास्त्रास मान्य आहे व पाणिनीच्या काळापूर्वी सप्तसुरांचा आद्याक्षरें ठरलीं आहेत. पुढ ही स्वरचिन्हमाला इराणी लोकानी घेतली, नतर तिचा संचार अरबस्थानात झाला व तेथून ग्रीक लोकानीं नेल्यामुळें मुळांतला हा विशेष ग्रीक स्वरमालेत उतरला. आणखी एक साम्य सांगितले पाहिजे ते असे की, ग्रीक लोकाच्या संगीत देवतेचे नाव अपोलो असून तिच्या सभोवती नऊ दासी असतात असे वर्णन आहे. हरीचा उत्सव ज्या वेळीं करण्यात येतो त्यात रासमंडळाचा नाच होतो. त्या वेळीं हरि हा आपल्या नवरागिणीनामक अप्सरांबरोबर नर्तन करितो. ह्या नवरागिणी नवरसाच्या आधिष्ठात्री देवता आहेत असे मानण्यात येते. ह्या कल्पनत व अपोलो आणि त्याच्या नव दासी या कल्पनेमध्यें साम्य नाही असें कोण म्हणेल ?"

प्राचीन काळांतील मुख्य संगीतपटु भरत, ईश्वर, पर्ण व नारद हे होत. गेल्या काहीं शतकात गोपाल नाईक व तानसेन हे होऊन गेले. हे दोघे अकबराच्या दरबारीं होते. गोपाल नाईक, यास दीपराग अवगत होता. मागे सांगितल्याप्रमाणें हा दीपराग गाऊन मृत्यु पावला व असे करण्यास अकबर बादशहाने त्यास हुकूम केला होता अशी दंतकथा आहे भरदुपारी अकबराच्या हुकुमावरून श्रीराग गाइल्याने जिकडे तिकडे रात्रीसारखा अंधःकार पडला अशी तानसेनाविषयी लोकवार्ता आहे.

ज्योतिष, गणित, वैद्यक व लष्करी शास्त्र यांखेरीज इतर अनेक शास्त्रे हिंदुस्थानांत भरभराटीस आलीं असें हिंदूंच्या अचाट कामाच्या अवशेषावरून दिसते. एल्फिन्स्टन म्हणतो की, " शास्त्राच्या पूर्ण अभिवृद्धीकरिता हिंदू लोक फारच मेहनत घेतात व त्या कामी बुद्धीची अपूर्व कुशाग्रता दाखवितात. "

आयुर्वेदाची पूर्ण वाढ होण्यास प्राणिशास्त्र, विद्युत्, रसायन, इत्यादि शास्त्रांची आवश्यकता आहे. अस्त्रविद्या सफळ होण्यास रसायन, गणितशास्त्र, हवामानशास्त्र, भूस्तरशास्त्र, पदार्थविज्ञान इत्यादि सजातीय शास्त्राचे थोडे फार अध्ययन पूर्वी झालें असलें पाहिजे. त्याचप्रमाणे विमानविद्येस अशाच प्रकारच्या दुसऱ्या शास्त्रांची आवश्यकता आहे. प्राचीन भव्य इमारती, व अजिंठा, वेरूळ, बदामी वगैरे ठिकाणचीं अफाट पांडवकृत्ये व भयंकर कोरीव लेणीं तयार होण्यास वास्तुविद्येचे हलकें सलकें ज्ञान पुरणार नाहीं. खरोखर हीं पांडवकृत्ये व कोरीव लेणीं जगातील अद्भुत चमत्कारात मोडत असून त्यास लागणारें शिल्पज्ञान केवळ अतर्क्यच असलें पाहिजे.

पाश्चात्य राष्ट्रांत एवढे नामांकित वास्तुविद्यापंडित झाले, परंतु अजून कोणासही इजिप्तसारखे मनोरे बांधण्याची कला साधत नाहीं. भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र याचा संयोग प्राचीन कालीं आसपासच्या स्थानिक राजांनी टोलेमीसारख्या ग्रीक पंडितांच्या मदतीने केला होता; परंतु त्याच्या काठचा प्रदेश वाळवंटाचा व रेताड असल्यानें हा संयोगी कालवा वारंवार बुजून जातो साप्रत काळीं तेंच काम केल्याबद्दल फ्रेंच शिल्पज्ञ लेसेप्स याचे नांव सर्वतोमुखी झालें आहे, व ते तसें होणें अगदीं रास्त आहे. मात्र आमची सध्या एवढीच इच्छा आहे कीं, पूर्वीप्रमाणे तो बुजून जाऊं नये. इजिप्तमधील मनोरे स्वर्गातून खालीं पडले अगर पृथ्वीच्या पोटातून वर आले अशा दोन संभवनीय कल्पना प्राचीन लोकांस सुचल्या होत्या.

महाभारतांत मयसभेचे जें वर्णन आहे तें सुद्धां खरोखर अतिशय विस्मयकारक आहे. मयासुराने दाखविलेल्या या खेळात अतिसूक्ष्मदर्शक यंत्रें, दुर्बिणी, घड्याळें वगैरे वस्तु होत्या असें वर्णिल आहे. ही मयसभा एवढी मोठी होती कीं, त्यांत हजारों लोकांचा समावेश होई; परंतु ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेण्यास १०।१२ माणसें पुरे होत. त्याचप्रमाणें त्यांत अग्निरथाचेंही वर्णन आहे.

फार मोठ्या शक्तीच्या दुर्बिणी त्या वेळीं होत्या व अशाच प्रकारची एक इंद्रप्रस्थामध्यें संजयाजवळ होती व ती त्यास व्यासानें दिली होती असे सांगितलें आहे.

वनस्पतिशास्त्रासंबंधी प्रो. विल्सन लिहितो कीं, " हिंदूंना वनस्पतींच्या अंतर्बाह्य दोन्ही गुणांचे ज्ञान होते. त्यानी त्यांची विस्तृत याद तयार केली असून त्यात त्याचा व्यवहार्य उपयोग व त्याच्या गुणधर्मांची दर्शक नांवें दिलीं आहेत. अकबर-उल-सालेख या नांवाच्या वर्तमानपत्राच्या १८८७ सालातील २५ नोव्हेंबरच्या अंकात असें विधान आहे कीं, काश्मीरमध्यें नुकताच त्रिभागात्मक वनस्पतिकोश सापडला आहे; हा कोश जगापुढें अद्याप न आल्यानें त्या विधानावर विश्वास ठेवणें कठीण आहे.

मालतीमाधव नाटकात मालतीनें माधवाचें चित्त लोहचुंबकाप्रमाणे ओढून घेतलें असें वर्णिलें आहे यावरून हिंदूंना कृत्रिम लोहचुंबक करण्याची कृति माहीत असली पाहिजे असें दिसते.

प्रो. विल्सन एका ठिकाणीं लिहितो कीं, " सृष्टींत निर्वात (Vacuum) स्थल नाहीं " हें तत्त्व हिंदूंस माहीत होतें. कांहीं यंत्रसाधनानीं हवा काढून टाकतां येते, अशा वेळीं निरनिराळ्या अणूंमधील सांधा गेल्यानें ते एकत्र होऊन त्यांची रास व्हावी असें कोणीहि सहज मानील; परंतु हें वस्तुस्थितीस विसंगत असल्यानें त्याचें योग्य व समाधानकारक उत्तर पुढे दिल्याप्रमाणें दिलें आहे

" दोन पदार्थांमध्यें अति सूक्ष्म इंधक (ether) नावाचें तत्त्व असल्यानें व तें सर्वत्र भरून राहिल्यानें अशा प्रकारची आपत्ति ओढवत नाहीं. अलीकडे या तत्त्वाचा स्वीकार हळुहळू होत चालला आहे. ग्रहांचे भ्रमण व ध्वनीचें वहन याच तत्त्वामुळें होतें असे मानण्यांत येते. निर्वात स्थलामध्यें ध्वनिसंचार होतो असें जे मानण्यात येते तें याच कारणामुळें. दोन परमाणू या तत्त्वामुळें ether (इंधक) भिन्न रहातात व हवा त्यास एकत्र खेचते. हवा दोन पदार्थांच्या संघ-

ह्मणावें कारण असून तिजमध्यें स्पर्शधर्म आहे. अग्नीचा धर्म तेज होय; यामुळें आकृतिप्रदर्शन होतें. केल्येक ही क्रिया रंगामुळें होते असे मानतात; परंतु आकृति अथवा रंग प्रकाशाशिवाय व्यर्थ होत. जलाचा धर्म रुचि हा आहे. यावरून एकोणिसाव्या शतकातील शोधांचें ज्ञान प्राचीन आर्यांस होतें असें मानण्यास कोणती हरकत आहे ? "

चंद्राच्या आकर्षणशक्तिमुळें भरती-ओहोटीचा खेळ होतो. याचे ज्ञान पूर्वी होते हें खालील रघुवंशातील श्लोकावरून दिसून येईल.

तं तस्थिवांसं नगरोपकंठे ।
तदागमारूढगुरुप्रहर्षः ॥
प्रत्युज्जगाम क्रथकौशिकेंद्रः ।
चन्द्रं प्रवृद्धोर्मिरवार्भिमाली ॥

हत्तीच्या गंडस्थळांतून मद वाहतो ही गोष्ट स्ट्रेबो यास प्राचीन ग्रीकांच्या वेळी माहीत होती नंतर तिची माहिती क्युव्हीयर यानें प्रसिद्ध करीपर्यंत पाश्चात्य जगास ती माहीत नव्हती. परंतु प्राचीन काळचें एक काव्य असे सांपडणार नाहीं कीं, ज्यात मत्तगजमदासंबंधा उल्लेख नाही. यावरून सृष्टपदार्थशास्त्राची माहिती आर्यांस होती हे स्पष्ट होते. सृष्टीच्या पोटातील खनिज संपत्ति काढून ती शुद्ध करणें, महासागरातून मोत्यें काढणें, खाणी व विहीरी खोदणें इत्यादि सर्व कामाचे पूर्वी ज्ञान होते. त्याचप्रमाणें हिरे, मोत्यें, इंद्रनील वगैरेचे गुणधर्म, जाति इतक्या बारकाईने सांगितलेल्या आढळतात कीं, ह्या वस्तु सुद्धा त्याच्या नजरेतून व सूक्ष्म अवलोकनांतून राहिल्या नव्हत्या असे दिसतें.

पन्नास वर्षांपूर्वी विमानासंबंधी बोलणें म्हणजे माथेफरूपणासारखी बडबड करणें होय असें पाश्चात्य लोकास वाटत असे; परंतु गेल्या पन्नास वर्षांत ही गोष्ट जवळ जवळ यशस्वी होऊन ती व्यवहार्य ठरली आहे व तिचा उपयोग गेल्या महायुद्धात फार मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत असें एका विचक्षण युरोपियन पंडितानें असे म्हटले आहे कीं, " हिंदुस्थानात विमानविद्या हे स्वतंत्र शास्त्र असून त्याचा हिंदू लोक व्यावहारिक कामाकडे उपयोग करीत असत. "

या विद्येवरून एवढे होतें कीं, रसायन, यंत्रविज्ञान, हवामानशास्त्र वगैरे शास्त्राचें अध्ययन प्राचीन काळीं हिंदुस्थानात बहुत झाल असलें पाहिजे. विमान-

विद्या होती असे एकदा कबूल केले की अंतरिक्षात वाहणारे वाऱ्याचे निरनिराळे प्रवाह, हवेचे एकावरील एक थर, हवेची शीतोष्णता व घनता इत्यादि गोष्टींचे ज्ञान त्यास असलेच पाहिजे असें मानावें लागते. यजुर्वेदात (६, २१) विमानविद्येविषयीं स्पष्ट उल्लेख आढळतो.

उदाहरणार्थः—

समुद्रङ्गच्छ स्वाहा अन्तरिक्षङ्गच्छ स्वाहा ।
देवं सावेतारङ्गच्छ स्वाहा ॥

मनु म्हणतोः—

संशोध्य त्रिविधं मार्गं षड्विधं च बलं स्वकम् ।
सांपरायिककल्पेन यायादरिपुरं शनैः ॥

कांही लोकांचे असें म्हणणें आहे कीं, विमानविद्या हे व्यापक वायु—विद्येचें अंग आहे. (शतपथ ब्राह्मण ११, १४) याशिवाय शतपथ ब्राह्मणात सर्पविद्येचा, आश्वलायन सूत्रात विषविद्येचा व पाणिनीच्या ग्रंथांत लोहशास्त्राचा स्पष्ट उल्लेख आहे.

विद्युत् व लोहचुंबक या गोष्टींहि लोकांच्या पूर्ण परिचयाच्या होत्या. वेदान्ती मनुष्य नेहमी असे म्हणत असतो की, विजेची उत्पत्ति मेघापासून होते व ही गोष्ट ट्यूलेट व इतर शास्त्रज्ञ यांच्या प्रत्यक्ष प्रयोगावरून कोणासही कळण्याजोगी आहे. प्राचीन ऋषींना वैद्युत आकर्षणशक्ति माहीत होती व इतरही वैद्युत चमत्कार ठाऊक होते. या सर्व शास्त्रांच्या पूर्णतेविषयी कथाप्रसंगानें व केवळ ठिकठिकाणच्या नाममात्र निर्देशानें एकाद्या हट्टी व आग्रही वादकाचे समाधान होणार नाहीं; परंतु त्यामुळें तीं ऋषींस माहीत नव्हतीं असे बिलकूल म्हणता येणार नाहीं यांच्या उलट व्यवहारांत त्यांचा प्रत्यक्ष उपयोग केलेला पाहिला म्हणजे व्यवहाराचे संपूर्ण ज्ञान व शास्त्रीय बुद्धीचा यथायोग्य उपयोग यांचे ऋषींच्या आचरणातील चित्र डोळ्यापुढे उभे राहते.

शेवटीं एका गोष्टीचा विचार करून हें संकीर्णशास्त्रविवेचनात्मक प्रकरण पुरे करूं. निद्रा व भोजन हीं मानवीं अथवा इतर कोणत्याही जीवनाचीं अधारभूत अंगें आहेत हातीं असलेल्या साधनाचा अत्युत्तम उपयोग करून घेणें हें ज्ञानी मनुष्याचे मुख्य लक्षण होय. श्रम झाले असता झोप येणें हे अगदीं साहजिक आहे. परंतु निद्रावश स्थिति असता त्या स्थितीचा आरोग्याला जास्तीत जास्ती उपयोग कसा होईल हे पाहणें हेंच खरें शहाणपण होय.

कृमिकीटक चतुष्पाद व अज्ञानी जन सर्व निजतात आणि ज्ञानी मनुष्यही निजतो; परंतु ज्ञानवान् मनुष्याने आपल्या बुद्धीचा उपयोग करून जर आपले शरीर झोपेमुळें आरोग्यवान् करून त्याचा आध्यात्मिक उन्नतीकडे उपयोग केला नाहीं तर दोघांच्या स्थितींत काय फरक? झोप कमी काल येऊन आरोग्य मात्र जास्त वाढविणें हें साध्य होण्यास झोप घेण्याची एक शास्त्रानिष्ठ पद्धति ठरविली पाहिजे. झोपेपासून भरपूर समाधान मिळून शिवाय कालाची बचत झाल्याने त्याच्या मनाची व ज्ञानाची उन्नति करून श्रेष्ठ पद मिळविण्यास उपयोग झाला पाहिजे.

अशी एक पद्धत तपोनिष्ठ, शास्त्रमग्न व दीर्घोद्योगी असे जे प्राचीन ऋषि त्यांनीं शोधून काढली होती. ही पद्धत आम्हा हिंदू लोकात वंशपरंपरेनें चालत आहे. तिचा उपयोग करण्यास कालाचा अथवा स्थलाचा कोणताही निर्बंध नाहीं. जेथें मानवी शरीर विश्रांतीकरितां पडेल तेथें ती आचरणात आणता येतें. विद्युत् व लोहचुंबकत्व या दोन शास्त्रांतील प्रमेयावर तिची उभारणी झाली आहे. प्रत्येक माता आपल्या कुटुंबातील मुलास निजताना बजावीते कीं, 'मुलानों, दक्षिणकडे अथवा पूर्वेकडे पाय करून निजूं नका बरे' या हिंदी सतीच्या भाषणात काही अर्थ आहे अथवा नाही याचा फारसा विचार न करिता अंध-श्रद्धामय धर्मशास्त्रातील हे एक वचन आहे असें मानण्याचा बराच प्रघात आहे. परंतु कोणत्या ना कोणत्या कारणानें साधारणतः प्रत्येक हिंदू वर दिलेल्या दोन दिशेकडे पाय करून निजण्याचे टाळतो. याची कांहीं शास्त्रीय उपपत्ति मिळाल्यास बरें होईल असें वाटल्यावरून बाबू सीतानाथ रॉय यानीं त्यासंबंधी आपले कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत, ते मननीय वाटल्यावरून पुढें देतो

स्मृतिग्रंथ व विष्णुपुराण या ग्रंथांत गार्ग्य व मार्कण्डेय ऋषींनीं ज्ञानप्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल तर पूर्वदिशेकडे डोकें करून निजावें; शरीरसामर्थ्य व दीर्घायुष्य पाहिजे असेल तर नेहमी दक्षिणेकडे माथा करून निजावे; प्रवासात असताना पश्चिमेकडे डोकें करून निजल्यास चालेल; परंतु उत्तरेकडे डोकें व दक्षिणेकडे पाय करून कधींही निजूं नये; त्यायोगें भयंकर व्याधी जडते; सबब ज्यास निरामयत्व प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल त्याने सदर आदेश पाळले पाहिजेत असें लिहून ठेवले आहे.

याप्रमाणे आनुवंशिक संस्कारानें म्हणा अथवा संध्येने म्हणा, बहुतेक हिंदू लोक या आदेशाचे पालन करतात. आता आधुनिक शास्त्रीय दृष्टीनें यापासून काय निष्पन्न होतें तें पाहूं.

सूर्यकिरणाचा जो प्रवाह आपल्या पृथ्वीवर एकसारखा वाहत असतो त्यात उष्णतोत्पादक विद्युत् (Thermal electricity) संमिश्रित असते.

हा प्रवाह पृथ्वीच्या पूर्व बाजूवर पडल्याने व पृथ्वी वाटोळी असल्यानें पश्चिम भाग थंड राहून फक्त पूर्व भागच उष्णतापूर्ण असतो. ही किरणजन्य उष्णतोत्पादक विद्युत् पृथ्वींत भिनून पूर्वेकडून पश्चिमेकडे अशी हिंडत रहाते. या विद्युत्प्रवाहानें पृथ्वीच्या अंतर्भागात लोहचुंबकाचे धर्म संपृक्त होतात व पृथ्वी ही लोहचुंबक-गुणानीं भरून जाते. परंतु सूर्यकिरणाची ही क्रिया भूमध्यरेषेवर एकसारखी घडत राहिल्यानें दर क्षणीं नवी विद्युत् तयार होत असते. म्हणून पूर्व क्षणीं उत्पन्न झालेल्या विजेस भूमध्यरेषेवर प्रदेशावर रहावयास मिळत नाहीं. सबब ही जुनी विद्युत् काही दक्षिण ध्रुवाकडे व काहीं उत्तर ध्रुवाकडे अशी पागते व तेणेंकरून ह्या उभय ध्रुवामध्ये लोहचुंबकाचे धर्म आपोआप भरपूर संचित होतात. अशा रीतीनें आपली पृथ्वी लोहचुंबकाचा एक अफाट लोळाच बनून जाते व याचें प्रत्यंतर म्हणजे होकायंत्राच्या काट्याची स्थिति होय. हा काटा नेहमीं दक्षिणोत्तराभिमुख असतो हे नव्याने सांगण्याची मुळींच जरूर नाहीं. भूमध्य प्रदेशावर हा काटा नेहमी भूमध्यरेषेशी समांतर असून दक्षिण व उत्तर ध्रुवप्रदेशामध्ये तो पृथ्वीच्या पातळीला काहीं कोण करून एका बाजूला लवलेला असतो; व ह्या त्याच्या स्थितीला त्याचे बाक असे म्हणतात.

ज्याप्रमाणे पृथ्वीमध्ये लोहचुंबकाचे गुणधर्म उतरतात असे वर सांगितले त्याचप्रमाणे ते मानवी शरीरामध्येही उतरतात; मात्र फरक इतकाच की, लोखंड अगर पोलाद ह्यामध्ये ते ज्या मानाने मिसळून जातात त्यापेक्षा फारच थोड्या प्रमाणात ते आपल्या शरीरात प्रवेश करितात. परंतु मुख्य प्रश्न येथे किती मिसळतात हा नसून ते मिसळतात की नाहीं हा आहे; व इतर कारणे सोडून दिलीं तरी रक्तात लोहपरमाणु मिसळलेले असल्याने त्याबरोबर लोहचुंबकधर्म शरिरात प्रवेश करितो हे मानण्यास कोणासच शंका येणार नाही.

दाक्षणध्रुव व उत्तरध्रुव अशी पृथ्वीची जशी एवंगुणविशिष्ट दोन टोके आहेत, त्याचप्रमाणे पद व शीर्ष ही मनुष्यदेहातील तद्गुणविशिष्ट दोन टोके होत.

ही चुंबकधर्मी ध्रुवद्वयाची आमच्या शरिरात जी योजना करून ठेवलेली आहे त्यायोगे आमचे शरीरस्वास्थ्य कायम राहून सुखाची प्राप्ति होते. परंतु ही शरीर-निष्ठ ध्रुवसंपन्नता (Polarity) जर कोणत्याही कारणाने ढळेल तर आमची निरामय स्थिति बदलून सर्व शरीरात बिघाड होईल; रोग, व्याधि याचा प्रसार होऊन अनवस्थाप्रसंग गुदरल्याखेरीज रहाणार नाही.

शरिरामध्यें चुंबकधर्म उत्पन्न होण्याला पृथ्वी हें मुख्य कारण आहेच, परंतु शरिरांत व शरिराबाहेर जो प्राणवायु पसरलेला आहे त्यायोगेही ही क्रिया होत असते. प्राणवायु हा चुंबकधर्माचा उत्तम वाहक आहे व त्याचा शरिरावर परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाही. पृथ्वी व प्राणवायु (Oxygen) यांचा मनुष्याच्या शरिरावर जरी सारखाच परिणाम व्हावा अशी समजूत आहे तरी शरिराच्या भिन्न घटकावयवामुळे तसा परिणाम होत नाहीं व आपणास मनुष्य-देहाची जी भिन्न भिन्न स्थिति आढळून येते त्याचें हेंच कारण होय

सबब हें शरीर-स्वाथ्य कायम राखण्याकरिता सुप्तावस्थेत शरीर कोणत्या स्थितींत ठेवावें याचा लोहचुंबकधर्मान्वये विचार केलेला आहे डोकें जेव्हां दक्षिणेकडे करून आपण निजतों तेव्हां आपल्या शरिराचा उत्तरध्रुव व पृथ्वीचा दक्षिणध्रुव हे सन्निध येतात, त्याचप्रमाणे जर आपण पूर्वेकडे डोकें करून निजलो तर अभ्यासाने अगर अन्य कारणानें डोक्यांत उत्पन्न झालेला दाह उष्णतोत्पादक विद्युत्पूर्ण किरणाच्या परिणामाने शमन पावतो व याच्या उलट निजलो तर हा प्रवाह पायामधून शरिरातून संचार करील व डोक्यातून बाहेर पडतांना उलट थोडेंबहुत उद्दीपन करील व मेंदूची साम्यावस्था व थंड स्थिति बदलून जाईल. उष्णतेनें उष्णता मारणें, शीताने शैत्याचा नाश करणें त्यातीलच हा प्रकार होय. डोकें व मेंदू हीं जगतात सर्व प्रकारची कामगिरी करण्याचीं साधने असल्यामुळें तीं स्वस्थ, थंड व शान्त रहाणे हें अवश्य आहे. सबब पूर्वकडे डोकें करून निजणें व त्याचप्रमाणे एकंदर शरीर निरोगी ठेवण्यास दक्षिणोत्तर निद्रा घेणें याचीं वरील विवेचनावरून थोडी तरी कल्पना येईल अशी आम्हास आशा आहे.

वर पूर्वेकडे डोकें करून का निजावें याचें विवेचन करितांना आम्हीं जें सांगितलें कीं, उष्णतोत्पादक विद्युत्प्रवाहाचा जेथें प्रवेश होतो (शरिरात) तेथील मूळचा दाह शान्त होऊन ज्या भागांतून तो बाहेर पडतो तेथें थोडा दाह उत्पन्न करून निघून जातो, तर हा नियम भेषजीय विद्युच्छास्त्रांत अनेक प्रयोगांवरून सिद्ध असल्याने त्याबद्दल कोणासच संशय घेण्याचे कारण नाहीं. मार्कंडेय व गार्ग्य-मुनींनीं आन्हिकधर्मांत वरील आदेश कां लिहून ठेवले याचा थोडाबहुत खुलासा वरील आधुनिक शास्त्रीय उपपत्तीने लागल्याखेरीज रहाणार नाहीं त्यांची दृष्टि सार्वजनिक आरोग्याच्या, सुखाच्या व उन्नतीच्या विचारांनां कशी भरून गेली होती व अज्ञ जनास शास्त्रीय उपदेशापेक्षा धार्मिक आज्ञा जास्त बंधक वाटतात असें वाटल्यावरून त्यानीं याच मार्गाचा अवलंब केला असे दिसतें व हे त्याच्या विश्वकुटुंबी बुद्धीस अनुरूपच आहे.

विद्युत् व लोहचुंबकत्व यांचीं आणखी पुष्कळ उदाहरणें आहेत. या गोष्टी शरीरस्वास्थ्याला, आरोग्याला व बळकटीला आवश्यक वाटल्यावरून त्यांचा व्यवहारांत सर्वत्र उपयोग केलेला दिसतो.

(१) देवळावरील कळस सोनें, रुपें व तांबें या धातूंचे केलेले असतात व अर्लाकडे त्रिशूलाकार तांब्याच्या अथवा लोखंडाच्या काबी अथवा गज इमारतींच्या अग्रभागीं बसविलेले असतात. दोन्ही उपायानीं विजेच्या आघातापासून इमारतींचें संरक्षण व्हावे हा हेतु असतो.

(२) दंडांत अगर गळ्यात सोने, रुपें अथवा तांबें यापैकीं ऐपतीप्रमाणें एकाची पेटी, ताईत अथवा गोळक करून बांधतात. अभिमंत्रित तांदूळ अगर विभूति त्यात असते. परंतु मुख्यतः विद्युत्प्रयोगाने रोग बरे करण्याच्या पद्धतींत कमरपट्टे, आणि इतर अवयवांस बाधण्याचे पट्टे यांचा जो उपयोग होतो, तोच वरील जिन्नसापासून होत असे व हल्लीही होत आहे. मात्र त्याची शास्त्रीय माहिती नसल्याने त्याजवरील श्रद्धा कमी झालेली आहे.

(३) दर्भासन, मृगाजिन, व्याघ्राजिन, रेशमी व लोकरी आसने यांचा उपयोग विजेच्या आघातापासून संरक्षण होण्यास फार होतो. हल्लींप्रमाणे विद्युत्प्रतिबंधक मोठमोठ्या इमारती नसून जंगलांत पर्णकुटिकेमध्ये राहण्याचा जेथे सर्वत्र प्रचार असे तेथें या साधनाचा विजेपासून बचाव करण्याकरिता उपयोग करण्यांत यावा याचें काय आश्चर्य ? वरील जिन्नसाचा आसनाचे कामीं उपयोग केल्यानें पृथ्वीवर घडलेल्या विद्युदाघाताचा आपणास संपर्क पोहोचत नाही. कारण आपलें शरीर व भूमि यांमध्ये हें विद्युन्निवारक आसन असल्याने विद्युदाघात अशा आसनस्थाचे शरीरास इजा देण्यास समर्थ नसे.

हिंदूंच्या समजुतीपैकी आणखी एक दोन सांगून या विषयाचा निरोप घेणे बरें. हिंदू देवादिकांच्या मूर्तीचे चित्र काढले असतां, मुखाभोवतीं एक प्रभामंडळ काढलेले असतें. अर्थात तें चकाकार, चकचकीत व तेजस्वी असते. पुष्कळ दिवस दिव्यत्वाच्या नांवाखाली याची कोणी चौकशी केली नाही. जे ईश्वरी अंश आहेत त्याच्या मुखाभोंवतीं अशी प्रभा असणें साहजिकच आहे, अशी सार्वलौकिक समजूत होती. परंतु अशा तऱ्हेने शास्त्रज्ञ लोकांचे व चिकित्सकांचें समाधान होणे अशक्य होतें. पुढें या बाबतीत आस्ट्रीयामधील शोधक रसायनशास्त्रज्ञ याने असा शोध लावला कीं मनुष्यजातीसुद्धां सजीव, निर्जीव प्रत्येक नैसर्गिक पदार्थ, आणे तारका यांच्या भोवतीं एक अत्यंत सूक्ष्म व जड दृष्टीला

भासमान होणारे असें प्रभावलय असते; परंतु शरिराच्या इतर भागासभोंवतालील यांतील परमाणु मुखाजवळील परमाणूंपेक्षां अत्यंत विरल व हीनतेज असतात. सबब सर्व शरिराभोंवतीं असलेले हें वलय भासमान न होता फक्त मुखासभोंवतालीं असलेलेच दृश्यमान होते. आता या शास्त्रीय शोधाने व प्रत्यक्ष प्रयोगाने एका गूढ गोष्टीस व्यवहाराच्या कोर्टात बसवून अतर्क्यता व दिव्यता या भाववाचक अंध समजुतीस अर्धचंद्र दिला. मात्र त्यायोगे प्राचीन भारतीय ऋषवर्यांची कीर्ति द्विगुणित झाल्यावाचून राहत नाहीं. कारण प्रयोगानें हें कोडे उकलण्यास जगास अद्यापपर्यंत कालावधि लागला, परतु ऋषिजनाच्या ज्ञानचक्षूंस याचे केव्हाच दर्शन झाले होते ! जर ह्या आधुनिक शास्त्रज्ञानें शोध करून हें कोडे उकलले नसते तर आम्ही मात्र चित्र काढताना प्रभामंडळयुक्त मुख काढून ते तसे का काढले याबद्दल किती दिवस अज्ञानी राहिलो असतो कोण जाणे ! हिंदूची गतानुगतिक बुद्धि त्यास जगाच्या चढाओढीत टिकविण्यास उपयोगी पडली हे मात्र खरे. इजिप्सीयन गेले; बाबीलोजियन नामशेष झाले; इराणी स्मृतिशेष उरले; खाल्डियन लोक इतिहासातच मात्र परिचित राहिले. अशा प्रकारचे प्राचीन काळच्या लोकाच्या दैवाचे विलास दृष्टीपुढे उभे ठाकले म्हणजे गतानुगतिक बुद्धीने का होईना, जगाचे हे दिवस पाहण्यास आर्य राष्ट्र जगले यावरून त्याला पुढे भाग्याचे दिवस येणार अशी मनाची स्वाभाविक समजूत होते व ती परमेश्वरी कृपेने खोटी ठरणार नाही अशी आशा करण्यास बलवत्तर कारणे आहेत.

वरील व्हॉन रीशेन बॅकचे तत्त्व स्पृश्यास्पृश्यतेस लावून कांही सार निघते कीं नाहीं हे पाहूं. एकाद्या हिंदू मेजवानीचे प्रसंगी सर्व मंडळी जेवणास बसली असतां कधीं कोणी कोणास शिवणार नाहींत. आपल्या पानाभोवती पाण्याचे मंडल तयार करून जेवण होईपर्यंत त्याच्या बाहेरील पदार्थास स्पर्श करणार नाहींत. मुसलमानामध्ये एका ताटांत जेवावे अशी कुराणाची आज्ञा आहे व तेणेकरून प्रेमसंवर्धन होतें असें ते लोक मानतात. युरोपीयन लोकात जरी एका ताटाचा प्रेमवर्धक प्रकार नसला तरी एका मेजासभोवता बसून एकमेकास पेले ओवाळून यथेच्छ हात मारण्याची फार मोठी चाल आहे. अशा लोकास हा प्रकार चमत्कारिक वाटल्यास काय आश्चर्य ? यात प्रेम नाही, फक्त सामाजिक जुलूम म्हणून मेजवानीसारखे प्रसंग करतात असेही त्यास वाटेल. परंतु थोडा विचार केल्यावर ही गोष्ट साफ खोटी आहे असें कळून आल्याखेरीज राहणार नाही. प्रत्यक्ष एका कुटुंबांत आजा, बाप,

मुलगा, भाऊ एकमेकांस जेवतांना शिवत नाहींत या प्रकारास काय म्हणावें ? यांत प्रेमाचा अभाव कोणास सापडेल काय ? तर ही गोष्ट निराळ्या दृष्टीनें पाहिल्यास यांत थोडेंबहुत तथ्य आहे असे कोणासही आढळून येईल. हा आत्मिक शक्तिविकासाच्या प्रयत्नाचा मासला होय. आपली शक्ति क्षणोक्षणीं वाढत असते व ती जेवणाच्या व अन्नपचनाच्या वेळीं फार वेगानें काम करीत असते. जगात प्रत्येकाची शक्ति सारखी नसते व दोन कमी अधिक शक्ति एकत्र आल्या असता त्याचा कलह हा ठेवलेलाच असतो. तर ज्यानीं आध्यात्मिक अभ्यासाच्या मार्गे आपले चित्त लावले आहे त्यानीं अशा द्वंद्वापासून अलिप्त रहाण्याची इच्छा करावी व आपल्या आध्यात्मिक शक्तीस वाढण्यास पूर्ण अवसर द्यावा हें अगदीं साहजिक आहे. हा आत्मबल वाढविण्याचा अभ्यास एकानेंच करावा व दुसऱ्यानें करूं नये असे थोडेंच आहे ! परंतु आध्यात्मिक बलाची चाड वरिष्ठ वर्गांत आढळते व म्हणून हा प्रकार ब्राह्मणात आढळून येतो. हल्लीच्या ब्राह्मणांत तो अपभ्रष्ट स्वरूपात असेल, परंतु प्राचीन आर्य शक्तीच्या पाठीस लागलेले होते म्हणूनच त्यानीं तो प्रचारात आणला. समाजातील कोणत्याही व्यक्तीस आपलें मनोबल वाढविण्यास पूर्ण मुभा आहे. अशा मार्गातील अभ्यासकाच्या अंगी व्हॉन रीशेन बॅक म्हणतो त्याप्रमाणे एक प्रकारची आकर्षक व वशीकरणात्मक शक्ति उत्पन्न होते व ती त्याच्या सभोवतीं पसरल्याने त्याच्या ताब्याभाड्यास, आसनास, दंडास, वस्त्रछाटीस व्यापून राहते यात काय नवल ? परंतु इतर मनुष्यांचे विचार स्वार्थी असतात. साध्या मनुष्याचे मन आत्मनिष्ठ व ईश्वरनिष्ठ नसल्याने त्यावर अहंकार व स्वार्थ याच्या मिश्रणाचे फार पूट बसलेले असतें व याजपासून जे किरण बाहेर पडणार ते मलीन व अशुद्ध असणार. निकृष्ट वर्गाकडे जसजसे आपण जाऊं तसतसे तामशी विचार-किरण त्याच्यामधून जास्त बाहेर पडणार. मागे सांगितल्याप्रमाणे अशा विधर्मी किरणाचे संघटन झाल्यास त्याचा परिपाक म्हणजे युद्ध, व त्यात सात्विक बलाचा विजय होणार हें खासच. तरी सुद्धा योगनिष्ठ व आत्मनिष्ठ यास जी आत्यंतिक पायरी गाठावयाची असते त्यास या शक्तिक्षयाने विलंब होतो सबब असा नेमधर्मी पुरुष बहुधा नीच व पतित लोकाचा संपर्क व सहवास टाळीत असतो. असें केल्याने आत्मिक बल अव्याहत वाढून त्याचा हेतु लवकर साध्य होतो. व्हॉन रिशेन बॅक म्हणतो कीं, हें मानसिक बलाचें किरण सात्विक असोत, राजसी असोत वा तामसी असोत, ते धातूच्या भांड्यापेक्षां मातीच्या अगर लाकडाच्या पात्रात जास्त लवकर

संचित होतात व म्हणूनच विटाळलेली मृण्मय व काष्ठमय पात्रे फोडून धातुमय पात्रें अग्निसंशोधित केलेलीं आपण पाहतो. असे तपोनिष्ठ पूर्वी आपली शक्ति, यज्ञयाग व पुढे पुढें ईशचिंतनांत घालवीत व जेणेंकरून लवकर सायुज्यमुक्ति मिळेल त्याची वाट पहात बसत. अशा लोकानीं आपल्या आसपास इतरांस येऊं न दिल्यास त्यांत त्याचा काय दोष आहे !

वरील स्पृश्यास्पृश्य विचार व या प्रकरणांतील प्राचीन आर्यांच्या इतर चालीरीती या सर्वांस सारख्याच मान्य व्हाव्या असे आमचे म्हणणे नाही. आम्हास एवढेंच सागावयाचे कीं, ज्या गतानुगतिक बुद्धीने आम्ही अनेक स्थित्यंतरांतून पार पडलों त्या बुद्धीवर नवीन शास्त्राचे संस्कार करा व आपला प्राचीन धर्म व आचार अर्थशः समजून घ्या आमच्या आचारविचारावर नवीन प्रकाश पाडून युरोपीअन त्याचे याथातथ्य सिद्ध करीत आहेत; परंतु ते आम्हीं घेणे हे लाजिरवाणे आहे.

मागे सांगितलेल्या नष्ट राष्ट्राच्या नशिबी जे सुख नव्हतें ते आम्हास मिळणार आहे; म्हणूनच आम्ही वाचलो आहो. तर नवीन शास्त्राचे साहाय्य घेऊन प्राचीन चालीरीती समजून घ्या व या आपले जगत्श्रेष्ठत्व सिद्ध करा. आम्हास हल्लीं मान मिळत नाही याचे कारण आमचे अज्ञान. प्राचीन काली जें योग्य होते तेच आम्ही मात्र अजून उराशीं घेऊन बसलो आहो व अशा तऱ्हेने अनौचित्याचा अपराध करून आम्ही आपलें हंसें जगाकडून करून घेत आहो सबब आधुनिक साधनें नसतां केवळ चिंतनानें व किरकोळ उपकरणाने प्राचीन भारतीय आर्यांनी जे शोध लावले तेच आज जगास साहाय्यभूत झाले व त्याचीच आज पुनरावृत्ति होत आहे; परंतु त्याच शोधावर उभारलेल्या चालीरीती काल बदलल्यामुळे हास्यास्पद भासूं लागल्या तरी त्या न टाकता त्यावर आधुनिक शास्त्राचा शोधक प्रकाशीकरण-प्रवाह टाका व त्याचे संशोधन करून त्या परिस्थितीला जुळवून घ्या व आपल्या प्राचीन वंशजाच्या कीर्तीस शोभेल अशी कृति करण्यास लागा. म्हणजे या ज्ञानपवित्र, अनुभवी, आत्मज्ञानानंनिष्ठ व वृद्ध भारतीय राष्ट्रास सर्व आधुनिक बाल राष्ट्रे शतशः प्रणाम करतील व ज्ञानाकरिता यांची सेवा करतील अशीं चिन्हे आज दृगोचर होऊं लागली आहेत. यावरून काल अनुकूल असून ईश्वरी कृपा आहे हे स्पष्ट दिसत आहे अशा वेळीं जर आम्ही आपलें कर्तव्य ओळखलें नाहीं तर मात्र आशा नाही आळशी, उधळ्या व कंगाल आजोबा लवकर मरावा म्हणजे खाण्यास एक मनुष्य तरी कमी झाला असे

निराशेचे विचार कधीं कधी डोकावतात त्याचप्रमाणें राष्ट्रांच्या संसारांत फाजील लोकसंख्येनें बुभुक्षित झालेलीं कांहीं राष्ट्रें हिंदुस्थानाकडे साभिलाष दृष्टीनें पहात आहेत; अशा वेळीं मागें सांगितल्याप्रमाणे त्यांस चेले बनवून त्यांचा बकासुरी स्वभाव बदलून त्यास शान्त, दान्त करणे व त्यांस वेदान्तधर्माचे ज्ञान देणे ही कामगिरी भावी पिढीवर अवलंबून असल्यानें पूर्वजांच्या बिनमोल व लोकविस्मयकारक कृतीवर नजर देऊन त्याप्रमाणे वागले पाहिजे; तरच आमचा तरणोपाय आहे व प्राचीन ऐश्वर्याची पुनरपि प्राप्ति होण्याची आशा आहे यापेक्षां दुसरें काय ?

प्रकरण १० वें.

भारतीय बांधकाम व खोदकाम.



चीन आर्यावर्तातील अत्युच्च संस्कृतीचे आणखी एक चिन्ह म्हटलें म्हणजे बांधकाम व खोदकाम होय. भव्य देवालये, उंच उंच स्तूप, काळाबरोबर झुंजणारे अभेद्य किल्ले, दीपमाळा, जयस्तंभ, कमानी, कोरीव लेणी, विहार वगैरे सर्व प्रकारची कामे पाहून अर्वाचीन शिल्पज्ञ थक्क होऊन जातात. कांहीं वेळ मनास अशी शंका येते कीं खरोखर अशा अपूर्व व प्रचंड कामाचे जनक तरी कोण असतील ? याची रचना करणारे कोणी तरी राक्षस योनीतिल असावेत असें वाटते. पंचमहाभूताना गुलाम बनवून जी अचाट शक्तीची कामे आज करून घेण्यात येतात त्यापेक्षांही या कामाची बळकटी, प्रचंडपणा, भव्यपणा हे गुण कांहीं अजब आहेत. मिसेस मॅनिंग म्हणते कीं, हीं कामे प्रथम पाहिली म्हणजे यांचें वर्णन करण्यास वाचा असमर्थ होते; परंतु पुढें पुढें जास्त परिचय झाला म्हणजे त्यातील असामान्य विस्मयकारकपणा नाहीसा होतो. परंतु कौतुक व सौंदर्य यांचें मनःपटलावर उमटलेलें चित्र कधींही पुसले जात नाही.

येथील इमारतींचे विशेष म्हणजे बळकटी, टिकाऊपणा, सौंदर्य व भव्यता हे होत. महंमद गझनवीसारख्या अत्यंत कडव्या धर्मांध मुसलमानाने सुद्धां ही गोष्ट कबूल केलेली आहे. तो मथुरा येथे असतांना त्याने खलीफास एक पत्र लिहिलें त्यात तो म्हणतो कीं, महंमदी धर्माइतक्याच येथील इमारती बळकट

आहेत. देवालयांचा नाश, मूर्तींचा उच्छेद व इतर ईश्वरस्वरूपी साकार वस्तूंची हानि हेंच ज्याचे ब्रीद व मुख्य धर्मकार्य त्या महंमद गझनवीने अशी कबूली द्यावी यापेक्षां येथील इमारतीच्या बळकटपणाविषयी दुसरा काय पुरावा पाहिजे ? आज हजारों वर्षे होऊन गेलीं; ऊन, पाऊस, थंडी, वीज, भूकंप आणि इतर अन्य प्रकारचे आघात सहन करून कांहीं इमारती जशाच्या तशा उभ्या आहेत. त्यांच्या सौंदर्यांत अगर भव्यपणात कोणत्याही प्रकारचे न्यून आलेले नाहीं. मि. थार्नटन, प्रो. वेबर, फर्ग्युसन, लार्ड व्हॅलेनाशिया यांसारख्या प्राच्यभाषाकोविद, कलापंडित व मार्मिक टीकाकार यांनीं मनापासून येथील प्रचंड, गंभीर विस्मयकारक इमारतींची यथेच्छ स्तुति करून शेवटी त्याचे यथार्थ व सौंदर्यानुरूप वर्णन करणें अशक्य आहे अशी कबुली दिलेली आहे एल्फिन्स्टन एका ठिकाणी एका इमारतीचें वर्णन करताना म्हणतो कीं, " खाब, गणेशपट्या, खिडक्यांचीं कवाडें व मेहेरपी यांची कामे इतकीं कांहीं सुबक व एकसारखीं केलेलीं आहेत कीं त्यांच्या पट्या साच्यांतून ओतून काढल्या आहेत की काय असा क्षणभर भास होतो. लता, वेली, पुष्पें, मानवाकृति, पशुपक्षी व इतर कांहीं काल्पनिक आकृति हीं सर्व एका ठिआणीं मनोहर रीतीने घालून त्यांचीं कलाकुसरीचीं केलेलीं कामे खरोखर मनास चटका लावून सोडतात. खरोखर भिंती, दरवाजाच्या बाजवा व गणेशपट्या, सुबक कुसरीच्या कामाने व वेलबुट्यानीं इतक्या कांहीं नयनमनोहर केल्या आहेत कीं त्यांची बरोबरी करणारी कामे दुसरीकडे क्वचितच पहाण्यास सापडतील. "

पॉडचरीच्या दक्षिणेस २० मैलावर चलब्रम् या नावाचे एक अति भव्य मंदिर आहे. ३६० फूट लांब, २६० फूट रुंद अशा विस्तीर्ण पटांगणात हे पवित्र भव्य मंदिर असून त्यास एक हजार खाब आहेत; व प्रत्येकाची उंची ६।७ पुरुष आहे. यावरून त्या देवालयाचा आकार केवढा असेल, त्याचे दर्शन किती उदात असेल, याची कोणासही सहज कल्पना होईल असें युरोपियन पंडित डॉ. राबर्टसन व प्रो हरिन म्हणतात; मग आम्हा हिंदूंस त्याचे चित्र मनश्चक्षूसमोर सहज उभे करितां येईल यात काय नवल ? एवढा वेळ दगडी देवालयाविषयीं विचार झाला यापुढे खोदलेल्या देवालयाविषयीं (कोरीव लेण्याविषयीं) जगाचें मत काय आहे ते पाहूं. पांडवकृत्ये अथवा कोरीव लेणी हीं ह्या देशाशिवाय अन्यत्र कोठेंच पहावयास मिळत नाहींत. यांचे ठिकाणी दिसून येणारें कलाकौशल्य व बुद्धिचातुर्य कांहीं अगाध आहे असें प्रत्येकजण निर्मुक्त कंठानें म्हणत असतो.

वेरूळच्या लेण्याविषयीं प्रो. हीरनचा पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेः—"पृथ्वीच्या पृष्ठभागावर व पोटांत शिल्पकलेला जेथें जेथें प्रवेश करून आपलें शोभिवंत काम, सुबकपणा, कसब, उदात्तपणा व गांभीर्य दाखविता येईल तितकें सर्व तिनें या ठिकाणीं दाखविलें आहे या लेण्यामध्यें जिनें, पूल, माड्या, गच्चया, देवालये, खाब, ढलेच (porties) द्वारकमानी, मनोरे, भव्य पुतळे, उठावदार वेलबुट्या (reliefs) वगैरे सर्व कांहीं आहे. याच्या दारात पाऊल टाकताना अंगावर एकप्रकारचा काटा उभा राहिल्याशिवाय रहात नाहीं. वसुंधरेच्या नितांत पोटात वर सांगितलेले सर्व प्रकार पोखरून काढलेले पाहिले, डोक्यावर अत्यंत वजनदार पर्वताचें आच्छादन अवलोकन केलें व त्या प्रस्तरमय भव्य इमारतींच्या दुबळ्या खाबावर नजर गेली व कित्येक ठिकाणीं निराधार भारी ओझ्याचे हे डोंगरी आढे व छप्पर दृष्टीस पडलें म्हणजे ज्याच्या हातून तें निर्माण झाले त्याच्याबद्दल आदर, विस्मय, कौतुक व पूज्यभाव इत्यादि भावना मनामध्ये खेळूं लागतात व जर त्याचे दर्शन होईल तर आपण किती धन्य होऊं, असे विचार मनांत आल्याशिवाय राहत नाहींत." अशाच प्रकारची कारोमाडेल किनाऱ्यावरील सप्तमंदिरे असून त्यांचे शिल्पकाम,मानवी चातुर्य व कसब यांच्या अत्यंत थोरवीचे प्रदर्शन करीत राहील असे म्हटल्यास मिथ्यास्तुति कधींच होणार नाही. हीच स्तुति शब्दशः द्वारकेला लागू आहे.

इजिप्शीयन, ग्रीक आणि हिंदी शिल्पकलेची तुलना करून प्रो. हीरनने असें ठरविले आहे की, स्तंभावर बारीक नक्षी काढणे, वेलबुट्टी खोदून ते सुशोभित करणे, मनुष्याकृतियुक्त दगडी खाब खोदणे व त्यावरही अशींच कौशल्याची कामे करणे या बाबतींत भारतीय आर्यांनीं इतर देशास किती तरी मागें टाकले आहे !

चुनेगच्ची, भरभक्कम टिकाऊ गिलावा करणे, पाखीं व खाब चुन्याच्या पिठाने मढवून त्यामध्यें चित्रें खोदणे, गिलाव्याचे छत तयार करणे, खिडक्या, दारे यांचेवर जाळीचे व थरकशीचें काम करणे, एकाच इमारतीस असंख्य खाब देऊन दगडी तुळ्या पसरणे व अशा रीतीने सर्व काम दगडाने करणे इत्यादि आणखी कांहीं जास्त विशेष मॅनिंग बाईनें सांगितले आहेत.

पुढें ही कला जास्त भरभराटीस बौद्ध धर्माचे काली आली. या धर्माचा प्रसार संबंध हिंदुस्थान, तिबेट, चीन, जपान सिंहलद्वीप व पूर्वेकडील बेटें यात होऊन भिक्षु व भिक्षुणी, श्राविक—का, संन्यासी व शिष्यवटु याना नगराबाहेर

विश्रामस्थाने पाहिजेत म्हणून विहाररूपाने तिचा प्रसार झाला. या निमित्ताने ती हिंदुस्थानांतून बाहेर जाऊन तिचा परिणाम मुसलमानी कमानी व ख्रिस्ती प्रार्थनामंदिरें याजवर सुद्धां झालेला दिसतो, असें प्रो. वेबर व कर्नल टॉड यांचें म्हणणें आहे.


पुढे मुसलमानांनी आपले स्वतंत्र शिल्पशास्त्र इकडे आणले, परंतु त्याचा व हिंदी कलेचा संयोग झाल्याबरोबर दुसऱ्याचाच ठसा पहिल्यावर पडला. याचे उदाहरण म्हणजे दिल्ली शहरातील सुप्रसिद्ध माशिदी,आग्र्याचा ताजमहाल, ग्वाल्हेरचा राजवाडा ही होत. ही कामे, त्याप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानातील देवालयें; कार्ल्याचीं व अजिंठ्याचीं कोरीव लेणी, या ठिकाणी संगमरवरी दगडात खोदलेल्या वेलबुट्या, काटकोणाकृति जाळीचीं नकशी आणि काश्मिरातील इमारतींत अवयव व रंग याचें प्रमाणबद्ध संमेलन पाहिले म्हणजे मनात अतिशय आदर उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यापासून भावी शिल्पज्ञाना सौंदर्य व गाभीर्य या बाबतींत फारच शिकण्यासारखे असून कदाचित् इंग्लंडमध्ये शिल्पकलेची स्फूर्ति व नवीन अभिरुचि याजपासून उत्पन्न झाली असेल असें प्राजलपणें कोलमन व सर हंटर यानीं कबूल केले आहे.

कर्नल टॉड् या प्रख्यात रजपूत लोकाच्या इतिहासकाराने बरोला येथील देवालयाचे विस्तृत, हुबेहुब व चित्ताकर्षक शब्दचित्र दिले आहे. तो म्हणतो की, अशा सुंदर देवालयाचें सौंदर्य, गाभीर्य, तेजस्विता, ओज व मनोहारित्व याचे यथार्थ वर्णन करणे हे जरी लेखणीचे काम असले तरी तिला शीण आल्याशिवाय रहात नाही. कारण, जेथे प्रत्यक्ष शिल्पकलेचीच परमावधि झाली, तेथे लेखणी काय करणार ?

अशा इमारती हिंदुस्थानच्या सर्व भागात आहेत. ज्याना विद्या नसेल, ज्याचें मन सुसंस्कृत बनले नसेल, वेदान्त, तत्त्वज्ञान, धर्म हे कळून घेण्याचे ज्यास अवसान नसेल, त्यानी आपल्या पूर्वजांच्या कृतीची ही जगन्मोहक स्मारके एकवार पाहून आपण पैतृक ऋणातून अंशतः तरी मुक्त व्हावे. त्याच्या सान्निध्यांत असताना पूर्वजाची बुद्धि, साहस, चिकाटी, अभिरुचि, परिश्रम, ज्ञानलालसा इत्यादि बाबतींत अणुमात्र स्फुरण झाल्यास मोठाच लाभ झाल्यासारखा होईल; निदान पुण्यस्थलाच्या दर्शनानें नेत्र पुनीत होऊन, समाधान पावतील, मनास शांति मिळेल, चित्तात चमत्कृति उत्पन्न होईल व हृदयात मानवी जीवनाच्या उदात्तपणाचें प्रतिबिंब पडेल, हा काय लहान लाभ आहे ?

प्रकरण ११ वें.

वीणकाम.



बुद्धीची कुशाग्रता, मानसिक विकासाची श्रेष्ठता, नेत्राचा सूक्ष्मभेदीपणा, श्रवणाचा नाजूकपणा, अभिरुचीचे श्रेष्ठत्व, हस्ताची बारकाई, कामधंद्यात लागणारी शीघ्र ग्राहक शक्ति इत्यादि थोर गुणांनी दोनशे वर्षांपूर्वी हिंदू लोकांनी काव्य, नाटक, कथा, पुराण इत्यादि वाङ्मयात्मक कामात व चित्रकला, गाणेबजावणे, शिल्पकाम वगैरे ललितकलांमध्येच नैपुण्य संपादिले होते असे नाही; तर कलाकुसरीचे नक्षीकाम, खोदकाम, वीणकाम कलाबतूचें, जडावाचे काम, आंतकाम, रसकाम, धातुकाम, कृषिकार्य, खनिज धातु काढण्याचे काम, संशोधन काम, रंगकाम इत्यादि इत्यादि सर्व प्रकारची सुधारलेल्या देशात होणारी कामे त्याच्या हातून फार नाजूकपणाने व सुबकपणाने होत असत, एवढेच नव्हे तर बाह्य देशातील लोक येथें येऊन त्या कला शिकून स्वदेशी परत जात, कलाकौशल्याच्या कामात हिंदू लोकांचा हात धरणे महामुष्किलीचे आहे अशी सर्वांची समजूत होती, परंतु त्या पिढीजाद कसबी लोकाचा नाश खुल्या व्यापारपद्धतीने झाला. संरक्षक जकातीच्या अभावाने, बुद्धिपुरःसर कारागिरांच्या नाशाने, स्वजातिविषयक प्रेमाने, भेदभावानें, अन्यायमूलक सवलतीने व इतर अन्य कारणांनी येथील हुन्नरकला १००–१२५ वर्षांच्या अवधीत साफ बुडून मागील कलाश्रेष्ठतेची आठवण सुद्धा बुजत चालली. स्वाभिमान नष्ट होऊन, आत्मविश्वास पार मावळत चालला. जिकडे तिकडे नैराश्य, दारिद्र्य, परावलंबीपणाचे काळेकुट्ट ढग पसरून, अज्ञानाचा पूर्ण अंधकार समाजाच्या कोनाकोपऱ्यात पसरून राहिला आहे. आत्मनिंदेने भरलेले शब्द कर्णप्रातावर धाडधाड येऊन आदळत आहेत, लोक किंकर्तव्यतामूढ होऊन हताश होत्साते मंदधी व जड बनत चालले आहेत. अशा वेळीं त्यास प्रस्फुरित करून सुपथावर आणून सोडण्याचें सामर्थ्य जरी आपल्या अंगी नसले तरी अशा स्थितींत प्राचीन वैभवाच्या गुणाधिक्याच्या, उत्तम स्थितीच्या दोन

सुखद गोष्टी सांगून त्यास धीर दिल्यास, त्यायोगे आपोआप त्यांस स्फुरण होऊन त्याच्या मधून कोणी शककर्ता निर्माण होईल; नाहीं तर निदान अपाय होणार नाही हें खास; झाला तर उपायच होईल. सबब मशागतीचे काम करण्याचें आम्ही योजिलें आहे. सध्यां जरी अज्ञानाचे दाट आवरण सर्वत्र पसरून हिंदू समाजातील शिल्पज्ञ-रत्नें त्यांत अगदी गाडली गेलीं आहेत. तरी अशा प्रकारचें काम कोणी हातीं घेतल्यास ते पुनरपि वर येऊन स्वतेजाने जगाचे नेत्र दिपवून टाकल्याशिवाय राहणार नाहीं काहीं लोकांस वाटतें कीं, हिंदुस्थानामध्यें कलाकुशलतेचा नायनाट झाला, तसें आम्हास वाटत नाही; परंतु या वेळीं आम्हांस चालू परिस्थितीसंबंधीं काहीं लिहावयाचे नसून प्राचीन काली येथील कलाकौशल्याची व हुन्नराची काय अवस्था होती हेच मुख्यत्वेकरून पहाणे आहे.

प्रथम आपण वीणकामच घेऊं, व त्यात येथील हवामान, कारागिराचे हस्तलाघव, नयनचापल्य, साधनसामुग्रीचें अल्पत्व व साधेपणा, पिढीजाद संस्कार व संवय याचे प्राचुर्य याविषयीं युरोपीयन इतिहासकार काय म्हणतात तें पाहूं. जेम्समिल व ऑर्म हे प्रख्यात इतिहासकार म्हणतात कीं, हिंदू लोक हे जरी शरिराने कृश, नाजूक, सडपातळ असले तरी त्यांची दृष्टि फार खोल, बारीक वहिवाटलेली आहे. हातांचीं बोटें अत्यल्प, संवेदना जाणण्यास पूर्ण समर्थ असून, चपळाई, सफाई व लवचिकपणा या बाबतींत बिनतोड आहेत. रेशीम कातण्याचे धंद्यात हिंदी कारागिराच्या स्त्रिया इतक्या पटाईत आहेत कीं, रेशमाच्या एका लहानशा कोशापासून वीस प्रकारचे सूत त्या हांहा म्हणतां कातितात. हें काम त्याच्या इतकें अंगवळणीं पडले होते कीं, वीस प्रकारच्या सुताच्या नमुन्यातून कोणतीही एक तऱ्हा एकदम कानण्यास सांगण्याचा अवकाश कीं, जरी पूर्वी निराळ्या प्रतीचा धागा लागला असला तरी तो एकदम बदलून बोलबोलता त्या मागितलेला धागा काढून देतील.

प्राचीन काली तरी असा समज असे कीं, इतर कोणत्याहि खंडांतील लोकांपेक्षा हिंदू लोक हे हस्तनेत्रादिकाचा खुबीदारपणा, कोमलता, नाजूकपणा, इत्यादि बाबतींत श्रेष्ठ असून वीणकामामधील धिम्मेपणा, चिकटपणा, सोशिकपणा, कल्पकता आणि व्यापारी जिन्नसाचे पैदासीचे कामी लागणारी हुशारी, तरबेजपणा व पटुत्व या गुणामुळे नांवाजलेले होते. अशा कामास लागणारें हवामानाचे आनुकूल्य येथे आहे व नैसर्गिक पदार्थांचीहि रेलचेल आहे. म्हणून इतर द्वीपस्थांना यांचेविषयीं हेवा, आदर व आश्चर्य वाटल्यास त्यांत कांहीं वावगे नाहीं. या देशातील कापूस फारच श्रेष्ठ दर्जाचा मानला जाई.

हल्लीं इजिप्त व अमेरिका हे देश कापसाच्या उत्कृष्ट निपजेत अग्रेसर आहेत. परंतु प्राचीन कालीं सर्वच स्थिति उलट होती. त्या कालात येथील कापूस त्याच्या गुणाबद्दल अत्यंत नाणावलेला होता. ख्रिस्ती धर्मयुद्धापासून या देशातील कापूस प्रथम युरोपात जाऊन तेथून तो अमेरिकेंत गेला आहे. अरब लोक त्या कालीं युरोप व हिंदुस्थान या दोन खंडामधील व्यापाराची ने-आण करीत व त्यांचे भाषेमध्यें कापसाला असलेल्या कुटा (Kuta) नामावरून इंग्रजी कॉटन (cotton) शब्द निघालेला असावा, असा अंदाज आहे. अशा उत्कृष्ट कापसापासून त्या वेळीं सुंदर, सुबक, तलम, नाजूक पातळ, पिळदार टिकाऊ कापड विणत असून त्याचा खप त्या वेळीं ज्ञात असलेल्या सर्व जगात होत असे. कांहीहीं करून, कितीहि किमत पडली तरी ती देऊन येथील मोहक झिरझिरीत, झगझगीत, खुमासदार कापड घेण्यासाठीं इतर द्वीपातल्या राजे लोकांना. सरदारउमरावांना, धनाढ्य व्यापाऱ्यांना उत्कंठा लागलेली असे, असे मिल्ल, एल्फिन्स्टन, मूरे, थार्नटन त्याच्या लेखावरून दिसते डाक्क्याची मलमल तर जगप्रसिद्धच आहे तिच्याबद्दल अशी गोष्ट सांगतात कीं, एकदा अवरंगजेब बादशहा आपल्या मुलीस दाक्षिण्याभावाबद्दल रागे भरून म्हणाला कीं, " मुली हें काय ? त्वा आपलें सुकुमार व नाजूक शरीर वस्त्राच्छादित करून पुरुषाच्या दृष्टीस पडावे, असे करणे हें उचित नव्हे काय ? " त्यावरून ती मोठ्या अदबीनें म्हणाली कीं, " बाबा, एकावर सात जामे मी नेसल्यें आहे, परंतु त्याच्या पातळपणामुळे व नाजूकपणामुळें त्या सातही वस्त्रातून माझे शरीर दिसते त्यास मी काय करूं ? " ही कथा दंतकथा असून बॉथ याच्या " डाक्क्यांतील कापसाचा धंदा " या पुस्तकातून घेतली आहे. डा. वाटसन् याने इंग्लंड व हिंदुस्थान या देशांतील कापसाच्या कापडाच्या निरनिराळ्या जातींचा अभ्यास करून येथील कापड इंग्लंडांतील यंत्रनिर्मित कापडापेक्षा जास्त पिळदार व टिकाऊ आहे, असें ठरविले आहे.

काश्मीरच्या शालीविषयी हल्ली सुद्धां सर्व युरोपभर प्रख्याति आहे. येथे वाफेने चालणारीं यंत्रे पूर्वी नव्हती व हल्लीही कोष्टी व एतद्देशीय कारागीर तीं वापरीत नाहींत; तरी सुद्धा मागाचा धंदा येथे इतक्या पूर्णावस्थेस पोंचला होता कीं, त्यांतील मालाच्या नाजूकपणाचे, तेजस्वीपणाचे व सुंदरपणाचे बाबतींत प्राचीन देशापैकीं कोणालाही हिंदुस्थानची बरोबरी करवली नाही. त्याचप्रमाणें गालीचे, सतरंज्या, किनखापी कापड यांचा गोष्ट. गालीचे मच्छलीपट्टण येथे फारच नामी

होत असत व त्यांची निपज, हिंदी अभिरुचि व दृष्टि यांना अनुरूप होत असे. हल्लीं कैद्यांना तुरुंगात जाडेभरडे, ओबडधोबड, बेढब व बैठकीवजा गालीचे विणण्यास शिकवितात, त्यावरून मॅनिंग बाई म्हणते की, जेथें अशा उत्कृष्ट प्रकारचे गालीचे तयार होत तेथील कैद्यांना मोठ्या परोपकारबुद्धीनें ओबडधोबड व जाडेभरडे गालीचे विणण्यास शिकविण्याचे दिवस यावे, याला दैवदुर्विलास याशिवाय दुसरे काय म्हणावे !

डॉ. फॉबेस, वारसन सारख्या वाणकाम-तज्ज्ञानें अहर्निश हिंदुस्थान व युरोप येथील सणंगाचा अभ्यास करून निःपक्षपातबुद्धीनें व नाइलाजानें असे म्हटलें आहे कीं, " खरोखर धन्य आहे हिंदू कारागिराची ! आधुनिक यत्रसामुग्रीची जोड नसता केवळ साध्या मागावर इतकें सुबक कापड कसे काढीत कोणास ठाऊक ! त्यांची हत्यारें व साधनें पाहिलीं, तर तीं साधीं, आणि चालू काळास व शोधास विसंगत दिसतात. परंतु त्याच्या चतुर हातास, कुशल डोळ्यांस व सरावलेल्या मनास तीं पुरेशीं आहेत असें वाटतें. उपयुक्तता, सौंदर्य, मोहकपणा, खुमारी इत्यादि गुण पाहिले तरी त्याही बाबतींत ते वरचढच. तेव्हा हा प्रश्न कसा सोडवावा हें मोठें कोडेंच आहे, यात शंका नाही. "

इतका वेळ सुती, लोकरी व रेशमी वाणकामाची हिंदुस्थानात प्राचीन काळीं काय स्थिति होती, येथील कारागराचे नैपुण्य किती होते व साधनसामुग्री कशी साधी होती हें सांगितलें; परंतु रंगीत कापडाबद्दल काहींच सांगितलें नाहीं. यापुढें रंगीत कापड, घडीव कामे, हिऱ्यामोत्यांच्या जडावाची कामे व इतर हराजेन्नसी हुन्नर याचा संक्षेपतः विचार करू.

दागदागिने करणें, हस्तीदंताचीं शोभिवंत, सुबक व नाजूक कामे करणें, पशुपक्षी, वेलबुट्टी, पाने, फुले, मनुष्य, देव यांचीं हस्तीदंती चित्रे व मूर्ति करणें, त्याचप्रमाणें दागदागिन्यावर तीं कोरणें, अंगठ्यांसारख्या सूक्ष्म ठिकाणी तीं बसविणें, भिंती, कागद, कापड यावर तीं रंगाने काढणें, चंदन, शिसवे व इतर योग्य लाकडावर तीं रंगानें काढणें व कोरणें इत्यादि बाबतींत हिंदू कला अद्यापही राष्ट्रास हार गेलेली नाही. मग ज्या काळीं हिंदू राज्यें होतीं, राजाश्रय मोठा होता, धनिक लोक शोकी होते, अमीर-उमराव, सरदार, मानकरी यास त्यांची हौस व शोक होता, संपत्ति विपुल होती, बाह्य देशाचीं चढाओढ नव्हती, देशात शांतता असून जातिविशिष्ट धंद्यास मान होता त्या कालाची गोष्ट कशाला !

कापडाप्रमाणेंच येथील रंगाविषयीं फार पूर्वीपासून प्रसिद्धि आहे. त्यांचे मुख्य गुण म्हणजे तजेला, चमक, कायमपणा व अपुसटपणा हे होत. हे रंग वनस्पतीपासूनच मुख्यतः काढीत असत. हल्लींप्रमाणें खनिज रंग व कोळसा रंग हे पूर्वी बहुधा मुळींच ठाऊक नव्हते. रंगाचीं सर्व कामें वनस्पतीपासून काढलेल्या रंगापासून होत असत. असे रंग वनस्पतीपासून निरनिराळ्या पद्धतीनीं काढणें, त्यांचा साख धरणे, त्याचा कापडावर ठसा मारून चीटे बनविणें, सूत रंगविणे वगैरे सर्व कामें साध्या, सोप्या पद्धतीने कारागीर लोक आपल्या मोडक्यातोडक्या घरात पोराबाळांकडून अथवा बहिणीबायकाच्या हस्ते करवून घेत. मात्र त्यांचा रंग एकदा बसला कीं कधीं काळी निघण्याची आशाच नको कच्चा रंग, पक्का रंग वगैरे सर्व तऱ्हा आणे निरनिराळ्या छाया व छटा याचे संमिश्रण व लेपनकार्य इतक्या खुबीने होई की, त्या कापडाची ती झकाकी, तेज, मनोहारित्व, छटाविलास पाहिला म्हणजे युरोपच्या पट्टराण्या रुसून बसत व त्याची समजूत काढण्याकरितां त्याची हौस, लज्जत, अभिरुचि व कल पाहून येथील व्यापारी व कारागीर तसा माल काढून त्याची समजूत करीत व अलोट संपत्ति ओढीत, या रोमन इतिहासकाराच्या कुरकुरीचे मर्म आता ध्यानी येते अशी संपत्ति परदेशांतून इकडे किती येई ? हा व्यापार कोण करीत असे ? तो कोणत्या मार्गाने होई ? याचे सविस्तर वर्णन पुढील एका स्वतंत्र प्रकरणात करण्याचे असल्याने त्याविषयीं येथें हात आखडता घ्यावा हे बरें. मात्र एवढी गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे कीं, प्रथम वनस्पतीपासून रंग काढण्याचा कला हिंदू राष्ट्रानेच शोधून काढली व याचे उत्तम निदर्शक ' इंडिगो ' हा शब्द होय. वास्तविक नील हा शब्द हिंदुस्थानात सर्वत्र रूढ असता येथील नील या शब्दाचे असे रूपांतर कसे झालें याबद्दल सर्वांस आश्चर्य वाटेल; परंतु ग्रीकांनी इंडिया या शब्दावरून इंडिगो असा शब्दप्रयोग केला व त्यावरून हल्लींचा इंडिगो हा शब्द रूढ झाला असला पाहिजे प्रो. विल्सन, एल्फिन्स्टन, डॉ. टेनेंट मिल्ल, बॅक्राफ्ट, हीरनप्रभृति पंडितांनी रंगोत्पत्तीच्या बाबतींत दिसून येणारी श्रेष्ठता अर्धवट आश्चर्याने, अर्धवट नाइलाजाने कबूल केली आहे.

प्रो. विल्सनसाहेबाने लोखंडाच्या कामाविषयी पुढील उद्गार काढले आहेत. " लोखंडाच्या ओतकामाची कला हिंदुस्थानात किती वर्षांपासून रूढ आहे हें काही निश्चित सांगवत नाही. इंग्लंडात ती कालपरवा सुरू झाली असें हिंदुस्थानच्या इतिहासाकडे दृष्टि दिली म्हणजे वाटते. कारण हिंदुस्थानात ओतकाम, घडकाम, तारकाम, पोलादकाम ही सर्व कामे फार वर्षांपासून होत आहेत. "

लोखंडास मऊ, चिवट व बाकदार करणे व नंतर त्यापासून पोलादी पाणीदार हत्यारे बनविणे ही कला हिंदूंस कोणी शिकविण्याची जरूरी नाही. डॉ. रॉय म्हणतो की, जरी डमास्कस येथील तरवारींच्या पात्यांची सर्वत्र कीर्ति गाजलेली असली तरी ती कला इराणी लोकांनी येथून नेली असून त्याच्यापासून त्यातील रहस्य अरबांनी ताडले. दिल्लीमधील कुतुबमिनारच्या पुढे असलेला भव्य स्तूप आज १५०० वर्षांवर तेथे उभा आहे; त्यावर, वारा, पाऊस, ऊन, थंडी यांचा सारखा मारा होत असता त्याजवर गुंजेएवढा गंज चढलेला नाही; त्याच्या मूळच्या सौंदर्यात किंमाप न्यूनपणा आलेला नाही अथवा त्यावरील कोरीव लेख यत्किंचित् सुद्धा मलीन झालेला नाही. त्याचप्रमाणे जगन्नाथपुरी येथील प्रचंड लोखंडी पट्टे, सोमनाथचे नक्षीदार व खलंकृत लोखंडी दरवाजे, नरवारची २४ फुटी तोफ ही सर्व मोठ्या मूक घोषाने प्राचीन कालातील हिंदूंच्या धातुकलाप्राविण्याबद्दल साक्ष देत आहेत. तसेच कनरुक (kanaruc) येथील देवळाच्या पाय्यास लावलेले लोखंडी वासे पाहिले म्हणजे येथे लोखंड ओतण्याची कला किती वर्षांपासून अवगत होती याची खात्री पटते व त्याचा सर्वत्र उपयोग होत होता हेही त्यावरून कळून येते. असतु. कुतुबमिनार पुढल्या स्तूपाचा एक तुकडा घेऊन त्याचे डॉ. मूरे व पर्सी यांनी निरनिराळें रासायनिक पृथक्करण केले असता त्यातच इतर धातूंची भेसळ नसून तें शुद्ध प्रसरणशील लोखंड आहे असे आढळून आले. इतक्या उत्तम दर्जाचे लोखंड इतक्या वर्षांपूर्वी हिंदुस्थानात तयार होत असे हे पाहून कोणास अचंबा वाटणार नाही ? आणि तें असल्या प्रकारचे होते म्हणूनच वर दिलेले लोखंडी स्मारकरूप जिन्नस आज जशाच्या तसे व मोडतोडीविना हयात आहेत. ग्लासगो व शेफिल्ड येथील लोखंडी जिन्नस व कारखाने प्रख्यात असून तेथल्यासारखे जिन्नस पूर्वी कच्छ येथे होत असत असे मॅानगबाई म्हणते; व पुढे तिचे म्हणणे असें आहे की, पूर्वी हिंदुस्थानांत गरजेपेक्षा जास्त लोखंड पैदा होत असल्याने तें फोनिशियन व्यापारी घेऊन जात असत.

आणखी काहीं किरकोळ गोष्टी सांगून हें प्रकरण बंद करूं. पींकपेरणीचा क्रम ही कला हिंदू शेतकऱ्यांस जात्याच इतकी परिचयाची झाली आहे की, त्यांत कांहीं शास्त्रीय भाग व महत्त्व आहे असे त्यास वाटत नाहीं. मात्र खरी गोष्ट तशी नसून हल्लींच्या शास्त्रीय व चिकित्सक दृष्टीने त्यात बरीच सुधारणा होणें शक्य आहे, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. परंतु चाल शतकाच्या मागें एकदोन

शतकें जाऊन त्या अशास्त्रीय कालीं या क्रमापासून झालेला फायदा व जमिनीची सुस्थिति पाहिली म्हणजे त्या गोष्टीचे जें जगास कौतुक वाटते ते अगदी सकारण आहे असे वाटल्याशिवाय रहात नाही. त्याचप्रमाणे तावदाने, जरतारी काम, कलाबत्तू व किनखापी काम, गालिचे, जनानी व चिकाचे पडदे, जडावाचे दागिने, नकशीदार व इतर कलाकुसरीचे जाळीदार काम, काच व बिल्लोरी काम, लाकडी काम, तीक्ष्ण धारेचीं पाणीदार हत्यारें, इत्यादि जिन्नसावरून भारतीय कलाप्रावीण्याबद्दल प्रत्येकाची खात्री झाल्यावाचून राहणार नाहीं. ज्याच्या सुबकपणाची व मोहकपणाची नक्कल करणे अशक्य आहे अशीं वीणकामे, मौक्तिकरत्नजडित दागिने, भरजरीच्या जिन्नसाचे नमुने, मूल्यवान नक्षीदार कामे, अपूर्वरंग मिश्रणाने सजविलेले गालिचे, रंगाचा [illegible] व विलक्षण प्रभा यामुळे तेजस्वी दिसणारी (enamel) मिनाची काम, कमानी, मेहरपी, वेलबुट्या व जाळ्या इत्यादि कोरून तयार केलेले लाकडी जिन्नस, चित्रविचित्र मोलवान शस्त्रे इत्यादि पदार्थांचे नमुने १८५२ सालच्या आंतरराष्ट्रीय लंडनच्या प्रदर्शनात मांडले होते. ते पाहून पाश्चात्य कलाप्रवीणांनी माना तुकविल्या, आश्चर्यचकित होऊन भारतीय कलाप्रावीण्य ठामपणें कबूल केले, व डॉ. फार्बस वाटसन्सारखे कलातज्ज्ञ असे म्हणू लागले कीं, इंग्लंडातील कारागिरांने हिंदुस्थानातील प्रत्येक कलाकौशल्याची वस्तु पाहून त्याप्रमाणे आपल्या मालाचे व नमुन्यात फरक केला पाहिजे. अशा रीतीने अहंमन्य पाश्चात्य कलाप्रवीणांकडून व कारागिरांकडूनही मूकप्रशस्ति हिंदी कलेने आपल्या अनाथ, दुबळ्या व अज्ञानी कारागिरास मिळवून दिली आहे. तिचा येथे थोडक्यात सारांश दिला आहे. ज्यास इच्छा होईल त्यानें ज्या पुस्तकांतून ही माहिती मिळविली आहे तीं सविस्तर वाचावीं व आपल्या भारतीय कलेचे विचित्र झालेले शिर वर करून त्याबरोबर आपली कीर्ति वाढवावी व स्वतंत्र आणि बाणेदार चारित्रकलेचा मार्ग सुधारावा. हे प्रत्येक कलाप्रेमी जनास नम्रतापूर्वक सांगणे आहे.

प्रकरण १२ वें.

व्यापार आणि संपत्ति.



इतर कोणत्याही गोष्टींपेक्षां व्यापाराच्या बाबतींत आज हिंदुस्थानची जी स्थिति दिसून येत आहे तींत व प्राक्कालीन स्थितींत खरोखर जमीनअस्मानाचें अंतर आहे. एक काल असा होता की, युरोप, आशिया व आफ्रिका या तिनही खंडांच्या व्यापाराचीं सूत्रे एकटा भारतदेश हलवीत होता. ज्या देशाने सोन्याचा धूर, कापराच्या मजलसी, अत्तराचे सडे, मोत्यांच्या रांगोळ्या, कस्तुरीचा बुक्का, गुलाल असे श्रीमंतीचे चोचले भोगले त्या देशातील लोकांस स्वतःच्या घरांत हक्काने गरम भाकरीचा तुकडा व घोटभर पाणी सुखाने व स्वतंत्रपणे खावयास मिळूं नये हा दैवाचा कोण दुष्ट खेळ! जेथे स्वतंत्र राज-सिंहासनें अलंकृत झालेलीं असावीं तेथे परराक्षित, बेगडी व दागिनेवजा सिंहासनें आढळावीं, ज्यानीं परदेशीयांस आपल्या व्यापारानें, सुखासमाधानाने लुटावे त्यांजकडून आपण स्वतः पिळून जाण्याचा प्रसंग यावा, तेथे पूर्वी तळपत असलेला ऐश्वर्यरूपी रविराज मावळल्यामुळे अशी ही स्थिति यावी हें केवढें दुर्भाग्य! मार्गील ऐश्वर्यमदाची ही ओहोटी असेल अथवा तर्क करून ही परिस्थितीची कुरघडी कशी झाली याची चर्चा व विचिकित्सा करून तरी काय उपयोग? परंतु असे म्हणून भागत नाही. प्रमादशील मनुष्यस्वभावानुरूप जरी चुका घडल्या तरी त्याचे निरसन करून सुस्थिति संपादण्याकडे मानवी मनाचा कल असतो म्हणून प्राचीन काली आपला दर्यावर्दी व्यापार केवढा होता, येथें जहाजे बांधून त्यातून येथील जिन्नस परदेशात व्यापारी कसे नेऊन घालीत व सुवर्णाचे ढीग या देशात कसे येऊन पडत; खलाशी कोण, व्यापारी कोण; आपला व्यापार कोणत्या मार्गान चाले; कोणकोणते जिन्नस येथून बाहेर जात; जकातीचा व संरक्षणाचा काय व्यवस्था होती; इत्यादि प्रश्न या प्रकरणांत अत्यंत संक्षिप्तपणें विवेचण्याचे आम्ही योजिलें आहे.

पंचतंत्र, हितोपदेशापासून तों तहत महान महान ललितवाङ्मयांतील प्रबंधापर्यंत कोणतेही एक पुस्तक घेऊन त्यातील सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करा

म्हणजे त्यांत एक गोष्ट मुख्यत्वेंकरून लक्षांत येईल ती अशी कीं, येथे धनाढ्य व्यापारी असत; व्यापाराकरितां ते मोठमोठे प्रवास व जलपर्यटने करीत व बाहेरच्या देशातून अपार संपत्ति मिळवून आणीत. उदाहरणार्थ, शाकुंतल नाटकात धनवृद्धि या नांवाचा व्यापारी समुद्रात बुडून बेपत्ता झाला व त्याची पाठभिगें क्रोडों रुपयांची संपत्ति होती असे लिहिले आहे. नलदमयंतीआख्यानात अशाच गोष्टी पहावयास मिळतात; रामायण व मनुस्मृति यामध्ये जहाजाच्या कारणावर कर्ज काढल्या ी उदाहरणे सांगितली आहेत; मनुस्मृतीत बऱ्याच ठिकाणी खुष्कीचे मार्ग, जलमार्ग जमूद केलेले आहेत. व उभय देशाच्या सरहद्दीवर चालणाऱ्या व्यापारात काही तंटेबखेडे झाल्यास ते कसे मोडावे हे सांगितले आहे; व्यापाऱ्यांची एक सुरस कथा दशकुमारचरित्रातही आहे; यावरून एलिफिन्स्टन, सर विल्यम, जोन्स, मॉनिगबाई व प्रो. हीरन यांनी हिंदू लोक मोठे धाडसी, दर्यादिल व्यापारी असले पाहिजेत म्हणून जे ठोक सिद्धान्तरूप विधान केले आहे ते अगदीं अक्षरशः खरे आहे. कारण तत्कालीन समाजाचा आदर्श म्हणून जर तत्कालीन वाङ्मय मानण्यास आम्ही तयार असतो तर त्याजपासून निघणारे सिद्धान्त हेही प्रत्येकाला मान्य असलेच पाहिजेत. सबब वरील सिद्धान्ताविषयीं कोणी शंका घेईल असे मानण्याचे मुळींच कारण दिसत नाही.

येथील व्यापारी लाब पल्ल्याच्या फेऱ्या करीत, समुद्रावर वर्षानुवर्षे काढीत, व जहाजे भरून संपत्ति घेऊन परत स्वदेशी येत; अशाच प्रकारची गोष्ट आपणास सत्यनारायणाच्या कथाप्रसंगी सांगण्यात येते. हा एक सिद्धान्त मान्य केल्यावर ओघानेच येथे जहाजे बांधण्याचे कारखाने असले पाहिजेत असे मानावे लागते. प्रो. मॅक्स उंकर म्हणतो कीं, अशा प्रकारचे जहाजें बांधण्याचे कारखाने येथे असून, येथील व्यापारी बहुतेक सर्व युरोपखंडाशी व्यापार करीत असत. फार प्राचीन काळापासून फीनीशियाशी हिंदुस्थानचा व्यापार होता. किस्तो सनापूर्वी दहाव्या शतकात इस्त्राईल लोकाचा सालोमन व टायरचा हीराम या दोघांनी हिंदुस्थानास जहाजे पाठवून येथून हस्तदंत, चंदन, माकडे, मयूर, सोने, हिरे इत्यादि पदार्थ 'ओफीर' जातीपासून खरेदी करून नेले. आता 'ओफीर' हा शब्द बरेच दिवसापासून वादाचा विषय होऊन बसला आहे व त्यावरून हिंदी व्यापाराचा बाह्य देशाशी असलेला संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. तेव्हा या मजेदार शब्दाविषयी थोडीशी हकीगत देऊ. टॉलेमीच्या मताप्रमाणे 'आभारिया' (Abhiria) नावाचा देश सिंधु नदीच्या मुखाशी होता. अर्थात्

अभिरिया देशाच्या नांवावरून त्यांत आभीर लोक रहात असावेत हे उघड दिसतें. हल्ली काठेवाडात 'अभीर' नावाच्या लोकाची एक जात आहे व ही जात आणि टॉलेमीने सांगितलेली जात एकच असावी असे अनुमान करण्यास स्थानसादृश्यामुळें व सान्निध्यामुळे मुळींच हरकत नाहीं असे दिसते प्रो. लासेनच्यामते 'ओफीर' नामक बंदर नैऋत्य किनाऱ्यावर असावे आणि मॅनिंगबाई म्हणते कीं, ते पश्चिम-किनाऱ्यावर असले पाहिजे याशिवाय स्मिथच्या बायबलकोशाचे कर्ते यांनी ही जात आफ्रिकेच्या भागात कोठे तरी असावी असे अनुमान ठोकून दिले आहे. त्या एका शब्दाविषयीं इतके विसंगत तर्क लढविलेलेले पाहिले म्हणजे मन साशंक होऊन मुख्य प्रश्नास बळकटी येणे बाजूला रहातें. अर्थात् ज्या मानाने हा 'ओफीर' शब्दाचा उलगडा होईल त्या मानानाने येथील परदेशाशा होणाऱ्या व्यापाराबद्दल निश्चितपणा येईल. याकरितां 'तार्शीश' Tarshish) व्यापारी लोकांनी जो माल खरेदी केला त्यांतील जिन्नसाच्या यादीवरून तो हिंदुस्थानातील. आफ्रिकेतील अथवा अन्य देशातील हे ठरविणे सोपे आहे. सर्व जिन्नसांची लावलचक यादी वगळून 'सालोमन' व 'हिराम' यास हिंद व्यापाऱ्यांनी पाठविलेली अशी एकच वस्तु आपण घेऊ की त्यावरून सर्व प्रश्नाचा छडा लागून मुख्य सिद्धान्त बळकटपणे प्रस्थापित होण्यास मदत होईल तो वस्तु म्हणजे मोर होत. त्या काळांत हिंदुस्थानाखेरीज कोठेही हे पक्षी सिद्धत नसत. अलेक्झांडरच्या स्वारीपूर्वी हे पक्षी ग्रीस, रोम अथवा इजिप्त येथे बिलकूल माहीत नव्हते. ते त्याने ह्या स्वारीनंतर आलेल्याबरोबर स्वदेशी नेले. पुढे पुढे ह्या सुंदर पाखराचा शोकी व डंगी रोमन लोकामध्ये इतका बडेजाव वाढला कीं, सरदार घराण्यांतील मजवानींच्या प्रसंगी मोराच्या जिभेचा डिश असे. मिष्टान्नभोक्ते व विलासी सरदार आपल्या विद्रिणींचा रुसवा मोराच्या कोवळ्या लुसलुशीत जिव्हानी काढीत असत. अशा प्रकारची चैन वाढण्यास व प्रथमतः तो उत्पन्न होण्यास राजवाड्यात काढलेली सुंदर चित्रे, नाटकात लिहिलेली वर्णने व अन्तःपुरात व विहारगृहात ठेवलेली ही पाखरें कारणभूत झाली. 'सालोमन' व 'हिराम' यांनी हे पक्षी हिंदुस्थानातून पैदा केले यास बळकट पुरावा आहे ऑक्सफर्ड, जेसेनियस, इमर्सन, टेनेंट व प्रोफेसर लासेन या सर्व पंडितांनी एकमताने असे कबूल केलें आहे की, हिब्रू भाषेतील मयूरवाचक शब्द मूळ संस्कृत शब्दावरून तयार झाला आहे व परदेशातील लोक, प्रत्यक्षपणे त्याची हिंदू लोक करीत असलेली मजा पाहून, मोहीत होऊन गेले व त्यानीं येथून हे मोहक पाखरें स्वदेशी नेले.

जशी मोराच्या व्यापाराची मजेदार हकीगत वर दिली तशीच हस्तिदंताचीही आहे. हे दोन्ही जिन्नस पूर्वी व्यापाराचे मौल्यवान् पदार्थ होते व त्याचे मूलस्थान हिंदुस्थान हे निश्चित झाले म्हणजे परदेशी व्यापारी ते येथून नेत व भारतीय प्राचीन व्यापार, भूमध्यसमुद्राच्या लगतचा युरोपचा भाग, आफ्रिकाद्वीपकल्प येथपर्यंत पसरला होता, हें सिद्ध करण्यास सोपें जाते. म्हणून हस्तिदंताविषयीं याच उद्देशाने चार शब्द जास्त लिहिणे उचित आहे.

हिंदुस्थान व आफ्रिका या दोन्ही द्वीपात हत्ती पुष्कळ सापडत असत. परंतु ते धरून पाळणे, त्यास माणसाळवणे, त्याचा विलासाचे प्राणी म्हणून उपयोग करणे हे सर्व चैनीचे प्रकार फक्त हिंदुस्थानातच माहीत होते. आफ्रिकेत यापैकी कोणताही प्रकार ठाऊक नसे. हिंदुस्थानातील राजे लोकाच्या अठरा कारखान्यांत गजशाळा म्हणून एक स्वतंत्र भाग असे. राजलक्ष्मीचा गजलक्ष्मी म्हणून एक प्रकार असे; राज्यवैभवाचे हे चिन्ह असल्याने आपआपल्या ऐपतीप्रमाणे लहान मोठे सर्व सरदार काही हत्ती बाळगीत असत व त्यास 'इभ' असे म्हणत. याच 'इभ' नावाने हस्तिदंताचा हिंदी बाजाराच्या पेठात मोठा क्रयविक्रय होत असे. हिंदुस्थान, असीरिया, इजिप्त, ग्रीस, रोम येथे या पदार्थांची फार आवड असल्याने, त्या काली त्याचा फार खप होत असे. लासेनच्या मताप्रमाणें इजिप्शियन लोकास हत्ती बाळगणें, माणसाळवणें वगैरे उद्योग माहीत नसल्यानें, त्याच्या भाषेत असलेल्या हस्तिदंतवाचक 'एबू' शब्दाची उपपत्ति 'इभ' शब्दापासून लावण, हें योग्य दिसते. मॅनिगबाई म्हणते की, ग्रीस व इजिप्त या देशात हास्तिदंतवाचक शब्द इभ शब्दापासून तयार होऊन नंतर त्याचे एलिफास हे रूपांतर झाले असले पाहिजे. परंतु एलिफास या शब्दाची खरी उत्पत्ति मात्र कळत नाही. होमरच्या पूर्वी हस्तिदंताचा उपयोग ग्रीस देशात माहीत होता. व खुद्द होमर हा सुद्धा आपल्या काव्यात त्याचा पुष्कळ वेळा उल्लेख करितो. परंतु ग्रीक लोकांना आरबेलाच्याच कारकीर्दीत हास्तदंत हा पदार्थ प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला, असे इतिहासावरून दिसते. डरायसच्या सैन्याबरोबर असे पुष्कळ हत्ती होते व ते माहुतासह हिंदुस्थानातून आणलेले होते, असें इतिहासांतरी नमूद आहे. एलिफास या हस्तिदंतवाचक शब्दावरून ह्या द्विदन्ती भव्य प्राण्यास ग्रीक लोकांनी पुढें तेंच नाव दिलें व ॲरिस्टाटलनें ते आपल्या जोरदार लेखणीने रूढ केले. एकंदरीत सर्व विवेचनाचा निष्कर्ष एवढाच कीं, हस्तिदंत हा पदार्थ व मोर हा प्राणी परदेशी व्यापारी हिंदुस्थानांतून नेत व येथे ते उत्तम पैदा होत असत.

ग्रीक लोकांना साखरेचा उपयोग प्रथम हिंदुस्थानातच माहीत झाला. शर्करा या संस्कृत शब्दापासून ग्रीक भाषेतील शुगर शब्द झाला आहे व अरबस्थान आणि इराण या देशातून प्रवास करीत असतां मूळ शब्दप्रयोगात इतका फरक होणे अगदी साहजिक आहे.

सेल्यूसीडांच्या कारकीर्दीत हिंदुस्थान व सीरीया यामध्यें फार जोराचा व्यापार सुरू होता. फोनिशिया, इराण, बाबीलोन, टायर इत्यादि तांबडा समुद्र याच्या लगतच्या देशांत भारतीय लोखंड, उंची वस्त्रे, चिटे इत्यादि पदार्थांचा व्यापार फार जारीने चालत असे. परंतु हे ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध करण्यापूर्वी इजिप्तपाशीं हिंदुस्थानचा असलेला व्यापारी संबंधच प्रथम ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध करूं, म्हणजे मालाहून या देशापासून वर दिलेले देश लाब नसल्यानें त्याही देशाशी तो तसाच जोराने चालत असला पाहिजे, हे सिद्ध करण्यास काहीं कठीण जाणार नाहीं.

जुन्या करारातील उत्पत्ती-पुराणात जोसेफच्या भाऊबंदांनीं त्यांस इस्मायली (Ishmaelites) लोकांस विकलें असें लिहिले आहे. हे लोक गिलीडहून (Gilead) इजिप्तला सुगंधी पदार्थ, हिंगासारखे स्वादिष्ट रस, चीक आणि रक्तचा बोळ हे पदार्थ उंटावर घालून नेत असत, असें लिहिले आहे. कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, रक्तचा बोळ हा पदार्थ अबिसीनियन व्यापारी आपल्या देशातून आणीत असत. कारण तो पदार्थ त्यांच्या देशांत बहुत पिकत असे. परंतु डॉ. रॉईल म्हणतो की, रक्तचा बोळ नावाचा इजिप्ती बाल (Bal) शब्द संस्कृतांतील मूळ 'बोल' शब्दावरून झालेला असला पाहिजे; व यावरून विक्रयार्थ तो हिंदुस्थानात तयार होत असला पाहिजे असे मानावे लागते. याशिवाय रेशमी कापड, मोतीं, हिरे, चिटे व इतर जिन्नस हिंदुस्थानातून इजिप्तमध्यें जाण्याकरिता अलेक्झांड्रिया येथे उतरत असत. तांबडा व भूमध्य समुद्र यांच्या लगत असलेल्या देशाशी होणाऱ्या हिंदुस्थानच्या व्यापाराची अलेक्झांड्रिया ही फार वर्षे उतारपेठ होती. केप ऑफ गुडहोपचा शोध लागल्या कालापासूनच या बंदराचे महत्त्व कमी झालें, नाहीतर त्याच्यापूर्वी सर्व युरोपियन व्यापाराचे तें नाकच होते, असे म्हटल्यास यत्किंचित् सुद्धां अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदी व्यापारी लोकांचीं गलबते तांबड्या समुद्रांतील मियोंस हॉरमोस येथें पहिला टप्पा करीत व तेथून अलेक्झांड्रिया येथे जात याशिवाय खुष्कीच्या मार्गानें पामिरि (Palmyra) मधून दुसरा एक रस्ता होता; परंतु पेरिप्लस व

डेव्हीस वगैरे लेखक म्हणतात कीं, जलमार्गानेंच पूर्वी या व्यापाराचा हमरस्ता होता.

इजिप्तखेरीज हिंदुस्थानचा ग्रीसपाशीं फार मोठा व्यापार चाले. मागे सांगितल्याप्रमाणें होमरच्या काव्यात उल्लेखिलेल्या हस्तिदंताखेरीज नीळही येथून ग्रीसमध्यें फार जात असे. येथे त्या पदार्थास नील म्हणतात, पोर्च्युगीज भाषेंत ॲनिल (anil) म्हणतात, आरबींमध्यें नीलच (Neel) म्हणतात; परंतु ग्रीसमध्यें मात्र त्यास हिंदुस्थानच्या नांवावरून इंडिगो म्हणत असत व हल्लीहीं त्याचप्रमाणे इंग्लिश भाषेमध्यें इंडिगो म्हणतात. जस्ताला असलेल्या संस्कृत नांवाचाच होमरनें उपयोग केला आहे; या सर्व प्रमाणावरून ग्रीस व हिंदुस्थान यांच्यामध्यें व्यापारी दळणवळण होते असें प्रत्येकाला वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

ग्रीसनंतर रोमकडे लक्ष पुरवूं व तेथे कोणकोणत्या मालाचा खप होत होता तें पाहूं. पेरिप्लस व टेसियस (ctesias) याच्या माहितीप्रमाणे सुती कापड, मलमल, चिट, दालचिनी, व इतर सर्व मसाल्याचे जिन्नस, हिरे, मोतीं, गोमेद, पाच, व इतर कमी दर्जाचे खडे, पोलाद, औषधी, सुवासिक पदार्थ, लाख इत्यादि जिन्नस जहाजें भरभरून रोमकडे जात. मिरी, दालचिनी वगैरे सर्व मसाल्याचें सामान पुरविण्याचे काम प्राचीन कालीं भारतवर्षाने उचललें होतें असें तत्कालीन इतिहासकाराकडून व अर्वाचीन शोधकाकडून कढून येतें. याशिवाय मॅनिंगबाई म्हणते कीं, जटामांसी, टाकळा, बोस, वेत, देवधूप, गुगुळ इत्यादि पदार्थही पुरवले जात असत.

या सर्व पदार्थांखेरीज हिंदुस्थानाकडून रोमला तलम रेशमी कापड फार जात असे. ह्या रेशमी कापडाचा रोमन स्त्रियाना त्याच्या वैभवकाली इतका शोक लागला होता कीं, रोमन लोक भारास भार सोने देऊन ते घेत असत असें इतिहासावरून दिसते. आम्ही ज्याप्रमाणें हल्लीं सोन्याच्या वाहतीसंबंधी इंग्लंड व इतर युरोपीयन राष्ट्रें यांजविरुद्ध तक्रार करतो व सोन्याची परदेशी निर्गत म्हणजे राष्ट्रीय दारिद्र्याचें व अवनतीचें एक लक्षण मानतों तेच विचार मोठ्या खिनीनें आपल्या ग्रंथात नमूद केले आहेत. तो म्हणतो कीं, "प्रतिवर्षी असल्या तलम रेशमी कापडाकरिता हिंदुस्थानात ४० लक्ष रुपये रवाना होत असतात." दुसऱ्या खात्रीलायक प्रमाणावरून असे कळतें कीं, हिंदुस्थानच्या व्यापाऱ्याजवळ रकमा व्याजीं लावून सुखाने चार पैसे मिळावे म्हणून रोममधून प्रतिवर्षी सहा

कोटी रुपये हिंदुस्थानाकडे धांव घेत. इजिप्त, सीरिया, रोम इत्यादि ठिकाणीं माल पोंचविण्यासाठीं व व्यापाराची ने-आण करणारी टॉलेमीच्या कारकीदींत १२५ जहाजें रोम व आसपासच्या बंदरांत जागरलेलीं दिसत व ही सर्व हिंदुस्थानांत तयार होऊन फक्त युरोपला माल पुरविण्याचे काम करीत असत.

हिंदुस्थानचा पाश्चिम किनारा सोडल्यानंतर प्रथम जो किनारा लागतो तो अरबस्थानचा. याच देशाशीं फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानचा व्यापार चालत असे. पेरिप्लसच्या पूर्वी तीनशें वर्षे होऊन गेलेला अंगारथाचिडस यानें यिमेन व पट्टल याच्यामध्ये व्यापार चालू होता असे लिहून ठेवले आहे. पॉटिंजर म्हणतो की, पट्टल म्हणजे सिंधमधील हैद्राबाद व हे जर खरें असेल तर प्रो. हीरन म्हणतो की, सिंधुनदीच्या मुखाने होणारा हा अत्यंत प्राचीन जलमार्गीय व्यापार होय यात शंका नाहीं. ऱ्हनूच्या वेळी-अर्थात आधुनिक युरोपियन पंडिताच्या मताप्रमाणे म्हटले म्हणजे ख्रिस्ती शकापूर्वी दहा शतकें-हिंदू व सबी लोक यांच्यामध्ये व्यापाराची घडामोड होत होती. अलेक्झाडरच्या कालीं मॅसिडोनियाचा नेआरकस नामक सेनापति इराणी आखतात आल्यानंतर त्यास असें कळलें कीं, आसेरियाला जाणारा माल प्रथम मस्कत येथे उतरतो व तेथून तो पुढे जातो, सबब हिंदी माल मिळण्याचें हेच मुख्य ठिकाण होय असें त्यास तेथें सांगण्यात आले. हे सर्व ऐतिहासिक पुरावे पाहिल्यावर कोणाचा विश्वास प्राचीन भारतीय व्यापारी घडामोडी व दर्याप्रवास यावर बसल्याखेरीज रहाणार आहे ? हा सर्व व्यापार गुजराथेमधील बनिये (वाणी) लोक याच्या हातीं होता. या लोकाचा हा पिढ्यानुपिढ्या धंदा असल्याने त्यास तो पूर्ण अंगवळणीं पडलेला होता व आहे हें सध्यां सुद्धा आपण पाहातो. अरेबिया, फेलिक्स येथे त्याच्या मोठमोठ्या वखारी असून तेथे हे आपला व्यापार मोठ्या मजेनें चालवीत असतात. त्याच्या मालमत्तेच्या अदमाशी किमतीवर त्यास तेथील सरकारास थोडा कर द्यावा लागत असे; परंतु तेवढ्यानें त्याचे उत्तम संरक्षण होऊन त्यांच्या व्यापारात कोठे खो येत नसे.

आफ्रिका खंडात फक्त इजिप्तपार्शीच हिंदुस्थानचा व्यापार चाले असे नसून झांझीबार व तांबड्या समुद्रालगत असलेल्या सर्व बंदरीं चालत असे. मिओस हॉरमॉस हें तांबड्या समुद्रातील व्यापाराचें केंद्र होते म्हणून मागें सांगितलेंच आहे. पेरिप्लसने झांझीबारपासून डेलगाडोपर्यंतच्या सर्व बंदरांचीं नावे आपल्या पुस्तकांत दिलीं आहेत व इजिप्तपार्शी असलेल्या व्यापारी दळणवळणाचें कथन

कारिताना तो पुढे असें लिहितो कीं, " तांदूळ, इतर धान्यें, लोणी, तिळाचें तेल साखर, हलकें भारी असे दोन्ही प्रकारचें कापड हे जिन्नस कोंकण प्रांताच्या अंतर्भागातून व भडोच बंदरामधून इकडे येतात. ॲरियन या ग्रंथकाराची या गोष्टीला पुष्टी आहे.

प्रो. हीरनचा असा तर्क धावतो कीं, हिंदुस्थानांत जो इतका सोन्याचा संचय होता याचे कारण सोन्याच्या खाणी आफ्रिकेच्या ज्या प्रदेशात होत्या त्या देशापाशी हिंदुस्थानचा असलेला व्यापार होय.

हिंदू बानिये व ग्रीसमधील व्यापारी हे एडनच्या आखातात गार्डाफूईच्या भूशिराजवळ सोकोट्रा येथे वसाहत करून राहिलेले होते असे पेरिप्लसने स्वच्छ लिहून ठेवले आहे. एकंदरीत हल्लीं सुद्धा त्या लोकाची प्रवृत्ति पाहिली म्हणजे हा सर्व व्यापार त्याच्या हातीं असल्याबद्दलचा जो येवढा वेळ ऐतिहासिक पुरावा दिला त्यास पुष्टि येते. हल्लीं सुद्धा हिंदुस्थानाबाहेर जे थोडे हिंदी व्यापारी आहेत ते गुजराथेमधील बनिये अगर खोजे लोकच होत व याच्या पूर्वजानीं तो प्राचीन व्यापार चालविला असला पाहिजे असें मानण्यास कोणतीच धास्ती नाहीं. कारण हा त्याचा फार प्राचीन काळापासून पिढीजाद धंदा आहे असे मागे सांगितलेच आहे.

आतांपर्यंत पाश्चात्य व्यापाराचे विवेचन झालें, परंतु पौर्वात्य व्यापारही काहीं कमी नव्हता. चीन, आस्ट्रेलिया, गंगापारद्वीपकल्प, आन्हामलाक्का इत्यादि देशाशी बंगालच्या उपसागरातून व्यापार चालत असे. हिंदुस्थानातून जो माल निघे तो गंगानदीच्या मुखालगत असलेल्या बंदरांतून अथवा कारोमाडेल किनाऱ्यावरील बंदरातून ग्रीस, रोम या देशांशी दळणवळण वाढल्यामुळें पुढे इकडेही व्यापार सुरू झाला असे नसून मूळपासूनच इकडेही व्यापार सुरू असे. स्वतः जहाजें बाधावी व बंगालच्या उपसागरासारख्या तुफानी दर्यावर व्यापार करीत हिंडावे हे प्राचीन आर्यांस बाळकडूच असे. पेरिप्लसच्या पुस्तकात कारोमाडेल किनाऱ्यावरील जहाजें सुरक्ष्यार्चीं बंदरें दिलीं आहेत, यामुळें या गोष्टीचा काल्पनिकपणा जाऊन त्यास भरभक्कम ऐतिहासिक पुराव्याचे स्वरूप आलें आहे. कापडाबद्दल मच्छलीपट्टण व इतर गंगेच्या मुखाजवळील व्यापारी ठिकाणे पेरिप्लसनें दिलेलीं आहेत; त्या नावानेंच तीं हल्लींही प्रसिद्ध आहेत असे आपण मानतों. मग त्या वेळीं पेरिप्लस म्हणतो त्याप्रमाणें त्या बंदरांतून व्यापार चालत असे याच गोष्टीवर आपणास गैरविश्वास कसा करिता येणार ?

सिंव्हलद्वीप.

सिव्हलद्वीपाची नैसर्गिक ठेवण व स्थिति पाहिली म्हणजे त्याच्या प्राचीन व्यापारी प्रसिद्धीबद्दल मनांत यथार्थ कल्पना उभी रहाते. एका काळीं भारतीय व्यापाराचे ते केंद्रस्थान होतें; व त्या कामाकरितां लागणारीं तेथील सुरक्षित बंदरें, अनुकूल परिस्थिति पाहिली म्हणजे सहजच ते स्थान भारतीय प्राचीन व्यापाऱ्यांनीं मध्यवर्ती ठिकाण म्हणून पसंत केले असल्यास त्यांत काय नवल?

याची पुष्कळ नावांनी पूर्वीपासून प्रसिद्धि आहे. 'ओनीसिक्रीटस' (onesicritus) याने त्यास प्रथम टाप्रोबेन अशी संज्ञा दिली. त्याची उपपत्ति टाप म्हणजे द्वीप व राहून अथवा रावण हा प्रसिद्ध राजा अर्थात् रावणाचें बेट अशी लावलेली आहे.

टॉलेमीनें असें म्हटलें आहे कीं, त्यास पूर्वी पॅलोसिमुंडी असे म्हणत; व त्यास फिनीचाही पाठिंबा आहे परंतु टोलेमीच्या कालीं त्यास सालिस व तेथील लोकांस सालो (Saloe) असे म्हणत व ह्यापासून पुढें सेवन व नंतर हल्लींचे सीलोन झालें असावें अशी दुसरी उप्पत्ति आहे. टालाकोरी, मोदुट्टी, आमुरोग्राममू, मोआग्राममू (महाग्राममू) इत्यादि प्रख्यात व्यापारी ठिकाणांचीं नावे टोलेमीचे दिलीं आहेत. प्रो. हीरनच्या मते ख्रि. पू. ३०० वर्षे यांची व्यापाराबद्दल फारच प्रख्याति होती.

ॲरियन म्हणतो कीं "सीलोनचा उत्तर भाग हा फार सुधारलेला असून त्या बेळी पूर्वेस चीनपर्यंत व पश्चिमेस इतालीपर्यंत ह्या बेटाचे दळणवळण होते."

कासमॉसनें साधारणतः अलीकडच्या काळची जी थोडीबहुत सीलोनविषयीं हकीगत दिली आहे त्यावरून त्या बेटाच्या व्यापाराचा विस्तार केवढा प्रचंड होता हें दिसून येईल.

"हिंदुस्थान, इराण, एथिओपिया याच्या साधारण मध्यभागीं हें बेट वसत असल्यामुळें याच्या किनाऱ्यास असंख्य जहाजें लागतात व येथूनही तितकींच दूरदेशीं जातात. चीन वगैरे पूर्वेकडील देशांच्या मध्यभागातून रेशीम, लवंगा वगैरे जिन्नसाचा पुरवठा येथे होतो. हे जिन्नस मलबार व कल्याण येथे पाठवून तेथून पोलाद व कापड आणविलें जातें. सिंध येथून कस्तुरी आणवून तेथे वर दिलेले जिन्नस येथून रवाना होतात; इराण, येमेन, आदुले वगैरे ठिकाणीं हेच जिन्नस येथून पाठविले जातात. व तेथून आलेले जिन्नस फिरून पूर्वेकडील चीन वगैरे देशांच्या मध्यभागांत नेऊन पोंचविले जातात. या रीतीने हिंदी महासाग-

रांतील प्राचीन अफाट व्यापाराची हे बेट म्हणजे महापेठच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. "

अलेक्झांडरच्या कारकीर्दीतील इतिहासकारानी सीलोन बेटास टॅप्रोबेन असें नाव देऊन त्याच्या भरभराटीचीं व व्यापारवृद्धीचीं सुरस वर्णने लिहून ठेविलीं आहेत. टॉलेमीच्या कारकीर्दीतही हे बेट असेंच प्रसिद्ध होतें. यावरून सरासरीने पाहता इ. स. पू ५०० वर्षांपासून तों इ. स. ५०० वर्षांपर्यंत या बेटाचा फार चलती असून व्यापारधंदा, कलाविद्या व इतर सर्व प्रकारची संस्कृति यानी हें बेट गजबजलेले होते. याप्रमाणे एक हजार वर्षे या बेटाचा पश्चिमेस आफ्रिका, येमेन, मलबार व पूर्वेस चीन व त्याच्या पलकिडच्याही देशापर्यंत व्यापार पसरलेला होता. ऑस्ट्रेलियन व्यापाराची चढउतारही येथेच होत असे.

ज्याप्रमाणें व्यापारात याची प्रसिद्धि होती तशीच विद्या, कला, संस्कृति वगैरे सर्व प्रकारच्या बाजूने याची भरभराट होऊन ते उत्तम संस्कृतिवान बेट म्हणून गाजत होते. याचा व हिंदुस्थानचा संबंध फार दिवसाचा होता. हे हिंदुस्थानाचा एक भाग अशीच सर्वांची समजूत होती. सेतुबंधाने हा संबंध पुढे निकट होऊन हिंदुस्थानातील राहिवाशी येथे येऊन राहिले. त्याच्याबरोबर त्याच्या विद्या,कला, शास्त्र व धर्म येऊन सर्व बाजूने याची सुधारणा झाली. अर्थात् हल्लीचे राहिवाशी मुद्दा भाषा, धर्म, जात व संस्काराने हिंदूशी संलग्न असल्यास नवल काय? प्राचीन हिंदुस्थानाशीं याचा निकट संबंध होता याबद्दल काहीं अवशेष हल्लीं सापडत असून परदेशीय इतिहासकाराचे याविषयीं उतारे स्पष्ट आहेत. इ. स. ५००-६०० च्या पुढे याचे महत्त्व कमी कमी होऊं लागले. तरी जेव्हा प्रथम युरोपीयन राहिवाशी येथे येऊन राहूं लागले तेव्हा त्यास येथील मूळच्या भव्य इमारती, प्रचंड देवालये व संस्कृतीचे अवशेष पाहून फार अचंबा वाटला; येथे साधीं तळीं बांधलेलीं होतीं तीं मोठ्या मोठ्या अर्वाचीन सरोवराएवढी होतीं. या बेटाची प्रबलता, संपत्ति, वैभव, नैतिक व सामाजिक संस्मरणीय कृत्ये याची नोंद ॲरियन, कॉसमॉस (५६० इ. स.) युरोपीयन फिरस्ते, इतिहासकार व इतर नामांकित लेखक यानी ख्रि. श. पहिल्या शतकापासून करून ठेविली आहे व त्या सर्वांचें प्राचीन काळात व्यापारी घडामोडीत व व्यवहारात हे बेट सर्वांच्या पुढें होतें याविषयीं ऐकमत्य आहे.

व्यापार हे राष्ट्राच्या संस्कृतीचे, वैभवाचे व सामर्थ्याचे पूर्ण द्योतक आहे हा सिद्धान्त सर्वमान्य होण्यास कोणतीच हरकत दिसत नाहीं.हिनी, ॲरियन, कॉस-

मोंस, पेरिप्लस वगैरे ज्या प्राचीन इतिहासकारांनी सीलोनचे भरपूर वर्णन केलें आहे त्याच्याच ग्रंथांत हिंदुस्थानच्या दक्षिण टोकाच्या मलबार व कारोमांडेल या उभय किनाऱ्यावरील बंदराचें, व्यापाराने समृद्ध झालेल्या शहराचें व एकंदर व्यापारोपयोगी ठिकाणांचे भरपूर वर्णन आहे; जिज्ञासाची माहिती आहे, संपत्तीचीं चमत्कृतिजनक वर्णनें आहेत; त्यावरून या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय घडामोडीत व सुधारणेच्या क्षेत्रात प्राचीन हिंदूनी केवढी थोरवी संपादन केली होती हें स्पष्ट दिसून येतें. व त्यावरून कोणालाही स्पष्टपणे व मुकाट्याने त्यांच्या प्राचीन वैभवाबद्दल, विद्याकलाबद्दल, संस्कृतीबद्दल व सर्वांगीण सुधारणा, अचाट कर्तृत्वशक्ति व विलक्षण धाडस याबद्दल सपशेल कबूली द्यावी लागेल. मानवाच्या संस्कृतींत भर टाकल्याबद्दल निर्विकारी व सुज्ञ पुरुष ती आनंदाने देतीलच, परंतु विकारवश, मदांध लेखकाना व इतिहासकाराना ती देणे भाग पाडण्याइतका भरभक्कम ऐतिहासिक पुरावा त्यांच्याच सजातीय विद्वानानीं व लेखकानीं जमविलेला असल्यानें एक वदनाने का होईना, परंतु ती दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

प्रकरण १३ वें.

खुष्कीचे व्यापारी रस्ते.

आपर्यंत भारतीय व्यापार जलमार्गाने बसकसा चालत होता याचें निरूपण केले. परंतु हिंदुस्थानांतील त्या वेळीं प्रसिद्ध गजबजलेलीं बंदरें कोणतीं होतीं हे प्रथम सांगून नंतर भारतीय व्यापार उत्तर व मध्य आशियाखंडात कोठपर्यंत पसरला होता हे पाहूं.

पेरिप्लस व कॉसमॉस यानीं वर्णिलेलीं (१) भडोच (२) मंगलोर (३) नेलीसेरम् (४) सिंध हैदराबाद (५) कल्याण (६) वसई (७) धारापुरी (८) सिंधू (९) सुरत (१०) सिबूर (११) पारसी (१२) मंगरुथ (१३) सालोपट्टण (१४) नेलोपट्टण (१५) पुदपट्टण हीं मुख्य बंदरे होत.

ज्याप्रमाणें हिंदुस्थानचा व्यापार दर्यामार्गानें चीन, तुर्कस्थान, इराण, बाबीलोन, इजिप्त, ग्रीस व रोमबेटापर्यंत पसरला होता त्याचप्रमाणे या शहरीं जाण्यास खुष्कीचाही मार्ग होता. चीनपाशीं मुख्यत्वेंकरून रेशमाचा व्यापार चालत असे, तरी हिंदुस्थानात रेशीम तयार होत नसे असें कांहीं म्हणता येणार नाहीं.

उत्तर आशियांत सोनेरी मैदान 'इदेर्शी' व कोबीचें मैदान येथपर्यंत हिंदू व्यापारी फेऱ्या करीत असत. ते अशा लांब पल्ल्याच्या फेऱ्या करण्याच्या वेळीं एकटे बाहेर पडत नसत अथवा घरीं परत लवकर जात नसत. प्रवास फार दूरचा व धोक्याचा पडल्याने ते एक हजार, दोन हजार अशा मोठमोठ्या टोळ्या करून ३।५ वर्षे बाहेर असत व नंतर यथेच्छ पैसा मिळविल्यावर घरीं जात. त्या वेळीं दळणवळणाच्या साधनांची कमतरता असल्याने परत मार्ग सांपडण्यासाठी ठिकठिकाणीं काहीं खुणा व ओळखीचीं चिन्हें ठेवावीं लागत. अशा प्रकारचें चिन्ह म्हणून "तारवतीमुलेमान" ह्या नावाचा एक दगडी मनोरा होता. मध्य आशियांत गेल्यावर पुढे पूर्वेकडे चीनपर्यंत फेरी करावयाची असल्यास ह्या मनोऱ्यापासून वळावें लागतें असें टॉलेमी व टेसियस हे सांगतात. अफाट महामार्गाच्या पृष्ठभागावर प्रवास करीत असतांना नक्षत्रपुंज, होकायंत्र व दीपगृह यांचा उपयोग होतो त्याप्रमाणे आशिया खंडाच्या मध्यभागीं असलेल्या अती विस्तृत ओसाड व भयाण मैदानांतर प्रवास करीत असतांना काहीं अशी सामुद्राप्रमाणे स्थिति होते; पुढला मागला मार्ग कळण्याचा अति पंचाईत पडते; अशा वेळीं वाटसरूंना मार्ग कळण्यास साधन असावें व एकमेकांची भेट होऊन परस्परांकडील हकीकत कळावी म्हणून त्या वेळीं हा तारवतीमुलेमान या नांवाचा उंच मनोरा बांधला होता. येथें सर्व व्यापाऱ्यांचा तळ पडत असे. येथें काहीं दिवस विश्रांत घेऊन, ठरावलेला कार्यक्रम पुरा करून, निश्चित केलेल्या भेटी घेऊन, नंतर पुढचा मार्ग सर्व व्यापारी सुधारीत. कायूल अथवा बॅक्ट्रीया येथून प्रवासास आरंभ केला असें धरले तर उत्तर दिशेकडे तोड करून उत्तर-अक्षांशाच्या ४१ अंशापर्यंत जावें लागे. नंतर एक मोठा पर्वत ओलांडून होशांज अथवा ओरा या मैदानातून पुढे जावे लागे. या मैदानातून बरेच चालून गेल्यानंतर तारवतीमुलेमान या मनोऱ्याजवळ जाऊन पोचत असत. येथे आल्यानंतर कोबीच्या मैदानास पोचण्याच्या वाटेवर काशगर हे प्रख्यात शहर व मोठमोठे पर्वत लागत. याशिवाय खोटेन व अक्सू हीं शहरेही वाटेंत लागत. या प्राचीन नगरावरून कोशोटी या शहरातून चीनच्या सरहद्दीवरील 'सेचू' या शहरास जाण्याचा एक मार्ग होता; व हाच पुढे पेकीन या प्रख्यात जुन्या शहरास जात असे. कायूलपासून पेकीनपर्यंतच्या या सर्व मार्गांची लांबी दोन हजार पांचशे मैल होती.

पाश्चिमेकडील व्यापाराचे मार्ग सांगितलेल्या मार्गाशिवाय आणखी दोन रस्ते होते. हिंदुस्थानांतून प्रथम व्यापारी निघाले म्हणजे सिंधमार्गानें पामीर या प्रख्यात प्राचीन श्रीमंत शहरास जात; व तेथून सीरियाच्या बंदरातून रोम व इतर युरोपातील शहरे याजकडे जाण्यास वळत.

दुसरा मार्ग हिमालयाच्या उत्तर उतरणीवरून जात होता. हिमालयाच्या उत्तरेकडील रागा ओलांडून पार गेल्यावर ओक्झस नदीच्या काठाने कास्पीयन समुद्रावर जावें लागे व नंतर तेथून ज्या शहरास जावयाचे असेल त्या मानाने निरनिराळ्या दिशेकडे वळावें लागे;परंतु हिमालयाच्या घाटातून ओक्झस नदीच्या कांठाने आले असता कास्पियन समुद्र हा सर्वांत मोठा तळ असे व येथून युरोपच्या निरनिराळ्या भागात जावयास मार्ग असत.

रोमचा ऱ्हास झाल्यानंतर त्याची जागा 'बसोरा' (Bassora) या शहरानें पटकावली व तेथे माल पोचण्यासाठी हिंदुस्थानातून आलेला माल ' ऑर्मस ' या शहरी उतरत असे.

येथपर्यंत भारतीय व्यापाराची परदेशाशी हे णारी घडामोड व दळणवळणाचे मार्ग यांचे विवेचन केले. ज्या लोकांचा बाह्य देशाशी एवढा अफाट व्यापार चालत असे त्याचा परस्पराशी स्वदेशात किती तरी जास्त पटीनें सहवास घडून मालाची देवघेव व अदलाबदल चालली असेल याची कल्पना करणे काही अशक्य नाहीं. व्यापाराचा व सुधारणेचा परस्परसंबंध काय याचे मागे वर्णन केले आहे. सर्व प्रकारचे चैनीचे व शोकाचे पदार्थ, उंची उंची वस्तु, दुर्मीळ जिन्नस यांचा खप एवढ्या विस्तारलेल्या देशांत व नानाविध अत्युच्च संस्कृतीच्या लोकांमध्ये व्हावा यात काय आश्चर्य ? भारतवर्षात उत्पन्न होणाऱ्या सर्व महार्ह सुखसोयींच्या, विलासाच्या व चैनीच्या वस्तूंचा उपयोग भारतीय लोक भरपूर करून घेत. एवढेंच नव्हें तर बाहेरच्या देशात पैदा होणारे मूल्यवान पदार्थ तेथील लोकांस वशा तऱ्हेने उपयोगात आणावे हे माहीत नसल्याने त्याचाही फायदा भारतीय आर्यांसच मिळत असे.

येथील प्राचीन रहिवाश्यांची अभिरुचि थोर, उपभोगाचे मार्ग नीतीला धरून, सुखविलासाची पद्धत नमुनेदार व एकंदर रहाणी संस्कृति-पोषक पडल्याने त्याच समाधान करण्या- ची व मागणी पुरविण्याकरिता व्यापाऱ्यांचे ताडेच्या ताडे एकसारखे प्रवास करीत असत. अशा व्यापाऱ्यांच्या, तांबडा समुद्र, इराणी आखात, इजिप्त व टायर या ठिकाणी गाठी पडत, तेथें मालाची अदलाबदल होई व नंतर स्वदेशात ठिकठिकाणचे व्यापारी परत जात.

हिंदुस्थानची एकंदर भौगोलिक परिस्थिति पाहिली म्हणजे व्यापाराची आंखणी व घडामोडींचे अंतर्गत मार्ग व विभाग सृष्टीनें आंखूनच दिले आहेत असे वाटतें. पूर्व टोकापासून पश्चिमटोकापर्यंत व उत्तरेस काश्मीरपासून दक्षिणेस कन्याकुमारी-पर्यंत सर्वत्र राजमार्ग पसरलेले होते. या रस्त्याच्या कांठी हिरवी गार प्रछाय झाडाची राग, विहिरी व खाणावळी असून कोसाचे दगड पुरलेले होते. अशा प्रकारच्या राजमार्गांपैकी तक्षशिलेपासून पाटलीपुत्रापर्यंत सुमारें ११०० मैलाचा एक रस्ता असून दुसरा अयोध्या-हस्तिनापुरावरून पंजाबात गिनाबेराजापर्यंत गेलेला होता.

याशिवाय सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा व इतर जहाजे जाण्यायेण्याजोग्या ज्या नद्या होत्या त्यातून अंतर्मार्गातील व्यापार चालत असे. दक्षिण हिंदुस्थानांत तागर Tagara व प्लुथमा Pluthama यातून सर्व माल भडोच येथें उतरत असे.

उत्तर हिंदुस्थानातील लाबलाबच्या प्रदेशांतील सर्व माल उज्जनी येथे येऊन उतरत असे कारण हें ठिकाण हिंदुस्थानच्या मध्यभागी असून आसपासच्या सर्व भागाची मागणी येथून पुरविली जात असे. आणि ही मागणी पुरविल्या-नंतर जो माल शिल्लक उरे व बाह्य देशास जाण्यासाठीं सांठविला जात असे त्याचें हे ठिकाण म्हणजे वखारच होती व येथूनच परदेशी जाणारा माल भडोच-कडे रवाना होत असे.

आतापर्यंत वर्णिलेल्या व्यापारांच्या सर्व पद्धतींहून यात्राची एक पद्धत पृथ्वी-वरील सर्व देशांत रूढ आहे. हल्लींच्या दळणवळणाच्या साधनांच्या विपुलतेमुळें त्याचें महत्त्व कमी होऊन त्या अजिबात बंद होतात कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. त्याचे पूर्वीचे व्यापारी महत्त्व हल्लीं अजिबात नाहींसे होऊन त्यात थोडेबहुत फक्त पूर्वीचे धार्मिकच स्वरूप शिल्लक राहिले आहे. हरिद्वार, काशी, प्रयाग, गया, नर्मदा, कृष्णा, गोदावरी यांच्या काठचीं क्षेत्रे रामेश्वर वगैरे सर्व क्षेत्रात वर्षाच्या निरनिराळ्या काळी लाखों लोक भाविकपणें जमत, परस्पर सुखसोयींच्या व सार्वजनिक हिताच्या प्रश्नांची आपोआप चर्चा होई व अशा रीतीने एकमेकाच्या विचारात बाहेर पडण्यास अवसर मिळे; परंतु हल्लीं सर्वच रहाणी बदलल्याने यात्राचे पूर्वीचे दीर्घप्रवासी व धोक्याचे स्वरूप बदलून ते करमणुकीचें व धार्मिक भावनाच्या परिपूर्तीचे एक साधन हल्ली होऊन राहिलें आहे.

प्रकरण १४ वें.

भारतीय संपत्ति



येथून अत्यंत मूल्यवान जिन्नस, हिरे, मसाल्याचे पदार्थ, उंची उंची रेशमी वस्त्रे, भारी किमतीचे इतर व्यापारी व बनावट पदार्थ यांची लाखो रुपयांची निर्गत आफ्रिका व युरोप खंडात होत असे, यामुळे मागे सांगितल्याप्रमाणे प्लिनीसारख रोमन इतिहासकार अधर्वट द्वेषबुद्धीने, अर्धवट चढाओढीच्या इर्षेने व राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने हिंदुस्थानाकडे जाणाऱ्या सुवर्णप्रवाहाची मोजदाद करून लोकास इशारत देत असत. ह्या जगद्व्याळ व्यापारामुळे सर्व जगातून सुवर्णाचा सारखा हिंदुस्थानात आल्याने येथे इतकी संपत्ति साठली होती की, त्याविषयी दूरदेशच्या लोकांमध्ये नानातऱ्हेचे प्रवाद सुरू असत. अफाट संपत्तीचे उदाहरण द्यावयाचे असल्यास हिंदुस्थानचे नाव सर्वमुखी झाले होते. येथील संपत्तीविषयी परदेशीय लोकांमध्ये फार चमत्कारिक अजब व अद्भुत गोष्टी रूढ झाल्या होत्या. भारतभूमी म्हणजे कुबेरनगरी व येथील व्यापारी व लोक म्हणजे सर्वत्र कोट्याधीश, येथील लोकास दारिद्र्याचा विटाळ नाही. सुख, चैन, भोग, विलास यामध्ये वाढल्याने भारतीय लोकास गरिबीचे व निर्धनपणाचे स्वप्न सुद्धा पडत नसेल. रत्नखचित घाडे, हिरेजडित प्रासादतले, इंद्रनीलविशोभित कारंजे, कमलपूर्ण पुष्करणी, सोन्याचांदीने मढविलेली देवळे व गोपुरे, सौगंधिक पदार्थांनी, मसाल्याच्या जिनसांनी, रुचकर व मधुर खाद्यपेयांनी, अमोल द्रव्य गिन्यांनी कल्पनाघटित अनेकरंगी वेलबुट्यांनी, भरजरी कापडांनी, गालिचे, किनखापी व मखमलीचे कपड्यांनी, चैन व विलासांच्या सर्व साधनांनी बजबजलेल्या पेठा; हत्ती, मोर, शुक सारिका, पारावत, हरिणे, ससे इत्यादि पाळीव पक्षांनी सुशोभित गृहे; अशा प्रकारचा थाट हिंदुस्थानात सर्वत्र असला पाहिजे असे चित्र परदेशीय व्यापाऱ्याच्या व गरीब आणि अज्ञान झालेल्या लोकाच्या मनश्चक्षूपुढे सदैव उभे असे. त्याची साभिलाष दृष्टि सारखी हिंदुस्थानाकडे लागलेली असे.

प्रत्येकास वाटे कीं, एकदा तरी अशा पुण्यभूमीचें दर्शन व्हावें म्हणून हजारों परकीय लोक येथें येऊन जात. एकदा ही भूमि पाहून गेल्यावर किल्लेकांच्या नोंडास पाणी सुटे, कांहीं धाडशी व तामसी लोक दुष्टबुद्धीनें येथील संपत्तीचा परिहार करण्यास टपलेले असत. परंतु जोपर्यंत अवनतीचें बीज येथें मुळींच रुजलें नव्हतें तोपर्यंत अशा सर्व आशाळभूताच्या व आसुरी बुद्धीच्या लोकांच्या श्रीमुखांत बसून त्यास येथून जीव घेऊन पळता पळतां नाकीं नऊ येत. परंतु एकदा पडत्या काळास सुरुवात झाल्याबरोबर अशाच आसुरी लोकांच्या टोळधाडीने येथील वैभवाचें मातेरें केलें, पशुसम नरवीरांनीं कला भ्रष्टविली, नीति बुडविली, धनश्रीचे धिंडवडे काढले, अभिरुचीची बेअब्रू केली, राजवैभव धुळीस मिळविलें, भक्ति निराधार केली, विद्या दारोदार लाविली, शास्त्रांना निराधार होऊन पळ काढावा लागला, संस्कृतीस वनवासास लावून पाशवीपणाला राज्यपदारूढ केलें अशा रीतीनें सर्व जगाच्या लोहचुंबकास निर्वार्य करून परदेशीय बलाढ्य राक्षसी तरवारबहादुरांनी येथील अगणित संपत्तीची वाटेल तशी विल्हेवाट लाविली. समशीतोष्ण हवामान, अगाध संपत्तीच्या खाणी, तेजस्वी व भव्य राजगृहें यांच्या सुरम्य वार्ता ऐकून अलेक्झांडरपासून तो अहंमदशहा अबदालीपर्यंत सर्व परदेशी लुटारू यानीं सारखा धुमाकूळ घालून नेववेल तेवढी संपत्ति नेली. रुचिर रविकिरणमय प्रदेश, धनधान्यसमृद्ध भूमि, अफाट व्यापार यामुळें संकलित झालेली संपत्ति ऐकून व पाहून मॅसिडोनियन वीर अलेक्झांडर हा प्रथम भरतभूमींत उतरला.

या मॅसिडोनियन बहादराने भरतभूमींत पाय टाकल्याबरोबर आपल्या शिपायास असें सांगितलें कीं, " माझ्या शूर पठ्ठ्यानों, आतां तुम्ही प्रत्यक्ष सुवर्णभूमींत पाय ठेवणार आहात; तुमच्या मायदेशापेक्षां येथे अगणितपट संपत्ति असून तेथें करामत दाखविणें हें तुमचें काम आहे, तरी तें पाहून घ्या. " अशी दणदणलेली भरत-भूमीची कीर्ति ऐकून एकामागून एक या देशावर स्वाऱ्या होऊन आतां तो निष्कांचन झाला आहे हें निराळें सांगणें नकोच. मिल्टनच्या पूर्वी होऊन गेलेल्या विद्वानांनीं व अलिकडील प्रत्येक युरोपियन पंडितानें या देशाविषयीं लिहितांना कौतुकोद्गार काढले नाहीत असें क्वचितच झालें आहे. सुलतान महंमद गझनवी याच्या एकाच उदाहरणावरून येथील महामूर संपत्तीची कोणालाही कल्पना येईल. याची हकीगत कोणास नव्याने सांगण्याची जरूरी नाही. सोरटी सोमनाथ येथील शिवाची मूर्ति फोडून जी संपत्ति त्याने बाहेर

काढली, तिला मोजण्यास त्याला योग्य अशी संख्याच मिळेना. मथुरेत २६ दिवस राहून हजारो मूर्ति आटदिण्याचा सपाटा सारखा सुरूच होता. परंतु मथुरा सोडून कनोजला गेला तेव्हां त्याचे तेथें डोळेच दिपून गेले. तरी सोमनाथ, मथुरा येथे राहिल्यानें त्यास हिंदुस्थानची संपत्ति म्हणजे काय, याचाही थोडा फार परिचय झाला होता. अशा स्थितींत एकापेक्षा एक वरचढ सधन शहरें पाहिलीं म्हणजे या बुभुक्षित गिधाडी वृत्तीच्या परदेशी लुटारूस आश्चर्य का वाटावें समजत नाहीं. परंतु जेथें दररोजची पंचाईत अशा गृहस्थास कांहीं दिवस मेजवानी देऊन नंतर दुसरीकडे पूर्वापेक्षां श्रीमंत घरीं नेऊन सोडलें तरी याची मूळची हलकट वृत्ति थोडीच एकदम बदलणार ! असो. सोनें व हिरे यांची या भूमींत पैदासच फार होत होती. मलबार किनाऱ्यावरील कालिकत शहरापाशी असलेल्या नेलीसेरम् शहरीं मोत्यांचा फार मोठा व्यापार चालत असे. हिंदुस्थानच्या खाणींतील जवाहीर संपत्ति फार प्रख्यात होती. हिरे, पाच, गोमेद, बिरोजा, पीतस्फटिक अथवा पुष्पराग इत्यादि जिन्नस या खाणींतून निघत असत. सोनें येथें मुबलक सांपडतें अशी प्राचीन काळापासून प्रसिद्धि आहे. दक्षिण देश व मलबार प्रांत येथें सोन्याच्या खाणी असत; धारवाड येथेही कांहीं दिवसांपूर्वी सोन्याची खाण लागलेली आहे. शिवाय पोवळीं, पाच, हिरकण्या, लोलक वगैरे जवाहीर संपत्ति अगाध मिळतच होती. जगांत जीं नामांकित रत्ने व हिरे आज आबालवृद्धांस माहीत आहेत तेही येथील खाणींतूनच निघालेले आहेत ब्रुटसची माता सर्व्हीलिया इजला ज्युलियसनें नजर केलेलें मोतीं व ज्युलियसची प्रख्यात राणी क्लिओपेट्रा इच्या कानांतील मौक्तिकवलय हीं हिंदुस्थानांतूनच तिकडे गेली होतीं. हल्लीं दोन हिरे जगप्रसिद्ध आहेत; एक कोहिनूर व दुसरा पिट्. जरी पिट्चे वजन कोहिनूरपेक्षा फाजील असलें तरी कोहिनूरच्या पाण्यानें सर्व जगास मोहित करून अखिल जगज्जिव्हेवर त्याचें नांव आरूढ झालें आहे. पिट्चें वजन पूर्वी १० कॅरेट होतें व हल्लीं फक्त १३६½ कॅरेटच आहे. त्याची हल्लींची किंमत ४८०००० पौंड आहे व तो पारीस येथील राजगृहाच्या एका स्वतंत्र दिवाणखान्यांत ठेवलेला आहे. कोहिनूरचें वजन १०६½ कॅरेट असून त्याची किंमत १००००० पौंड आहे. या दोन्ही हिऱ्यांचा व विशेषत: कोहिनूरचा एक स्वतंत्र इतिहास होईल इतकी कालांतरानें त्याच्याभोवतीं माहिती व कथा गोळा झाली आहे. त्याचप्रमाणें कालानें त्यास एक प्रकारचें माहात्म्य व पावित्र्य आलें आहे.

स्त्रीला स्वरूप व राष्ट्राला संपत्ति जशीं अलंकाररूप आहेत व त्यामुळें सर्व जगाचा त्यांच्यावर सारखा डोळा असतो, तसाच प्रकार हिंदुस्थानचा झालेला आहे. आरब, तार्तार, मोंगल यांच्यांतील गझनवी, घोरी, तयमूर, नादिरशहा व शेवटचा अहंमदशहा अबदाली हे सर्व इकडे कशाकरिता लोटले ? सोफोकलसनें एका ठिकाणीं म्हटलें आहे कीं, " सर्व दुःखांत संपत्तीचें दुःख अत्यंत वाईट आहे. मनुष्यजातीच्या मागें असंख्य व्याधि आजपर्यंत लागल्या व नाहींशा झाल्या; परंतु या संपत्तिरूप व्याधीचा नायनाट अद्याप झाला नाहीं व पुढें होईल असें दिसत नाहीं. याच्या योगानें शहरें उध्वस्त झाली असून त्यांतील कुटुंबें देशोधडीस लागलीं आहेत; निर्मल अंतःकरण भ्रष्ट होऊन सद्गुणी मनाचीं अधमाधम कर्माकडे प्रवृत्ति होते. " अशी ही आपन्मूलक संपत्ति चांगली कशी म्हणावी हें समजत नाहीं; परंतु व्यवहारांत संपत्तीकडे चांगुलपणाचा भाग येत नाहीं हें प्रत्यक्ष अनुभवविरुद्ध असल्यानें नाकबूल करितां येत नाहीं; विद्या, कला याची वृद्धि होण्यास संपत्ति हेंच मूळ कारण होय; ललितकलांचें संगोपन व संवर्धन करणारी संपत्ति हीच जननी होय. कित्येक वेळेला राष्ट्रीय आपत्ति याच्या योगानेच टळल्या आहेत. थोडक्यांत म्हणजे संपत्ति ही दुपाती तरवार असून तिचा सदुपयोग होण्यास योग्य योजकाचीच दुर्लभता असते असें म्हणावें लागते.

प्रकरण १५ वें.

आर्यांचा धर्म.



र्मासारख्या विषयावर अधिकारी लेखणीला पोक्तपणें व अत्यंत दूरदर्शीपणे लिहिण्याला आजन्म अभ्यास लागतो. परंतु नुस्त्या ग्रंथपठनानेच ती योग्यता येईल असे मानणें विलक्षण धाडसाचें होईल. अलौकिक बुद्धिमत्ता, असामान्य विवेचनशैली, अखंड अभ्यास, अनेक जन्माचे संस्कार व तयारी, आध्यात्मिक अभ्यासाची व तालमीची पराकाष्ठा, परमश्रेष्ठ नैतिक व आध्यात्मिक शुचिर्भूतता, वाणीचा रसाळपणा, निश्चयात्मक बुद्धि, त्रिकालज्ञान, निर्दोष तर्कपद्धति, इत्यादि गोष्टींची भरपूर मदत लागते. ' वसुधैव कुटुंबकं ' या तत्त्वाचें प्रत्यक्ष आचरण

पदोपदीं व क्षणोक्षणीं सिद्ध करून द्यावें लागतें; त्यागाची तयारी किती लागते याचें प्रत्यक्ष अनुभवाशिवाय अनुमान करणें अत्यंत धाडसाचें होईल; हाल, अपेष्टा, कष्ट, छल सोसण्यास व त्रिकालसत्य सिद्धांताचें प्रतिपादन व आचरण करण्यास मनाचा खंबिरपणा व शरिराची सहनशीलता किती असावी लागते हे तत्त्वज्ञानी धर्मसंस्थापक यांच्या ऐतिहासिक माहितीवरून कळेल. मनाची ईश्वराविषयीं तन्मयता व ध्यास किती असावा लागतो हें निदान हिंदू वाचकांस तरी सांगण्याची मुळीच जरूरी नाहीं. जगांतील अन्यायमूलक विषमता नाहीशी व्हावी, प्रेमाचे साम्राज्य सर्वत्र पसरून भेदभावाचे बंड पार मोडून जावे, अखिल मानवांस शांति व ज्ञानप्राप्ति व्हावी; जगांतील अज्ञानाचा पूर्ण निरास होऊन ईश्वरी दरबारात कोणास मज्जाव नसावा, जगातील सर्व दुःखे नाहींशीं होऊन अध्यात्मज्ञानाची प्राप्ति सर्वांस व्हावी, व त्याकरिता स्वाभिमान, स्वार्थ याना तिलाजुळी देऊन परहित व परार्थ साधण्यासाठीं ज्याची सर्वसंगपरित्यागपूर्वक तयारी झाली आहे अशाच सत्पुरुषास धर्मासंबंधी बोलणे, लिहिणे व उपदेश करणे या गोष्टीचा अधिकार आहे. प्रस्तुत लेखकाच्या ठिकाणा तशापैकी एकही गुण असेल कीं नाहीं याबद्दल त्यास जबरदस्त शंका आहे. परंतु मागील सर्व प्रकरणावरून वाचकांच्या लक्षात असें येऊन चुकलें असले कीं, स्वतःचे विचार प्रदर्शित करण्यापेक्षा उत्तम पुरावा गोळा करून भारतीय श्रेष्ठत्व सर्व लोकाच्या निदर्शनास आणणें हेच मुख्य काम आहे. आपल्या ठिकाणीं धर्मासारख्या विषयावर स्वतंत्र जोरदार विचार प्रदर्शित करण्याची ताकद नाहीं हें समजून हा विषय अजिबाद गाळल्यास आतापर्यंत केलेले श्रम व्यर्थ होऊन काम अर्धवट राहील; अशी भीति वाटत असल्याने आपल्या हातून होईल तसे अल्प प्रमाणात कर्तव्य म्हणून काम करावे; त्यात कांही न्यून राहिल्यास—तसे ते बरेंच राहणार अशी भीति आहे—ज्ञानी पुरुष दूर करतील एवढे समाधान मानून घेऊन पुढील कार्यास लागूं.

सत्य व श्रेष्ठ धर्म, प्रेममूलक, शांत व निरुपद्रवी असतो. खऱ्या धर्माचें निशाण रक्तस्रावाने विटाळलेलें नसून धर्मसंस्थापक हा मदांध, अरेराव व जुलमी केव्हांही आढळून येणार नाहीं. विध्वंस, नाश हे शब्द याच्या दरबारांत कधींही ऐकूं येणार नाहींत. साहाय्य, ज्ञानदान, दुःखविमोचन व सुधारणा या चार कोनशिलांवर धर्माच्या उज्ज्वल वैभवाची उत्तुंग इमारत उभारली जाते, व त्यांत लोकहित हीच मुख्य दैदीप्यमान मूर्ति नांदत असते अशी धर्माची मिल्लर याने

जी व्याख्या दिली आहे ती किती यथार्थ आहे व हिंदू धर्माच्या बाबतींत ती तंतोतंत लागू असून यांत थोडीशी हिंदुधर्मानें भरच घातली आहे असें दिसून येईल.

अत्यंत त्रस्त मनाला शांति देणारें उत्तम औषध म्हणजे धर्म होय. समाजामध्यें सर्व लहानथोर मंडळींत एक प्रकारचा बंध दिसतो तो खरोखर धर्मानेंच उत्पन्न केला आहे. मनुष्यमात्राच्या सर्व व्यवहारांत धर्म भरून राहिला आहे व विशेषतः हिंदुसमाजाच्या दृष्टीनें ही गोष्ट सागणें ज्यास्त अगत्याचें आहे. संगतीवरून मनुष्याची ज्याप्रमाणें परीक्षा होते त्याचप्रमाणें धर्मावरून राष्ट्राची परीक्षा होते. राष्ट्रामध्यें कोणते विचार उसळत आहेत, लोकांची मनोभावना कोणत्या प्रकारची आहे, ज्ञान, संस्कृति व परार्थ यासंबंधानें लोकाच्या विचाराला कसें वळण लागलें आहे व त्यायोगें त्या राष्ट्राची भवितव्यता काय आहे हें अजमावण्यास सोपें जातें. साध्या गोष्टीवरून, क्षुल्लक कार्यावरून अथवा सहज साध्या दिसणाऱ्या कामावरून व वागणुकीवरून ज्याप्रमाणें व्यवहारांत मनुष्याची परीक्षा होते त्याप्रमाणें धर्मावरून जगाच्या सुधारणेंत प्रत्येक राष्ट्राला आपली पदवी ठरवून घ्यावयाची असते.

धर्म हें राष्ट्राच्या उच्च वा नीच संस्कृतीचें गमक आहे. धर्म या शब्दाभोवतीं आचारात्मक असंख्य व्यवहारांचें जाळे माजलेलें दिसतें; परंतु धर्माची खरी ओळख म्हणजे परमात्मज्ञानाची प्राप्ति होणें; परमार्थज्ञानाची गुणाधिक्यता व श्रेष्ठता, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, वाङ्मय, विज्ञान व सर्वसाधारण उन्नति यांजवर अवलंबून असल्याने ज्या मानानें हीं शास्त्रें प्रगल्भदशेस येऊन लोकांचीं मनें सुसंस्कृत होतील त्या मानानें तो धर्म अधिकाधिक श्रेष्ठ असें ठरणार हें उघड आहे.

हिंदुस्थानातील वैदिक धर्माचा इतिहास व त्याची उदात्त शिकवण यांची प्रत्यक्ष व्यवहारात असलेल्या धर्माशीं तुलना केल्यास खरोखर वाईट वाटतें व आचरणांत इतका फरक कशाने घडला हा एक मोठा प्रश्न मनापुढें उभा रहातो. सर्व वस्तूंच्या मुळाशीं असलेला वैदिक धर्म यास स्वस्थानापासून पदच्युत करून लौकिक, विकृत, हिणकस, जडवादी धर्माने त्याचें स्थान कसें पटकाविलें आहे हें मागें सांगितल्याप्रमाणें अर्वाचीन कालच्या हिंदूंची अवनति, त्यांची चालू धर्मव्यवस्थिति, समाजरचना, नैतिक समजुती व कित्येक हिडिस चालीरिती यांवरून स्पष्ट होतें.

जडसृष्टि व परमात्मा यांच्या परस्परसंबंधाचें विवेचन व आत्म्याचीं चिरंतन तत्त्वें यांचा ऊहापोह वेदामध्यें केलेला आहे. सर्व सृष्टींतील यच्चयावत् जीवाशीं

प्रेममय वर्तन ठेवणें, त्यांच्या दुःखानें दुःखित होणें व सुखानें सुखी होणें हेच वैदिक धर्माचें रहस्य आहे. या तत्त्वाचें स्पष्ट प्रतिबिंब बुद्धाच्या पुढील वचनांत दिसून येईल.

" माझ्या वैय्यक्तिक परमसुखाची मला मुळींच पर्वा नाहीं; अथवा मी अखेरच्या प्रशांत अवस्थेंत एकटाच रहाण्याला बिलकूल तयार नाहीं. परंतु चिरंतन सर्वत्र माझा वास असावा; माझ्याबरोबर प्रत्येक प्राणिमात्र मुक्त होऊन शाश्वत सुखाचा वाटेकरी व्हावा अशी माझी इच्छा आहे; व त्याकरितां मी जन्मोजन्मीं प्रयत्न करीन व तसें घडून आल्याशिवाय माझें कधींही समाधान होणार नाहीं. जगांतील प्रत्येक दुःख व हाल यांचा पूर्ण निरास होऊन प्रत्येक मजबरोबर मुक्ति-सुख भोगण्यास तयार होईल तेव्हांच मी आपला प्रयत्न बंद करीन !" केवढी ही अचाट महत्त्वाकांक्षा ! व कोण हें विश्वव्यापी प्रेम !

हिंदुधर्मांत, सृष्टि आणि मनुष्य यांचे एकमेकांशीं असलेले संबंध, मनुष्याचे ठिकाणीं बद्धत्व कशानें येतें याविषयीं दृढ झालेलीं चिरंजीव तत्त्वें व अढळ सिद्धान्त यांचा अंतर्भाव होतो. या अढळ सिद्धांतांना एका दृष्टीनें विज्ञान अथवा शास्त्रे व दुसऱ्या दृष्टीने पारमार्थिक तत्त्वज्ञान असें मानण्याचा प्रघात आहे. यांतील प्रमेयें फक्त चिरकाल नांदणाऱ्या गोष्टींनाच लागू आहेत; कमलजलवत् असार गोष्टीचा यांत मुळींच विचार केलेला नाहीं. यांच्या ठिकाणीं भेदभाव मुळींच नसून सर्वत्र यांची व्याप्ति सारख्या प्रमाणांत आहे. हिंदू असो अगर अरब, युरोपीयन, अमेरिकन, आफ्रिकन, चिनी कोणताही असो, त्यांस त्यांच्या अध्ययनापासून सारखेंच ज्ञान होऊन परमार्थाची प्राप्ति होण्याला सर्वांना सारखाच मार्ग या मोक्षशास्त्रानें मोकळा करून दिलेला आहे.

हिंदुधर्म पौरुषवादी आहे, प्रयत्नवादी आहे; म्हणजे त्यास परमेश्वराचें अस्तित्व मान्य नाहीं असें कोणींही समजूं नये. परंतु परमेश्वर निष्क्रिय असून मनुष्य आपल्या कर्मानें बांधलेला आहे. तो जसें पेरील तसें त्यास फळ मिळेल; परमेश्वर निराकार, निर्गुण व निष्क्रिय असल्यानें कर्मफलाच्या भानगडींत तो मुळींच पडत नाहीं. जो तो आपल्या कर्मफलाचा उपभोगी आहे; अर्थात् कर्म करून स्वाभिप्रायसदृश फल उत्पन्न करणें हें पुष्कळांशीं मनुष्याच्या स्वाधीन आहे. तो आपला पंगुपणा व्यक्त करण्यास केव्हांही तयार नाहीं. 'परमेश्वराला भक्ताचा हट्ट पुरा करणें भाग पडतें.' या साधुसंतांच्या वचनावरून मनुष्य आपल्या भावी सुखाचा स्रष्टा आहे असें म्हटल्यास त्यांत कांहींही वावगें होणार नाहीं. परंतु

ही स्थिति इतर धर्मांत आढळून येत नाहीं. त्यामध्यें ईश्वर हा एकाद्या ऐहिक नृपतीप्रमाणें कल्पिलेला असून मानवी मनोधर्माचे आरोप त्याच्या ठिकाणीं केलेले आहेत. अर्थात भक्त हा आत्मनिष्ठ व प्रबल व्यक्ति कल्पिलेली नसून त्याच्या बऱ्यावाईट कर्मांबद्दल तो ईश्वराच्या न्याय, दया, कारुण्य इत्यादि भावनांवर पूर्णपणें अवलंबून रहातो असें मानलें आहे. त्याच ठिकाणीं हिंदुधर्माचा व इतर धर्मांचा विरोध येऊन याच्याच योगानें त्यास वैशिष्ट्य प्राप्त झालेलें आहे.

परमेश्वराचें खरें ज्ञान प्राचीन ऋषींस झालें होतें अशाबद्दलचीं उदात्त, स्पष्ट व गंभीर वचनें त्यांच्या अनेक ग्रंथांत पहावयास मिळतात; व संस्कृत भाषेंतील हे ज्ञान, वचनें व विचार इतर कोणत्याहि भाषेंत इतक्या स्पष्टपणें व सोप्या रीतीनें लिहिलेलीं आढळणार नाहींत. या ज्ञानास ब्रह्मज्ञान असें म्हणतात. " एकमेवाद्वितीयं ब्रह्म " हें वाक्य सर्वतोमुखीं असून वादाच्या वेळीं सर्व भर याच्यावरच असतो. याच्याशिवाय लोकांच्या ध्यानींमनीं इतर कोणताच विषय नसतो. ब्रह्मास सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, सर्वशास्तृ व अनन्त असें मानण्यांत येतें.

" सर्व प्राचीन संस्कृत धर्मग्रंथाना फक्त एकच परमेश्वर मान्य आहे. त्याचें स्वरूप तेजोमय आहे. तत्कालीन प्रत्येक ब्राह्मणाची खटपट, जड व बंधनकारक वस्तुग्रामाच्या संसर्गापासून मुक्त होऊन अशा प्रकाश-तेजोरूप परमेश्वरापाशीं तादात्म्य पावावें म्हणून असे. त्या वेळीं परमेश्वराची जडमूर्ति करून पुजण्याचा प्रघात नव्हता. अथवा प्रतिमापूजेची वहिवाट मनूच्या काळापर्यंत मुळींच रूढ नव्हती. श्राद्धकर्म हीं हिंदुधर्मांतिल एक महत्त्वाची संस्था आहे. प्रो. मॅक्समूलर म्हणतो कीं, " अजून हिंदु लोकात श्राद्धकर्मांची परंपरा नष्ट झालेली नाहीं. त्यांतील उदात्त हेतु, गंभीर विचार व थोर कल्पना यांची जाणीव जरी फार थोड्यांस असली तरी ती चाल अजून अव्याहत चालत आलेली आहे. अंत्यविधि, अंत्येष्टि, दहनकर्म इत्यादि शब्द हिंदूंच्या कानास कटु व अमंगल लागतात. याचें कारण मानवी जीवनाच्या ऐहिक थोरवीबद्दल व भावी उत्कर्षाबद्दल त्यावे ठिकाणीं पूर्ण निष्ठा असते. माता, पिता, पुत्र यांच्या पुण्यस्मरणाचा श्राद्धरूप प्रसंग न पाळण्यानें खरोखर मोठी धार्मिक हानीच होणार आहे. सबब ही चाल जितकी दृढमूल होईल तितकी, धर्माचरणास बळकटी येऊन मानवी जीवनाबद्दल गांभीर्य व उच्चताप्रधान भावना या सुविरूढ होऊन समाजस्थैर्यास निःसंशय मदत होणार आहे. "

आता या गोष्टीसंबंधीं मतभेद असूं शकेल. परंतु जगच्चालक परमेश्वराशीं

तादात्म्य पावण्याचा स्थिति प्राप्त होण्यास शरीर हें अत्यवश्य साधन आहे असें जोंपर्यंत प्रत्येकाचें प्रामाणिक मत असेल, तोंपर्यंत त्याच्या उपजत पंगूस्थितींत निष्काम बुद्धीनें जीवाची पर्वा न करितां त्यास वाढविण्याची जबाबदारी ज्यांनीं मोठ्या आनंदानें पत्करली, ऐहिक व पारलौकिक सुखसेवनास त्यास समर्थ करण्याची ज्यांनीं अहर्निश खटपट केली, त्या पूज्य मातापितरांचें पुण्यस्मरण केल्यानें खात्रीनें हितच होईल. व अशा तऱ्हेनें कृतज्ञता व्यक्त केल्यास त्यांत काय गैरवाजवी होणार आहे ?

आतांपर्यंत निवेदन केलेल्या सर्व विशेषांत पुढील विशेष फारच उत्तम, मनोग्राही व ढोबळ असून त्याची सर इतरत्र कोठेंही आढळून येणार नाहीं. हिंदुधर्माची रचना शास्त्रशुद्ध पायावर झालेली आहे. ज्या वेळीं चालू हिंदुधर्माची रचना झाली त्या वेळीं अर्वाचीन भौतिक शास्त्रें व ज्ञानपर्वतांच्या कोणत्या निबिड व भयाण गुहेंत आपलीं तोंडें खुपसून बसलीं होतीं कोणास ठाऊक ? परंतु वेदद्रष्ट्या ऋषींचें ज्ञान इतकें अमोघ व बिनचूक आहे कीं, त्यांत अजूनपर्यंत कोठेंही न्यूनपणा आलेला कोणासही स्मरत नाहीं. ऋषींच्या सृष्ट्युत्पत्तीच्या कल्पना व ईश्वराविषयींच्या कल्पना, यांचा आधुनिक भौतिक शास्त्राशीं काडीमात्र विरोध नसून त्यांच्या योगानें ह्या विचारास व कल्पनेस उलट बळकटीच आलेली आहे. असा विलक्षण योग इतर कोणत्याच धर्मांत पहावयास मिळत नाहीं. तत्त्वज्ञान, शास्त्रें व ईश्वरोत्पत्ति आणि जगदुत्पत्ति याविषयीं ठाम झालेल्या समजुती यांत अणुमात्र सुद्धां फरक आढळून येऊं नये हाच हिंदुधर्मांतील अपूर्व प्रकार होय. याचमुळें आर्यावर्तास सर्व धर्मांची जननी अशी संज्ञा आहे. नोहाचा प्रलय, माता मेरीची कौमार्य स्थिति, महंमदाचें सगर्व स्वानुयायांस आश्वासन, ख्रिस्ताचे प्रलयानंतर न्यायदान, इत्यादि कुरण व बायबलांत दिसून येणाऱ्या तत्त्वज्ञानविरोधी गोष्टी वेदांत मुळींच आढळत नाहींत. वेद व उपनिषदें यांतील तत्त्वे कोणत्याहि निकषावर घासून पाहिलीं तरी त्यात अणुमात्र हिणकस द्रव्य आढळणार नाहीं व याच कारणानें आज हजारों वर्षे अनेक रजोगुणी व सशस्त्र धर्मवीरांस तोंड देऊन हा धर्म अवनितलावर गंभीरपणानें आपला उपदेश जगतास करीत आहे. जगांतील अर्धे लोक याचे पक्के अनुयायी असून इतर अर्ध्याहून कमी असणाऱ्या लोकांनीं याचा उपदेश स्वीकारून आपल्या धर्मास मात्र निराळें नांव दिलें आहे. त्यांचें निशाण जरी भिन्न दिसलें तरी मुळांत याच गुरूपाशीं त्यांचा अभ्यास झालेला आहे असें पूर्णविचारांतीं दिसून येईल. खऱ्या गुरूला

आपल्या बहुश्रुत व पंडित शिष्याकडून पराजय होण्यांत मोठें भूषणच वाटतें. तीच स्थिति आर्यधर्माची आहे. हा शमप्रधान, गंभीर, पूर्ण ज्ञानी गुरु असल्यानें त्यास इतर शिष्यसम धर्माकडून पराजय होण्यांत आनंदच वाटला आहे. परंतु तामसी व अपरिपक्व धर्मांनीं पितृरूप हिंदुधर्मावर शस्त्र उगारून त्याचा छल केला आहे. यांची शिष्यपरंपरा वाढविण्याची पद्धत म्हणजे समशेरदर्शन, अडवणूक आणि फसवेगिरी ! असा प्रकार आर्यावर्तांत कोठेंही पहावयास मिळणार नाहीं. इतर धर्मांत असहिष्णुतेचें बंड विलक्षण असून तत्त्वज्ञानी व शास्त्री लोकांचा छल वेदेतर धर्मांनीं केलेला सर्वत्र पहावयास मिळेल. गॅलिलिओ, कोपरनिकस, ब्रूनो इत्यादि तत्त्वज्ञानी लोकांचे बळी या लोकांनीं घेतलेले आहेत, परंतु त्याच्याच काळीं हिंदुस्थानांत झालेल्या सर्व प्रकारच्या मताभिमानी लोकास यत्किंचित् सुद्धा त्रास पोंचला नाहीं. यावरून वैदिक धर्माची सात्त्विकता, बळकटी, आत्मश्रद्धा, तात्त्विक विशुद्धता इत्यादि गुणांची परीक्षा होणार आहे. हिंदुधर्मानें उपदेशकाच्या टोळ्या करून परकीयांस ' दे माय धरणी ठाय ' केले नाहीं अथवा अडाणी, गरीब, नडलेल्या लोकास नाडून नाखुषीनें त्याच्या गळ्यांत परकीय धर्माचें लोढणें अडकवून दिले नाहीं. डेला व्हेली नामक एका प्रख्यात ख्रिस्तभक्तानें आपल्या ' पूर्वहिंदुस्थानची सफर ' या पुस्तकात बरोबर हेच विचार प्रदर्शित करून हिंदी लोकांस दुष्काळानें अनाथ व अन्नान्न करून सोडले नसते तर येथें एकही ख्रिस्त ठेवण्याची जरूरी नव्हती अशी स्पष्ट कबूली दिली आहे.

'नाइन्टींथ सेंचरी' नामक प्रख्यात मासिकांतील जसींच्या काउन्टेसचे खालील विचार मननीय आहेत:—

"हिंदुस्थानांतील उच्च जातींतील विचारवान् लोकाना ज्या शंका येतात व भीति वाटते त्याचे निरसन ख्रिस्ती धर्मानें होणें ही अशक्य गोष्ट आहे. मनांत उद्भवणाऱ्या अत्युच्च आशा व त्यांची तृप्ति करण्यास उपनिषदें पूर्ण समर्थ आहेत. प्राचीन ऋषींचें सूक्ष्म तर्कशास्त्र हा एक अभेद्य तट असून त्यातील वादविवाद व विवेचनपद्धति हिंदू तत्त्वज्ञानाचें पूर्ण संरक्षण करण्यास पुरेशी आहे. जगामध्यें दिसून येणारी विषमता, सुखदुःखाची व्यस्त प्रमाणात झालेली वांटणी हे प्रश्न कर्माच्या तत्त्वानें सोडविलेले आहेत. आत्म्याची खळबळ व तळमळ शांत करण्यास एका विशिष्ट मूर्तीवर ध्यान देऊन बसावें हा उपाय सांगितलेला आहे. पुढें ही प्रतिमा बिंदुसमान कल्पून नंतर कांहीं दिवसांनीं तो बिंदु आपणामध्येंच आहे अशी भावना करण्याचा प्रयत्न करावा. हा प्रयत्न सिद्ध झाला म्हणजे मन

आत्मविचारांत दंग होतें व अशा वेळीं ऐहिक इच्छा व सुखलालसा पार मावळून मन आत्मिक प्रेमानंदांत पोहूं लागतें. हिंदू तत्त्वज्ञानाची ही स्थिति म्हणजे परमावधि होय; परंतु अशा अत्युच्च आर्यतत्त्वज्ञानानें सुद्धां ज्यांचें समाधान होत नाहीं अशांस ख्रिस्ती धर्म कसें समाधान देणार? ख्रिस्ती धर्मामध्यें इतकी योग्यता थोडीच असणार!"

अर्वाचीन भौतिक शास्त्रांशीं कोणत्याहि एका तत्त्वज्ञानाचा पूर्ण मेळ असेल तर तो आर्यतत्त्वज्ञानाचा होय. बुद्धाचें तत्त्वज्ञान मूलतः आर्यतत्त्वज्ञानापासून भिन्न नसल्यानें त्याचा विचार करण्याचें कारणच नाहीं. आर्यतत्त्वज्ञानानें व धर्मानें बहुतेक सर्व जगावर आपला अंमल बसाविला आहे. "आर्यांच्या वसाहती" या प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें जगाच्या सर्व भागांत आर्य लोक पसरून ते तेथें वसाहती करून राहिले आहेत. अर्थात् त्यांच्याबरोबर त्याचा धर्म व तत्त्वज्ञान जाणें हें अगदीं साहाजिक आहे. परंतु जरी थोडा वेळ हा विचार बाजूला ठेविला तरी सध्याच्या सर्व जगाच्या लोकसंख्येवरून अर्ध्यापेक्षां अधिक संख्या हिंदुधर्मी असून बाकीची ख्रिस्ती, मुसलमानी, ज्यू व रानटी अशी आहे.

सध्यां सर्व जगाची लोकसंख्या ठोकळ मानानें एक (१०००००००००) अब्ज आहे असें धरलें तर फक्त त्यांपैकीं हिंदू व बौद्ध धर्मी मिळून ५३००००००० आहेत व बाकीचे ४७००००००० अहिंदू आहेत. ख्रिस्तभक्त बोर्डे म्हणतो कीं, "हिंदु तत्त्वज्ञान व धर्म यांचें प्राबल्य जगाच्या अजून बऱ्याचशा भागावर असून जपान, चीन, तार्तरी, हिंदुस्थान, ब्रह्मदेश, सयाम, सिंहलद्वीप, इत्यादि ठिकाणीं हिंदूपद्धतीनेंच पूजाअर्चा चालू असून विचार व भावना यांजवरही त्यांचेंच प्राबल्य आहे." जे धर्म प्रत्यक्षपणें हिंदुस्थानांत उगम पावले नाहींत त्यांचेवरही हिंदू विचारांचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. जॉनस्टनी म्हणतो कीं, 'बौद्ध धर्माचीं तत्त्वें बहुतेक इतर सर्व धर्मांत मिसळलेलीं आढळून येतात. ज्यू लोकांतील मोझेजसंबंधींची जगदुत्पत्ति व हिंदूची जगदुत्पत्ति यामध्यें मुळींच फरक नसून वास्तविक पहिली दुसरीपासून निघालेली स्पष्ट दिसते.'

ख्रिस्ती धर्मांत 'ग्रीक चर्च' या नावाचा एक पंथ आहे. त्याची प्रिन्सेपने पुढीलप्रमाणें उपपत्ति दिली आहे

"ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्याच्या वेळीं कांहीं बुद्ध भिक्षु धर्मांतर करून युरोपांत येऊन राहिले. तेव्हां त्यांचे बरोबर हल्लीं 'ग्रीक चर्च' पंथांत रूढ असलेले धार्मिक आचार व सण हिंदुस्थानांतून बाहेर गेले. हिंदुस्थानांतूनच राज-

सत्तात्मक राज्यकारभारपद्धति, प्रार्थना, आन्हिक धार्मिक क्रिया, महाजन मंडळें, अस्थिपूजा, चमत्कार, वेष, मुंडन इत्यादि प्रकार युरोपांत प्रविष्ट झाले."

ख्रिस्ती धर्म उदयास येण्यापूर्वी शेंकडों वर्षे जे ऋषि होऊन गेले त्यांचेच शब्द व वचनें कित्येक ठिकाणीं बायबलांत आलेलीं दिसतात. 'दुसऱ्यांनीं तुजपाशीं जसें वागावें अशी तुझी इच्छा असेल तसेंच तूं दुसऱ्याशीं वागत जा.' हें बायबलातील अगदीं वेदतुल्य वचन आहे. आतां याज्ञवल्क्याचें वचन पहा. 'हा आश्रम आमचा नव्हे; ज्या जड शरिराने आम्हास धर्माचें आचरण करितां येतें त्याचा रंग तयार होणें हें तरी आमच्या मुळींच स्वाधीन नाहीं. शरीर असेपर्यंत फक्त धर्मानें वागणें आपलें कर्तव्य आहे. म्हणून आपणास जें आवडणार नाहीं ते आपण दुसऱ्यास तरी कसें द्यावें?'

ऋग्वेदांत सर्व धार्मिक आकांक्षाचें फारच उदात्त व गंभीर उच्चारण झालें आहे त्यामुळें जी संस्कृति आर्यावर्तांत पसरली तीच आज आपणांस सर्वत्र पसरलेली दिसते असें डेल्वॉस म्हणतो.

ज्याप्रमाणें रेशमाचे किडे अगर फुलपाखरें यांची पहिली व दुसरी अवलाद यात मुळींच संबंध नसतो तशी मनुष्यजातीची स्थिति नाहीं ही जात प्रगमनशील व बुद्धिमान असल्यानें हिच्या एका पिढीचा व दुसऱ्या पिढीचा अनेक गोष्टींमुळें संबंध जडलेला असतो अथवा दुसरी पिढी मागील पिढीचे गुणदोष घेऊन येते, त्याचप्रमाणें धर्माची स्थिति आहे. एक धर्म पार नष्ट होऊन दुसरा उत्पन्न झाला; पाहिल्याचा दुसऱ्याशीं काडीमात्र संबंध नाहीं, असे कधीही होणें शक्य नाहीं. जगातील ज्ञानपरंपरेस व अभिवृद्धीस असे झाल्यानें मोठाच धोका येईल. प्रत्येक तरुण नव्यानें शिकावयाची पाळी येईल; मागील आम्हास कांहीं नको असे म्हटल्यास आज जगाची जी सुस्थिति दिसते तिच्या अत्यल्पांशाइतकी सुद्धा ती झाली नसती. म्हणून जो धर्म अस्तंगत होतो तो भावी वर्धिष्णु, तडफदार, जोमदार आपल्याला पुढें करून आपण मागें सरतो. भारतवर्षांतून इजिप्शियन धर्म निघाला; इजिप्शियन धर्मावरून मोझेसनें आपलीं ज्यू धर्मशास्त्रें तयार केलीं व या शास्त्रांवर ख्रिस्ती धर्माची उभारणी झाली. पारशी धर्म, ज्यू लोकांचा धर्म व ख्रिस्ती धर्म यांतून महंमदी धर्माचा उदय झाला.

बौद्ध धर्म म्हणजे ब्राह्मणी धर्माविरुद्ध शुद्ध बंड होय. या योगे त्याला क्रान्तिकारक रूप जरी आल्यासारखें भासलें तरी ज्या कारणांकरितां हें बंड उभारलें

गेलें तों कारणें नाहींशीं झाल्याबरोबर भिन्न नांवानें पूर्वीचा हिंदुधर्म वावरूं लागला व एवढ्या नाममदानें जेव्हां तो बेहोष झाला तेव्हां श्रीमच्छंकराचार्यांनीं त्याचा गर्वपरिहार करून हिंदुधर्मास मूळ सिंहासनावर पुन्हां आरूढ केलें.

हिंदुधर्म अथवा वैदिकधर्म आणि बौद्धधर्म यांमध्यें समान तत्त्वें कोणतीं आहेत तीं पाहूं. (१) दोघांनाहि वेदांचें जनकत्व मान्य आहे, (२) दोघांनाहि त्रिमूर्तीची कल्पना पसंत आहे; मात्र प्रत्येकांतील मूर्ति निराळ्या आहेत. (३) उभयतांना पुनर्जन्म (४) व आत्म्याचें परमात्म्यांत विलीन होणें या गोष्टी मान्य आहेत.

भेद पुढीलप्रमाणें आहेतः—(१) वेद अपौरुषेय नसून अत्युच्चदर्जाची महासिद्धान्तसंस्थापक पुरुषाची ती कामगिरी होय, (२) चातुर्वर्ण्याची संस्था मान्य नाहीं. (३) दुय्यम देव व उपदेव हे मान्य नसून ते फक्त पुण्यपुरुष व धर्मसुधारक होत. (४) देवाच्या कल्पनेत फार अंतर आहे.

सर आर्नोल्डच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे निर्मर्याद विश्वप्रेमाचें अखंडत्व, विश्वाच्या आत्यंतिक सुखाच्या व स्वातंत्र्याच्या आशेचें अमरत्व व वैय्यक्तिक सुखाचा निरास आणि विश्वव्यापक प्रेममय आशेचें अनंतत्व हें बौद्ध धर्माचें विशेष होत.

अशा जगत्प्रेमी बौद्ध धर्माचा अंमल ब्रह्मदेश, सयाम, हिंदी आचिंपेलागोमधील बहुतेक बेटें, सिंहलद्वीप, तिबेट, मंगोलिया, जपान, नेपाल, भूतान या देशांत चालू काळांत सुरू आहे व एका काळीं तो सर्व पृथ्वीवर पसरला होता असें मानण्यास कारणें आहेत. तुर्कस्तान, इराण, इजिप्त, रोम स्कान्दिनाव्हिया व ब्रिटिश बेटें यांमध्यें तर तो बहुत करून चालूच होता.

जन्स्टर्न म्हणतो कीं, "आसाम, पेगू, आव्हा व सीलोन येथें बुद्धास गोदाम म्हणतात; सयामांत समन; जपानात अमिध बुद्ध, चीन व कोरियामध्यें फो अथवा फाहीं; बंगाल व नेपालमध्यें शाक्यसिंग; भूतानमध्यें धर्मराय; तिबेटमध्ये आदिबुद्ध व महामुनि; आणि मंगोलियामध्यें शाक्यमुनि" अशीं देशपरत्वें नांवें आहेत.

इ. स. ६५ सालीं मिंग्टी बादशहाच्या कारकीर्दीत "भारण" व "मतंग" या दोन बौद्ध भिक्षूंनीं चीनमध्यें प्रथम बौद्ध धर्म नेला. ते मुळचे पंजाबांतील तक्षशिलेचे राहिवाशी होते. चिनांतील "गीती" व ग्रीसमधील "स्किथी" हे एकच असून ते शाक्यकुलाचे मूळ उत्पादक असावेत असा कांहींजणांचा तर्क आहे.

बौद्ध धर्माचा विस्तार सर्व जगभर झाला असें जर कोणीं म्हटलें व त्याच्या स्पष्टीकरणार्थ उदाहरणें दिलीं नाहींत तर हल्लींच्या चिकित्सक काळात त्यांवर कोणीही विश्वास ठेवणार नाहीं; व त्याच्या म्हणण्याकडे कोणी लक्षही देणार नाहीं. उदरनिर्वाहाच्या प्रश्नानें सर्व लोकांचीं मनें अगदीं उत्फुल्ल भरून गेलीं असता, दिवसेंदिवस जीवनकलह फार बिकट होत असतां, वाङ्मय विषयाकडे कोणास लक्ष देण्यास सवड आहे? पूर्वपरंपरा, इतिहास, प्राचीन वैभव, पूर्वजांची कीर्ति व पराक्रम हे विषय मनुष्यमात्रास प्रिय आहेत, परंतु त्यांचा अभ्यास करण्यास शेकडा एकदोघांना सुद्धा फुरसत नाहीं; सबब करमणूक व परिश्रमरहित ज्ञानप्राप्ति होण्याला लेखकाची लेखणी अधिकारी व विषयाची मांडणी चित्ताकर्षक, मुद्देसूद व समर्पक पाहिजे. स्वतःसंबंधाने कोणालाही कांहीं लिहिता येणें जरी अशक्य नसलें तरी अवघड आहे. सबब आत्मश्लाघेचा दोष स्वीकारण्याऐवजी प्रस्तुत विषयावर (बौद्ध धर्माचा जगद्व्यापं) आणखी कांहीं विश्वसनीय माहिती देणें बरें.

बुद्धदेवाच्या पादुका हिंदुस्थान व बाहेर ठिकठिकाणीं आढळून आल्या आहेत. अशा आजपर्यंत सहा पादुका उपलब्ध आहेत. त्या साधारणतः डोंगरांतील खडक व कातळ अशा ठिकाणीं खोदलेल्या आहेत. बौद्ध लोकांची अशी समजूत आहे कीं, जोपर्यंत अशा पादुका अस्तित्वांत असून लोक त्यांचें दर्शन घेत आहेत तोंपर्यंत महापूर, प्रलय, उल्कापात वगैरे पंचभूतात्मक आपत्तींपासून भीति नाहीं. अशा पादुकाची एक जोडी मक्केस आहे व महंमदी धर्माचा उदय होण्याच्या पूर्वी तेथे अनेक बौद्ध यात्रेकरू जात असत. या पादुकास फ्राबत् असें म्हणतात. अरबस्थानात बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता हें वरील उदाहरणावरून दिसून येईल. इजिप्तमध्ये नाईल नदीच्या काठीं सुद्धा हा धर्म पसरला होता. इजिप्ती लोकांचे 'हर्मीज' नावाचे पवित्र धर्मग्रंथ आहेत. त्यामध्ये बौद्ध धर्मांतील बहुतेक तत्त्वें गोवलेली आहेत. पुनर्जन्म, पूर्वजन्म, मानवी आत्मा परमेश्वरी अंश आहे व येथील यात्रा संपविल्यानंतर तो परत परमात्म्यात विलीन होतो इत्यादि तत्त्वें स्पष्ट वैदिक व बौद्ध धर्मांतील असल्याने व तींच इजिप्ती लोकांच्या पवित्र धर्मग्रंथात आल्यानें वरील अनुमानास पूर्ण दृढता येते. याशिवाय ही तत्त्वें हर्मीज व बॉड याच्या संवादात आहेत. आतां बॉड हा बॉद्ध व बुद्ध अशा परंपरेनेंच सिद्ध झालेला शब्द आहे हें कोणाही विचारी माणसास दिसल्याशिवाय राहणार नाहीं. पिमाडरचें "हर्मीज" "ट्रिसमेजिस्टस" या नांवाचें संवादात्मक दुसरें

एक इजिप्शी पुस्तक आहे; त्यांत त्रिमूर्तीच्या तत्त्वावर पिमँडर व थॉइ यामध्ये झालेला संवाद दिला आहे. खाल्डियन, बॅबिलोनियन, कॉल्डीसचे लोक, व आसिरी यांजमध्यें बौद्ध धर्माचा पूर्ण प्रसार झाला होता, इत्यादि माहिती जॉन्स्टर्ना याचे पुस्तकांत दिली आहे. आरामांतील सामाराइट लोक व पॅलेस्टाईनमधील इसेनी लोक हेही बुद्धानुयायीच होते. इसेनी लोक बाह्यतः जरी ख्रिश्चन होते तरी त्यांचे सर्व आचार बौद्ध धर्मानुकूल होते व ख्राइस्टला ते बुद्धदेव मानीत असत.

ग्रेटब्रिटनमधील ड्रुइड हे आपले कर्डील ब्राह्मण जातीप्रमाणे श्रेष्ठ वर्णाचे लोक होते. त्याच्यामध्यें पूर्वजन्म, पुनर्जन्म, आत्म्याचें व परमात्म्याचें संमेलन हीं तत्त्वें असून उत्पादक, संरक्षक, विनाशक या तीन धर्माच्या देवाचें त्रिकुट आपल्याकर्डील त्रिमूर्तीप्रमाणेंच होते. हे लोक पुढें ग्रेटब्रिटन सोडून सीझरच्या स्वारीपूर्वी फ्रान्स, जर्मनी, स्पेन इत्यादि देशामध्ये उपदेश करण्याकरिता गेले. त्यांचा हा सर्व कारभार ख्रिस्ती धर्माच्या पूर्वकालीन होता. त्याच वेळेला स्कादिनाव्हिया व पूर्व आशियांत आल्ताई पर्वतापर्यंत बौद्ध धर्माचा विस्तार झाला होता,त्यावरून हे ड्रुइड लोक सुद्धां बुद्धानुयायीच असले पाहिजेत, असें वाटतें. स्कांदिनाव्हियाच्या द्वीपकल्पांत बौद्ध धर्माचा मूळ संस्थापक ' व्होडिन ' या नांवाचा होता व त्यास अर्वाचीन भाषेंत ' ओडिन 'असें म्हणतात. व्हॉइ, भोइ, बुद्ध या उतरत्या शब्दपरंपरेकडे लक्ष दिलें तर बुद्ध या शब्दास ' इन् ' हा प्रत्यय लागून व्होडिन् हा शब्द सिद्ध झाला असें वर वर पाहणारासही दिसून येईल. ज्या ज्या देशात बौद्ध लोक जाऊन राहिले व जेथें त्यांनीं देशपरिस्थितीप्रमाणे हिंदुशास्त्राच्या आधारावर ज्या ज्या पुराणकथा, धार्मिक प्रमेयें व शास्त्रीय सिद्धांत प्रस्थापित केलें त्यामध्यें व प्रत्यक्ष हिंदुधर्मशास्त्र, पुराणें, व तत्त्वज्ञान यांमध्ये निकट साम्य आढळून यावें यात काय आश्चर्य ? बौद्ध धर्म झाला तरी हिंदुधर्माचा सुधारलेला प्रकार असें असल्यानें बौद्धधर्मांकित सर्व देशांतील शास्त्रें,पुराणें व तत्त्वज्ञान यात एकवाक्यता व एकरूपता दिसून येणें हें क्रमप्राप्तच आहे. स्कान्दिनाव्हियांतील ग्रंथांत तर हें साम्य इतकें दिसून येतें कीं, हिंदूंचें तेथें स्थलांतर व निवास या गोष्टी मान्य केल्याशिवाय हें कोडें केव्हांच उलगडता यावयाचें नाहीं. कर्नल टॉड् म्हणतो कीं, ' हिंदुस्थानामध्यें स्वारी करणारे सर्व इंडोसीथियन योद्धे हे बुद्धधर्मी असल्याने त्यांच्यामध्यें व रजपुतामध्यें चालीरीती व पुराणकथा यांमध्यें अगदीं जवळचें साम्य दिसते.

स्कान्दिनाव्हियांतील लोकांच्या पवित्र धर्मग्रंथांना " एड्डा " असें म्हणतात. वेद व एड्डा या दोन शब्दांमध्ये उच्चार-साधर्म्य स्पष्टच आहे; परंतु त्यातील विषयामध्यें जी एकरूपता आहे ती खाली दिली आहे.

(१) गंधर्वांनीं, यक्षांनीं वगैरे देवकोटींतील स्वर्गस्थ राहिवाश्यांनीं ब्रह्मदेवाला जे प्रश्न केले आहेत व त्यांस ब्रह्मदेवानें जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांच्या सारखींच प्रश्नोत्तरें ' एड्डा ' मध्ये आहेत.

(२) एड्डामध्यें असलेला " मिडगार्डचा सर्प " व वेदांमधील विष्णूचा शेषनामक सर्प हे सारखेच दिसतात.

(३) हिंदु कालमानाप्रमाणे कालाचे चार विभाग कल्पून त्यांपैकीं प्रत्येकास युग अशी संज्ञा देण्यांत आली आहे. कृत, त्रेत, द्वापार व कलि अशीं तीं चार युगे होत त्यांपैकीं कलियुगावीं ४३२००० वर्षे असतात; या संख्येस २, ३, ४ यांनीं गुणलें असतां अनुक्रमें द्वापार, त्रेत व कृत या युगाचीं वर्षसंख्या मिळते. आता आपण एड्डाकडे पाहूं. त्या ग्रंथात " बाल हॉल " नामक राजवाडा असून त्यास ५४० दरवाजे आहेत.यातील प्रत्येक दरवाज्यांतून ४३२००० शूर देव-सैनिक राक्षससाशीं झगडण्याकरिता बाहेर पडतात असें वर्णन केलें आहे. आता हे रूपक काढून टाकले असतां ४३२००० ही सैनिकसंख्या कलियुगाच्या वर्षसंख्येशी बरोबर मिळती आहे असें स्पष्ट दिसते. यावरून उभय धर्मामध्यें युगसंख्या सारख्या आहेत असें अगदीं उघड आहे.ह्या चार प्रमाणांनी व वेद आणि ' एड्डा ' याच्या सादृश्यानें स्कादिनाव्हियामध्यें बुद्धाचा धर्म दृढमूल होऊन फार दिवस नादला होता असे स्पष्ट दिसतें.

एवढा वेळपर्यंत स्कान्दिनाव्हिया व भारत वर्ष यातील दोन धर्मांत असलेलीं समान स्थले, समान तत्त्वे, सारख्या कल्पना, सदृश चालरीती, अभिन्न पुराणकथा, एकरूप तत्त्वज्ञान यांचें दिग्दर्शन केलें. तींच पद्धत इजिप्त व भारत वर्ष यास लावून त्यापासून हिंदुस्थानांतून बौद्ध धर्म इजिप्तमध्यें कसा गेला, त्याचा विस्तार व व्याप तेथें कसा वाढला हें स्पष्टपणें कळण्यास जीं साधने उपलब्ध आहेत त्याकडे अनुक्रमानें वळूं.

दोन्ही धर्मांत प्रथमतः एकच ईश्वर असे मानलें असून पुढे तत्त्वज्ञानाचा ऱ्हास होत जाऊन ईश्वराच्या असंख्य मूर्ति मानण्यात येऊं लागल्या. पूर्वीचा उदात्त विश्वव्यापी ईश्वराची कल्पना बिघडून जाऊन हजारो रूपें ईश्वरास देण्यात आली. ईश्वर विश्वव्यापी अद्वितीय असून गुणभेदाने प्रथम त्यास तीन स्वरूपें देण्यात

आलीं. इजिप्ती व आर्यधर्म या दोघांनाही ही त्रयी संमत आहे. पूर्वजन्म, पुनर्जन्म, चातुर्वर्ण्य, हिंदूंचा ओंकार, व इजिप्ती लोकांचा अॅमन्; उभय देशांतील कमलाकार सूर्यमंडळाची कल्पना, अमरत्वनिदर्शक चिन्हें; वंध्या स्त्रियांच्या नवसाचा प्रकार, गंगानदीवर ठिकठिकाणीं शिवालये असतात, त्यांचे सारखेंच नाइल नदीवर शिवलिंगाकार ' फॅलस ' चीं देवळे इत्यादि साम्यस्थळें पाहिली म्हणजे इजिप्ती धर्माची उत्पत्ति हिंदू धर्मापासूनच झाली असली पाहिजे याविषयीं बिलकूल शंका रहात नाहीं. याखेरीज जानस्टर्नानें पुढील तीन चार उदाहरणे त्याच सिद्धांताच्या बळकटीप्रीत्यर्थ दिलीं आहेत.

(१) हेरोडोटस, प्लेटो, पाययागोरस, सोलन, फिलॉस्ट्रेटस इत्यादि पंडितांनीं याच प्रश्नास दुजोरा दिला आहे.

(२) इजिप्तच्या दक्षिण भागांतील देवालयांपेक्षा उत्तर इजिप्तमधील देवालयें जास्त जुनीं, थीब्स, एलिफंटाईन येथें असलेल्या देवालयांपेक्षां मेम्फीसमधील जास्त जुनीं; थीब्सचीं देवालयें टॉटेरा व अबिडॉस येथील देवालयांपेक्षां पुराण, आणि टॉटेरा व अबिडासचीं मेंफिस, हेलिओपालीस व साईस यापेक्षां प्राचीन; अशी एकापेक्षां एक जुनेपणात देवालयाची परंपरा आहे; परंतु ही सर्व हिंदू देवालयांची नक्कल आहे असें नाभर, व्हेर्लेन्शया, च्यापोलियन व वॉर्डिंग्टन या विद्वानांचें म्हणणें आहे.

(३) जोसेफस्, आफ्रिकॅनस, युसेबियस यांस अबिडॉस व साईस या देवालयांत जीं जुनीं कागदपत्रें सांपडलीं तीं त्यांनीं काळजीपूर्वक वाचून, अभ्यास करून जतन करून ठेविलीं; तीं क्रमाक्रमाने आपणास उपलब्ध झालीं आहेत; त्यांवरून पाहता प्रस्तुत सिद्धान्त जास्त दृढ होतो.

(४) मानेथोनें इजिप्तच्या राजाच्या ज्या वंशावळी दिल्या आहेत, त्यावरून कालगणना केली तर हिंदू कालगणना कोष्टकाच्या कितीं तरी नंतर हा इजिप्तमधील काल येतो, व यामुळें हिंदुस्थानांतून बौद्ध धर्म इजिप्तमध्यें गेला असें म्हणण्यास कांहींच आडकाठी दिसत नाहीं.

(५) अबिसीनियांतील ज्यू व ख्रिश्चन याचा पुढील हकिगतीवर फार दृढविश्वास आहे व त्यांच्यामध्यें ही दंतकथा फार प्राचीन कालापासून चालत आली आहे.

" अबिसीनिया व तांबडा समुद्र आणि बाबेलमांडेबची सासुद्रधुनी व दक्षिणेकडील प्रदेश यांमध्यें असणारी पर्वतांची रांग ही नोहाचा नातू कुश व त्याचें

कुटुंब यांचें आद्य निवासस्थान होय. त्यांनी पुढें अब्राहामच्या कारकीर्दीत 'आक्झम' नामक शहर बांधलें व येथून पुढें नाइल व अतबारा या दोन नद्यांच्या संगमापाशीं असलेल्या मेरु बेटापर्यंत नाईलच्या कांठाकांठाने ते खालीं सरकत गेले. " या पुराणकथेचा विचार केला व वर दिलेली इतर सर्व प्रमाणें पूर्णपणें संशोधिलीं म्हणजे हिंदुराष्ट्राचा वडीलपणा पूर्णपणें सिद्ध झाल्याशिवाय रहाणार नाहीं असें जानस्टर्ना म्हणतो.

सृष्ट्युत्पत्तिसंबंधीं बौद्ध धर्मांत पुढील कथा प्रसिद्ध आहे. " स्वर्गांत रहाणारे देव, यक्ष, किन्नर वगैरे आणि भूरणमधील देवदूत व दुष्टग्रम देव हे पृथ्वीवर कधी कधी फिरावयास येत; तेव्हा त्याच्याबरोबर त्याच्या सुंदर व तेजस्वी स्त्रिया असत. मनःशुद्धीमुळें व आत्मसाविध्यानें त्यास कामवासना होत नसे. कांहीं कालानंतर आदिबुद्धाने त्यांचे ठायीं जायफळ खाण्याची प्रेरणा केली; ते खाल्ल्यानंतर त्यांचे ठायीं कामवासना प्रदीप्त होऊन त्यास पृथ्वीवर रहाणेंच बरें वाटूं लागले, आणि नंतर याजपासूनच मनुष्यजातीची उत्पत्ति झाली. "

ग्रीक लोकांची तींच कथा थोडक्यांत अशी आहे:—" त्यांचा देव कोनस याच्या मनांत जगत् उत्पन्न करण्याचें आलें. त्यानें प्रथम दिनरजनीघटित काल निर्माण करून त्याच्या पोटांत एक अंडे ठेऊन दिलें. या अंड्यापासून त्रिमूर्ति उत्पन्न झाल्या व त्यांनी आद्य स्त्रीपुरुष उत्पन्न केले: व या जोडीनंतर सर्व प्रजा निर्माण झाली. "

आता पहिल्या बौद्ध पुराणकथेवरून बायबलांतील व कुराणांतील सृष्ट्युत्पत्ति-कथा रचल्या गेल्या हें अगदीं उघड दिसतें, व दुसऱ्या कथेचा उद्गम हिंदु शास्त्रांतील ब्रह्माण्डाच्या कल्पनेवरून झाला असला पाहिजे, याशिवाय दुसरें अनुमान काढणें अशक्यच आहे.

मॅक्समय्यूलरच्या मतें असीरियन, इजिप्शियन व ग्रीक पुराणांचा पाया हिंदु पुराणेंच होत, व हिंदु पुराणांची सर्व इमारत वेदावर उभारली आहे.

उदाहरणार्थ—ग्रीक पुराणांतील व हिंदु पुराणांतील देवतांचा जो काळजीपूर्वक अभ्यास करील त्यास असें दिसून येईल कीं, भारतीय आर्य ज्या वेळीं येथून ग्रीस देशांत रहावयास गेले त्या वेळीं त्यांनी येथून पुराणें बरोबर नेलीं असलीं पाहिजेत व पुढें क्रमानें या देवतांच्या कल्पनेवर आसपासची परिस्थिति, भूरचना, ऋतुकाल इत्यादि गोष्टी पाहून नवी पुराण-रचना तेथें झाली असावी. कारण पुष्कळ देवतांमध्यें, त्यांच्या पराक्रमामध्यें व एकंदर सर्व कृत्यांमध्यें इतकें तंतोतंत

साम्य आहे कीं, ग्रीक नावें वगळल्यास त्या हिंदू देवताच आहेत असा खात्रीने भास होईल. उदाहरणार्थ:—

ज्युपिटर	=	इंद्र
ज्यूनो	=	दुर्गा, पार्वती (इंद्रायणी)
अपोलो	=	कृष्ण
व्हीनस	=	रति
सिरेस	=	श्री
सिबेल	=	पृथ्वी
नेपच्यून व युरेनियस	=	वरुण
मिनर्व्हा	=	सरस्वती
मार्स	=	स्कन्द
प्लुटो	=	यम
प्लुटस	=	कुबेर
व्हल्कन	=	विश्वकर्मा
क्यूपिड	=	काम
मक्युरी	=	नारद
ऑरोरा	=	उषा
इऑलस	=	वायु
जेनस	=	गणेश
डायोस्कुरी (कॅस्टर व पोलक्स)	=	अश्विनीकुमार
स्टिक्स	=	वैतरणी
ईडा	=	कैलास
ऑलिंपस	=	मेरु

मागे सांगितल्याप्रमाणें रामायण व महाभारत यावरून ग्रीक व इतर स्थित्यन्तर पुराणकथा तयार झालेल्या असाव्यात व हिंदुशास्त्रांतील सर्व देवता पृथ्वीवर निरनिराळ्या नांवांनीं पूजिल्या जातात असें तुलनात्मक अभ्यास करणारास दिसून येईल असें मॉरिस व सर वुइल्यम जोन्स यांचें म्हणणें आहे.

शेवटीं डब्ल्यू. डी. ब्राऊन याचा अभिप्राय देऊन हा ग्रंथ पुरा करूं. " सर्व जगांतील वाङ्मय व ईश्वरोत्पत्तिशास्त्र हें हिंदूंच्याच अखंड परिश्रमाचें फळ होय

असें पूर्वग्रहरहित व निर्विकार मनानें काळजीपूर्वक अभ्यास करणारास वाटल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. ईश्वरोत्पत्तिसंबंधानें हल्ली जगांत रूढ असलेलीं सर्व मतें मूळ हिंदूंच्याच कल्पनेवरून निघालीं आहेत. प्राचीन भारतीयांना मूर्तिपूजा ठाऊक नव्हती, म्हणून ते अविद्य किंवा असंस्कृत नव्हते; त्यांस हल्लीं कांहीं लोक रानटी म्हणतात तसे ते मुळींच नसून त्याच्या ठिकाणीं गाढ विद्वत्तेला शोभणारी व विशाल प्रतिभेला अनुरूप अशी गंभीर कवित्वस्फूर्ति व नितांत आणि अगाध विचारशक्ति वास करीत होती. त्यांच्या वाङ्मयाचे संपूर्ण भाषांतर झाल्यास आधुनिक संस्कृतरूप प्रमदा या जुन्या, टाकाऊ समजल्या जाणाऱ्या वाङ्मयरूप रुचिर, मोहक व सुगंधि पुष्पाकडे साभिलाष दृष्टीनें पाहून त्याच्या प्राप्तीविषयीं आतुर झाल्याशिवाय रहाणार नाहीं असें आजन्म विद्याव्यासंगी प्राच्यविद्याविशारद प्रो. मॅक्समूलर, जेकोलिट, सर विल्यम जोन्स हे छातीठोकपणें सांगतात."

समाप्त.